
ॐ नमो ज्ञानेश्वरा ।
करुणाकरा दयाळा ।।



पारमार्थिक शतकोटी

(भाग - १)

अनुक्रमणिका

१ : गणेश

वक्रतुंड महाकाय सूर्यकोटी समप्रभः।
निर्विघ्नं कुरूमे देव सर्वकार्येषु सर्वदा॥

गणेश स्तवन करून हे पुस्तक लिहिण्याचा प्रयत्न करतो आहे. ज्ञानोबा, एकनाथ, नामदेवराय या संतांनी गणेशस्तुती करूनच ग्रंथाची सुरुवात केली आहे. गणेश ही मानाची देवता आहे. शिवाय देव पंचायतनमध्ये गणेशांची गणना शंकराचार्यांनी केली आहे.

१) गणपती किंवा गणेश - गण तीन आहेत. देवगण, मनुष्यगण, राक्षसगण. या तीनही गणांचा जो ईश त्याला गणेश म्हणतात. तो तीनही गणांचा पती म्हणजे मालक, स्वामी आहे.

२) गणपती देवता शेंदूर रंगामध्ये असते. पौराणिक कारण असे आहे पूर्वी देवांना त्रास देणारा शेंदूर नावाचा राक्षस होऊन गेला. त्यास गणपतीने मारले. त्याचे रक्त (शेंदरी रंगाचे) गणेशांच्या अंगावर उडाले. तेव्हापासून गणपती शेंदरी रंगामध्ये दिसू लागले. शिवाय त्यांना तो रंग आवडता झाला.

३) या देवतेच्या दोन पत्नी आहेत ऋद्धी व सिद्धी ! गणेशाची उपासना करणाऱ्यांना ऋद्धी (भोग) व अनेक सिद्धी प्राप्त होतात.

४) गणपतीचे डोळे बारीक आहेत याचा अर्थ सूक्ष्म नजर. जो सर्वांचा मालक आहे. त्याची सर्वांवर सूक्ष्म नजर हवी. त्याच्या नजरेतून छोटसं पाप किंवा पुण्य सुटू नये.

५) गणपतीचे कान विशाल आहेत. जो सर्वांचा स्वामी आहे. त्याने सर्वांच्या तक्रारी ऐकून घेतल्या पाहिजेत. तो हलक्या कानाचा असता कामा नये.

६) गणपतीचे नाक मोठे आहे. याचं कारण जो सर्वांचा स्वामी आहे तो निरपेक्ष असला पाहिजे. कारभार स्वच्छ असायला हवा.

परमार्थाचे मुख्य बीक। निरपेक्षता तेचि 'नाशिक'।
तेणेविण ते निर्नाशिक। कैसे सुख सापेक्षा॥नाथ. रामायण

नाक म्हणजेच सोंड, थोडी वक्र आहे. याचा अर्थ ज्ञानोबा माऊली सांगतात

जे तुझ्याविखीमूढ। तयालागी तू वक्रतुंड। ज्ञानियासी तरी अखंड। उजूचि आहासी॥

तुला जाणतात, ध्यान करतात त्यांना तू सरळ आहेस पण तुला जाणत नाहीत, मानत नाहीत त्यांना तू वाकडा आहेस. थोडक्यात तू जशांस तसा आहेस.

७) गणपतीचे पोट मोठे आहे. याचा अर्थ जो सगळ्यांचे अपराध पोटात घालतो. माऊलीच्या शब्दात

घेऊनि जळाचे लोट। आलिया नदीनदांचे संघाट । करी वाढ 'पोट'। समुद्र जेवी॥

जो मालक आहे. त्याने सगळ्यांचे अपराध पोटांत घातले पाहिजेत. जसे ओहोळ, ओढे, नद्या या सगळ्यांचे सर्व प्रकारचे कितीही प्रमाणात आलेले पाणी सागर सामावून घेतो. तसे गणेश क्षमाशील आहेत म्हणून मोठे पोट आहे.

८) गणपतीचे शिर हत्तीचे आहे. कारण हत्ती सर्वात मोठा प्राणी आहे. हत्ती बुद्धीमान आहे. शिवाय शाकाहारी आहे. पूर्वी राज्याला वारीस नसेल तर हत्तीच्या सोंडेत माळ देत असत. हत्ती ज्याच्या गळ्यात माळ घालील तो राजा. याच्यातून असा निष्कर्ष निघू शकतो सात्विक व बुद्धीमान यांनी राजा निवडावा.

९) गणपतीचे वाहन उंदीर आहे. उंदीर हा विध्वंसक आहे. उंदीर शेतकऱ्याचे पीक नासतो, श्रीमंताच्या नोटा खातो. बऱ्याच लोकांचे कपडे खातो व गरीबांचे पाय खातो. असा हा उंदीर दुर्बुद्धी असणारा, याच्यावर जो आरुढ होतो तो गणपती. तु. म. म्हणतात.

दुर्बुद्धी ते मना। कदा नुपजो नारायणा॥

महाराष्ट्रामध्ये गणपती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होतो. पण बहुतेक ठिकाणी त्याच्यासमोर नको ते कार्यक्रम साजरे करुन त्याची विटंबना होत आहे. परिणाम गणेशचतुर्दशीला महाराष्ट्रात किल्लारीच्या ठिकाणी भूकंप झाला. मधे गणपती बाप्पाने आपल्या वाहनाच्याद्वारे प्लेग पाठविला. आणखी एक चमत्कार भारतामध्ये पसरला ''गणपती दूध पितो'' याचा अर्थ गणपती उत्सव शास्त्रशुद्ध साजरा व्हावा नाहीतर विघ्न येण्याची शक्यता आहे.

★ ★ ★ ★ ★

२ : नाम

१) मानवी जन्मात माणूस जो ओळखला जातो तो त्याच्या नामामुळे.

उपजलिया बालकाशी। नाम नाही तयापाशी।
ठेविलेनि नावेसी। ओ देत उठी॥ ज्ञाने.

२) व्याकरण शिकताना प्रथम नाम, त्यानंतर सामान्य नाम, विशेष नाम, दर्शक नाम वगैरे

३) लग्नामध्ये पूर्वी नाव घेणे प्रकार होता. वर वधूचे नाव घेत होता. तिला आनंदाच्या उकळ्या फुटायच्या. वधू वराचे नाव घेत असे, तेव्हा वराची छाती आपोआप फुगत होती. आता 'लव्ह मॅरेज' मुळे तो आनंद कमी झाला आहे. महत्वाची गोष्ट, वधू जेव्हा स्वतःचे नाव बदलते. अर्थात नवऱ्याच्या मर्जीप्रमाणे, पुढे वडिलांच्या ऐवजी मालकाचे नाव लिहिते, आडनाव बदलते, तेव्हाच कायद्याप्रमाणे ती अर्ध्या इस्टेटीची मालकीण होते. यदाकदाचित पती निवर्तला तर संपूर्ण

मालमत्ता तिच्या नावे होते. कारण नाव बदलते. तद्वत आपण सतत देवाचे नाव घेतले तर देवाची दैवी संपत्ती आपल्या नावे होते व देव कधी मरत नाही.

एका शाळेत एक सुशिक्षित बाई मुलाचे नाव दाखल करण्याकरिता गेली होती. नवरा ऑफीसला गेला होता. शिक्षकाने विचारले याचे नाव काय? तिने सांगितले रामचंद्र. याच्या बापाचे नाव काय? बाई हुशार होती ती म्हणाली बापाच्या ऐवजी माझे नाव टाका कारण मी यास नऊ महिने वागविले आहे. आतापर्यंत मी याचा सांभाळ केला मग वडिलांचे नाव का? शिक्षक म्हणाले तुमचे म्हणणे बरोबर आहे पण अद्याप तसा कायदा नाही. आपण सरकारात तशी तक्रार करु शकता. तात्पर्य जेव्हा मुलगा बापाचे नाव पुढे टाकतो. तेव्हाच तो बापाच्या मालमत्तेचा पूर्ण वारसदार होतो. तद्वत आपण सर्व देवाची लेकरे आहोत. जर देवाच्या नावास पुढे ठेवले तर देव आपली सर्व सुख संपत्ती जीवाच्या नावे करणार, अर्थात मानव सुखी होणार.

४) नाम हे सर्व साधकांचे माध्यम आहे. ज्याप्रमाणे मुंबई मधील लोकल नऊ डब्यांची आहे. आता कांही बारा डब्यांच्या गाड्या झाल्या आहेत. त्यामध्ये स्त्रियांकरिता दोन डबे असतात प्रथम वर्ग, द्वितीय वर्ग, पुरुषांकरिता दोन डबे असतात प्रथम वर्ग व द्वितीय वर्ग. दोन मालाचे डबे, पुढे चालक व मागे गार्ड असतो. ज्याचा जसा पास, तिकीट त्याप्रमाणे प्रवास करतात. गती एकसारखी पण स्थिती वेगळी वेगळी. मात्र उतरताना सर्वांना एकच फलाट असतो. फलाटावर उतरल्याशिवाय घरी जाता येत नाही. तद्वत परमार्थात अनेक प्रकारचे साधक आहेत. प्रत्येकाचा अधिकार वेगळा पण 'नाम' फलाटावर उतरल्याशिवाय देवरुपी घरी जाणे शक्य नाही.

५) नाम सर्वात म्हणजे संसारात, रसात, शास्त्रात व साधनात सार आहे. याचा विचार सार कोटीत आला आहे.

६) नाम सर्वात मोठे आहे. पृथ्वीपेक्षा पाणी दहापट आहे. पाण्यापेक्षा तेज दहापट आहे. तेजापेक्षा वायु दहापट आहे. वायुपेक्षा आकाश दहापट आहे. मात्र नाम आकाशापेक्षा अनंतपट मोठे आहे. असे माऊली हरिपाठात सांगते.

ज्ञानदेव पुसे निवृत्तीसी चाड। गगनाहूनि वाढ नाम आहे॥

नामापासून (ॐ कार) आकाश झाले. आकाशापासून वायू, वायूपासून तेज, तेजापासून पाणी व पाण्यापासून पृथ्वी झाली. पृथ्वीपेक्षा पाणी व्यापक व सूक्ष्म आहे. पाण्यापेक्षा तेज व्यापक व सूक्ष्म, तेजापेक्षा वायू व्यापक व सूक्ष्म, वायूपेक्षा आकाश व्यापक व सूक्ष्म मात्र नाम आकाशापेक्षा सूक्ष्म व व्यापक आहे.

७) नामधारक जगात मोठा. नाथ महाराज सांगतात. गावठी एक हजार ब्राह्मण जेवायला वाढले तर पुण्यक्षेत्रीचा एक ब्राह्मण जेवण्याचे पुण्य मिळते (ब्राह्मण मात्र सदाचारी पाहिजे) असे पुण्यक्षेत्रीचे हजार ब्राह्मण जेवले तर एक वेद पाठक जेवल्याचे पुण्य मिळते. वेद पाठकांचे चार

प्रकार वेदी, द्विवेदी, त्रिवेदी, चतुर्वेदी. असे हजार वेदपाठक जेवले तर एक पंडित जेवल्याचे पुण्य मिळते. पंडित त्याला म्हणतात चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणे ज्याची मुखोद्गत आहेत. असे हजार पंडित जेवले तर एक संन्यासी जेवल्याचे पुण्य मिळते. संन्यासी म्हणजे भगवे धारण करणारा नाही. रंग बदलणे दोन रुपयाचे काम आहे. मग संन्यासी कोण?

मी माझे आठवण। विसरले जयाचे अंतःकरण।
पार्था तो संन्यासी जाण। निरंतर॥ ज्ञाने.

मी माझे विसरला तो गृहस्थी असला तरी संन्यासी असे हजार संन्यासी जेवले तर एक परमहंस जेवल्याचे पुण्य मिळते. परमहंस चार आहेत. सत्ययुगात सनकादिक, त्रेतात जनक, द्वापारात उद्धव, कलियुगात शंकराचार्य. असे एक हजार परमहंस जेवले तर एक ब्रह्मज्ञानी जेवल्याचे फळ मिळते. ब्रह्मज्ञानीसुद्धा चार आहेत. नाथांच्या शब्दात

शुक याज्ञवल्क्य दत्त कपिलमुनी। हरिसी जाणोनि हरिच झाले॥

ब्रह्मज्ञानियास जेवायला दिल्यास हरिहर (शंकर, विष्णू) तृप्त होतात. पण असे हजारो नाही अगणित ब्रह्मवेत्ते जेवले तरी नाम धारकाची बरोबरी होत नाही.

ऐसे वेत्ते अपरंपार। नये नामधारका बरोबर।
एका जनार्दनी सादर। पाहे नाम धारक॥

नामधारक कोण? जागृती, स्वप्न, सुषुप्ति या तिन्ही अवस्थेत सतत नामस्मरण करतो तो 'नामधारक'

ओठ कंठ चाले नाही, जिभ्या रटे न राम।
राम हमारा जप करे, हम बैठे आराम॥ कबीरजी

ज्ञानदेवा मौन, जपमाळ अंतरी। (कोण जपतो) धरोनि श्रीहरी जपे सदा॥ ज्ञान.

ही अवस्था. तुकोबाराय म्हणतात

आम्ही नामाचे धारक। नेणो प्रकार आणिक। सर्व भावे एक। विठ्ठलची प्रमाण॥
एकंदर शिक्का। पाठविला इह लोका। आलो म्हणे तुका। मी नामाचा धारक॥

८) काही गोष्टी कधीच करु नयेत. दारु पिणे, जुगार खेळणे, परस्त्री गमन अथवा खोटे बोलणे. धर्मराज एकदाच खोटे बोलले, तेही देवांनी आग्रह केला त्यामुळे. परिणाम स्वर्गात जाताना अंगठा गळून पडला.

"वदविले मुखे नारायणे धर्मा। अंगुष्ठ त्या कर्मासाठी गेला॥" तु. म.

काही गोष्टी कधी कधी कराव्यात. उदा. तिर्थयात्रा, अन्नदान, जे परमार्थास पोषक आहे.

करा जप तप अनुष्ठान याग। संती हे मारग स्थापियेले॥ तु. म.

तिर्थी व्रती भाव धरी रे करुणा। शांती दया पाहुणा हरि करि॥ ज्ञान.

पण नामस्मरण मात्र सतत करावे.

सदा नाम घोष करु हरिकथा। तेणे 'सदा' चित्ता समाधान॥ तु. म.

सुखे सेवू ब्रह्मानंदा। गाऊ रामनाम 'सदा'।
नोहे मग बाधा। काळ दूत यमाची॥ नाथ.

शिवाय नामच सदा घेता येते. बाकी सदा काहीच करता येत नाही. कारण नामास कोणताच प्रतिबंध (अडथळा) नाही. कोणत्याही देशात, कोणत्याही काळात, कोणत्याही अवस्थेत (बालपण, तरुणपण, म्हातारपण अथवा झोपून, बसून, चालत अथवा उड्या मारत) शिवाय शुद्धतेचि एवढी गरज नाही. असे नारद म्हणतात.

न देशकाल अवस्था आत्मशुद्धादिकं अपेक्षते।
किंतु स्वतंत्र एवत नाम कामित कामदम॥ पद्मपुराण
म्हणोनि गोड सर्व भावे। आंघोळी न लगे तोंड धुवावे।
अर्थ चाड जीवे। न लगे भ्यावे संसारा॥ तु. म.

९) नाम सर्वात अगोदर आहे. सकाळी उठल्याबरोबर प्रथम नामस्मरण करावे कारण ते आधी आहे.

आरंभी आवडी आदरे आले नाम। तेणे सकळ सिद्धी जगी झाले पूर्ण काम॥ ज्ञान.

राम राम स्मरा आधी। तु. म.

प्रभाते मनी राम चिंतीत जावा। पुढे वैखरी राम आधी वदावा॥ रामदास स्वामी

भजन किती श्रेष्ठ आहे याकरिता शास्त्रकार सांगतात माणसाने शंभर कामे टाकून भोजन करावे, हजार कामे सोडून स्नान करावे, लाख कामे टाकून दान करावे व कोटी कामे सोडून हरि भजन करावे.

शतं विहाय भोक्तव्यं, सहस्त्रं स्नानं आचरेत।
लक्ष विहाय दातव्यं, कोटीं त्यक्त्वा हरिं भजेत॥ सुभा.

सृष्टीच्या उपक्रमास ब्रह्मदेवानी नाम जपले व त्यांना सृष्टी करण्याची शक्ति प्राप्त झाली. माऊलीच्या शब्दात

सृष्टीचिया उपक्रमा। पूर्वी गा विरोत्तमा॥
वेडा ऐसा ब्रह्मा। एकला होता॥
मज ईश्वराते नोळखे। ना सृष्टीही करु शके॥
तो थोर केला एके। नामे जेणे॥

जयाचा अर्थ जीवी ध्याता। जे वर्ण त्रयची जपता॥
विश्वसृजन योग्यता। आली त्यासी॥ ज्ञाने.

तात्पर्य नाम आधी आहे म्हणून आधी ते घ्यावे. कोणत्याही कार्याच्या सुरवातीस नाम घेतल्यास कार्य निर्विघ्नपणे पार पडते. कारण

१०) नाम मंगलात मंगल आहे.

सकळ मंगळ निधी। श्री विठ्ठलाचे नाम आधी॥ ज्ञान.

तुलसीदासांनी सात मंगल गोष्टी सांगितल्या आहेत.

सुधा साधू सुरतरु सुमन सुफल सुहावनी बात।
तुलसी सीतापती भक्ति सगुण सुमंगल सात॥

१) अमृत, २) साधू (तुका म्हणे मंगल आता। कोण दाता याहुनि।), ३) कल्पवृक्ष, ४) फूल, ५) चांगले फळ, ६) सुभाषित, ७) हरिभक्ति या सर्व गोष्टीत नाम मंगलाचे मंगल आहे. नाम अमंगलास मंगल करते. तुलसीदास म्हणतात

जिन्ह कर नाम लेत जगमाही। सकल अमंगल मूल नसाही॥
कर तल होई पदारथ चारी। तिन्हके सियराम कहेऊ कामारी॥

११) वाकीची साधने अनिष्ठ निवृत्ती करतात पण इष्ट प्राप्ती करून देत नाहीत. मात्र नाम अनिष्ट निवृत्ती सह इष्ट प्राप्त करून देते. तुकोबाराय सांगतात

मागे जाळी महादोष। पुढे नाही गर्भवास॥

वाकीची साधने देवाजवळ पोहचवितात पण देव नामामुळेच मिळतो.

यज्ञ याग तपे संसार दायके। न सुटे एके नामे विण॥
नामेविण भवसिंधु पावे पार। ऐसा हा विचार नाही दुजा॥ तु. म.

ज्याप्रमाणे पंढरपूरात येण्याकरिता अनेक साधने (पायी, रेल्वे, कार, एस्. टी.) अनेक मार्ग पण देवाच्या पद दर्शनाकरिता एकच मार्ग आहे.

१२) काही नावे घेऊ नयेत. कोणाची?

आत्मनामो गुरुर्नामो नामो अतिकृपणस्य।
श्रेयस कामो न गृहिणीयात जेष्ठ अपत्य कलत्रयो॥

स्वतःचे नाव, गुरुचे नाव, कृपणाचे, कल्याण करणारा, कामी, बायको, मोठा मुलगा, कूळ. यामध्ये काही आदर म्हणून नावे घ्यायची नाहीत व काही नाव घेण्याच्या पात्रतेचे नाहीत म्हणून. पुरुषांनी बायकोचे 'प्रेम' म्हणून नाव घ्यायला सुरुवात केली. आता बायको पण नवऱ्यास एकेरी नावाने बोलावू लागली. हिंदू संस्कृतिची ही उत्क्रांती म्हणावी लागेल.

देवाचे व संताचे नाम सतत घ्यावे.

येई घेई माझे वाचे। गोड नाम विटोबाचे॥ तु. म.

पुण्यवंत व्हावे। घेता सज्जनांची नावे॥ तु. म.

(प्रभाते नाम न घ्यावे माकडाचे। तैसे अभक्ताचे सर्व काळ। तु. म.)

१३) कलियुगात नामस्मरणांमुळेच देव मिळतो असे सर्व संत, शास्त्रे सांगतात. सत्य युगात ध्यानाने देव मिळत होता. त्रेतात यज्ञांनी देवाची प्राप्ती होत होती. द्वापारात पूजेने देव प्रसन्न व्हायचा पण कलियुगात कीर्तनामुळेच देव प्रसन्न होतो (कीर्तन म्हणजेच नामस्मरण)

कृतेयद ध्यायतो विष्णू त्रेतायां यजतो मखैः।
द्वापारे परिचर्यानाम कलौ तद्दहरि कीर्तनात॥ भागवत

कृत जुग सब जोगी विज्ञानी। करि हरिध्यान तरहि भवप्रानी॥
त्रेता विविध जग्य नर करहि। प्रभूहि समर्पि कर्म भव तरही॥
द्वापार करि रघुपति पद पूजा। नर भव तरहि उपाय न दूजा॥
कलियुग केवल हरिगुण गाहा। गावत नर पावहि भव थाहा॥ तुलशीदास

यहि कलिकाल न साधन दूजा॥ जोग जग्य जप तप व्रत पूजा।
रामहि सुमिरिअ गाइय रामहि। सतत सुनिअ राम गुण ग्रामही॥
चहू जूग चहू श्रुति नाम प्रभाऊ। कलि विषेखी नहि आन उपाऊ। तुलशीदास

कलियुगामाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी॥ तु. म.

तात्पर्य - कलियुगात वाकीच्या भानगडीत न पडता फक्त नामस्मरणच करा. असे संतांचे सांगणे आहे.

१४) नामामध्ये एवढी जवरदस्त शक्ति आहे अनंत जन्माचे पाप जळून जाते. एका घडीत.

नाम संकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची॥ तु. म.

पंच पातकांच्या कोडी। नामे जळता न लगे घडी॥ तु. म.

यापुढे सांगता येईल नामामध्ये एवढी शक्ति आहे की मानव तेवढे पाप करूच शकत नाही, जेवढे नाम नाहीसे करते.

नाम्नोऽस्य यावती शक्तिः पापनिर्हरणे हरेः।
तावत् कर्तुं न शक्नोति पातकं पातकी जनाः॥ विष्णू पुराण

नाथ महाराज सांगतात

जेवढी नामाची शक्ति। तेवढे पाप नाही त्रिजगती।
नामापाशी चारी मुक्ति। जाण निश्चिती विदेहा॥ भागवत
माझे नाम ब्रह्मास्त्र जगी। महापाप बापुडे मुंगी।
नामापुढे उरावया लागी। कस त्याचे अंगी असेना॥ भागवत

ज्याप्रमाणे गवताच्या कितीही गंज्या (होळ्या) असल्यातरी माचिसमधील एक काडी सर्व गंज्या जाळून भस्मसात करते. तद्वत जीवनात नाम-काडी मिळाली तर अनंत जन्माच्या पापाच्या गंज्या जळून भस्मसात होतात. माऊली म्हणते -

तृण अग्नि मेळे समरस झाले। तैसे नामे केले जपता हरि॥

१५) नाम सर्वात सोपे आहे -

सांकेत्यं परिहास्यं वा स्तोभं हेलनमेव वा।
वैकुंठनाम ग्रहणम् शेषाघहरं विदुः।
पतितः स्खलितो भग्नः संदष्टस्तप्त आहतः।
हरिरित्यवशेनाह पुमानार्हति यातनाम॥ भागवत

अर्थ : संकेत, परिहास (उपहास), तान (आलाप), अवहेलना करण्यासाठी घेतलेले नाम पाप हरण करते. पडताना, पाय घसरताना, जखम झाल्यानंतर, भाजल्यानंतर काही लागल्यानंतर हरि-हरि म्हटल्यास नरकयातना होत नाहीत.

तुका म्हणे सोपे आहे सर्वाहुनी। शहाणा तो धणी घेत असे॥
सोपे आणि गोड। किती अमृताही वाढ॥ तु. म.

हे नाममहत्त्व जाणून सतत नाम स्मरण करावे.

★ ★ ★ ★ ★

३ : नाममहिमा

ज्याप्रमाणे संतांचा महिमा आहे, परिसाचा महिमा आहे, त्याचप्रमाणे नाममहिमा सांगितला जातो. नाम हे नामी परमात्म्यापेक्षा श्रेष्ठ आहे. एकदा तीन मोठ्या महिला एकत्र जमल्या. कोण महिला? राम-माता कौसल्या, हनुमंत-माता अंजनी व अगस्ति मुनींची पत्नी लोपामुद्रा. स्त्रिया गप्प बसतच नाहीत. एक विनोद सांगितला जातो, जो सर्वात मोठी थाप मारील त्यास दहा हजार रुपये बक्षिस. बऱ्याच लोकांनी मोठ्या-मोठ्या थापा मारल्या. पण ''दोन स्त्रिया दहा मिनिटे गप्प बसल्या होत्या'', या थापेस दहा हजार रुपये मिळाले. कौसल्यामाता म्हणाली, ''माझ्या रामाने

सागरावर ४०० मैल पूल बांधला, रावणास मारला व सीतेस घेऊन आला''. अंजनीमाता म्हणाली, ''माझ्या मुलास (हनुमंतास) जर सांगितले असते, तर रामास सेतू बांधण्याची गरजच नव्हती''. कौसल्यामाता नाराज झाली. मधेच तोंड घालून लोपामुद्रा म्हणाली, ''माझ्या पतीराजांस सांगितले असते तर हनुमंतांना उड्डाण करण्याची गरज नव्हती. कारण -

जंव वरी रे तंव वरी समुद्र करी गर्जना।
जंव अगस्ति ब्राह्मणा देखिले नाही बाप॥ ज्ञान.

त्यांनी एका घोटात समुद्र प्राशन केला असता. सैन्य पलिकडे गेले असते. परत एकदा सैन्य येण्याकरिता समुद्र प्राशन करावा लागला असता''. अंजनीमाता शांत झाल्या. मात्र या तिघींचे बोलणे राम-हनुमंत ऐकत होते. राम हनुमंतास म्हणाले, 'जा व आपल्या मातांची समजूत घालून ये'. हनुमंत आत स्वयंपाक घरात गेले. कौसल्या मातेच्या पाया पडून बोलले,''माते सेतू रामाने नाही बांधला, सेतू रामनामाने तयार झाला. रामांनी स्वतः प्रयोग केला पण एक दगड सुद्धा तरला नाही. रामापेक्षा त्याचे नाव मोठे आहे.''

मी तो अल्पमती हीन। काय वर्णु तुमचे गुण॥
उदकी तारीले पाषाण। हे 'महिमान नामाचे'॥तु. म.

अंजनी मातेस म्हणाले,''आई मी उड्डाण मारले, ही माझी शक्ती नाही. फक्त 'श्रीराम' म्हणालो व माझ्यात शक्तिचा संचार झाला.'' परत लोपामुद्रास हनुमंत म्हणाले,''आपल्या पतीच्या पोटात एवढा समुद्र सामावेल कसा? तर अगस्ति हे रामनाम, ॐ नाम सतत जपतात त्यामुळे त्यांच्यात ती शक्ति आली आहे कारण नामात आकाश सामावते तर समुद्र कां सामावणार नाही?'' तात्पर्य रामापेक्षा नाम मोठे आहे. रामाने अयोध्या नगरी तारली

''अयोध्येचे लोक। राम झाले सकळीक॥'' तु. म.

पण नामाने भूतकाळात तरले. वर्तमान काळात तरत आहेत व भविष्यकाळात तरणार.

तरले तरती हा भरवसा। नाम धारकाचा ठसा॥ तु. म.

ऐसे अनंत अपार। नामे तरले चराचर।
नाम पवित्र आणि परिकर। रखुमादेवीवराचे॥ ज्ञान.

नामाचा महिमा एवढा आहे. त्या व्यक्तिपेक्षा त्याच्या नामामुळे कामे होतात. हल्ली मोठ्या लोकांच्या नावाने बरीच कामे होतात हे स्पष्ट सांगण्याची गरज नाही. आम्हास शालेय जीवनात कथा होती. एकदा, भोज राजाच्या पदरी असणारे प्रतिभासंपन्न कवि 'कालिदास' राजास न सांगता गुप्त स्थळी निघून गेले. किती दिवस, कोठे गेले? हे राजास सुद्धा माहित नव्हते. ही नामी संधी साधून बाजूच्या राज्यातील पंडित भोजराजाकडे आला व म्हणाला,''मला तुमच्या, पंडितासी शास्त्रवाद करायचा आहे.'' भोज राजा म्हणाले,''आठ दिवसांनी आपणास कळवितो.''

पंडित गेल्यानंतर भोजराजा चिंतेत पडले आता काय करायचे? रस्त्याने एक डोळा नसलेला गांगु तेली जात होता. राजाच्या चेहऱ्यावर चिंता पाहून जवळ आला व म्हणाला, "आपणास काय चिंता आहे?" भोज म्हणाले, "माझी चिंता तुला सांगून उपयोग होणार नाही." गांगु तेली म्हणाला, "सांगा तरी. माझ्या परीने मी आपणास काही सल्ला देईन." राजाने सांगितले, "कालिदास नाही हे पाहून बाजूच्या राज्यातील पंडिताने वादाचे आव्हान केले आहे. त्या तोडीचा पंडित आपल्याकडे नाही." तेली म्हणाले, "आपण पत्र पाठवा या रविवारी वादास यावे, कालिदास नसले तर त्यांचे गुरु आपल्याशी वाद करतील. राजा म्हणाले, "गुरु कोण होणार?" तो म्हणाला, "मी नकली गुरु होतो. तुम्ही काळजी करु नका." राजाने पत्र पाठविले, मात्र पत्र मिळताच तो पंडित घाबरला. कालिदास जर एवढे हुशार तर गुरु किती हुशार असतील! पण आव्हान केले आहे. जायला पाहिजे. घाबरत घाबरत पंडित आला. मोठी सभा भरली होती. गांगु तेली पंडित बनून आला होता. बाराबंदी, धोतर, जानवे, पगडी, एक पुस्तक व भूक लागली तर ७ भाकरी व दह्याचे गाडगे बरोबर ठेवले होते. राजा नाराजच होता. पण करणार काय! एका उंच खुर्चीवर गांगु तेली (गुरु) व दुसऱ्या उंच खुर्चीवर पंडित बसले होते. राजाने इशारा केला. वाद सुरु झाला. पंडिताने एक बोट वर केले. कालिदासांच्या गुरुने दोन बोटे वर केली. पंडिताने चपराक (पंजा) दाखविली. गुरुंनी मूठ दाखविली. पंडिताने सात बोटे वर केली. गांगु तेल्याने सात बोटे वर करुन मध्ये रेष ओढली. पंडिताने इषारा केला कुठे आहे? त्यावरोबर गांगू तेल्याने दह्याचे गाडगे पुढे केले. वाद संपला पंडित बोलले मी हरलो. शेवटी हे 'कालिदासाचे गुरु' माझ्यापेक्षा श्रेष्ठ असणारच. राजास फार मोठा आनंद झाला. त्याने लगेच गांगु तेल्याची मिरवणूक काढली. दहा एकर जमिन बक्षिस दिली. पंडितास एका बाजूस घेऊन विचारले. आपला वाद आम्हा, सामान्यांना कळला नाही. स्पष्टीकरण द्यावे. पंडित म्हणाले, "मी एक बोट वर करून विचारले जगात एक ब्रह्म आहे. तुमचे पंडित दोन बोटे करून म्हणाले, "फक्त ब्रह्म नाही, ब्रह्म व माया दोन आहेत." मी विचारले, "जगात पंचमहाभूताद्वारे या दोघांचा कारभार चालतो." तुमच्या पंडिताने सांगितले, (मूठ दाखवून) "पंच महाभूते वेगळी वेगळी आहेत पण या जगात व देहात एकत्र नांदतात." मी तिसरा प्रश्न विचारला, "जगात सात समुद्र आहेत." तुमच्या कालिदासांच्या गुरुने सांगितले, 'मध्ये मेरु पर्वत आहे (आडवी रेष ओढली, सात बोटे दाखवून) मी विचारले मेरु पर्वत कुठे आहे? तुमच्या पंडिताने तो पर्वत दधी समुद्राजवळ आहे हे सांगण्याकरिता दह्याचे गाडगे पुढे ठेवले. शेवटी ते "कालिदासांचे गुरु"! राजा मनातल्या मनात हसले. त्यांची बोळवण केली. गांगु तेल्यास राजाने विचारले तू एवढे शास्त्र कुठे शिकलास? तेली म्हणाला, "उत्तरे मोघमच दिली पण 'फिट' बसली." राजा म्हणाला कसे काय? त्याने एक बोट वर केले मला वाटले माझा एकच डोळा आहे तो फोडतो काय? मी दोन बोटे वर करुन सांगितले आमच्या राज्यात येऊन दादागिरी करतोस की काय? तुझे दोनही डोळे फोडीन. त्याने चपराक दाखविली. मी सांगितले तुला एका बुक्कीत खाली बसवीन. त्यास वाटले हा सात भाकरी खात असावा मी

सांगितले सातच खातो पण सकाळी साडेतीन व रात्री साडेतीन त्याने शेवटी विचारले कशाबरोबर खातोस? मी दह्याबरोबर खातो हे सांगण्यासाठी दह्याचे गाडगे पुढे केले. वाद संपला तो हरला व कालिदासाचा 'गुरु' जिंकला. राजा, पाहिलेत नामात व्यक्तिपेक्षा किती सामर्थ्य आहे. राजाने गांगु तेल्यास मिठीच मारली. नामामुळे सर्व साधनांचे फळ मिळते. तुकोबारायांचा एक अभंग पाहू व कोटी पूर्ण करु.

न कळे ते कळों येईल उगले। नामें या विठ्ठले एकाचिया॥ १॥
न दिसे ते दिसो येईल उगले। नामे या विठ्ठले एकाचिया॥ २॥
न बोलो ते बोलों येईल उगले। नामे या विठ्ठले एकाचिया॥ ३॥
न भेटे ते भेटों येईल आपण। करिता चिंतन विटोबाचे॥ ४॥
अलभ्य तो लाभ होईल अपार। नाम निरंतर म्हणता वाचे॥ ५॥
तुका म्हणे जीव आसक्त सर्वभावे। तरतील नावे विटोबाच्या॥ ६॥

★ ★ ★ ★ ★

४ : नाम-फळ

कोणताही जीव फायद्याशिवाय कोणतीच गोष्ट करीत नाही. शास्त्र सांगते,

'प्रयोजनम् उद्दीश्य मंदोऽपि न प्रवर्तते॥

प्रश्न निर्माण होतो नामाने काय मिळते. याकरिता रामदास स्वामींच्या अनुभवाची ही कोटी आहे.

१) एक कोटी नामस्मरण झाले की आरोग्यप्राप्ती होते.
२) दोन कोटी नामस्मरणामुळे संपत्ति प्राप्त होते.
३) तीन कोटी नामस्मरणामुळे यश, किर्ती मिळते.
४) चार कोटी नामस्मरणामुळे इहलोकीची सर्व सुखे प्राप्त होतात.
५) पाच कोटी नामस्मरणामुळे कामक्रोधादि विकार जातात.
६) सहा कोटी नामस्मरणामुळे ज्ञानप्राप्ती होते.
७) सात कोटी नामस्मरणामुळे अनुकुल पती पत्नी मिळते.
८) आठ कोटी नामस्मरणामुळे अपमृत्यू टळतो.
९) नऊ कोटी नामस्मरणामुळे स्वरुप साक्षात्कार होतो.
१०) दहा कोटी नामस्मरणामुळे प्रारब्ध कर्म नाश होते.
११) अकरा कोटी नामस्मरणामुळे संचित कर्मनाश होते.
१२) बारा कोटी नामस्मरणामुळे क्रियमान कर्म संपते.

१३) तेरा कोटी नामस्मरणामुळे ज्या देवाचे नामस्मरण जीव करतो तो देव प्रत्यक्षात भेटतो. रामदास स्वामींनी तेरा वर्षात तेरा कोटी नामस्मरण केले. त्यामुळे राम प्रभूंनी प्रत्यक्ष भेट दिली. तेरा कोटीच्या पुढे नामस्मरण झाले तर देव मागे पुढे उभा राहतो.

मागे पुढे उभा राहे सांभाळित। आलिया आघात निवाराया॥ तु. म.
निर्वाणी गोविंद असे मागे पुढे। काहिच साकडे पडो नेदी॥ तु. म.

योगियांच्या ध्यानी ध्याता नातुडसी।
तो तू आम्हापाशी मागेपुढे ॥नाम.

नामामुळे भुक्ति मिळते, मुक्ति मिळते व भक्तिही मिळते.

भुक्ति मुक्ति नामापाशी प्रत्यक्ष। चारी वेद साही शास्त्रे वेताती साक्ष॥ ज्ञान.

भुक्ति मुक्ति सुखदायक साचार। पतीत अज्ञान जीव तरले अपार॥ ज्ञान.

नामामुळे फायदे होतात पण पथ्ये पाळली तर! औषधाचा गुण येतो पण जर पथ्ये पाळली तर, पथ्याचे दोन प्रकार वर्ज्य व सेव्य. वर्ज्य म्हणजे काय करु नये. सेव्य म्हणजे काय करावे.

जेणे विठ्ठल मात्रा घ्यावी। त्याने पथ्ये सांभाळावी॥ १ ॥
काम क्रोध मीट मिरची। याची घेऊ नये रुचि॥ २ ॥
आशा मनिषा तेल घट। याचा येऊ दे रे विट॥ ३ ॥
भक्तिभाव तूप पोळी। यासी सावध होऊनि गिळी॥ ४ ॥
तुका म्हणे औषध घ्यावे। तेणे ब्रह्मानंदी रहावे॥ ५ ॥
(हा अभंग देवडीकर गाथ्यात नाही)

पथ्य नाम विठोबाचे। आणिक वाचे न सेवी॥ तु. म.

परदारा परधन परनिंदा परपिडन। सांडुनिया भजन हरिचे करा॥ नाम.

पथ्ये न पाळता औषध घेतले तर गुण येईलच कसा? भागवतामध्ये दहा नामापराध सांगितले आहेत.

सनिंदासति नामवैभव कथा श्रीशेशयोर्भेदधीरश्रद्धा।
गुरु शास्त्र वेद वचने नाम्न्यर्थवादभ्रमः।
नामास्तीति निषिद्धवृत्ती विहितत्यागो हि धर्मान्त्तरैः।
साम्यं नाम्निजपे शिवस्यच हरेर्नामापराधा दश॥

१) हरिदासाची निंदा करणे, २) विष्णू शंकर यामध्ये भेद मानणे, ३) नामावर श्रद्धा नसणे, ४) गुरु, ५) शास्त्र, ६) वेद वचनावर विश्वास नसणे, ७) नामाने काय मिळेल? असा संभ्रम असणे, ८) नाम शक्तिवर निषिद्ध गोष्टी करणे ९) विहित गोष्टीचा त्याग करणे, १०) धर्मांतर करणे

हे शिव व विष्णूच्या नामामधील अपराध सांभाळून नाम घेतले तर फळ कां प्राप्त होणार नाही? चार चौपाई मध्ये तुलशीदास चौघांचे फळ सांगतात

नारद जानेउ नाम प्रतापु। जगप्रिय हरि हरि हर प्रिय आपु।
नामु जपत प्रभु किन्ह प्रसादु। भगत सिरोमनि भे प्रहलादु।
ध्रुव सगलानि जपेत हरिनाऊ। पायऊ अचल अनुपम टाऊ।
सुमिरि पवन सुत पावन नामु। अपने बस करी राखे रामु॥

अर्थ - नारद नामाचा प्रताप जाणतात. जगातील काहींना हरि प्रिय आहे काहींना शिव प्रिय आहे. पण हरिहर यांना नारद प्रिय आहेत. प्रल्हाद नाम जपामुळे भक्तात शिरोमणी ठरले. ध्रुवास नामामुळे अचल ध्रुवपद मिळाले. हनुमानांनी नाम सामर्थ्यामुळे रामास आपल्या ताब्यात ठेवले.

तात्पर्य नाम जर पथ्ये सांभाळून घेतले तर तो भक्त नामी परमात्म्यापेक्षा श्रेष्ठ होतो हे नामाचे फळ आहे. (राम म्हणा पण रम, रमा, रमी ही व्यसने सोडून)

एक चिंतन : मुक्ति चार आहेत. मात्र चार वेगळ्या वेगळ्या साधनामुळे एक एक मुक्ति मिळते. उदा.

१) समिपता - देवाचे सानिध्य प्राप्त होणे. ही मुक्ति उपासना अथवा पुण्याईमुळे मिळते.

पुण्यकाळ त्यांचा राहिलासे उभा। देवकीच्या गर्भा देव आले॥ तु. म.

२) सलोकता - देवाचा लोक प्राप्त होणे. विष्णूची उपासना करणाऱ्यांना वैकुंठ, रामाच्या उपासकांना साकेत धाम, कृष्णाच्या उपासकांना गोलोक प्राप्त होतो. ही मुक्ति तपामुळे मिळते.

तपाचे सामर्थ्ये तपिन्नला अमूप। चिरंजीव कल्प वैकुंटी नांदे॥ ज्ञान.

वैकुंठा जावया तपाचे सायास। करणे लागे नाश जीवा बहू॥ तु. म.

३) स्वरुपता - देवाचे रुप प्राप्त होणे. ही मुक्ति ध्यानामुळे प्राप्त होते.

"ध्यानी ध्याता पंढरीराया। मनासहित पालटे काया॥ तु. म.

४) सायुज्यता - ब्रह्मरुप होणे, मोक्ष मिळणे. ही मुक्ति ज्ञानाने प्राप्त होते.

जे ज्ञान तयाचे हाती। तोचि समर्थ मुक्ति। ज्ञाने.

मात्र या चारही मुक्ति नामाने मिळतात असे नाही नामापाशी सतत सेविका म्हणून उभ्या असतात.

तुका म्हणे नामापाशी चारी मुक्ति। ऐसे बहुता ग्रंथी बोलियेले॥
नारायण हरि नारायण हरि। भुक्ति मुक्ति चारी घरी त्याच्या ॥ ज्ञान.

★ ★ ★ ★ ★

५ : रस

रस हा शब्द वेद शास्त्रामध्ये आनंद या अर्थाने वापरला आहे. शास्त्रामध्ये, संत वाङमयात रसाचे मुख्य तीन प्रकार आहेत.

१) खाण्याचे रस, २) बोलण्याचे रस, ३) प्रेमरस

थोडक्यात हे काया वाचा मन यांना तुष्टी पुष्टी देणारे रस आहेत. क्रमवार विचार.

मा) खाण्याचे १२ रस आहेत. नाथमहाराजांनी 'रुक्मिणी स्वयंवर' या ग्रंथात एकाच ओवीत बारा रस सांगितले आहेत.

लेह्य पेय चोष्य खाद्य । भक्ष भोज्यादि प्रसिद्ध ।
षड्रसाचे जे 'स्वाद' । केले विविध उपचार ॥

अर्थ :

१) लेह्य - चटणी, तिळकूट, सारखे पदार्थ
२) पेय - दूध, दही, ताक, कढी वगैरे सारखे पिण्याचे पदार्थ
३) चोष्य - रस चोखून चोथा टाकायचा असे लोणच्याचे पदार्थ, ऊस
४) खाद्य - अग्नि, मीठ विरहीत पदार्थ म्हणजेच फलाहार
५) भक्ष - डाळ, भात, तूप, साधे जेवण
६) भोज्य - श्रीखंड, बासुंदी, लाडू जिलेबी अर्थात् पक्वाने (श्रीबालाजीवेत)

नाथ महाराजांनी स्वाद या शब्दांनी नैयायिकांचे सहा रस सांगितले आहेत. हे चवीचे सहा प्रकार आहेत.

षड्रसाः पुरुषेणेह भोक्तव्या बलमिच्छता ।
आम्लस्तिक्तः कषायश्च मधुरो लवणः कटुः ॥

१) आंबट, २) कडू, ३) तुरट, ४) गोड, ५) खारट, ६) तिखट या व्यतिरिक्त उसाचा मोसंबीचा वगैरे फळ 'रस' आहेतच.

ध) बोलण्याचे 'नवरस' आहेत.

शृंगार वीर करुणा अद्भूत हास्य भयानकः ।
बिभत्स्य रौद्र शांतश्च नवधा किर्तीता रसः ॥ सुभा.

१) शृंगार, २) वीर, ३) करुणा, ४) अद्भूत, ५) हास्य, ६) भयानक, ७) बिभत्स, ८) रौद्र, ९) शांत. ज्ञानेश्वरीमध्ये हे नवरस खचाखच भरले आहेत. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात नवरसाचा सागरच आहे या ग्रंथात.

ना तरी सर्व सुखांची आदी । जे प्रमेय महानिधी
नाना नवरस सुधाब्धि । परिपूर्ण हे ॥ ज्ञाने.

कल्पना येण्याकरीता एक रस व ज्ञानेश्वरीतील एक ओवी देत आहे.

१) शृंगार - तेथ हर म्हणे नेणीजे । देवी जैसे कां स्वरुप तुझे
तैसे नित्य नुतन देखिजे । गीतातत्व ॥

२) वीर - तुवां संग्रामी हरु जिंतीला। निवांत कवचाचा ठाव फेडिला।
पवाडा तुवा केला । गंधर्वासी ॥

३) करुणा - तू गुरु बंधू पिता । तू आमुचि इष्ट देवता ।
तूचि सदा रक्षिता । आपदी आमूते ॥

४) अद्भूत - तिये अंगप्रभेचा देवा। नवलाव काइसया ऐसा सांगावा।
कल्पांति एकचि मेळावा । द्वादशांदित्यांचा होय ॥

५) हास्य - कां कवण एक भ्रमलेपणे । मी तो नव्हे गां चोरलो म्हणे ।
ऐसा नाथिला छंद अंतःकरणे । घेऊनि टाके ॥

६) भयानक - तरी मी काळ गां हे फुडे। लोक संहारावयालागी वाढे।
सैंघ पसरली आहाती तोंडे। आता ग्रासीन आघवे ॥

७) बिभत्स - खरी टेको नेदी ऊडे। लातौनी फोडी नाकाडे।
तऱ्ही जेवी न काढे। माघौता खरु ॥

८) रौद्र - अहा कटकटा हे वोखटे । इये मृत्युलोकीचे उफराटे ।
एथ जरी अर्जुना अवचटे । जन्मलासी तू ॥

९) शांत - जे ज्ञानगंगे नहाले । पूर्णता जेऊनि धाले ।
जे शांतीसी आले । पल्लव नवे ॥

संताचे वर्णन. ओव्यांचा अर्थ विस्तारभयास्तव दिला नाही. दुसरा 'किळस' नावाचा रस ज्ञानेश्वरीमध्ये आहे. पण त्याचे श्लोकांत वर्णन नाही.

व) मनाचे रस त्यास प्रेमरस म्हणतात यालाच ''अष्टसात्विक भाव'' असे नाव आहे. श्लोक :

स्तंभ स्वेदोऽथ रोमाञ्चः स्वरभंगो अथ वेपथुः ।
वैवर्ण्यमश्रुप्रलय इत्यष्टौ सात्विका मताः ॥ सुभा.

१) स्तंभ - शरीर स्तब्ध होणे. २) स्वेद - अंगास घाम येणे
३) रोमांच - अंगावर केस उभे राहणे ४) स्वरभंग - वाणी गदगद होणे
५) कंप - शरीर कापणे (थरथरणे) ६) वैवर्ण्य - वर्ण बदलणे
७) अश्रु - डोळयातून अश्रुधारा वाहणे ८) प्रलय - शरीर, मन अविचल होणे

ज्ञानेश्वरी अध्याय ९, ११ व १८ अध्यायात हे प्रेमरस आले आहेत.

कंठी प्रेम दाटे नयनी नीर लोटे । ह्रदयी प्रगटे रामरुप ॥ तु. म.

नेत्री अश्रुचिया धारा । कोठे रोमांच शरीरा ॥ तु. म.

प्रेम रसे बैसली मिठी । आवडी लाठी मुखासी । तु. म.

वरीच प्रमाणे देता येतील. पण 'कोटी' मोठी होईल म्हणून थोडक्यात. प्रेमरस ह्रदय साफ करतो. नवरस वाणी पवित्र करतात. षड्‌रस शरीर सांभाळतात. प्रेमरसाचेसुध्दा 'भागवतात' ४ प्रकार आहेत.

तामस, राजस, सात्विक, शुद्ध सात्विक (मूळात पहावे)

अमृत नावाचा एक रस आहे. सगळ्या रसांचा यात अंतर्भाव होतो. असे माऊली म्हणतात

कां तिर्थे जिथे त्रिभुवनी । ती घडती समुद्रावगाहनी ।
नातरी अमृतरस स्वादनी । रस सकळ ॥ज्ञाने.

पण अमृतापेक्षा एक महान रस आहे त्यास ब्रह्मरस, नामरस म्हणतात.

राम रसाचिया चवी । आण रस रुचती केवी ॥ तु. म.

अमृत राहिले लाजोनि माघारे । येणे रसे थोरे परमानंदे ॥ तु. म.

जिव्हे गोड तीन अक्षरांचा रस । अमृत जयास फिके पुढे ॥ तु. म.

गंगोदकाहुनि निके । गोडी अमृत झाले फिके ॥ ज्ञान.

अमृताहुनि गोड नाम तुझे देवा । मन माझे केशवा कां बा नेघे ॥ नाम.

या नामरसाचे वैशिष्टय असे की बाकीच्या रसामुळे मरण पण यामुळे अमरपण मिळते.

आणिका रसा मरण गांठी । येणे तुटे भवभय ॥ तु. म.

बाकीच्या रसाचा वीट येतो. पण हा अविट रस आहे. बाकीचे रस विटतात. खाणारा विटतो. पण नामरस विटत नाही व घेणारा विटत नाही. या रसाची गोडी लागली की कशांत गोडीच वाटत नाही.

ब्रह्मरस गोडी तयाशी फावली । वासना निमाली समूळ ज्याची ॥ तु.म.

दृष्टांत - तुकाराम महाराजांचा मेहुणा (बायकोचा भाऊ) त्यांच्या घरी आला होता. जिजाईमातेने

उसनवारी करुन जेवण चांगले केले. दोघे जेवण्यास बसले. महाराज जेवून लवकर उठले. लाजेने मेहुण्याने कसे तरी दोन घास खाल्ले. बाहेर आले. जिजाई जेवण्यास बसल्या. पहिल्याच घासात समजले. कोणत्याच पदार्थात मीठ नाही. बाहेर आल्या, महाराजांना दम दिला माझा भाऊ जेवला नाही. महाराजांनी विनोद केला कदाचित बाहेर वडापाव खाल्ला असेल. अहो असे काय बोलता. कोणत्याच पदार्थात मीठ नाही. हे तुम्ही सांगावयास नको का ? महाराज म्हणाले 'आवले' हे कळले असते तर पहिल्याच घासास सांगितले नसते का ?

काय खातो आम्ही कासया सांगाते । कैसे हे लागते नेणो मुखी ॥ तु. म.

याचे एकच कारण रामरसाची गोडी.

तात्पर्य - नामरस सर्वात थोर आहे. मात्र त्याच्यात प्रेमरस मिसळायला हवा नाहीतर कोरडा लागेल. जसा डाळ + भात, चटणी + भाकरी तसे नाम+प्रेम

रामराम तो सब कोई कहे ठक, ठाकूर और चोर ।
विना 'प्रेम' रिझे नही तुलशी नंदकिशोर ॥

असे हे आहेत रसांचे जवळजवळ एकतीस प्रकार.

खाण्याचे बारा, बोलायचे नऊ, मनाचे आठ अमृत आणि नामामृत.

★ ★ ★ ★ ★

६ : सार

वि) व्यवहारातील सामान्य सार

१) दुधामध्ये तूप 'सार'

नका घालू दूध जयामध्ये सार।ताकाचे उपकार तरी करा॥ तु. म.

२) फुलामध्ये तुळस सार. तुळशीची आठ नावे अशी आहेत.

वृंदा वृंदावनी विश्वपूजीता विश्वपावनी ।
''पुष्पसारा'' नंदिनीच तुलशी कृष्ण जीवनी ॥

३) दागिन्यांमध्ये मंगळसूत्र मुख्य म्हणजे सार आहे.

४) धातूमध्ये सोने सार. सोन्याचे वजन सर्वात जास्त असते. अधिक सोने असणारा माणूस वजनदार समजला जातो. बाकीचे धातू जुने झाले तर कमी भावात 'भंगार' म्हणून विकले जातात. पण सोने जुने झाले तरी भाव वाढतच जातो. म्हणून याला 'भांगार' म्हणतात.

५) शरीराच्या अवयवामध्ये नाक सार म्हणजे प्रमुख आहे.

एक माणूस मित्रास सांगत होता बरेच प्रयत्न करून मुलीचे लग्न जमत नाही. मित्राने विचारले, मुलगी गोरी नाही कां? गोरीपान आहे. आंधळी आहे कां? चांगली डोळस आहे. पांगळी आहे कां? चांगली चालते. शिकलेली नाही कां? पदवीधर आहे. स्वयंपाक येत नाही कां? उत्तम सुगरण आहे. बहिरी, मुकी आहे कां? नाही. मग लग्न कां होत नाही. एकच उणीव आहे, नाकाचा पत्ता नाही.

काय करावी ती बत्तीस लक्षणे। नाक नाही तेणे वाया गेली। तु. म.

६) जगातील सर्व ग्रंथात गीता 'सार' ग्रंथ आहे. लंडनच्या मुख्य ग्रंथालयात गीतेचा प्रथम क्रमांक आहे. हा ग्रंथ जगातील सर्व मानवाकरिता आहे. अतिशय छोटा पण व्यापक. जसा सूर्य छोटा पण संपूर्ण त्रिभुवनास प्रकाश पुरवून उरतो. माऊली म्हणते.

''पै बिंब तरी बचकेचि एवढे। परि प्रकाशासी त्रिभुवन थोकडे।
शब्दाची व्याप्ति तेणे पाडे। अनुभवावी ॥''

जे उपनिषदांचे 'सार'। सर्व शास्त्रांचे माहेर। परमहंसी सरोवर। सेविजे जे॥ ज्ञाने.

हे शब्द ब्रह्माचे मथिते। श्री व्यास प्रज्ञेचेनि हाते। मथूनि काढिले आयिते। 'सार' आम्ही॥ ज्ञाने.

ड) ज्ञानोबा माऊली एका अभंगात चार सार सांगते. अर्थात नामाबद्दल

सार सार सार विठोबा नाम तुझे सार।
म्हणोनि शूळपाणि जपताहे वारंवार ॥ ज्ञाने.

शास्त्र दृष्ट्या द्विरुक्ति दोष आहे. पण संत वाङमयात बऱ्याच ठिकाणी द्विरुक्ति आली आहे. पण इथे चौरुक्ति आहे. याचे दोन अर्थ ज्ञानेश्वर महाराज म्हणजे माऊलीचे हृदय. एखादी आई मुलांच्या कल्याणाकरिता पुन्हाः पुन्हाः सांगते अभ्यास कर. कारण त्यास स्वतःचे हित कळत नाही. तद्वत आम्हांस नामाचे महत्व समजत नसल्याने शंकराचे उदाहरण देऊन माऊली सांगते सार आहे, सार आहे, सार आहे, सार आहे, म्हणून शंकर जपतात. दुसरा अर्थ माऊली ''ज्ञानियाचे शिरोमणी'' आहेत. प्रत्येक सार शब्दाचा अर्थ वेगळा आहे.

१) सार - ''सर्व साधनांचे सार। भवसिंधु उत्तरी पार॥'' तु. म.

देवाकडे जाण्याची जी अनेक साधने आहेत त्यापैकी उत्तम, योग्य व सोपे साधन म्हणजे 'नाम'स्मरण.

२) सार - ''फलकट तो संसार। येथे सार भगवंत॥'' तु. म.

संसार या शब्दाचा अर्थ असा ज्यात काही सार आहे असा संभ्रम होणे म्हणजे संसार,

सर्व अनित्य, एक नामच नित्य- तुकाराम महाराज सांगतात ''संसारा आलिया एक सुख आहे। आठवावे पाय विठोबाचे॥''

३) सार - सर्व रसात सार. रस बरेच आहेत. त्याचा विचार रस या कोटीत आला आहे. ''ब्रह्मरस घेई काढा। तेणे पिडा वारेल॥'', ''सब रसोंका किया मार। भजन गोली एकही सार॥ तु. म.

४) सार - सर्व शास्त्रात आहे. ''सकळ शास्त्राचे हे सार। हे वेदाचे गव्हार॥ पहाता विचार। हाचि करिती पुराणे॥''तु. म.

सहा शास्त्रे, चार वेद, अठरा पुराणे या अठ्ठावीस जनांनी अठ्ठावीस युगे विटेवर उभा असणाऱ्या विठ्ठलाच्या नामाचाच घोष केला आहे.

तात्पर्य - नाम हे साधनांत सार, संसारात सार, रसात सार व शास्त्रात सार आहे. असे तुकाराम महाराजांनी सिद्ध केले आहे. कारण सर्व प्रमाणे त्यांचीच आहेत.

ळ) नाथ महाराजांनी एका अभंगात १६ सार सांगितले आहेत.

वेदामाजी ॐ कार सार। शास्त्र सार वेदांत॥ १॥
ज्ञानसार ज्ञान सार। नाम सार सर्वामाजी॥ २॥
मंत्रामाजी गायत्री सार। तिर्थ सार गुरुचरणी॥ ३॥
व्रतामाजी एकादशी सार। द्वादशी सार साधनी॥ ४॥
पूजेमाजी ब्राह्मण सार। सत्य सार तपामाजी॥ ५॥
दानामाजी अन्नदान सार। कीर्तन सार कलियुगी॥ ६॥
जनामाजी संतभजन सार। भोग सार शांतिसुख॥ ७॥
सुखामाजी ब्रह्मसुख सार। दुःख सार देहबुद्धी॥ ८॥
एका जनार्दनी एक सार। सर्व सार आत्मज्ञान॥ ९॥

अर्थ सोपा आहे. या सर्वात नामच सार वाटते.

नाम सारांचेही सार। शरणांगत यमकिंकर॥ तु. म.

म्हणून - सारासार विचार करा उठाउठी। नाम धरा कंठी विठोबाचे॥ तु. म.

त्रिगुण असार निर्गुण हे सार। सारासार विचार हरिपाठ॥ ज्ञान.

सर्व कोटीचा आशय हाच, नाम, सर्वात सार आहे. म्हणून माणसाने ''सारे'' लक्ष याकडे दिले पाहिजे. सुभाषितकार सांगतात.

अनंत शास्त्रं बहुलाश्चविद्या, ह्यल्पश्च कालो बहुविघ्नताच।
यत्सार भूतं तदुपासनीयं, हंसैर्यथा क्षीरमिवांबु मध्यात॥ सुभा.

अर्थ - शास्त्रे अनंत आहेत. विद्या खूप आहेत. काळ फार कमी आहे. व विघ्ने जास्त आहेत. याकरिता जीवांने, ज्याप्रमाणे राजहंस पक्षी दूध पाणी मिश्रणातून फक्त दुधच घेतो. तसे 'सारभूत' घ्यावे. अर्थात नामाचीच उपासना करावी. संत त्यास म्हणतात जो सार घेतो (नाम) व सूपाप्रमाणे फलकट उडवून टाकतो.

साधु तो ऐसा चाहिये जैसा सूप सुहाय।
सार सार तो गह रहे थोता देय उडाय॥ कबीरजी

(तुलशी इस संसारमें पाच रत्न है सार। संतसमागम, हरिकथा, दया धर्म उपकार॥)

★ ★ ★ ★ ★

७ : रामनाम

विष्णूची जी हजारो नावे आहेत. त्या सर्वात सोपे व श्रेष्ठ 'रामनाम' आहे.

सहस्त्र नामावरी कळसु साजे। तोचि तो अंतरी बाहिजु भितरी॥ ज्ञान.

रामरक्षे मध्ये शेवटचा श्लोक सांगतो विष्णूची सहस्त्र नावे एका बाजूस व रामनाम एका बाजूस किंमत सारखीच. ज्या प्रमाणे एक रुपयाच्या हजार नोटा व एक हजाराची एकच नोट, किंमत समान होते. "राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे। सहस्त्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने॥" रामरक्षा. शंकराना 'रामनाम' अतिशय आवडते.

हस्तेऽक्षमाला हृदी कृष्ण तत्वं। जिव्हाग्र भागे वर 'राम' मंत्रम्।
यन्मस्तके केशवपाद तिर्थं। शिवं महाभागवतम् नमामी॥ सुभा.

अर्थ - ज्याच्या हातात रुद्राक्ष माळ आहे. हृदयात श्रीकृष्णाचे ध्यान आहे. सतत जीभेवर रामनाम आहे व मस्तकावर केशवपाद तीर्थ गंगा आहे. अशा महाभागवत शिवास नमस्कार.

गळा रुंड माळा खापर हस्तकी। राम नाम मुखी सर्व काळ॥ नाम.

राम नामाच्या श्रेष्ठत्वाबद्दल एक दृष्टांत सांगतात. एका शाळेत एक शिक्षक रामनामाचे महत्व सांगत होते. मुलांनो 'रा' म्हटल्याबरोबर अंतःकरणातील सर्व पापे बाहेर जातात. (रा म्हणून पहा) एक हुशार विद्यार्थी म्हणाला गुरुजी 'रा' म्हणून सर्व पापे जातात. मग 'म' ची काय गरज? गुरुजीनी विद्यार्थ्याचे कौतुक केले. तुझी शंका बरोबर आहे. 'रा' म्हणून पापे बाहेर जातात पण पापांना जागा सोडवत नाही. परत येण्याची शक्यता आहे. मात्र 'म' त्यांना परत येऊ देत नाही. (उच्चारुन पहा) कंपनीच्या भाषेत 'नॉन रिटर्न वॉल', गेलेले पाणी अथवा वाफ परत येऊ नये म्हणून दिलेला वॉल. तसा 'म' काम करतो. म्हणून 'राम'. असा श्रेष्ठ मंत्र असल्यामुळे वारकरी भजनाची सुरवात राम मंत्राने करतात व शेवट सुद्धा ज्ञानदेव तुका'राम' याने होतो. तुकाराम महाराजांनी सर्वांना उघडा मंत्र दिला आहे. जो बाबाजी चैतन्य यांनी महाराजांना दिला.

बाबाजी आपुले सांगितले नाम। मंत्र दिला रामकृष्ण हरि॥ तु. म.

राम कृष्ण हरि मंत्रामध्ये फार अर्थ भरला आहे.

रामाचा आचार + कृष्णाचा विचार + हरिचा उच्चार - राम कृष्ण हरि

हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी॥ ज्ञान.

राम कृष्ण हरि हा मंत्र राष्ट्रीय एकात्मता साधणारा आहे. कारण राम प्रिय आहे उत्तर प्रदेश - बिहार, दिल्ली, हरियाणा. कृष्ण प्रिय आहे; गुजराथ, मद्रास, केरळ इकडे, हरि म्हणजे विठ्ठल प्रिय आहे महाराष्ट्र, कर्नाटक व आंध्र. तुकाराम महाराजांची ही इच्छा, "भारत कायम अखंड राहो", तो या षड्क्षरी मंत्रामुळे बांधला जाईल.

रामायणात एक श्लोक आहे. त्यात सांगितले आहे. सात कोटी महामंत्र आहेत. पण त्यामध्ये 'राम' मंत्र श्रेष्ठ आहे असे रामायणकार सांगतात. बाकीचे मंत्र म्हणजे काजवे किंवा चांदण्या. मात्र राम मंत्र सूर्यासारखा आहे. वेद, शास्त्र व संत सांगतात. रामनाम व राम परमात्मा यामध्ये अभेद आहे जसे पाणी व लाटा, जसा सूर्य व प्रकाश.

रामस्य नाम रुपं च लिला धाम परात्परम्।
एतत् सर्व चतुष्टयं सच्चिदानंद विग्रहम॥ रामायण

राम त्याचे नाव, त्याचे रुप व त्याचे धाम हे सर्व सच्चिदानंद रुप आहे. तथापि रामनाम नामी परमात्म्यापेक्षा श्रेष्ठ वाटते. रामाने फक्त अयोध्येचा उद्धार केला पण रामनामाने भूतकाळात तरले. वर्तमान काळात तरत आहेत व भविष्यकाळात तरतील.

ऐसे अनंत अपार। नामे तरले चराचर।
नाम पवित्र आणि परिकर। रखुमादेवीवराचे॥ ज्ञान.

असे हे रामनाम आले कोठून? त्याची परंपरा सांगतात. वाल्मिक ऋषी (आद्यकवि) यांनी शतकोटी रामायण लिहिले. 'बिजमंत्र रामनाम। फळ शतकोटी रामायण॥ नाम.

चरितं रघुनाथस्य 'शतकोटी' प्रविस्तरम।
एकैकं अक्षरं पुंसां महापातक नाशनम्॥ रामरक्षा.

जेव्हा रामायण तयार झाले. तीन लोकात भांडणे झाली. देव मानव पन्नग (सर्प) प्रत्येकजण रामायण आमचे म्हणू लागला. तिघे शंकराकडे गेले. आपली बाजू मांडली. देव म्हणाले राम देवाचा अवतार म्हणून रामायण आमचे. मानव म्हणाले राम देव आहेत पण मानव शरीर धारण केले आहे म्हणून रामायण आमचे. सर्प म्हणाले लक्ष्मण आमचा भाऊबंद म्हणून रामायण आमचे. शंकर भोळे सर्वांना समान रामायण वाटले. तेहतीस कोटी, तेहतीस लक्ष, तेहतीस हजार, तीनशे, तेहतीस. शेवटी एक श्लोक 'बत्तीस' अक्षरांचा राहिला. त्यातील दहा दहा अक्षरे वाटली. शेवटी तिघात दोन अक्षरे वाटता येत नाहीत म्हणून शंकराने वाटणी करण्याचे फळ म्हणून स्वतःजवळ

ठेवली. ती दोन अक्षरे म्हणजे 'राम'! यामुळे क्षिरसमुद्रातून निघालेले हलाहल विष याचा दाह शांत झाला. ''शिव हळहळे तापला। तोहि नामे शीतळ झाला।।'' नाम.

शंकर हे नाम सतत घेऊ लागले. एकदा पार्वती शंकर क्षीरसागराच्या काठी गप्पा मारताना शंकर सतत रामराम म्हणत असताना पार्वतीने रामनामाचे महत्व विचारले. शंकर सांगू लागले, पार्वती झोपली. हे तत्वज्ञान ऐकण्याकरिता विष्णूनी मछिंद्रनाथांचा अवतार घेतला. मछिंद्राने हा मंत्र गोरक्षास दिला गोरक्षानी गहिनीनाथांना दिला. गहिनींनी निवृत्तीनाथ व निवृत्तींनी ज्ञानदेवांना दिला. मात्र ज्ञानदेवांनी उघड केला.

''प्रगट गुह्य बोले' विश्व ब्रह्मचि केले। रामा जनार्दनी पायी टकचि ठेले।।'' रामा जनार्दन

राम कृष्ण नामे हे दोन्ही साजिरी। ह्दयमंदिरी स्मरा करे।। ज्ञान.

सर्व संतांना रामनाम अतिशय आवडते. शेवटी सुद्धा म्हणतात ''रामनाम सत्य है'' पूर्वी नमस्कार करताना ''रामराम'' म्हणत.

असे आहे रामनामाचे महत्व अथवा थोरवी. म्हणून जोपर्यंत आयुष्य आहे. तोंड चालते आहे तोपर्यंत राम म्हणा अर्थात 'वाचेस' विराम देऊ नका.

राम नाम लड्डु, गोपाल नाम घी। हरिनाम मिश्री, घोर घोर पी।

★ ★ ★ ★ ★

८ : रामराज्य

संतांपासून सर्वसामान्य लोकांपर्यंत सर्वांची इच्छा आहे की रामराज्य यावे. असे रामराज्यामध्ये होते तरी काय? तुकाराम महाराज त्या वेळी अंगद होते. ते म्हणतात.

झाले रामराज्य काय उणे आम्हासी। धरणी धरी पीक गायी वोळल्या म्हैसी।।
स्वप्नीही दुःख कोणी न देखे डोळा। नामाच्या गजरे भय सुटले कळिकाळा।।

रामराज्यात कोणास दुःख नव्हते. अर्थात सर्व सुखी होते. भूमी भरपूर पिक देत होती. वेळेवर पाऊस पडत होता. गायी म्हैशी भरपूर दूध देत होत्या. सर्व ऋतू अनुकूल होते. तुलसीदासांच्या भाषेत 'रामराज्य' म्हणजे –

दैहिक दैविक भौतिक तापा। रामराज नाही काहुही ब्यापा।
सब नर करहि परस्पर प्रिती। चलहि स्वधर्म निरत श्रुति नीती।
चारिऊ चरण धर्म जगमाही। पूरी रहा सपनेहु अघ नाही।

अर्थ - रामराज्यात आदि भौतिक, अध्यात्मिक, आदिदैविक हे तिन्ही ताप नव्हते. सर्व जन एकमेकांवर प्रेम करीत होते. सर्व जन स्वधर्माने, नितीने वर्तत होते, जसे वेदात सांगितले.

धर्मरुपी गाय चारही चरणांवर उभी होती. म्हणजेच १% अधर्म नाही. स्वप्नातसुद्धा लोक पापाचा विचार करीत नव्हते. हे एक-दोन दिवस नाही. तब्बल अकरा हजार वर्षे.

दशवर्षसहस्त्राणि दशवर्षशतानी च।
रामो राज्यमुपासित्वा ब्रह्मलोकं प्रयाच्छति।। रामायण

अर्थ - दहा हजार + एक हजार म्हणजे अकरा हजार वर्षे राज्य करून राम ब्रह्मलोकास गेले. रामावद्दलच्या ९ कोट्या.

१) रामासारखा देव नाही - भगवान रामाचे चरित्र, आदरणीय, आचरणीय व वंदनीय वाटते. श्रीकृष्णचरित्र उच्चारणीय आहे. आचरणीय नाही. राम म्हणजे मर्यादा पुरुषोत्तम.

२) रामासारखा राजा नाही - राजा रामाचे विशेषत्व असे की हे 'लोकाभिराम' होते. रामरक्षेमध्ये हा शब्द तीन वेळा, तीन श्लोकात आला आहे. एक श्लोक -

'लोकाभिरामं रणरंगधीरं। राजीव नेत्रं रघुवंशनाथम।
कारुण्यरूपं करुणाकरंतं। श्रीरामचंद्र शरणं प्रपद्ये।। रामरक्षा

एका सामान्य धोब्याने सीतेवर आरोप केला. रामाने सीतेचा त्याग केला. जिने अग्निदिव्य केले होते.

राम जेव्हा गादीवर वसले तेव्हा त्यांनी घोषणा केली. माझ्या मुखातून अनितीची भाषा जरी आली. (अनिती केली नाही) तरी भर सभेत कोणास न भिता मला गर्जना करून जाव विचारावा.

जौ अनिति कछू भाषौ भाई।
तै मोहि बरजहु भय बिसराई।। तुलसीदास

म्हणून रामासारखा राजा नाही.

३) रामासारखा पुत्र नाही - पित्याने सावत्र आईस पूर्वी कधी दिलेल्या दोन वरांकरिता चौदा वर्षे वनवास, तोही आनंदाने स्वीकारला.

रघुकुल रिती सदा चली आई। प्राण जाई परी बचन न जाई।। तुलसीदास

म्हणून रामासारखा पुत्र नाही.

४) रामासारखा पती नाही - जनकपुरीत सीतेची प्रथम भेट झाली. तेव्हा रामाने सीतेस ही भेट दिली, आजपासून फक्त तुला सोडून मला सर्व स्त्रिया मातेसमान. दशरथ राजास सातशे बायका होत्या. रामास निदान सात करण्यास हरकत नव्हती पण अकरा हजार वर्षे एकपत्नी व्रत पाळले म्हणून असा पती नाही.

५) रामासारखा पिता नाही - एवढी वर्षे राज्य केले पण संतान फक्त दोनच पुत्र 'हम दो हमारे दो' यांनी सार्थक केले. जास्त मुलांमुळे संपत्तीची विभागणी होते. भांडणे होतात. शिवाय माता - पित्यास त्रास आहेच म्हणून रामासारखा पिता नाही.

६) रामासारखा बंधू नांही - सर्व भावांवर अतिशय प्रेम. भरताचा वियोग सहन झाला नाही. सुवर्णाची लंका जिंकली. पण पाहिली नाही. का? भरत-भेटीकरिता! लक्ष्मणांनी अवतार संपविल्याबरोबर रामांनी अवतार संपविला. म्हणून यासारखा बंधू नाही.

७) रामासारखा मित्र नाही - सुग्रीवास साथ देऊन वालीचा वध केला. वालीने आरोप केला. प्रभूंनी उत्तर दिले लहान भावाच्या बायकोवर वाईट नजर ठेवणारा वधासच योग्य आहे. कारण या 'चार' स्त्रिया समान आहेत.

अनुज बंधू भगिनि सुतनारी। सुन सठ कन्या सम ये चारी॥
इन्हई कुदृष्टी विलोकई जोई। ताहे बधे कछु पाप न होई॥ तुलसीदास

लहान भावाची बायको, बहिण, सून व मुलगी या चार समान आहेत.

८) रामासारखा शिष्य नाही - स्वतः परब्रह्म असून एखाद्या शिष्यास लाजविल अशी वसिठ व विश्वामित्रांची सेवा केली.

९) रामासारखा शत्रूही नाही - कारण आपल्या सर्व शत्रूंस रामांनी मुक्ति दिली.

नाम चांगले चांगले। माझे कंठी राहो भले।
कपिकुळ उद्धरिले। मुक्त केले 'राक्षसा'॥ तु. म.

राम नवमीस जन्मले म्हणून या नऊ कोटी. एका श्लोकात संपूर्ण रामायण आले आहे. यास म्हणतात ताकापुरते रामायण. यातसुद्धा नऊ मुद्दे आहेत.

आदौ राम तपोवनादिगमनं हत्वा मृगं कांचनम्।
वैदेहि हरणं जटायु तरणं सुग्रीव संभाषणम्।
वाली निर्दलनं समुद्रतरणं लंकापुरी दाहनम्॥
पश्चाद रावण कुंभकर्ण हननं एतद्धी रामायणम्॥

१) राम वनवासास गेले, २) सोनेरी हरण मारले, ३) सीतेस रावण घेऊन गेला, ४) जटायुचा उद्धार केला, ५) सुग्रीव मैत्री झाली, ६) वालीस मारला, ७) समुद्रावर सेतू बांधला, ८) लंका जाळली, ९) रावण कुंभकर्णास मारले

१) राम राज्यावर बसण्याअगोदर रामाने त्राटिका मारली. लक्ष्मणाने शूर्पणखेचे नाक, कान कापले. भरताने आईची (कैकयीची) निर्भत्सना केली. तात्विक अर्थ असा होतो. राम मूर्तिमंत ज्ञान. लक्ष्मण मूर्तिमंत वैराग्य. भरत मूर्तिमंत भक्ती. १) त्राटिका क्रोधाचे रुप, २) शूर्पणखा कामाचे रुप, ३) कैकेयी लोभाचे रुप. ज्ञानाने क्रोधाचा नाश. वैराग्याने कामावर ताबा, भक्तिने लोभावर विजय. रामराज्यात काम, क्रोध, लोभ यावर ताबा होता. त्यामुळे त्यांचा परिणाम असणारा अनुक्रमे व्यभिचार, हिंसाचार व भ्रष्टाचारांचा नामोनिशाण नसल्यामुळे सुखाचे साम्राज्य होते.

२) रामांनी रावण व कुंभकर्णास मारले. तीन भाऊ म्हणजे तीन गुण. रावण - राजस, कुंभकर्ण - तामस, विभिषण - सात्विक, म्हणून विभिषण गादीवर बसविला. जोपर्यंत सात्विक लोकांच्या ताब्यात सत्ता नाही. तोपर्यंत रामराज्य येणे शक्य नाही.

३) एक शंका अशी राम-लक्ष्मण यांना अहिरावण व महिरावण यांनी चोरुन नेले. राम-लक्ष्मण समर्थ असताना हे कसे? तात्विक अर्थ असा राम - ज्ञान, लक्ष्मण - वैराग्य, अहि - अहंभाव, महि - ममता. अहं ज्ञानास नेतो. ममता वैराग्यास घेऊन जाते.

अहं ममतेच्या लवडसवडी। माते न पवतीची बापुडी॥
म्हणोनि जन्ममरणाच्या दुथडी। ड्हुळती ठेली॥ ज्ञाने.

त्यानंतर भक्तिरुपी हनुमान गेले. तिघे एकत्र आले व अहि महि संपविले. भक्ति ही माता आहे. ज्ञान - वैराग्य तिच्या मागून येतात.

पुढे भक्तिने धरिले हाती। मागे ज्ञान वैराग्य धर्म येती॥ तुकया बंधू

तात्पर्य - असे होते रामराज्य.

★ ★ ★ ★ ★

९ : देव

देव या शब्दाचे शास्त्रात दहा अर्थ आहेत. त्यात तीन महत्वाचे वाटतात.

१) ज्याच्याकडे 'दिव्यता' आहे तो देव.
२) सर्वांना जो सर्व देतो तो देव.
३) दिव धातुपासून झालेला देव शब्द. दिव म्हणजे जो सर्वांना प्रकाशित करतो तो देव.

हिंदू धर्मात तेहतीस कोटी देव मानतात. तेहतीस कोटी संख्या नाही तेहतीस प्रकारचे देव आहेत. १) बारा आदित्य, २) अकरा रुद्र, ३) अष्टवसु, ४) दोन अश्विनीकुमार या सगळयाची बेरीज तेहतीस होते. हे तेहतीस प्रकारचे देव. माऊलीच्या एका ओवीत हे सर्व देव आले आहेत.

हे रुद्रादित्यांचे मेळावे। वसुहन साध्य आघवे।
अश्विनी देव विश्वदेव विभवे। वायुही हे जी॥ ज्ञाने.

शास्त्रात चार प्रकारचे देव सांगितले आहेत.

१) अधिष्ठातृ २) मर्त्य, ३) नैमित्तीक, ४) नित्य.

१) अधिष्ठातृ देव म्हणजे ग्रामदेवता, गृहदेवता व वास्तुदेवता वगैरे. जो पर्यंत गाव आहे तोपर्यंत देव. गाव मोडला देव संपला. जोपर्यंत घर आहे तो पर्यंत गृहदेवता अथवा वास्तुदेवता घर मोडले की देवतेचे अस्तित्व संपले. पण यांना शास्त्र मान्यता आहे.

२) मर्त्य देव - येथून पुण्य करुन स्वर्गात गेले. दिव्य भोग भोगले. परत मृत्युलोकी आले. यांना मर्त्य देव म्हणतात. माऊलीच्या भाषेत - 'मग पुण्याची पाऊटी सरे। सवेचि इंद्रपणाची उटी उतरे। येऊ लागती माघारे। मृत्युलोका ।।'

जो पर्यंत खिसा गरम तोपर्यंत माथेरान अथवा महाबळेश्वर. पैसा संपला. खाली लोटांगण. जोपर्यंत डब्यात तूप आहे तोपर्यंत त्यास कपाट, तूप संपले की दोन छिद्रे. एक तार. आता दाराजवळ चिनपाट (टिनपॉट) असे या मर्त्य देवांचे आहे.

३) नैमित्तीक देव - इंद्रापासून ब्रह्मदेवापर्यंत सर्व मुदतीचे म्हणजे काही काळाकरिता नेमलेले देव ते नैमित्तीक देव. जसे आपले. सरपंच, आमदार, खासदार, नगरसेवक, मंत्री अथवा पंतप्रधान. मुदत संपली की निवडणुका. मात्र यांचे आयुष्य फार मोठे आहे. सर्वात ब्रह्मदेवाचे आयुष्य मोठे. दोन परार्ध वर्षे. परार्ध १ च्या पुढे सतरा शून्य. थोडक्यात १) एकम, २) दहम, ३) शतम, ४) सहस्त्र, ५) दशसहस्त्र, ६) लक्ष, ७) दशलक्ष, ८) कोटी, ९) दशकोटी, १०) अब्ज, ११) खर्व, १२) निखर्व, १३) महापद्म, १४) शंकू, १५) जलधी, १६) अन्त्य, १७) मध्य, १८) परार्ध सर्वांत मोठी संख्या.

ब्रह्मदेवाचे आयुष्य भागवत सांगते.

लोकानां लोक पालानाम मद्‌भयं कल्पजीवीनाम्।
ब्रह्मणोऽपि मद्‌भयं 'द्वी परार्ध परायुषः ।।' भागवत.

इंद्राबद्दल बोलायला नको. ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा इंद्र होतात.

'येर सुरगणांची नवाई। विशेष सांगु येथ काई।
मुद्दल इंद्राचिच दशा पाही। जे दिहाचे चौदा ।। ज्ञाने.

गीतेप्रमाणे ब्रह्मदेवाचा एक दिवस म्हणजे चार युगे एक हजार वेळा गेल्यानंतर एक दिवस व तेवढीच रात्र. हा ब्रह्मदेवाचा एक दिवस. पण ब्रह्मदेवास सुद्धा मरावे लागते.

कैसे थोरीवेचे मान पाहे पां। जो सृष्टी बिजाचा साटोपा।
तोहि 'पुनरावृत्तीचिया मापा'। शीग जाहला ।। ज्ञाने.

म्हणून नैमित्तीक देव.

४) नित्य देव - ज्याना शंकराचार्य देव पंचायतन म्हणतात.

१) सूर्य, २) शक्ति, ३) गणेश, ४) शंकर, ५) विष्णू. यांना जन्ममरण नाही म्हणून हे कायमचे म्हणजे नित्य देव. यात वारकऱ्यांचा देव विष्णू (राम-कृष्ण-विठ्ठल) म्हणून यांना वैष्णव म्हणतात. भागवतात देवाची तीन रुपे सांगितले आहेत.

१) ब्रह्म, २) परमात्मा, ३) भगवान

अ) निर्गुण निराकार - ब्रह्म, ब) निर्गुण साकार - परमात्मा, क) सगुण साकार - भगवान

वदन्ति तत्तत्व विदस्तत्त्वं यज्ज्ञानमद्वयम।
ब्रह्मेति परमात्मेति भगवानिती शब्यते ।। भागवत.

१) जे सगळीकडे व्यापक आहे ते ब्रह्म
२) जो सगळ्यांचे पालन पोषण करतो तो विष्णू अथवा परमात्मा.
३) जो सहा गुण घेऊन आकारास येतो तो भगवान.

नमो 'विश्वरुपा' विष्णू 'मायबापा'। अपारा अमुपा 'पांडुरंगा' ।। तु. म.

महाराज एकाच चरणात तीन रुपे सांगतात.

दृष्टांत - बर्फ, पाणी व पाण्याची वाफ रुपे वेगळी पण मूळ तत्व H_2O. ज्याप्रमाणे हवा, वारा, वादळ क्रिया वेगळी मूलतत्व एक आहे.

आणखी देवाचे चार प्रकार सांगितले जातात.

१) केलेले - धातुचे सोनारांनी, लोहारांनी, सुतारांनी, मूर्तिकारांनी केलेले देव.
२) मानलेले - शेंदूर लावून शेतातील, चौकातील दगड
३) झालेले - इंद्र, ब्रह्मदेव स्वकर्तृत्वाने झालेले आहेत.
४) स्वयंभू - शंकर विष्णू हे झालेले, केलेले, मानलेले नाहीत मूळातच आहेत म्हणून स्वयंभू देव.

देवाची दोन रुपे १) सगुण-निर्गुण, २) सूक्ष्म-स्थूल, ३) आकार-निराकार, ४) व्यक्त-अव्यक्त पण यात फरक नाही

जो गुणरहित सगुण सोई कैसे। जल हिम उपल बिलग नही जैसे ।। तुलशीदास

ज्याप्रमाणे पाणी व बर्फ यात फरक नाही तद्वत ही दोन्ही रुपे एकच. देव व जीव यातील फरकांचे सहा मुद्दे

देव १) दिव्य, २) प्रकाशक, ३) प्रेरक, ४) आधार, ५) ज्ञाता, ६) सर्वज्ञ
जीव १) मायावी, २) प्रकाश्य, ३) प्रेय, ४) आधेय, ५) अज्ञेय, ६) अल्पज्ञ

गीतेत दहाव्या अध्यायात श्रीकृष्णानी आपल्या ७५ विभूती सांगितल्या आहेत. तथापि काही देवाचे अंश असणारे देवच आहेत. त्यांचे प्रकार

१) मातृदेवो भव २) पितृदेवो भव ३) आचार्यदेवो भव ४) अतिथीदेवो भव. उपनिषद

१) आईवडिल हे प्रत्यक्ष देव आहेत. त्यांच्या सेवेने देव संतुष्ट होतो.

मातरं पितरम चैव साक्षात प्रत्यक्ष देवताम।
मत्वा गृही निषेवेत सदा सर्व प्रयत्नतः ।। सुभा.

मानवाने सतत माता पित्यांची सेवा करावी. यांच्या सेवेमुळे गणपतीस अग्रपूजेचा मान मिळाला. पुंडलिकास देव भेटण्यास आला.

२) संतही प्रत्यक्ष देवच आहेत. त्यांची सेवा म्हणजे देवाचीच सेवा होते.

देव ते संत देव ते संत। निमित्य त्या प्रतिमा॥ तु. म.

३) ब्राह्मण सुद्धा प्रत्यक्ष देव आहेत पण सदाचार संपन्न हवेत.

दैवाधीनं जगत सर्वं मन्त्राधीनाश्च देवताः।
ते मंत्रा ब्राह्मणाधीनास्तस्मात ब्राह्मण देवता॥ सुभा.

अर्थ - सर्व जग दैवाधीन आहे दैवते मंत्राच्या अधीन आहेत. ते मंत्र ब्राह्मणांच्या आधीन आहेत. म्हणून ब्राह्मण देवच आहेत.

जे पृथ्वीतळीचे 'देव'। तपो अवतार सावयव।
सकळ तिर्थासी दैव। उदयले जे॥ ज्ञाने.

४) गुरु सुद्धा प्रत्यक्ष देवच आहेत. मात्र हे आचार्य (आचारसंपन्न) असावेत.

गुरु हा संतकुळिचा राजा। गुरु हा प्राणविसावा माझा।
गुरुविन 'देव' दुजा। पाहता नाही त्रिलोकी॥ ज्ञान.

देवाची सेवा म्हणजेच यांची सेवा होय.

तुका म्हणे देवा। यांची केल्या पावे सेवा॥ तु. म.

मुखी अमृताची वाणी। देह 'देवाचे' कारणी॥ तु. म.

या सर्वांची सेवा म्हणजे देवाचीच सेवा होय. हे सुद्धा देवाचे प्रकारच आहेत.

★ ★ ★ ★ ★

१० : देव - सात प्रश्न

एक महात्मा एका राजाकडे मंदिरास देणगी मागण्यास येतो. राजा उदार असतो शिवाय अध्यात्मवादी व हुशार असतो. राजा साधूस सांगतो मी मंदिरास सत्तर हजार देणगी देतो. पण माझ्या सात प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील. महात्मा बारा गावचे नाही, बाराशे गावचे पाणी प्यालेला असतो. राजास सांगतो विचारा! ते हे देवाबद्दलचे सात प्रश्न :

१) देव कुठे आहे? २) देव काय पहातो? ३) देव काय करतो? ४) देव केव्हा हसतो? ५) देव केव्हा रडतो? ६) देव काय देतो? ७) देव काय खातो?

१) देव कुठे आहे - मोठी सभा भरली. राजास साधूने टोप भरुन दूध आणावयास सांगितले. दूध आणले. साधूने विचारले दुधात तूप कुठे आहे. राजा म्हणाला दुधात तूप सर्वत्र आहे. साधू बोलला तसा देव सर्वत्र आहे. सर्व देशात, सर्व काळात व सर्व वस्तूत आहे.

तो नसे ऐसा ठाव असे कवण। सर्वत्र संपूर्ण गगन जैसे॥ नाम.

एका नास्तिक शिक्षकाने आस्तिक विद्यार्थ्यास विचारले देव कुठे आहे सांग तुला एक सफरचंद देतो. विद्यार्थी म्हणाला गुरुजी देव कुठे नाही सांगा मी तुम्हांस दोन सफरचंद देतो.

विठ्ठल जळी स्थळी भरला। रिता ठाव नाही उरला॥ ज्ञान.

२) देव काय पहातो - राजास साधूने दिवा आणण्यास सांगितला. दिवा आणला. दिवा कुठे पहातो विचारले. राजाने सांगितले सर्व ठिकाणी पाहतो. तसा देव सर्वांना पाहतो. त्याचे डोळे विशाल आहेत. 'मनोजगर्व मोचनं विशाललोल लोचनं' शंकराचार्य. त्याच्या दृष्टीतून काहीसुद्धा सुटू शकत नाही. ना खारुताईची सेवा ना मांडव्य ऋषीनी काजव्यास केलेली दुखापत. कोणी असं समजू नये मला कोणी पहात नाही. तो सर्वांना पहातो.

३) देव काय करतो - भक्तांचा सांभाळ व दुष्टांचे निर्दालन.

घेऊनिया चक्र गदा। हाचि धंदा करितो॥ १॥
भक्ताराखे पायापाशी। दुर्जनासी संहारी॥ तु. म.

राजास साधूने सांगितले मला शंका, प्रश्न विचारता तुम्ही खाली बसा मी तुमच्या जागेवर बसतो. मला मुकुट द्या. राजाने तसे केले. साधू बोलले. देव हे सुद्धा करतो. काय? राजाचा रंक, रंकाचा राव.

तुका म्हणे आले समर्थाच्या मना। तरी होय राणा रंक त्याचा॥ तु. म.

४) देव केव्हा हसतो - जीव जेव्हा जननीच्या उदरात असतो. तेव्हा देवास सांगतो. या संकटातून मला सोडव. मी तुझा अंश आहे. जीव म्हणतो सोहं, तू आणि मी समान. पण जीव जेव्हा संकटातून सुटतो, बाहेर येतो तेव्हा म्हणतो कोहं (क्यां) मी असं कुठे म्हणालो. ''देव तेव्हा हसतो''. आणि देवास फसविणाऱ्या जीवाच्या मागे अहं लावून देतो. राजा अहंमुळे जीव दुःख भोगतो.

५) देव केव्हा रडतो - भक्ताची दीन दशा पाहून. जेव्हा सुदामदेव श्रीकृष्णास भेटण्यास आले. सुदामाची दशा पाहिली, फाटके कपडे, पायात चप्पल नाही. शरीर कृश झालेले. हे पाहून देवास अश्रू आवरता आले नाहीत. राण्या पाणी आणण्याकरिता गेल्या. पण श्रीकृष्णानी त्याचे पाय अश्रूंनी धुतले. एक भक्त म्हणतो, 'देखी सुदामाकी दीन दसा, करुणाकरके करुणामय रोये। पाणी परातको हात छुयो नही, नयनके जलसे पग धोये॥' राजा देवास भक्ताची दशा पाहून डोळ्यात अश्रू उभे राहतात. कारण त्याचे हृदय अत्यंत कोमल आहे.

देव दयाळ दयाळ। करी तुकयाचा सांभाळ॥ तु. म.

६) देव काय देतो - देव सर्वांना सर्व देतो. देह देतो. इंद्रिय देतो, प्रेम, शक्ति देतो.

देवे दिला देह भजना गोमटा। तया झाला फाटा बाधीकेचा॥ तु. म.

दिली इंद्रिये हात पाय कान। डोळे मुख बोलाया वचन।
जेणे तू जोडसी नारायण। नाशे जीवपण भवरोग॥ तु. म.

प्रेम देवाचे हे देणे। देहभाव जाय जेणे॥ तु. म.

राजा, देव सर्वांना सर्व देतो. कारण हे सर्व देवाचेच आहे.

७) देव काय खातो - राजा, देव प्रथम भक्ताचे दोष खातो.

माझ्या मी पणाचा करोनि फराळ। उरले खावयासी बैसला सकळ।
ऐसा भुकाळ हा नंदाचा गोवळ। यासी न पुरेची ग्रासीता माझा खेळ॥ निळोबा.

यानंतर भक्ताचे चित्त हरण करतो व जन्म मरणपण खाऊन टाकतो. हे सर्व केल्यानंतर भक्ताची बोरे अथवा कण्या खातो. ''सप्त द्वीप नवखंड पृथ्वी भोजन किया अपार। एक बार शबरीके घर, एक बार विदुरके घर स्वाद लिया दो बार॥'' भक्ताने दिलेले पत्र, पुष्प, फळ अथवा पाणीसुद्धा खातो.

सातही प्रश्नांची योग्य उत्तरे ऐकून राजा खूष झाला. महात्म्यास पाया पडून एक लाख रुपये दान दिले कारण हे सत्पात्री दान होते.

★ ★ ★ ★ ★

११ : भाव

देवाकरिता भावाचीच गरज आहे.

भावेन देवं कलया नरेंद्रं धनेन कांता कपटेन शत्रूं।
सत्येन मित्रं कृपयाच पुत्रं ज्ञानेन मोक्षं वशमानयंति॥ सुभा.

अर्थ - भावाने देवास, कलेने राजास, पैशाने पत्नीस, कपटाने शत्रूस, सत्याने मित्रास, प्रेमाने पुत्रास व ज्ञानाने मोक्षास वश करावे.

न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये।
भावेहि विद्यते देवो तस्मात् भावोहि कारणम्॥ सुभा.

काष्ठात, पाषाणात, मातीत देव नाही. भावातच देव आहे. यामुळे देवास भावच कारण आहे. भाव असेल तर सगळ्यांत देव दिसेल.

देव, तिर्थ, द्विजे, मंत्रे दैवज्ञं भेषजं गुरु।
यादृशी भावना तस्य सिद्धीरभवती तादृशी॥ सुभा.

देव, तिर्थ, ब्राह्मण, मंत्र, ज्योतिषी, वैद्य, गुरु या सात गोष्टी जसा भाव असेल तशा प्राप्त होतात.

भाव म्हणजे काय? भाव म्हणजे चित्ताची एकाग्रता.

देवाकारणे भाव तस्मात। द्यावे नलगे फारसे वित्त।
झाले एकचित्त तरी बहुत। एवढ्यासाठी नका करु वाताहात गा॥ तु. म.

भाव हे देवाचे वर्म आहे. असे महाराज म्हणतात. ''वर्म ते एक आहे दृढ धरावा भाव'' वर्म चुकल्यास साध्य प्राप्त होत नाही.

एका आषाढी वारीस पदवीधर जोडपे आले होते. द्वादशीस बडव्यांच्याकडे उतरल्यामुळे त्यांच्या प्रथेप्रमाणे यांना एक एक पुरणपोळी दिली. पुरुषास पुरणपोळी फार आवडली. पत्नीस सांगितले बडवीन बाईकडून पुरणपोळीचे ज्ञान घे. तिने वही पेन्सिल घेतली व विधवा बडवीन बाईकडून सर्व माहिती लिहून आणली. पण कणीक, पुरण कसे वापरायचे हे लिहिले गेले नाही. गंगापूजनास पदवीधर पुरुषाने सर्व मित्रांना आमंत्रण दिले व सांगितले आज तुम्हांस पुरण पोळी मिळणार आहे. सर्व जण आले. ही स्त्री पोळ्यांचे साहित्य बनवून पोळ्या करण्यास बसली. पण पुरणांत कणिक घालून लाटू लागली. पोळी जमेना. पुरण लाटण्यास चिकटू लागले. ती पदवीधर असल्यामुळे तर्क केला त्या बाईची (बडवीन) पांढरी साडी होती. नवऱ्यास पांढरी साडी आणण्यास सांगितली. पोळी जमेना. काकणं फोडली. (अतिशयोक्ति होते) डोक्यावरचे केसही काढले पण पोळी जमेना. तात्पर्य, असा बाहेरचा किती बदल केला म्हणजे पोळी जमेल? तसे भाव नसेल तर बाकीच्या उपचारांना काय किंमत आहे? महाराज सांगतात.

कासया पाषाण पूजितसा पितळ। अष्ट धातु खळ भावेविण॥ १॥
भावचि कारण भावचि कारण। मोक्षाचे साधन बोलियेले॥ २॥
काय करिल जपमाळा कंठमाळा। करिशी वेळोवेळी विषयजप॥ ३॥
काय करिशील पंडित हे वाणी। अक्षराभिमानी थोर होय॥ ४॥
काय करशील कुशल गायन। अंतरी मळीण कुबुध्दि ते॥ ५॥
तुका म्हणे भाव नाही करी सेवा। तेणे काय देवा योग्य होशी॥ ६॥

अर्थ अतिशय सोपा आहे, 'तुका म्हणे भावासाठी। देव पोटी पडेल॥'

तुका म्हणे मुख्य पाहिजे हा भाव। भावापाशी देव शीघ्र उभा॥
देवाशी तो पुरे एक भाव गाठी। तोचि त्याचे मिटी देईल पाया॥ तु. म.

भाव ज्याचे गाठी। त्यासी लाभ उठाउठी॥ तु. म.

कितीतरी प्रमाणं आहेत.

भावबळे आकळे एऱ्हवी नाकळे। करतळी आवळे तैसा हरि ॥ ज्ञान.

मात्र भाव देवाकडे लावणे तेवढे सोपे नाही. संसारातील सर्व पदार्थावरील, व्यक्ति वरील चित्त काढून देवाकडे लावणे तसे अवघडच आहे. म्हणून महाराज म्हणतात.

भाव हा कठीण वज्र हे भेदवे। परी न छेदवे मायाजाळ ॥ तु. म.

१) आमच्याकडे जो भरपूर आहे तो अहंभाव, द्वैतभाव
२) ज्ञानी व योगी यांच्याकडे आहे तो सोहंभाव, अद्वैतभाव
३) भक्ताकडे आहे तो प्रेमभाव

बळाचे अनेक प्रकार आहेत. १) शक्तिबळ, २) मनुष्यबळ, ३) सत्ताबळ, ४) संपत्तीबळ, ५) तपबळ, ६) ज्ञानबळ, ७) वैराग्यबळ. पण या सर्वात 'भाव बळ' श्रेष्ठ आहे. कारण एवढा महान शक्तिशाली परमात्मा 'भावबळाने' दास होतो.

तुका म्हणे भावे। देवा सत्ता राबवावे ॥ तुका म्हणे भावे। भेणे देवे आकारावे ॥

शास्त्रात संबंधावरुन पाच 'भाव' सांगितले आहेत हे एकापेक्षा एक वरचढ आहेत. १) शांतभाव, २) दास्य अथवा सेवाभाव, ३) सख्यभाव, ४) वात्सल्यभाव, ५) माधुर्यभाव अथवा कांतभाव.

१) शांतभाव - देव आपला राजा. आपण त्याची प्रजा असा जो संबंध त्यास शांतभाव म्हणतात. देवाचे दर्शन कधीतरी होते म्हणून परमार्थ क्षेत्रात यास विशेष किंमत नाही.

२) दास्यभाव - देव आपला मालक व आपण त्याचे सेवक हा जो संबंध असतो त्यास दास्यभाव म्हणतात. जो रामायणात प्रगटला आहे. (सेवा कोटीत पहावा.)

३) सख्यभाव - देव आपला मित्र, आपण त्याचा सखा असा जो संबंध त्यास सख्यभाव म्हणतात. अर्जुन, गोपाल या भावाचे अधिकारी आहेत.

४) वात्सल्यभाव - देव आपला मुलगा, आपण त्याचे मायबाप अथवा देव आपला मातापिता आपण त्याचे लेकरु असा जो संबंध त्यास वात्सल्यभाव म्हणतात. यामध्ये दशरथ कौसल्या, नंद यशोदा, देवकी-वसुदेव यांचा समावेश होतो.

५) माधुर्यभाव - यास कांतभाव सुद्धा म्हणतात. परमात्मा आपला पती व आपण त्याची प्रेयसी असा जो संबंध यास कांत भाव म्हणतात. या भावामध्ये गोपिकांचा समावेश होतो.

याचा विचार केल्यास राजा-प्रजा यापेक्षा मालक-नोकर संबंध जवळचा. त्यापेक्षा आईवडिलांचा संबंध जवळचा व आईवडिलांपेक्षा नवराबायकोचा संबंध जवळचा आहे. देवाशी कोणता तरी संबंध (भाव) ठेवून जवळीक साधता येईल.

संतांनी या सर्व भावांचा स्विकार केला आहे.

पहिले दोन भाव रामायणात व बाकीचे तीन भाव महाभारतात अर्थात श्रीकृष्ण लिलेमध्ये प्रगट झाले आहेत. श्रीकृष्णानी या तीनही भावांच्या अधिकाऱ्यास 'विश्वरुप' दाखविले आहे. (अर्जुन, यशोदा, गोपिका यांना)

तात्पर्य देवास भावच हवा त्याचा जीवनात अभाव असता कामा नये. बाजारभाव कमी जास्त होतो. पण हा भाव सतत वाढता हवा.

एक चिंतन

१) रामाचा 'स्वभाव' जाणावा.
२) कृष्णाचा 'प्रभाव' ध्यानात घ्यावा.
३) शिवाचा 'समभाव' ओळखावा.
४) कामनांचा 'अभाव' व्हावा.
५) नामावर 'दृढभाव' असावा.

★ ★ ★ ★ ★

१२ : मूर्ती

शैली दारुमयी लौहि लेप्या लेख्या च सैकती।
मनोमयी मणिमयी प्रतिमाष्टविधा स्मृताः ॥ भागवत

अर्थ - पाषाण, काष्ट, धातू, मृत्तिका, चित्रमय, वाळू, मनोमयी व मणिमय. हे मूर्तीचे आठ प्रकार आहेत. खरं पाहता मूर्ति महत्वाची नाही. भाव म्हणजे प्रेम महत्वाचे. भाव असेल तर दगडातसुद्धा देव प्रगट होतो

भाव धरी तया तारील पाषाण। दुर्जना सज्जन काय करी ॥ तु. म.

न काष्टे विद्यते देखो न पाषाणे न मृण्मये।
भावेहि विद्यते देवो, तस्मात भावो हि कारणम ॥ सुभा.

देव काष्ठात, दगडात अथवा मातीत नाही (तसा सर्व ठिकाणी आहे) भावामुळेच देव मिळतो. अर्थात देवास भावच हवा. वाङ्मयात मिळालेले आठ मूर्ती प्रकार

१) वेदमूर्ती - धर्ममूर्ती परमात्मा - 'धर्माची तू मूर्ती। पापपुण्य तुझे हाती ॥' तु. म.

अल्पभाव अल्पमती। अल्प आयुष्य नाही हाती।
अपराधाची ओळलो मूर्ती। अहो वेदमूर्ती परियेसा ॥ तु. म.

परमात्मा धर्मपालना करिता अवतार घेतो. वेदानी याचेच वर्णन केले आहे. म्हणून हा धर्ममूर्ती व वेदमूर्ती.

२) श्रीमूर्ती - सद्‌गुरुना नाथमहाराजांनी श्रीमूर्ती म्हटले आहे.

ओम नमो सद्‌गुरु श्रीमूर्ती। चराचर तुझी विभूती ॥
विश्वात्मा विश्वस्फूर्ति। अमूर्तमूर्ती श्रीगुरुराया॥ भागवत

३) पुण्यमूर्ती - संध्या करणारे सदाचारी ब्राह्मण यांना नाथमहाराज पुण्यमूर्ती म्हणतात.

जयां अंगी एक रती। पाप न राहे संघे हाती।
या लागी ब्राह्मण पुण्यमूर्ती। स्वये रमापती बोलिला॥ भा. नाथ.

४) ब्रह्ममूर्ती - संताना नामदेवराय ब्रह्ममूर्ती म्हणतात.

ब्रह्ममूर्ती संत जगी अवतरले। उद्धरावया आले दीन जना॥ नाम.

५) भाग्यमूर्ती - पुंडलिकाच्या मुखातून नामदेवराय समाधीच्या अभंगात सांगतात, निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई हे चौघे 'भाग्यमूर्ती' आहेत.

पुंडलिक विस्मय बोलती। हे चौघे भाग्याच्या मूर्ती।
यांच्या नामे जग उद्धरती। पावे विश्रांती जगासी॥ नाम. सोपान काका समाधी

६) पापमूर्ती - आततायी याना तुकाराम महाराज पापमूर्ती म्हणतात. कौरव आततायी होते. असा गीता उल्लेख करते. (पाप, कोटीत आततार्इचे सहा प्रकार दिले आहेत.)

दुखवी तो बुडे सांगडीचा ताफा।
आततायी पापाचिच 'मूर्ती'॥ तु. म.

७) वाङ्‌मयमूर्ती - गीतेस ज्ञानेश्वर महाराज वाङ्‌मयमूर्ती म्हणतात.

म्हणोनि मज काही। समर्थनी आता विषय नाही।
गीता जाणा हे वाङ्‌मयी। श्रीमूर्ती प्रभूचि॥ ज्ञाने.

८) ज्ञानमूर्ती व कैवल्यमूर्ती – ज्ञानोबाराय. देवाच्या मुखातून नामदेव राय सांगतात

ऐके ज्ञान चक्रवर्ती। तू तव ज्ञानाचिच मूर्ती।
परी पुससी जे आर्ती। ते कळली मज॥ नाम. समाधी अभंग

आणि कैवल्य पुतळा, अर्थात मोक्षमूर्ती म्हणजे सुद्धा माऊलीच. असे नाथ महाराज वर्णन करतात

कैवल्याचा पुतळा। प्रगटला भूतळा। चैतन्याचा जिव्हाळा। ज्ञानोबा माझा॥ नाथ.

असे हे मूर्तीचे प्रकार आहेत.

१३ : सुख

सर्व मानव रात्रंदिवस सुखाकरिता प्रयत्न करीत आहेत. जगात एकहि माणूस असा मिळणार नाही. ज्यास दुःख हवे आहे. नाथ महाराज सांगतात ''मज लागी दुःख व्हावे। ऐसे कोणी भाविना जीवे। न वांछिता दुःख पावे। येणे न संभवे स्वतंत्रता॥'' महाभारताचा सिद्धांत आहे. ''दुःखात उद्विजती सर्वः सर्वस्य सुखमीप्सितम्॥ दुःख कोणास नको. सुख मात्र सर्वानाच हवे आहे. काहीना कपडे नसतील तरी चालेल. काहींना घर, जमिन नसेल तरी चालेल, वायकोशिवाय काही आयुष्य जगतात. काहींना देव सुद्धा नको आहे. ''देव धर्म सांदी पडिले सकळ। विषयी गोंधळ गाजतसे॥ तु. म. पण सुख मात्र सर्वांना हवे. महाभारतात कुंतीने श्रीकृष्णाकडे संकटे येऊ दे असे मागितले आहे. पण त्यातही सुखाचाच अंतर्भाव आहे. कारण संकटात श्रीकृष्ण धावून येणार व त्याचे दर्शन होणार.

विपदः सन्तु नः शश्वतत्र तत्र जगद्गुरो।
भवतो दर्शनं यत्स्यादपुनर्भव दर्शनम्॥ महाभारत

तुकाराम महाराज पण देवाकडे दारिद्र्य मागतात पण त्यामागे सर्व सुख मूळ हरि मुखात राहो म्हणतात.

तुका म्हणे करी फकिराचे परी। रात्रंदिवस हरि येईल मुखी॥

प्रश्न निर्माण होतो. सुख म्हणजे काय? माऊली दोन ओव्यात सुखाची व्याख्या सांगतात.

किंबहुना सोये। जीव आत्मयाचे लाहे॥
तेथ जे होये। तया नाम सुख॥
सुख ते गा किरीटी। दाविजेल तुज दिठी॥
जे आत्मयाचे भेटी। जीवाशी होय॥ (जीव आत्म्याचा संयोग)

सुख जरी एक असले तरी सुखाचे विषय अनेक आहेत. संसारात प्रत्येकाचा सुखाचा विषय वेगळा आहे. मात्र परमार्थात साधूसंतांना देवाशिवाय सुख कशातच दिसत नाही.

दृष्टांत - एका शाळेची तपासणी करण्याकरिता वरिष्ठ तपासनिस आले होते. अर्थात शाळेस न कळविता. अचानक एका वर्गात अधिकारी घुसले. शिक्षक पुस्तक वाचत होते व विद्यार्थ्यांचा गोंधळ चालू होता. साहेब आल्यानंतर सर्व शांत झाले. तपासनीसानी एका मुलास विचारले. सात त्रिक किती? पहिला विद्यार्थी म्हणाला सात त्रिक दहा. अधिकारी नाराज झाले. दुसऱ्यास विचारले त्याने पन्नास सांगितले. चौथ्याने १०० सांगितले. साठ विद्यार्थ्यानी वेगळी वेगळी उत्तरे दिली. अधिकाऱ्यांनी शिक्षकास शेरा दिला व दुसऱ्या वर्गात गेले. वर्गात शिक्षक ९ चा पाढा शिकवत होते. अधिकाऱ्यांनी पाढा पुसण्यास सांगितले व एका मुलास विचारले. ९ त्रिक किती? विद्यार्थ्याने उत्तर दिले नऊ त्रिक सत्तावीस. दुसऱ्यास, तिसऱ्यास, चौथ्यास विचारले नऊ त्रिक सत्तावीस

सांगितले. साठ मुलांनी एकच उत्तर दिले. नऊ त्रिक सत्तावीस. अधिकारी विनोदाने म्हणाले अठ्ठाविस कां नाही? एक हुशार विद्यार्थी म्हणाला अठ्ठावीस होईल तुम्हास धरुन. मात्र नऊ त्रिक सत्तावीसच. सिद्धांत हा की पहिला वर्ग संसारी लोकांचा. प्रत्येकाची सुखाची व्याख्या वेगळी. दुसरा वर्ग संताचा, सुखाची एकच व्याख्या.

सर्व सुखाचे आगर। बाप रखुमादेवीवर॥ ज्ञान.

तुका म्हणे माझे हेचि सर्व सुख। पाहिन श्रीमुख आवडिने॥ तु. म.

सर्व सुखाचे आगर। म्हणे नरहरी सोनार॥
सर्वहि सुखाचे हा जोडला आगर वो॥ निळो.

तात्पर्य - सुख म्हणजे देव व देव म्हणजेच सुख. संसारात सुखाचा भास आहे. सुख मिळणे शक्य नाही.

सुख पहाता जवापाडे। दुःख पर्वता एवढे॥ तु. म.

दुःख बांदवडी आहे हा संसार। सुखाचा विचार नाही कोठे॥ तु. म.

ज्याप्रमाणे तळ्याच्या काठावर असलेल्या झाडावर मोत्याच्या हाराच्या तळ्यात पडलेल्या प्रतिबिंबाकरिता हार मिळावा म्हणून उड्या मारण्यासारखे आहे. ज्ञानेश्वर महाराज दृष्टांत देतात

जैसा नक्षत्राचिया आभासा। साटी घातु झाला तया हंसा।
माजी रत्नबुद्धीचिया आशा। रिघोनिया॥ ज्ञाने.

संसारात कोणास सुख झाले नाही. सुख होत नाही व सुख होणार नाही. संसारिक सुखाचे तीन प्रकार गीतेत आले आहेत.

अ) १)

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम्।
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम्॥ गीता १८/३७

आता चंदनाचे बुड। सर्पी जैसे दुवाड।
कां निधानाचे तोंड। विवसिया जेवीं॥ ज्ञाने.

संसारीक सात्विक सुख म्हणजे अगोदर कठीण व नंतर चांगले त्यास सात्विक सुख म्हणतात. माऊलींची एकच ओवी घेतली आहे जसे चंदन मिळविण्याकरिता सर्प बाजूस करावे लागतात अथवा धनसाठा मिळण्याकरिता भूतांना हटवावे लागते.

२)

विषयेंद्रिय संयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम्।
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम्॥ गीता १८/३८

अर्थ - विषय व इंद्रिय यांच्या संयोगाने जे क्षणिक सुख होते. परिणाम वाईट होतो त्यास राजस सुख म्हणतात.

अधिकारीया रिगता गावो। होय जैसा उत्साहो।
कां रिणावरी विवाहो। विस्तारिला॥ ज्ञाने.

ज्याप्रमाणे एखादा मंत्री बोलवावा. तो आश्वासन देऊन गेल्यानंतर उत्सवाच्या हिशोबाकरिता भांडणे लागावी अथवा कर्ज काढून लग्न करावे व नंतर दहा वर्षे फेडावे. तसे राजस सुख आहे.

३)

यदग्रे चानुबन्धे च सुखं मोहनमात्मनः।
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम्॥ गीता १८/३९

या सुखात फक्त सुखाचा भास होतो. असते सर्व दुःखच.

आणि अपेयाचेनि पाने। अखाद्याचेनि भोजने।
स्वैरस्त्रीसंनिधाने। होय जे सुख॥ ज्ञाने.

जे दारु पिण्यात, नको ते खाण्यात अथवा वेश्यागमनात सुख वाटते त्यास तामस सुख म्हणतात. मुंगीपासून ब्रह्मदेवापर्यंत ही सुखे आहेत. यांच्यात पाडले तर आणखी तीन प्रकार पडू शकतात. पण यात पूर्ण सुख नाही. ब्रह्मदेवास पण दुःख आहे असे तुकोबाराय म्हणतात.

ब्रह्मादिक पदे दुःखाची शिराणी।
तेथे चित्त झणी जडो देसी॥

ब) सुखाचे परत तीन प्रकार आहेत. उत्तरोत्तर श्रेष्ठ असे.

१) विषय सुख - हे नेहमी घटत जाते. लग्नाच्या पहिल्या वर्षी जे नवरा बायकोत आकर्षण असते ते चार वर्षाने रहात नाही १०-१५ वर्षाने एकमेकांना बोलतात लग्न केले नसते तर बरे झाले असते. हल्ली तर असे आहे पहिल्या वर्षी बायको नवऱ्याचे ऐकते. दुसऱ्या वर्षी नवरा बायकोचे ऐकतो व तिसऱ्या वर्षी शेजारी दोघांचे भांडण ऐकतात. यास संसारीक सुख म्हणतात.

२) ब्रह्मसुख - हे घटतही नाही व वाढतही नाही.

३) प्रेमसुख - हे उत्तरोत्तर सतत वाढतच असते यास भक्तिसुख पण म्हणतात नारद यास ''प्रतिक्षणवर्धमानं'' असे म्हणतात. तुकोबारायांच्या शब्दात

अंगी प्रेमाचे भरते। नेघे उतार चढते॥

क) परमार्थिक सुखाचे तीन प्रकार आहेत. जेव्हा श्रीकृष्ण गोकुळात प्रगट झाले तेव्हा तीन

प्रकारचे गोकुळवासीयांना सुख झाले. याला अंत व पार नाही.

गोकुळिच्या सुखा। अंत पार नाही लेखा॥ तु. म.

गोकुळी आनंद प्रगटले सुख। निर्भर हे लोक घरोघरी॥
घरोघरी झाला लक्ष्मीचा वास। दैन्य दारिद्र्यास त्रास आला।
आला नारायण तयांच्या अंतरा। दया क्षमा नरा नारी लोका॥
लोका गोकुळीच्या झाले ब्रह्मज्ञान। केलिया वाचून जपतपे॥ तु. म.

१) अधिभौतिक सुख - देव घरात येणे, २) आधिदैविक सुख - देव अंतरात येणे, ३) अध्यात्मिक सुख - देव अनुभवात येणे. असे हे सुखाचे नऊ प्रकार आहेत.

गरज व प्राप्त याचे चार प्रकार

१) काही गोष्टीची गरज नाही व प्राप्त नाही. भांडणाची, मारामारीची गरज नाही. प्राप्त नाही. विषाची गरज नाही व प्राप्त पण नाही.

२) गरज आहे प्राप्त आहे. अन्न, वस्त्र, निवारा याची गरज आहे. सर्वसाधारण सर्वांना प्राप्त आहे.

३) गरज नाही पण प्राप्त आहे. रोग, दारिद्र्य याची गरज नाही पण प्राप्त आहे.

रोग काय रोगीया। आवडे दारिद्र्य दरिद्रीया॥
परी भोगविजे बळीया। अदृष्टे जेणे॥ ज्ञाने.

४) गरज आहे पण प्राप्त नाही - सर्वांना कायमच्या सुखाची गरज आहे. पण सुख कायम प्राप्त होत नाही. (फक्त महात्म्ये सोडून)

सुखाचा व्यवहार - चार प्रकार

१) व्यवहार दुःखाचा फळहि दुःख. संसार दुःखाचा अर्थात फळ दुःखच मिळणार.

लटिका व्यवहार सर्व हा संसार। वाया येरझार हरिवीन॥ ज्ञान.

दुःखरुप संसारात सुख कसे मिळणार?

२) व्यवहार दुःखाचा मात्र फळ सुख. आईस गरोदरपण, बाळंतपण सर्व दुःखाच्या वावी पण लेकराचे मुख पाहिल्यानंतर सर्व दुःख विसरून सुख होते. १०० यज्ञ करणे दुःखाची गोष्ट पण काही काळाकरिता इंद्रपद प्राप्त होते.

३) व्यवहार सुखाचा पण फळ दुःख. परमार्थ करतो पण सदाचारी नसल्यामुळे फळ दुःखच मिळते.

भजन ते ओगळ वाणे। नरका जाणे चुकेना॥ तु. म.

व्यवहार तो खोटा। आता नवजो तुझ्या वाटा।
एक नामी नाही ताळा। केली सहस्त्रांची माळा॥ तु. म.

माला बनाई मोती की बिच में डाला सूत।
माला बेचारी क्या करे जपनेवाला कपूत॥ कबीरजी

टोपी बनाई खादीकी पहननेवाले हजार।
टोपी बेचारी क्या करे पेटमें काला बाजार॥ कबीरजी

अर्थात परमार्थ करुन अधोगती प्राप्त होते.

४) व्यवहार सुखाचा फळही सुखच. संतानी परमार्थाचा व्यवहार केला. सदाचारी, शास्त्रयुक्त आचार करून परमसुखाची अर्थात परमात्म्याची प्राप्ती करून घेतली.

सुखाचे व्यवहारी सुख लाभ झाला।
आनंद कोंदला मागे पुढे॥ तु. म.

★ ★ ★ ★ ★

१४ : सर्वसुख

सर्व सुख म्हणजे पूर्ण सुख. १००% सुख अथवा पूर्वीच्या भाषेत सोळा आणे सुख, ज्यात दुःखाचा लवलेश नाही ते सर्व सुख. माऊली म्हणते मी जी ज्ञानेश्वरी लिहितो आहे. त्याचे फळ आहे सर्व सुख ''नातरी सर्वसुखाची आदि। प्रमेय महानिधी। नाना नवरस सुधाब्दी। परिपूर्ण हे॥' ज्ञाने. ही ज्ञानेश्वरी तिन्ही लोकांस अर्थात जगास सुख देईल. पसायदानात माऊली गुरुकडे मागणी मागते. 'किंबहुना सर्व सुखी। पूर्ण होवूनि तिही लोकी। भजी जो आदि पुरुखी अखंडित॥' माऊलींची प्रतिज्ञा पण अशी आहे माझ्याकडे कान, मन एकवटून लक्ष द्या मी तुम्हांस सर्वसुखास पात्र करीन. 'तरी अवधान एकले दिजे। मग सर्व सुखासी पात्र होईजे। हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड आइका॥' पण हे सर्व सुख आहे कोठे? अर्थात सर्वांच्या हृदयात ''तैसा हृदयामध्ये मी रामु। असता सर्व सुखाचा आरामु।'' हृदयात आहे पण आपण बाहेर शोधतो आहे. मिळेल कसे? 'कस्तुरी कुंडल वसे मृग दुंढे वनमाय। वैसा घट घट राम है दुनिया जाने नाय॥' कबीर. आपण अंतर्मुख झाल्याशिवाय आपले सुख आपणास मिळणार नाही. मासा पाण्याच्या आधारावर राहतो. झोपतो पाण्यात. ''पाण्यातील मासा झोप घेई कैसा। जावे त्याच्या वंशा तेव्हा कळे॥'' तु. म. यापेक्षा मोठे आश्चर्य आहे पाण्यात राहून माशास तहान लागते, 'पानीमो मीन प्यासी। मोहे सुन सुन आवत हासी॥' मीरा. पण ही वस्तूस्थिती आहे. मासा तहानेने तडफडतो व उलटा होतो. तेव्हा खालच्या बाजूस असणारा कप्पा उघडतो, त्याच्यात पाणी जाते व तहान मिटते. मासा पाण्याच्या आधारावर राहून जोपर्यंत उलटा होत नाही तोपर्यंत तहान

भागत नाही. तद्वत जीव अंतर्मुख होत नाही तोपर्यंत सर्व सुख मिळणे शक्य नाही. देव पळून मिळत नाही. वळून मिळतो. तात्पर्य पूर्ण सुख परमात्मा सर्वांच्या हृदयात आहे व सर्वांना हे सुख मिळविण्याचा अधिकारपण आहे. ''सर्व सुखा अधिकारी। मुखी उच्चारी हरिनाम ।।'' तु. म.

सर्व सुख पहाण्याकरिता चार प्रकार पहावे लागतील.

१) दुःखातून सुख वजा - जीवनात एक दुःख असेल तर सर्व सुख वजा होते. दशरथ राजास सर्व सुखे होती पण एक पुत्र सुख नव्हते त्यामुळे दुःखी होते. ते वसिष्टास म्हणतात पुत्रहिनस्यमं राज्य सर्वं दुःखाय कल्पते ।। अ. रामायण. रावणास ८० हजार बायका पण सीता वश होत नाही म्हणून दुःखी होता.

२) दुःखातून दुःख वजा - दुसऱ्याचे जास्त दुःख पाहिले की आपले कमी दुःख वजा होते. जसे गौतम बुद्धांनी, मेलेला मुलगा, जिवंत करण्याकरीता आलेल्या बाईस सांगितले. तुझा मुलगा जिवंत होईल पण ज्याच्या घरी कोणीच मेले नाही त्या घरच्या मूठभर मोहऱ्या घेऊन ये. तिला एकहि घर असे मिळाले नाही. की ज्या घरात कोणी मेलेले नव्हते. तिकडेच तिला बोध झाला. ''साधूबोध झाला नुरोनिया ठेला। ज्ञान. सगळ्याचे सगळे मरतात मग आपला मुलगा मेला म्हणून दुःख कशाला. ती भगवान बुद्धाकडे आली व प्रेत घेऊन स्मशानात गेली. दुःखातून दुःख वजा.

३) सुखातून सुख वजा - दुसऱ्याचे जास्त सुख पाहून आपले कमी सुख वजा होणार. शेजारी रंगीत टि.व्ही. आला की आपल्या कृष्णधवल टि.व्ही.मध्ये सुख वाटत नाही. पायी चालणारा सायकल स्वारास पाहून दुःखी, सायकलवाला मोटरसायकलवाल्यास पाहून दुःखी, मोटर सायकलवाला कारवाल्यास पाहून दुःखी, कारवाला विमानवाल्यास पाहून दुःखी होतो. जगात यामुळेच दुःख जास्त आहे. संसारात सुखी व्हायचे असेल तर आपल्यापेक्षा कमी प्रतिच्या माणसाकडे पहा. मात्र ज्ञानाच्या दृष्टीने आपल्यापेक्षा मोठ्या माणसाकडे पहा. म्हणजे समाधान होईल. हे सुखातून सुख वजा.

४) सुखातून दुःख वजा - एक परमार्थिक सुख झाले तर सगळी दुःखे वजा होतात यास सर्व सुख म्हणतात. स्वप्नात सुद्धा दुःख होत नाही.

दुःख ते कैचे न ये स्वप्नासी। भुक्ति मुक्ति झाल्या कामारी दासी।
त्यांचे वर्म तू आम्हापाशी। सुखे राहिलासी प्रेमाचिया ।। तु. म.

असे सुख संतांजवळ असते. **सर्व सुख ल्यालो सर्व अलंकार। आनंदे निर्भर डुल्लतसो ।। तु. म.**

सर्व सुखाची लहरी। ज्ञानाबाई अलंकापुरी ।। नाथ.

(निर्धन कहे धनवान सुखी, धनवान कहे राजा हमारा ।
राजा कहे महाराज सुखी, महाराज कहे इंद्र हमारा
इंद्र कहे ब्रह्मा सुखी ब्रह्मा कहे शंकर प्यारा ।
शंकर कहे विष्णु सुखी, विष्णु कहे भक्त हमारा ।
भक्त सुखी जो नाम जपे बाकी दुखिया सब संसारा ।।)

सर्वसुखे

आपण सुखाचे प्रकार पाहिले. सर्व सुख म्हणजे काय याचा विचार केला. आता सर्वसुखे म्हणजे काय हे समजावून घ्यायचे आहे. संसारीक सुखाचे जसे अनेक विषय आहेत तसे परमार्थिक सुखाचे बरेच प्रकार आहेत. नामदेवरायाचे गुरु यांनी नामदेवरायांना सुखाचे १३ प्रकार सांगितले आहेत. हे गुरु म्हणजे विसोबा खेचर होय.

सुखालागी तुझे मन गिवसीत तळमळी। परी सुख आहे जवळी न कळे तुज ।। १ ।।
दर्पणी दिप्ती की दुग्धी घृतशक्ति। करणीविन हाति न लभे जाण ।। २ ।।
सुखालागी सुख सोय दाखवित आहे। अनुभवोनि होय सुख रुप ।। ३ ।।
सुख ते शांती सुख ते दया क्षमी। सुख ते उपदेश मी निर्विकारी ।। ४ ।।
सुख ते नैराश्य सुख ते हरिचे दास्य। सुख ते विश्वास सदा बसे ।। ५ ।।
सुख ते संतसंगती सुख ते नामी प्रिती। सुख ते विकृति विषय भोगी ।। ६ ।।
सुख ते एकांतवास सुख लौकिक त्रास। सुख ते सौरस स्वस्वरुपी ।। ७ ।।
म्हणे खेचर विसा परियेसी विष्णूदासा। न घडे भरवसा तरी अनुभवने ।। ८ ।।

१) शांती, २) क्षमा, ३) दया, ४) निर्विकारता, ५) नैराश्य, ६) हरिचे दास्य, ७) विश्वास, ८) संतसंगती, ९) नामी प्रिती, १०) विषय विकृति, ११) एकांतवास, १२) लौकिक त्रास, १३) आत्मानुसंधान. यापेक्षा १४) गुरु, १५) धर्म यामध्ये सुद्धा सुखच आहे. अशी परमार्थिक 'सर्व सुखे' संतांजवळ असतात.

सर्वसुखे आजी येथेचि ओळली। संताची देखिली चरणांबुजे। तु. म.

सर्व सुखे मोहरती या ठाया। जेथे दाटणी या वैष्णवांची। तु. म.

सुख एक हेचि ठायी। 'बहू' पायी संताच्या। तु. म.

काही सुखाचे विषय व त्याची संत प्रमाणे

१) शांती -

शांतीपरते नाही सुख। येर अवघेची दुःख ।। तु. म. अशांतश्य कुतः सुखं - गीता

आला शीतळ शांतीचा वारा। तेणे 'सुख' झाले या शरिरा ।। नाम.

२) क्षमा -

तुका म्हणे क्षमा सर्वांचे स्वहित। धरा अखंडित 'सुखरुप' ।।

३) दया -

दया तेथे धर्म। धर्म तेथे सुखागम। सुखी पुरुषोत्तम। असे जैसा ।। ज्ञाने.

४) नाम -

सुखाचे फुकाचे काही न वेचे भांडार। कोटी यज्ञा परिस तुका म्हणे हेचि सार ।।

सुख तरीच घडे भजनाचे सार। वाचे निरंतर रामनाम॥ तु. म.

५) नैराश्य -

नैराश्यं परमं सुखं॥ भागवत

जयाचिया ठायी पांडवा। अपेक्षे नाही रिघावा।
सुखासी चढावा। जयाचे असणे॥ ज्ञाने.

६) एकांत -

येणे सुखे रुचे एकांताचा वास। नाही गुण दोष अंगा येत॥ तु. म.

एकांतिचे सुख देई मज देवा। आघात या जीवा चुकवोनि॥ तु. म.

७) गुरु -

गुरु हा सुखाचा सागरु। गुरु हा प्रेमाचा आगरु॥
गुरु धैर्याचा डोंगरु। कदाकाळी डळमळेना॥ ज्ञान.

८) देव -

सुखाचा सागर उभा विटेवरी। कृपादान करी तोचि एक॥ तु. म.

९) ज्ञान -

गुरु तेथे ज्ञान। ज्ञानी आत्मदर्शन॥
दर्शनी समाधान। आथी जैसे॥ ज्ञान.

१०) विषय विकृति -

आमिषा अंगी दुःख असे। त्यागी असे बहु 'सुख'॥ तु. म.

११) संतसंग -

सुख या संत समागमे॥ तु. म.

१२) धर्म -

स्वधर्म जरी लोपला। तरी सर्व 'सुखाचा' धारा मोडिला।
दिपा सवे हरपला। प्रकाश जैसा॥ ज्ञान.

अशी अनेक प्रमाणे सांगता येतील. विस्तार भयास्तव थोडी प्रमाणे दिली आहेत. अशी सुखे संताजवळ असतात. या सर्व सुखांचा साठाच संतांपाशी असतो. सागरातून वाफेच्या ढग निर्माण होतात. ढगांचा पाऊस, पावसामुळे ओहोळ, ओढे, नदी व परत समुद्र अर्थात पाणी समुद्राचे तसे संत सागरासारखे आहेत.

तुका म्हणे संत सुखाचे सागर। मना निरंतर धणी घेई॥

देव सुद्धा संतसंगतीने सुखी होतो.

संताचे सुख झाले या देवा। म्हणऊनि सेवा करी त्यांची॥ तु.म.

★ ★ ★ ★ ★

१५ : भक्ति

भक्ति म्हणजे देवासी विभक्ति नसणे. स्वस्वरुपाशी सतत अनुसंधान यास नाथ महाराज भक्ति म्हणतात. 'सहज स्वरुप स्थिती तया नाव भक्ति। नाथ.' माऊलीपण असेच म्हणते.

एऱ्हवी तिजी ना चौथी। हे पहिली ना सरती॥
पै माझिये सहजस्थिती। भक्ति नाम॥ ज्ञाने.

अहर्निशी माझी कथा। अहर्निशी माझी वार्ता।
अहर्निशी माते ध्याता। भक्ति तत्वता ती नाव॥ नाथ.

तुकाराम महाराज मात्र थोड्या वेगळ्या भाषेत सांगतात.

हेचि थोर 'भक्ति' आवडती देवा। संकल्पावी माया संसाराची॥

संसारावरील माया म्हणजे प्रेम सोडायचे व तेच प्रेम देवाकडे वळवायचे याचेच नाव भक्ति व हिच थोर व आवडती भक्ति आहे. कोणत्याही संताने संसार सोडण्यास सांगितले नाही. संसारावरचे प्रेम सोडा सांगितले. माऊली म्हणते 'असोनि संसारी जिव्हे वेगु करी॥' संसारात रहा पण तुमच्या आत संसार नको जसे पाण्यात नाव तरते. पण नावेत पाणी आले की बुडालीच. प्रेम जर संसारात असेल व क्रिया भक्तिच्या असतील तर करोडो जन्म गेले तरी देवाची प्राप्ति होणार नाही.

दृष्टांत - शहरातील कॉलेजची चार मुले खेडेगावात गेली होती. शहरातील मुलांना खेडेगाव आवडते (थोडे दिवस) व खेड्यातील मुलांना शहर, मुले नदीच्या पलिकडे गेली. खूप फिरली. बिअर पिवून तर्र झाली व परत येण्यास उशीर झाला. नावाडी घरी गेला होता. नाव मात्र काठावर होती. मुले नावेमध्ये बसली व फेराफेराने वल्हवण्यास सुरुवात केली. चौघेजण रात्रभर नाव वल्हवत होते. सकाळ झाली. पाहिले तर नाव जाग्यावर होती. नंतर त्यांच्या लक्षात आले की नावेची दोरी झाडास बांधली होती. तद्वत प्रेमाची दोरी जर संसारात बांधली असेल तर एका क्रियेस काही किंमत रहात नाही. तुलसीदास म्हणतात सर्वावरचे प्रेम काढून (प्रेमाचे धागे) ती प्रेम दोरी देवाच्या चरणी बांधा. याचेच नाव भक्ति.

जननी जनक बंधु सुत दारा। तनु धनु भवन सुहृद परिवारा।
सब कै ममता ताग बटोरी। मम पद मनही बांध बरी डोरी॥

भक्तित प्रेम प्रधान आहे. सा त्वस्मिनपरम प्रेम रुपा॥ ना. भ. सू. २. नारदानी भक्ति सूत्रात भक्तिचे ४ प्रकार सांगितले आहेत.

१) पूजादिष्वनुराग इति पाराशर्यः ॥ ना. भ. सू. १६

नारदांनी व्यासांचे मत सांगितले आहे. पूजेत प्रेम असणे यास भक्ति म्हणतात. पण यात पूजा

साहित्यात उणिव येण्याची शक्यता म्हणून

२) कथादिष्विति गर्गः ।। ना. भ. सू. १७ कथेत प्रेम असणे ही भक्ति असे गर्गाचार्यांचे मत नारदानी सांगितले आहे. यात पण भजनाचे साहित्य न मिळण्याची शक्यता आहे. म्हणून

३) आत्मरत्यविरोधेनेति शाण्डिल्यः ।। ना. भ. सू. १८ सतत आत्मानुसंधान असणे यास भक्ति म्हणतात हे शाण्डिल्यांचे मत नारदांनी सांगितले. तथापि यात कर्म बाधा येण्याची शक्यता आहे. म्हणून नारदानी स्वतःची व्याख्या सांगितली आहे व हिच श्रेष्ठ ठरविली आहे.

४) नारदस्तु तदर्पिताऽखिलाचारिता तद्विस्मरणे परम् व्याकुळतेति ।। ना. भ. सू. १९ अर्थात आपले रोजचे काम, आचार देवास अर्पण करुन त्याचे सतत स्मरण करावे व विस्मरण झाल्यास व्याकुळ व्हावे. ही खरी भक्ती आहे. त्यांनी गौळणीचे उदाहरण दिले आहे. यथा व्रजगोपिकानाम ना. भ. सू. २१ गौळणी आपला काम धंदा न सोडता सतत श्रीकृष्णाचे स्मरण करीत होत्या व विस्मरणाने व्याकुळ होत होत्या.

धन्य भाग्याच्या त्या जन्मल्या संसारी । ज्यांचे ध्यानी मनी नित्यकाळ हरि ।
करिता कामकाज दृष्टी त्याचे वरी । बोलता चालता जेविता निरंतरी वो ।। निळो.

शास्त्रात भक्तिचे पाच विधी सांगितले आहेत.

१) अन्वय विधी - यानेच देवाची प्राप्ति होते का? अर्थात यामुळेच.

तैसा मी एकेचि परी । आतुडे गां अवधारी ।
जरी भक्ति येऊनि वरी ।। चित्ताते गा । ज्ञाने.

२) व्यतिरेक विधी - याच्या शिवाय (भक्ति शिवाय) देवाची प्राप्ति होत नाही का? अर्थात नाही. कारण कर्मामुळे ब्रह्मपदापर्यंत जाता येते. योगाने समाधी सुख मिळेल. ज्ञानाने मुक्ति मिळेल. पण भक्तिनेच देवाची प्राप्ति होईल.

३) निरपेक्षता विधी - भक्तिला बाकीच्या साधनांची अपेक्षा नाही ही स्वतंत्र आहे. 'भक्ति सुतंत्र सब सुख खाणी ।। तुलशीदास' अगदी आडाण्यातील अडाणी भक्तिने देवाची प्राप्ति करून घेतो.

४) सार्वत्रिकता विधी - भक्ति सर्वांना करता येते. कर्माचे, ज्ञानाचे, योगाचे अधिकारी वेगळे मात्र 'सर्वजन' भक्तिचे अधिकारी आहेत.

५) सदातनत्व विधी - ज्याची भक्ति करावी तो परमात्मा आपला नेहमी साथीदार असतो. मागेपुढे उभा राहे सांभाळित । आलिया आघात निवाराया ।। तु. म.

एक सुंदर बालक मातीत खेळत होते. मात्र हे योगभ्रष्ट बालक होते. त्या वाटेने राजा जात होता. राजाने पाहिले गोरा गोमटा मुलगा मातीत खेळतो आहे. राजाने विचारले. बाळ तू मातीत

कां खेळतोस? मुलाने उत्तर दिले मानवाचा देह मातीचा आहे व हा शेवटी मातीत मिळणार. राजा खूष झाला. म्हटला तू माझ्या बरोबर चल तुला मोठा हुशार बनवितो व दरबारात चांगले पद देतो. बालक म्हणाला काही हरकत नाही. पण माझ्या चार अटी आहेत. राजा म्हणाला कोणत्या? मी जेवणार, आपण जेवायचे नाही, २) मी झोपणार, आपण जागायचे, ३) मी कपडे वापरायचे, आपण वापरायचे नाहीत. ४) सतत माझ्या सोबत राहायचे. राजा म्हणाला, आपण तडजोड करूया. आपण दोघे जेऊ, कपडे वापरू, झोपू व मी सतत तुझ्याबरोबर एक सेवक ठेवीन. बालक म्हणाला नाही माझा स्वामी (परमात्मा) असा आहे. मी जेवतो तो जेवत नाही, मी कपडे वापरतो तो वापरत नाही. मी झोपतो तो झोपत नाही. व सतत माझ्याबरोबर असतो. अशा मालकास सोडून मी तुमच्या बरोबर कशाला येऊ? तात्पर्य परमात्मा सतत सर्वांबरोबर असतो.

शांडिल्यांनी दिनचर्याचे पाच भक्ति प्रकार सांगितले आहेत.

१) सदाचार - सर्व इंद्रिये, वाणी, बुद्धी, मन, द्रव्य, क्रिया, देह यांची शुद्धी ठेवणे.

२) अभिगमन - सकाळी उठल्यावरोबर स्नान, संध्या, देवपूजा वगैरे सात्विक कर्मे करणे.

३) उपादान - योग्य मार्गाने पैसा मिळवून कुटूंबाचे पोषण करणे. जोडोनिया धन उत्तम व्यवहारे ।। तु. म.

४) इज्या - संध्याकाळी कुटुंबातील सर्व मिळून देवाची प्रार्थना करणे अथवा मंदिरात जाऊन समाजाबरोबर, साधकाबरोबर कथा कीर्तन, प्रार्थना करणे.

५) योग - रात्री देवाचे ध्यान करत झोपणे. झोप नाही आली तर त्याचे चिंतन करणे.

यासच पंच कालक्रमणा म्हटले आहे. भक्ति ही सर्व साधनापेक्षा सोपी व थोर आहे.

सा तु कर्मज्ञानयोगेभ्योऽपि अधिकतरा ।। ना. भ. सू. २५

ही कर्म, ज्ञान, योग यापेक्षा श्रेष्ठ आहे. या प्रेमभक्तिची सहा लक्षणे आहेत.

१) गुणरहित, २) कामनारहित, ३) प्रतिक्षण वर्धमानं, ४) अविच्छिन्नं, ५) सूक्ष्मतरं, ६) अनुभव रूपं । ना. भ. सू. ५४

१) गुण पाहून भक्ति करत नाहीत.
२) भक्ति कामनारहित करतात.
३) ही सतत वाढत असते.
४) ही अखंड, निरंतर असते.
५) ही सूक्ष्म आहे. कळत नाही.
६) या भक्तिचा अनुभव घ्यायचा असतो बोलून कळत नाही.

भक्तिच्या ८ उत्तरोत्तर वाढत्या अवस्था

१) प्रेमा, २) स्नेहा, ३) मान, ४) प्रणय, ५) राग, ६) अनुराग, ७) भावावेश, ८) महाभाव

भक्तिचे उत्तरोत्तर तीन वाढते प्रकार

१) साधारण रती - स्वतःच्या सुखाकरिता देवाची भक्ति. उदा. कुब्जा

२) सामंज्यसा रती - स्वताःच्या व देवाच्या सुखाकरिता जी भक्ति होते. उदा. रुक्मिणी, सत्यभामा वगैरे राण्या.

३) समर्था रती - फक्त देवाच्या सुखाकरिता जी भक्ति होते. याच्या अधिकारी गोपिका व सर्वात अधिकारी राधा.

देवास भक्तिच आवडते. भक्ति करीत नाहीत त्यांना नाथ महाराज पशू म्हणतात.

भक्तिविन पशू कशासी वाढला। सटवीने नेला कैसा नाही॥

सुकर कूकर उंट खर बड पशुअनमें चार।

तुलसी हरिके भक्ति बिना ऐसे हि नरनार॥ तुलसीदास

माऊली तर यांना पाषाण (दगड) म्हणते

तैसे माझिया भक्तिविन। जळो ते जियालेपण।

अगा पृथ्वीवरी पाषाण। नसती काई॥ ज्ञाने.

एका महात्याने हिंदी काव्यामध्ये लिहिले आहे. सर्व आहे पण भक्ति नसेल तर नाक कापलेली सुंदर स्त्री म्हणावी.

बुद्धी बडी चतुराई बडी देहमें ममता अतिशय लिपटी है।

ज्ञान बडा धनधाम बडा जगमें करतुत प्रगटी है।

गजबाजी द्वार मनुष्य हजार तो इंद्र समान कौन घटी है।

मानो एक हरिके भक्ति बिना सुंदर नारीकी नाक कटी है॥

काय करावी ती बत्तीस लक्षणे। नाक नाही तेणे वाया गेली। तु. म.

भागवतामध्ये दोन सुंदर श्लोक आहेत.

मन्ये धनाभिजनरुपतपः श्रुतौंजतेजः प्रभाव बल पौरुष बुद्धियोगः।

नाराधनायहि भवन्ति परस्य पुसो, भक्त्या तु तोष भगवान गजयुथ पाय।

अर्थ - या गुणास समाजात मान्यता आहे. धन, चांगल्या कुळात जन्म, रुप, तप, बहुश्रुत, तेज, प्रभाव, बल, पौरुष, बुद्धी व योग तथापि हे गुण भगवंतास प्रसन्न करु शकत नाहीत त्याच्याकरिता भक्तिच हवी. गजेंद्राकडे फक्त भक्ति होती. त्यामुळे त्याचा उद्धार झाला.

भक्ताचेनि नावे। चतुष्पादादि आघवे। वैकुंठाचिये राणिवे। योग्य केले॥ ज्ञाने.

पाहे पा सावजे हातिरु धरिले। तेणे तया काकुळती माते स्मरिले।

की तयाचे पशुत्व वायो जाहले। पावलिया माते॥ ज्ञाने.

न साधयति मां योगो न साख्यं धर्म उद्धव।

न स्वाध्यायस्तपस्त्यागो यथा भक्तिर्ममोर्जिता॥ भागवत

अर्थ - मी योग, ज्ञान, धर्म, स्वाध्याय, तप, त्याग, यामुळे मिळत नाही फक्त भक्तिने मला मोजता येते.

भक्तिचिया मापे मोजितो अनंता। इतरांने तत्वता न मोजवे॥ तु. म.

भक्ति दोन प्रकारची आहे.

१) देव मिळेपर्यंत जी भक्ति केली जाते तिला साधारण अथवा अपरा भक्ति म्हणतात.

२) देव प्राप्त झाल्यानंतर जी भक्ति केली जाते तिला परा भक्ति म्हणतात. पराभक्तिमुळे देव भक्ताचा अंकित होतो. त्याच्या इशाऱ्याने नाचतो. गोपिका थोड्याशा ताकाने देवास नाचवत होत्या.

शेष महेश गणेश दिनेश सुरेशहि जाही निरंतर गावे।

आदि अनादि अनंत अखंड अभेद अखेद सुबेद बतावे।

नारदसे शुक व्यास रचे पछी हारनको पुनी पार न पावे।

ताही अहिरकी छोअरिया छछियाभर छाछपै नाच नचावे। रसखान

नाच रे तू कृष्णा मज पाहू दे नयनी । नाथ.

कृष्णा नाच रे व्यापका । म्हणताती गोपीका ।। नाथ.

तात्पर्य - भक्ति श्रेष्ठ आहे.

हरिभक्तिके तीन गुण हर कोई लागे पाव॥

खानेको मिष्ठान्न मिले आखीर वैकुंठको जाव॥

★ ★ ★ ★ ★

१६ : नवविध भक्ति

भक्तिचे नऊ प्रकार भागवतामध्ये सांगितले आहेत.

श्रवणं कीर्तनं विष्णो स्मरणं पादसेवनम्। अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ भा.

१) विष्णूचे श्रवण, २) कीर्तन, ३) स्मरण, ४) पदसेवा, ५) पूजा, ६) वंदन करणे, ७) दास्य करणे, ८) सख्य ठेवणे, ९) आत्मनिवेदन करणे. याचा थोडा वेगळा विचार केला तर

१) श्रवण, कीर्तन, स्मरण - या पहिल्या तीन भक्तित 'नाम' प्रधान आहे.

२) पादसेवा, पूजा, वंदन - या दुसऱ्या तीन भक्तित 'रुप' प्रधान आहे.

३) दास्य, सख्य, आत्मनिवेदन - या तिसऱ्या तीन भक्तित 'भाव' प्रधान आहे.

तात्पर्य - नाम + रुप + भाव = भक्ति असे तुकोबाराय ज्ञानोबाराय सांगतात.

नामरुपी जडले चित्त। त्याचा दास मी अंकित॥ तु. म.
करा विठ्ठल स्मरण। नामरुपी अनुसंधान।
जाणोनि भक्ता भवलक्षण। जपनं प्रमाण दावितो॥ ज्ञान.

भक्ति एकच मात्र तिचे प्रकार नऊ. ज्याप्रमाणे एक गहू, प्रकार बहू. एका गव्हापासून चपात्या, पुऱ्या, घुगऱ्या, लापसी, खीर, शिरा, लाडू, शंकरपाळी व कुरडया हे नऊ पदार्थ होतात. मात्र गहू या सर्वामध्ये आहे. तुकोबारायांनी संताना विनंती केली आहे.

नवविधा काय वोलिले जे भक्ति। द्यावी माझे हाती संतजनी॥ जो नवविध भक्ति जाणतो तोच शुद्ध असे तुकोबाराय म्हणतात.

तुका म्हणे नवविध। भक्ति जाणे तोचि शुद्ध॥

ज्ञानोबाराय सांगतात मन राम होण्याकरिता मी या नऊ प्रकारची भक्ति केली.

श्रवण कीर्तन पादसेवन कैचे विष्णूस्मरण केले।
अर्चन वंदन दास्य सख्य आत्मनिवेदन केले।
मन हे राम झाले, मन हे राम झाले॥ ज्ञान.

रामचरित मानस मध्ये रामप्रभूंनी शबरीस नऊ प्रकारची भक्ति सांगितली आहे. मात्र ही साधन भक्ति म्हटली जाते.

नवधा भगति कहऊँ तोहि पाहि। सावधान सुनु धरु मनमाही॥
प्रथम भगति संतन कर संगा॥ दुसरी रति मम कथा प्रसंगा॥
गुरु पद पंकज सेवा तिसरी भगति अमान।
चौथी भगति मम गुण गन करइ कपट तजि गान॥
मंत्र जप मम दृढ विश्वासा। पंचम भजन सो वेद प्रकाशा॥
छट दम सील विरती बहु करमा। निरत निरंतर सज्जन धरमा॥
सातवँ सम मोहि मम जग देखा। मोते संत अधिक कर लेखा॥
आठवँ जथा लाभ संतोषा। सपनेहुँ नहिं देखई परदोषा॥
नवम सरल सब सन छल हीना। मम भरोस हियँ हरष न दीना। तुलशीदास

अर्थ - १) पहिली भक्ति संतांचा संग करावा.
२) दुसरी भक्ति माझ्या कथेमध्ये (ऐकण्यात) प्रेम ठेवावे.
३) गुरु चरणाची सेवा करावी.
४) कपटरहित माझे गुण गावे.

५) दृढ विश्वास धरुन माझ्या नामाचा मंत्र जपावा, प्रासादिक वाणीचे भजन गावे.
६) इंद्रियावर ताबा ठेवावा, सदाचारी, विरक्त राहून कर्म करावे व सज्जनानी सांगितलेल्या धर्माचे पालन करावे.
७) संपूर्ण जग माझे स्वरुप समजावे. माझ्या भक्तांना माझ्यापेक्षा मोटे मानावे.
८) कोणत्याही परिस्थितीत समाधानी रहावे. स्वप्नातसुद्धा दुसऱ्याचे दोष पाहू नये.
९) सर्वांशी सरळ रहाणे. कोणाचा छळ करु नये. माझ्यावर विश्वास ठेवून संसारी पदार्थापासून होणाऱ्या लाभ अथवा हानी यामुळे सुखी अथवा दुःखी होऊ नये.

भागवतात नऊ भक्तिने नऊ जनांचा उद्धार झाला. तो श्लोक

श्रीविष्णोः श्रवणे परिक्षित भवद्वैयासकिः कीर्तने।
प्रल्हादः स्मरणे तदङ्घ्रिभजने लक्ष्मी पृथुः पूजने।
अक्रूरस्त्वभिवन्दनेच हनुमान दास्येच सख्येऽर्जुनः।
सर्वस्वाऽऽत्मनिवेदने बलिरभूत कैवल्यमेषां समम॥

१) विष्णू श्रवणामुळे परिक्षित राजा,
२) कीर्तनामुळे नारद, शुकाचार्य,
३) स्मरणामुळे प्रल्हाद,
४) पादसेवनामुळे लक्ष्मी,
५) पृथू राजा पूजनामुळे,
६) अक्रूर वंदनामुळे,
७) दास्यभक्तिमुळे हनुमान,
८) सख्यभक्तिने अर्जुन,
९) आत्मनिवेदन भक्तिने बळी राजा या नऊ जनाना कैवल्य म्हणजे मोक्ष मिळाला.

रामायणामधील नवविधा भक्ति व त्याचे अधिकारी

धन्ये रामकथाश्रुतौच हनुमान वल्मीक भूः कीर्तने।
सीता संस्मरणे तथैव भरतः श्रीपादुका सेवने।
पूजायां शबरी प्रणाम करणे लंकाधिपो लक्ष्मणो।
दास्ये सख्यकृतेऽर्कजोऽप्युपद्दत प्राणो जटायुः स्वयम॥ रामायण

ते धन्य १) श्रवण करणारा हनुमान - अद्याप हनुमान ज्या ज्या ठिकाणी रामकथा असते त्या त्या ठिकाणी गुप्तरुपाने हजर असतात. किंवहुना रामप्रभूकडून त्यांनी तसा वर मागून घेतला आहे.

यत्र यत्र कथा लोके विचरेषु प्रितिर्सुभा। तत्रतत्र गतिर्वेषु श्रवणार्थ सदैव ही॥ रामा.

२) कीर्तन + भक्तिचे अधिकारी वाल्मिक ऋषि. रामाचे 'शतकोटी' ने कीर्तन केले.

कूजन्तं राम रामेति मधुरं मधुराक्षरम्।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मिकी कोकीलम॥ रामरक्षा

३) स्मरण भक्तिची अधिकारी सीता - राम स्मरणामुळे अशोक वनातील स्थावर जंगम

पदार्थ राममय झाले होते. सीतेची प्रकृति इतकी कृश झाली होती की बोटातील अंगठी मनगटात जात होती.

४) पादसेवन भक्तिचा अधिकारी भरत चौदा वर्षे सिंहासनावर राम पादुका ठेऊन राज्य सांभाळले. पादुका मस्तकावर धारण केल्या.

५) पूजा भक्तिची अधिकारी - शबरी आहे. राम आश्रमात आल्यावरोवर शबरीचा भाव पाहून राम, सीता विरह थोडे विसरले. शबरीने उष्टी बोरे दिली. रामाने आवडीने खाल्ली. लक्ष्मणाने मात्र बोरांची अवहेलना केली. बोरांचा द्रोण मागच्या मागे फेकून दिला. महात्म्ये सांगतात त्या द्रोणाचा द्रोणागिरी झाला. लक्ष्मणास जेव्हा मेघनाथाची शक्ति लागली तेव्हा हनुमंतानी द्रोणागिरी पर्वतच आणला व बोरांच्या बियापासून ज्या वनस्पती तयार झाल्या त्यांच्या औषधामुळे लक्ष्मण शुद्धीवर आला.

६) वंदन भक्तिचा अधिकारी बिभिषण - रामास सतत वंदन करत होता.

७) दास्य भक्तिचा अधिकारी लक्ष्मण आहे. कारण लहानपणापासून रामाची सतत सेवा करीत असे. अगदी अवतार संपेपर्यंत रामाची सतत सेवा करीत राहिले हनुमानापेक्षा लक्ष्मण हे जेष्ठ सेवक आहेत.

८) सख्य भक्तिचे अधिकारी सुग्रीव होत. रामाशी मैत्री केली. सीता शोधास मदत करुन प्रत्यक्ष युद्धात भाग घेतला.

९) आत्मनिवेदन भक्तिचे अधिकारी जटायु आहेत. कारण सीता रावण घेऊन गेला ही बातमी सांगण्याकरिता जटायु रावणाशी युद्ध करुन, जखमी अवस्थेमध्ये रामाची वाट पहात होते. रामास सर्व समाचार सांगितला. रामाने जटायुस म्हटले मी तुला दुःख मुक्त करतो. दिव्य देह बनवितो. पण जटायु बोलले ज्याचे नाम मरताना मुखात आल्यानंतर, अधम असला तरी मुक्त होतो. मग मरताना प्रत्यक्ष राम जवळ असल्यानंतर हा देह कशाकरीता ठेवावा?

"जाकर नाम मरत मुख आवा। अधमऊ मुकुत होई श्रुतिगावा।
सो सम लोचन गोचर आगे। राखौ देह नाथ केहिं खागे॥ तुलशीदास

तात्पर्य - रामाच्या मांडीवर देह सोडला व साकेतधाम गाठले. अर्थात रामरुप झाला. ही रामायणातील नवधा भक्ति.

★ ★ ★ ★ ★

१७ : ज्ञान

ज्ञानाचे तीन प्रकार आहेत.
१) ज्ञान, २) विज्ञान, ३) अज्ञान - ज्ञानोबाराय यांनी या तिघांची व्याख्या केली आहे.

तैसी जाणीव जेथ न रिघे। विचार मागुता पाऊली निघे।
तर्कु आयणी नेघे। आंगी जयाच्या॥ ज्ञाने.

अर्जुना तया नाव ज्ञान। येर प्रपंचु हे विज्ञान।
तेथ सत्यबुद्धि ते अज्ञान। हेहि जाण॥ ज्ञाने.

१) ज्ञान - ज्या ज्ञानामुळे परमात्मा प्राप्ति होते त्यास ज्ञान म्हणतात. यासच आत्मज्ञान अथवा अध्यात्म ज्ञान म्हणतात. माऊलीच्या भाषेत

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्वज्ञानार्थदर्शनम। अतज्ज्ञानमिती प्रोक्तमज्ञानं यद्तोऽन्यथा॥ गीता

तरी परमात्मा ऐसे। जे एक वस्तु असे। ते जया दिसे। ज्ञानास्तव। ज्ञाने.

प्रथम स्वरुपज्ञान म्हणजे स्वतःचे ज्ञान झाले पाहिजे. आत्मज्ञानानंतर परमात्मज्ञान होते. मग तो महात्मा होतो.

२) विज्ञान - विषयाचे, जगाचे, वस्तूचे, पारलौकिक ज्ञान यास विज्ञान म्हणतात. यांची सुद्धा गरज आहे. कारण हे ज्ञानास सहाय्यक आहे. ज्ञानोबाराय म्हणतात

एथ विज्ञाने काय करावे। ऐसे घेसी जरी मनोभावे।
तरी पै 'आधी' जाणावे। तेचि लागे॥ ज्ञाने.

आपले शरीर पंचभूतात्मक आहे. काय खावे, काय पहावे, कोठे जावे, काय ऐकावे, काय करावे यांचे ज्ञान हवे. कारण हे शरिरास आवश्यक आहे व या शरिरामुळे परमार्थ प्राप्ति आहे. या ज्ञानात वकील, वैद्य, अभियंता वगैरे येतात. पण हे पोट भरण्यापुरते मर्यादित आहे. यामुळे अध्यात्मलाभ होणे शक्य नाही. अध्यात्म ज्ञानाशिवाय बाकीचे ज्ञान म्हणजे मोराच्या पिसावरील असंख्य डोळे होत. मुख्य पहाण्याचे डोळे नसतील तर पिसावरील डोळ्यांचा काय उपयोग?

मोरा अंगे अशेषे। पिसे असती डोळसे। परी एकली दृष्टी नसे। तैसे ते गा॥ ज्ञाने.

अर्थात तत्वज्ञानाशिवाय बाकीचे ज्ञान अपूर्ण आहे. पण याची गरज आहे.

३) अज्ञान - विज्ञान हेच सत्य आहे असे समजणे म्हणजेच अज्ञान होय. ज्ञानोबारायांनी ज्ञानेश्वरीच्या सोळाव्या अध्यायात अज्ञानाचे वर्णन केले आहे. ज्याप्रमाणे दगडास शीतउष्ण सारखे, आंधळ्यास दिवसरात्र सारखी. आगीस खाद्याखाद्य, परिसास सोने, लोखंड, पळीस चव कळत नाही, लहान मुलगा जसे खाद्य अखाद्य म्हणत नाही. तसे पाप पुण्य जाणत नाही त्यास

अज्ञान म्हणतात. तीन ओव्या देत आहे.

हे चोख हे मैळ। ऐसे नेणोनिया बाळ। देखे ते केवळ। मुखीची घाली ॥ ज्ञाने.

तैसे पापपुण्याचे खिचटे। करोनि खाता बुद्धिचेष्टे।

कडू मधुर न वाटे। ऐसी जे दशा॥ ज्ञाने.

तिये नाम अज्ञान। या बोला नाही आन॥ ज्ञाने.

गीतेतील ज्ञानाचे तीन प्रकार, सात्विक, राजस, तामस.

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमक्षिते। अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम॥ गीता १८/२०

अर्थ - भिन्न भिन्न असलेल्या सर्व भूतांच्या ठिकाणी एकच अविनाशी व अविभक्त असा आत्मा ज्याच्या योगाने पाहतो ते सात्विक ज्ञान होय.

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान पृथग्विधान।

वेति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम्॥ गीता १८/२१

अर्थ - सर्व भूतांच्या ठिकाणी भिन्न भिन्न प्रकारचे पदार्थ आहेत, असा भेदकारक बोध ज्या ज्ञानाने होतो ते राजस ज्ञान होय.

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन कार्ये सक्तमहैतुकम्।

अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम॥ गीता १८/२२

अर्थ - एका कार्याचे ठिकाणी पूर्णत्वाने जडलेले, प्रमाणरहित, तत्वार्थशून्य व क्षुद्र असे ज्ञान त्याला तामस ज्ञान म्हणतात.

यावरील ज्ञानोबारायाची टिका पहाणे महत्वाचे आहे. कारण ज्ञानेश्वरी म्हणजे ईश्वरी ज्ञानाचे भांडारच आहे.

ज्ञान मिळण्याची ४ साधने

१) इंद्रियांच्याद्वारे ज्ञान - शब्द, स्पर्श, रुप, रस, गंध याचे ज्ञान. मात्र यात डोळ्याने ८२%, कानाने ११%, त्वचेने ३.५%, नाकाने २% व जीभेने १.५% सर्व मिळून १००% ज्ञान (इंद्रियजन्य)

२) तर्काने ज्ञान - यत्र यत्र धूमः तत्र तत्र अग्निः। धूरावरुन अग्निचे ज्ञान, गढूळ पाणी नदीस आले, मागे पाऊस झाला हे तर्काने समजते. मुले चांगली यावरुन आई वडिल शुद्ध याचे ज्ञान होते.

३) प्रतिभाशक्तिने ज्ञान - दैवी शक्ति, विशेष ज्ञान होते.

४) कृपेने ज्ञान - गुरु, देव, संत कृपा यामुळे ज्ञान होते. उदा. गावबा वगैरे

५) मात्र श्रीकृष्ण शंकराचार्य, ज्ञानेश्वर महाराज हे उपजताच ज्ञानी होत.

उपजताच ज्ञानी हे वर्म जाणूनी। आले लोटांगणी चांगदेव॥ नाम.

ज्ञानानुसार व्यक्तिचे पाच प्रकार.

१) अज्ञ, २) अल्पज्ञ, ३) तज्ञ, ४) विशेषज्ञ, ५)सर्वज्ञ.

ज्ञानाच्या सप्त भूमिका

१) शुभेच्छा - देवास जाणून घेण्याची तीव्र इच्छा.

२) विचारणा - गुरु, संत, महात्म्यांना देवाविषयी विचारणा करणे.

३) तनुमानसा - गुरुकरिता साधनेकरिता तन मन लावणे

४) सत्वापत्ती - वरील साधनामुळे सात्विक वृत्ती तयार होणे.

५) ऽऽसंसक्ती - देवा विषयी आसक्ती निर्माण होणे.

६) पदार्थभाविनी - आसक्तिचा परिणाम सविकल्प समाधीपर्यंत जाणे

७) तुर्यगा - पूर्ण वस्तूरुप होणे - देवरुप होणे. अर्थात निर्विकल्प समाधीपर्यंत मजल मारणे.

ज्ञानाकरिता साधन चतुष्ट्य संपत्ति

१) विवेक, २) वैराग्य, ३) शमादि षटक संपत्ति, ४) मुमुक्षुत्व

१) विवेक - नित्यानित्य ज्ञान असणे.

२) वैराग्य - इहलोक, परलोकाविषयी ना द्वेष ना राग (आसक्ति)

३) षट्संपत्ति - १) शम-मनोनिग्रह, २) दम-इंद्रिय निग्रह, ३) श्रद्धा-शास्त्र, गुरु, वेद, देव यावर श्रद्धा असणे, ४) उपरम - लौकीकाचा वीट येणे, ५) समाधान - आहे त्या स्थितीत समाधान मानणे, ६) तितिक्षा - सुख दुःख, मान अपमान शीत उष्ण ही द्वंद्वे सहन करणे.

४) मुमुक्षुत्व - देव प्राप्तिची तीव्र जिज्ञासा असणे. त्यानंतर योग्य गुरु, महावाक्याचा बोध, शेवटी ज्ञान प्राप्ति.

ज्ञानाची १८ लक्षणे

गीतेमध्ये १३ व्या अध्यायात ज्ञानाची १८ लक्षणे सांगितली आहेत. त्याचे ४ श्लोक.

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम्। आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥

इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च। जन्ममृत्यूजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम्॥

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु। नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु॥

मयिचामन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी। विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि॥ गीता ७/८/९/१०

१) मानाची आवड नसणे, २) दांभिकपणा नसणे, ३) अहिंसा (काया वाच मने), ४) सर्व सहनशीलता, ५) सरळपणा, ६) सद्गुरुसेवा, ७) शुद्धि, ८) स्थैर्य, ९) अंतःकरण निग्रह, १०) इंद्रियांच्या ठायी विषय वैराग्य, ११) अहंकाराचा अभाव, १२) जन्म, मृत्यू, जरा, व्याधी या

ठिकाणी दुःखाचे व दोषाचे दर्शन, १३) अनासक्ति (देहासंबंधी), १४) स्त्रीपुत्रगृह इत्यादिविषयी अलोलुपता, १५) इष्ट, अनिष्ट घडले असता चित्ताचे समत्व ढळू न देणे, १६) देवाच्या ठिकाणी अनन्यपूर्वक अव्यभिचारी भक्ति १७) एकांतात राहण्याची आवड, १८) जनांच्या समुदायामध्ये राहण्याची खंती.

ही ज्ञानाची १८ लक्षणे. खरे तर माऊलीनी या ४ श्लोकात आपली सर्व प्रतिभा शक्ति ओतली आहे. या श्लोकांवरील व्याख्यान मुळात पहाणे श्रेयस्कर आहे. विस्तारभयास्तव ओव्या देत नाही. तथापि ही लक्षणे ज्याकडे आहेत समजावे त्यास 'ज्ञान' झाले.

अनुभूतिमुळे ज्ञानाचे तीन प्रकार.

१) परोक्ष ज्ञान - जे ज्ञान शब्दाने होते. अनुभव नसतो त्यास परोक्ष ज्ञान म्हणतात जसे साधक 'विठ्ठल जळी स्थळी भरला। रिता ठाव नाही उरला।।' ज्ञान. हे शब्दाने सांगतो पण अनुभव नसतो. मात्र हेही नसे थोडके. शब्दाचे पण ज्ञान नाही त्यापेक्षा हा बरा म्हणावा लागेल.

२) अपरोक्ष ज्ञान - देवाचा अनुभव येणे यास अपरोक्ष ज्ञान म्हणतात (व्यवहारात हा शब्द उलटा वापरतात) ''आजी म्या दृष्टीने पाहिला। विठ्ठलचि'' ज्ञान. हे फक्त संतानी म्हणावे. ''हा गे माझा अनुभव। भक्तिभाव भाग्याचा।।'' तु. म.

३) दृढ अपरोक्ष ज्ञान - कधी कधी साधनांत व्यभिचार होतो. पण कधी कधी साध्यात व्यभिचार होण्याची शक्यता असते. म्हणोनि शास्त्राने, संतानी दृढ अपरोक्ष ज्ञान सांगितले आहे. ज्या ज्ञानात व्यभिचार होत नाही. निश्चित असते ते दृढ अपरोक्ष ज्ञान समजले जाते.

दृष्टांत - एक राजा एका धट्ट्याकट्ट्या माणसास यज्ञाकरिता दहा मैल दूर असणाऱ्या गावी मेंढा आणण्याकरिता पाठवतो. माणूस मेंढा खरेदी करतो. खांद्यावर घेतो. रस्ता जंगलातून असतो. चार चोर येतात व विचारतात. आपण कुठे चालला? त्या माणसाने सांगितले राजाच्या यज्ञात मेंढा बळी द्यायचा म्हणून घेऊन चाललो. राजाच्या नावाने चोर घाबरले पण मेंढ्याचा लोभ मनांत होता. चौघांनी वेष बदलून दोन दोन मैलावर थांबायचे ठरविले व तसे थांबले. पहिल्या दोन मैलावर एक चोर भेटला व त्या राजाच्या माणसास म्हणाला हा कुत्रा कुठे घेऊन जातो आहेस? प्रथम त्यास आश्चर्य वाटले. मेंढा असताना हा कुत्रा कसा म्हणतो. दुसऱ्या दोन मैलावर दुसरा चोर भेटला व म्हणाला आपण कुत्रा कुठे घेऊन चाललात? आता त्यास थोडी शंका आली. पण दिसत होता मेंढा. तिसऱ्या दोन मैलावर तिसरा चोर भेटला व म्हणाला आपण कुत्रा कुठे घेऊन चाललात? पिसाळलेला वाटतो आहे. आता मात्र राजाच्या माणसाची शंका वाढली खरंच कुत्रा आहे की मेंढा? चौथ्या दोन मैलावर चौथा चोर भेटला व म्हणाला, हा पिसाळलेला कुत्रा चावेल. आता मात्र त्यास १००% वाटले ज्याअर्थी चौघे बोलतात त्याअर्थी हा मेंढा नाही कुत्राच आहे. तो मेंढा टाकून पळाला. बाकीचे चोर मागून येतच होते. त्यांनी मेंढा हस्तगत केला. तात्पर्य सत्य

ज्ञानावर पण पाखांड्यांचे वर्चस्व येण्याची शंका आहे. म्हणून दृढ अपरोक्ष ज्ञानास विशेष महत्व आहे. हे ज्ञानाचे तीन प्रकार होतात.

१) अज्ञानात अज्ञानी, २) अज्ञानात ज्ञानी, ३) ज्ञान्यात अज्ञानी, ४) ज्ञान्यात ज्ञानी. (चार प्रकार)

★ ★ ★ ★ ★

१८ : वैराग्य

ज्ञानोबाराय म्हणतात वैराग्यावाचून ज्ञान टिकूच शकत नाही.

विरक्तिवाचूनि कहीं। ज्ञानासि तगणेचि नाही। हे विचारुनि ठायी। ठेविले देवे।। ज्ञाने.

माऊलीनी दृष्टांत दिला आहे. एकाद्या जेवणाऱ्या माणसास समजले ताटात विषयुक्त अन्न आहे जरी तो १५ दिवसांचा उपाशी असेल तर जेवेल काय?

जे विषें रांधिली रस सोय। जै जेवणारा ठाउवी होय।
तै तो ताटचि सांडूनि जाय। जयापरी।। ज्ञाने.
तैसी संसारा या समस्ता। जाणिजे जे अनित्यता।
तै वैराग्य दवडिता। पाठी लागे।। ज्ञाने.

दृष्टांत - एक जावई सासुरवाडीस गेला होतो. सासूस जावई 'परब्रह्म वाटतो' एक म्हण आहे. 'नाकाचा मोती ठेवी गहाण, राखे जावयाचा मान' जावई शाकाहारी असल्यामुळे सासुबाईनी पहाटे उठून बासुंदी करण्याकरिता चुलीवर दूध ठेवले व ढवळत राहिली. तिला खोकला झाला होता व सासूबाई झोपेत होत्या. खोकता खोकता बेडका बाहेर पडला व नेमका दुधाच्या कढईत पडला. ती तशीच दूध ढवळत राहिली मात्र जावई नेमका खोकल्याच्या आवाजाने जागा झाला होता व त्याने कढईत बेडका पडलेला पाहिला होता. सर्व जेवण तयार झाले. जावयाबरोबर काही मंडळी जेवायला बसली होती. सासुबाई सर्वांना बासुंदी वाढत वाढत जावयासमोर आली जावई म्हणाले मामी मला बासुंदी सोडून बाकी पदार्थ वाढा. सासुबाई म्हणाल्या अहो खास तुमच्याकरिता बासुंदी बनविली आहे. तो म्हणाला पण मला नको. बाकीचे मात्र यथेच्छ ताव मारत होते. कारण त्यांना बासुंदीमध्ये काय आहे हे ठाऊक नव्हते. तात्पर्य मी फक्त विषाच्या ऐवजी बेडका घेतला आहे. जशी बेडक्याची आठवण होऊन बासुंदीची (चांगली वाटली तरी) किळस यावी तशी संसारातील अनात्म पदार्थांची किळस आली म्हणजे समजावे वैराग्य झाले. तुकोबाराय म्हणतात.

विटले हे चित्त प्रपंच्यापासूनी। वमन ते मनी बैसलेसे।।

मात्र वैराग्य वेगळे व वैताग वेगळा. वैताग म्हणजे वैराग्य नव्हे. एक सेवा निवृत्त म्हातारा ज्याने कष्टाने पैसा मिळविला होता. पण दोन मुलांची, त्यांच्या बायकांची उधळपट्टी पाहून नाराज होता. त्यास नातू वगैरे होते. एकदा कडाक्याचे भांडण झाले व रुसून आळंदीस जाऊन राहिला.

त्याने ठरविले पेन्शन आळंदीस मागवून घ्यावी. चार दिवस झाले. मात्र त्यास आळंदीस करमेना. मनात म्हणाला याना माझ्या बद्दल थोडेही प्रेम नाही. अद्याप कोण विचारपूस करण्यास आले नाही. इकडे दोन मुले एकत्र जमली. विचार केला बाबांची १००० रुपये पेन्शन त्यांचा खर्च महिना ४०० रुपये. शिवाय बाहेर फिरायला गेल्यानंतर मुले, घर सांभाळतात. सर्व बाबतीत यांची मदत होते आळंदीस राहिले तर आपला तोटा आहे. म्हणून दोघांनी आईस आळंदीस पाठविले. म्हातारी आळंदीस आली. म्हाताऱ्यास भेटली. चांगली कान उघाडणी केली. आपलेच दात आपलेच ओठ. "जीभ दातानी चाविली। कोणी वत्तीशी ताडिली" मुलांनी मांडीवर विधी केला तर मांडी कापायची का? म्हातारा म्हणाला तू म्हणतेस म्हणून येतो. (मनांत घरी जाण्याची इच्छा होतीच.) 'अग अग म्हशी मला कुठे नेशी' या म्हणीप्रमाणे परत घरी आला. याला वैराग्य म्हणत नाहीत. वैताग म्हणतात.

वैराग्याचे फक्त सोंग केले तर 'जन' पाठी लागतात. मग प्रत्यक्ष वैराग्य अंगी बाणले तर जनार्दन कां मागे लागणार नाही?

वैराग्य म्हणजे काय?

शास्त्रीय दृष्ट्या इहलोक, परलोक यातील कोणत्याही वस्तूची आसक्ति नसणे व द्वेषही नसणे यास वैराग्य म्हणतात. माऊलींनी अनेक दृष्टांत सांगून सिद्धांत सांगितला आहे. ज्याप्रमाणे ओकलेले अन्न याविषयी विट, किळस येते. प्रेतास आलिंगन द्यावे वाटत नाही, विषाची भिती वाटावी, जळत्या घरात कोण कसा थांबेल? वाघाच्या गुहेत वस्ती करावी वाटेल का? लोखंडाच्या रसात उडी घ्यावीशी वाटत नाही. अजगराची उशी करुन झोप लागेल कां? तसा विषयाचा विट येणे याचे नाव वैराग्य आहे व हे महाभाग्य आहे.

ते हे विषय वैराग्य। आत्मलाभाचे भाग्य।
येणे ब्रह्मानंदा योग्य। होती जीव ॥ ज्ञाने.

चिरंजीवपदामध्ये नाथ महाराजांनी वैराग्याचे तीन प्रकार सांगितले आहेत. १) तामस, २) राजस, ३) सात्विक

नाही वेदविधी आचार। नेणे सत्कर्म साचार।
कर्मधर्मी भ्रष्टाकार। ते अपवित्र तामस।

कर्ज झाले अथवा संसारीक विपत्ती आली तर संसार सोडणे व संन्यास घेणे हे तामस वैराग्य. हे वेदविधी जाणत नाहीत. सत्कर्माचे सोंग करतात. कर्म धर्मामध्ये भ्रष्टाचार असतो.

त्याग केला पूज्यते कारणे। सत्संग सोडूनि पूजा घेणे।
शिष्यममता धरोनि रहाणे। ते जाणणे राजस ॥

लोकांनी आपली पूजा करावी. गुरु म्हणून मिरवणे, मठ स्थापन करणे माऊलीच्या भाषेत,

शिष्य शास्त्राचेनी विलासे। मठादि मुद्रेचेनि मिषे।
घातले आहाती फासे। निसंगा जेथे ॥ ज्ञाने.

यास राजस वैराग्य म्हणतात. मात्र देवाकरीताच सर्वस्वाचा त्याग करणे यासच सात्विक वैराग्य म्हणतात. हा धनात, मानात, स्त्रियात फिरकत नाही. पंच विषयाचा उपभोग फक्त तनु सांभाळण्याकरीता घेतो. ज्याचे मुख्य अनुसंधान परमात्मा प्राप्ति असते त्यास सात्विक वैराग्य म्हणतात. तुकोबाराय म्हणतात.

विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे जन धन माता पिता ॥

नाथांची एकच ओवी देतो. बाकी ४२ ओव्या मुळांत पहाव्या.

कुटूंब आहाराकारणे। अकल्पित न मिळे तरी कोरान्न करणे।
ऐसे स्थिती जे वर्तणे। ते जाणणे शुद्ध वैराग्य ॥

हे वैराग्याचे तीन प्रकार. भक्ति, ज्ञान, वैराग्य याशिवाय परमार्थ प्राप्ति होऊच शकत नाही. ज्याप्रमाणे पाक (जेवण) करण्यास तीन गोष्टी हव्याच, उदक, अग्नि, धान्य.

उदक अग्नि धान्य झाल्या घडे पाक। येकाविण एक कामा नये ॥ तु. म.

पाण्याने भरलेली नदी पार करण्याकरीता १) पोहण्याचे ज्ञान हवे, २) पोहण्याकरीता ताकद हवी, ३) नदीत उडी घेण्याचे धैर्य हवे. तरच तो नदीपलीकडे जाऊ शकेल तद्वत ही भवनदी तरण्याकरीता भक्ति, ज्ञान, वैराग्य या तिघांची जोड हवीच. संत हे ज्ञान, वैराग्य भक्ति पूर्ण असतात. तुकोबारायांचे वर्णन माऊली रामेश्वर भट्टांच्या मुखातून करते

भक्ति ज्ञान वैराग्य आगळा। ऐसा नाही डोळा देखियेला ॥

या संतामुळेच साधकास भक्ति ज्ञान वैराग्य प्राप्त होते.

संतसंगे हरिची भक्ति। संतसंगे ज्ञान विरक्ति।
संतसंगे भुक्तिमुक्ति। साधका वरिती अनायासे ॥ निळो.

हनुमानरायांनी तिघांना हृदयात ठेवले आहे.

पवन तनय संकट हरन मंगल मुरती रुप।
राम लखन सीतासहित हृदयी बसऊ सूर भूप ॥ तुलशीदास

राम-ज्ञान, लक्ष्मण-वैराग्य, सीता-भक्ति या तीन गोष्टी ज्याच्या हृदयात आहेत तो महात्मा ठरतो.'सुखे मी निजलो गा शून्य सारुनी तेथे। त्रिकूट शिखरी या दान मिळे आईते ॥' तु. म. अशा भक्तास परमात्मा प्रेम भक्ति दान देतो.

★ ★ ★ ★ ★

वैराग्य पांच प्रकारामुळे होते. १) दुःख, २) किळस, ३) भिती, ४) विवेक व ५) देवावरील प्रेमामुळे

१९ : काम, क्रोध, लोभ

काम क्रोध लोभ हे तीन माणसांचे सर्वांत मोठे शत्रू आहेत. समाजात यांच्यामुळेच अनुक्रमे व्यभिचार, हिंसाचार व भ्रष्टाचार माजला आहे. सर्व दुःखाचे मूळ हे तीन दोष आहेत. गीताकारांनी ही तीन नरकाची द्वारे सांगितली आहेत.

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः। कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत॥ गीता १६/२१

परि काम क्रोध लोभ। या तिहींचेचि थोंब। थावे तेथे अशुभ। पिकले जाण॥ ज्ञाने.

हे तिघे जिथे आहेत तेथे अशुभ पिकते. ज्ञानेश्वर महाराजांनी तिघांकरिता तीन दृष्टांत दिले आहेत. ज्याप्रमाणे कफ वात पित्त यांनी शरीर सोडले, गावात चहाडी, चोर, शिंदळकी नसेल तर गाव सुखी रहाते. आध्यात्मिक, आदिभौतिक आदिदैविक ताप गेले तर अंतःकरण सुखी होते. तद्वत हे तिघे गेले तरच शांतता मिळेल. माऊलीच्या शब्दात

त्रिदोषी सांडिले शरीर। त्रिकुटी फिटलीया नगर।
त्रिदाह निमालिया अंतर। जैसे होय॥ ज्ञाने.

हे तिन्ही जीवीं जव जागती। तववरी निकियाची प्राप्ति।
हे माझे कान नाइकती। देवोही म्हणे॥ ज्ञाने.

श्रीकृष्ण पण म्हणतात जोपर्यंत जीवात हे तिघे जागे आहेत. तोपर्यंत परमार्थ प्राप्ति होणे शक्य नाही. वल्लभाचार्य म्हणतात या तिघांमुळे त्या तिघांचा नाश होतो. (भक्ति, ज्ञान, कर्म)

कामेन कर्मनाशः स्यात क्रोधेन ज्ञान नाशनम्।
लोभेन भक्तिनाशः स्यात तस्मात एतत् त्रयं त्यजेत॥

कामामुळे कर्म, क्रोधामुळे ज्ञान व लोभामुळे भक्ति नाश पावते याकरिता या तिघांचा त्याग करावा. हे तिघे चोर ज्ञानरत्नाचे हरण करतात याकरिता जागे रहा.

कामक्रोध लोभस्य देहि तिष्ठन्ति तस्करा।
ज्ञानरत्नापहाराय तस्मात जागृत जागृत॥ सुभा.

मात्र या तिघांना जिंकणे अतिशय अवघड आहे. मात्र अशक्य नाही. दृष्टांत - विश्वामित्र वसिष्ठांच्या आश्रमात हजारो सैन्यानिशी गेले. पण वसिष्ठानि त्यांना इच्छा भोजन दिले. विश्वामित्र आश्चर्यचकित झाले. वसिष्ठांनी हा सर्व कामधेनुचा प्रताप! असे सांगितले. विश्वामित्रास नंदिनीचा लोभ सुटला. तो जबरदस्तीने नंदिनीस घेऊन चालला. पण कामधेनुने दिव्य सैन्य निर्माण करुन विश्वामित्रास ससैन्य पळवून लावले. तेव्हा विश्वामित्र समजले क्षत्रिय तेजापेक्षा ब्रह्मतेज श्रेष्ठ आहे. ते तसेच तपश्चर्येस गेले. वीस हजार वर्षे तपश्चर्या केली. इंद्राने मेनका पाठविली. लग्न झाले. शकुंतला झाली. विश्वामित्रास पश्चात्ताप झाला. मनात समजले लोभ

जिंकला पण काम नाही जिंकला परत तप करु लागले. वीस हजार वर्षांने परत इंद्राने रंभा पाठविली. पॉलिटिक्स तेव्हापासून चालू आहे. रंभेस शाप दिला. काही म्हणतात जाळून खाक केली. परत विश्वामित्रास पश्चाताप झाला. मनात म्हणाले लोभ, काम, जिंकला पण क्रोध नाही जिंकला. परत वीस हजार वर्षे तपश्चर्या केली. अशी एकेका विकाराकरिता वीस वीस हजार वर्षे मिळून तीन विकाराकरिता साठ हजार वर्षे तपश्चर्या केली मगच हे विश्वाचे मित्र झाले. किंबहुना हे रामाचे गुरु होण्यास पात्र झाले. तुलशीदास म्हणतात.

नारीनयन सर जाही न लागा। घोर क्रोध तम निशी जो जागा।
लोभ पाश जेहि गर न बंधाया। सो नर तुम समान रघुराया।

अर्थ - जो स्त्रिच्या नयन कटाक्षाने घायाळ होत नाही. घोर क्रोध रुपी रात्रीत जो जागा असतो लोभ पाश ज्यास बांधत नाही तो, रामा तुझ्या सारखाच होय. हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु हे लोभाचे अवतार याना मारण्याकरिता देवास दोन अवतार घ्यावे लागले वराह व नारसिंह, रावण व कुंभकर्ण हे दोन कामाचे अवतार यांना मारण्याकरिता देवास एकच राम अवतार घ्यावा लागला व शिशुपाल व दंतवक्र हे क्रोधाचे अवतार यांना मारण्याकरिता देवाचा एकच अवतार श्रीकृष्ण होय. हे दोघे सकनादिकांच्या शापामुळे जय विजय यांनी तीन राक्षसांचे अवतार घेतले पण देवाच्या हातून यांना मरण येऊन हे मुक्त झाले. यांना जिंकणे कठीण आहे पण संतांनी यांना देवाकडे वळविले व स्वतःच्या ताब्यात ठेवले.

काम क्रोध लोभ स्वार्थ। अवघा माझा पंढरीनाथ। तु. म.

काम क्रोध लोभ निमाले ठायीचे। अवघी आनंदाचि सृष्टी झाली॥ तु. म.

काम असावा ईश्वर भजनी। क्रोध असावा इंद्रिय दमनी।
तिर्थ प्रसाद सेवनी। लोभ अपार असावा॥
काम नसावा परस्त्रिचा। क्रोध नसावा सत्पुरुषाचा॥
लोभ नसावा देहाचा। मोह पुत्राचा बाधक। एक कविकाव्य

आता एकेकाचा थोडा विचार

१) काम - काम हा सर्व विकारांचे मूळ आहे. काम पूर्ण झाला तर लोभ निर्माण होतो व काम अपूर्ण राहिला तर क्रोध निर्माण होतो. या कामाने मोठमोठ्यांना सतावले आहे. नाथ महाराजांनी 'एडका' अभंगात दहा जणांची यादी दिली आहे.

एडका मदन तो केवळ पंचानन॥ धृ.॥
धडक मारीली शंकरा, केला ब्रम्ह्याचा मातेरा।
इंद्र चंद्राशी दरारा लाविला जेणे॥ १॥
धडक मारीली नारदा, केला रावणाचा चेंदा।

दुर्योधना मारीली गदा घेतला प्राण ॥ २ ॥
भस्मासूर मुकला प्राणासी तिच गती झाली वालीसी।
विश्वामित्रासारीखा ऋषी नाडिला जेणे ॥ ३ ॥

१) शंकर, २) ब्रह्मदेव, ३) इंद्र, ४) चंद्र, ५) नारद, ६) रावण, ७) दुर्योधन, ८) भस्मासूर, ९) वाली, १०) विश्वामित्र. हे कामाच्या तावडीतून सुटले नाहीत. ब्रह्मचारी चार आहेत. १) शुकाचार्य, २) कार्तिक मुनी, ३) हनुमंत, ४) भिष्म.

पण एका सुभाषितकाराने दोघांचीच नावे घेतली आहेत.

अन्यत्र भिष्म गांगेयं अन्यत्रच हनुमंतः।
हरिणी खुर मात्रेन चर्मना मोहितं जगतः।

भिष्म व हनुमान स्त्रियांत राहून काम जिंकला. मात्र कार्तिक व शुकाचार्य यांना स्त्रियांचा संबंधच आला नाही. त्यामुळे अवघड काहीच नाही. नामदेवरायांनी या दोघांना शहाणा खेळीया म्हटले आहे.

खेळीयामजी हनुम्या शहाणा। व खेळीयामाजी भिष्म्या शहाणा ॥

कामाची दोन रुपे, स्त्रिकाम व धनकाम. हे दोनही काम संतांना सतावत नाहीत. "काम नाही काम नाही। झालो पाही रिकामा। तु. म." तुकोबारायांना शिवाजी महाराजांनी न मागता नजराणा दिला पण तुकोबारायांनी स्विकारला नाही. 'दिवट्या छत्र घोडे। हे तो बऱ्यात न पडे॥' तु. म. शिवाय कामाच्या इच्छेने आलेल्या स्त्रिला तुकोबाराय माता म्हणतात.

जाई वो माते न करी सायास। आम्ही विष्णूदास तैसे नव्हे॥ तु. म.

काम गेला की सर्व विकार जातात कारण काम हा मूळ आहे. मूळ छेदले तर झाड छेदण्याची गरज नाही. अथवा सेनापती मारल्यानंतर सैनिक मारण्याची गरज नाही. पानिपत युद्धात विश्वासराव गेले त्याबरोबर सैन्य घाबरले मराठ्यांची १ लाख बांगडी फुटली. नाथ म्हणतात

मुख्य धूर रणी लागला हाता। येर कटक जिंकीले न झुंजता॥
कां मूळ छेदिले असता। शाखा समस्त छेदिल्या होय॥

ज्ञानोबाराय पण म्हणतात

मूळाचे तोडणे जैसे। होय शाखोद्देशे।
काम नाशिलेनी नाशे। तैसा क्रोध॥ ज्ञाने.

ज्या ठिकाणी काम आहे त्या ठिकाणी राम येत नाही.

जहाँ काम तहँ रामनहिं जहाँ राम तहँ नहिं काम॥
तुलशी कबहुँ रही सके रवि रजनी एक ठाम॥

मंदोदरी रावणास म्हणाली तुम्ही मायावी रुप घेता मग सीतेस वश करण्याकरिता राम होऊन कां जात नाही. रावण म्हणाले मला एवढे कळत नाही कां? नकली राम झालो तर काम रहात नाही. मग सीतेकडे जाण्याचे काय काम आहे? हा काम फक्त रामाचे भजन केल्याने ताब्यात येतो. 'एका जनार्दनी गाता हरिचे नाम। निमाली इंद्रिये विषय विसरली काम॥'

२) क्रोध - मोठमोठ्यांना क्रोधाने सोडले नाही.

क्रोध जहाला कपिल मुनीसी। तेणे भस्म केले सगरासी।
नारदे कुबेर पुत्रासी। वृक्षत्वासी आणिले।
दुर्वासाची सांगता गोठी। त्याची कथा आहे मोटी।
कोप आला शृंगीच्या पोटी। मेल्या सर्पासाटी शापिले॥
मुख्यत्वे शांती सनकादिकासी। द्वारी आडकाठी केली त्यासी।
वैकुंठी क्षोभूनि आवेशी। जय विजयासी शापिले॥
सज्ञानाची ऐसी स्थिती। मा इतरांची कोण गणती।
परअपराध सहनशक्ति। दुर्लभ त्रिजगती गोविंदा॥ भागवत. नाथ

नाथ महाराजांनी प्रसंगासह कपिल, नारद, दुर्वास, शृंगी, सनकादिक या मोठ्यांची यादी दिली आहे.

१) दुष्टांचा क्रोध म्हणजे काळ्या दगडावर कोरलेली रेष.
२) संसारी लोकांचा क्रोध म्हणजे वाळूवर काढलेली रेष.
३) साधकांचा क्रोध म्हणजे पाण्यावर काढलेली रेष.
४) संतांचा क्रोध म्हणजे आकाशात काढलेली रेष. (फक्त हात हलतो.)

नाथमहाराजांना राग आणण्याचा प्रयत्न केला. पण सफल झाला नाही. मंबाजी बुवांनी तुकोबारायांना झोडपले पण क्रोध आला नाही. याचे कारण काम क्रोध संतांच्या ताब्यात आहेत. आम्ही मात्र त्यांच्या ताब्यात आहेत.

काम क्रोध बंदी खाणी। तुका म्हणे दिले दोन्ही।
इंद्रियांचे धनी। आम्ही झालो गोसावी॥ तु. म.

काम क्रोधा नाही चाली। भूती झाली समता॥ तु. म.

आता फक्त काम क्रोध एकत्र विचार

गीतेमध्ये अर्जुनाने देवास प्रश्न विचारला आहे. देवा चांगली चांगली माणसे भ्रष्ट कां होतात?

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पुरुषः।
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः॥ गी. ३/३६

तरी देवा हे ऐसे कैसे। जे ज्ञानियांचीही स्थितीभ्रंशे।
मार्ग सांडूनि अनारिसे। चालत देखो॥ ज्ञाने.

श्रीकृष्णांनी लगेच उत्तर दिले आहे.

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः। महाशनो महापाप्मा विध्द्येनमिह वैरिणम्॥ गीता ३/३७

या श्लोकावरील सर्व वीस ओव्या पाठ करण्यासारख्या आहेत. त्यातील फक्त दोनच देतो.

तरी हे काम क्रोध पाही। जयांते कृपेची साठवण नाही।
हे कृतान्ताच्या ठायी। मानिजती॥ ज्ञाने.

हे ज्ञान निधीचे भुजंग। विषय दरीचे वाघ।
भजन मार्गीचे मांग। मारक जे॥ ज्ञाने.

हे मूळचे आसूरी स्वभावाचे, रजोगुणापासून झालेले आहेत. हे मृत्युच्या नगरीत मान पावतात कारण हे यमाचे एजंट आहेत. हे चैतन्याच्या शेजारी राहतात म्हणून मोठ्यामोठ्यांना मारता येत नाहीत. हे जलाशिवाय बुडवितात, आगीशिवाय जाळतात, न बोलता जीवास कवटाळतात. हे शस्त्राशिवाय तोडतात, दोराशिवाय बांधतात, ज्ञानीयांस पैजेने हरवितात. हे चिखलाशिवाय रोवतात, जाळ्याशिवाय गोवतात. हे फार आत न दिसणारे आहेत. तात्पर्य काम क्रोध यांचे हे वर्चस्व माउलींनी सांगितले आहे. पण नामाने नाहीसे होतात.

तुका म्हणे नाम। ज्याचे नाशी क्रोध काम।
हरे भव श्रम। उच्चारिता वाचेसी॥

३) आता लोभाचा स्वतंत्र विचार. काम क्रोध हे दिसणारे विकार आहेत पण लोभ हा थोडा लपून असणारा विकार आहे. काम क्रोध लोभ हे पापाचे पोषक आहेत. माणूस पाप करतो तो या तिघांमुळे. पापामुळे जन्म मरणांचे दुःख भोगावे लागते. तात्पर्य हे पापाचे मूळ आहेत. एक लोभाचा दृष्टांत पाहू

लोभ मूलानि पापानि व्याधितो रस मूलकः।
स्नेह मुलानि दुःखानि त्रिणी त्यक्त्वा सुखीं भवेत॥ सुभा.

अर्थ - पापाचे मूळ लोभ आहे. रोगाचे मूळ भोग (रस) आहे. दुःखाचे मूळ स्नेह (मोह) आहे. या तिघांचा त्याग करावा व माणसाने सुखी व्हावे.

महाराष्ट्रातील एक पंडित काशीत रहात होते. महाराष्ट्रातील परमार्थिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर काशीला गेले होते. त्यांचे लग्न झाले होते. काशीत पण अभ्यास पूर्ण झाला. हुशार असल्यामुळे तिथे त्यांना प्रसिद्धी मिळाली. मराठी लोकांना अभिमान वाटला आपला मराठी माणूस काशीत चमकतो आहे. त्या पंडितांना परत महाराष्ट्रात बोलविले. एका शहरात सत्कार करण्यात आला दोन लाखांची थैली अर्पण केली. पुढाऱ्यांनी त्याच्यावर स्तुती सुमने उधळली. नंतर त्यांना

वाजत गाजत घरी नेण्यात आले. त्यांच्या पत्नीस आरती घेऊन स्वागतास उभे राहण्यास सांगितले. पत्नीने फार कष्ट झेलले होते. पंडित आले. घरात जाणार तेवढ्यात त्यांच्याच पत्नीने प्रश्न विचारला. मी तुम्हास ओवाळते, पण उत्तरानंतर. तो म्हणाला तू अडाणी मला काय प्रश्न विचारणार! पण विचार, ती म्हणाली पापाचा बाप कोण? उत्तर देता येईना. उत्तर दिले तरच घरी या नाही पेक्षा काशीस परत जा. पंडित म्लान वदन झाले. परत काशी रेल्वे पकडली व काशीस गेले. सर्व विद्वानांना प्रश्न विचारला पण कोणीच उत्तर देईना सर्व वंशावळ पाहिली. हा सैरभैर झाला व गणिका गल्लीत फिरु लागला एक गणिका या पंडितांना ओळखत होती, पेपरमध्ये नाव येत होते. ती पटकन खाली आली व म्हणाली महाराज आपण इकडे कसे? तो म्हणाला एक प्रश्न सुटत नाही त्यामुळे वेड्यासारखा झालो आहे. गणिका म्हणाली कोणता प्रश्न? पंडित म्हणाले तुला काय समजणार, पण सांगतो पापाचा बाप कोण? गणिका म्हणाली उत्तर सोपे आहे पण माझ्या माडीवर तुम्ही आलात तर उत्तर मिळेल. तो म्हणाला तुझ्या वेश्येच्या माडीवर? गणिका म्हणाली माझ्या घरी आलात तर २५,००० रुपये मी देते व उत्तरपण मिळेल. पंडित हळूच घुसला. म्हणाला उत्तर सांग. गणिका म्हणाली तुम्ही महात्मे आमच्या घरी आला हे आमचे परम भाग्य आहे. माझी एक इच्छा आहे माझ्या घरी आपण या गादीवर थोडी विश्रांती घ्यावी. पंडित म्हणाले आपल्या गादीवर! मी पंडित बसणार? गणिका म्हणाली जर गादीवर बसला तर आणखी २५,००० रुपये व उत्तर मिळणार. पंडित गादीवर बसले. गणिका म्हणाली माझी आणखी एक इच्छा आहे. आपण माझ्या घरी दोन घास खावे. तो म्हणाला तुझ्या घरी मी खाणार? ती म्हणाली मी साहित्य देते. तुम्ही दोन घास खाल्ले तर २५,००० व तुमच्या प्रश्नाचे उत्तर मिळेल. तो म्हणाला सामुग्री घेऊन या. याने खिचडी बनविली. जेवावयास बसणार एवढ्यात गणिका जवळ आली व म्हणाली, माझी शेवटची इच्छा माझ्या हाताने मी आपणास पहिला घास भरविणार. पंडित चक्रावून गेले. गणिका म्हणाली परत आपणास मी २५,००० रुपये देणार जर माझ्या हातचा घास खाल्ला तर, शिवाय प्रश्नाचे उत्तर मिळणारच. तो म्हणाला एकच घास लवकर तोंडात घाल. तिने घास खाली टाकला व महाराजांच्या एक कानाखाली लगावली. पंडित लालबुंद झाले. हे काय? गणिका म्हणाली महाराज हे आपल्या प्रश्नाचे उत्तर. ते कसे? गणिका म्हणाली मी वेश्या आपण पंडित पण पंचवीस हजार रुपयाच्या लोभाने तुम्ही माझ्या घरी आला, गादीवर बसला, जेवणास तयार झाला किंबहुना माझ्या वेश्येच्या हातचे खाण्यास तयार झाला याचे कारण १ लाखाचा लोभ! तुम्ही हे सर्व पाप करण्यास तयार झाला कशामुळे? तर लोभामुळे. लक्षात ठेवा पापाचा बाप आहे लोभ. लोभामुळे कामामुळे, क्रोधामुळे माणूस पाप करतो.

हे विकार मायेचे आहेत. पण जिवावर वर्चस्व गाजवितात. मुळात नसलेले पण यांना घालवता येत नाही. संतांनी मात्र यांना कायमचे हाकलून दिले. जसे इंग्रज आले, आमच्यावर वर्चस्व गाजविले. पण आमच्या देशभक्तांनी त्यांना हाकलून दिले कारण ते मूळचे नव्हते. भक्तांनी

यांना हाकलून दिले कारण ते मूळचे नव्हते. भक्तांनी याना हाकलून दिले व देव साठविला किंवा देव हृदयात आले व यांनी घर खाली केले.

''तुका म्हणे देह भरिला विठ्ठले। काम क्रोधे केले घर रिते॥
काम क्रोध वैरी दवडिले दुरी। मज हृदय मंदिरी साठविले॥ नाम.

★ ★ ★ ★ ★

२० : मन

मन म्हणजे अंतःकरणाचा चौथा भाग होय. यास अंतःकरण चतुष्टय म्हणतात.

बुद्धि आणि मन। चित्त अहंकार हन।
हे चतुर्विध चिन्ह। अंतःकरणांचे॥ ज्ञाने.

मन हे इंद्रियांच्या पलिकडे असते. मनापलिकडे बुद्धि व बुद्धिपलिकडे तो परमात्मा असतो असे गीता म्हणते.

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः। मनसस्तु पराबुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः॥ गीता ३/४२

मन हे वायु तत्वापासून बनलेले आहे. बुद्धितेज तत्वाने, चित्त आकाश तत्वाने व अहंकार पाणी-माती तत्वापासून बनला आहे.

जे भुलिचे कुहर। वायु तत्वाचे अंतर। बुद्धिचे घर। झाकिले जेणे॥ ज्ञाने.

वाया मन हे नाव। एऱ्हवी कल्पनाच सावयव। जयाचेनि संगे जीव। दशा वस्तू॥ ज्ञाने.

आत्यास जीव दशा प्राप्त होण्यास मनच कारण आहे. प्रत्येकास फक्त एकच मन आहे जर दहा असती तर दहा ठिकाणी लावता आली असती.

'एक' मन तुझ्या अवघ्या भांडवला। वाटिता ते तुला येईल कैसे। तु. म.

मन एक आहे पण त्यास दोन बायका आहेत प्रवृत्ति व निवृत्ती.

मनुराजा एक देहपुरी। असे नांदतो त्यासी दोघी नारी।
पुत्र पौत्र संपन्न भारी। त्याने कृपा केली आम्हावरी वो॥ कान्होबाराय

बायका दोन मात्र मुले भरपूर आहेत. १) संकल्प, २) विकल्प, ३) प्रकल्प वगैरे ही मनाची मुले आहे. मनाचा एवढा विचार करण्याचे कारण माणसाच्या अधोगतीस अथवा प्रगतीस कारण मनच आहे. मनामुळे विषयासक्ति, त्यामुळे बंधन व निर्विषयामुळे मोक्ष.

मन एवं मनुष्याणां कारणं बंधमोक्षयोः।
बंधाय विषयासक्तं मुक्तैः निर्विषयं स्मृतम्॥ सुभा.

मना करा रे प्रसन्न। सर्व सिद्धीचे कारण॥
मोक्ष अथवा बंधन। सुख समाधान इच्छा ते॥ तु. म.

गती अधोगती मनाची हे युक्ति। मन लावा एकांती साधुसंगे। तु. म.

मन एक स्वाधीन तरी खुंटले साधन। सर्व सुखाचे निधान हरि पावशी रया॥ ज्ञान.

तनाचे ऑपरेशन करता येते पण मनाचे नाही. कारण ते सूक्ष्म आहे. मनाचे तीन दोष आहेत. १) मल, २) विक्षेप, ३) आवरण. माणसाने कितीही सांगितले माझे मन साफ आहे पण ते सर्व खोटे आहे. जोपर्यंत हे तीन दोष जात नाहीत तोपर्यंत मन शुद्ध होऊच शकत नाही. मल म्हणजे मनात पापवासना येणे. विक्षेप दोष म्हणजे मनाचा चंचलपणा होय. आवरण दोष म्हणजे अज्ञान पडदा असणे. माऊलीच्या एकाच ओवीत हे तीन दोष आले आहेत.

नातरी सरोवर तरंगी। आकाश सांडिले मेघी।
चंदनाचिया उरगी। उद्यान जैसे॥ ज्ञाने.

तरंग रहित तळे - विक्षेप रहित, चंचलरहित मन, मेघ (ढग) रहित आकाश, आवरण दोषरहित मन. सापाशिवाय चंदनाची बाग, मलरहित मन. यात विक्षेप दोष फार महत्वाचा आहे. कारण मन फार चंचल आहे. शास्त्रात दहा चंचल पदार्थ सांगितले आहेत त्यात मनाचा प्रथम क्रमांक आहे.

मनोमधुकरो मेघो मानिनि मदनो मरुत। मा मदो मर्कटो मत्सो मकारा दश चंचलाः॥

१) मन, २) भ्रमर, ३) पाऊस, ४) स्त्री, ५) मदन, ६) वारा, ७) लक्ष्मी, ८) गर्व, ९) माकड, १०) मासे, हे 'म'कार दहा चंचल पदार्थ. यास अनुप्रास अलंकार म्हणतात. एका अक्षराची पुनरावृत्ती होते तेव्हा हा अलंकार होतो.

मन लोभी मन लालची मन चंचल मन चौर।
मनके मत मत चलिये पलक पलक मन और॥ कबीरजी

अर्जुनाने पण देवास गीतेत मन चंचल आहे हे सांगितले आहे.

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम्। तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम्॥ गीता ६/३४

माऊलीची फक्त एकच ओवी देत आहे.

म्हणौनी ऐसे कैसे घडेल। जे मर्कट समाधी घेईल। कां रहा म्हणतलिया राहील। महावातु॥

माकडास समाधी लागेल कां? महावात रहा म्हणण्याने स्थिर राहिल काय? तसे मन आहे. एक सुभाषितकार म्हणतात.

मर्कटस्य सुरापानं तत्र वृश्चिक दंशनम्। तन्मध्ये भूतसंचारो यद्वातद्वा भविष्यति॥

नाथ महाराज म्हणतात 'मर्कटरुपे चंचल मन। त्यासी असत्संग मदिरापान। काम वृश्चिके

दंशिले जाण। मग वर्तन यद्वातद्वा॥' अगोदर मन चंचल त्यास दुष्ट संग हे मदिरापान व कामरुपी विंचू चावला तर वर्तन सैरभैरच होणार. बऱ्याच ठिकाणी मनास माकडाची उपमा दिली आहे.

दृष्टांत - एक माकडवाला माकडास व बोकडास घेऊन खेळ करण्याकरिता बाजाराच्या गावी चालला होता. पण बाजाराचे गाव नदीच्या पलिकडे होते. नदी पाण्याने भरलेली होती माणसे नावेने पलिकडे जात होती. माकडवाल्यास सर्वांनी विरोध केला. पण तो काकुळती आला. एकाने युक्ति सांगितली माकडास घ्या पण त्याचे पाय बांधून. माकडवाला तयार झाला. माकडाचे पाय बांधले. सर्व जण नावेत बसले. थंड हवा असल्यामुळे बोकडासह सर्व झोपी गेले. बोकड माजलेला होता. माकड चुळबुळ करीत होते. त्यास एक गवताची काडी सापडली. त्याने हळूच तोंडाने काडी घेतली व झोपलेल्या बोकडाच्या नाकात घातली. बोकड बिथरला व बरोबर नावेच्या काठावर उडी मारली. नावेचा समतोलपणा बिघडला व नाव पाण्यात उलटी झाली व सर्व माणसे पाण्यात बुडाली. याचे एकच कारण माकड. तसे मन सर्वांस कारण आहे. मन किती चंचल याची थोडी कल्पना तुकयाबंधू देतात

न पुरती भ्रमणा दाही दिशा। सप्तही पाताळे आकाशा।
घाली उडी बळेची देखोनि फासा। केलो या दोषा पाहुणा॥

याच्या भ्रमणास पाताळ, आकाश दाही दिशा अपुऱ्या आहेत. मग यास काही उपाय नाही का? उपाय आहे. गीतेत श्रीकृष्णानी अर्जुनास सांगितला आहे अभ्यासाच्या सहाय्याने, वैराग्याच्या जोराने हे स्थिर राहील. यास परमार्थाची गोडी लावली तर ते तिकडे स्थिरावेल असा याचा स्वभाव आहे.

परी वैराग्याचेनि आधारे। जरी लाविले अभ्यासाचिया मोहरे।
तरी केतुलेनि एके अवसरे। स्थिरावेल॥ ज्ञाने.

कां जे यया मनाचे एक निके। जे देखिले गोडीचिया ठाया सोके।
म्हणोनि अनुभव सुखचि कवतिके। दावित जाईजे॥ ज्ञाने.

देव सांगतात हे मन मला दे म्हणजे स्थिरावेल.

तू मन हे मीची करी। माझिया भजनी प्रेम धरी। सर्वत्र नमस्कारी। मज एका ते॥ ज्ञाने.

किंबहुना आपुले मन। करी माझे एकायतन। माझेनि श्रवणे कान। भरुनि घाली॥ ज्ञाने.

जर हे संसारातून काढून देवाकडे लावले तर धावणार नाही. हीच युक्ति संतांनी वापरली.

दृष्टांत - एका गावात लक्ष्मीमंदिर व शेजारी अवदसा मंदिर होते. एका उत्सवात सर्वांनी लक्ष्मीच्या दर्शनास रांग लावली. मात्र एकास रांगेचा कंटाळा होता. त्याने अवदसा मंदिरात जाऊन दर्शन घेतले. देवीस आश्चर्य वाटले व ताबडतोब प्रसन्न झाली वर मागण्यास सांगितले. तो म्हणाला आमच्या घरावर आपली अवकृपा असावी अर्थात दारिद्र्य, रोग, भांडण, अज्ञान यांचे

उच्चाटन व्हावे. देवी तथास्तु म्हणाली. याची परिस्थिती सुधारु लागली. शेजाऱ्याने चौकशी केली हा कुठे गेला होता? एकाने सांगितले अवदसा मंदिरात गेला होता. हाही गेला, देवीची पूजा, आराधना केली, देवी दोन दिवसात प्रसन्न झाली. ती म्हणाली वर माग. तो म्हणाला आपली कृपा असावी. देवी तथास्तु म्हणाली. तो खुशीत घरी चालला होता पण वाटेत एक मित्र भेटला व म्हणाला घरी लवकर पळा. घरास आग लागली आहे. कारण अवदसा कृपा! तात्पर्य मन हे अवदसेप्रमाणे आहे. जीवनाची दशा दशा करुन टाकील. पण जर हे देवाकडे वळवले तरच कल्याण होईल. कुठे वळवायचे हे प्रत्येक माणसाच्या हातात आहे. 'आता कोठे धावे मन। तुमचे चरण देखिलिया॥ तु. म.' मनाची धाव देवाच्या चरणाजवळच थांवेल.

देखिले तुमचे चरण नितांत राहिले मन।
कासया त्यजिन प्राण आपुला गे माये॥ ज्ञान.

मनाला आवरणे किती कठीण आहे हे नाथ महाराज सांगतात.

वारा बांधवेल मोटे। अग्नि प्राशवेल अवचटे।
समुद्र घोटवेल घोटे। परी मन आत्मनिष्ठे नये।
आकाशाची करवेल चौघडी। महामेरुचि बांधवेल पुडी।
शून्याची मुरडवेल नरडी। परी मनाच्या ओढी अनिवार्य॥
काळ जिंकवेल तत्वता। त्रिभुवनीची लाभेल सत्ता।
परी मनोनिग्रहाची वार्ता। तुजविण अच्युता घडे केवी॥ भागवत

अर्थ सोपा आहे. हे एवढे अवघड आहे पण अशक्य मात्र नाही. देवाच्या कृपेने संताच्या कृपेने हे सर्व शक्य आहे. पण त्यासाठी वैराग्य ज्ञान, भक्ति याची गरज आहे.

ज्ञानामुळे मनाचा आवरण दोष जातो. वैराग्याने मनाचा विक्षेप दोष जातो. भक्तिमुळे मनाचा मल दोष जातो. हे दोष गेले की मन शुद्ध होते. शुद्ध झाले की देव प्राप्त होतो.

मन हे राम झाले। प्रवृत्ति ग्रासुनि कैसे निवृत्तीसी आले॥ ज्ञान.

मन रंगले रंगले। तुझ्याचरणी स्थिरावले॥ तु. म.

जयाचे चोखटे मानसी। मी होऊनि असे क्षेत्र संन्यासी॥
जया निजेलियाते उपासी। वैराग्य गां॥ ज्ञाने.

महात्म्याचे मनच विठ्ठलरुप होते. माणूस केसांची काळजी घेतो. केस स्वच्छ रहाण्याकरिता अनेक प्रकारचे साबण। (शिकेकाई) शाम्पू वापरतो. कपडे साफ, करण्याकरिता अनेक प्रकारचे साबण वापरात आणतात. कपडे इस्त्री करुन नीटनेटके ठेवतात. शरीर साफ करण्याकरितासुद्धा साबण पाणी याचा वापर करतात. पण मन निर्मळ, साफ ठेवण्याकरिता कोणीही विशेष लक्ष देत नाही. कबीर म्हणतात

न्हाये धोये क्या भया मन का मैला न जाय।
मीन सदा जलमे रहे धोये बास न जाय।

साधारण आंघोळीस काय महत्व आहे. मासा पाण्यातच राहतो. पण त्यास धुतला तरी घाणेरडा वास जात नाही. मच्छी बाजाराजवळून जाताना नाक धरुन जावे लागते. तात्पर्य मनाचा मैला जाणे आवश्यक आहे. केसापेक्षा, कपडे महत्वाचे कारण केस दोन महिन्यातून तरी कापावे लागतात (पुरुषाचे) पण कपडे ३-४ वर्षे टिकतात. कपड्यापेक्षा शरीरास महत्व. कारण संपूर्ण जन्मभर शरीर साथ करते. मात्र मन अनेक जन्म बरोबरच असते. संताच्या मते ज्यांचे केसावर लक्ष आहे तो अधमाधम होय. ज्यांचे कपड्यावर लक्ष आहे तो अधम समजला जातो. ज्याचे शरीरावर लक्ष आहे तो मध्यम समजावा. मात्र ज्याचे मनावर, बुद्धिवर लक्ष आहे तो उत्तम समजावा. मनास साफ करण्याचे साधन प्रेम भक्ति म्हणजेच प्रार्थना म्हणून नियमाने भजन अथवा प्रार्थना झाली पाहिजे. ज्याचे निर्मळ मन आहे त्याच्या देव मागे लागतो.

कबिरा मन निर्मळ भया जैसा गंगा नीर।
पाछेपाछे हरि फिरे कहत कबिर कबिर॥

हा निर्मळ मनाचा फायदा आहे.

महामळे मन होते जे गादले। शुद्ध चोखाळले स्फटिक जैसे॥ तु. म.

मन

संतांचे मन निर्मळ असते. यालाच मोकळे मन म्हणतात.

मोकळे मन रसाळ वाणी। याचि गुणी संपन्न॥ तु. म.
तुका म्हणे मोकळे मन। नारायण भोगासी॥

गंगेच्या काठी रोहिदास राहात होते. एकदा पर्वकाळ असल्याने गंगेवर स्नानास गर्दी झाली. एका ब्राह्मणाची चप्पल तुटली म्हणून तो रोहिदासाकडे आला. पण खूप गर्दी होती. त्याने रांग तोडली व सरळ पुढे गेला व म्हणाला माझी चप्पल शिवून द्या. रोहिदास म्हणाले रांगेत या. ब्राह्मण म्हणाला मी १ रुपया देतो. रोहिदास म्हणाले १०० रुपये दिले तरी मी रांग मोडणाऱ्याची चप्पल शिवणार नाही. ब्राह्मण नाराज झाला पण तिथे दुसरा चर्मकारच नव्हता. नाइलाजाने रांग लावली. नंबर आल्यानंतर चप्पल ठिक केली. ब्राह्मणाने १० पैसे दिले व जाता जाता म्हणाला तुम्ही गंगेवर राहून पर्वकाळाचे महत्व तुम्हास नाही. याचे कारण 'अति परिचयात अवज्ञा' रोहिदास म्हणाले तुमच्यासारख्यांची सेवा हाच आमचा पर्वकाळ. आपण गंगा स्नानाला जात आहात तर हे माझे दहा पैसे गंगेत टाका. मात्र लक्ष द्या. ब्राह्मण गंगेवर गेले स्नान उरकले व रोहिदासांचे दहा पैसे गंगेत टाकले. पण आश्चर्य घडले गंगा माता प्रगट झाली व दहा पैसे झेलले व एक सोन्याचे दिव्य कंगण फेकले. ते ब्राह्मणाने घेतले. सरळ घरी आला. बायकोस दाखविले. दिव्य कंगण पाहून

तिला नवल वाटले. ती शहाणी होती तिने सांगितले हे राजाच्या राणीसच शोभून दिसेल. आपण गरीब आहोत. ब्राह्मण राजाकडे गेला. कंगण दाखविले. राजाने राणीस बोलविले दिव्य कंगण पाहून राणी म्हणाली याना या कंगणांचे १० हजार रुपये द्या. व आणखी १० हजार रुपये देऊन दुसरे कंगण दुसऱ्या हातासाठी मागवा. ब्राह्मणाने २० हजार रुपये घेतले व सरळ रोहिदासाकडे आला. रोहिदासांना सविस्तर कथा सांगितली. क्षमा मागितली. म्हणाला माझा प्राण तुमच्या हातात आहे. परत १० पैसे द्या. मी गंगेत टाकतो व गंगा दुसरे कंगण देईल. रोहिदास महाराज म्हणाले आपणास कंगणच हवे ना, लगेच त्यांनी चामडे बुडविण्याचे कुंड होते त्यात हात घातला व तसेच कंगण काढले. ब्राह्मणांच्या हातात दिले. म्हण पडली आहे."मन चंगा तो कटौती (कटवटी) में गंगा." तात्पर्य असा अधिकार असतो मोकळ्या मनाच्या संताचा.

★ ★ ★ ★ ★

२१ : बुद्धी

बुद्धीसच प्रज्ञा, मती अशी नावे आहेत. बुद्धी ही तेज तत्वापासून झालेली आहे व हृदयाचा चौथा हिस्सा आहे. 'जे तेजतत्वांची आदी। जे सत्वगुणांची वृद्धी। जे आत्मया जीवाचे संधी। वसवीत असे॥ ज्ञाने.' निश्चय करणे हे काम बुद्धीचे आहे.

संकल्प विकल्प मनाचे। 'निश्चयो कर्म बुद्धीचे।'
चिंतन जाण चित्ताचे। अहंकाराचे मी पण॥ नाथ. भाग.
हे सुख हे दुःख। हे पुण्य हे दोख।
हे मैळ हे चोख। ऐसे निवडिजे॥ ज्ञाने.

निवड करणे हे सुद्धा बुद्धीचे काम आहे.

बुद्धीचे महत्व - 'विद्वत्वं च नृपत्वं च नैव तुल्यं कदाचन। स्वदेशे पूज्यते राजा विद्वान सर्वत्र पूज्यते॥ सुभा.' अर्थ - राजा व विद्वान यांची तुलना केल्यास विद्वान श्रेष्ठ ठरतो. कारण राजा फक्त स्वतःच्या राज्यात पूज्य असतो पण विद्वान सर्वत्र पूजला जातो. बुद्धिमान कोल्ह्याकडून सिंह मारला जातो म्हणून शरीरबळापेक्षा बुद्धिबळ श्रेष्ठ आहे. "बुद्धिपुढे बळ तृणतुल्य॥ तु. म. "बुद्धिर्यस्य बलं तस्य निर्बुद्धेस्तु कुतो बलम। वने सिंहो मदोन्मत्तः शशकेन निपातितः॥

बुद्धीचे प्रकार जवळ जवळ १८ आहेत.

मुख्य दोन प्रकार सत् बुद्धी व दुर्बुद्धी. जी बुद्धी सत् म्हणजे सत्य-परमात्मा, या ठिकाणी स्थिर झालेली आहे. तिलाच सत्‌बुद्धी म्हणतात. यामुळेच मानव संसार सागर तरु शकतो.

संसारु तरावया। मुख्य सत्‌बुद्धी गा राया।
रिगमु नाही आणिक उपाया। व्यर्थ काह्या शिणावे॥ भागवत. नाथ

बुद्धीचे वैभव अन्य नाही दुजे। एका केशव राजे सकळ सिद्धी ॥ ज्ञान.

ज्ञानेश्वर महाराजांनी सहा ओव्यात बुद्धीचे सर्व वर्णन केलेले आहे. श्लोक व ओव्या

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनन्दन। बहुशाखा ह्यनन्ताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम॥ गीता २/४१
जैसी दिपकळिका धाकुटी। परी बहु तेजाते प्रगटी। तैसी सत्‌बुद्धी हे थेकुटी। म्हणो नये॥

पार्था बहुती परी। हे अपेक्षिजे विचार शूरी। जे दुर्लभ चराचरी। सद्वासना॥
आणिका सारिखा बहुवसु। जैसा न जोडे परिसु। कां अमृताचा लेशु। दैवगुणे॥
तैसी दुर्लभ जे सद्बुद्धि। जिये परमात्माची अवधि। जैसा गंगेसी उदधि निरंतर॥
तैसा ईश्वरावाचुनि काही। जिये आणिक लाणी नाही। ते एकचि बुद्धि पाही। अर्जुना जगी॥
येर ते दुर्मती। जे बहुधा असे विकरती। तेथ निरंतर रमती। अविवेकिये॥
म्हणोनि तया पार्था। स्वर्ग संसार नरकावस्था। आत्मसुख सर्वथा। दृष्ट नाहीं ॥ ज्ञाने.

थोडक्यात अर्थ - दिप कलिका लहान असते पण प्रकाश मोठा (व्यापक) असतो. तशी सत्‌बुद्धि लहान म्हणू नये. ही दुर्लभ आहे, जसे अमृत, परिस मिळत नाहीत. ज्या बुद्धीचा शेवट परमात्म्यात होतो त्यासच सत्‌बुद्धी म्हणतात. बाकी सर्व दुर्बुद्धिच होय. यांना देवसुख न मिळता स्वर्ग, संसार अथवा नरकच मिळतो.

हरि बुद्धी जपे तो नर दुर्लभ। वाचेसी सुलभ रामकृष्ण॥ ज्ञान.

आता दुर्बुद्धिचे प्रकार पाहू.
गीतेत बुद्धिचे तीन प्रकार सांगितले आहेत. सात्विक, राजस, तामस.

१) **प्रवृत्तिं च निवृतिं च कार्याकार्ये भयाभये।**
बंध मोक्षं च या वेत्ति बुद्धिःसा पार्थ सात्विकी॥ गीता १८/३०

अर्थ - काय करावे, करु नये, प्रवृत्ती, निवृत्ती, भय, अभय, बंध, मोक्ष हे जाणते व चांगले ग्रहण करते तिला सात्विक बुद्धि म्हणतात.

ऐसेनि कार्याकार्य विवेकी। जे प्रवृत्ति निवृत्ति मापकी।
खरा कुडा पारखी। जीया परी॥ ज्ञाने.

तैसी कृत्याकृत्य शुद्धी। बुझे जे निखधी। सात्विक म्हणिपे बुद्धि। तेचि तू जाण॥ ज्ञाने.

२) **यया धर्ममधर्म च कार्यें चाकार्यमेव च।**
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी॥ गीता १८/३१

ज्या बुद्धिने धर्म, अधर्म, कार्य, अकार्य, याचा यथार्थ निर्णय होत नाही त्यास राजस बुद्धि म्हणतात. ज्ञानेश्वर महाराजांची एकच ओवी.

आणि बकांच्या गांवी। घेपे क्षीरनीर सकलवी। कां अहोरात्रींची गोवी। आंधळे नेणे॥

ज्या प्रमाणे बगळयास पाणी दूध समजत नाही अथवा आंधळ्यास दिवस रात्र कळत नाही. त्यास राजस बुद्धि म्हणतात.

३) **अधर्म धर्ममिती या मन्यते तमसाऽऽवृत।**
सर्वार्थान्विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी॥ गीता १८/३२

अर्थ - जी अधर्मालाच धर्म समजते. सर्वार्थाने जी विपरीत असते व तमाने आच्छादिलेली ती तामस बुद्धि होय. माऊलीची एक ओवी

आणि राजा जिया वाटा जाये। ते चोरांसी आडव होय।
कां राक्षसां दिवो पाहे। राति होऊनि॥

ज्याप्रमाणे राजाची वाट चोरास संकट वाटते अथवा राक्षसास रात्रच दिवस वाटतो. तशी जी उलटे निर्णय घेते ती तामस बुद्धि समजावी.

बुद्धीचे तीन वेगळे प्रकार

१) तैलबुद्धी - ज्याप्रमाणे पाण्यावर तेलाचा एक थेंब टाकल्यास तो सर्वत्र पसरतो. तद्वत थोडे सांगितल्यास खूप विचार करते ती तैलबुद्धी होय.

२) चर्मबुद्धी - जशी चामड्यात आरी घातल्यास छिद्र पडते. पण आरी काढल्यावरोबर चामडे छिद्ररहित होते. तसे एखाद्यास कार्यक्रमास हजर असण्यापुरते लक्षात राहते. कार्यक्रम अथवा वर्ग संपल्यानंतर जी परत सर्व विसरते त्या बुद्धीस चर्म बुद्धी म्हणतात.

३) दगडबुद्धी - दगडास जेवढे छिद्र पाडावे. कित्येक वर्षे गेल्यानंतरही ते छिद्र तसेच राहते. ना मोठे ना छोटे तसे जेवढे सांगितले तेवढेच लक्षात राहते त्यास दगड बुद्धी म्हणतात.

तुका म्हणे ऐसी बुद्धी ज्याची जड। त्याहूनि दगड बरे देवा॥

एका गावात गुरु आले होते. त्यांचे तीन शिष्य होते. तिघांना प्रसाद म्हणून दोन दोन चणे दिले. एकाने तिथेच प्राशन केले. त्यास कैकयी आठवली. (विलंबो कार्यनाशकः रामा.) दुसऱ्याने श्रीमंत असल्यामुळे दोन चणे सोन्याच्या पेटीत ठेवले. तिसऱ्याने शेतात पेरले. दोन रोपे झाली. थोडे चणे मिळाले. दुसऱ्या वर्षी एक वाफा, तिसऱ्या वर्षी १० पोती चणे मिळाले. तीन वर्षाने गुरु आले, विचारले चणे कुठे आहेत? पहिला बोलला मी तेव्हाच खाल्ले, दगड बुद्धी, दुसऱ्याने सोन्याची पेटी दाखविली. चणे खराब झाले होते. चर्म बुद्धी, तिसऱ्याने चण्याची दहा पोती दाखविली ही तैल बुद्धी. होय. कल्पना येण्याकरिता दृष्टांत दिला आहे.

पारमार्थिक विचाराने बुद्धीचे तीन प्रकार.

१) मुर्खाची बुद्धी - संसाराचा रात्रं दिवस विचार करणे. तिथे बुद्धी चालणे अथवा स्थिर होणे यास मुर्खाची बुद्धि म्हणतात. अशी बुद्धी नको असे तुकोबाराय सांगतात.

आता मज धरवावी शुद्धी। येथुनि परतवावी बुद्धी॥
घ्यावे सोडवूनि कृपानिधी। सापडलो संधी काळचक्री॥ तु. म.

२) मुमुक्षुची बुद्धी - साधक परमार्थ मार्गास लागतो पण ऋद्धी सिद्धीत गुंतून राहतो यास मुमुक्षुची बुद्धी म्हणतात. अशी बुद्धी परमार्थास घातकच आहे. ही बुद्धी सुद्धा नको. असे तुकोबाराय म्हणतात.

नको दुजी बुद्धी आणिक। रिद्धी सिद्धी परलोक।
तू स्वामी मी सेवक। खंडणा नको करु ऐशी॥
म्हणती संसारी जन्मीजे। यज्ञादिक कर्म किजे।
मग स्वर्गसुख भोगिजे। मनोहर॥ ज्ञाने.

एथ हे वांचूनि काही। आणिक सर्वथा सुखची नाही।
ऐसे अर्जुना बोलती पाही। दुर्बुद्धी ते॥ ज्ञाने.

३) मुक्ताची बुद्धी - संसारातून मुक्त व्हावे. मोक्ष मिळावा अशी जी बुद्धी ती मुक्ताची बुद्धी जी परमार्थास, प्रेमभक्तिस पोषक नाही. अशी बुद्धी जळो असे तुकोबाराय सांगतात.

जळो माझी ऐसी बुद्धी। मज घाली तुज मधी।
आवडी ही विधी। निषेधीच चांगली॥ अथवा

नको ब्रह्मज्ञान आत्मस्थिती भाव। मी भक्त तू देव ऐसे करी॥ तु. म.

पालट (बदल) वरुन बुद्धीचे तीन प्रकार.

१) तुकोबाराय सांगतात संसारातून परमार्थाकडे बुद्धी वदलू दे. कारण संसार अशाश्वत व परमार्थ शाश्वत आहे.

बुद्धीचा पालट धरा रे काही। मागुता हा नाही मनुष्य देह॥ तु. म.

२) साधकांना सांगतात परमार्थाकडे बुद्धी लागली आहे. आता परत संसाराकडे नको.

न पाहिजे झाला बुद्धीचा पालट। केली खटपट वाया जाय॥ तु. म.

माऊली दृष्टांत देतात.

नाव थडिये टाकिता। बरपडी होय दुर्वाता। चुकलाहि मागुता अपावो पावे॥

नाव किनाऱ्यास लागली पण लागता लागता जर वादळ झाले तर परत नाव पाण्यात जाण्याची शक्यता आहे. म्हणून साधकांनी जपून रहावे.

३) मात्र ज्यांच्या बुद्धीत कधीच पालट होत नाही त्यांना मुक्त म्हणावे.

बुद्धीचा पालट नव्हे कदाकाळी। हरि जळी स्थळी काष्ठी तया॥ तु. म.

माणसाच्या रंगामध्ये वदल होउ शकत नाही. उंचीत वजनात थोडा वदल होतो. पण बुद्धीत मात्र करुन घेतला तर आमुलाग्र वदल होतो. म्हणून महाराज बुद्धीतच वदल करण्यास सांगतात.

रामायणातील बुद्धीचे चार प्रकार.

आत्मबुद्धी हितार्थाय गुरुबुद्धी विशेषता।
परबुद्धी विनाशाय स्त्रीबुद्धी प्रलयावहाः॥

१) स्वतःची बुद्धी हितास कारण ठरते. २) गुरुबुद्धीने विशेष हित होते.
३) परक्या बुद्धीने चालले तर नाश होतो. ४) स्त्रीबुद्धीने चालला तर सत्यानाश (प्रलय) होतो.

असे बुद्धीचे १८ प्रकार पडतात.

बुद्धी नेहमी वदलत असते.

अनेक बुद्धीचे तरंग। क्षणोक्षणा पालटती रंग।
धरु जाता संग। तव तो होतो बाधक॥ तु. म.

तुकोबाराय देवास विनवणी करतात.

काय हे स्थिर राहील बुद्धी। काही अरिष्ट न येईल मधी॥
धरिले ते जाईल सिद्धी। शेवट तो कधी मज न कळे॥

मी परमार्थास लागलो आहे. माझी बुद्धी शेवटपर्यंत टिकून राहू दे. 'दुर्बुद्धि ते मना। कदा नुपजो नारायणा॥ तु. म.' अशी मागणी मागतात.

बुद्धी सात्विक व स्थिर राहण्यास दोन उपाय आहेत.

१) सात्विक अन्न खावे. २) सतत संतांची संगत धरावी.

१) आपण ज्याप्रमाणे अन्न खातो त्याप्रमाणे बुद्धी होत असते. जसे दिवा अंधार खातो व काजळ ओकतो अथवा सोडतो.

दिपो भक्षयते ध्वान्तं कज्जलंच प्रसूयते।
यदन्नभक्षये नित्यं जायते तादृशी मतीः॥ सुभा.

२) संगतीमुळे बुद्धीचा विकास होतो अथवा वाईट संगतीने अधोगती होते.

न्हीयते हि मतिः पुसां हिनैः सह समागमात।
समैश्च समतामेति विशिष्टैश्च विशिष्टताम॥ सुभा.

माणसांची बुद्धी, हीनांच्या संगतीने हीन, सम बुद्धीच्या लोकांबरोबर सम व विशिष्टाबरोबर विशिष्ट राहते. म्हणून संत संगती धरावी.

बैससी तरी बैस संतामधी। आणिक ते बुद्धी नको मना॥ तु. म.

बैसता चोरापाशी तैसी होय बुद्धी। देखोनिया चिंधी मन धावे॥ तु. म.

धन्य हे आनंदाची सापडली वेळ। ते हे संत सज्जन भेटले कृपाळ।
त्यांनी फेडियेला बुद्धीचा वो मळ। दृष्टी दाखविला यशोदेचा बाळ वो॥ निळो.

अर्थ - संतांच्यामुळे बुद्धीचा मळ जातो व परमात्मा प्राप्ति होते.

रामायणात हनुमान रामास सांगतात.

देहबुद्धया तु दासोऽहं जीवबुद्धया त्वदशकंः॥
आत्मबुद्धया त्वमेवाहं इति मे निश्चिताः मतिः॥

देवा, देह बुद्धीने मी तुझा दास आहे. जीवबुद्धीने तुझा अंश आहे. आत्मबुद्धीने तू व मी एकच आहे. अशी माझी निश्चित बुद्धी आहे. (सत्ता त्याच्या हातात असावी, ज्याची सात्विक व तैल बुद्धी आहे असे संतांचे मत आहे.)

★ ★ ★ ★ ★

२२ : चित्त

चित्त हे आकाश तत्वापासून बनले आहे. यास चिदाकाश, हृदय म्हणतात. चित्ताच्या पाच अवस्था आहेत.

१) मूढ, २) क्षिप्त, ३) विक्षिप्त, ४) एकाग्र, ५) निरुद्ध.

मूढ व क्षिप्त चित्तवाले लोक परमार्थाचे अधिकारी नाहीत.

विक्षीप्त चित्तवाला परमार्थाचा अधिकारी आहे. यास कधी परमार्थ खरा वाटतो कधी संसार खरा वाटतो.

एकाग्र चित्त अवस्थावाले यांना सविकल्प समाधी लागते.

निरुद्ध चित्त अवस्था म्हणजे निर्विकल्प समाधी होय.

उपाधी भेदाने तुम्ही चित्तात काय ठेवता यावरुन हृदयाची अथवा चित्ताची अनेक नावे पडतात.

१) ज्याच्या चित्तात जनावरे तो गोठा.
२) ज्याच्या चित्तात नट, नटी अथवा खलनायक ते चित्रपटगृह (सिनेमागृह)
३) ज्याच्या चित्तात राजकारण ते लोकसभा, विधानसभा, चावडी वगैरे
४) ज्याच्या चित्तात धन ती तिजोरी अथवा बँक
५) ज्याच्या चित्तात बायको, मुले ते घर.
६) ज्याच्या चित्तात देव ते मंदिर. यावरुन हृदयाचे काय बनवायचे हे प्रत्येकाच्या हातात आहे.

मात्र संतांनी हृदयाचे मंदिरच बनविले.

साठविला हरि। जिही हृदय मंदिरी॥ तु. म.

तुकोबाराय कधी यास पेटीची तर कधी घराची उपमा देतात.

संपुष्ट हे हृदय पेटी। करुनि पेटी साठवू॥ तु. म.
नारायण घरी सांटविले धन। अवघेचि वाण तया पोटी॥ तु. म.

अनादीकाळापासून या चित्तात संसारच साठविला आहे.

अनादी संसार माळेच्या ठायी। नित्य विषय सेविता पाही।
ते ठसावले चित्ताच्या ठायी। वारंवार देही भोगिता॥ नाथ. भागवत

या चित्तातील घाण काढून त्यास स्वच्छ करावयास हवे व परमात्मा साठविला पाहिजे. देव कसा साठवावा या करीता नाथ महाराज दृष्टांत देतात. एका श्रीमंत मुलाचे लग्न झाले. तो कमी शिकलेला व एकुलता एक असल्यामुळे लाडात वाढला होता. लग्नानंतर रात्रंदिवस बायको बरोबरच राहू लागला. ती चपात्या करण्यास बसली की हा भाजण्यास बसायचा, ती कपडे धुवू लागली की हा कपडे सुकत टाकायचा. ती मुलगी खानदानी असल्यामुळे देवा, ब्राह्मणांनी, अग्निच्या साक्षीने मिळालेला नवरा कसाही असला तरी त्याच्या मताप्रमाणे वागत होती. पण त्याची जास्त लगट तिला मनापासून पसंत नव्हती. पण त्याच्या चित्तात नेहमी तीच होती. अर्थात तो तिच्या मताप्रमाणे वागत होता.

चित्त आराधी स्त्रियेचे। तियेचेनि छंदे नाचे।
माकड गारुडयाचे। होय जैसे॥ ज्ञाने.

स्त्रिया गायीले आईकावे। स्त्री रुप डोळा पहावे।
सर्वेंद्रियाते आलिंगावे। स्त्रियेतेचि॥ ज्ञाने.
कुरवंडी किजे अमृते। ऐसे सुख स्त्रीपरौते।
नाही म्हणोनि चित्ते। निश्चय केला॥ ज्ञाने.

या माऊलीच्या वर्णनाप्रमाणे त्याच्या चित्तात ती बसली होती. एके दिवशी हा बाहेर पान खाण्याकरिता गेला होता. एक मुराळी आला व म्हणाला या मुलीचे वडिल अत्यवस्थ आहेत. घरात सासुबाई होत्या. सासुबाईना विचारले. सासुबाई म्हणाल्या लवकर निघा नाहीतर माझा मुलगा बाप मेला तरी जाऊ देणार नाही. कारण लग्न झाल्यापासून आई त्याची नाटकं पहात होती. मुलगी वडिलांना पहाण्यास गेली. हा पान खात आला. पाहतो तर ती घरात दिसत नाही. शेवटी आईस विचारले. ती कुठे आहे. आई म्हणाली ती माहेरी गेली. वडिल सिरीअस आहेत. मला न विचारता गेली? आई म्हणाली माझापण तुझ्यावर व तिच्यावर हक्क आहे. शिवाय माहेरीच गेली आहे. तो बोलला मग कॉफी कोण करून देणार. आई बोलली मूर्खा लग्न होईपर्यंत जेवण, कॉफी कोण देत

होते? तो म्हणाला आई ती आल्यापासून तुझ्या हातचे मला काहीच गोड लागत नाही. आईने तोंड सुख घेतले. शेवटी हा झोपी गेला पण बायको स्वप्नात आली. रिकामी नाही तर कॉफी घेऊन. हा बडबडत उठला 'ती बघ कॉफी घेऊन आली.' तात्पर्य बायको चित्तात साठविली तिच स्वप्नात आली नाथ महाराज सांगतात.

पर्णिली कांता माहेरी जाये। चित्ती रिघाली दुरी न राहे।
यापरी विषयो पाहे। जडला ठाये चित्तासी॥ भागवत नाथ.

जशी बायको, धन चित्तात राहते तसा परमात्मा ठेवायचा. तो तर आणखी अतिशय जवळच म्हणजे हृदयातच आहे. फक्त चित्त आत वळवायचे आहे.

सर्व भूतांच्या अंतरी। हृदय महाअंबरी।
चिद्वृत्तीच्या सहस्त्रकरी। उदैयला असे जो॥ ज्ञाने.

तो तावडतोब मिळेल.

चित्ताच्या तीन अवस्था व्हाव्या लागतात तरच चित्तात देव राहतो.

१) चित्त हे लोण्यासारखे मऊ झाले पाहिजे.

मृदु सबाह्य नवनित। तैसे सज्जनाचे चित्त॥ तु. म.

संत हृदय नवनित समाना। कहा कभिन्न परी कहे न जाना।
निज परिताप द्रवही नवनिता। परदुःख द्रवहि संत सुपुनिता॥ तुलशीदास

संतांचे हृदय हे लोण्यासारखे असते पण लोण्यापेक्षा वेगळे, कारण लोणी तापवले तर ते स्वतः वितळते पण साधूचे हृदय दुसऱ्याच्या दुःखाने द्रविभूत होते.

२) चित्त निर्मळ पाहिजे अर्थात गंगेच्या पाण्यासारखे

सर्वांग निर्मळ। चित्त जैसे गंगाजळ॥ तु. म.

चित्त ते निर्मळ जैसे नवनित। जाणिजे अनंत तयामाजी॥ तु. म.

तुका म्हणे चित्त करावे निर्मळ। येवोनि गोपाळ राहे तेथे॥
निर्मळ चित्ते झाली नवनिते। पाषाणा पाझर फुटती रे॥ तु. म.

मग चित्त मलीन कशाने होते? तुकोबाराय सांगतात.

चित्ती द्रव्य दारा पुत्रादि संपत्ती। समान ते होती पशुनर॥

अर्थात संसारिक वस्तू चित्तात असल्या तर चित्त मलीन होते. मलीन चित्त निर्मळ कशाने होते? फक्त भजनाने. प्रेम भक्तिच्या अष्टसात्विक भावाने हे चित्त धुतले जाते. असे नाथ महाराज भागवतात सांगतात.

पुत्रवित्त लोकेषणा। त्यजुनि भजता हरिचरणां।
तव तव चित्ताचे चैत्यमळ जाणा। क्षणक्षणा नासती।
रजतमादि कर्मज मळ। चित्ती बैसले जे सबळ।
ते प्रक्षाळती सकळ। भक्ति प्रेमजळ क्षाळणे॥
प्रेमभक्ति जल बिनु रघुराई। अभी अंतर मल कबहु न जाई॥ तुलशीदास

३) चित्त व्यापक बनविले पाहिजे. महात्म्यांचे चित्त एवढे व्यापक असते एवढ्या व्यापक परमात्म्यास ते गवसणी घालते.

हे असो अघवी करणी। तो लेईला शांतीची लेणी।
जयाचे चित्त 'गवसणी'। व्यापका मज॥ ज्ञाने.

एवढ्याशा चित्तात एवढा मोठा देव कसा साठवितात?

ज्याप्रमाणे एवढ्याशा दृष्टीत एवढी मोठी सृष्टी साठवितात किंवा एवढ्याशा वडाच्या बी मध्ये वृक्ष सामावतो. तसा एवढ्याशा चित्तात परमात्मा साठवू शकतो. 'एवढा प्रभू भावे। तेणे संपुष्टी रहावे॥ तु. म.' कारण संताचे चित्त मृदू, निर्मळ व व्यापक असते. अशा चित्ताचे परमात्मा हरण करतो. म्हणून त्यास चित्तचोर म्हणतात. चित्तावरच परमार्थ अवलंबून आहे. शरीराच्या क्रियेवर नाही. पुराणात एक कथा आहे दोघे मित्र चालले असताना मोठे वादळ झाले. त्यामुळे दोघे दोन ठिकाणी गेले. एक मंदिरात गेला व एक वेश्यागृही गेला. मात्र मंदिरातील माणूस रात्रभर मंदिरात असून वेश्यागृही असणाऱ्या मित्राचे चिंतन करु लागला. मात्र वेश्यालयात असणारा माणूस मंदिरात असलेल्या मित्राचे चिंतन करु लागला. त्यास देव दर्शन घडले असावे. भजन ऐकण्यास मिळाले असावे. दुसऱ्या दिवशी दोघेही गतप्राण झाले. पण मंदिरातील मित्रास यमदूत नेण्यास आले व वेश्यालयातील मित्रास विष्णूदूत आले. कारण परमात्मा चित्त पहातो. शरीर नाही. तुमचे चित्त कशात आहे यास फार महत्व आहे. पाण्यात दगड किती दिवस ठेवला तर मऊ होईल?

चित्त मिले तो सब मिले। नहि तो फुकट संग।
पानी पाथर एक ठोर। कोरा न भिजे अंग॥ तु. म.

जसे आईचे चित्त लेकरावर असते "मातेचिया चित्ती। अवघी बालकाची व्याप्ति॥" अथवा 'लेकुराचे हित। जाणे माऊलीचे चित्त॥' किंवा 'तुका म्हणे माता। वाहे तान्हुल्याची चिंता।' 'जया चित्ती जैसा भाव। तयाजवळी तैसा देव॥ लोभी के चित्त धन बैठे। कामिनीके चित्त काम॥ माताके चित्त पुत बैठे। तुका के मन राम॥ तु. म.' तसा संतांच्या चित्तात परमात्मा बसलेला असतो.

तुका म्हणे चित्ती बैसला अनंत। दिसो नेदि नित्य अनित्य ते॥
विठ्ठल हा चित्ती। गोड लागे गाता गीती॥ तु. म.

★ ★ ★ ★ ★

२३ : अहंकार

अंतःकरणातील अहंकार हा चौथा भाग आहे.

ज्ञानेश्वर महाराज क्षेत्राचे वर्णन करताना छत्तीस तत्वापैकी एक तत्व अहंकार सांगतात. ज्याप्रमाणे जागृतीमध्ये स्वप्न लपलेले असते. अवसेला चंद्र लपलेला असतो. बालपणात तारुण्य गुप्त असते. न फुलणाऱ्या कलिकेत सुगंध लपलेला असतो. काष्टात अग्नि जसा गुप्त तसा शरीरात अहंकार लपलेला असतो. पण निमित्त मिळताच बाहेर पडतो जसे अपथ्याचे निमित्त साधून ज्वर बाहेर पडतो.

तैसी पाचाहि गाठी पडे। जै देहाकारु उघडे।
तै नाचवी चहूंकडे। तो अहंकारु गां॥ ज्ञाने.

नवल अहंकाराची गोठी। विशेषे न लगे अज्ञानापाठी।
सज्ञानाचे झोंबे कंठी। नाना संकटी नाचवी॥ ज्ञाने.

अज्ञानापेक्षा सज्ञानास हा अहंकार सतत नाचवत असतो. देवास कोणताच अहंकार आवडत नाही.

तिळभरी जरी होय अभिमान। मेरु तो समान भार देवा॥ तु. म.

अहंकाराचे अनेक प्रकार आहेत.

१) रुपाचा, २) शक्तिचा, ३) सत्तेचा, ४) धनाचा, ५) ज्ञानाचा, ६) भक्तिचा वगैरे. हनुमान भेटीच्या वेळी श्रीकृष्णानी चौघांचा अभिमान घालविला. गरुडाचा बळाचा, सत्यभामेचा रुपाचा, बळीरामदादांचा व चक्राचा शक्तिचा अभिमान नष्ट केला. तुकोबाराय म्हणतात.

धाडिले गरुडा आणिले हनुमंता। तै पाचारिले होऊनि येई वो सीता।
लाजिन्नली रुप नये पालटता। झाला भिमकी आपण राम सीता वो॥

शुकाचार्यांना ज्ञानाचा अभिमान झाला होता.

अभिमान लागे शुकाचिये पाठी। व्यासे उफराटी दृष्टी केली॥ तु. म.

ज्ञानाचा अभिमान अतिशय घातक आहे.

तुका म्हणे नरकी घाली अभिमान। जरी होय ज्ञान गर्व ताठा॥ तु. म.

शिकल्या बोलाचा धरशील ताठा। तरी जाशी वाटा यमपंथे॥ तु. म.

गौळणीना रासक्रिडेच्या वेळी भक्तिचा अभिमान झाला होता. एवढा अखंड ब्रह्मांडपती पण आम्हांस खांद्यावर घेऊन नाचतो. असा अभिमान झाल्याबरोबर देव गुप्त झाले व गौळणी जमिनीवर आपटल्या. विरहगीत गायल्यानंतर श्रीकृष्ण प्रगट झाले.

कोणी सांगा या गोविंदाची शुद्धी। होता वहिला लपाला आता खांदी॥
कोठे आड आली हे देहबुद्धी। धावा आळवा करूणा कृपानिधी वो॥ तु. म.

देवास कोणताच अभिमान नाही म्हणून त्यास कोणाचा अभिमान आवडत नाही.

अभिमान तुका म्हणे नाही यासी। नेदी आणिकाशी येऊ देव॥ तु. म.

देव सर्व बाबतीत सर्व श्रेष्ठ आहे. रुपात, गुणात, शक्तित, सत्तेत, धनांत. त्यासमोर आमचा अभिमान कसा टिकेल! अभिमान गेल्याशिवाय तो प्राप्त होत नाही.

अहंकार गेला। तुका म्हणे देव झाला॥ तु. म.

अभिमान बाधक आहे पण स्वाभिमान साधक आहे.

जे अहंकारु वाहत अंगी। आम्ही हरिचे भूषावया लागी।
जे लोभिये एकचि जगी। माझेनि लोभे॥ ज्ञाने.

याचा धरिन अभिमान। करीन हेचि जतन॥ तु. म.

अहंकार जाणे म्हणजेच नम्रता येणे. नम्रतेशिवाय देवाची प्राप्ति नाही.

'थोर पण सांडिजे। येथ व्युत्पत्ती आघवी विसरिजे।
जै जगा धाकुटे होईजे। तै जवळिक माझी॥ ज्ञाने.'

देनेको अन्नपान, लेने को हरिनाम। तरनेको लिनता, डुबनेको अभिमान॥ कबीरजी

ईश्वरस्य अपि अभिमानद्वेषित्वात दैन्यप्रियत्वातच॥ ना. भ. सू. २७

परमात्मा अभिमानाचा द्वेषी आहे व दीनांचा प्रिय आहे. दीन म्हणजेच अभिमानरहित भक्त देवास फार आवडतो

कृपावंत किती। दीन बहु आवडती॥ तु. म.

नम्र झाला भूता। तेणे कोंडिले अनंता॥ तु. म.

महापूरे झाडे जाती। तेथे लव्हाळे रहाती॥ तु. म.

द्रौपदीची देवाने लाज राखली. पण द्रौपदी देवास म्हणाली देवा तू फार उशीर केलास. देव म्हणाले नाही. मी बरोबर वेळेवर आलो होतो. पण तू तुझ्या हाताने लज्जा संरक्षण करीत होतीस. त्यानंतर दाताने पदर धरलास मग माझी काय गरज? जेव्हा तू सर्व अभिमान सोडून मला पूर्ण शरण आलीस तेव्हा मला प्रगट व्हावे लागले. मी वस्त्रावताराच धारण केला. द्रौपदी म्हणाली होती.

''दीनानाथा ब्रीद सांभाळी आपुले। नको पाहू केले पाप पुण्य॥ तु. म.

तात्पर्य दीनता म्हणजेच लिनता हवी.

लिन दीन हेचि सार। भव तरावया पार। बुडे माथा भार। तुका म्हणे वाहुनि॥ तु. म.

हनुमंतराय सीता शोधाकरीता लंकेत गेले. पण तुळशीचे झाड पाहून, राम भजन ऐकून, बिभीषणासमोर प्रगट झाले. विभीषणास फार मोठा आनंद झाला. बिभिषण म्हणाला हनुमंता बत्तीस दातात जशी जिभ राहते तसा मी राहतो आहे. दात अहंकाराचे प्रतिक आहेत. रावण अहंकाराचा अवतार होता. मात्र जिभ नम्रतेचे प्रतिक आहे. दात कधी कधी जिभ चावतात पण जिभ मात्र दात साफ ठेवते. शिवाय दातात अन्न कण अडकल्यास मदत करते. हनुमान म्हणाले. दात उशिरा येतात व लवकर जातात. पण जिभ नम्र असल्यामुळे देहाबरोबर येते व मरणांपर्यंत राहते. जिभ थोडीशी वाकडी झाली तर बत्तीसास भारी पडते.

दंत कहे जिभ को हम बत्तीस तू अकेली माय।
फिर एक बार तेढी चलू तो बत्तीसही गीर जाय॥ कबिरजी

म्हणून माणसात नम्रता हवी. ''नमन ते नम्रता अंगी। ने घे रंगी पालट॥ तु. म.

नम्रतेमध्ये मुख्य दोन प्रकार आहेत. १) नैसर्गिक नम्रता, २) कृत्रिम नम्रता.

कृत्रिम नम्रतेचे तीन प्रकार पडतात.

१) गरज भागण्याकरीता नम्रता - गरज सरो वैद्य मरो

जगा घालावे साकडे। दीन होऊनि बापुडे।
हेचि अभाग्य रोकडे। मूळ आणि अविश्वास॥ तु. म.

२) विषयाकरिता दीन - जसा रावण सीतेकडे दीन झाला होता.

इंद्रियाची दीने। आम्ही केलो नारायणे॥ तु. म.

३) दांभिक दीनता म्हणजे वर वर नम्रता मात्र आतून क्रोध. जसा एखादा दादा त्यास राम राम करावा लागतो पण तोंडापुरता. आतून समजतात हा दुष्ट आहे. 'दुर्जनं प्रथमं वंदे। सज्जनं तद्नंतरम' या न्यायाने नम्रता. त्यास दांभिक दीनता अथवा नम्रता म्हणतात. पण संतांजवळ जी नम्रता असते ती नैसर्गिक नम्रता होय. ज्याप्रमाणे

फळलिया तरुचि शाखा। सहजे भूमिसी उतरे देखा॥
तैसे जीव मात्रा असेखा। खालावती ते॥ ज्ञाने.

अखंड अगर्वता होऊनि असती। तयांचि विनय हेचि संपत्ति।
जे जय जय मंत्रे अर्पिती। माझ्या ठायी॥ ज्ञाने.

नमंति फलितो वृक्षाः नमंति गुणिनो जनः।
शुष्क काष्टश्च मुर्खश्च न नमंति कदाचन॥ सुभा.

अर्थ - ज्या झाडास फळे येतात ती वाकतात. तसे सज्जन नम्र होतात मात्र वाळलेले लाकूड व मूर्ख माणसे कधीच नमत नाहीत. नमन म्हणजेच भक्ति आहे. असे तुकोबाराय सांगतात.

भक्ति ते नमन वैराग्य तो त्याग। ज्ञान ब्रह्मी भोग ब्रह्मतनु॥

तात्पर्य अहंकार जावा व नम्रता अंगी यावी तरच परमात्म्याची प्राप्ति संभवते.

★ ★ ★ ★ ★

२४ : दया क्षमा शांती

संतांकडे दैवी संपत्ती असते. त्यातील मुख्य तीन दया, क्षमा, शांति तशी गीतेत २६ लक्षणे सांगितली आहेत. पण वाङ्मयात या तीन संपत्तीचा विशेष उल्लेख आहे. हे तीन गुण जेथे आहेत तेथे देवाची वसती असते.

दया क्षमा शांती। तेथे देवाची वसती॥ तु. म.

सतत कृष्णमूर्ति सावळी। खेळे हृदय कमळी।
शांती क्षमा तया जवळी। जिवे भावे अनुसरल्या॥ ज्ञान.

भक्तिचे ते वर्म जयाचिया हाती। तया घरी शांती क्षमा दया॥ तु. म.

आता दया म्हणजे काय? क्षमा, म्हणजे काय शांति म्हणजे काय? याचा थोडक्यात विचार.

१) दया - मनुने दयेची व्याख्या अशी केली आहे.

परे वा बंधु वर्गे वा मित्र द्वेष्टी अरि वा सदा। आपन्ने रक्षतव्यंतु दयेषा परि किर्तीतः॥

अर्थ - परका अथवा बंधू. मित्र अथवा शत्रू संकटात पडला असता. त्यांचे रक्षण करण्याची इच्छा होणे. कळवळा निर्माण होणे यास दया म्हणतात. ज्ञानोबारायांच्या भाषेत

चिखली रुतली गाये। धड भाकड न पाहे। तियेचिये ग्लानी होये। कालाभुला॥ ज्ञाने.

चिखलात रुतलेली गाय चांगली अथवा भाकड असली तरी तिच्या दुःखाने जो कळवळतो. त्यास दया म्हणतात. ज्ञानोबारायांच्या १६ व्या अध्यायातील ९ ओव्या पाठ करण्यासारख्या आहेत.

आता दया ते ऐसी। पूर्णचंद्रिका जैसी। निववीता न कडसी। साने थोर॥
तैसे दुःखितांचे शिणणे। हिरता सकणवपणे। उत्तमाधम नेणे विवंचू गा॥
पै जगी जीवनासारिखे। वस्तु अंगवरी उपखे। परी जाते जीवित राखे। तृणाचेही॥
तैसे पुढिलांचेनि तापे। कळवळलीया कृपे। दिघलेही आपणपे। न्युनचे मानी॥
निम्न भरलिया उणे। पाणी ढळोंचि नेणे। तेवी श्रांता तोषौनी जाणे। सामोरे पां॥
पै पायी काटा नेहटे। तवं व्यथा जीवी उमटे। तैसा पोळे संकटे। पुढिलांचेनि॥

कां पावो शितळता लाहे। की ते डोळयाचि लागी होये। तैसा परसुखे जाये। सुखावत जो॥
किंबहुना तृषिता लागी। पाणी आरायिले असे जगी। तैसे दुःखितांचे सेल भागी। जिणे जयाचे॥
तो पुरुष वीरराया। मूर्तिमंत जाण दया। मी उदयजतांचि तया। ऋणिया लाभे॥ ज्ञाने.

याचा अर्थ मूळात पहाणे योग्य. विस्तारभयास्तव देत नाही. आपणास दुःख झाले तरी दुसऱ्यास सुख होईल अशी इच्छा याचे नाव दया. असे 'दया' भांडवल संतांजवळ असते.

भूताची दया हे भांडवल संता। आपुली ममता नाही देही॥ तु. म.
दया संता भांडवल। वेचि बोल उपकारे॥ तु. म.

दृष्टांत - वृत्रासुराने तपाच्या जोरावर इंद्रावर स्वारी करून अमरावतीचे राज्य हस्तगत केले. जरी राक्षस असला तरी तपश्चर्या वाढली होती. सर्व देवांनी परत तपश्चर्या केली. ब्रह्मदेव प्रसन्न झाले व सांगितले दधिची ऋषिंच्या हाडाचे वज्र हत्यार बनविले तरच वृत्रासूर मारला जाईल. सर्व देव दधिची आश्रमात आले जसे आपले मंत्री पाच वर्षाने दारात येतात, प्रथम संकोच वाटला बोलावे कसे! पण दधिची बोलले देवाचे काम होण्याकरिता प्राण गेला तरी मी आनंदाने देईन. याचा फायदा इंद्राने घेतला व त्यांची हाडे मागितली. संकोच न करता त्यांनी आत्मा ब्रह्मांडात नेला. देह पडला. देवानी हाडे जमा केली व शस्त्र बनविले ते वज्र होय. या शस्त्रानेच वृत्रासुराचा वध केला. आपल्या देहाचा विचार न करता दधिचीनी हाडे दिली. प्रश्न निर्माण होतो दुसऱ्यास मारण्याकरिता हाडे देणे ही दया होऊ शकते का? याचे उत्तर तुकोबाराय देतात. दया हे दुधारी शस्त्र आहे.

दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दळन कंटकाचे॥ तु. म.

सज्जनांचे रक्षण करणे ही दयाच व दुष्टांना मारणे ही सुद्धा दयाच आहे. शेतातून तन काढणे व पीक वाढविणे यास दयाच म्हणावी. दळणातील खडे काढणे, शरीरातील रोग नाहिसा करणे ही सुद्धा दयाच तसे समाजातील दुष्टांचे निर्दळण व सज्जनांचे पालन ही दयाच आहे. एखाद्याचे घर जाळले तर शिक्षा होईल पण हनुमंताने लंका जाळली तरी तुकोबाराय त्यांना धन्यता देतात. 'जाळियेली लंका। धन्य धन्य म्हणे तुका॥' कारण रावण आततायी होता. श्रीकृष्णाने सुद्धा अर्जुनास सांगितले गुरु, ब्राह्मण हे आततायीना सहकार्य करणारे असतील तर त्यांना मारणे दोष नाही.

गुरुं वा बाल वृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम।
आततायिनमायातं हन्या देवाविचारयन॥ म. स्मृ.

अर्थ - गुरु अथवा बालक, वृद्ध, ब्राह्मण किंवा बहुश्रुत हे आततायी असतील तर देवाचा विचार न करता त्यांना हाना म्हणजे मारा. तात्पर्य दया दोन प्रकारची आहे. जिथे दया असते तिथे परमात्मा असतो. ''भूतदया ज्याचे मनी। त्याचे घरी चक्रपाणी॥ तु. म.'' ज्ञानेश्वर महाराज मात्र दयाळू आहेतच पण 'दयानिधी' आहेत असे नाथ म्हणतात.

ॐ नमो ज्ञानेश्वरा। करुणाकरा दयाळा॥ नाथ.
देशिक राजा 'दयानिधी' अलंकापुरी जो नांदे॥ नाथ.

आता क्षमा पाहू. क्षमा म्हणजे सहनशक्ति. सर्वांचे अपराध सहन करणे म्हणजे क्षमा होय. गीता १३ व्या अध्यायात क्षान्तिः शब्द क्षमेकरिता वापरलेला आहे. माऊलीच्या भाषेत

घेऊनि जळाचे लोट। आलिया नदिनदांचे संघाट।
करी वाढ पोट। समुद्र जेवी॥ ज्ञाने.

तुकोबाराय म्हणतात.

मधुरा वाणी ओटी। तुका म्हणे वाव पोटी।

बळ असून सर्वांचे अपराध सहन करणे म्हणजे क्षमा होय. ज्याप्रमाणे समुद्र वोहळ, ओढे व नद्यांचे कसलेही पाणी पोटात घेतो.

शिलेन शोभते रुपं। क्षमया शोभते बलम्। विनयेन तथा ज्ञानं। दानेन शोभते धनम॥ सुभा.

अर्थ - रुपाला शोभा शिलामुळे, बळाला शोभा क्षमेमुळे, ज्ञानाची शोभा विनय व धनाची शोभा दान होय.

दृष्टांत - सॉक्रेटिस तत्ववेत्ता हा एकदा संध्याकाळी प्रवचनास बसला होता. सर्व अनुयायी समोर बसले होते. मात्र घरात धान्याचा कण नव्हता. प्रवचनानंतर धान्य आणायचे. ते दळायचे व त्याची भाकरी केल्यानंतर जेवण मिळणार होते. घरी पत्नी प्रवचन संपण्याची वाट पहात होती. घरासमोरच प्रवचन चालू होते. तिला राग आला. स्त्रियांचा राग प्रथम भांड्यावर जातो. भांडी (मातीची) आपटली. तरी प्रवचन चालूच, नंतर शिव्या देण्यास सुरुवात केली. पण प्रवचन संपण्याची चिन्हे दिसेनात. पत्नी वैतागली व थंड पाण्याचे मडके घेतले व सॉक्रेटिसच्या डोक्यावर पाणी ओतले. समोरची मुले घाबरली व जाऊ लागली. सॉक्रेटिस म्हणाले थोडे थांबा. उपसंहार करु. मला सांगा पाऊस पडण्याच्या अगोदर काय होते? मुले म्हणाली गडगडाट व विजा चमकतात. अरे आज पण तसेच झाले प्रथम गडगडाट झाला (भांड्याचा आवाज) नंतर विजा चमकल्या (शिव्या) मग पाऊस येणारच (डोक्यावर थंड पाणी) मग पळून कां जाता? यास क्षमा म्हणावी.

आता 'शांतीचा' थोडा विचार.

ज्ञानोबारायांनी गीतेच्या १२ व्या अध्यायात शांतिचे श्रेष्ठत्व सांगितले आहे. अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ, ज्ञानापेक्षा ध्यान श्रेष्ठ, ध्यानापेक्षा कर्मफळ त्याग श्रेष्ठ व कर्मफळ त्यागापेक्षा शांती श्रेष्ठ होय.

सोळाव्या अध्यायात शांती म्हणजे काय सांगतात.

गिळोनि ज्ञेयाते। ज्ञाता ज्ञानही मागौते। हारपे निरुते। ते शांती पै गा॥ ज्ञाने.

ज्ञानाने अज्ञान नाहीसे होणे व शेवटी ज्ञानही हरपून जाणे याचे नाव शांती होय.

जसे काट्याने काटा काढायचा व तोही शेवटी फेकून द्यायचा. रोगाकरिता औषध खायचे व रोग बरा झाल्यानंतर औषधाचे काय काम? चोरांना पकडण्याकरिता पोलिस येणे व काम संपल्यानंतर पोलिसही जाणे. तसे ज्ञानासहित अज्ञानाची निवृत्ती म्हणजे शांती होय. माऊली १८ व्या अध्यायात शांतीचे मोठेपण सांगतात "मग वैराग्याची गोंधळुक। जे ज्ञानाभ्यासाचे वार्धक्य। योग फळाचाही परिपाक। दशा जे कां॥ ते शांती पै सुभगा। संपूर्ण ये तयाचिया अंगा। तै ब्रह्म होआवया जोगा। होय तो पुरुष॥ ज्ञाने."

तात्पर्य - वैराग्य, ज्ञान, अभ्यास, योग याचा परिपाक शेवटची अवस्था म्हणजे शांती आहे. अशी मूर्तिमंत शांती म्हणजे ज्ञानोबाराय.

रेड्या मुखी वेद बोलविला। गर्व द्विजांचा हरविला।
शांती सूर्य प्रगटला। ज्ञानोबा माझा॥ नाथ.

शांती सूर्य म्हणजे सकाळी उगवलेला सूर्य जो प्रकाशित आहे पण शांत! (मत्स्य धरोनिया मनी। बक निश्चळ राहे ध्यानी। ते शांती कोण मानी। अंतःकरणी सकाम॥ नाथ.)

★ ★ ★ ★ ★

२५ : शरणागती

जीवाने देवास शरण जाण्यात त्याचे परम कल्याण आहे.

म्हणऊनि शरण जावे। सर्व भावे देवासी॥ तु. म.

प्रश्न निर्माण होतो. देवास शरण कां जावे? त्याची कारणे

१) सर्व जीव त्याचे अंश आहेत. अंश अंशीस शरण गेल्याशिवाय पूर्णता नाही जसे गंगेने सागरास, लेकराने आईस, माशाने पाण्यास शरण जावे. तरच तरणोपाय आहे. तुकोबाराय सांगतात

गंगा गेली सिंधूपाशी। तिने अव्हेरिले तिशी॥
तिने जावे कवण्या ठाया। वेगी सांगा पंढरीराया॥
जळ कोपे जळचरा। माता बाळा नेदी थारा॥
तुका म्हणे आलो शरण। विठू त्वा कां धरीले मौन॥

२) ब्रह्मादिक देवापर्यंत कोणीही भवसागर तारण्यास असमर्थ आहेत. फक्त हा भगवानच अथवा त्याचे भक्त जीवास तारु शकतात. देवाचे वचनच आहे. "जो मज होय अनन्य

शरण। त्याचे निवारी मी जन्ममरण। या लागी शरणांगता शरण्य। मीच एकू॥ ज्ञाने." अथवा 'करीता विचार। तो हा दृढ संसार। ब्रह्मादिका पार। नुल्लंघवे सामर्थ्ये॥ शरण शरण नारायणा॥' तु. म. 'सांडूनि श्रीकृष्ण चरण। इंद्रादी देवाचे करीता भजन। ते देवच मृत्यूग्रस्त पूर्ण। भजत्याचे मरण कोण वारी॥ नाथ.

३) चार वेद, सहा शास्त्रे व अठरा पुराणांनी (अठ्ठावीस) या विठोबास शरण जाण्यास सांगितले आहे. हे आपले प्रमाण ग्रंथ आहेत.

वेद अनंत बोलीला। अर्थ इतुकाचि साधीला॥
विठोबासी 'शरण' जावे। निजनिष्ठा नाम गावे॥
सकळ शास्त्रांचा विचार। अंती हाचि निर्धार॥
अटरा पुराणी सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत॥

४) धन, दारा, पुत्र, जन, बंधु, सोयरे हे सर्व मिथ्या म्हणजे फक्त शरीराच्या संबंधापुरते आहेत. देवांचा संबंध कायमचा आहे. म्हणून जीवाने देवासच शरण जावे. नामदेवराय म्हणतात.

धन दारा पुत्र जन। बंधु सोयरे पिशुन।
सर्व मिथ्या हे जाणून। 'शरण' रिघा देवासी॥

५) या देवास शरण गेल्यानंतर तो जीवाचे पाप-पुण्य, दोष-गुण, काहीच पहात नाही. तुकोबाराय म्हणतात.

मागे शरणांगत तारिले बहुत। म्हणती दीनानाथ तुज देवा॥
पाहिले अपराध नाही याती कुळ। तारिला अजामेळ गणिका भिल्ली॥
अढळपदी बाळ बैसविला ध्रुव। क्षीराचा सागरु उपमन्या॥
गजेंद्र पशु नाडिला जळचरे। भवसिंधु पार उतरिला॥
प्रल्हाद अग्नीत राखिला जळात। विषाचे अमृत तुझ्या नामे॥
पांडवा संकट पडता जडभारी। त्यांचा तू कैवारी नारायणा॥
तुका म्हणे तू या अनाथांचा नाथ। ऐकोनिया मात 'शरण' आलो॥

६) कोणत्याही भावाने यास शरण गेल्यास त्याचा उद्धार होतो. प्रेम भावाने अथवा वैर भावाने शरण जा. उद्धार झालाच म्हणून समजा. भागवतातील प्रसिद्ध श्लोक जो ऐकल्यानंतर शुकाचार्य समाधीतून जागे झाले व भागवत ऐकण्यास व्यासाकडे (वडिलांकडे) आले.

अहो बकी यं स्तनकालकुटं, जिघासयाप्य यघय्य साध्वी।
लेभे गतीं धातृचित्तं ततोऽन्यं कं वा दयालुम् शरणं व्रजेत॥

जी पुतना श्रीकृष्णास मारण्याच्या इच्छेने स्तनात जहरी विष भरून आली होती अशा पूतनेस

श्रीकृष्णानी स्वतःच्या आईपेक्षा उत्तम गती दिली. मग अशा दयाळू देवास कां शरण जाऊ नये?

७) हा करुणा सागर आहे म्हणून यासच शरण जावे.

शरणांगता वज्रपंजर। अभयदाना तू उदार।
सकळा देवा तू अगोचर। होशी अविकार अविनाश॥ तु. म.

शरण येणाऱ्या जीवांना हा वज्रासारखा कठीण असणारा कापसासारखा मऊ होतो. वास्तू नावाचा राक्षस देव व मानव यांना पिडा करत होता. सर्वांच्या तक्रारी करून देवानी त्याच्याशी युद्ध केले. देव आटोपत नाही म्हणून तो तत्काळ शरण आला व त्यास वरदान दिले नविन घरात तू रहा तुझी शांती केल्याशिवाय त्यांना शांती नाही. म्हणून आपण 'वास्तूशांती' करून घर प्रवेश करतो. शंखासूराचा वध करून तो शरण आल्यानंतर त्याच्या हाडांच्या शंखास देवाने मान दिला असा हा करुणा सागर आहे. म्हणून यासच शरण जावे.

लोकाभिरामं रणरंङधीरं राजीवनेत्रं रघुवंशनाथम।
कारुण्यरुपं करुणाकरं तं श्रीरामचंद्र शरणं प्रपद्ये॥ रामरक्षा

८) देव स्वतःच आश्वासन देतात सर्व धर्माचा त्याग करुन मला शरण आलास तर मी तुला सर्व पापातून मुक्त करून मोक्ष देईन

सर्वधर्मान्परित्यज्य मामेक शरणं व्रज।
अहं त्वा सर्व पापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः॥ गीता १८/६६

म्हणून यास शरण जावे.

९) मन अतिशय चंचल आहे. पण यास शरण गेल्यास तो कृपा करतो व चंचल मन त्याच्याच चरणांवर स्थिर राहते.

तुझी कृपा नव्हता जाण। साधका कदा नातळे मन।
मनोनिग्रहार्थ जाण। तुझ्या चरणा शरण रिघावे॥ नाथ.

१०) कर्म कोणास सुटत नाही. कर्माची गती गहन आहे. तथापि देवास दया आल्यास तो कर्म भोगामध्ये मदत करतो. आत्यंतिक कृपा केल्यास कर्मच संपते.

कर्माशी शंभू मानी आपण। किती पळशी कर्माभेण।
बापरखुमादेवीवर विठ्ठला शरण। केली कर्मे निवारी नारायण॥ ज्ञान. अथवा

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा। हरिकृपे त्याचा नाश झाला॥

११) सर्व जगावर कामाचा प्रभाव आहे. पण देवास शरण गेल्यास त्याच्या कृपेने कामाचाच राम होतो.

सर्व भावेसी संपूर्ण। हरिशी रिघालिया शरण।
सकळ कामाचे निर्दळण। सहजे जाण स्वये होय॥ नाथ.

भावे हरिसी रिघालिया शरण। हृदयी प्रगटे नारायण।
तेव्हा सर्वकाम सहजे जाण। जाती पळोन हृदयस्थ॥ नाथ.

१२) अ) सर्वांना पूर्णसुख हवे याच्या कृपेशिवाय हे प्राप्त होत नाही. व शरणांगतीशिवाय कृपा होत नाही. म्हणून यास शरण जावे.

ब) मायेचा प्रभाव देवास शरण गेल्याशिवाय नष्ट होत नाही. म्हणून यासच शरण जावे.

क) यास शरण गेल्यास जगातील कोणीही केस वाकडा करु शकत नाही म्हणून यास शरण जावे.

जीतने तारे गगनमे उतने शत्रू होय।
कृपा करे एक रघुराज बाल न बाका होय। कबीरजी

प्रल्हादास मारण्याकरिता हिरण्यकश्यपूने अकरा प्रयोग केले पण प्रल्हादाचा केसही वाकडा झाला नाही.

देव राखे तया मारील कोण। न मोडे काटा हिंडता वन॥ तु. म.

महाभारतीय युद्धात ३९,३६,६०० सैन्य लढले पण देवाने पांडवासच वाचविले कारण ते त्याचे शरणांगत होते.

ड) प्रत्येक जीवाचा तो अंतःकरणातील भाव जाणतो. तो सर्व देशांत, सर्व काळात, सर्व वस्तूत आहे. म्हणून त्यास शरण जाण्यात जीवाचे कायमचे कल्याण आहे.

मात्र सर्व भावाने शरण जाण्यास हवे.

सर्व भावे आलो तुजशी शरण। काया वाचा मने सहित देवा॥ तु. म.

त्वमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत॥ गीता
तया अहं वाचा चित्त अंग। देऊनिया शरण रिघ।
महोदधी कां गांग। रिघाले जैसे॥ ज्ञाने.

सर्व भावाने शरण गेल्यास तो तावडतोब कृपा करतो.

जीव देवास शरण का जात नाही. त्याची चार कारणे.

१) शरण-वरण तुष्टी - काही माणसे फक्त तोंडाने बोलतात. पण क्रिया काहीच नाही. यास शरण-वरण तुष्टी म्हणतात. देवास शरण जावे म्हणतात. पण जात नाहीत.

२) भाग्य तुष्टी - काही माणसे म्हणतात भजन, देव, धर्म आमच्या भाग्यातच नाही. तुम्ही करता तुमच्याच भाग्यात आहे. वास्तविक परमार्थ प्रयत्नावर व संसार प्रारब्धावर अवलंबून आहे. पण यांच्या बाबतीत उलटे असते तुकोबारायांच्या शब्दात 'भजन घाली भोगावरी। अकर्तव्य मनी धरी॥'

३) काळ तुष्टी - काही माणसे म्हणतात योग्य काळ आल्यानंतर आम्ही देवाकडे आपोआप आकर्षित होऊ. प्रमाण देतात.

तुका म्हणे नाही चालत तातडी। प्राप्त काळ घडी आल्याविण॥ तु. म.

४) भगवत् तुष्टी - काही लोक म्हणतात भगवंत आमच्या स्वप्नात येऊन सांगेल तेव्हाच आम्ही परमार्थ करु. त्यांना वाटते आपण देवाचे जावईच आहोत.

अशा चार कारणांनी जीव भगवंतास शरण जात नाही असे वल्लभाचार्य सांगतात.

देवास शरण जाण्याच्या पाच पद्धती.

१) आश्रय - पृथ्वीसारखा देवाचा आश्रय धारण करणे.
२) अवलंबन - हात तुटल्यानंतर पट्टी बांधून गळ्याचा आधार घेणे तसा भगवंताचा आधार घेणे यास अवलंबन म्हणतात.
३) आधिनता - मालकाच्या ताब्यात जसा नोकर तसे देवाच्या ताब्यात रहाणे. देवाच्या आज्ञेत रहाणे.
४) प्रपत्ती - देवाच्या चरणांवर लोटांगण घालणे.
५) सहारा - बुडताना नदीच्या काठावर असणारा दगड, झाड याचा सहारा घेणे. तसे भवनदीत बुडताना देवाचा सहारा घेणे.

जीव देवास शरण गेला हे कसे ओळखायचे? अर्थात शरणांगतीचे सहा प्रकार (अहिर्बुध्न्य संहिता)

१) देवाच्या अनुकुल संकल्प करणे.
२) देवाच्या प्रतिकुलतेचा त्याग करणे.
३) देवावर रक्षणाचा भार घालणे.
४) देवावरच विश्वास ठेवणे.
५) देवच सर्व भरून आहे असा भाव असणे (अकिंचनता)
६) आत्मसमर्पण, देह, इंद्रिये, मन देवास अर्पण करणे.

ही देवास शरण गेल्याची लक्षणे आहेत.

★ ★ ★ ★ ★

२६ : औट

वैदिक हिंदू धर्मामध्ये औट म्हणजे साडेतीन या अंकास विशेष महत्व आहे.

१) एका वर्षात साडेतीन मुहूर्त आहेत. या दिवशी ब्राह्मणांना मुहूर्त विचारण्याची गरज नाही. एक पाडवा (गुढी), दोन दसरा, तीन दिवाळी पाडवा, चार अक्षयतृतीया हा अर्धा मुहूर्त आहे.

२) ॐ हे एकाक्षरी ब्रह्म याच्या मात्रा साडेतीन आहेत.

देवा तू अक्षर। औटाविये मात्रेसी पर। श्रुति जयाचे घर। गिवसीत आहाती॥ ज्ञाने.

३) प्रत्येक माणसांचा देह त्याच्या हाताने साडेतीन हात आहे.

हे औट हात मोटके। की केवढे पां केतुके। बरड कि पिके। कोणाचे हे। ज्ञाने.

औट हात तुझा जागा। येर शिणसी वाऊगा। तु. म.

या जगात प्रत्येकाची जागा फक्त साडेतीन हात आहे. थोडा विचार केला तर या देहातून जीव आऊट (Out) झाला तर आपल काहीच नाही. बळी राजाकडे वामन अवतारात देवाने तीन पावलं जमीन मागितली पण नाथ महाराज म्हणतात ही साडेतीन हाताची भूमि मागितली.

आत्मनिवेदन करुनिया बळी। झाला वनमाळी द्वारपाळ।
औट पाऊल भूमि घेऊनिया दान। याचक आपण स्वये झाला॥ नाथ.

देवांनी एका पावलात भूमि, दुसऱ्या पावलात आकाश व तिसरे पाऊल बळी राजाच्या डोक्यावर ठेवले. मात्र देवास स्वतःचा देह त्यास द्वारपाळ म्हणून द्यावा लागला जसा भाव तसा देव. म्हणून तु. म. म्हणतात.

देह समर्पिजे देवा। भार काहीच न घ्यावा॥
होईल आघवा। तुका म्हणे आनंद॥

४) भारतात साडेतीन ठिकाणी कुंभमेळे भरतात.
१) प्रयाग, २) उज्जयनी, ३) त्र्यंबकेश्वर (नाशिक), ४) अर्धा हरिद्वार

देव दैत्यांच्या दधीसमुद्रमंथनातून चौदा रत्नापैकी अमृत हे रत्न मिळाले. हा अमृताचा कुंभ गरुड नेत असता त्यातील साडेतीन थेंब अमृत या साडेतीन ठिकाणी पडले म्हणून इथे कुंभमेळे भरतात.

५) ज्ञानेश्वर महाराजांनी सहाव्या अध्यायात योगदर्शन लिहीले. त्यात देहामध्ये कुंडलिनी आहे ती साडेतीन वेढ्यामध्ये वळून बसली आहे असे सांगतात.

तैशी ते कुंडलिनी। मोटकी औट वळणी। अधोमुख सर्पिणी। निजैली असे॥ ज्ञाने.

६) प्रत्येक माणसांच्या शरीरावर साडेतीन कोटी केस आहेत. पण कोणी मोजण्याचा प्रयत्न करु नये. जरी आपले असले तरी! कबीर दासांचा एक दोहा आहे.

चार मिले चौसष्ठ खिले। बीस रहे कर जोड।
हरिजनसे हरिजन मिले। विहंसे सात करोड॥

जेव्हा दोन हरिजन म्हणजे महात्मे एकमेकांना भेटतात. तेव्हा प्रथम आलिंगन देतात. "प्रथम भेटी आलिंगन। मग चरण वंदावे॥ तु. म." त्याचे दोन हात याचे दोन हात. एकमेकांना मिठी मारतात. चौसष्ठ खिले म्हणजे दोघांची बत्तीशी दिसते. खळखळून हसतात. नंतर आदराने त्याची व याची दहा दहा बोटे नमस्काराकरिता जुळतात. आणि त्याचे साडेतीन कोटी केस व याचे साडेतीन कोटी केस रोमांचित होतात. एवढा त्यांना एकमेकांच्या भेटीचा आनंद होतो.

ज्ञानेश्वर महाराज दोन साधूंच्या भेटीचे वर्णन करतात

जैसी जवळिकेची सरोवरे। उचंबळलिया कालवती परस्परे।
मग तरंगांसी धवळारे। तरंगचि होती॥

दृष्टांताने सिद्धांत सांगतात

तैसी येरयेरांचिये मिळणी। पडत आनंद कल्लोळांची वेणी।
तेथ बोध बोधाची लेणी। बोधेचि मिरवी। ज्ञाने.

७) महाराष्ट्रामध्ये साडेतीन शक्तिपीठे आहेत. म्हणून हे 'महा'राष्ट्र आहे.
१) कोल्हापूरची महालक्ष्मी, २) तुळजाभवानी महासरस्वती तुळजापूर, ३) माहुरगड-महाकाली, रेणुकादेवी, ४) अर्धे शक्तिपीठ वणी सप्तशृंगीदेवी जगदंबा

असे हे आहे औट अंकाचे महिमान. म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी ज्ञानेश्वरीच्या ओव्या साडेतीन चरणांमध्ये लिहील्या आहेत.

* * * * *

२७ : कर

मनुष्य शरीरात, हात (कर) हे विशेष इंद्रिय आहे. चार खाणी, चौऱ्यांशी लक्ष योनी, तीन गुणी, वनचर, जलचर, भूचर व खेचर या सर्व जीवांचा विचार केल्यास 'कर' फक्त माणसालाच आहेत. माकड पुढच्या दोन पायांचा उपयोग हातासारखे करते. म्हणून डार्विन माकडास माणसाचा पूर्वज म्हणत असावे. हत्ती सोंडेचा उपयोग हातासारखा करतो म्हणून त्यास 'हत्ती' नाव पडले असावे. मात्र देवांनी माणसालाच हात दिले आहेत. प्रश्न पडतो माणसालाच कर का? उत्तर सांगता येईल पशु पक्षी वगैरे सर्व जीव डोक्याचा उपयोग खाण्यापिण्याकरिता करतात.

माणसाच्या मुंडीस महान मूल्य आहे. म्हणून माणसानी आपले डोके फक्त खाण्यापिण्याकरिता वापरु नये. याकरिता देवाने माणसालाच हात दिले आहेत.

तुकाराम महाराजांच्या बऱ्याच प्रमाणात हात प्रथम आला आहे.

दिली इंद्रिये 'हात' पाय कान। डोळे मुख बोलाया वचन।
जेणे तू जोडिसी नारायण। नाशे जीवपण भवरोग॥
सदैव तुम्हा आहे। 'हात' पाय चालण्या॥ तु. म.

वास्ताविक पायी वारीचे महत्व सांगताना पायाचे वर्णन प्रथम पाहिजे. पण इथे सुद्धा महाराजांनी हातच घातला आहे.

जव हे सकळ सिद्ध आहे। 'हात' चालावया पाये।
तव तू आपले स्वहित पाहे। तिर्थ यात्रे जाय चुकू नको॥ तु. म.

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम्। गीता १३/१३

गीताकारांनीसुद्धा पाणि म्हणजे हातासच महत्व दिले आहे. सकाळी उठल्याबरोबर एक श्लोक म्हणतात.

कराग्रे वसते लक्ष्मीः करमूले सरस्वती । करमध्ये तू गोविंदं प्रभाते कर दर्शनम् ।।सुभा.

शास्त्रीय दृष्ट्या हाताची देवता इंद्र आहे. परंतु सुभाषितकाराने तीन देवता हातावर ठेवल्या आहेत. लक्ष्मी, सरस्वती, गोविंद, यातून त्यांना हे सांगायचे आहे सकाळी उठल्यापासून काय मिळवायचे? हे तुझ्याच हातात आहे. काही लक्ष्मीदास लक्ष्मीच्या मागे धवतात. विद्यार्थी सरस्वतीच्या मागे पळतात आणि संत साधू सकाळी देवाकडे धावतात. इथे गोविंद मध्ये आहे. यातून असा निष्कर्ष निघतो. गोविंद मिळविणाऱ्यांना लक्ष्मी मिळते. कारण यांचा अद्याप घटस्फोट झाला नाही. लक्ष्मी चंचल आहे. पण नारायणाच्या पायाजवळ स्थिर आहे.

कमला स्थिर ना रहिम कहे ये जानत नही कोय।
पुराण पुरुषकी बधू कस ना चंचला होय॥ रहिमदास

लक्ष्मी चंचल आहे. हे सर्वांना माहीत आहे. पण पुराण पुरुष (नारायण) त्याच्या चरणाजवळ स्थिर आहे. सरस्वती नारायणाची सून आहे. तात्पर्य नारायण मिळाल्यानंतर लक्ष्मी, सरस्वती मिळणारच.

माणसास दोन हात आहेत. सकाळी डाव्या हातास उजवा सहकार्य करतो. दुपारी (जेवतेवेळी) उजव्या हातास डावा सहकार्य करतो. एकमेकांना सहाय्य करण्याकरिता देवाने माणसासच हात दिले आहेत. यातून एक सिद्धांत निर्माण होतो. "एकएका सहाय्य करु । अवघे धरु सुपंथ ।। तु.म.

दृष्टांत - ब्रह्मदेवाचा एक पुत्र कश्यप. कश्यपाच्या दोन बायका दिती व अदिती. दितीचे

पुत्र राक्षस. अदितीचे देव. म्हणजे दोघेही ब्रह्मदेवाचे नातू. एकदा राक्षसांनी तक्रार केली, ब्रह्मदेवा आपण आम्हां दोघांचे आजोबा. पण आम्ही राक्षस दुःखात व देव सुखात आहेत. ब्रह्मदेव बोलले माझ्याकडे पंक्ति प्रपंच नाही. मला दोघेही सारखे. पण देवाकडे सहकार्याची भावना आहे. ती तुमच्याकडे नाही. राक्षस म्हणाले कशावरुन? ब्रह्मदेवानी दोन्ही पार्टींना जेवावयास बोलाविले. षड्रसयुक्त भोजन केले राक्षस म्हणाले,'आम्ही प्रथम बसणार'. ब्रह्मदेवानी राक्षसास प्रथम बसविले. जेवण वाढले. मात्र एक अट घातली. जेवताना हात कोपरात वाकडा न करता जेवायचे. राक्षसांनी सुरुवात केली. पण जेवता येईलच कसे? अन्नानी तोंडे बरवटली. कोणाचेही पोट भरले नाही. मूर्ख एकमेकांना हसू लागले. जेवणाची वेळ संपली. राक्षसांनी सांगितले हीच अट देवांना घाला. पाहू या कसे जेवतात ते? देव जेवायला बसले. ब्रह्मदेवांनी अट घातली हात कोपरात वाकवायचा नाही. देवांनी विचारले फक्त एवढीच अट कां? होय एवढीच अट. देवांनी पत्रावळया समोरासमोर घेतल्या व समोरच्यास त्याच्याच पत्रावळीतील अन्न त्याच्या मताप्रमाणे तोंडात घालू लागले. तोंड खराब न होता हात सरळ ठेऊन सर्वजण पोटभर जेवले. राक्षसांनी पाहिले. म्हटले ही आयडिया आपणास सुचली नाही. सुचणारच कशी? कारण अंतःकरणात सहकार्याची भावनाच नाही. या सहकार्यामुळे जग सुखी होऊ शकते. भावांनी भावांस सहकार्य केल्यास कुटुंब सुखी, शेजाऱ्यांनी एकमेकांना सहकार्य केल्यास गाव सुखी. गावागावांनी सहकार्य केल्यास तालुका, जिल्हा, राष्ट्र, खंड, किंवहुना जग सुखी होऊ शकते.

हातावर हस्तरेषा आहेत. या रेषा कर्तृत्वाप्रमाणे बदलतात. कर्म बदलण्याचे सामर्थ्य तुमच्याच हातात आहे. जो लांब हाताचा आहे. (गुडघ्याच्या खालपर्यंत) त्यास अजानुबाहू म्हणतात. अर्जुन, ज्ञानेश्वर महाराज, शंकराचार्य हे भाग्यवान अजानुबाहू होते. हाताचे भूषण आहे, दान 'हस्तस्य भूषणं दानं,' अथवा देवाची, संतांची पूजा ''कर नीत करहि रामपद पूजा। राम भरोस हृदय नहीं दूजा।।'' तुलशी. किंवा देवाच्या भजनात टाळी वाजविण्याकरिता ''लागोनिया पाया विनवितो तुम्हाला। कर टाळी बोला मुखी नाम।।'' तु. म. बाकीच्या योनी भोगभूमी आहेत. मनुष्ययोनी कर्म भूमी आहे. ''कर्मभूमी ऐसा ठाव। व्यवसाय जाणावा।।'' तु. म. उर्ध्व गतीस जावे की अधोगतीस जावे हे माणसाच्याच हातात आहे.

एका गावात एक सज्जन माणूस रहात होता. तो गावचं ''भूषण'' होता. पूजा सांगणे. वास्तुशांती, लग्ने, कीर्तन, प्रवचन, व्याख्यान सर्व गोष्टीत तरबेज, सतत हसतमुख. सर्व लोकांना तो वंदनीय होता. ''वदनं प्रसाद सदनं सदयं हृदयं सुधामया शब्दः। करणं परोपकरणंच येषां केशां न ते वन्दयाः।।'' ज्याचे मुख कमळ प्रसन्न आहे. हृदयात दया आहे, अमृतासारखे गोड बोलतो. ज्याची इंद्रिये परोपकारात उपयोगी पडतात. अशी माणसे वंदनीय कां होणार नाहीत? पण याचा चांगुलपणा गावातील चार पदवीधरांना खपेना. त्यांनी गावात सभा घेऊन सांगितले. आम्ही पदवीधर असताना या सामान्य ७ वी पास माणसास आमच्यापेक्षा श्रेष्ठ कसे मानता? तथापि आम्ही यांना (सज्जनास) एक प्रश्न विचारतो. त्याचे उत्तर बरोबर दिले तर तो

आमच्यापेक्षा श्रेष्ठ समजा. चौघापैकी एकाने पोकळ मुठीत माशी पकडली. सर्व गावकऱ्यांसमोर सांगितले. माझ्या मुठीत माशी आहे. या सज्जनाने सांगावे माशी जिवंत कां मेलेली आहे? त्यांनी विचार केला जिवंत म्हटला तर पटकन दावून मारायची, मेलेली म्हटला तर सर्वासमोर मूठ उघडायची. माशी उडून जाईल कारण ती जिवंत होती. कसे ही उत्तर दिले तरी विजय आमचाच. पण हा सज्जन माणूस त्यांच्या बापाचे बारसे जेवला होता. त्याने सांगितले माशी जिवंत टेवायची की मारायची ते तुमच्याच हातात आहे. चौघांनी साष्टांग दंडवत घातला. सिद्धांत हा. नरकात जायचे, स्वर्गात जायचे की देव मिळवून मुक्त व्हायचे. हे माणसाच्याच हातात आहे. म्हणून देवांनी मनुष्यासच कर दिला आहेत. मराठीत 'हात' या इंद्रियावर जेवढ्या म्हणी आहेत तेवढ्या कोणत्याच इंद्रियावर नाहीत. तात्पर्य 'कराचे' महत्व लक्षात घ्यावे. (काहींना कर म्हणजे टॅक्स एवढेच माहीत असते.) याचा योग्य उपयोग करुन सुखी व्हावे.

सिकंदरने मृत्यूपत्रात लिहीले होते. मेल्यानंतर तिरडीवर माझे दोन्ही हात रिकामे टेवावे. एका बाजूला माझी सर्व संपत्ती व एका बाजूस माझे सर्व सैन्य टेवावे. अशी प्रेतयात्रा स्मशानापर्यंत काढावी. यातून त्यास हे सांगावयाचे होते. एवढी संपत्ती व सैन्य असून मला यास सोडून हात हलवित जावे लागत आहे. मानवा जन्मास येऊन असं काही 'कर' की ज्यामुळे पुढचे सर्व जन्म सुलभ होतील. असे सर्व संतांनी 'कर' जोडून आम्हा सर्वांना मार्गदर्शन केले आहे.

कर जोडूनि विनवितो तुम्हा। नका गुंतू विषय कामा। नका करु संसारश्रमा।
तुम्ही आठवा मधुसूदना। तुम्ही वासुदेव वासुदेव म्हणा॥ नाथ.

एक महात्मे सांगतात भजनांत, कीर्तनात टाळी वाजवा. पण लोक लाजतात. यास शिक्षितांचा भरणा जास्त आहे. वाईट कर्माची लाज हवी. चांगल्याची नको. ज्या ठिकाणी नामस्मरण होते. त्या ठिकाणी परमात्मा असतो असे त्याचेच वचन आहे. 'माझे भक्त गाती जेथे। नारदा मी उभा तेथे।।' तु. म. अथवा 'नाहं वसामी वैकुंठे, योगीनां हृदये रवौ। मद्भक्त यत्र गायन्ति। तत्र तिष्ठामी नारद।।' सुभा.

तो मी वैकुंठी नसे। एक वेळ भानु बिंबही न दिसे। वरी योगीयांची मानसे। उमरडोनि जाय।
परी तयापाशी पांडवा। हारपला गिवसावा। जेथ नाम घोष 'बरवा'। करीती माझा॥ ज्ञाने.

जे भजनांत टाळी वाजवत नाहीत त्याची देव नोंद ठेवतात. हा हात देण्याच्या लायकीचा नाही म्हणून पुढच्या जन्मी दोन हात काढतात व दोन पाय वाढवतात (चतुष्पाद करतात) जर जनावर व्हायचे नसेल तर हाताचा उपयोग भजनाकरीता करा. पैशाकरीता नको. कारण पैशाकरीता टाळी वाजविणारे स्त्री पुरुषात मोडत नाहीत. देवाच्या छंदात हात वापरले तर परमात्मा चतुष्पाद ऐवजी चतुर्भूज करतो. फक्त त्याला नाही तर त्याच्या जवळच्या सर्व लोकांना 'मातृ पितृभ्राता सगोत्र अपार। चतुर्भूज नर होऊनि ठेले।।' ज्ञान. 'विठ्ठल नामे वाजविता टाळी। तेणे होय होळी महत्पापा।।' नाम.

★ ★ ★ ★ ★

२८ : बोल

नवमास मातेच्या उदरात राहणाऱ्या मानव शरीरास नऊ छिद्रे आहेत. डोळे दोन, कान दोन, नाकपुड्या दोन, मुख एक, गुद-शिश्न दोन एकूण नऊ. शरीर एवढे घाणरडे आहे. या नऊ छिद्रातून घाणच बाहेर येते. फक्त यातून एकच चांगले बाहेर येऊ शकेल ते म्हणजे बोलणे. बोलणे चांगले नसेल तर हे शरीर नरकच. परमात्म्याने माणसाचे मुख ॐ आकाराचे बनविले आहे. वरचा ओठ पाहिला तर! याची योजनाच ॐ जपाकरिता आहे. संपूर्ण चेहऱ्यास तोंड म्हणतात याचे कारण तोंडाचे तीन उपयोग आहेत. १) बोलणे, २) खाणे, ३) नाक चोंदल्यानंतर श्वास घेण्यास. तात्पर्य मुखास अत्यंत महत्व आहे. यामुळे आपण जन व जगन्नाथास जोडू शकतो. अथवा विपरीत वापर केल्यास सर्वांना तोडू शकतो. अस म्हणतात. 'बोला'मुळे रामायण घडले. सीता बोलली ''मला समजले, माझा नवरा संकटात असताना आपण कां जात नाही'' यामुळे विपरीत घडले. बोलामुळेच महाभारत घडले, द्रौपदी दुर्योधनास बोलली, ''आंधळ्याचे पुत्र आंधळेच'' म्हणून अयोग्य टाळा व योग्य बोला. माऊलीनी बोलण्याचे बारा दोष सांगितले आहेत.

विरोधवाद बळु। प्राणिताप ढाळू। उपहासु छळू। वर्मस्पर्शु॥
आटु वेगु विदांणु। आशा शंका प्रतारणु। हे संन्यासिले अवगुणु। जिया वाचा॥

१) विरोधात बोलणे, २) भांडणास उत्तेजन देणे, ३) दुसऱ्यास ताप देणारे बोलणे, ४) उपहासाने बोलणे, टर उडविणे, ५) टाकून बोलणे, ६) वर्मास झोंबणारे बोलणे, ७) हट्टाने बोलणे, ८) आवेशाने बोलणे, ९) कपटाचे बोलणे, १०) आशा लावणे, ११) संशयात पाडणारे बोलणे, १२) फसवेगिरीचे बोलणे. बोलताना हे दोष टाळले पाहिजेत. मग बोलावे कसे? हे सुद्धा माऊलीनी सांगितले

साच आणि मवाळ। मितले आणि रसाळ। शब्द जैसे कल्लोळ। अमृताचे॥

खरे व मऊ, कमी पण रसाळ, जसे अमृताची वाणी. संताची भाषा अशीच आहे.

तुका म्हणे सुख पराविया सुखे। अमृत हे मुखे स्त्रवतसे॥ तु. म.

मुखी अमृताची वाणी। देह देवाचे कारणी॥ तु. म.

माझा मऱ्हाटाचि 'बोल' कवतुके। अमृतातेहि पैजा जिंके।
ऐसी अक्षरे रसीके। मेळविन॥ ज्ञाने.

नाथ सांगतात.

सत्य आणि मधुर। आइकता आल्हादकर। सर्वांशी हितत्वे साचार। बोले सनागर हरिकथा॥

काय बोलावे काय बोलू नये काही सुभाषिते

सत्यं मृदु प्रिय धीरो वाक्यं हितकरं वदेत। आत्मोत्कर्षं तथा निंदा परेषां परिवर्जयेत॥ उप.

अर्थ - सत्य, मृदु, प्रिय, धीराचे, हिताचे बोला. स्वस्तुती व परनिंदा टाळा.

सत्यं ब्रुयात प्रियं ब्रुयात न ब्रुयात सत्यम अप्रियम्।
प्रियं च नानृतं ब्रुयात यश धर्म सनातनः॥ म. स्मृती

सत्य व प्रिय बोला. सत्य आहे पण प्रिय नाही असे बोलू नका. दृष्टांत - अकबराचा एक आवडता पोपट असतो. राजाची सूचना होती पोपटाच्या मरणाची वार्ता सांगणाऱ्यास फाशी पोपट मेला. सांगणार कोण? सर्वांनी बिरबलाला पाठविला. चतुर बिरबल बोलला आपला आवडता पोपट हालत नाही, डोळे पांढरे केले आहेत. पाय वर आहेत. पंख पसरले आहेत. मग मेला म्हणा की! बिरबल बोलला हे आपण बोला.

प्रिय वाटते पण असत्य आहे असेही बोलू नका. वाचिक तप सांगताना गीता सांगते.

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं यत। स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मय तप उच्यते॥ गीता

पाणी मुद्दल झाडा जाये। तृण ते प्रसंगेचि जिये। तैसे एका बोलिले होये। सर्वाही हित॥

जोडे अमृताची सुरसरी। तै प्राणाते अमर करी। स्नाने पाप ताप वारी। गोडीही दे॥

तैसा अविवेकुही फिटे। आपुले अनादित्व भेटे। आइकता रुचि न विटे। पियुषी जैसी॥

बोलणे हे असे हवे.

वाणी उत्कर्ष १) बोलण्यापेक्षा अबोल, २) खरे बोलणे, ३) खरे व धर्माचा समावेश, ४) सत्य, देव, धर्म थोडक्या शब्दात.

संतांचे बोलणे : सहज बोलणे हित उपदेश। करुनि सायास शिकविती॥ तु. म.

तुका सहज बोले वाणी। तेथे वेदांत वाहे पाणी॥, मधुरावाणी ओटी। तुका म्हणे वाव पोटी॥

नामदेवराय म्हणतात

बोलू ऐसे बोले। जेणे बोले विठ्ठल डोले।
एक बोले सुस्पष्ट बोलावा। वाचे हरि हरि म्हणावा
संत समागमु धरावा। तेणे ब्रह्मानंद होय आघवा गा॥

बोलावा विठ्ठल पहावा विठ्ठल। करावा विठ्ठल जीवभाव॥ तु. म.

बोलणेचि नाही। आता देवाविन कांही॥ तु. म.

मतितार्थ हा, दोष टाळा व गोड बोला. गोड एक देवच आहे. (प्रिय वाक्य प्रदानेन सर्वे तुष्यन्ति जन्तवाः। तस्मात अतीप्रयत्नेन, वचने किं दरिद्रयता॥ चांगल्या बोलण्यांनी सर्व खूष होतात. म्हणून प्रयत्नपूर्वक चांगले बोला. वचनात (फुकटच्या) दारिद्रयता कां? (बोंबलणे, बरळणे, बडबडणे व बोलणे यात फरक आहे.)

★ ★ ★ ★ ★

२९ : मानवी मूल्य

चौऱ्यांशी लक्ष योनी, चार खाणी व तीन गुणी या जीवसृष्टीमध्ये मानवी देहाला फार महत्व आहे. प्रत्येक जीवास वीस लक्ष वेळा वृक्षामध्ये, नऊ लक्ष वेळा जलचर प्राण्यामध्ये, अकरा लक्ष वेळा सरपटणारे प्राणी, दहा लक्ष वेळा पक्षामध्ये, तीस लाख वेळा पशू व मानवाकरीता चार लक्ष वेळा जन्म घ्यावा लागतो. या चौऱ्यांशी लक्ष योनी. एक अभंग

भक्ति विणे जिणे जळो लाजिरवाणे। संसार भोगणे दुःख रूप ॥ १ ॥
एक एक योनी कोटी कोटी फेरा। मनुष्य देहिचा वारा मग लागे ॥ २ ॥
वीस लक्ष योनी वृक्षामध्ये घ्याव्या। जळचरी भोगाव्या नवलक्ष ॥ ३ ॥
अकरा लक्ष योनी किरडामध्ये घ्याव्या। दश लक्ष भोगाव्या पक्षामध्ये ॥ ४ ॥
तीस लक्ष योनी पशूंचिये घरी। मानवा भीतरी चारी लक्ष ॥ ५ ॥
नामा म्हणे तेव्हा नर देह या नरा। तयाचा मातेरा केला मूढे ॥ ६ ॥ नाम.

या योनीमध्ये चार खाणी आहेत. १) स्वेदज - पाण्यापासून अथवा घामापासून, २) अंडज - अंड्यापासून, ३) उद्भिज - बीजापासून, ४) जारज - वीर्यापासून. शिवाय तीन गुणी, सत्व, रज, तम. या सर्व देहामध्ये अथवा जीवामध्ये मानवास देवाने काही खास वैशिष्ट्ये दिली आहेत. याचा विचार.

१) हात फक्त मानवासच आहेत. बाकी कोणत्या योनीत हात नाहीत. कर या कोटीमध्ये याचा विस्तृत विचार केला आहे.

२) हसणे - माणूस हसतो. बाकी कोणीही हसत नाही. प्राणी, झाडे सुद्धा रडतात हे शास्त्रज्ञांनी सिध्द केले आहे. शिवाजी महाराज गेले तेव्हा त्यांचा कुत्रा रडत होता असे इतिहासात वर्णन आहे जो मोठ्याने हसतो त्यास हृदय विकाराचा झटका येत नाही. मोठयाने हसतो तो मोकळ्या मनाचा असतो. स्मित करतो तो आतल्या गाठीचा समजला जातो. हसण्यांचे बरेच प्रकार आहेत. १) स्मित हास्य, २) विकट हास्य, ३) कुत्सित हास्य वगैरे. माणूस दिसायला अगदी काळा पत्थर असला, पण चेहऱ्यावर हास्य असेल तर त्याच्याकडे पाहून समाधान वाटते. या विरुद्ध दिसायला देखणा असून जर कधीच हसत नसेल तर त्याच्याकडे पाहून वाईट वाटते. शिवाय हसण्यास पैसा पडत नाही ही दैवी देणगी आहे. विठ्ठलाच्या चेहऱ्यावर हास्य आहे. "सदय धवल हासं विठ्ठलं चिंतयामी" अथवा "गवां वृन्दकानन्दनं चारुहासं, परब्रह्म लिंगं भजे पांडुरंगम ॥" शंकराचार्य चारु म्हणजे गोड हास्य, राम प्रभू चौदा वर्षे वनात निघाले. अनवाणी व वल्कले धारण केलेले. पण चेहऱ्यावर सतत हास्य होते. लोक रडत होते. एकाने विचारले प्रभू एवढे मोठे संकट पण आपल्या चेहऱ्यावर हास्य कसे? प्रभू म्हणाले, मी जर रडत वनात निघालो तर पिताजी म्हणतील माझ्या वचनाकरीता वनात निघाला पण रडत, म्हणून मी मागे पाहून रडू शकत नाही. पुढे पाहून

रडू शकत नाही कारण रावण विचार करेल मला मारण्याकरीता राम निघाला पण रडत रडत, वर पाहून रडू शकत नाही कारण सूर्य म्हणेल माझ्या वंशात रडका राजा निपजला, खाली पाहून रडलो तर सासूबाई म्हणतील, रडका जावई मिळाला. म्हणून मी हसत वनात जात आहे. हसा, मात्र फसू नका. कारणाशिवाय हसला तर लोक वेडा म्हणतील.

३) उभा - माणूसच उभा आहे. बाकीच्या योनीमध्ये देह आडवे आहेत. वृक्ष उभा आहे पण अचल आहे. मानव उभा व चल आहे. माणसासच देवांनी उभा कां केला? कदाचित देवास वाटले असावे हा पुढे निवडणुकीस उभा राहील म्हणून आताच उभा करुन ठेवावा. उभा या शब्दाचा अर्थ तत्पर. मानवच सगळ्या गोष्टीत तत्पर राहू शकतो. पशूपक्षी इतके तत्पर नसतात. आमचा विठोबा उभा आहे. "सुंदर ते ध्यान 'उभे' विटेवरी। कर कटावरी ठेवोनिया ॥" तु. म. उभा का? भक्त हाक मारील तेव्हा तत्परतेने धावण्याकरीता. कारण झोपलेल्या, बसलेल्या पेक्षा उभा लवकर धावतो. मानवा देव मिळविण्याकरिता तत्पर रहा म्हणून देवाने तुला उभा केला आहे.

४) बोलणे - बोलणे हे माणसांचे वैशिष्ट्य आहे. बोलण्यामुळे माणसाने फार प्रगति केली आहे. जो चांगले बोलतो तो पुढारी होतो व जगात चमकतो. म्हणून "शतेषु जायते शूरः, सहस्त्रेषु पंडितः। वक्ता दशसहस्त्रेषु, दाता भवति वानवा॥ दहा हजारात एखादा वक्ता असतो. पोपट बोलतो पण काय बोलतो हे त्याचे त्यास समजत नाही. एका पोपटास एका माणसाने "यात काय संशय" हे वाक्य शिकविले होते. पोपट बाजारात विक्रीस आणला. एका हौशी माणसाने विचारले पोपटाची किंमत काय? त्याने सांगितले दोन हजार रुपये. पोपटाची किंमत २ हजार रुपये? तो बोलला हा काही सामान्य पोपट नाही. हा बोलतो. पोपटवाल्याने पोपटास विचारले काय रे पोपटा तुझी दोन हजार किंमत आहे की नाही? पोपट बोलला "यात काय संशय" हौशी माणसाने पोपट खरेदी केला. गावात आला. चौकात काही मंडळी बसली होती. एकाने विचारले बाळू पोपट किती किंमतीचा? बाळू बोलला हा सामान्य पोपट नाही. दोन हजार मोजलेत. हा पोपट बोलतो. एक धूर्त माणूस बोलला पोपटा, हा दोन हजार किंमत देऊन फसला आहे की नाही? पोपट बोलला, 'यात काय संशय.' माणसाने बोलून विचारात पडण्यापेक्षा विचार करुन बोलावे.

५) ज्ञान - मानवास देवाची ज्ञान ही देणगी आहे. बाकीच्या योनीना मर्यादित ज्ञान आहे. कोणत्या मर्यादा?

आहार निद्रा भय मैथूनंच, सामान्य एतत् पशुभीः नरानाम॥
ज्ञानोहि तेषां अधिको विशेषोः ज्ञानेन हिनः पशुभीः समानः॥ भागवत

आहार, निद्रा, भय, मैथून या बाबतीत मानव व पशु यामध्ये विशेष भेद नाही. विशेष आहे ज्ञान. नाथ महाराज म्हणतात (वरील श्लोकाचे भाषांतरच आहे.) "आहार निद्रा भय मैथून। सर्व योनीसी समसमान। मनुष्य देहिचे ज्ञान। अधीक जाण सर्वाशी॥ प्रश्न निर्माण होतो

कोणते अधिक ज्ञान? तर भजनाचे ज्ञान. "याच जन्मी घडे देवाचे भजन। आणिक हे ज्ञान नाही कोठे॥" तु. म. पशू पक्ष्यांना बायको असते. मुले असतात. कदाचित माणसापेक्षा ते सुखी आहेत कारण बायकोची हौस पुरविण्याची त्यांना गरज नसते व मुलांच्या शिक्षणाची काळजी नसते. पण पशू पक्षी भजन करत नाहीत. कुत्रा एकादशी करत नाही. गाढवांची दिंडी नसते. हे सर्व मानव करतात कारण हे विशेष ज्ञान त्यांनाच आहे.

६) लाज - लाज सुद्धा फक्त माणसासच आहे. कारण मानव कपडे वापरतो. पशू पक्षी आपले विधी कुठेही करतात. कारण त्यांना लाज नाही. पशूपक्षांना जर लाज असती तर त्यांनी कपडे वापरले असते व गिरणी कामगारांचा संप यशस्वी झाला असता. पुरुषापेक्षा लाज हे भूषण स्त्रियांना जास्त शोभते. मात्र चांगल्या गोष्टीची लाज धरु नये. लाज धरावी निषिद्ध कर्माची. नाथ महाराज सांगतात 'केवळ अवयव झाकणे। येथ लज्जा कोण म्हणे। गेलीयाही जीवे प्राणे। अकर्म न करणे ते लज्जा॥' जीव गेला तरी अकर्म न करणे ते लज्जा, दारु पिणे, जुगार खेळणे, वेश्यागमन, खोटे बोलणे याची लाज वाटावी. भजनात टाळी वाजविण्याची लाज नसावी. एक सुसंस्कृत माता लग्न झालेल्या मुलीस सांगते

निज कन्येशी शिकवी माता। लाज धरावी लोका देखता।
एकांता मिळाल्या कांता। लाज सर्वथा सोडावी॥ नाथ.

या चार ठिकाणी लाज नसावी.

धनधान्य प्रयोगेषु विद्यासंग्रहणेषुच।
आहारे व्यवहारेच त्यक्त लज्जाः सुखी भवेत॥ सुभा.

अर्थ - धनधान्य मिळविण्यासाठी, विद्या संपादन करण्यासाठी, जेवताना व व्यवहारात जो लाज बाळगत नाही तो सुखी होतो.

७) स्मरण - माणसांनीच देवाचे स्मरण करावे.

जन्मोनिया कुळी वाचे 'स्मरे' राम। धरी हाचि नेम अहर्निशी॥ तु. म.

तुका म्हणे धरी 'आठव' या देही। नाही तरी काही बरे नव्हे॥ तु. म.

बाकी योनीत स्मरण करता येत नाही. शिवाय फायदा नाही. स्मरण म्हणजे जे मरणावरोबर येते ते. शरीरासह सर्व येथेच राहणार.

धनानी भूमौ पश्वश्च गोष्ठे, भार्या गृहद्वारे जनः स्मशाने।
देह चितायां परलोक मार्गे, कर्मानी गो गच्छति जीव एकः॥ सुभा.

अर्थ - मरताना धन भूमीत अथवा बँकेत राहते. पशु गोठ्यात, कार कारशेडमध्ये, वायको दारापर्यंत, जन स्मशानापर्यंत. देह चितेत जळतो. मग बरोबर काय येते. केलेले कर्म म्हणजे देवाचे स्मरण. मात्र स्मरण सतत हवे यासच आठवण अथवा चिंतन म्हणतात. चांगले मरण हवे

असेल तर देवाचेच स्मरण करा. "त्रिद ज्याचे जगदानी। तोचि मनी स्मरावा॥"

दुखमे सुमिरण सब करे, सुख मे करे न कोय।
सुख मे सुमिरण जो करे दुख काहे का होय॥ कबीरजी

कबीर एका विहीरीवर पाणी पिण्याकरिता गेले होते. एक बाई नथ घालून आली होती. ती इतर बायकांना नवऱ्याचे कर्तृत्व व सोनाराची कला सांगत होती. कबीर मनात म्हणाले. हिला नाक देणाऱ्यांचे स्मरण कसे नाही.

नथनी दी जिस यार ने सुमरत बारबार।
नाक दिया जिस यार ने उसे भुल गयी नार॥

तात्पर्य - देवाचे स्मरण करा व मरण सुधारा.

८) या देहाचि इच्छा देव करतात.

इहलोकीचा हा देह। देव इच्छिताते पाहे॥ तु. म.

कोणते देव?

स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा। मृत्यूलोकी व्हावा जन्म आम्हा॥ तु. म.

ज्या देहाचि प्राप्ति। इंद्रादिक देव वांछिती।
वेद वाणी ज्या देहाची किर्ती। निज मोक्ष प्राप्ति नरदेही॥ नाथ.

फक्त इंद्रादी देव नाही. ब्रह्मदेव सुद्धा याची (या देहाची) इच्छा करतात.

आस करिती ब्रह्मादिक। देखोनि बाळवंटीचे सुख।
धन्यधन्य मृत्युलोक। म्हणती भाग्याचा केसा॥ तु. म.

असे या देहात काय आहे? तसे देवांचे देह दिव्य आहेत. देवांच्या देहाची सावली पडत नाही. देव डोळ्याची पापणी झाकत नाहीत. देव जमिनीस पाय टेकत नाहीत. नल दमयंती विवाह प्रसंगी नलाचे रुप घेऊन आलेल्या सर्व देवांना दमयंतीने ओळखले व नलाच्या गळ्यात वरमाला घातली. देवांचे देह मल मूत्र विरहित असतात. असे असताना या घाणेरड्या देहाची देव इच्छा कां करतात? याचे एकच कारण या देहात भजन करुन अथवा ज्ञान मिळवून मुक्त होता येते. दृष्टांत - एखाद्या माणसाने आपणास एक किलो चांदी व एक किलो लोखंड यापैकी एक घ्या सांगितले तर आपण चांदीच स्विकारणार. पण आपल्याकडे जर परिस असेल तर लोखंड घेणार. तसे देवाकडे दिव्य देह आहे पण मुक्त होता येत नाही. पशूपक्षांना मुक्त होण्याचा अधिकार आहे पण ज्ञान नाही. देवांना या देहाचे ज्ञान आहे पण अधिकार नाही. मात्र मनुष्यास ज्ञान व अधिकार दोन्ही आहेत.

मनुष्य देहिचेनी ज्ञाने। सच्चिदानंद पदवी घेणे।
एवढा अधिकार नारायणे। कृपावलोकने दिधला॥ नाथ.

या करीता देव या देहाची इच्छा करतात.

९) या देहाने देव होता येते.

शरीर उत्तम चांगले। शरीर सुखाचे घोसुले।
शरीरे साध्य होय केले। शरीरे साधीले 'परब्रह्म'॥ तु. म.

नरदेह निधान लागले हाती। उत्तम सार उत्तम गती।
देवचि होईन म्हणती ते होती। तरी कां चित्ती न धरावे॥ तु. म.

गळती लागे अपाय मोठे विरळा जाणे हेचि खुण।
नरदेही अवचितु साधकु होय नारायण।
परमानंदे गळती गळे पाचही तत्वे हारपोन॥ ज्ञान.

पशुका होत पन्हया नरका कछु न होय।
एक बार नर करणी करे, नरका नारायण होय॥ कबीरजी

तात्पर्य नारायण व्हायचे प्रत्येकाच्या हातात आहे. नर शरीरामुळे नारायण व्हा अथवा 'वानर' व्हा. ज्ञानदेव, चांगदेव, नामदेव सर्व संत या देहामुळे 'देव' झाले.

१०) नर शरीरच मुक्तीचे द्वार आहे. या शरीराद्वारेच मुक्त होता येते. ''येणेचि शरीरे। शरीरा येणे सरे। किंबहुना येरझारे। चिरा पडे॥ ज्ञाने. ''भ्रमणा पाऊले वेचिताचि वाव। प्रवेशाचा ठाव एका द्वारे॥ तु. म. पूर्वी नगरास सभोवती भिंत असायची व एकच प्रवेशद्वार असे. तद्वत चौऱ्यांशी लक्ष योनीतून फक्त याच नरदेहाद्वारे या फेऱ्यातून बाहेर पडता येते.

११) ही कर्मभूमी आहे. 'कर्मभूमी ऐसा ठाव। व्यवसाव जाणावा॥' तु. म. इथूनच नरकास, स्वर्गास अथवा वैकुंठास जाता येते. हे जंक्शन स्टेशन आहे. शंभर यज्ञ करून इंद्र व्हा अथवा शंभर ब्राह्मणांचे जन्म घेऊन, षडकर्मे करून ब्रह्मदेव व्हा. वाईट कर्मे करून नरकास जा. अथवा भजन करून वैकुंठ गमन करा.

जे ज्ञान तयाच्या हाती। तोचि समर्थ मुक्ति। जैसी शतमख संपत्ति। स्वर्गीचिया।
कां शत एक जन्मा। जन्मोनि ब्रह्मकर्मा। करी तोचि ब्रह्मा। आन नोहे॥ ज्ञाने.

केले होय 'याचि जन्मे'। अवघे विटोबाच्या नामे।
तुका म्हणे कर्मे। जाळोनिया तरशी॥ तु. म.

१२) ही पापपुण्य भूमी आहे.

वाहतेनि भौतिके। पापपुण्य येथ पिके।
म्हणोनि आम्ही कवतुके। क्षेत्र म्हणो॥ ज्ञाने.

याचा विस्तार 'पापपुण्य' कोटीत सविस्तर आहे.

१३) मानव सर्व सुख अधिकारी आहे. सर्व सुख म्हणजे पूर्ण सुख या देहामुळेच मिळते.

''सर्व सुखा अधिकारी। मुखे उच्चारी हरिनाम॥'' तु. म.

बरवे झाले आलो या जन्मासी। जोड जोडिली मनुष्य देहा ऐसी।
महालाभाची उत्तम राशी। जेणे 'सर्व सुखासी पात्र होईजे॥' तु. म.

तरी अवधान एकले दिजे। तेणे 'सर्वसुखासी' पात्र होईजे।
हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड आईका॥ ज्ञाने.

अशा अधिकाराचा जो फायदा घेत नाही तो करंट्या कपाळाचा म्हणावा. 'करंटे कपाळ ज्याचे नाम नये वाचे॥' ज्ञान.

एक दृष्टांत पाहून कोटी पूर्ण करु. शिर्षक आहे 'अधिकार'. एकदा यमलोकात यमराज हत्तीस म्हणाला एवढासा छोटा माणूस पण एवढ्या मोठ्या हत्तीवर अंकुश ठेवतो. हत्तीस राग आला. म्हणाला, यमराज आपण आतापर्यंत मेलेली माणसे आणली एकदा जिवंत माणूस आणा. यमराजांनी यमदूतांना हुकूम दिला मृत्यूलोकांत जा व जिवंत माणूस घेऊन या. यमदूत गेले व रात्री एका हुशार कवीस, जो घराबाहेर खाटल्यावर झोपला होता. त्यास घेऊन आले खाटल्यासह! त्या जिवंत माणसाने पाहिले हा यम दरबार आहे. त्याने एक चिठ्ठी लिहिली व यमदूताकरवी यमराजास दिली. चिठ्ठी वाचता क्षणीच यमराज आले. जिवंत माणसाची कपडे बदलून त्यास स्वतःच्या आसनावर बसवून त्याची सेवा करु लागले. यमराजाचे काम होते पापपुण्याचा निवाडा करून वर किंवा खाली नरकात पाठविणे पण या नवीन यमराजाने सर्वांना वैकुंठात पाठवायला सुरुवात केली. मग तो कोणीही असो! वैकुंठामध्ये गर्दी होऊ लागली. विष्णू खाली आले. कारण कधीतरी एखादा माणूस वैकुंठात येत होता. ''कहीं एकाधेनी वैकुंठा जावे। ते तिही वैकुंठचि केले आघवे॥'' ज्ञाने. असा कोण महात्मा भूतलावर अवतीर्ण झाला आहे याची चौकशी करण्याकरीता विष्णू यम दरबारात आले. पहातात तो एक माणूस गादीवर बसलेला व यमराज त्याची सेवा करतो आहे. यमराजास बोलाविले व विचारले हा कोण? यमराजाने चिठ्ठी दाखविली त्यात लिहीले होते. ''यमराज आपली मुदत संपली आहे. आपण गादी खाली करून या माणसास बसवावा व आपण त्याची सेवा करा.'' इति विष्णू. ही बनावट चिठ्ठी दिसते. मी कोणास चिठ्ठी दिली नाही. त्या जिवंत माणसास बोलविले. तू कसा आलास व ही बनावट चिठ्ठी कां लिहिलीस? जिवंत माणूस म्हणाला मी आलो नाही. मला आणले. माझ्या अक्कल हुशारीने गादी मिळिवली व या गादीचा भरवसा नसल्यामुळे अधिकाराचा योग्य उपयोग करून सर्वांना वैकुंठास पाठविले. विष्णू बोलले. ठिक आहे. तू खाली जा. मानव बोलला गीतेत असे वचन

आहे.'यत् गत्वा न निवर्तन्ते तद्धाम परमं मम ।।' हे वचन खोडा. 'जो एकदा देवास मिळाला तो खाली जात नाही वर येतो' देव म्हणाले गीता तशीच राहू दे तू वर चल. मानव बोलला या हत्तीमुळे मी वर आलो त्यास बरोबर घ्या. विष्णू म्हणाले त्याचे तेवढे पुण्य नाही. मानव बोलले एक हत्ती आपण अगोदर नेला आहे. "भक्तिचेनि नावे। चतुष्पादादि आघवे। वैकुंठीचिया राणिवे। योग्य केले ।।" ज्ञाने.

आपण गजेंद्र नेला. हा जड होतो काय? विष्णू बोलले दोघेही चला हत्ती निघाला पण यमराजाकडे पाहून बोलला "पाहिला कां जिवंत माणसाचा प्रताप" यमराज वरमले.

तात्पर्य मानव जन्म दुर्लभ आहे. देवाने खास अधिकार दिले आहेत त्याचा योग्य वापर करा व सर्व सुख प्राप्त करून घ्या.

★ ★ ★ ★ ★

३० : देह दोष

मागच्या कोटीमध्ये देहाचे गुण पाहिलेत या कोटीमध्ये देहाचे दोष पहायचे आहेत. दोष याकरीता पहायचे याची आसक्ति नसावी. मी म्हणजे देह व देह संबंधीत माझे या मी माझ्यामुळे आपण करोडो जन्म, जन्म मरणांच्या फेऱ्यात फिरत आहे.

अहं ममतेच्या लवडसवडी। माते न पवतीच बापुडी।
म्हणोनि जन्ममरणाच्या दुथडी। डहुळती ठेली ।। ज्ञाने.

१) देह जन्माला आल्यावरोवर याचा विटाळ पाळावा लागतो व मरणानंतर तेरा दिवस सुतक धरावे लागते. 'शरीर विटाळाचे आळे' असे तुकोवाराय म्हणतात.

२) ज्या मातेच्या उदरात या देहाचि निर्मिती होते ती जागा अतिशय घाणेरडी असते. माऊली सांगते.

मातेचिया उदर कुहरी। पचोनि विष्ठेच्या दाथरी।
उकडोनि नवमास वरी। जन्मजन्मोनि मरती ।। ज्ञाने.

३) जो देह जन्मतो तो तरी चांगला असावा. नाही, देहासारखा घाणेरडा पदार्थ जगात दुसरा नाही. विष्ठेस माणूस शी शी म्हणतो. पण ती विष्ठा म्हणते मूर्खा मी काल परवा जिलेवी, लाडू होते. मला पाहून लोक जिभल्या चाटत होते. पण तुमच्यातील एका माणसाने माझा अंगीकार केला व मला ही अवस्था प्राप्त झाली मग घाणेरडा कोण? देहास मुख्य नऊ द्वारे आहेत. या नऊ द्वारापैकी एकाही द्वारातून चांगला पदार्थ बाहेर येत नाही. एखाद्या गटारात केळी टाकली तर चार दिवस चांगली राहील. पण नाका खालच्या गटारात टाकल्यास दुसऱ्या दिवशी नरक होतो.

४) हा देह क्षणभंगूर आहे. याचा उद्याचा भरवसा नाही.

क्षणभंगूर हे जाय न कळता। ग्रास गिळो सत्ता हाती नाही ।। तु. म.

क्षणभंगूर नाही भरवसा। व्हारे सावध तोडा माया आशा ।। तु. म.

हे काळा नळाच्या तोंडी। पडली लोनियाची उंडी।
माशी पाख पाखडी। तव हे सरे ।। ज्ञाने.

एकदा धर्मराजाकडे एक याचक रात्री आला व याचना केली. पण धर्मराजाने त्यास सकाळी यावयास सांगितले. याचक नाराज होऊन निघाला वाटेत भीमदादा भेटले. त्याने याचकास विचारले. आपण कुठे गेला होता? त्याने सांगितले धर्मराजाकडे, एक वस्तू मागण्या करीता. मग? धर्मराज बोलले सकाळी या. भीम याचकास घेऊन नगराच्या चौकात नगारा वाजवू लागले जो काही विपरित घडल्यानंतर वाजवायचा असतो. नगरवासी जमले. धर्मराजपण धावत आले. सर्वांनी विचारले असं काय आश्चर्य घडले. भीम बोलले, 'आमच्या दादास सकाळपर्यंत जगण्याची खात्री आहे. अर्थात ही देवाच्या कायद्यात ढवळाढवळ आहे. धर्मराज वरमले, शहाण्यास शब्दाचा मार. एक म्हण आहे. 'शहाण्यास एक वात, मूर्खास सारी रात' अर्थात धर्मराजांनी याचकास त्याच रात्री दान दिले.

५) हा देह नाशिवंत आहे.

हा देह नाशिवंत मळ मुत्राचा बांधा। ज्ञान. मदालसा

नाशिवंत देह जाणार सकळ। आयुष्य खातो काळ सावधान ।। तु. म.

६) या देहासारखी नाजूक वस्तू क्वचित मिळेल. ठेच लागली, फक्त छोटेसे रेझर फिरविले, थोडेसे विष पोटात गेले (सायनाईड सारखे जहाल विष) तर माणूस लगेच गतप्राण होतो. हे शरीर काचेचे भांडे आहे. दगड लागला तर फुटून जाते. 'यह तन काच्या कुंभ है लिये फिरे ज्यूँ हात। ढबका लागी फुट गया कछु ना आया हात ।।' तुलशीदास

७) हे रोगाचे भांडार आहे.

शरीर दुःखाचे कोटार। शरीर रोगाचे भांडार।
शरीर दुर्गंधीची थार। नाही अपवित्र शरीरा ऐसे ।। तु. म.

शास्त्रात ३० हजार रोग सांगितले आहेत तरी सुद्धा सध्या कमी वाटतात. डॉक्टर वाढताहेत तसे रोगपण वाढताहेत.

८) मेल्यानंतर या शरीराचा काहीच उपयोग नाही. सध्या नेत्रदान होते. पण क्वचित ठिकाणी.

पशुका होत पन्हया नरका कछु ना होय।
एक बार नर करनी करे नर का नारायण होय। कबीरजी

९) हे मायावी आहे. मायावी म्हणजे अगोदर नाही नंतर पण नाही. मध्ये फक्त आहे त्यास मायावी म्हणतात. बायको, मुले देह हे सर्व मायावी आहेत. जसे मृगजळ सकाळी नाही संध्याकाळी नाही फक्त मध्ये भासते. देहास 'संसार' पण अनेक ठिकाणी म्हटले आहे. "ये मार्गे आलिया वोळंगा शारंगधरु। नाही तरी संसारु वाया जाईल रया॥" ज्ञान. माऊली याच स्वरूप सांगतात.

ब्रह्मगिरीहुनि न निघे। आणि समुद्रिही किर न रिघे॥
माजी दिसे वावूगे। मृगांबु जैसे॥ ज्ञाने.

तैसे आद्यंती किर नाही। आणि साचचि नोहे कही।
परी लटीकेपणाची नवाई। पडी भासे गा॥ ज्ञाने.

१०) हा देह पाच तत्वांचा उसना आणलेला आहे.

देह तंव पाचांचा आणिला उसना। शेखी ज्याचा त्याला देणे असे॥ तु. म.

क्षिती जल पावक गगन समीरा। पंच रचित अति अधम सरीरा॥ तुलशी.
पंच भूतांचा गोंधळ। केला एके ठायी मेळ॥ तु. म.

मेल्यानंतर ही भूते आपापल्या तत्वात विलीन होतात.

११) हे शरीर षड्विकारयुक्त आहे.

१) अस्ति, २) जायते, ३) वर्धते, ४) विपरिणमते, ५) अपक्षियते, ६) नश्यति.

अर्थ - १) गर्भस्थ होतो, २) जन्मतो, ३) वाढतो, ४) तरुण होतो, ५) म्हातारा होतो, ६) नाश पावतो.

हे मला सापडलेले ११ दोष आहेत.

माऊली 'घोंगडी' या अभंगात वर्णन करतात.

"काम कर्म अविद्या त्रिगुण पंचभूताने विणली रे॥
रक्त रेत दुर्गंधी जंतु नरक मुताने भरली रे॥
षड् विकार षड्वैरी मिळोनि तापत्रयाने विनली रे॥
नवा ठायी फाटुनी गेली ती त्वा आम्हांशी दिधली रे॥

नाथ महाराज म्हणतात. याच्यासारखे चांगले नाही. शिवाय या देहासारखे वाईटपण नाही चांगले म्हणून विषयाचा उपभोग घेऊ नका. वाईट म्हणून त्याग करु नका. मग काय करावे? याचा उपयोग परमार्थाकरीता करावा. नाथ महाराजांच्या शब्दात

देहा ऐसे वोखटे। पृथ्वीमाजी नाही कोटे। देहा ऐसे गोमटे। पाहता न भेटे त्रिलोकी।
वोखटे म्हणोनि त्यागावे। तै मोक्ष सुखासी नागवावे।
कां गोमटे म्हणोनि भोगावे। तै आवश्य जावे नरकासी॥

तरी हे त्यागावे ना भोगावे। मध्यभागी विभागावे।
आत्मसाधनी राखावे। निजस्वभावे हितालागी॥

★ ★ ★ ★ ★

३१ : मानव महत्व

देवाने मानवापेक्षा पशूपक्षांना काही गुण जास्त व चांगले दिले आहेत. त्याचा थोडा विचार.

अ) पशू पक्षी यांची उपमा त्या त्या क्षेत्रात माणसास दिली जाते.

१) कोकीळेसारखे गायन	२) हत्तीसारखा जाडपणा
३) कुत्र्यासारखी झोप	४) मोरासारखे नाचणे
५) गाढवासारखे ओझे वाहणारा	६) कावळ्यासारखी नजर
७) सापाच्या कानाचा	८) पोपटासारखे बोलणारा
९) राजहंसासारखे चालणे	१०) शेळीसारखे चरणे
११) कोल्ह्यासारखा लबाड	१२) चातकासारखा आतूर

ब) काही गुण देवांचे जे माणसापेक्षा जास्त आहेत.

१) इंद्रासारखे 'वैभव' कोणास नाही.	२) कुबेरासारखे 'धन' कोणाजवळ नाही.
३) गंधर्वासारखे 'गायन' कोणी करु शकत नाही.	४) गणेशासारखा 'मान' कोणास नाही.
५) अश्विनीकुमारास 'वैद्यराज' म्हणतात.	६) सूर्य सर्वांत 'तेजःपुंज' आहे.
७) चंद्र सर्वापेक्षा 'शितल' आहे.	८) मेघ सर्वापेक्षा 'उदार' म्हटला जातो.
९) कामदेवासारखे 'सौंदर्य' कोणात नाही.	१०) ब्रह्मदेवासारखा ज्ञानी कोणी नाही.

तथापि पशू, पक्षी, किटक या खालच्या योनी व ब्रह्मदेवापर्यंत वरच्या योनी या पेक्षा मानवात सर्वांत मोठा गुण, जो देवांनी खास दिला तो, या मानव देहाने देव बनून मुक्त होता येते.

★ ★ ★ ★ ★

३२ : मिळाला कळाला

मानव देहाचे महत्व कळण्याकरिता कोटी.

१) पशू-पक्षांना मानव देह मिळाला नाही व कळालासुद्धा नाही.

२) इंद्रादिक देव यांना या देहाचे महत्व कळले. म्हणून ते हा देह मिळावा अशी इच्छा करतात. 'स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा। मृत्युलोकी व्हावा जन्म आम्हा॥" तु. म. पण त्यांना हा देह त्यांचे पुण्य संपल्याशिवाय मिळत नाही, पुण्य संपल्यानंतर मानव देह मिळेलच याची खात्री

नाही. कदाचित त्यांच्या कर्माप्रमाणे पशू पक्षी, किटक यांचा पण देह मिळू शकतो.

३) साधूसंतांना हा देह मिळाला व कळालासुद्धा कारण त्यांनी या देहाचा प्रत्येक क्षण परमार्थाकरीता खर्च करुन मुक्त झाले.

साधू संत गेले आनंदी राहिले। हरिनामे झाले कृतकृत्य ॥ नाथ.

४) मात्र काही (बहुतांशी) मूर्ख माणसांना हा देह मिळाला पण कळाला नाही. कारण या देहाचा वापर ते अनाठायी करतात म्हणून. वस्तू मिळणे यास महत्व नाही. ती कळणे महत्वाचे. तुकोबाराय एक दृष्टांत देतात. एका मेंढपाळास एक चिंतामणी सापडला. पण तो न कळल्यामुळे त्याने आपल्या आवडत्या शेळीच्या गळ्यात बांधला. एक रत्नपारखी रस्त्याने जात असता त्याने शेळीच्या गळ्यात चिंतामणी पाहिला. तो मेंढपाळास म्हणाला शेळीच्या गळ्यातील दगड आपण १० रुपयास देणार कां? तो म्हणाला बायकोस विचारतो. बायको हुशार होती. संसारात दोघे हुशार असून जमत नाही. भांडणे होण्याची शक्यता असते. दोघे बुद्धू असल्यास संसार रसातळास जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. हा मेंढपाळ थोडा बुद्धू होता. बायकोने विचारले किंमत कोणी गेली? तो बोलला त्या माणसाने. ती बोलली १० रुपयास तो मणी द्यायचा नाही. रत्नपारखी बोलला १०० रुपये, १००० रुपये, १०,००० रुपये देतो. शेवटी बायको व मेंढपाळ बोलला मणी द्यायचा नाही. रत्नपारख्यास त्यांच्या अज्ञानाची किव आली व बोलला हा मणी सामान्य नाही. या पासून पाहिजे ते मिळेल.

कां चिंतामणी आलीया हाती। सदा विजयवृत्ती मनोरथी आशा।
तैसा मी पूर्ण काम श्रीनिवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे ॥ ज्ञाने.

पण याचे महत्व न कळल्यामुळे तुम्ही यास शेळीच्या गळयात बांधला आहे. "तुका म्हणे चिंतामणी शेळी गळा। पावे अवकळा म्हणोनिया ॥" हा देह चिंतामणी आहे. तुकोबाराय सांगतात.

सकळ चिंतामणी शरीर। जरी जाय अहंकार समूळ।
निंदा हिंसा नाही कपट देहबुद्धि। निर्मळ स्पटिक जैसा ॥

हा देह कशाकरीता वापरता त्यावर त्याची किंमत तुम्हास किती समजली हे लक्षात येते. (व्यसनात, संसारात, समाजसेवेत अथवा संत सेवेत)

एकदा एका गुरुने शिष्यास एक किंमती हिरा दिला व सांगितले बाजारात जा व याची फक्त किंमत विचारुन ये. विकू नकोस. शिष्य बाजारात गेला एका भाजीवालीस हिरा दाखविला. तिने सांगितले चकाकणारा खडा आहे. मुलांना खेळण्यास चांगला आहे. दोन जूडी भाजी देते. शिष्य एका धान्याच्या दुकानदाराकडे गेला. तो मारवाडी होता. त्याने सांगितले एक पोते तांदूळ देईल. त्याला वाटले हिऱ्यासारखा खडा दिसतो. शिष्य सोनाराकडे गेला. सोनाराने हिरा पाहिला व

दहा हजार रुपये देतो बोलला. त्याने ओळखले हा हिरा आहे. पण याची नक्की किंमत करता येत नाही. पण दहा हजार द्यावयास काही हरकत नाही. शिष्य शेवटी जवेरी बाजारात हिऱ्याच्या पेढीवर गेला. हिरापारखी बोलला याची १ लाख किंमत मिळेल. शिष्य परत गुरुकडे आला व ४ ठिकाणच्या किमती सांगितल्या गुरु म्हणाले अरे, मानव याची किंमत अशीच करतात. व्यसनात आयुष्य घालवितात, भाजीवाली सारखी किंमत. गाढवासारखे संसारात राबतात एक पोते तांदळाची किंमत. सोनाराचे दहा हजार म्हणजे या देहास समाजसेवेकरिता देतात. पण खरी किंमत संतसेवा अथवा देव सेवा. कारण हा देह देवाने भजनाकरीताच दिला आहे.

देवे दिला देह भजना गोमटा। तया झाला फाटा वायीकेचा ॥ तु. म.

तात्पर्य देहाची किंमत ओळखा व परमार्थाकडे उपयोग करा.

★ ★ ★ ★ ★

३३ : मानव प्रकार

या जीव सृष्टीत भेद आहेच. अर्थात मायेचा प्रभाव म्हणून. माया तीन गुणात आहे. मात्र देव व संत गुणातीत असल्यामुळे माणसांचे चार प्रकार पडतात.

१) स्वार्थी, २) ना स्वार्थ ना परार्थ, ३) स्वार्थ व परार्थ, ४) परार्थी

याचा थोडा विस्तारपूर्वक विचार करायचा आहे.

१) स्वार्थी - यास 'धूर्त'सुद्धा म्हणता येईल. दुसऱ्याचे घर जळले तरी चालेल पण याचे वांगे भाजले पाहिजे. ही ज्याची वृत्ती तो स्वार्थी अथवा धूर्त माणूस. समाजात याचेच प्रमाण वाढत चालले आहे. माऊली यांचे वर्णन करतात.

तैसा मना वाचे काये। भलतया दुःख देत जाये।
'स्वार्थ' साधीता न लाहे। पराचे हित ॥ ज्ञाने.

दृष्टांत - एका राजकीय उमेदवाराच्या प्रचाराच्या सभेस मोठी गर्दी झाली होती. एके ठिकाणी एक दाढीवाला बसला होता. त्याच्या शेजारी एकास विडी ओढावयाची होती. त्याने माचिस काढली. अशा सभेत काही मर्यादा नसतात. कीर्तनात, प्रवचनात मात्र तंबाखू खायची नसते. विडी ओढायची नसते. किंबहुना कार्यक्रम संपेपर्यंत जाग्यावरुन हलायचे नसते. पेपर वाचायचा नसतो. पण पुढाऱ्यांना फक्त मते हवी असतात. मग तुम्ही काहीही करा. विडीवाल्याच्या माचीसमध्ये एकच काडी होती. गर्दीमध्ये त्याने ती ओढली पण चुकून दाढीवाल्याच्या दाढीस लागली. तो दाढी विझवू लागला. पण विडीवाला बोलला थोड थांबा विडी पेटवितो मग दाढी विझवा अर्थात त्याची दाढी जळाली तरी चालेल पण याची विडी पेटली पाहिजे. धूर्ताचे लक्षण शास्त्रामध्ये सांगितले आहे.

मुखं पद्मदलाकारं वाणी चंदनशितला।

ह्रदयं क्रोध संयुक्तं धूर्त एव लक्षणम्॥ सुभा.

अर्थ - ज्याचे मुख कमळाप्रमाणे आहे. वाणी चंदनासारखी शीतल आहे. पण हृदयात क्रोध धडधडत असतो. त्यास धूर्त म्हणतात.

२) ना स्वार्थ ना परार्थ - यास मूर्खपण म्हणता येईल. याला स्वतःचे अथवा दुसऱ्याचेपण हित समजत नाही. काही कामगार चांगला पगार घेऊन व्यसनाधिन असल्यामुळे स्वतः सुखी नसतो. अर्थात बायकोचा, मुलांचापण विचार करीत नाही. यांना मूर्ख म्हणतात. मुर्खाची पाच लक्षणे आहेत.

मुर्खश्च पंच चिन्हानी गर्वो दुवर्चनं तथा।

क्रोधश्च दृढवादश्च परवाक्येष्व अनादरः॥

अर्थ - मुर्खाची पाच लक्षणे, जो गर्व करतो, वाईट बोलतो, क्रोधी असतो. नेहमी वाद घालतो व दुसऱ्याच्या वाक्याचा अनादर करतो. माऊली दृष्टांत देतात.

माशी आपणयाते गिळवी।परी पुढीला वांती शिणवी।

ते कश्मळ आटवी।आचरण गां॥ ज्ञाने.

अर्थ - माशी जेवताना ज्याच्या घशात जाते त्यास वांती होते व ती सुद्धा मरते. अशी काही माणसे आहेत

अंगभरे सुटला धोंडा।आपण फुटोनी होय खंडखंडा।

कां आड आलिया रगडा।करी जैसा॥ ज्ञाने.

अर्थ - डोंगरावरुन एखादा दगड खाली आला तर त्याच्या वाटेत येणारी झाडे, झुडपे यांचा रगडा करतो व स्वतः खाली जाऊन फुटतो.

दृष्टांत - एका गावात एक खलेश्वर रहात होता. गावात त्याचं कोणाशीही चांगल नव्हतं. एकदा तो रागाने हिंस्त्र पशूच्या जंगलात गेला जंगल गावाजवळच होते. एका झाडाखाली निश्चिंत बसला. एक शिकारी सर्व शस्त्रासह त्या रस्त्याने घावरत जात होता. शस्त्र विरहीत विनधास्त माणसास पाहून त्याने विचारले आपण शस्त्ररहित कसे काय बसला? त्याने सांगितले माझा एक स्वार्थ आहे. काय स्वार्थ आहे? मला वाघाने खावे. शिकाऱ्यास आश्चर्य वाटले. जगात नऊ आश्चर्य आहेत पण हे आश्चर्य नं. १० वाटते. शिकाऱ्याने विचारले वाघाने तुम्हास खाल्यानंतर तुमचा काय फायदा? खलेश्वर बोलला मला वाघाने खाल्यानंतर वाघास माणसांच्या रक्ताची चटक लागेल व माझ्या विरुद्ध असणारा गाव त्यामध्ये एकही माणूस राहणार नाही. याला म्हणतात ना स्वार्थ ना परार्थ.

३) स्वार्थ व परार्थ - यास शहाणा माणूस म्हणतात. आपला फायदा तसा दुसऱ्याचाही फायदा होईल असा ज्याचा आचार. माऊली दृष्टांत देतात. ज्याप्रमाणे गंगा समुद्राला मिळण्याकरिता वाहते पण वाहता वाहता काठावरील सर्व झाडांना पाणी देते. आंघोळ, कपडे धुणे, पाणी पिण्याकरीता उपयोग होतो तशी काही सज्जन माणसे स्वतःचा संसार करता करता बाकीच्यांना पण मदत करतात.

फेडित पाप ताप।पोखीत तिरीचे पादप।समुद्रा जाय आप।गंगेचे जैसे॥ ज्ञाने.

तैसी बांधली सोडीत।बुडाली काढीत।साकडे फेडित।आर्तांचिया॥ ज्ञाने.

किंबहुना दिवस राती । पुढीलांचे सुख उन्नती । आणित आणित स्वार्थी । प्रवेशिजे ॥ ज्ञाने.

अर्थ सोपा आहे म्हणून देत नाही.

४) परार्थी - दुसऱ्याच्या हिताचा विचार करतो. ज्याला स्वतःच्या स्वार्थाचा विसर पडतो. त्यास परार्थी म्हणावे. तुकोबाराय सांगतात

संसाराच्या नावे घालुनिया शून्य।वाढता हा पुण्य धर्म केला।

स्वतःचा संसार पाहिला नाही जगाच्या सुखाकरीता आयुष्य वेचले असे संत याना परार्थी म्हणतात. यास 'भोळा' म्हणावा. भोळा म्हणजे बावळट नव्हे तर सरळ मताचा. गीताकार ज्यास 'आर्जव' म्हणतात. माऊलीच्या शब्दात.

वारयाची धाव।तैसे सरळ भाव।शंका आणि हाव। नाही जया॥ ज्ञाने.

मायेपुढे बाळका।रिघता नाही शंका।तैसे मन देता लोका।नालोची जो॥ ज्ञाने.

वारा जसा सरळ, वगीच्या पहात नाही अथवा हागंदरी पहात नाही. अथवा बालकाची लाज आईस वाटत नाही. आईची लाज बालकास वाटत नाही तशी जगातील माणसाशी जो वागतो तो भोळा, परार्थी. शंकर भोळे आहेत. विठ्ठल भोळा आहे व संत भोळे असतात.

एकदा दुर्योधनाने द्रोणाचार्यांना विचारले. मी वज्रदेही म्हणजे अमर कशाने होईल? द्रोणाचार्य म्हणाले हे तुझ्या दादास (धर्मराजास) विचार. दुर्योधन म्हणाला तो माझा १ नंबरचा शत्रू आहे. द्रोण बोलले तू त्यास शत्रू समजतोस पण तो तुला मित्र समजतो. धूर्त दुर्योधनाने भोळेपणाचा फायदा घ्यायचे ठरविले. धर्माकडे गेला व विचारले दादा मी अमर कशाने होईल? धर्मराज बोलले अरे औषध तुझ्या घरीच आहे. 'तुझे आहे तुजपाशी।परी तू जागा चुकलासी॥' तु. म. कोणते औषध? तुझी आई गांधारी डोळस आहे पण नवरा आंधळा म्हणून डोळयावर पट्टी बांधून घेतली आहे. तिने पट्टी काढून तुला नखापासून केसापर्यंत अमृत दृष्टीने न्याहाळला तर तू वज्रदेही होशील. लगेच रात्री दुर्योधन आईकडे विवस्त्र निघाला. श्रीकृष्णानी विचार केला जर हा दुष्ट अमर झाला तर माझ्या पांडवांचे (भक्तांचे) वाटोळे होईल. म्हणून श्रीकृष्ण फुलवाल्याचं

रुप घेऊन दुर्योधनाच्या समोर आले व विचारले कोण हा मूर्ख नग्न अवस्थेत आहे? दुर्योधन म्हणाला मी सम्राट दुर्योधन आहे. कृष्ण म्हणाले सम्राट व नागवा? दुर्योधन म्हटला दादाने अमर होण्याचे वर्म सांगितले आहे. श्रीकृष्ण म्हणाले तो तुझा शत्रू! जर तुझ्या पतिव्रता आईने पाहिले तर शाप देऊन भस्म करील. मूर्खांना खोटे लवकर पटते. तो म्हणाला तुम्ही म्हणता ते खरे आहे पण मी लंगोटीपण आणली नाही. श्रीकृष्ण (फुलवाले) म्हणाले मी फुलांची लंगोटी बनवून देतो. फुलांची लंगोटी असलेला दुर्योधन गांधारीने नखापासून केसापर्यंत न्याहाळला. "पुत्र प्रेमाकरीता पतिव्रता धर्म विसरली" व म्हणाली बाळ तुला वाटेत कोण भेटले का? दुर्योधन म्हणाला एक फुलवाला भेटला. गांधारी म्हणाली घोटाळा झाला. तुझा सर्व देह वज्ररुप होईल मात्र फुलांची जागा कच्ची राहील व तिथेच गदा लागून तुझा मृत्यू होईल. भक्त जरी भोळे असले तरी हा काळा (विठ्ठल) त्यांच्या मागे उभा असतो. तात्पर्य धर्मराज किती भोळा आहे. नाथ महाराज वर्णन करतात.

करावया पांडव निर्दळण। वज्र देही व्हावया आपण।
वर्म पुसे दुर्योधन। धर्म असत्य वचन न वदे॥

भक्त जरी भोळे असले तरी त्यांचा अधिकार किती असतो तुकोबाराय सांगतात 'तुका म्हणे भोळा। जिंकू जाणे कळिकाळा।' हा कळिकाळास जिंकतो.

असे हे माणसांचे अनादिकाळापासून चालत आलेले चार प्रकार होतात. मात्र हे एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत. सत्पुरुषांचे वर्णन एका सुभाषितात आले आहे.

छायाम अन्यस्य कुर्वन्ति, तिष्ठन्ति स्वयम आतपे।
फलन्ति अपि परार्थाय। वृक्षाः सत्पुरुषाः इव॥

अर्थ - वृक्ष स्वतः उन्हात उभे राहतात. मात्र दुसऱ्यास सावली व फळे देतात. तद्वत सत्पुरुष स्वतः कष्ट भोगतात व दुसऱ्यांना सुखी करतात ते परार्थी होत.

★ ★ ★ ★ ★

३४ : नररुपे

मागच्या कोटीत माणसांचे चार प्रकार पाहिले. या कोटीत पण चार प्रकार पहायचे आहेत. मात्र थोड्या वेगळया रुपात. म्हणून या कोटीचे नाव बदलले आहे. यात चार 'नर रुपे' याचे वर्णन आहे. १) राक्षस नर, २) पशू नर, ३) माणूस नर, ४) देव नर. माणसे आकृतिने माणसे वाटतात. आकृती जरी माणसाची असली तरी वृत्ती व त्यामुळे कृती वेगळी असल्यामुळे हे प्रकार पडतात.

१) राक्षस नर - यांचे आचरण माणूस असून राक्षसासारखे असते. हे कसे ओळखायचे याकरीता

रामचरित मानस मध्ये शंकर पार्वतीस खलांचे वर्णन सांगतात.

बाढे खल बहु चोर जुवारा। जे लंपट परधन परदारा।
मानुहि मातु पितु नही देवा। साधुन्ह सन करवावही सेवा॥
जिन्हके यह आचरण भवानी। ते जानेहु निसिचर सब प्रानी॥ तुलशीदास

अर्थ - चोर, जुगारी, परधन हरण करणारे, परस्त्रीविषयी लंपट असणारे, आईवडिल, देव यांना मान न देणारे व साधूकडून सेवा करुन घेणारे हे सर्व (निशाचर) राक्षस आहेत. यामध्ये रावण, कंस मोडतात. आताही त्यांचा वंश चालविणारे मिळतात. यांचे चरण माणसासारखे पण आचरण राक्षसासारखे.

---

२) पशु नर - यांची आकृति माणसाची पण वागणे पशुसारखे. काही नर नको त्यांच्यावर तोंड सुख घेतात. कुत्र्यामध्ये व त्यांच्यामध्ये फरक काय? काही काहीही खातात, पितात व कुठेही लोळतात त्यांच्यात, डुकरात काय फरक? कांही सरळ वागतच नाहीत. त्यांच्यात व उंडात काय फरक? माऊली सांगते 'करेयाच्या ठायी चांग। कैसे तयासी निट अंग। तैसा असुरांचा प्रसंग। प्रसंगे परीस॥ ज्ञाने. काही फक्त बैलासारखे, गाढवासारखे संसाराचे ओझे वाहतात. त्यांच्यामध्ये व गाढव, बैलामध्ये काय फरक? तुकोबाराय म्हणतात. "नाही तरी काय थोडी। श्वान सूकरे वापुडी॥" शास्त्रकार सांगतात हे सहा गुण ज्यांच्याकडे नाहीत तो नर पशू होय. 'येषां न विद्या न तपो न दानं नचऽपि शिलो न गुणो न धर्मः। ते मृत्युलोके भूविभार भूता मनुष्य रुपेन मृगश्चरन्ति॥' ज्या माणसाकडे विद्या, तप, दान, शिल, सत्गुण व धर्म नाही ते सर्व जवळ जवळ पशूच आहेत. दुसरे एक सुभाषित आहे.

मांसभक्षै सुरापानैः मुर्खश्च अक्षर वर्जितः।
पशुभिः पुरुषाकारै भाराक्रांतीच मेदिनी॥

जे मांस खातात, दारु पितात, मूर्ख आहेत व अडाणी आहेत. ते सर्व पशूत गणले जातात व अशांचा पृथ्वीस भार होतो. जे नियमाने वागत नाहीत त्यांना तुकोबाराय कुत्रा व बैल म्हणतात.

काही नित्यनेमाविण। अन्न खाय तोचि श्वान। वाया मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ॥

ही सर्व पशू माणसे अथवा पशू नर.

३) माणूस नर - ही माणसासारखी वागणारी, परोपकार करणारी माणसे, यांच्याकडे निती असते स्वधर्माने वागतात.

वदनं प्रसाद सदनं सदयं हृदयं सुधामयाः शब्दः।
करण परोपकरणं येषां केषां न ते वंद्यः॥ सुभा.

ज्याचे मुखकमल नेहमी प्रसन्न, ज्यांच्या हृदयात दया जे अमृतासारखे मधुर बोलतात व ज्यांची इंद्रिये परोपकारात खर्च होतात ते जनांत वंदनीय कां होणार नाहीत? हा नर संत होऊ

शकतो.

४) देव नर - अथवा देव माणूस. यामध्ये संत मोडले जातात ही विशेष माणसे आहेत. आकार माणसांचा पण आहेत देवच. जसे दगडात परीस, रसात अमृत, पाण्यात गंगाजळ, माळेत तुळशी अथवा रुद्राक्ष तसे हे माणसातील देव आहेत. नाथ महाराज माउलीचे वर्णन करतात.

'नररुपे' अवतरला हा 'भगवान'। नदी वापी कूप पहाता उदय नोहे भिन्न।
नवल हेचि पशू म्हैसा करी वेदाध्ययन। नमन करुनि जपता होय विज्ञान॥

ज्ञानदेव, नामदेव, चांगदेव हे सर्व माणसांतील अथवा नरातील देवच आहेत.

१) राक्षस नर हे 'विकृति' प्रधान असतात.
२) पशु नर हे 'आकृति' प्रधान असतात.
३) माणूस नर हे 'प्रकृति' प्रधान असतात.
४) देव नर हे 'संस्कृति' प्रधान असतात.

★ ★ ★ ★ ★

३५ : ओळखा

दिसणे व असणे यामध्ये जमिन अस्मानाचा फरक आहे. आपली मराठी म्हणच आहे 'दिसतं तसं नसतं म्हणून जग फसतं' माणूस बाहेर कसा दिसतो याला येवढे महत्व नाही. तो आत कसा आहे यास फारच महत्व आहे. अर्थात बाहेरुन व आतून माणूस कसा यावरून माणसांचे चार प्रकार पडतात. तसे माणसाचे तीन प्रकार. 'प्रकाराचे तीन। तुका म्हणे केले जन॥' मात्र संत हे चौथ्या प्रकारात वसतात.

१) बाहेर संसार आतून संसार - जगातील बहुतांशी लोक यामध्ये मोडतात. हृदयात, दृष्टीत, बोलण्यात सर्व संसारी गोष्टी. हे सर्व संसारात गुंतलेले लोक असतात. तुकोबाराय म्हणतात.

जन तरी देखे गुंतले प्रपंचे । स्मरण ते त्यांचे त्यासी नाही ।

बहुतेक हे देहालाच आत्मा समजतात.

देह खंड नाम आत्मा। ईश्वर पाषाण प्रतिमा। यया परौति प्रमा। ढळो नेदी॥ ज्ञाने.

खाणे, पिणे, विणे अथवा आहार, निद्रा, भय, मैथून यामध्ये आसक्त. यांना ओळखणे अतिशय सोपे असते.

२) बाहेर देव आत देव - हे महात्म्ये ओळखण्यास सोपे असतात. कारण "सर्वभावे त्यांचे देव भांडवल। आणिक ते बोल न बोलती॥" तु. म. बोलणेचि नाही। आता देवावीण काही॥ तु. म. तुकोबारायांच्या सासूबाई आल्या व म्हणाल्या जरा संसाराकडे लक्ष द्या. देव देव किती करणार!

महाराज म्हणाले, मामी, 'नको मजपाशी। वदो प्रपंच्याविशी॥' प्रपंच्या विषयी माझ्याकडे नाव काढू नका. मला त्याचा वीट आला आहे. 'विटले हे चित प्रपंचापासूनी। वमन ते मनी वैसलेसे॥'

३) आत संसार - बाहेर परमार्थ - यांना ओळखणे फार कठीण काम आहे. यांच्या आत प्रपंच भरलेला असतो. बाहेर परमार्थाचे सोंग दाखवितात. हे लोकांना फसवितात. तुकोबाराय सांगतात.

गुळे माखोनिया दगड ठेविला। वरी दिसे भला लोकाचारी॥
अंतरी विषयाचे लागले पै पिसे। बाहिरल्या वेशे भुलवी लोका॥

यांच्या बाहेरच्या वेषाला मोठे मोठे लोक फसतात. तुलशीदास सांगतात.

लखी सुवेष जग बंचक जेऊ। बेष प्रताप पूजिअही तेऊ।
उघरही अंत न हेई निबाहू। काल नेमी जिमी रावण राहू॥

तुलशी दासांनी तीन नावे दिली आहेत. १) कालनेमी, रावणाचा हस्तक, द्रोणागिरी पर्वत आणण्याकरीता हनुमंतराय निघाले. मध्येच साधूचे सोंग घेऊन हनुमंतांना गुंतवून ठेवण्याचा प्रयत्न केला. पण हनुमंतानी थोड्याच वेळात त्याला ओळखले व कालनेमी राक्षसास ओळखून मारले. २) रावण सीतेला पळवून नेण्याकरीता साधूचा वेष घेऊन आला होता. सीतामाईस त्याचे खरे स्वरुप कळले नाही व सहा महिने राक्षसाच्या ताब्यात रहावे लागले. ३) राहू हा राक्षस पण अमृत वाटताना देवाचे रुप घेऊन देवाच्या रांगेत बसला. बाजूस बसलेल्या देवाना हा राक्षस ओळखता आला नाही. अमृत तोंडात घेतले पण घशाखाली उतरण्याच्या अगोदर विष्णूने त्याचे मुंडके उडविले. तात्पर्य - हनुमंताना प्रथम कालनेमी ओळखता आला नाही. सीतेस रावण ओळखता आला नाही. देवाना राहू ओळखता आला नाही. मग सामान्य लोकांची फजिती कां होणार नाही? कव्हरला व पॅकिंगला भुलू नका आत माल कसा आहे हे पहा. नाहीतर फसगती आहे.

४) आत परमार्थ बाहेर संसार - यांना ओळखणे पण कठीण आहे. पण ओळखल्यास मोठा फायदा आहे. तुकोबाराय म्हणतात 'तोचि साधु ओळखावा। देव तेथेचि जाणावा॥' यांच्या संगतीची महाराज अपेक्षा करतात. 'देव वसे चित्ती। त्याची घडावी संगती॥' हे दिसायला संसारी दिसतात पण असायला संत असतात. यांनी संसार सोडलेला नसतो. संसारावरचे प्रेम (माया) सोडलेली असते व मनात हरि धरलेला असतो. 'जिही हरि धरिला मनी। दिले संसारासी पाणी॥' तु. म. हे जगातील लोकांनी आपणास साधू म्हणून ओळखू नये असाच प्रयत्न करतात. लोकांनी आपणास वेडे म्हणावे अशी इच्छा ठेवतात.

वाचस्पतीचेनि पाडे। सर्वज्ञता तरी जोडे। परी वेडिवे माजी दडे। महिमे भेणे॥ ज्ञाने.

यांचे वर्णन

फणसा अंगी काटे। माजी अमृताचे साठे । अथवा
मातीयेचा घट। माजी अमृताचा साठ॥ तु. म.

दृष्टांतच द्यायचा म्हटले तर कबीरांना जनाबाई प्रथम बाहेरील व्यवहारामुळे (भांडण) ओळखता आल्या नाहीत. काहींना ज्ञानोबा तुकोबा प्रथम कळले नाहीत. काशीवरुन ज्ञानोबाराय यांच्या समाधी प्रसंगी ज्यांनी कीर्तन केले असे कान्हा पाठक याना भेटण्याकरीता एक ब्राह्मण आले. गावांत लोकांनी पाठकांचे घर दाखविले. पण पाठक मुलांशी खेळत होते. ब्राह्मण नाराज झाले. उगीच एवढा त्रास घेतला असे वाटले. कान्हा पाठकांनी ओळखले हे आपणास भेटण्यास आले आहेत. जवळ बोलविले व विचारले कशाकरीता आला होता? ब्राह्मणांने सांगितले आपला अधिकार माहीत पडल्यामुळे मी आलो पण वाटले होते आपला एखादा मठ असावा. वगैरे शिष्यमंडळी अवती भोवती फिरत असावी. आपले मंदिरपण सुंदर असावे. पण निराशा झाली आपण तर मुलांबरोबर खेळत आहात. पाठक म्हणाले ही मुलं जर परमार्थास आड येत असतील तर यांना विहीरीत फेकून देतो. दिली सुद्धा. ब्राह्मण आश्चर्यचकीत झाले. आता तरी मी साधू होऊ शकतो. ब्राह्मण घाबरले घरी जायला निघाले पण कान्हा पाठक बोलले आपण लांबून आला आहात जेवल्याशिवाय जाता कसे? ब्राह्मण बोलले आपली सर्व मुले मेली आहेत म्हणजे आपणास सुतक आहे. सुतक्याच्या घरी मी जेवत नाही. पाठकांनी लगेच प्रत्येक मुलाच्या नावाने हाक मारल्याबरोबर चेंडू सारखी मुले पंगतीस येऊन बसली. ब्राह्मणांनी कान्हा पाठकांच्या चरणांवर लोटांगण घातले.

श्री संताचिया माथा चरणावरी। साष्टांग हे करी दंडवत॥ तु. म.

तात्पर्य असे साधू ओळखणे कठीण असते म्हणून साधू ओळखा. हनुमंताने रामाचे सामर्थ्य जाणले व गुरु केले. "पाणी पिना छानके। गुरु करना जानके॥" संत हे गुरु असतातच पण गुरु संत असतील याची खात्री देता येत नाही. संसाराचे स्वरुप ओळखा, हरिस ओळखा व साधूस ओळखा व स्वतःस ओळखा. यामुळे आपला संसार सागर पार होईल.

★ ★ ★ ★ ★

३६ : दृष्टी

माणसाच्या सर्व ज्ञानेंद्रियात डोळयास फार महत्व आहे. ८२% ज्ञान डोळयांनी होते. आपली एक म्हण आहे "जशी दृष्टी तशी सृष्टी" जसा चष्मा लावावा त्याप्रमाणे जग दिसते. माझ्या पोषाखावरुन (धोतर, शर्ट, टोपी) मला जवळ जवळ आठ नावांनी लोक पहातात. १) बुवा, २) महाराज, ३) घाटी मामा, ४) गुजराथी काका, ५) गुरुजी, ६) भटजी, ७) पोपटवाला भैय्या, ८) काँग्रेस. मी मात्र साधा माळकरी व वारकरी आहे. डोळ्यामुळे माणसे जास्त बिघडतात. किंबहुना डोळे म्हणजे कॅमेरा आहे. हृदय पटलावर अल्बम तयार होत असतो. प्रत्येकाच्या हृदयात जो अदृश्य अल्बम तयार होतो. त्यापेक्षा जगात कोणताच मोठा अल्बम नसावा. आंधळ्या माणसांची जेवढी आपणास दया येते तेवढी मुका, बहिरा, पांगळा याची दया येत नाही. यावरुन

चार कोट्या तयार होतात.

१) बाहेरुन आंधळे आतून आंधळे - धृतराष्ट्र असा होता असे माऊली म्हणते

संजय दुखवलेनी अंतःकरणे। म्हणे नवल नव्हे दैवा दवडणे।
जीवी घडसा आहे म्हणे। तव आतही आंधळा॥ ज्ञाने.

महाभारतीय युद्ध झाल्यानंतर धृतराष्ट्राने भीमास भेटण्यास बोलाविले. भीम उतावीळ झाला. पण श्रीकृष्ण आडवे आले. श्रीकृष्णानी भीमाचा पुतळा (जो दुर्योधनाने अगोदर बनवून त्या लोखंडाच्या पुतळ्यासी द्वेषाने गदायुद्ध खेळत होता.) पुढे केला. धृतराष्ट्राने आलिंगनात त्या लोखंडाच्या पुतळ्याचा चुरा केला. भीमाची काय अवस्था झाली असती? तात्पर्य जगात अशी काही माणसे आहेत आतबाहेर आंधळी. (काकाने धोका दिला असता)

२) सामान्य माणसे बाहेरुन डोळस पण आतून आंधळी

आंधळी ती तुका म्हणे संसारी। जिही नाही हरी ओळखिला॥ तु. म.

माणसे पाहूनसुद्धा डोळे झाकपणा करतात.

देखोनि ऐकोनि एक अंध बहिर झाले। विषयाचे लंपट बांधोनि यमपुरीसी नेले॥ ज्ञान.

दारु प्यायल्यामुळे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शारीरीक सर्व प्रकारे नुकसान होते. तरी लोक दारु सोडतात का? सिगारेटच्या पॉकेटवर लिहिलेले असते हे शरीरास अपायकारक आहे. पण लोक वाचत वाचत सिगारेट ओढतात. तंबाखूमुळे कॅन्सरचे प्रमाण वाढले आहे. तरी लोक तंबाखू खातात. कारण आंधळेपणा!

ऐसे जाणता जाणता। कां रे होतोसी नेणता॥ तु. म.

महाराज इशारा देतात. 'तुका म्हणे इहलोकीच्या व्यवहारे। नका डोळे धुरे भरुनि राहू॥' धुरांचे भागवतात चार प्रकार आहेत.

यौवनं धनसंपत्तिः प्रभुत्वंऽविवेकताः। एकैकमप्यनर्थाय किमु यत्र चतुष्टयम्॥

१) जवानी, २) धनसंपत्ती, ३) सत्ता, ४) अविवेक. या चारपैकी एकामुळे अनर्थ ओढवतो मग चार एकत्र आल्यानंतर काय होईल?

अकबराने बिरबलाला विचारले जगात आंधळे किती व डोळस किती? बिरबल हजरजबाबी असल्यामुळे पटकन सांगितले ९०% लोक आंधळे व १०% लोक डोळस. कशावरुन? बिरबल बाजारात खाटले विणत बसला. बाजूस हिशेब ठेवण्यासाठी माणूस ठेवला होता. ९०% माणसे अशी मिळाली पहात असून बिरबलला विचारले आपण काय करता? १०% माणसे अशी मिळाली, त्यांनी विचारले बिरबल आपण बाजारात खाटले का विणता? सिद्ध झाले जगात डोळसपेक्षा आंधळी माणसे जास्त आहेत.

३) बाहेरुन आंधळे आतून डोळस - सुरदास सारखे संत बाहेरुन आंधळे पण आतून डोळस. सुरदास एकदा मंदिरात देव दर्शनास गेले होते. लोकांनी विचारले आपण आंधळे देव दर्शनास का येता? सुरदास म्हणाले मी आंधळा आहे. पण देव आंधळा नाही तो आहे 'विशाललोललोचन' त्याने मला पाहिले की काम झाले. सुरदासांस एकदा विचारले देवाच्या अंगावर कोणता कपडा आहे. सुरदास बोलले देव आज नंगा आहे. कारण आतून डोळस. वारकरी सांप्रदायात. देवडीकर, गुलाब महाराज हे आंधळे होते. पण महात्मा झाले. सध्यापण आळंदीत एक आंधळे बाबा आहेत. त्यांची ज्ञानेश्वरी मुखोद्‌गत आहे. (मुकूंदकाका जाटदेवळेकर)

४) संत मात्र बाहेरुन डोळस - आतून डोळस. उदा. ज्ञानेश्वर महाराज, तुकाराम महाराज ज्ञानाचा डोळा डोळसा। तो डोळस असे विरेशा॥ ज्ञाने. तुकाराम महाराजांनी इतर जनाना आंधळे म्हटले आहे. पण शुकाचार्यांनासुद्धा आंधळे म्हटले आहे. "बैसोनि खोळी शुक गर्भी राहे आंधळा॥" महाराज म्हणतात, आम्ही सुद्धा आंधळे पण वेगळ्या प्रकारचे

सहज मी आंधळा गा निज निराकार पंथे॥ तु. म.

पापी लोकांच्या दृष्टीचे महाराज वर्णन करतात.

संत देखोनिया स्वये दृष्टी टाळी। आदरे न्याहळी परस्त्रीसी॥ तु. म.

जीवाने आपले डोळे देव दर्शनाकडे लावावे अथवा संताकडे पहावे.

'आत्मज्ञाने चोखडी। संत जी माझी रुपडी। तेथ दृष्टी पडो आवडी। कामिनी जैसी॥ ज्ञाने.

स्त्रिया पुत्र धन। देखोनि सुखावती नयन।
तैसे संत प्रतिमांचे दर्शन। आवडी जाण जो करी॥ नाथ.

नयनन्हि संत दरस नहीं देखा। लोचन मोर पंख कर लेखा॥ तुलशीदास

जे डोळे संताचे दर्शन घेत नाहीत ते डोळे म्हणजे मोर पंखावरील डोळे समजावे. संताचे फक्त दर्शन नको. त्यांना न्याहाळा. पाहणे वेगळे न्याहाळणे वेगळे.

धन्य धन्य धरा तळी। जो याते दृष्टी न्याहळी।
तो वाहत येईल टाळी। वैकुंठ भुवनासी॥ नाम.

नामदेवराय म्हणतात ज्ञानेश्वर महाराजांना न्याहाळा. तो टाळी वाजवत वैकुंठास येईल. देवास पण निरखा.

निरखित निरखित गेलीये। पाहे तव तन्मय झालिये वो॥ ज्ञान.

सर्व जीवात देवास पहावे. त्यापेक्षा सर्व जगात देव पहावा हेच खरे 'देवदर्शन' याला ज्ञानदृष्टी म्हणतात. तुकाराम महाराज अशी दृष्टी देवाकडे मागतात, "आता मज दृष्टी देई पांडुरंगा मायबापा".

चुटके - १) एक अशिक्षित माणूस डोळयाच्या डॉक्टरकडे आला. डोळे तपासून घेतले. डॉक्टरनी सांगितले चष्मा लागेल. चार दिवसांनी अडाणी माणूस चष्मा नेण्याकरीता आला. चष्मा घेतला व विचारले, डॉक्टर चष्म्यामुळे मी 'वाचेन' कां? डॉक्टर बोलले 'तुम्ही वाचणार'. अशिक्षित माणूस बोलला बरे झाले तुमच्या चष्म्यामुळे न शिकता पुस्तक वाचणार. डॉक्टरही हुशार होते ते म्हणाले तुम्ही चष्म्यामुळे वाचणार म्हणजे पुस्तक नाही. तर चष्मा लावल्यामुळे जनावरापासून, खड्डयापासून वाचणार.

२) न्यूटनने पाहिले झाडाचे फळ खालीच कां पडते? या पाहण्याच्या डोळस दृष्टीमुळे गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला.

३) जेम्स वॅट शास्त्रज्ञ एका टोपात भात शिजवत होते. वाफेमुळे झाकण उडत होते. दाबण्याचा प्रयत्न केला पण हात भाजला. यातून त्यांनी वाफेचे इंजिन शोधले. वाफेने झाकण उडून आपले डोके जरी फुटले तरी आपल्या डोक्यात काय येणार नाही. तात्पर्य डोळ्यांनी पहा व डोक्याने विचार करा. 'दृष्टी जर योग्य ठेवली तर ज्ञानाची वृष्टी होईल.'

निरीक्षण

माणसाला देवाने निरीक्षण करण्यासाठी बुद्धी दिली आहे. पण काय निरीक्षण करावे याचे ज्ञान हवे. पाच गोष्टीत निरीक्षण करावे

१) देह निरीक्षण - चौऱ्यांशी लक्ष योनी, चार खाणी व तीन गुणी या जीवसृष्टीत मानव देहास अत्यंत महत्व आहे. कारण या देहाने देव प्राप्त होतो. म्हणून या देहाचे महत्व लक्षात घ्यावे

२) ग्रंथ निरीक्षण - माणसाने सतत ग्रंथाचे वाचन करावे. यासच 'स्वाध्याय' म्हणतात. अर्थात प्रासादिक ग्रंथ वाचावेत. ज्यामध्ये माणूस जन्म मरणातून दुःखातून 'वाचेल' असे ज्ञान आहे तेच ग्रंथ वाचावेत. वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी॥ जनावाई

३) संत निरीक्षण - ग्रंथामध्ये संताची, भक्तांची जी लक्षणे सांगितली आहेत त्यांची जाणीव करून घ्यावी. उदा. गीतेमध्ये १२ या अध्यायात शेवटच्या आठ श्लोकात भक्तांची लक्षणे आहेत. भागवतात ११ व्या अध्यायात साधूची ३० लक्षणे सांगितली आहेत. त्यांचे निरीक्षण करावे

४) आत्मनिरीक्षण - ग्रंथ वाचल्यास आपली पात्रता, अधिकार काय आहे. याचे ज्ञान होईल. आपण पाप करतो का पुण्य करतो याची माहिती मिळेल. आपण दुष्ट, मूर्ख, मुमुक्षु अथवा मुक्त आहे हे कळेल. यालाच आत्मनिरीक्षण म्हणतात.

५) साधन निरीक्षण - देह निरीक्षण, ग्रंथ निरीक्षण, संत निरीक्षण, आत्मनिरीक्षण झाल्यानंतर देव व आपला संबंध कळेल व आपण साधनावर आरुढ होउन साध्य मिळविण्याचा प्रयत्न करु. देव मिळविण्याची चार साधने संतांनी व शास्त्रांनी सांगितली आहेत. १) कर्म, २) ज्ञान, ३) योग,

४) भक्ति- जसे प्रवासाकरीता चार मार्ग आहेत. (१) भूमार्ग, २) लोहमार्ग, ३) जलमार्ग व ४) आकाशमार्ग. याचे थोडे निरीक्षण केल्यास हे ध्यानात येईल. १) कर्म मार्ग सूक्ष्म आहे, २) ज्ञान मार्ग दुस्तर आहे. ३) योग मार्ग क्लिष्ट आहे. ४) भक्तिमार्ग मात्र सोपा आहे. कलियुगातील अल्प बुद्धी. अल्प आयु माणसांना संतांनी भक्तिमार्गच सांगितला आहे.

भक्तिपंथ बहु सोपा। पुण्य नागवे या पापा। येणे जाणे खेपा। अवघ्या येणेची खुंटती॥ तु. म.

अर्थात हे सर्व निरीक्षण माणसाने करावेच.

१) चर्म दृष्टी - सामान्य लोक, २) तत्व दृष्टी - साधक, ३) सम दृष्टी - संत

★ ★ ★ ★ ★

३७ : मंत्रिमंडळ (शरीरातील)

वेद, शास्त्रे, पुराणे व संत यांनी देहाचे फार मोठे वर्णन केले आहे. किंबहुना ब्रह्मांडाचा छोटा नकाशा अथवा छोटे रुप म्हणजे 'पिंड' होय.

पिंडी देहस्थिती ब्रह्मांडी पसारा। हरीवीण सारा व्यर्थ भ्रम॥ नाथ.
पिंडांड ब्रंह्मांड अंतरी दैवत भिन्नाकृति वो॥ नाथ.

या पिंडांतील प्रत्येक अवयव अतिशय महत्वाचा आहे. विचारवंतांनी शरीर म्हणजे मंत्रिमंडळच आहे, हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. यातील हृदय, डोके व हात यांना विशेष महत्व आहे. हात पाय कापला अथवा नसला तरी माणूस जगतो. डोके चालले नाही अथवा वधीर झाले तरी माणूस जगतो. (कोमामध्ये) पण हृदय बंद पडले तर माणूस संपतो. म्हणून हृदयास विशेष महत्व आहे. त्याखालोखाल डोक्यास महत्व आहे. कारण त्यात मेंदू आहे. डोके म्हणजे मोठा काँम्प्युटर (संगणक) आहे. यामध्ये असंख्य स्मृती राहू शकतात. पण यास वटणांची अथवा विजेची गरज नाही. एका मुंडीमध्ये पाच विषयांची ज्ञानकेंद्रे आहेत. १) शव्द, २) स्पर्श, ३) रुप, ४) रस, ५) गंध. वाकी शरीराच्या भागास फक्त स्पर्श ज्ञान आहे. माचीसमधील काडीस पण डोके असते पण त्यात मेंदू नसतो. काडी घासली तर आग होते. तद्वत मेंदूचा वापर न करता डोके वापरले तर आग लागण्याची शक्यता आहे. हातास पण फार महत्व आहे. हे 'कर' कोटी मध्ये वेगळे लिहिले आहे. या तीन इंद्रियांचा योग्य उपयोग केला तर मानव फार प्रगती करु शकतो. १) हृदय - इच्छाशक्ती, २) डोके - ज्ञानशक्ती, ३) कर - क्रियाशक्ती. माउलीनी एका ओवीच्या एका तुका मध्ये या तीन शक्ती आणल्या आहेत. म्हणून नामदेवराय म्हणतात 'नामा म्हणे ग्रंथ श्रेष्ठ ज्ञानदेवी। एक तरी ओवी अनुभवावी॥' ती ओवी 'कळा येथूनि जालिया। विद्या इयेची केलिया। 'इच्छा ज्ञान क्रिया'। वियाली हे॥' ज्ञाने.

हृदय, डोके, कर यांना महत्व आहे तसेच वाकीच्या अवयवांनासुद्धा महत्व आहे. किंबहुना शरीर हे मंत्रीमंडळच आहे. कसे ते पाहू.

१) हृदय - राष्ट्रपती, २) मोठा मेंदू - पंतप्रधान, ३) लहान मेंदू - उपपंतप्रधान, ४) फुफ्फुस - गृहमंत्री, ५) हात - अर्थ मंत्री, ६) बुद्धी - शिक्षण मंत्री, ७) जीभ - नभोवाणी मंत्री, ८) कान - पालकमंत्री, ९) त्वचा - संरक्षण मंत्री, १०) जठर - अन्नपुरवठा मंत्री, ११) हाडे - वांधकाम मंत्री, १२) पाय दळणवळण मंत्री, १३) डोके केस - जंगलमंत्री (वनमंत्री), १४) डोळे - शिक्षण मंत्री (सांस्कृतिक मंत्री)

याचा आणखी विस्तार करता येईल. पण हे राज्यातील अथवा केंद्रीय मंत्रिमंडळ नाही.

★ ★ ★ ★ ★

३८ : दुर्लभ

जगात ज्या दुर्लभ गोष्टी आहेत. त्या मध्ये 'नर' देह फार दुर्लभ आहे.

पुनर्वित्तं पुनर्मित्रं पुनर्भार्या पुनर्मही।
एतत् सर्व पुनर्लभ्यं न शरीरं पुनः पुनः॥ सुभा.

एखादी नोकरी गेली तर दुसरी नोकरी मिळेल. एक मित्र तुटला तर दुसरा जोडता येईल. एखाद्याची वायको हातावर तुरी अथवा तांदूळ देऊन गेली तर दुसरी करता येईल. ''स्त्रिया मेळविता असंख्य मिळती। माता न मिळे त्रिजगती। ऐसे जे सज्ञान जाणती। तेही उपेक्षिती मातेते॥'' नाथ. एखादी जमीन गेली पुन्हा घेता येईल. या सर्व गोष्टी परत परत मिळतील पण नर शरीर पुन्हा मिळण्याची शक्यता नाही. नाथ महाराज सांगतात.

नरदेह 'दुर्लभ' जाणा। शत वर्षाची गणना। त्यामध्ये दुःख यातना। तुम्ही आठवा मधुसुदना॥

नाथ महाराज एकच दुर्लभ शब्द वापरतात पण ज्ञानराज माऊली या नरदेहास तीन वेळा दुर्लभ शव्द वापरतात.

दुर्लभु रे दुर्लभु रे दुर्लभु। संसार तुम्ही कां नेणा॥
आहार निद्रेसाठी दवडिता माणूसपणा॥

द्विरुक्ति दोष आहे मग तिरुक्ति नाही का? पण याचा अर्थ लक्षात घेता हा दोष नाही. आम्हा मूर्खांना नरदेहाचे महत्व समजण्यासाठी माऊलीनी पुनःपुनः सांगितले आहे. जसे अतिशय जवळचा पाहुणा असल्यास आपण लग्नाला बोलविताना आपण जरुर जरुर यावे असे लिहितो. तसे जीवाच्या कल्याणाकरीता माऊलीच्या अंतःकरणात कळवळा आहे. ''ऐसी कळवळ्याची जाती। करी लाभाविण प्रिती॥ तु. म. अथवा ''येतो हिताचा कळवळा। पडती हाती म्हणऊनि काळा॥ तु. म. कळवळा म्हणून तिरुक्ति आहे. पण ज्ञानियाचे शिरोमणी ज्या अर्थी तीन वेळा शब्द वापरतात त्याअर्थी प्रत्येक शब्दात वेगळा अर्थ असावा.

माऊलीचे दुसरे अवतार नाथ महाराजांनी भागवतात ही तिरुक्ति सोडविली आहे.

१) दुर्लभु - चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये नरदेह दुर्लभ आहे.

चौऱ्यांशी लक्ष योनी। त्यात मनुष्य देहा वाचोनी।
अधिकारी ब्रह्मज्ञानी। आन कोणी असेना।।

२) दुर्लभु - सर्व इंद्रिये यथासांग असणे दुर्लभपणाचे दुसरे लक्षण आहे.

सुदृढ म्हणजे अव्यंग। अविकळ सकळ भोग।
नव्हे बहिरे मुके अंधपंग। सर्वांगे सांग संपूर्ण।।

३) भारतासारख्या धर्म प्रधान देशात जन्म मिळणे दुर्लभ आहे.

भरतखंडी नरदेह प्राप्ति। हे तो परम भाग्याची संपत्ती।
तेथही विवेकु परमार्थी। त्याचा वशवर्ती मी परमात्मा।।
येणे देहे होय मत्प्राप्ती। या लागी आद्य देहो याते म्हणती।
याची दुर्लभ गा अवाप्ति। भाग्ये पावती नरदेह।। नाथ.

कबीरदास सुद्धा यास दुर्लभ म्हणतात.

मनुष्यजन्म दुर्लभ है मिले न बारंबार। तरुवरसे फल गीरे फिर न लगे डार।।

नरदेह पुनपुनः मिळत नाही जसे झाडाचे पळ खाली पडले तर परत देठास लागत नाही. या नरदेहात चांगली बायको, चांगला मुलगा, चांगले नातेवाईक, चांगला मित्र मिळणे दुर्लभ आहे.

दुर्लभं प्राकृतं मित्रं दुर्लभः क्षेमकृत सुतः। दुर्लभा सदृशी भार्या दुर्लभा स्वजन प्रियाः।।

भागवतकार व्यास सांगतात

दुर्लभो मानुषो देहो देहीनां क्षणभंगुरः। तत्रापि दुर्लभं मन्ये वैकुंठप्रिय दर्शनम।।

अर्थ - मानव देह दुर्लभ आहे. तो क्षणभंगूर आहे. त्यामध्ये वैकुंठप्रिय म्हणजे देवाचे आवडते भक्त भेटणे दुर्लभ आहे. आणखी एक महत्वाचे सुभाषित आहे. या तीन दुर्लभ गोष्टी देवाच्या कृपेशिवाय मिळत नाहीत.

दुर्लभं त्रयमेवैत देवानुग्रह हैतुकम ।
मनुष्यत्वं मुमुक्षुत्व महापुरुष संश्रयः ।। शंकराचार्य

मानवपण, साधकपण व महात्म्याचा सहवास या तीन गोष्टी दुर्लभ आहेत. तुलसीदास दोन गोष्टी दुर्लभ सांगतात

संत समागम हरिकथा तुलशी दुर्लभ होय।।
सुत दारा अरु लक्ष्मी पापी घर भी होय।।

संत समागम व हरिकथा या दोन गोष्टी दुर्लभ आहेत बायको, मुले व संपत्ती तर पापी माणसांच्यासुद्धा घरी असते.

तात्पर्य - नरदेह मिळणे दुर्लभ, त्यात साधक होणे दुर्लभ व शेवटी संत होणे फारच दुर्लभ. गीताकार सांगतात -

मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये।
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः।। गीता ७/३

हजारो माणसात परमार्थास एखादाच लागतो. अशा हजारो परमार्थमार्गी साधकांपैकी देवाची प्राप्ति एखाद्यासच होते. माऊली दृष्टांत देतात. संपूर्ण जगामध्ये चांगली, दणकट माणसे पाहून सैन्य निर्माण होते पण लढाईच्यावेळी शेवटी एखाद्यासच विजय प्राप्त होतो.

जैसे भरलिया त्रिभुवना। एक एक चांग अर्जुना।
निवडूनी किजे सेना। लक्षवरी।।
की तयाही पाठी। जे वेळी लोह मासाते घाटी।
ते वेळी विजयश्रीयेंच्या पाटी। एकचि बैसे।। ज्ञाने.

ज्याप्रमाणे परिक्षेस बसणारे विद्यार्थी लाखो असतात. पण त्यातील ५०% नापास, काही तृतीय श्रेणीमध्ये, काही द्वितीय, काही प्रथम श्रेणी मात्र 'मंगेश म्हसकर' एखादाच. निवडणुकीस जेवढे उमेदवार उभे राहतात त्यांच्यापैकी एखादाच निवडून येतो. निवडून आलेल्यापैकी फार थोडेच मंत्री व एखादाच पंतप्रधान होतो.

तुकाराम महाराज दृष्टांत देतात. जेवढा झाडास मोहोर येतो, तेवढ्या कैऱ्या येत नाहीत. जेवढ्या कैऱ्या येतात तेवढा आंबा पाडास येत नाही. जेवढा आंबा पाडास येतो तेवढा आढीत येत नाही. जेवढा आढीत येतो तेवढा परिपक्व होत नाही.

म्हुरा ऐसी फळे नाही। आली काही गळती।।
पक्वदशे येती थोडी। नाश आढी वेचे तो।।
विरळा पावे विरळा पावे। अवघड गोवे शेवटीचे।। तु. म.

महाभारतीय युद्धात ३९,३६,६०० सैन्य लढले पण शेवटी १० च उरले. पांडवांकडील पांच, श्रीकृष्ण व सात्यकी आणि कौरवांकडील कृपाचार्य, अश्वत्थामा, कृतवर्मा (यापैकी दोन चिरंजीव), मोक्ष दुर्लभ आहे.

मोक्ष तो देवा। तुमचा दुर्लभ जो ठेवा।। तु. म.

त्यापेक्षा रसिक संत जो देवास नाचवितो. तो महात्मा दुर्लभ असतो.

'सिंहनके लेंडे नही हंसो की नही पात।'
लालोंकी नही बोरीयाँ साधू न चले जमात।। कबीरजी

अर्थ - सिंहाची डुकरासारखी पिलावळ नाही, एकच छावा. हंसांचा थवा नसतो एखादाच हंस. लाल, मोत्यांच्या बटाट्यासारख्या गोण्या नसतात, एखादाच लाल, हिरा तद्वत क्वचितच कोणत्यातरी जमातीत एखादाच साधू.

महत्संगत्सु दुर्लभो अगम्यो अमोघश्च ॥ ना. भ. सू. ३९

असे श्रेष्ठ महात्मे भेटणे दुर्लभ, भेटले तरी कळणे दुर्लभ (इंद्रास दुर्वासांची भेट झाली. दांभिकपणाने मान दिला पण कळले नाहीत. त्यामुळे सर्व संपत्ती समुद्रात गेली.) आणि जर कळलेच तर जीवाचा उद्धार झाला. जन्म, फुकट जाणार नाही.

अशा दुर्लभ महात्म्यांचा अनुभव काय ?

बहुनां जन्मनामते ज्ञानवान मां प्रपद्यते ।
वासुदेवः सर्वमिती स महात्मा सुदुर्लभः ॥ गीता ७/१९

अनेक जन्मांनी ज्ञानवान मला शरण येतात व त्यांना सर्व जगत वासुदेवमय आहे असा अनुभव येतो. पण हे फारच दुर्लभ आहेत. या श्लोकावरील माऊलींच्या दोन ओव्या चिंतनीय आहेत.

हे समस्तही श्रीवासुदेवो । ऐसा प्रतीतिरसाचा वोतला भावो ।
म्हणोनि भक्तामाजी रावो । आणि ज्ञानिया तोचि ॥

जयाचिये प्रतीतीचा वाखारा । पवाडु होय चराचरा ।
तो महात्मा धनुर्धरा । दुर्लभु आधी ।
ब्रह्म सर्वगत सदा सम । जेथे अणु नाही विषम ।
ऐसे जाणती ते अति दुर्गम । तयाची भेटी झालीया भाग्य परम ॥ नाथ.

नामदेवरायांचा एक संयुक्त अभंग लिहून कोटी संपवू.

सुवर्ण आणि परिमळ । हिरा आणि कमळ ।
योगी आणि निर्मळ । हे दुर्लभ जी दातारा ।
देव जरी बोलता । कल्पतरु चालता ।
गज जरी दुभता । हे दुर्लभ जी दातारा ।
क्षत्रिय आणि शूर भला । स्वरुपी गुण व्यापिला ।
चंदन फुली फुलला । हे दुर्लभ जी दातारा ॥
सुंदर आणि पतिव्रता । पुराणिक तरी ज्ञाता ।
सावधान श्रोता । हे दुर्लभ जी दातारा ॥
धनवंत आणि दयाळू । व्याघ्र आणि कृपाळू ।
अग्नि आणि शितळु । हे दुर्लभ जी दातारा ॥

ऐसा संपूर्ण सर्व गुणी । केवी पाविजे शारंगपाणि ।
नामा करी विनवणी । मुक्ति चरणी त्याचिया ॥

हे जवळ जवळ नामदेवरायांनी देवासमोर केलेले ज्ञानेश्वर माऊलींचेच वर्णन वाटते.

★ ★ ★ ★ ★

३९ : पंच

१) पंचमहाभूते - १) पृथ्वी, २) आप, ३) तेज, ४) वायू, ५) आकाश
२) पंचविषय - १) गंध, २) रस, ३) रुप, ४) स्पर्श, ५) शब्द. असे वाचावे.
३) पंचकोष - १) अन्नमय (शरीर), २) प्राणमय (प्राण), ३) मनोमय (मन), ४) विज्ञानमय (बुद्धी), ५) आनंदमय (आत्मा)
४) पंचज्ञानेंद्रिये - १) श्रोत्र, २) त्वचा, ३) नेत्र, ४) रसना, ५) घ्राण
५) पंचकर्मेंद्रिये - १) वाणी, २) हात, ३) पाय, ४) उपस्थ, ५) गुद
६) पंच प्राण - १) प्राण, २) अपान, ३) समान, ४) उदान, ५) व्यान
७) पंच उपप्राण - १) नाग (शिंक), २) कुर्म (जांभई), ३) कृकल (ढेकर), ४) देवदत्त (उचकी), ५) धनंजय (अस्थिर)
८) पंचक्लेश - १) अविद्या, २) अस्मिता, ३) राग, ४) द्वेष, ५) अभिनिवेश

अविद्यास्मिता रागद्वेषाभिनिवेशाः क्लेशाः (प. यो. सू.)

९) देव पंचायतन - १) विष्णू, २) शंकर, ३) गणपती, ४) शक्ति, ५) सूर्य
१०) पाच भक्त नावे - १) वैष्णव, २) शैव, ३) गाणपत्य, ४) शाक्त, ५) सौर.
११) पंचांग - (पांच अंगे) १) तिथी, २) वार, ३) नक्षत्र, ४) योग, ५) करण
१२) पंचामृत - १) दुध, २) दही, ३) तूप, ४) साखर, ५) मध

तुकोबाराय म्हणतात -

'प्रपंच' वोसरो । चित्त तुझे टायी मुरो ॥ अथवा
विटले हे चित्त 'प्रपंच्यापासूनी । वमन ते मनी बैसलेसे ॥

प्रपंच - पाचाचा आहे. (देव भक्त सोडून) याचा वीट यावा अथवा तो चित्तातून ओसरावा (नाहीसा व्हावा) प्रपंच कळण्याकरीता 'पंच' कोटीचा हा प्रपंच. एका कीर्तनकारांनी एका गावात देहाचे वर्णन करताना 'पंचभूतांचा गोंधळ । केला एके टायी मेळ । लाविला सवळ । अहंकार त्या पाठी ॥' तु. म. हे प्रमाण घेतले. कीर्तन संपल्यानंतर एक सज्जन गावकरी कीर्तनकार महाराजांना भेटला व म्हणाला आपण तुकाराम महाराजांचे प्रमाण योग्य घेतले. कीर्तनकार म्हटले कसे काय ? तो म्हणाला आमच्या गावात जे 'पंच' आहेत. त्यांचाच गावात गोंधळ चालतो जवळजवळ ती भूतेच आहेत. ''पंच भूतांचा गोंधळ'' !

★ ★ ★ ★ ★

४० : विषय

विषय आहेत पाच.

१) शब्द, २) स्पर्श, ३) रुप, ४) रस, ५) गंध.

प्रत्येकाचे शरीर पंचमहाभूताचे आहे त्यामुळे प्रत्येक भूताचा हा एक एक गुण आहे. या पाच ज्ञानेंद्रियाद्वारे जीव पाच विषय भोगीत असतो. त्यांची यादी

१) आकाश - शब्द गुण - कानाद्वारे	२) वायु - स्पर्श - त्वचेद्वारे
३) तेज - रुप गुण - डोळ्याद्वारे	४) जल - रस गुण - जिभेद्वारे
५) पृथ्वी - गंध गुण - नाकाद्वारे	

पाच इंद्रियांना पाच विषयाशिवाय काही रम्य वाटतच नाही. ''या विषयावाचोनि कांही। आणिक सर्वथा रम्य नाही। हा स्वभावोचि पाही। इंद्रियांचा॥ ज्ञाने. त्या त्या विषयाकरिता ती ती इंद्रिये रात्रंदिवस तडफडत असतात. नाथ महाराज सांगतात

'जिव्हा रसाकडे ओढी। तृषा प्राशनालागी तोडी।
शिश्नाशी रतिसुखाची गोडी। ते चरफडी रमावया॥
त्वचा पाहे मृदुपण। उदर वांछी पूर्ण अन्न।
श्रवण मागती गायन। मधुरध्वनी आलापु॥
घ्राण उद्यत परिमळा॥ रुप पहावया डोळा।
हस्त वांछीती खेळा। नाना लिला स्वभावे॥
पाय वांछिती गती। ऐशी इंद्रिये वोढा ओढीती।
जेवी नाना गेहपती। बहुता सवती तोडीती। भागवत

ज्याप्रमाणे एका पुरुषास अनेक बायका असतात व त्यास आपापल्याकडे ओढण्याचा प्रयत्न करतात. तद्वत हे विषय इंद्रियांच्या माध्यमाने जीवास आपल्याकडे ओढतात. या विषयांच्या अल्प सुखामुळे जीव देवापासून दूर जातो व जन्म मरणाचे दुःख भोगीत असतो. एक सुभाषितकार सांगतात एक एका विषयामुळे एक एक जीव मरतो. मग पंच विषय भोगणाऱ्यांची काय गती होणार?

कुरंग मातंग पतंग मीना, भृगाः, हताः पंचभिरेव पंच।
एकः प्रमादी स कथं हतोन यः सेवते पंचभिरेव पंच॥

१) कुरंग म्हणजे हरीण हा नादास लुब्ध होतो व पारध्यास सापडतो. एक पारधी एका हरणास मारतो. हरीण शेवटचे श्वास मोजत असते. पारधी जवळ जातो. हरीण काय बोलते ते मनोगत आपल्याकरीता कवीर लिहितात.

अब देखत है पारधी पुरा लगा है घाव।
जब लग साँस शरीरमा तब लग बीन बजावो।
शिर काटो, ताडण करो, मांस पकावो खावो।
मेरे चमडे आसन बैठे सुरस रागीन गावो॥

मरणोत्तर सुद्धा विषयांची आसक्ति सुटत नाही.

२) मातंग - म्हणजे हत्ती, याला पकडण्याकरीता एका खड्डयात नकली हत्तीण ठेवतात. हा हत्ती तिला पाहून खड्डयात उडी मारतो व माणसांच्या हाती कायमचा सापडतो. माऊलीच्या भाषेत ''तैसे विषयालागी। उडी घाली जळते आगी। व्यसनांची आंगी। लेणी मिरवी॥

३) पतंग - हा किटक दिव्यावर झडप घालतो व मरतो.

दिपी पतंगा आलिंगण। तेथ त्यास अचूक मरण।
तेवी विषयाचरण। आत्मघाता॥ ज्ञाने.

४) मीन - म्हणजे मासा. गळास लावलेल्या अमिषास भुलतो आतील गळ दिसत नाही. तो गळ्यात अडकतो व मरतो. माऊली म्हणते ''आमिष कवळु पांडवा। मिनु न सेवी तवचि बरवा। तैसा विषय संगु आघवा॥ निभ्रांत जाण॥'' अथवा 'आमिष कवळु योगी आशा। न विचारीता गिळी मासा। तैसे किजे विषयाशा। तयांसि गा॥' ज्ञाने.

५) भृंग - भुंगा हा गंध विषयात गुंतून फुलांत अडकतो व मरतो. एका कविने एक श्लोक लिहिला आहे. तो चिंतनीय आहे.

'रात्रीर्गमिष्यति भविष्यति सुप्रभातं भास्वानुदेष्यति हसिष्यति पंकजश्रीः।
इत्थं विचिन्तयति कोशगते द्विरेफे हा हन्त हन्त नलिनीं गज उज्जहार॥

अर्थ - रात्र जाईल, सकाळ होईल असा विचार करीत भुंगा फुलामध्येच अडकला. रात्री हत्ती आला व सर्व फुलझाडेच खाऊन टाकली. या सर्व दृष्टांताप्रमाणे माणसांची गती होत आहे. 'विषय ओढी भुलले जीव। आता यांची कोण करील किंव। नुपजे नारायणी भाव। पावोनि ठाव नरदेह॥' तु. म.

एक दृष्टांत - एक राजा होता, राणीसुद्धा! पण त्यांना मुलबाळ नव्हते. दोघेही म्हातारे झाले. एक दिवस त्यांनी जाहीर केले. पाडव्याच्या दिवशी जो आम्हास प्रथम भेटेल त्यास 'राजा' केले जाईल. राजा पाडव्याच्या दिवशी पाच मैल अंतर ठेवून बागेत सहाव्या मैलाच्या जागेत बसले राज्यातील सर्व तरुण, तरुणी आल्या, राजा-राणी होण्याकरिता बागेच्या दरवाज्याजवळ पाडव्याच्या दिवशी सर्व सकाळी जमा झाले. तिकीटाचा दर विचारला. सांगण्यात आले तिकीटाचे पैसे नाहीत फक्त वेळेचा पास आहे. आत गेल्यास तिकीट वेळ संपल्यानंतर चेकर बाहेर हाकलून देणार. आत गेल्यानंतर वस्तूंचा उपभोग घ्यायचा. घरी न्यायच्या नाहीत. सर्वजण आत गेले.

माऊली म्हणते

जगस्रहे आस्वद। एक सार्वभौमपद। न मरणे निर्विवाद। जगा पढीये॥

प्रत्येकास राजा व्हावेसे वाटते. राजाने पाच मैलात पाच हॉल तयार केले होते. पहिल्या हॉलमध्ये अनेक प्रकारचे संगीत साहित्य ठेवले होते. संगीत प्रिय तिथेच नादात गुंतले. आपण कशाकरीता आलो तेच विसरले. दुसऱ्या हॉलमध्ये मऊ मऊ गाद्या ठेवल्या होत्या. सेवेस ललना ठेवल्या होत्या. काही तिथेच अडकले. तिसऱ्या हॉलमध्ये कपडे व दागिने ठेवले होते. बहुतेक स्त्रिया तेथेच गुंतल्या, काही पुरुष सफारी वगैरे घालून तिथेच फिरत राहिले. चौथ्या हॉलमध्ये पंचतारांकित हॉटेल होते. खादाड लोक तिथेच वळले व ताव मारु लागले. वेळ किती गेला समजले नाही. पाचव्या हॉलमध्ये अनेक प्रकारची सुगंधी द्रव्ये ठेवली होती. काही तिथे रममाण झाले. चेकरने वेळ संपल्यानंतर बऱ्याच जणांना वागे बाहेर हाकलले. एकच तरुण असा निघाला त्याने पाच हॉलमधून प्रवेश केला. पण गुंतला नाही. सरळ राजा राणीस भेटला व राजा झाला. आता सर्व बागच ताब्यात आली. सिद्धांत हा,पाच हॉल हे पाच विषय. राजा म्हणजे देव. पासाची वेळ म्हणजे आयुष्य, चेकर म्हणजे यम, येथून काय घेऊन जायचे नाही. यायचे एकटे जायचे एकटे. राजाला भेटण्याचा जसा अधिकार सर्वांना तसा देव मिळविण्याचा अधिकार सर्वांना. पण जीव अल्प विषय सुखामुळे पूर्ण सुखास पारखा होतो.

विषय सुखामुळे अल्प सुख व फारच दुःख होते. विषय सुखाचे ८ तोटे शंकराचार्य सांगतात.

बलविर्यतप प्रज्ञामेधा धन धर्मोत्साह।
हानि हेतुत्वादधर्म तज्जनित नरकादी हेतुत्वाच॥

अर्थ - बल, विर्य, तप, प्रज्ञा, मेधा (धारणाशक्ति) धन, धर्म, उत्साह नाहीसे होतात. शिवाय शेवटी नरक ठरलेला आहे.

विषयाचे सुख येथे वाटे गोड। पुढे अवघड यमदंड॥

मारीती झोडीती तोडीती निष्ठूर। यमाचे किंकर बहुसाल॥ तु. म.

माऊली विषय सुखाचे बेगडी स्वरुप सांगतात.

विषयाचे समसुख बेगडाची बाहुली। अभ्रीची साउली जाईल रया॥

विषयसुख क्षणभंगुर पण परिणाम फार वाईट. इंद्रियांना विषयांची चटक लागली आहे. पण या इंद्रियांना जर देवाकडे वळवले तर ही इंद्रिये ब्रह्मरुप होतात. माउलींनी गीतेचेद्वारे वर्म सांगितले आहे.

किंबहुना आपुले मन। करी माझे एकायतन। माझेनि श्रवणे कान। भरुनि घाली॥
आत्मज्ञाने चोखडी। संत जी माझी रुपडी। तेथ दृष्टी पडो आवडी। कामिनी जैसी॥

मी सर्व वस्तीचे वसौटे हे। माझी नामे जिये गोमटे। तिया जीवा यावया वाटे। वाचेचिये लावी॥
हाताचे करणे। कां पायाचे चालणे। ते होय मज कारणे। तैसे करी॥

तुकाराम महाराजांचे या विषयाचे अनेक अभंग आहेत. त्यातील नमुना म्हणून एक.

घेई घेई माझे वाचे। गोड नाम विटोबाचे॥
तुम्ही घ्यारे डोळे सुख। पहा विटोबाचे मुख॥
तुम्ही ऐका रे कान। माझ्या विटोबाचे गुण॥
मना तेथे धाव घेई। राही विटोबाचे पायी॥
तुका म्हणे जीवा। नका सोडू या केशवा॥

तात्पर्य - इंद्रिय देवाकडे लावली तर देह ब्रह्मरुप होतो व जीवाचा सहज उद्धार होऊ शकतो. पण हे एवढे सोपे नाही माऊली सांगतात.

जे सारसाही विघडता। बोहहुनि वत्स काढीता।
कां भणंग दवडिता। भाणयावरुनि॥
ना तरी माये पुढोनी बालक। काळे नेता येकुलते एक।
होय कां उदक। तुटता मीना॥
तैसे विषयांचे घर। इंद्रिया सांडिता थोर॥
युगांत होय ते वीर। विराग साहाती॥

विस्तारभयास्तव अर्थ देत नाही. पण याशिवाय जीवास तरणोपाय नाही. म्हणून हळू हळू अभ्यासाने विषयापासून इंद्रिये देवाकडे वळवा. विषयाचे दुःख, क्षणभंगुरत्व, इतर तोटे लक्षात घ्या व पुढचे जन्ममरणाचे दुःख टाळा असा संतांचा आम्हांस (साधकास) निरोप आहे. विषापेक्षा विषय घातक आहेत. विष एकालाच एकदाच मारते. पण विषय सर्व जनांस अनंत जन्म मारत आहेत.

विषं समानो विषयो 'य' कारा द्विषयोऽधिकः।
विषंमेकाकिनं हन्ति विषयाश्च पुनः पुनः॥ सुभा.

तथापि भक्ताप्रमाणे इंद्रियांचा विषय नारायण होऊ दे. 'विषय तो त्यांचा झाला नारायण। नावडे जन धन माता पिता॥ तु. म. अथवा एक 'विषय' तो सकळांचा हरि॥ तु. म.

★ ★ ★ ★ ★

४१ : जात

वेदाने समाज व्यवस्थेकरीता चार जाती निर्माण केल्या.

१) ब्राह्मण, २) क्षत्रिय, ३) वैश्य, ४) शुद्र. या सर्व जाती गुण, कर्म, स्वभाव यावर

आधारीत आहेत.

'न जात्या ब्राह्मण श्चात्र क्षत्रियो वैश्य एवच।
न शुद्रौ न च वैम्लाच्छो भेदना 'गुणकर्मभि'॥' म. स्मृ.

चातुर्वर्ण्य मया सृष्टं गुणकर्मविभागशः॥ गीता/४/१३

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप।कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः॥ गीता १८/४१

जोपर्यंत गुण बदलत नाहीत, स्वभाव, कर्म बदलत नाही. तोपर्यंत जाती राहणारच. जात तिला म्हणतात जी कधी जात नाही. १) सत्वगुणी ब्राह्मण, २) सत्व व रजोगुण क्षत्रिय, ३) रजोगुण व तमोगुण वैश्य, ४) केवळ तमोगुण शुद्र. मात्र हे सर्व वर्ण एकाच देवाची अंगे आहेत. मुखापासून ब्राह्मण झाले. बाहुपासून क्षत्रिय झाले. छाती, पोटापासून वैश्य आणि पायापासून शुद्र झाले. हे सर्व अवयव एकमेकांना पुरक आहेत. एक नसून चालणार नाही. तद्वत हे चार वर्ण म्हणजे समाज व्यवस्था होय.

ब्राह्मणोऽस्य मुख मासीद बाहू राजन्यः कृतः।
उरु तदस्य यद्वैश्यः पदभ्यां शूद्रो अजायत॥ म. स्मृ.

जनावरात जाती आहेत. धान्यात, पक्ष्यात, वृक्षात, सापात जाती आहेत मग माणसात असणारच. एखादा समाज सुधारक निर्माण झाला. जाती नष्ट करण्याचा प्रयत्न करु लागला तरी दुसऱ्या जाती निर्माण होतात. उदाहरणार्थ - एखाद्या कंपनीत कामगार, स्टाफ, मॅनेजर, डायरेक्टर या जाती आहेतच. प्रत्येकांचे पगार वेगळे, सुविधा वेगळ्या, राहणीमान वेगळे राहणारच, सगळे एक होऊन कंपनी चालणार नाही. तशी समाजात समानता आली तर समाज चालणार नाही.

समानता आहे ब्रह्मामध्ये, 'विषमता आहे मायेमध्ये.' सगळ्याच्या अंतःकरणात एक देव आहे. बाकी सर्व विषमता आहे. कारण बाकी सर्व मायेचे जग आहे जसे सोन्यात फरक नाही. दागिन्यात फरक आहे. गाडग्या मडक्यात फरक आहे. मातीत फरक नाही. तरंगात फरक आहे. पाण्यात फरक नाही.

प्रश्न निर्माण होतो जाती नष्ट होणार नाहीत का? उत्तर होणार, केव्हा? जर देवास मिळाला तर, देव झाला तर. माऊली दृष्टांत देतात. तोपर्यंत नद-नदी जोपर्यंत गंगेस मिळत नाही. तोपर्यंत वेगळी वेगळी लाकडे जोपर्यंत अग्नित मिळत नाहीत.

जैसे तवचि वहाळ वोहळ। जव न पवती गंगाजळ।
मग होऊनि ठाकती केवळ। गंगारुप।
कां खैर चंदन काष्टे। हे विवंचना तवचि घटे।
जव न घापती एकवटे । अग्नीमाजी ॥ ज्ञाने.
आंबा बोरी वड बाभुळा चंदन। गुणागुण भिन्न अग्नि एक॥ तु. म.

म्हणून संताना जात नाही. कारण ते देव झालेले असतात.

यातायाती धर्म नाही विष्णूदासा। निर्णय तो ऐसा वेदशास्त्री॥ तु. म.
तुका म्हणे याती। हो कां तयाची भलती॥
तुका म्हणे नाही जातीसवे काम। जया मुखी नाम तोचि धन्य॥

जर जीव संत झाला तर त्यास जात रहात नाही. बाकी जाती आहेतच.

बीज मोडे झाड होये। झाडमोडे बीजी सामाये।
ऐसेनि कल्पकोडी जाये। परी 'जाती' न 'नाशे'॥ ज्ञाने.

वेगळ्या चार जाती आहेत

१) कामाजी, २) दामाजी, ३) नामाजी, ४) धामाजी

१) कामाजी - काम हेच ज्याचे जीवन, शब्द, स्पर्श, रुप, रस गंध या विषयामध्ये आयुष्य बरबाद करणारा तो 'कामाजी'.

२) दामाजी - दाम म्हणजे पैसा. पैशाकरीता जीवन घालविणारा तो दामाजी ''पैसा मेरा परमेश्वर, पत्नी मेरी गुरु। बालबच्चे साधुसंत और सेवा किसकी करु॥''

३) नामाजी - जगामध्ये आपले नाव वाढेल किंवा किर्ती राहील याकरीता प्रयत्न करणारे. 'तुका म्हणे ज्यावे। सतकिर्तीने बरवे॥', 'मरावे परी किर्ती रुपे उरावे।' रामदास स्वामी. हा नामाजी.

४) धामाजी - धाम, परमात्म्याचे निवास स्थान. देवाचे ठिकाण गाठण्याकरिता प्रयत्न करणारे धामाजी. परं ब्रह्म परं धाम। गीता. अथवा तरी झडझडोनि वहिला निघ। इये भक्तिचिये वाटे लाग। जिया पावसी अव्यंग। 'निजधाम' माझे॥ ज्ञाने. या चार कोटीवरुन चार जाती निर्माण होतात.

१) कामाजी - शुद्र, २) दामाजी - वैश्य, ३) नामाजी - क्षत्रिय, ४) धामाजी - ब्राह्मण.

संतांनी सर्व जाती एकत्र केल्या. 'यारे यारे लहान थोर। याती भलती नारीनर। करावा विचार। न लगे चिंता कोणासी॥' तु. म. वेदाचा अधिकार ब्राह्मणांना आहे. पण नामाचा अधिकार सर्वांना.

ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शुद्र। चांडाळाही अधिकार।
बाळे नारी नर। आदी करोनि वैश्याही॥ तु. म.

सकळासी येथे आहे अधिकार। कलियुगी उद्धार हरिच्या नामे॥ तु. म.

नामाचा अधिकार सर्व जातीना, नाम सतत घेतले तर जात शिल्लक राहत नाही. कारण तो जीव संत होतो. महात्म्ये ज्या जातीत जन्मास आले. त्या जातीस त्यासंतांच्या नावाने समाज मान देऊ लागला.

★★★★★

४२ : शुद्धी

परमार्थामध्ये शुद्धतेला फारच महत्व आहे. तसे व्यवहारातसुद्धा शुद्धतेला उच्च किंमत आहेच. जसे शुद्ध तेल वगैरे. परमार्थिक शुद्धतेचे प्रकार.

१) आचार शुद्धी - परमार्थात आचरण शुद्ध हवे. शुद्ध म्हणजे काय ?

पंचेद्रियस्य देहस्य बुद्धेश्च मनसस्तथा। द्रव्य देश क्रियाणांच शुद्धिराचार इष्यते॥ शांडिल्य.

पंच इंद्रिये - कान, डोळे, नाक, जिभ, त्वचा, देहाची शुद्धी, बुद्धी, मन, द्रव्य, देह व क्रिया या सर्वांची शुद्धी हवी. शरीराची मलीनता तीन प्रकारची आहे.

१) उत्पत्तीजन्य मल - रेत, रज यापासून
२) इंद्रियजन्य मल - परनारी निरीक्षण, परनिंदा ऐकणे वगैरे
३) आभ्यन्तरिक मल - विकारांच्या (काम,क्रोध, लोभ) स्वाधीन.

उपाय - शरीर - माती, पाणी याने शुद्धता अथवा प्राणायाम, योगासनामुळे.
इंद्रियांची शुद्धता - देवाकडे लावणे
अंतःकरण शुद्धता - प्रेमभक्ति करणे

प्रेमभक्ति जल बिनु रघुरायी। अभी अंतर मल कबहु न जायी॥ तुलशीदास

ज्ञानोबाराय सुद्धा सांगतात पाणी व मातीने शरीराची शुद्धता होते. पण अंतःकरणाची शुद्धता ज्ञानाने होते.

किंबहुना इयापरी। बाह्य चोख अवधारी। आणि ज्ञानदिप अंतरी। म्हणोनि शुद्ध॥ ज्ञाने.

देह शुद्धीस विशेष महत्व नाही, जर अंतर शुद्धी नसेल तर जसे गाढव तिर्थात धुतला, कडू भोपळ्यावर गुळाचे लेपन केले, मृत माणसास शृंगार केला अथवा ओस गृहास तोरण बांधले किंवा उपाशी माणसाच्या पोटावर अन्न बांधले, नवरा नसताना कुंकू व शेंदूर लावले तसे होईल. त्यांच्या भाषेत

मृत जैसा शृंगारिला। गाढव तिर्थी न्हाणीला॥ कडू दुधिया माखीला। गुळे जैसा॥ ज्ञाने.
वोस गृही तोरण बांधीले। उपवासी अन्न लिंपीले। कुंकूंम शेंदूर केले। कांतहिनेने॥ ज्ञाने.

तात्पर्य - मन शुद्धी, चित्तशुद्धी, शुद्ध बुद्धी यास फार महत्व आहे.

करुनिया शुद्ध मन। नारायण स्मरावा॥ तु. म.

चित्तशुद्ध तरी शत्रू मित्र होती। व्याघ्रहि न खाती सर्प तया॥ तु. म.

चित्त सुचित करी, मन सुचित करी। न धरी तू विषयाची सोय॥ ज्ञान.

तैसे चित्त शुद्ध नाही। तेथे बोध करील कायी॥ तु. म.

शरीर आतून बाहेरुन शुद्ध ठेवणे यास आचार शुद्धी म्हणतात हेच खरे संतांचे पूजन आहे.

शुद्धचर्या हे संतांचे पूजन। लागतचि नाही धन वित्त॥ तु. म.

२) अन्नशुद्धी - यालाच आहार शुद्धी म्हणतात आहार शुद्धीमुळेच आचार शुद्धी होते. कारण माणूस जसे खातो त्याप्रमाणे त्याचे शरीर व अंतःकरण बनत असते. म्हणून गीतेत तीन प्रकारचे 'आहार' सांगितले आहेत. सात्विक, राजस, तामस.

१) फलाहार, दुध, तूप, शाकाहार यास सात्विक आहार म्हणतात.
२) जास्त तिखट, खारट, तळलेले पदार्थ यास राजस आहार म्हणतात.
३) सडलेले, शिळे, करपलेले अन्न यास तामस आहार म्हणतात. मांसाहार खरे पहाता माणसांचा नाहीच. कारण शाकाहारी पशू व मांसाहारी पशू यामध्ये फरक आहे. मांसाहारी पशूंना वेगळे दात असतात व ते जिभेने पाणी पितात. शाकाहारी पशू तोंडाने पाणी पितात. आपण जिभेने पाणी पीत नाही. तोंडाने पाणी पितो म्हणून मांसाहार निसर्गता माणसांचा नाही. शाकाहारी व मांसाहारी यांचा जपानमध्ये प्रयोग केला व निष्कर्ष काढला १) शाकाहारी माणूस मांसाहारी माणसापेक्षा चांगला दिसतो. २) शाकाहारी माणूस मांसाहारी माणसापेक्षा निरोगी राहतो. ३) शाकाहारी माणूस मांसाहारी माणसांपेक्षा हुशार असतो. ४) मांसाहारी माणूस शाकाहारी माणसांच्या अगोदर (वर) जातो. मग मांसाहार करावाच कां ?

अन्नाचे तीन दोष आहेत. १) उपाय, २) क्रिया, ३) स्वरुप.

१) क्रिया दोष - अन्न बनविणारी माणसे शुद्ध हवीत. हॉटेलमध्ये चवदार पदार्थ मिळतील पण पवित्र नसतील. पण घरी आई, बहीण, बायको, मुलीने बनवलेली चटणी भाकरी शुद्ध असेल यास क्रिया दोष म्हणतात. (मात्र विटाळाच्या काळात नव्हे.)

२) स्वरुप दोष - अन्न कोणत्या प्रकारचे आहे. मांसाहार कां शाकाहार, सात्विक, राजस कां तामस. यास स्वरुप दोष म्हणतात.

३) उपाय दोष - अन्न दान करणारा कष्टाच्या पैशाचे अन्न देतो कां चोरीच्या पैशाचे नाहीतर एक साधू जेवत असताना श्रीमंताचा चांदीचा पेला झोळीत घातला. त्यास पश्चात्ताप झाला. व कळले श्रीमंताने अन्नदान केले पण काळ्या पैशाचे, त्यामुळे चोरीची बुद्धी झाली. यास उपाय दोष म्हणतात.

श्रीकृष्णानी दुर्योधनाचे छप्पन भोग टाळले व विदुराच्याघरी कण्या खाण्यास गेले. माणूस जे अन्न खातो त्याचे तीन भाग होतात. १) मैला शरीराबाहेर फेकला जातो. २) हाडे, रक्त, रेत, केस, नखे, स्नायू वगैरे बनते. ३) मन, बुद्धी, चित्त बनत असते. ज्ञानोबाराय म्हणतात

प्रत्यक्ष पाहे पा विरा। जो सावध घे मदिरा। तो होऊनि टाके माजिरा। तियेचि क्षणी।
कां अमृत जयापरी। घेतलिया मरण वारी। कां आपुलिया ऐसे करी। जैसे वीष॥

आपला नेहमीचा अनुभव आहे जो दारु घेतो तो उन्मत्त होतो. अमृत घेतल्यास मरण नाहीसे होते व विष घेतले तर माणूस मरतो. म्हणून सात्विक आहार सेवन करावा. त्यामुळे विचार शुद्धी पण होते.

३) नाम शुद्धी - बाकीची नामे कदाचित शुद्ध नसतील पण श्रीहरीचे नाम मात्र शुद्ध आहे.

भेदभाव तोडूनि घेतला प्रेमाचा गरुळा।
शुद्ध नाम श्रीहरिचे निजमुखी लागला चाळा॥ नाथ.

नाम शुद्ध आहेच पण त्याबरोबर भावशुद्धी हवी.

४) भाव शुद्धी - शुद्ध भाव देखोनिया गाव सोनयाचा दिधला॥ नाम. सुदाम्याचा शुद्ध भाव होता त्यामुळे सुवर्ण नगरी मिळाली.

भावशुद्ध नामावळी। हर्षे नाचू पिटू टाळी।
घालू पायातळी। कळिकाळ या बळे॥ तु. म.

नाम शुद्धी व भावशुद्धीमुळे संतांनी कळिकाळ पायातळी घातला.

५) काळ शुद्धी - गीतेत शुद्ध काळ व अशुद्ध काळ सांगितले आहेत. शुद्धकाळ - उत्तरायण, शुद्ध पंधरवडा, दिवस यास शुद्ध काळ म्हणतात. भिष्माचार्यांनी शरपंजर स्विकारले व मरणाकरीता शुद्ध काळ साधला. कारण या काळात योगी परम गतीस जातात.

म्हणौनि 'काळशुद्धी' जरी देह ठेविती। तरी ठेवत खेवी ब्रह्मचि होती।
येरवी अकाळी तरी येती। संसारा पुढती॥ ज्ञाने.

६) देश शुद्धी - ज्या ठिकाणी संत वास्तव्य करतात. तिर्थ, क्षेत्र आहे. शिवालय, मंदिर आहे. ज्या ठिकाणी सतत भजन चालते तो देश शुद्ध समजला जातो.

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः॥ गीता ६/११

'घरी ज्ञानेश्वरी पारायण करणे व आळंदीत माऊलीच्या समाधी शेजारी पारायण करणे यात फार अंतर आहे.

७) द्रव्य शुद्धी - स्वतःच्या कष्टाने पैसा मिळविणे यास द्रव्यशुद्धी म्हणतात.

कथा विक्रय न करावा। दान परिग्रहो न घ्यावा।
स्वकष्टार्जित मेळवावा। तोचि ग्रास आपुला॥ नाथ.

८) मायबाप शुद्धी - चांगले (शुद्ध) आईवडिल असतील तर मुले चांगली उपजतात.

शुद्ध बिजा पोटी। फळे रसाळ गोमटी॥ तु. म.
तुका म्हणे सुख पावे या वचनी। ज्याची शुद्ध दोन्ही मायबापे॥ तु. म.

यात चार प्रकार पडतात

उन्मादो मातृदोषेन पितृ दोषेन मुर्खता।
कार्पण्य वंश दोषेन कर्म दोषात दरिद्र्यता॥

अर्थ - मूल उन्मत्त - आईचा दोष, मूर्खता - वापाचा दोष, कृपण - वंशाचा दोष, दारिद्र्य - कर्माचा दोष.

अ) आई वडिल वाईट मुलेही वाईट.

झोंडा झोंडगीचे पोटी। फळे विजाती करंटी॥ तु. म.

एक मुलगा आंव्याच्या झाडावरचे पाडाचे आंवे रात्री टॉर्च लावून काढत होता. मालकाच्या लक्षात आले. तो धावत गेला व त्या मुलास दम दिला तुला शिक्षा करण्यास लावतो. तुझे वडिल कुठे आहेत? मुलगा हळूच म्हणाला, ''पलिकडील वरच्या डहाळीवर''. इंद्राने ऋषीपत्नीसी (अहिल्या) व्यभिचार केला. त्याचा मुलगा जयंतने देवपत्नी (सीता) च्या अंगास स्पर्श केला. वापसे वेटा सवाई.

ब) आईवडिल चांगले मुले वाईट.

कश्यप-दिती चांगले पण हिरण्याक्ष व हिरण्यकश्यपु पोटी आले. कारण काय? दितीने कश्यपाकडे संध्याकाळी समागम मागितला. स्त्री हट्टाप्रमाणे कश्यप दितीच्या आधीन झाले व राक्षस पोटास आले. तुकोवाराय म्हणतात.

अन्याय तो त्याचा नव्हे वायचाळा। मायबापा वेळा न साधिली॥

क) आईवडिल वाईट मुले चांगली.

हिरण्यकश्यपूच्या पोटी प्रल्हाद (भक्त शिरोमणी) कसा? हिरण्यकश्यपू तपश्चर्येस निघाला. वाटेत दगडावर 'नारायण' लिहिलेले पाहिले अपशकून म्हणून मागे फिरला. कयाधुने विचारले परत कां आलात? माझ्या राज्यात माझ्या शत्रूचे 'नारायण' नाव कोणी लिहिले होते. कयाधुने त्यास भजी करुन दिली. परत विचारले तुमच्या सत्तेत कोण धारिष्ट्यवान 'नारायण' लिहितो. 'नारायणच' होते कां? तो म्हणाला होय नारायणच लिहिले होते. झोपेपर्यंत कयाधुने १०८ वेळा नवऱ्याकडून नारायण वदवून घेतले. दोघांचा समागम झाला. दोघांच्या चित्तात नारायण असल्यामुळे त्यांच्या पोटी राक्षस कुळ असून नारायणभक्त प्रल्हाद निपजला.

ड) मायवाप चांगले - मुले चांगली.

आपुलिया हिता जो असे जागता। धन्य माता पिता। तयाचिया॥ तु. म.

विठ्ठलपंत, संन्यासी अंतःकरण व रुक्मिणी माता खडतर तपश्चर्या, कुळ पवित्र त्यामुळे चार सूर्य पोटी आले.

तिन्ही देव जैसे परब्रह्माचे ठसे। जगी 'सूर्य' जैसे प्रकाशले॥ नाम.

रुक्मिणी माता देवास (विठ्ठलास) म्हणते धन्य तिची कुशी की ज्ञानदेव तिच्या पोटी आले.

ऐसे सांगता हरिसी। प्रेम वोसंडले रुक्मिणीसी ॥
म्हणे धन्य धन्य तियेची कुशी। ज्ञानदेव जन्मले ॥ नाम.

धन्य ते बोल्होबा व कनकाई ज्यांच्या पोटी जगद्गुरु तुकोबाराय जन्मास आले.

मातापित्यांचे प्रकार पाहिले. मुलांचे पण पाच प्रकार पडतात.

१) शत्रू - अशी काही मुले आहेत आईवडिलांना मारणारी. उदा. कंस, औरंगजेव वगैरे.

२) ऋणी - वापाचे ऋण फेडण्याकरीता जन्मास येतात. अथवा वाप मुलांचे ऋण फेडतो. समाजात काही मुले वापाचा सर्व संसार पाहतात यांनी फक्त जन्म दिलेला असतो व वाढविलेले असते. बाकी मुले सांभाळतात. मात्र काही वाप मुलांना मुले म्हणजे नातू झाले तरी सांभाळ करतात. यास ऋणी मुले म्हणतात.

३) उदासिन - शुकाचार्यासारखे घराचा त्याग करुन जाणारे अथवा तुकोबारायांचे एक वंधू सावजी घरातून गेले परत आलेच नाहीत. काही मुले लग्न झाल्यानंतर बायकोस घेऊन वेगळे राहतात. बाकी काही पहात नाहीत. यांना उदासिन मुले म्हणतात.

४) सेवक - आई वडिलांची सेवा करणारी मुले.
उदा. श्रावण बाळ, रामप्रभू, पुंडलिकराय वगैरे

५) किर्तीमान - ज्यांच्या किर्तीमुळे आईवडिलांचे नाव अजरामर होते. अशी मुले किर्तीमान मुले. उदा. निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताई.

उभारीला ध्वज तिही लोकावरी। ऐसी चराचरी किर्ती ज्याची ॥ निळो.

असे शुद्ध आईवडिलांचे व मुलांचे प्रकार आहेत.

९) मुखशुद्धी - पानाने अथवा वडीशेपने होते. तुकोबारायांनी मात्र देव घरी आल्यानंतर तुळशीपान दिले होते.

मुखशुद्धी तुळशीदळ। तुका म्हणे मी दुर्बळ। तु. म.

पान फक्त जेवणानंतर खाणे योग्य आहे. नाहीतर ते व्यसन होईल व्यसनांचा तुकोबारायांनी निषेध केला आहे.

पाने खाशी उदंड। अंती जाशी सुकल्या तोंड ॥ तु. म.

१०) सांप्रदाय शुद्धी - सांप्रदाय म्हणजे परंपरेने आलेले ज्ञान. चैतन्य, नाथ व दत्त सांप्रदाय म्हणजे वारकरी सांप्रदाय.

चैतन्य सांप्रदायाचे अध्वर्यू तुकोबाराय
नाथ सांप्रदायाचे अध्वर्यू ज्ञानोबाराय
दत्त सांप्रदायाचे उध्वर्यु एकनाथ महाराज

श्रीगुरु प्रसन्न होये। शिष्य विद्याही किर लाहे।
परी ते फळे सांप्रदाये। उपासलीया ॥ ज्ञाने.

श्रीगुरु प्रसन्न होऊन शिष्यास विद्या देतील पण सांप्रदायाने उपासना केल्याशिवाय फळ प्राप्ति होणार नाही.

निळा म्हणे सांप्रदाय 'शुद्ध'। उपजवी बोध गुरु शिष्या।

असे हे शुद्धीचे दहा प्रकार वर्णन केले आहेत.

★ ★ ★ ★ ★

४३ : धर्म

धर्म म्हणजे काय ?

धारणाद्धर्ममित्याहु धर्मो धारयते प्रजाः।
यस्याद्धारण संयुक्तः स धर्म इति निश्चयः ॥ म. स्मृ.

अर्थ - ज्यामुळे प्रजेचे धारण होते. ज्या आधाराने प्रजा राहते. असा धारण संयुक्त त्यास धर्म म्हणतात.

यतोऽभ्युदयनिः श्रेयससिद्धीः स धर्मः ॥ पतंजली

अर्थ - ज्यामुळे अभ्युदय होतो, ज्यामुळे कल्याण होते त्यास धर्म म्हणतात.

धर्मो विश्वस्य जगतः प्रतिष्ठा। यतो धर्मस्ततो जयः ॥ उप.

अर्थ - धर्मामुळे जगतात प्रतिष्ठा प्राप्त होते. ज्या ठिकाणी धर्म असतो. त्या ठिकाणी निश्चित विजय होतो.

धर्म एव हतो हन्ति, धर्मो रक्षति रक्षितः।
तस्माद्धर्मो न हंतव्यो मा नो धर्मो हतोऽवधीत ॥ सुभा.

अर्थ - धर्माची हत्या करणाऱ्यांची हत्या होते व धर्माचे रक्षण करणाऱ्यांचे धर्म रक्षण करतो. म्हणून धर्माची हत्या म्हणजे अधर्माने वागू नका व आपला घात करुन घेऊ नका.

दहा लोकांना धर्म कळत नाही असे भिष्म धृतराष्ट्रास सांगतात.

दश धर्म न जानन्ति धृतराष्ट्र निबोधतान
मत्त, प्रमत्त उन्मत्त श्रांतः क्रुधो बुभुक्षितः ॥

त्वरमाणस्य लुब्धस्य भितः कामीच ते दश ॥ महाभारत

१) माजलेले, २) वेडे, ३) व्यसनाच्या आधिन असणारे, ४) तहानलेले, ५) क्रोधी, ६) भुकेलेले, ७) घाईत असणारे, ८) लोभी, ९) घाबरलेले व १०) कामी या दहा जणांना धर्म कळत नाही अथवा यांच्याकडून धर्माचे पालन होत नाही.

सर्व माणसांना सुख हवे आहे. मात्र धर्माशिवाय सुख मिळणे शक्य नाही. म्हणून धर्म परायण व्हा.

सुखार्था सर्वभूतानां मता सर्वा प्रवृत्तयः ।
सुखंच न विना धर्मात तस्माद्धर्मपरो भवेत ॥ सुभा.

धर्माची शास्त्रात दहा लक्षणे सांगितली आहेत.

धृती क्षमा शमोऽस्तेयं शौचमिद्रिंयनिग्रहः ।
धीर्विद्या सत्यमक्रोधो दशकं धर्म लक्षणम ॥ सुभा.

अर्थ - १) धैर्य, २) क्षमा, ३) मनोनिग्रह, ४) चोरी न करणे, ५) शुद्धता, ६) इंद्रिय निग्रह, ७) धारणाशक्ति, ८) विद्या, ९) सत्य, १०) अक्रोध. ज्याप्रमाणे सोन्याचे लक्षण आहे, पिवळे दिसणारे, चमकणारे सोने होऊ शकत नाही त्याचे चार कस आहेत. पुरुषाची चार लक्षणे आहेत.

''यथा चतुर्भिः कनकं परिक्षते निघर्षण छेदन ताडण तापैः ।
तथा चतुर्भिः पुरुषः परिक्षते त्यागेन शिलेन गुणेन कर्मणा ॥'' सुभा.

अर्थ - सोन्याच्या चार परिक्षा सोनार करतात. १) काळ्या दगडावर घासून बघतात, २) छेद करतात (आत हिनकस धातूची शंका म्हणून), ३) वाजवून पहातात, ४) अग्नित टाकतात. तशीच पुरुषांची परीक्षा होते. १) देशाकरीता, देवाकरीता, समाजाकरीता काय त्याग केला, २) आचार कसा आहे. काहीकडे त्याग आहे पण सदाचार नाही. ३) काही सदाचारी आहेत पण गुणवान नाहीत. सत्गुण पहावे. ४) कर्म काय करतात. का घरातच बसून राहतात. यावरुन व्यक्तिचे महत्व कळते. तात्पर्य जशी सोन्याची, पुरुषाची लक्षणे तशी धर्माची दहा लक्षणे आहेत.

धर्माचे मुख्य चार प्रकार पडतात.

१) सामान्य धर्म, २) विशेष धर्म, ३) परधर्म, ४) परमधर्म

सामान्य धर्म हा सर्वांकरीता आहे. सर्व पंथामध्ये, याचा विचार होतोच. एका विचारवंताने व्याख्यानात सांगितले शालेय विद्यार्थ्यांना धर्माचे शिक्षण दिले पाहिजे. लगेच त्याच्यावर प्रश्नाचा भडिमार झाला कोणत्या धर्माचे? हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान, बौद्ध कां जैन? तो व्याख्याता गडबडला. त्याचे सरळ उत्तर आहे सर्वांना सर्व धर्मियांना, पंथीयांना, शाळेत सामान्य धर्माचे शिक्षण दिले पाहिजे. सामान्य धर्म कोणता? त्याची वर दहा लक्षणे आलीच आहेत पण मी चारच

देतो आहे. त्यात सर्वांचा समावेश होतो.

१) सदाचार, २) अहिंसा, ३) सत्य, ४) दया.

१) सदाचार -

आचार परमो धर्मः श्रुत्युक्तः स्मार्त एव च।
तस्मात्स्मिन्सदा युक्तो नित्यं स्यादात्मवान द्विजः ॥ म. स्मृ.

अर्थ - आचार हा परमधर्म आहे असे सर्व शास्त्रांचे तात्पर्य आहे. म्हणून ब्राह्मणानी (विशेषता) व सर्वांनीच नेहमी आचार युक्त रहावे.

गंगा म्हणजे ज्ञान, यमुना म्हणजे भक्ति व गुप्त सरस्वती म्हणजे सदाचार या तिघांचा संगम झाला तरच जीवन तिर्थरुप होईल. चौदा वर्षाच्या वनवासात एकदा सीता व राम नदीत पाय धुवून एकत्र बसले होते. सीतेने रामाच्या पायाकडे व आपल्या पायाकडे पाहिले व म्हणाली माझे पाय तुमच्या पायापेक्षा चांगले आहेत. राम म्हणाले माझे पाय जरी निळे असले तरी तुझ्या पायापेक्षा चांगले आहेत. दोघांचे भांडण जुंपले. लक्ष्मण दूर होता त्यास बोलाविले व भांडण मिटवण्यास सांगितले. लक्ष्मण म्हणाले मी नवरा बायकोच्या भांडणात पडत नाही. तुम्ही दिवसा भांडाल व संध्याकाळी भांडण मिटेल. दोघांनी फारच आग्रह केला. सांगितले तुझा निर्णय आम्हा दोघांना मान्य! लक्ष्मणाने रामाच्या पायावर हात ठेवून नंतर सीतेच्या पायावर हात ठेवत म्हटले "आचरणसे ये चरण अच्छे है" सीता माईंनी सामान्य अर्थ घेतला व विजयामुळे हसू लागली व म्हणाली भावोजीनी योग्य निर्णय दिला. माझेच पाय चांगले आहेत. राम खुदकन हसले व म्हणाले लक्ष्मणास विचार त्यास काय म्हणायचे आहे. लक्ष्मण म्हणाला दादा तुम्ही व्याकरण शिकला आहात तुम्हीच अर्थ सांगा. राम म्हणाले लक्ष्मणास म्हणायचे आहे माझ्या पायामुळे तुझे पाय चांगले आहेत. सीता नाराज झाली. रामाने लक्ष्मणास विचारले बरोबर की नाही? लक्ष्मण म्हणाला ५०% बरोबर. राम म्हणाले १००% बरोबर काय? लक्ष्मण म्हणाला दादा मी शब्दात सांगितले आहे पण तुमच्या दोघांच्या लक्षात आलेले दिसत नाही. राम म्हणाले अर्थ काय? आचरणसे ये चरण अच्छे है याचा अर्थ तुमच्या दोघांचेही चरण आचरणामुळे जगात चांगले व सुंदर आहेत. कारण आपण सदाचारी आहात. तात्पर्य सदाचार परम धर्म आहे. सदाचार म्हणजे काय?

''अनाचारेन मालिन्यं अत्याचारेन मूर्खता ।
विचार आचार योयोगः सदाचार स उच्यते ॥ शांडिल्य

अर्थ - अनाचाराने पाप होते. अत्याचाराने मूर्खता, दुष्टता प्राप्त होते. विचार, आचार याचा संयोग म्हणजे सदाचार होय. तुकोबारायांच्या शब्दात

बोले तैसा चाले। त्याची वंदावी पाऊले।

२) अहिंसा - अहिंसा परमो धर्मः ॥ श्रुति

अहिंसा म्हणजे काय? कोणत्याही जीवास काया वाचा मने करुन दुःख न देणे याचे नाव अहिंसा आहे. यापेक्षा उत्तम व्याख्या ज्ञानेश्वर महाराजांची आहे. काया, वाचा, मने करुन दुसऱ्यास सुख देणे. याचे नाव अहिंसा आहे. ही व्याख्या सर्व श्रेष्ठ आहे.

आणि जगाचिया सुखोद्देशे। शरीरे वाचा मानसे।
राहाटणे ते अहिंसे। रुप जाण॥ ज्ञाने.

तुलशीदासाच्या शब्दात

परमधर्म श्रुति बिदीत अहिंसा। परनिंदा सम अघ न गरीसा

अर्थ - श्रुति सांगते अहिंसा परमधर्म आहे व परनिंदेसारखे मोठे पाप नाही.

३) सत्य -

नास्ती सत्यात्परो धर्मो नानृतात्पातकं परम।
श्रुत्तर्हि सत्यं धर्मस्य तस्मात्सत्यं न लोपयेत। म. स्मृ.

अर्थ - सत्यासारखा धर्म नाही. असत्यासारखे पाप नाही. म्हणून सत्याचा लोप होऊ देऊ नका. सत्य हाच धर्म आहे.

पुराणात कथा आहे. एक सत्यवादी राजा होता. त्याचे राज्य सुखी होते. एका रात्री राजाच्या समोर एक दिव्य स्त्री आली म्हणाली मी निघाले. राजा म्हणाले आपण कोण? ती स्त्री म्हणाली मी लक्ष्मी, मी एके ठिकाणी जास्त रहात नाही. राजा म्हणाला काही हरकत नाही. त्यानंतर दिव्य पुरुष निघाला. राजाला सांगितले मी 'यश' आहे. जिथे लक्ष्मी नाही तिथे मी रहात नाही. नंतर किर्ती निघाली. व शेवटी सत्य दिव्य पुरुष पुढे आला व म्हणाला मी पण निघतो. राजा म्हणाला मी सत्यवादी आहे. प्राण गेला तरी आपणास सोडणार नाही. बाकी जाऊ देत. राजाच्या अट्टाहासामुळे सत्य राहिले त्यामुळे लक्ष्मी, यश, किर्ती परत आले.
तात्पर्य - सत्य हा परम धर्म आहे.

धरम न दुसर सत्य समाना। आगम निगम पुराण बखाना॥तुलशीदास

४) दया

दया धर्मका मूल है पाप मूल अभिमान।
तुलशी दया न छोडिये जब तक घट में प्राण॥

दया हे धर्माचे मूळ आहे. असे तुलशीदास सांगतात. म्हणून प्राण असे पर्यंत दया सोडू नका. ज्ञानोबारायांच्या शब्दात

दया तेथे धर्म। धर्म तेथे सुखागम। सुखी पुरुषोत्तम। असे जैसा॥ ज्ञाने.

दया म्हणजे दुसऱ्याचे दुःख पाहून अंतःकरणात कालवाकालव होणे. याचा विस्तार दया क्षमा शांती कोटीत आहे.

२) विशेष धर्म अथवा स्वधर्म - ज्याचा जो वर्ण, आश्रम, कर्तव्य तो त्याचा विशेष धर्म होय. चार वर्ण, जे गीतेत सांगितले आहेत. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र हे वर्ण. यांचे धर्म वेगळे वेगळे आहेत. आश्रम चार, ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ व संन्यास यांचे धर्म वेगळे.

१) ब्रह्मचारी म्हणजे बेरीज, २) गृहस्थ म्हणजे वजाबाकी, ३) वानप्रस्थ म्हणजे गुणाकार, ४) संन्यास म्हणजे भागाकार. तुकोबारायांच्या भाषेत.

ब्रह्मचारी धर्म घोकावी अक्षरे। आश्रमी विचार षट्कर्मी।
वानप्रस्थ तरी संयोगी वियोग। संन्यास तो त्याग संकल्पाचा॥

आता फक्त दोनच आश्रम राहिले आहेत. गृहस्थाश्रम, संन्यासाश्रम या दोघात ज्यांना थारा नाही त्याकरीता वृद्धाश्रम आहेच.

आणखी चार विशेष धर्म तुकोबाराय सांगतात.

स्वामीकाज गुरुभक्ति। पितृ वचन सेवा पती॥

१) सेवकाने स्वामीची सेवा, २) शिष्याने गुरुची सेवा, ३) मुलाने वडिलांची सेवा व आज्ञा, ४) पत्नीने पतीची सेवा हे विशेष धर्म आहेत. पतीव्रतेचा पतीची सेवा हाच परम धर्म आहे.

एकही व्रत एक धर्म नेमा। काया वचन मन पती पद प्रेमा॥ तुलशीदास

ज्ञानोबाराय म्हणतात.

अगा जया जे विहीत। ते ईश्वराचे मनोगत।
म्हणौनि केलिया निभ्रांत। सापडेचि तो॥ ज्ञाने.

हे विहीत कर्म पांडवा। आपुला अनन्य वोलावा।
आणि हेचि परम सेवा। मज सर्वात्मकाची॥ ज्ञाने.

आपले कर्तव्य चोख करणे हा विशेष धर्म पण यात सामान्य धर्माचा अंतर्भाव हवाच.

---

३) परधर्म -

श्रेयान्सधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ गीता ३/३५

स्वतःच्या धर्मात मरण भले पण दुसऱ्याचा धर्म भीतीदायक आहे. परधर्मापेक्षा आपलाच धर्म श्रेयस्कर आहे. ज्ञानोबारायांनी अनेक दृष्टांत देवून ही गोष्ट पटवून दिली आहे.

हे असो वनिता आपुली। कुरुप जरी जाहली। तरी भोगिता तेचि भली। जियापरी॥ ज्ञाने

अर्थ - आपली पत्नीच उपभोगण्यात पुरुषाचे कल्याण आहे. मग ती कुरुप असली तरी.

आणि आपुली माये। कुब्ज जरी आहे। तरी जीजेते नोहे। स्नेह कुन्हे की॥ ज्ञाने.

येरी जिया पराविया। रंभेहूनि बरविया। तिया काय कराविया। बाळके तेणे ॥ ज्ञाने.

अगा पाणियाहूनि बहुवे। तुपी गुण कीर आहे। परी मीना काय होये। असणे तेथे ॥ ज्ञाने.

बालकासमोर रंभादिक स्त्रिया उभ्या केल्या पण ते आपल्या वेड्या वाकड्या आईकडेच जाणार त्यातच त्याचे हित आहे. पाण्यापेक्षा तुपात चांगले गुण आहेत पण माशास पाण्यातच रहाणे श्रेयस्कर. तद्वत स्वतःचा धर्म सोडू नये. परधर्मात जाणे भितीदायक आहे. संभाजी महाराजांना धर्मवीर म्हणतात. का? तर त्यांनी प्राण दिला पण धर्म सोडला नाही.

४) परमधर्म - अनन्य भावाने देवास शरण जाणे. त्याचे सतत नाम घेणे हा परमधर्म आहे. कारण सर्व जाती, सर्व धर्म, सर्व वर्ण, सर्व आश्रम किंबहुना तो विश्वाचा आधार आहे.

सर्वधर्मान्परित्यज मामेकं शरणं व्रज ॥ गीता १८/६६

तैसे धर्मधर्माचे टवाळ । दावी अज्ञान जे कां मूळ । ते त्यजुनि सकळ । धर्मजात ॥ज्ञाने.

हा परमधर्म आहे.

सर्व आश्रम सर्ववर्ण। त्यासी हा 'स्वधर्म' जाण। सांडोनि विकल्पाचे भान। माझे भजन करावे ॥ नाथ.

निज धर्म हा चोखडा। नाम उच्चारु घडघडा। भुक्तिमुक्तिचा सवंगडा। हा भवसिंधु तारक ॥ ज्ञान.

कळे न कळे त्या धर्म। ऐका सांगतो रे वर्म। माझ्या विठोबाचे नाम। अट्टाहासे उच्चारा ॥ तु. म.

तात्पर्य सतत नामस्मरण हा सर्वाकरीता 'परम धर्म' आहे.

१) राम - सामान्य धर्म, २) लक्ष्मण - विशेष धर्म, ३) भरत - विशेषतर धर्म, ४) शत्रुघ्न - विशेषतम धर्म

"गीतेत एका शब्दात काय आहे असा प्रश्न निर्माण झाला तर त्याचे उत्तर 'धर्म'. कारण गीतेच्या प्रथम श्लोकात पहिले अक्षर ध आहे व शेवटच्या श्लोकात शेवटचे अक्षर म आहे. म्हणजे धम - धर्म होय."

★ ★ ★ ★ ★

४४ : कर्म

माणूस जन्मास येतो त्याची तीन कारणे आहेत. १) कर्म, २) पाप, ३) वासना.

१) कर्म -

अगा कर्मी जे उरावे। तै सुख दुःखी फळावे। तयाते भोगावया यावे। देहा एका ॥ ज्ञाने.

येथे आलिये वो याचि निजकार्या। केली कर्मे ती मागील भोगाया ॥ निळो.

२) पाप-

जन्मा येणे घडे पातकाचे मूळ। संचिताचे फळ आपुलिया ॥ तु. म.

३) वासना -

जन्म घेणे लागे वासनेच्या संगे। तेचि झाले अंगी हरिरुप ॥ नाथ.

तात्पर्य कर्माचा भोग भोगण्याकरिता हा देह धारण करावाच लागतो. यात तीन प्रकार पडतात. १) अनिच्छा प्रारब्ध, २) स्वइच्छा प्रारब्ध, ३) परेच्छा प्रारब्ध.

जीवास यावेच लागते हे अनिच्छा प्रारब्ध,
संत स्वतःच्या मर्जीने येतात हे स्वइच्छा प्रारब्ध,
देवास मात्र आणावा लागतो हे परेच्छा प्रारब्ध होय.

दृष्टांत - रेल्वेने प्रवास करणारे दोन प्रकारचे प्रवासी १) तिकीट धारक व पास धारक. तिकीट धारक एकाच वेळी एक तासाच्या आत प्रवास करु शकतो. मात्र पासधारक केव्हाही प्रवास करु शकतो. तिकीट धारक जीव व पास धारक संत. मात्र रेल्वेगाडीच्या उद्‌घाटनास रेल्वे मंत्र्यास बोलवावे लागते. तो देव.

जो देहास येतो त्यास कर्म करावेच लागते जो करत नाही त्यास श्रीकृष्ण गांवढळ म्हणजे मूर्ख म्हणतात ज्ञानोबाराय सांगतात. 'परीस पा सव्यसाची। मूर्ती लाहोनि देहाची। खंती करीती कर्माची। ते गांवढे गा ॥' ज्ञाने. सर्वाना कर्म करावेच लागते. याचे शास्त्रात पाच प्रकार सांगितले आहेत.

१) नित्यकर्म - दररोज जे कर्म करावे लागते त्यास नित्यकर्म म्हणतात.

संध्या स्नानं जपो होमः स्वाध्यायो देवताऽर्चनम।
वैश्वदेवआतिथेयं च सत् कर्माणि दिने दिने ॥ सु. सं.

१) संध्या, २) स्नान, ३) जप, ४) होम, ५) स्वाध्याय, ६) देवपूजा, ७) वैश्वदेव, ८) अतिथी सत्कार या दररोज करण्याच्या क्रिया नित्यकर्मात मोडतात.

२) नैमित्तिक कर्म - वर्षातून ठराविक वेळी जी सत्कर्मे केली जातात. त्यास नैमित्तिक कर्मे म्हणतात. उदा. श्राद्ध, पुण्यतिथी, सत्यनारायण वगैरे. ज्ञानोबारायांच्या भाषेत

आणि सोम सूर्यग्रहणें। येऊनि करविती पार्वणें।
कां मातापिता मरणें। अंकित जे दिवस ॥ ज्ञाने.

३) काम्य कर्म - जे मोबदल्याच्या कामनेने कर्म गेले जाते त्यास काम्य कर्म म्हणतात. उदा. नोकरी, व्यापार व शेती वगैरे

४) प्रायश्चित कर्म - स्वतःच्या हातून पाप घडल्यानंतर ते निवारण करण्याकरिता जे कर्म केले जाते त्यास प्रायश्चित्त कर्म म्हणतात.

५) निषिद्धकर्म - शास्त्राने, संतानी जे कर्म करु नका सांगितले ते करणे त्यास निपिद्ध कर्म म्हणतात. उदा.

द्युतंच मासं मदिराच वेश्या, मृगयार्थ चौर्य परदार सेवा।
एतानि सप्त व्यसनानि लोके घोरातिघोरं नरकं नयन्ति॥ सुभा.

१) घूत, २) मांसभक्षण, ३) दारु सेवन, ४) वेश्यागमन, ५) शिकार, ६) चोरी, ७) परदार गमन ही सात व्यसने लोकांना ताबडतोब नरकास घेऊन जातात.

कर्माचे कालानुरुप तीन प्रकार आहेत.
१) संचित, २) प्रारब्ध, ३) क्रियमान

भूतकाळात जे झाले व आपल्या नावे जमा आहे त्यास संचित कर्म म्हणतात. वर्तमान काळात जे आपण उपभोगतो आहे त्यास क्रियमान म्हणतात. संचितातील व क्रियमानातील भोगून जे उरेल त्यास प्रारब्ध म्हणतात. ज्याप्रमाणे बँकेत पैसे आहेत ते संचित. त्यातील खर्चास काढून खर्च करत आहे त्यास क्रियमान म्हणतात व पहिले संचितातील शिल्लक व क्रियमानातील काटकसर करुन परत शिल्लक टाकतात त्यास प्रारब्ध म्हणतात. तुकोबारायांच्या शब्दात.

केले ते क्रियमाण।झाले ते संचित म्हण।प्रारब्ध जाण।उर्वरीत उरले ते॥

मात्र ही कर्मे संतांना नाहीत.

प्रारब्ध क्रियमान।भक्ता संचित नाही जाण॥ तु. म.

नित्य हरिचिया समागमे बाई।नाही देखिले ते सुख भोगू देही।
संचित प्रारब्ध क्रियमान तेही।गेले हारपोनिया ठायीचे ठायी वो॥ निळो.

कर्म कोणासही भोगल्याशिवाय सुटत नाही. रावण, दशरथ, राम पण या कर्मातून सुटले नाहीत. 'परियेसी गव्हारा सादर' हा माऊलीचा चिंतनीय अभंग आहे.

केले कर्म झाले तेचि भोगा आले।उपजले मेले ऐसे किती॥ नाथ.

कर्म भोगावेच लागते अर्थात वेदाच्या कायद्याप्रमाणे

विश्व हा अनादी ठावो।येथ नियंता ईश्वर रावो।
चावडी न्यावो अन्यावो।निवडी वेद॥ ज्ञाने.

तथापि देवाची कृपा झाल्यास कर्मातून सुटका होते. मात्र देव ही कर्माचे फळ भोगतो कारण लोकांना शंका नको म्हणून. जसे रामाने वालीस मारले. त्यामुळे श्रीकृष्ण अवतारात तो वाली व्याध (भिल्ल) झाला व त्याच्या बाणाने श्रीकृष्णांनी अवतार संपविला. रामाने सीतेचा त्याग केल्यानंतर अश्वमेध यज्ञ केला. १६१०८ दिवस हा यज्ञ चालला होता व दररोज सोन्याची सीता करुन रामाबरोबर बसविली जात होती व संध्याकाळी ब्राह्मणांना दान दिली जात होती. त्या

सत्कर्माचे फळ श्रीकृष्णास १६१०८ बायका मिळाल्या. जसे कर्म तसे फळ मिळत असते.

शंका - मग देवाच्या कृपेने कर्म कसे सुटते? जसे व्यवहारात कायद्याने सुप्रिम कोर्टापर्यंत केस नेली व गुन्हेगारास फांसीची सजा झाली. पण राष्ट्रपतीने दया दाखविली तर सजा रद्द होऊ शकते. तसे देवाने कृपा केल्यास कर्म संपते. महाभारतात, सुदाम देवास सर्व ज्योतिषांनी सांगितले होते आपल्या नशिवी मरेपर्यंत अठरा विश्व दारिद्र्य आहे. (१८ × २० - ३६० दिवस) पण सुदामा श्रीकृष्णाच्या भेटीस गेला. देवाने त्यास आंघोळ घातली व गंध लावण्याकरिता कपाळावर हात फिरविला. तेव्हा त्याची कर्म रेषा पुसली गेली व त्याचवेळी तिकडे सोन्याची सुदामा नगरी तयार झाली.

तुलशी रेखा करमकी भेट सकत नही राम।भेटे तो कछु देर नही समज कियो ये काम॥

तात्पर्य -

एका जनार्दनी भोग प्रारब्धाचा।हरिकृपे त्याचा नाश झाला॥ नाथ.

आता कर्म योगाचा थोडा विचार करु. याचे चार प्रकार. १) कर्म, २) विकर्म, ३) अकर्म, ४) कर्म संन्यास

१) कर्म - वेद शास्त्राने सांगितलेले योग्य कर्म करून ब्रह्मपदापर्यंत मजल मारता येते. पण हे अवघड आहे असे नाथ महाराज म्हणतात.

काम्य कर्मी विघ्न विचित्र।देश काल मंत्र तंत्र।द्रव्य दक्षिणा विधी पात्र।शुद्धी सर्वत्र पाहिजे।

१) योग्य देश, २) योग्य काळ, ३) योग्य मंत्र, ४) योग्य तंत्र, ५) योग्य द्रव्य, ६) योग्य दक्षिणा, ७) योग्य विधी, ८) योग्य पात्र, ९) सर्वत्र शुद्धी.

या सर्व गोष्टी साधल्यास ब्रह्मलोकांपर्यंत जाता येते. कारण १०० यज्ञ करणारा इंद्र व शंभर ब्राह्मणाचे जन्म घेऊन षड्कर्म करणारा ब्रह्मदेव होतो. पण ब्रह्मदेवापर्यंत जन्ममरण आहे.

कैसे थोरिवेचे मान पाहे पां । जो सृष्टी बीजाचा साटोपा ।
तोहि पुनरा वृत्तीचिया मापा।शीग जाहला॥ ज्ञाने.

२) विकर्म - शास्त्राने करु नका सांगितलेले करणें व नरकास जाणे यास विकर्म कर्मे म्हणतात. जशी सात व्यसने. याना ना कैलासवास ना वैकुंठवास ना स्वर्गवास फक्त नरकवासच मिळतो.

३) अकर्म - यासच शास्त्राने, संतांनी कर्म योग म्हटला आहे. शास्त्राने सांगितलेले सत्कर्म करुन ते भगवंतास अर्पण करणे. कर्माचा अहंकार व आसक्ति न धरणे यास कर्म योग म्हणतात. योगः कर्मसु कौश्यल्यम् ॥ गीता. ज्ञानोबाराय म्हणतात 'विधीते पाळीत।निषेधाते गाळीत।मज देऊनि जाळीत।कर्म फळे॥' ज्ञाने. माऊली म्हणते एखादा माणूस असा म्हणेल कां? मला हापूस आंबा आवडत नाही. कारण त्याची साल व कोय कडू असते. तो मूर्ख ठरला जाईल. माणसे

आंबा आवडीने खातात मात्र साल व बी टाकून तद्वत

कर्तृत्वाचा मद। आणि कर्मफळाचा आस्वाद। या दोही नावे बंध। कर्मा चाखी॥ ज्ञाने.

कर्तृत्वाचा अहंकार व कर्मफळाचा त्याग केला तर कर्मच बंधनातून सोडू शकते. पण या दोन्हीतच सर्व जीव अडकले आहेत. फक्त महात्म्ये या दोन जाळ्यांतून पलिकडे गेले व मुक्त झाले. यासच थोडक्यात अकर्म योग म्हणतात.

४) कर्मसंन्यास - संसाराचा त्याग करुन संन्यास घेणे व मुक्त होणे यास कर्म संन्यास म्हणतात. पण देवास कर्म संन्यासापेक्षा अकर्म योग आवडतो. कारण सर्व संन्याशी झाल्यास जगाचा कारभार कसा चालणार? म्हणून अकर्म योगी श्रेष्ठ ठरतो. सर्वांना माहीत आहे शुकाचार्यांचे गुरु जनक हे कर्म योगी होते म्हणून गीतेत त्यांचेच उदाहरण दिले आहे.

देख पां जनकादिक। कर्मजात अशेख। न सांडीता मोक्षसुख। पावते झाले॥ ज्ञाने.

उद्ववापेक्षा श्रीकृष्णास अर्जुन आवडता होता. तात्पर्य आमच्या सर्व संतांनी संसार न सोडता या दोन गोष्टी सोडल्या व संसारच सुखरुप केला. संन्यासी, संतांपेक्षा भारतात गृहस्थी संत जास्त झाले आहेत व श्रेष्ठ ठरले आहेत. असे हे कर्म प्रकार. (ज्ञानोबारायांनी कर्माची व्याख्या सांगितली आहे. ''ऐसा करितेनवीण गोचरु। अव्यक्ति हा आकारु। निपजे जो व्यापारु। तया नाम कर्म॥') एक अशी शंका की मेल्यानंतर जीवा बरोबर कर्म येते कसे? त्याचे उत्तर महाभारतात दिले आहे.

यथा धेनुसहस्त्रेषु वत्सो गच्छति मातरम। तथा यच्च कृतं कर्म कर्तारम् अनुगच्छति॥

अर्थ - ज्याप्रमाणे हजारो गायींमधून वासरु (रेडकू नव्हे) स्वतःच्या आईकडेच दूध पिण्याकरीता कासेस लागते तद्वत ज्याने जे कर्म केले ते दुसऱ्या जन्मी त्याच्याकडेच येत असते.

★ ★ ★ ★ ★

४५ : भेद

भेदाचे बारा प्रकार आहेत.

१) जीव ईश्वराचा भेद - तसा भेद नाही कारण ईश्वराचा अंश 'जीव' आहे.

दर्पणीचे दुसरे भासे। परि ते असे एकचि॥ तु. म.

यास बिंब प्रतिबिंब न्याय म्हणतात.

२) जीव जीवाचा भेद - दोघेही ईश्वराचे अंश असल्यामुळे यात भेद होत नाही.

कोणाही जीवाचा न घडो मत्सर। वर्म सर्वेश्वर पूजनाचे॥ तु. म.

जीव अवघे देव। खोटा नागवी संदेह॥ तु. म.

३) जीव जडाचा भेद - जड सर्व ईश्वररुप असल्यामुळे व जीव ईश्वराचा अंश असल्यामुळे जड व जीव यात भेद होत नाही.

४) जड ईश्वराचा भेद - सर्वच जग ईश्वर रुप असल्यामुळे यात भेद पडत नाही.

विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ॥ तु. म.

५) जडजडाचा भेद - परमात्माच सर्व जग झाल्यामुळे यात भेद संभवत नाही.

कां जे मिया अधिष्ठिलिया प्रकृति। होती चराचराचिया संभूति।
म्हणोनि मी हेतु हे उपपत्ती। घडे यया॥ ज्ञाने.

६) ईश्वर ईश्वराचा भेद - यात पण भेद नाही.

हरिहरा भेद। नाही नका करु वाद॥ तु. म.

७) स्वगत भेद - डाव्या हाताचा व उजव्या हाताचा भेद आहे पण दोन्ही शरीराचे अवयव असल्यामुळे भेद राहत नाही.

८) सजातीय भेद - दोन जातीत भेद नाही. कारण सर्वांच्या अंतःकरणात परमात्मा आहे.

९) विजातीय भेद - दोन भिन्न भिन्न पदार्थ असले तर ते देवाचेच आहेत. म्हणून यात भेद होत नाही.

१०) देश भेद - सर्व देशांत परमात्मा भरुन उरला आहे.

अर्जुना मी नसे। ऐसा कवण ठाव असे॥ ज्ञाने.

११) काळ भेद - सर्व काळात परमात्मा आहे. पूर्वी होता आता 'रिटायर' झाला असे म्हणता येत नाही.

१२) वस्तू भेद - वस्तूत वस्तूत भेद मानता येत नाही. तुकोबारायांच्या एकाच प्रमाणात

देश काळ वस्तू भेद मावळला। आत्मा निर्वाळला जगदाकार॥

भेद हे भ्रमाचे म्हणजेच अज्ञानाचे लक्षण आहे.

असे भेदाचे बारा प्रकार आहेत, जे भ्रमामुळे पडतात. हरिभक्तास कोणताच भेद नसतो कारण त्यांची स्थितीच अभेदामध्ये स्थिरावलेली असते. भेद मायेत आहेत. ब्रह्मात नाहीत. जसे. दागिन्यांत भेद आहे. सोन्यात नाही. गाडग्या मडक्यात भेद आहे. मातीत नाही. तरंगात भेद आहे. पाण्यात नाही.

भाव अभाव (वेदांत विचार) - शरिरास चार अभाव आहेत. परमात्म्यास नाहीत.

१) प्रागभाव - जन्माअगोदर नसणे, गर्भस्थ.

२) प्रध्वंसाभाव - जन्मानंतर नसणे,

३) अनन्योभाव - एके ठिकाणी असणे, अन्य ठिकाणी नसणे.

४) अत्यन्ताभाव - कुठेही नाही (मरणानंतर)

परमात्मा कोणत्याही अभावाचा प्रतियोगी नाही अनुयोगी आहे. कारण तो जन्मा अगोदर आहे. जन्मानंतर आहे. सर्व ठिकाणी आहे. त्यास मरणच नाही. मात्र देह (आपल्या) या उलट आहे. परमात्मा कारण आहे जग कार्य आहे. निमित्य कारण - कुंभार, उपादान कारण - घट.

मात्र परमात्मा अभिन्न, निमित्य उपादान कारण आहे.

★ ★ ★ ★ ★

४६ : जावे कोठे ?

यामध्ये तीन प्रकार आहेत.

१) काही ठिकाणी बोलाविले तरी जाऊ नये. जुगार, दारु पिणे, चोरी वगैरे ठिकाणी, सर्वांना माहित आहे. धर्म राजास जुगार खेळण्याकरिता बोलाविले. फक्त याच वेळी धर्मराजाने श्रीकृष्णाचा सल्ला घेतला नाही. कारण शकुनिमामाने श्रीकृष्ण युद्धात गुंतले असताना धर्म राजास द्युताचे निमंत्रण पाठविले. परिणाम काय झाला. सर्व राज्य हरवून बसला. साध्वी द्रौपदी पणास लावली. शिवाय बारा वर्षे वनवास व एक वर्ष अज्ञातवास पत्करला. शेवटी युद्ध करुन राज्य मिळवावे लागले. हा सर्व परिणाम फक्त एकट्या जुगाराचा. आपण रोज वर्तमान पत्रात वाचतोच दारु पिण्यामुळे बरेच अपघात होतात. तथापि व्यसन करण्याकरिता बोलाविले तरी जाऊ नये.

२) काही ठिकाणी निमंत्रण असेल तरच जावे. उदा. लग्न समारंभास, वारशास वगैरे. दक्षकन्या वडिलांचे निमंत्रण नव्हते. (सती) जाणून मुद्दाम निमंत्रण पाठविले नव्हते. शंकर नको म्हणत असताना सती यज्ञास गेली. फार मोठा अपमान झाला. यज्ञात जावयाचा (शंकराचा) मुद्दाम अपमान करण्याकरीता त्यांची पूजा केली नाही. शेवटी सतीने यज्ञकुंडात देहाचा त्याग केला. दुसऱ्या जन्मी हिमालय व मैना यांच्या पोटी पार्वती म्हणून जन्म घेतला व हजारो वर्षे तपश्चर्या करुन परत शंकरानांच वरले. एक महात्मा म्हणतात शंकरांना राम नाम फार आवडते. पण सतीच्या नावात र ही नाही व म ही नाही. म्हणून तिचा त्याग केला. पार्वती नावात निदान र तरी आहे. उमा नावात म आहे. गौरी नावात र आहे. अपर्णा नावात र आहे. म्हणून पार्वतीचा स्विकार केला.

३) काही ठिकाणी न बोलविता जावे. उदा. मंदिरात प्रवचनास कीर्तनास, जाण्याकरीता निमंत्रणाची वाट पाहू नये.

तुका म्हणे जवळी न पाचारिता जावे। संतचरणी भावे रिघावया॥

आळंदी, पंढरपूर, पैठण देहू या संत गावांना न बोलविता जावे. कारण यांच्या ठिकाणीच मनास व तनास विश्रांती मिळते.

जाशी तरी जाई संताचिया गावा। होईल विसावा तेथे मना॥ तु. म.

संताचिया गावी प्रेमाचा सुकाळ। नाही तळमळ दुःख लेश॥ तु.म.

तुलशीदास सांगतात चार ठिकाणी न बोलविता जावे मात्र यास सती अपवाद ठरते.

जदपि मित्र प्रभु पितु गुरु गेहा। जाइअ बिनु बोलहुँ न संदेहा॥

मित्राच्या, प्रभुच्या, पित्याच्या व गुरुच्या घरी न विचारता जावे. कोणताही संशय धरु नये.

★ ★ ★ ★ ★

४७ : पाश

रामायणामध्ये सात पाश सांगितले आहेत

काळपाश कर्मपाश। धर्मपाश ब्रह्मपाश।
मायापाश मोहपाश। जन्म पाश सातवा॥
काळपाश तो आयुष्य घात। कर्मपाश तो अनैश्वर्यवंत।
धर्मपाश तो आश्रमगत। वेदविहितार्थ ब्रह्मपाश॥
देहममता तो मोहपाश। मुख्य माया तो आशापाश।
कनक कांता हा जन्मपाश। सप्तपाशी जीव बद्ध॥ नाथ.

अथवा

भ्रांतीमाजी सप्तपाश। अहं दारा पुत्र पाश।
गृहदारा धन स्वजनपाश। आशापाश सातवा॥ रामायण (नाथ)

वेगळ्या प्रकारे सात पाश व त्यांचा विचार.

१) ब्रह्मपाश - लंकेमध्ये हनुमंत गेले असता सीतेची ओळख झाल्यानंतर सीतेने झाडाची पडलेली फळे खाण्यांस सांगितले. हनुमंत त्यानिमित्ताने झाडे हलवू लागले. बागेचा विध्वंस केला. अक्षय कुमारास मारले. शेवटी इंद्रजीत आले. त्यांने हनुमान आटोपत नाहीत बघून ब्रह्मास्त्र सोडले. ब्रह्मास्त्राचा अपमान होऊ नये म्हणून हनुमंतानी त्याचा अंगीकार केला व रावणासमोर हजर झाले. हा ब्रह्मपाश होय.

२) आशापाश - सीतामाईस कांचन मृगाची आशा निर्माण झाली. रामास हरणाच्या पाठीमागे पाठविले. इकडे रावण सीतेस घेऊन गेला. आशा हे बंधन आहे. 'आशेचे बांधले। तुका म्हणे वाया गेले॥' 'बंधनाचा तोडू फासा। देऊ आशा टाकोनि॥' तु. म.

३) मायापाश - नारद मुनि श्रीकृष्णाच्या १६१०८ पत्नीपैकी एक पत्नी मागू लागले (ब्रह्म बिघडले) श्रीकृष्णानी सांगितले ज्या ठिकाणी मी नसेल ती पत्नी घेऊन जा. नारद सर्व महाल फिरले पण एक ही घर असे मिळाले नाही की ज्या ठिकाणी श्रीकृष्ण नाही. नारदास मायेचा प्रभाव दाखविण्याकरीता आंघोळीस गेले असता नारदी केले. तिला ६० पुत्र झाले. नारदास मायेचा प्रभाव दाखविला. काम जिंकल्याचा अभिमान झाल्यानंतर पुन्हा शिलनिधी राजाच्या कन्येच्या विवाहप्रसंगी परत विष्णूनी मायेचा प्रभाव दाखविला. हा मायापाश होय.

४) कर्मपाश - देवाना सुद्धा हा पाश आहे. एक मोठा अभंग आहे.

परियेसी गव्हारा सादर। कर्मे निर्वंश झाले सगर।
भिल्ले विंधिले सारंगधर। जाला पुरंदर सहस्त्रनयन॥ ज्ञान.

यामध्ये श्रीकृष्ण, राम, रावण, दशरथ, इंद्र वगैरे सर्वांची यादी आहे. कर्म कोणालाच सुटत नाही. याचा विस्तृत विचार 'कर्म' कोटीमध्ये आहे.

५) यमपाश - देव, भक्त, यांना सोडून हा पाश सर्वांना आहे.

६) भवपाश - चांगदेवांनी यमास १४ वेळा परत पाठविले पण त्यास भवपाश मात्र निवारण करता आला नाही. फक्त भगवंतास शरण गेल्यास हा पाश नाहीसा होतो.

७) ज्ञानपाश - ज्यावेळी शुकाचार्य आईच्या उदरातून बाहेर पडले ते थेट जंगलात पळू लागले. व्यास शुक म्हटल्यास माती झाडे ओ देत होती. एवढा शुकांचा अधिकार. नग्न स्त्रिया व्यासास लाजल्या. पण शुकास लाजल्या नाहीत. तेव्हा शुकाचार्यास अभिमान झाला. मी वडिलांपेक्षा श्रेष्ठ आहे. 'अभिमान लागे शुकाचिये पाठी। व्यासे उफराटी दृष्टी केली॥' तु. म. हा ज्ञानपाश. असे हे पाशांचे प्रकार आहेत. तथापि भक्तास कोणतेच पाश नाहीत. भक्त ऐसे जाणा जे देही उदास। गेले 'आशापाश' निवारोनि॥ तु. म.

'आशापाश' - पाशांचे अनेक प्रकार जरी असले तरी 'आशापाश' सर्वांचा शिरोमणी आहे. हा मुख्य पाश आहे. आशा जवळ जवळ सर्वांना आहे. ज्याला कमी मिळते त्याला व ज्याला जास्त मिळते, त्यास जादा आशा असते. जसे श्रीमंत माणसे वरदक्षिणेच्या नावाने मोठा हुंडा घेतात.

एक श्लोक चिंतनिय असा आहे.

निस्सोवष्टी शतं शति दशशतं लक्षं सहस्त्रादिपो।
लक्षेशां क्षितीपालकं क्षितीपती चक्रेशतां वाच्छंति।
चक्रेशाम सुरराजतां सुरपति ब्रह्मास्पदम् वाच्छंति।
ब्रह्मा शिवपदं शिवो हरिपदं आशावधी को गतः॥ सुभा.

अर्थ - ज्याच्या जवळ काहीच नाही त्यास वाटते शंभर रुपये असते तर बरे झाले असते. शंभर रुपये वाल्यास वाटते हजार असते तर बरे झाले असते. हजारो रुपये असणारा लाख रुपयाची आशा करतो. लाख रुपयेवाला राजा होण्याची आशा करतो. राजा चक्रवर्ती राजा होण्याची स्वप्ने पाहतो. चक्रवर्ती राजा इंद्राची, इंद्र ब्रह्मदेवाची, ब्रह्मदेव शिवपदाची, शिव विष्णूपदाची अपेक्षा करतात. पहा आशा कुठे नेते. बालकांना आशा असते, तरुणांना तर आशा असतेच पण ज्याच्या गोवऱ्या स्मशानात गेल्या त्या म्हाताऱ्यास आशा सुटत नाही. असे शंकराचार्य सांगतात.

अंगं गलीतं पलितं मुण्डं, दशन विहीनं जात तुण्डम।
वृद्धो याति गृहित्वा दण्डं तदपि न मुच्चत्याशा पिण्डम॥

अर्थ - ज्याची गात्रे गलित झाली आहेत. सर्व केस सफेद झाले आहेत. तोंडात एकही दात नाही. एवढा म्हतारा की काठीशिवाय चालता येत नाही. तरी त्यास आशा सुटत नाही. आशा ही अशी विचित्र साखळी आहे ज्याला ही साखळी आहे ते धावतात व ही साखळी ज्यास नाही ते गप्प बसतात.

आशानाम मनुष्याणां काचिदाश्चर्य शृंखला। यया बद्धाः प्रधावन्ति मुक्तास्तिष्टंति पंगुवत॥ सुभा.

आशेचे दास जगाचे दास होतात व ज्याला आशा नाही त्यांचे जग दास होते.

आशाया ये दासास्ते दासाः संति सर्व लोकस्य। आशां येषां दासी तेषां दासायते लोकः॥

तुकोबारायांच्या शब्दात - आशाबद्ध तो जगाचा दास। पूज्य तो उदास सकळ लोका॥

निरपेक्ष भक्तांची सेवा परमात्मा करतो. याचे कारण देवास आशा अहे पण भक्तास नाही. "चित्ती नाही आस। त्याचा पांडुरंग दास॥" तु.म. नदीला मासे पकडण्याकरीता लावलेल्या जाळ्यात मासे, कचरा, लाकडे सर्व पदार्थ अडकतात. फक्त पाणीच बाहेर जाते. तद्वत देवासह सर्व जीव आशेच्या जाळ्यात आहेत. फक्त भक्त यात अडकत नाहीत.

आशाहि परमं दुःखं नैराश्यं परमं सुखं। यथा संछिद्य कान्ताशा सुखं सुष्वाप पिंगला॥ भाग.

या श्लोकावरील दोन ओव्या महत्वाच्या आहेत. जो जगाचा दाता तो आशेत बांधला जातो.

आशा उपजली अनंतासी। निच वामनत्व आले त्यासी।
आशेने दीन केले देवासी। कथा कायसी इतरांचि॥
जगाचा जो नित्य दाता। तो आशेने केला भिके सवता॥
बैऱ्याच्या द्वारी झाला मागता। द्वारपाळता तेणे त्यासी॥ नाथ. भा.

व्यास भागवतामध्ये सांगतात.

गिरिर्महान गिरेराब्धिर्महानब्धेर्नभो महत। नभसोऽपि परं ब्रह्म ततोऽप्याशा दुरत्यया।

अर्थ - पर्वत महान आहे पर्वतापेक्षा समुद्र मोठा, समुद्रापेक्षा आकाश मोठे, आकाशापेक्षा

ब्रह्म मोठे, पण ब्रह्मापेक्षा ही आशा मोठी वाटते. असे आशेचे वर्चस्व आहे. पण भक्तांना नाही.

जयाचिया ठायी पांडवा। अपेक्षे नाही रिघावा। सुखासी चढावा। असणे तेथ॥ ज्ञाने.

तुकोबाराय प्रतिज्ञा करतात.

बंधनाचा तोडू फासा। देऊ आशा टाकूनि॥
बाकी सर्वलोक 'आशेचे बांधले। तुका म्हणे वाया गेले॥' तु. म.

भागवतात भक्तांची पाच लक्षणे सांगितली आहेत त्यात पहिले लक्षण निरपेक्ष आहे.

निरपेक्षं मुनिर्शान्तं निर्वैरं समदर्शिनम् । अनुव्रजाम्यहं नित्यं पूयेयेत्यंघ्रिरेणुभिः ।

अर्थ - निरपेक्ष, मुनि, शांत, निर्वैर, समदृष्टी ही पाच लक्षणे ज्यांची आहेत अशा भक्तांच्या पाठीमागे देव लागतो की ज्यामुळे त्यांच्या चरणाची धूळ देवास मिळावी.

या श्लोकातील तीन ओव्यांचा मोह सुटत नाही.

आटाटीविन न प्रार्थिता। अयाचित अर्थ प्राप्त होता।
तोहि हाती घेता। निरपेक्षता बुडाली॥
अर्थ देखोनि लविन्नला। तो जाण लोभे ओणवा केला।
तोहि उपेक्षुनि निघाला। तो म्या वंदिला सर्वस्वे॥
मार्गी अर्थ पडता। कोणी नाही माझे म्हणता।
तोही हाती घेता। निरपेक्षता बुडाली॥ नाथ.

हनुमंतराय जेव्हा सीतेचा शोध घेऊन सीतेसमोर उभे राहतात. तेव्हा सीता म्हणते माझ्या रामाचे वर्णन कर. तेव्हा हनुमान रामाच्या नाकाचे वर्णन रामायणात करतात.

परमार्थाचे मुख्य बीक। निरपेक्षा तेचि नासीक।
तेणे विण ते निर्नासिक। कैसे सुख सापेक्षा॥ नाथ.

निरपेक्षा हेच नाक आहे. तुकोबाराय म्हणतात देव काही बाबतीत आमच्यापेक्षा बळी असेल पण आम्ही एका बाबतीत देवापेक्षा बळी आहोत.

तुका म्हणे आम्ही देवाहुनि बळी। राहिलो निराळी टेऊनि आशा॥ तु.म.

वर ओवी दिली आहे. गीतेचा श्लोक देतो व इथेच थांबतो.

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः॥ गीता १२/१६

निरपेक्ष भक्त सदा सुखी असतात.

★ ★ ★ ★ ★

४८ : सेवा

सेवा हे परमार्थाचे प्रवेशद्वार आहे. माउली सांगते

जे ज्ञानाचा कुरुटा। तेथ 'सेवा' हा दारवंटा। तो स्वाधीन करी सुभटा। ओळगोनी॥ ज्ञाने.

प्रत्येक माणूस हा कोणाचा तरी सेवक असतोच. यामध्ये सात प्रकार पडतात. सेवक म्हणजे दास.

१) देह - सेवक - काही माणसे फक्त स्वतःच्या देहाची सेवा करत असतात.

त्यावे खावे बरे असावे सदैव। हेचि करी हाव संसारी॥ तु. म.

हा जीव पंचविषयांच्या आहारी गेलेला असतो. दुसऱ्याचा विचार करीत नाही.

२) कुटुंब सेवक (दास) - हा पहिल्यापेक्षा थोडा बरा. घरच्या लोकांची सेवा करतो. "संसार तापे तापलो मी देवा। करिता या सेवा कुटुंबाची॥ तु. म. यामध्ये काही मोठ्या कुटुंबाची सेवा करतात. काही छोट्या कुटुंबाची सेवा करतात. 'हम दो हमारे दो' आईवडिलांकडे विशेष लक्ष नाही. 'बायलेचा दास पित्रासी उदास। भीक भिकाऱ्यास घालू नेदी। तु. म. 'जय जगदंबे पूर्ण कदंबे देह तुज अर्पिला' अशी यांची अवस्था असते.

३) लक्ष्मी - दास (सेवक) - हा रात्रंदिवस पैशाच्या पाठीमागे लागलेला असतो. पैसा संसाराचे साधन आहे. पण हा त्यास साध्य समजतो. अंतःकरणात व डोक्यात संपत्तीशिवाय विचार नाही हा लक्ष्मीदास होय.

४) समाजसेवक - गावचे, तालुक्याचे, अर्थात आपल्या परिसरातील लोकांचे कुटुंब कल्याण कसे होईल. याकरिता आयुष्य वेचतो. त्यांची कामे (सेवा) करतो. मात्र त्यास 'मेवाही' मिळतो. सरपंच, नगरसेवक, आमदार, खासदार यामध्ये मोडले जातात.

५) देशसेवक - ज्यानी आपले आयुष्य देशाकरीता वाहिले. फार मोठा त्याग केला. उदा. बाबू गेनू, सावरकर, टिळक, महात्मा गांधी हे सर्व देशसेवक आहेत. देशाकरीता जीवन समर्पण!

६) देव सेवक - देवाची सेवा करणारा भक्त! रामदास, कृष्णदास, हरीदास.

धन्य आम्ही जन्मा आलो। दास विटोबाचे झालो॥ तु. म.

७) संत सेवक - संतांची सेवा करणारा संतदास.

हे सेवक एकापेक्षा एक श्रेष्ठ आहेत. संसाराची सेवा करणाऱ्यास महाराज 'गाढव' म्हणतात. "कारे दास होसी संसाराचा खर। दुःखाचे डोंगर सोसावया॥ तु. म. गाढवाचे बरेच गुण याच्याकडे असतात. गाढवास बांधावा लागत नाही. गाढवाचा मालक फक्त त्याच्या पायावरुन हात फिरवतो. त्यास वाटते मी बांधलो गेलो. तसे काही जीव घर, नोकरी, नातलग

यांच्यामध्ये बांधलेले असतात. त्यांना समाज, धर्म, देव काही सुचत नाही. अर्थात यांच्यावर कोणीतरी हात फिरवतात! गाढव नेहमी अंधारात जातो. तशी काही मनुष्य गाढवं संसाराच्या अंधारात आयुष्य घालवितात. परमार्थ प्रकाशात कधी येतच नाहीत. गाढव उन्हाळ्यात सशक्त व पावसाळ्यात अशक्त असतो. कारण पावसाळ्यात गाढव चरताना मागे पहातो. त्यास सर्व हिरवे दिसते, वाटते मी काहीच खाल्ले नाही. तशी काही गाढव संसारात तत्पर, आळस नसतो. भजनात झोप आलीच. वारीत आजारी पडतात. म्हणून महाराजांनी यांना गाढवाची उपमा दिली आहे. मग कोणाचे दास व्हावे? तरीच जन्मा यावे। दास विठोबाचे व्हावे।। तु. म. शंका - दास होणे कमीपणाचे लक्षण आहे. पाच जण जिवंत असून मेलेले आहेत असं व्यास म्हणतात. जीवन्तोऽपि मृतः पंच व्यासेन किर्तीतः। दरिद्रो व्याधितोः मुर्खः प्रवासी नित्यसेवकः।। व्यास. दरिद्री, रोगी, मूर्ख, प्रवासी, नित्यसेवक हे जिवंत असून मेल्यासारखे आहेत. परंतु विठोबाचे दास झाल्यानंतर तो मिळेपर्यंत त्याची सेवा. तो भेटला तर तोच आपली सेवा करतो. ''दास्य करि दासाचे उणे न साहे तयाचे। वाढीले ठायीचे। भाणे टाकोनिया धावे।।'' तु. म. बाकीच्यांची सेवा केल्यास आपले पद कोणीही देत नाही. अगदी ब्रह्मदेवापर्यंत. पण हा असा उदार आहे. दासास आपले पद देतो तुज ऐसा न देखे उदाराची राशी। आपुलेचि देशी पद दासा।। तु. म. म्हणून याचा दास होण्यात जीवाचे कायमचे कल्याण आहे. अथवा संतांचे सेवक व्हा. कारण संतांच्या सेवेने देव संतुष्ट होतो. यांची (संतांची) सेवा त्याला पोहोचते. तुका म्हणे देवा। यांची केल्या पावे सेवा।। ज्याप्रमाणे पुत्राच्या विजयाने पिता सुखावतो. तसे संतांच्या सेवेने देव संतुष्ट होतो. ''पुत्राच्या विजये।, पिता सुखावत जाये।। तैसे पूजिता वैष्णव। सुखे संतोषतो देव।। तु. म.

संतांची सेवा म्हणजे पाच जनांची सेवा होते (Five in One)

१) संतांची सेवा - देवाची सेवा होते. कारण संत देव आहेत.

२) संतांची सेवा - संतांची सेवा होते.

३) संतांची सेवा - गुरुची सेवा होते. कारण संत गुरु आहेत. लघु नाहीत.

४) संतांची सेवा - ब्राह्मणांची सेवा होते. कारण संत 'ब्रह्म' आहेत.

तुकीता तुलनेसी ब्रह्म तुकासी आले। म्हणोनि रामेश्वरी चरणी मस्तक टेविले।

५) संतांची सेवा - आईवडिलांची सेवा होते. कारण संत माता पिता आहेत. ''तुम्ही संत माय बाप कृपावंत। तु. म. म्हणून संतांचे सेवक व्हा. तुका म्हणे संतसेवा ।माझ्या पूर्वजांचा ठेवा।।

रामायणातील सेवाभाव ९ प्रकार

१) रामाची सेवा मिळावी म्हणून शंकर हनुमान झाले.

जानि राम सेवा सरस समुझी करब अनुमान। पुरुषा सेवक भए 'हर' ते भे हनुमान।। तुलशीदास.

शंकरांनी विचार केला देव म्हणून रामाची सेवा होणार नाही. नर होऊन सेवा बरोबर होणार नाही. म्हणून नीच योनी पत्करली. शंकर वानर झाले. माणसास तीन गोष्टीची गरज आहे. अन्न, वस्त्र, निवारा. 'अवनी' पतीने या तीनची सोय केली पाहिजे. शंकरानी ठरविले प्रभुची सेवा खूप करायची पण अन्न वस्त्र, निवारा याचा भार स्वामीवर टाकायचा नाही. माकडास अन्न, वस्त्र, निवारा लागत नाही म्हणून शंकर वानर झाले.

२) शंकर जेव्हा हनुमान म्हणून अवतार घ्यायला निघाले. तेव्हा पार्वतीने हट्ट केला. मीपण येणार. शंकर बोलले. मी ब्रह्मचारी राहणार आहे. पार्वती म्हणाली मी तुम्हांस सोडू शकत नाही. शेवटी स्त्री हट्ट पडला. शंकर बोलले हरकत नाही. तू शेपूट हो. रामाच्या सेवेकरीता पार्वती शेपूट झाली. लंका शेपटीने जाळली. शिवाय अठरा पद्म वानरांचे संरक्षण शेपूट करत होती.

३) रामाच्या सेवेकरीता ब्रह्मदेव जांबुवंत झाले.

४) रामाच्या सेवेकरीता आदिशक्ति 'सीता' झाली.

केवळ स्त्री नव्हे सीता। ते निजभक्त तत्वता।
सांडोनि राजभोगा समस्ता। सेवेच्या निजस्वार्था वना आली।। भाग.

५) रामसेवेकरीता शेष लक्ष्मण झाले जन्मापासून मरेपर्यंत सेवाच केली.

६) रामसेवेकरीता शंख, चक्र भरत, शत्रुघ्न झाले.

७) रामसेवेकरीता इंद्र वाली झाला.

८) रामसेवेकरीता सूर्य सुग्रीव झाला.

९) रामसेवेसाठी सर्व भक्त वानर झाले.

निद्रा करीत होतो पायी। लंका घेतली सवेची तई।
माकडे गोवळे गाई। चारीत सवे फिरतसो।। तु. म.

तुकाराम महाराज म्हणतात रामअवतारात आम्ही माकडे होतो. कृष्ण अवतारात आम्ही गोपाळ, गायी होतो. आता पंढरीचे वारकरी आहोत. म्हणून सेवा करा.

तुका म्हणे करा सेवा। आले जीवावरी तरी।।

★ ★ ★ ★ ★

४९ : कीर्तन

कलियुगात कीर्तनास अतिशय महत्व आहे. याच साधनांमुळे कलियुगात देवाची प्राप्ति होऊ शकते असे शास्त्राचे व संतांचे सांगणे आहे.

कृते यद् ध्यायतो विष्णूं त्रेतायां यजतो मखैः।
द्वापारे परिचर्यानाम कलौ तद्हरि कीर्तनात॥ भागवत

कृतयुगात ध्यानामुळे, त्रेतात यज्ञामुळे, द्वापारात पूजेमुळे देवाची प्राप्ति होत होती. पण कलियुगात फक्त कीर्तनामुळे देव मिळू शकतो.

कलियुगांमाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी॥ तु. म.

सकळासी येथे आहे अधिकार। कलियुगी उद्धार हरिच्या नामे॥ तु. म.

कीर्तन म्हणजे काय? कीर्तन म्हणजे नामस्मरण, नामघोष.

'नामस्मरण - स्वतःकरीता'. (वैयक्तिक) 'नामघोष सर्वांनी मिळून'. जशी छोटी नाव एक दोघांना नदीपलिकडे नेते. पण जहाज हजारो माणसांना नेते. कीर्तनाचे महत्व असे आहे. ज्या ठिकाणी कीर्तन होत असते त्या ठिकाणी तिनही देव (ब्रह्मा, विष्णू, महेश) उभे असतात असे नाथ महाराज म्हणतात.

ऐसा संवाद कैलास गिरी। गिरीजेसी सांगे त्रिपुरारी।
एका जनार्दनी सत्य निर्धारी। कीर्तन गजरी उभे तिन्ही देव॥

शंकर पार्वतीस सांगतात

चरणीचे रज वंदी शूळपाणी। नाचती कीर्तनी त्यांचे माथा॥ तु. म.

कीर्तनात जे प्रेमाने नाचतात त्यांचे चरण रज शंकर कपाळास लावतात. विष्णू कीर्तन करणाऱ्यांच्या मागे मागे धावतात. एवढी याना कीर्तनाची गोडी आहे.

तुका म्हणे यासी कीर्तनाची गोडी। प्रेमे घाली उडी नामासाठी॥
देव इच्छी रज चरणीची माती। धावत चालती मागे मागे॥ तु. म.

महाराष्ट्रात कीर्तनाच्या तीन पद्धती आहेत.

१) नारदीय कीर्तन, २) राष्ट्रीय कीर्तन, ३) वारकरी संप्रदाय कीर्तन

कीर्तनाचे जवळ जवळ सहा विषय असतात.

१) स्वरुप कीर्तन - यामध्ये वेदांत विषय, तत्वज्ञान, जीव शिव ऐक्य, अनेक प्रकारचा तात्विक विचार सांगितला जातो.

२) गुण कीर्तन - देवाचे अनेक गुण आहेत. त्यापैकी महत्वाचे सहा गुण आहेत. त्यांचं वर्णन

ऐका यश श्री औदार्य। ज्ञान वैराग्य ऐश्वर्य। हे साही गुणवर्य। वसती जेथ॥ ज्ञाने.

षड्गुण ऐश्वर्य संपन्न। एक भगवंतची जाण॥ तु. म.

करावे कीर्तन। मुखी गावे हरिचे 'गुण'॥ 'गुण' गाईन आवडी। हेचि माझी सर्व जोडी॥ तु. म.

यास गुण कीर्तन म्हणतात.

३) धर्म कीर्तन - यामध्ये धर्माचे महत्व, धर्म म्हणजे काय, धर्माची लक्षणे वगैरे विषय असतात. किंबहुना तुमचे केले। धर्मकीर्तन हे सिद्धी नेले। तेथ माझे जी उरले। पायीकपण। ज्ञाने.

४) लिला कीर्तन - ज्या कीर्तनामध्ये श्रीकृष्ण लिला वर्णन करतात त्यास लिला कीर्तन म्हणतात. गाईन ते लिला चरित्र पवाडे। राखिले सवंगडे सहित गाई॥ तु.म. थोडक्यात जे प्रसादाचे म्हणजेच काल्याचे कीर्तन.

५) नामसंकीर्तन - या कीर्तनामध्ये नामस्मरण, नामाचे महत्व, नामाचे फायदे असे नामविषयक वर्णन असते त्यास नामसंकीर्तन म्हणतात. हे कीर्तन सर्वात सोपे आहे.

नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची॥ तु. म.

नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोटी गेली त्याची॥ ज्ञान.

६) संतकीर्तन - ज्या कीर्तनात संतांची स्तुती, संताचे महिमान, संतांचे कार्य याचे वर्णन येते त्यास संत कीर्तन म्हणतात. देवास संतांची स्तुती फार आवडते.

ये मे भक्तजनाः पार्थ न मे भक्ताश्च ते जनाः।
मद्भक्तानांच ये भक्तास्ते मे भक्ततमाः मता॥

हे पार्थ, माझे भक्त ते एवढे मला आवडत नाहीत. पण भक्तांचे भक्त फार आवडतात.

तेही प्राणापरौते। आवडती हे निरुते। जे भक्तचरित्राते। प्रशंसती॥ ज्ञाने.

हे कीर्तनाचे सहा प्रकार. नाथ महाराज सांगतात त्यास कीर्तन म्हणतात. ज्यामुळे श्रीहरीची मूर्ती हृदयात ठसली जाते.

जेणे करोनि मूर्ती अंतरी ठसावी श्रीहरीची। ऐसी कीर्तन मर्यादा आहे संताच्या घरची॥

भाषणापेक्षा व्याख्यान श्रेष्ठ, व्याख्यानापेक्षा प्रवचन श्रेष्ठ, प्रवचनापेक्षा कीर्तन श्रेष्ठ याची अनेक कारणे आहेत.

कीर्तनकारास १) इतिहास, पुराण, शास्त्र याचे ज्ञान पाहिजे. त्याचबरोबर साहित्य, व्याकरण, अलंकार, शब्द कोट्या याची माहिती हवी. २) ताल, सूर, पक्के हवेत. ३) नाचता आले पाहिजे," नाचू कीर्तनाच्या रंगी। ज्ञानदिप लावू जगी॥ नाम. ४) सभाधीटपणा पाहिजे.

५) समयसूचकता हवी, ६) उत्कृष्ट वाक्‌चातुर्य हवे, ७) उच्चार स्पष्ट हवेत. ८) अफाट पाठांतर पाहिजे, ९) कीर्तनावरोवर वर्तनपण सदाचारी हवे. तरच तो चांगला कीर्तनकार होऊ शकेल.

कीर्तनाची पथ्ये - पथ्यांचे दोन प्रकार - १) सेव्य पथ्य, २) वर्ज पथ्य.

१) सेव्य पथ्य - अ) कीर्तन श्रद्धेने झाले पाहिजे

'भावे गावे गीत। शुद्ध करोनिया चित्त ॥ तु. म.

ब) कीर्तन सतत झाले पाहिजे

सततं कीर्तयन्तो मां यतन्तश्य दृढव्रतः ॥ गीता

२) वर्ज पथ्य. ना) कीर्तन निष्काम हवे - कोणतीच अपेक्षा नका ॥ तु. म.

रा) कीर्तन निष्पाप पाहिजे - पाप सोडून कीर्तन करावे.

''शरण मी आलो तुज निवारोनिया पापा'' । तु. म.

य) कीर्तन दंभ रहित व्हावे - लोकांना दाखविण्याकरीता नाही. देवाच्या प्रसन्नतेकरीता.

थुंकोनिया मान । दंभ करीतो कीर्तन । तु. म.

यास निर्दंभ कीर्तन म्हणतात.

ण) निरव्यभिचारी - म्हणजे एकाच देवाची उपासना. एकनिष्ठ कीर्तन, अर्थात व्यभिचार रहित कीर्तन. जसा बालक मातेशी, मासा पाण्याशी अनन्य. तसा एकाच देवाशी अनन्य ते निर्व्यभिचारी कीर्तन. अशी ही कीर्तनाची सहा पथ्ये आहेत.

अशा प्रकारे सर्व संतांनी कीर्तन केले व ब्रह्मरुप झाले. कीर्तनामुळे तन (शरीर) ब्रह्मभूत होते.

ब्रह्मभूत काया होतसे कीर्तनी । भाग्य तरी ऋणी देव ऐसा ॥ तु. म.

कीर्तन चांग कीर्तन चांग । होय अंग हरिरुप । तु. म.

ही कीर्तनाची महती आहे. कीर्तनामुळे आम्ही शुद्ध झालो असे महाराज म्हणतात.

संसाराचे अंगी अवघीच व्यसने । आम्ही या कीर्तने शुद्ध झालो ॥ तु. म.

असे हे कीर्तनाचे महत्व, कीर्तनाचे प्रकार, कीर्तनाची पथ्ये आणि कीर्तनाचा फायदा म्हणून कीर्तन करावे व कीर्तन ऐकावे. 'कीर्तनास नर हो तुम्ही जागा।'

दिव्य कीर्तन -

प्रल्हादस्तालधारी तरलगतितयाचोद्धवः कास्यधारी।
वीणाधारी सुरर्षिः स्वरकुशलतया रागकर्तार्जुनऽभूत।
इंद्रोऽवादीन्मृदङ्ग, जयजय सुकराः कीर्तनं ते कुमारा।
यत्राग्रे भाववक्ता सरस रचनया व्यासपुत्रे बभूव ॥ भा.

अर्थ - ज्या कीर्तनात प्रल्हाद तालधारी आहे. उद्धव टाळ वाजवितो आहे. नारद विणाधारी आहेत. स्वरामध्ये कुशल असणारे अर्जुन राग गात आहेत. इंद्र मृदंग वाजवित आहे. सनकादिक कुमार जयजयकार करत आहेत व सर्वांच्यापुढे व्यासपुत्र शुकाचार्य भावपूर्ण अर्थ सांगत आहेत

कीर्तनाचे फायदे चैतन्य महाप्रभु सांगतात.

चेतोदर्पणमार्जनं भवमहादावाग्नि निर्वापणं।
श्रेयः कैरवचन्द्रिका वितरणं विद्यावधु जीवनं।
आनंदाम्बुधिवर्धनं प्रतिपदं पूर्णामृतास्वादनं।
सर्वात्मस्वपनं परं विजयते श्रीकृष्ण संकीर्तनं ॥ चैतन्यषट्‌क

१) चित्तरुपी दर्पणास साफ करणारे
२) भवसंसाररुपी दावाग्निस शांत करणारे
३) कल्याण रुपी कलिकेचा विकास करणारे
४) विद्यारुपी वधुचे जीवन असणारे
५) दररोज आनंदरुपी समुद्रांची वाढ करणारे
६) पूर्ण अमृताचा आस्वाद देणारे.

सर्व प्रकारे आत्म्याचे कल्याण करणारे श्रीकृष्ण संकीर्तन आहे.

★ ★ ★ ★ ★

५० : कीर्तनकार

रा) कीर्तनकारांचे दहा प्रमुख प्रकार आहेत.

१) संगीत प्रधान - कीर्तनात संगीतास महत्व देतात. व्याख्यान कमी करणारा.
२) मोद प्रधान - मोद म्हणजे प्रेम. स्वतः प्रेमळ, श्रोतेपण सदगदीत होतात.
३) व्यवहार प्रधान - व्यवहार शिकविणारे, परमार्थ कमी.
४) बोध प्रधान - अंतःकरणात बदल होतो. श्रोता बोधावर येतो.
५) वक्तृत्व प्रधान - वाक्‌चातुर्याने कानामनाची तृप्ती करणारे.
६) तर्कप्रधान - तर्कानी ज्ञान सांगणारा.
७) शास्त्रप्रधान - शास्त्राचा अभ्यास करून शास्त्र सांगणारा.
८) धर्मप्रधान - धर्माची महती, लक्षणे, प्रकार सांगणारा.
९) भक्ति प्रधान - भक्तिचे विवरण करणारा. महत्व सांगणारा.
१०) ज्ञान प्रधान - ज्ञान, विज्ञान, अज्ञान सांगणारा.

म) मानधनावरुन पाच प्रकारचे कीर्तनकार

१) सच्चा - कीर्तनाचे मानधन न घेणारा. एकाच जागी कीर्तन करणारा अथवा फक्त तिर्थ क्षेत्राच्या ठिकाणी सेवा करणारा. 'सच्चा'.

२) अच्छा - देतील तेवढेच घेणारा. लिफाफा (पॉकेट) घरी जाऊन पहाणारा. त्याच्यातच समाधान मानणारा. कमी वाटल्यास दुसऱ्यावेळी न जाण्याचा निश्चय करणारा.

न मांगे मिला दुध बराबर, मांग लिया सो पाणी।
छीन लिया सो खून बराबर कबिर बोले वाणी।

३) बच्चा - सेवेनंतर मंडळाच्या समोर पॉकेट फोडून पहाणारा. कमी असल्यास लहान मुलाप्रमाणे हट्टाने जास्त मागून घेणारा.

४) कच्चा - कीर्तन ठरवितानाच मानधन ठरविणारा. नंतर भांडणे नको म्हणून!

५) लुच्चा - हा कीर्तनकार मानधन ठरवितो. परंतु ज्यांच्याकडे पहिल्यापेक्षा जास्त मानधन मिळत असेल तिकडे जातो. पहिल्या ठिकाणी आपला शिष्य पाठवितो. अथवा आजारी म्हणून तार पाठवितो.

असे हे कीर्तनकारांचे मानधनावरून पाच प्रकार पडतात.

★ ★ ★ ★ ★

५१ : साधक

संसारी माणसापेक्षा साधक श्रेष्ठ आहे. साधकापेक्षा सिद्ध व सिद्धापेक्षा संत श्रेष्ठ आहेत. मात्र संतापेक्षा कोणीही श्रेष्ठ नाही. संसारी माणसे जगात खूप आहेत साधक कमी, सिद्ध फारच विरळे, मात्र संत अति दुर्लभ आहेत. प्रथम जिवाने साधक व्हावे. साधक त्याला म्हणतात जो देव प्राप्तिकरीता साधनावर आरुढ झालेला असतो. ज्यास संसाराचा उवग आलेला असतो.

जे भवस्वर्गा उबगले। मुमुक्षू योग ज्ञाना वळघले।
पुढती नयो इया निघाले। पैजा जेथ॥ ज्ञाने.

तुकाराम महाराज सांगतात साधक कसा असावा?

साधकाची दशा उदास असावी। उपाधि नसावी अंतर्बाह्य॥ १ ॥
लोलुपता काय निद्रेते जिणावे। भोजन करावे परिमीत॥ २ ॥
एकांति लोकांती स्त्रियांसी भाषण। प्राण गेल्या जाण करु नये॥ ३ ॥
संग सज्जनांचा उच्चार नामाचा। घोष कीर्तनाचा अहर्निशी॥ ४ ॥
तुका म्हणे ऐशा साधनी जो राहे। तोचि ज्ञान लाहे गुरुकृपा॥ ५ ॥

साधक उदास असावा. उदास म्हणजे उद् + अस्! उद म्हणजे वर, अस म्हणजे असणे. ज्याची वृत्ती वर देवाकडे आहे. संसाराकडे 'क्षुल्लक' दृष्टीने पहातो. त्यास संसार त्रोटक, लहान दिसतो. एक माणूस म्हणाला मी घोडा पाहिला पण कुत्र्याएवढा दिसला! सर्व लोक वोलले शक्य

नाही. तो बोलला मी वरुन विमानातून पाहिला, मग शक्य आहे. तशी साधकाची उच्च अवस्था हवी. मग संसार लहानच वाटणार. साधकाने कमी झोपावे. कमी खावे.

युक्त आहार विहार। नेम इंद्रियासी सार। नसावी बासर। निद्रा बहु भाषण॥ तु. म.

साधकांनी स्त्रियांच्या बावतीत मात्र अतिशय सावध रहावे. मी जेव्हा वारी घेतली तेव्हा गुरुवर्यांनी दोन सूचना केल्या. १) परस्त्रीगमन, २) परधन अपहार या दोन गोष्टी कटाक्षाने टाळाव्या व दोन गोष्टी सतत पाळाव्या १) नामस्मरण, २) संतसंग. या चार गोष्टीने जीवन सफल होईल. साधकाने स्त्रिसंगा विषयी ८ गोष्टी पाळाव्या.

दर्शनं स्पर्शनं केलि कीर्तनं गुह्यभाषणं। संकल्पोऽध्यवसायश्च क्रियानिष्पत्तिरेवच।
एतन्मैथुनमष्टांग प्रवदंति मनीषिणः। विपरितं ब्रह्मचर्यमनुष्ठेयं मुमुक्षुभिः॥ सुभा.

अर्थ - स्त्रियांचे दर्शन, स्पर्श, स्त्रियांशी वोलणे, गुह्य भापण करणे, संकल्प करणे, त्यांचे वर्णन करणे (कीर्तन), वश करण्याचा प्रयत्न करणे, क्रिया (समागम) करणे. ही मैथुनाची आठ अंगे आहेत. मुमुक्षुनि म्हणजेच साधकांनी या गोष्टीपासून सावध रहावयास हवे. नाथ महाराजांनी साधकाकरीताच चिरंजीव पद लिहिले आहे. त्यानी या श्लोकाचे भाषांतर केलेले दिसते. ते मूळात पहाण्यासारखे आहे.

नारी नासत चार गुण जो नर सन्निध होय।
भक्ति ज्ञान वैराग्य ध्यानमें बैठ न सकतहि कोय॥ कबीरजी

नाग से नागिन बुरी हात लगे तो कट जाय।
नागिनसे नारी बुरी देखत लहरी आ जाय॥ कबीरजी

नारीकी छाया पडत अंधा होय भुजंग।
क्या बोलू उस नरका हाल जो नीत नारी संग॥ कबीरजी

सर्वाचे तात्पर्य नारी संग साधकास वर्ज असावा.

गुजरातमध्ये एक गोधडीया नावाचे साधू होऊन गेले. त्यांच्याकडे एक विधवा वाई आली व म्हणाली मला तुमच्याशी एकांतात बोलायचे आहे. साधू बोलला मी कोणत्याच स्त्रीशी एकांतात बोलत नाही. इथेच सर्वांच्या समोर बोला.

एकांति लोकांती स्त्रियांशी भाषण। प्राण गेल्या जाण करु नये॥ तु. म.

स्त्रियांचा तो संग नको नारायणा। काष्टा या पाषाणा मृत्तिकेचा॥ तु. म.

त्या बाईचा मुलगा महात्म्याकडे गेला व म्हणाला ५ मिनिटे तुम्ही माझ्या आईशी एकांतात भेटू शकत नाही कां? त्या मुलास गोधडीया महाराजांनी आईचे लुगडे आणण्यास सांगितले. त्याने आणले. मुलास प्रवचनास यायला सांगितले व माणसामध्ये बसण्यास विनंती केली. महाराजांनी स्वतःचे धोतर व लुगडे धुतले व सर्वांच्या समोर वाळत टाकले. सर्व लोक प्रवचनास

आले पण प्रवचनावर कोणाचेच लक्ष नाही. कुजवूज चालू झाली. महाराज विघडलेले दिसतात धोतराच्या जोडीस लुगडे कसे? काही उठून गेले. प्रवचन संपले त्या वाईच्या मुलास बोलविले व सांगितले जर तुझ्या आईचे लुगडे, फक्त धुऊन सुकत टाकले तर लोक संशयाने पछाडले मग प्रत्यक्ष एकांतामध्ये भेट घेतल्यास लोक काय म्हणतील? तात्पर्य ही दोन साधने साधकांनी पाळावीच.

साधने तरी हीच दोन्ही। जरी कोणी साधील ॥ १ ॥
परद्रव्य परनारी। यांचा घरी विटाळ ॥ २ ॥

त्यांचा व्यवहार, परमार्थ सुखाचा होतो जे या दोन गोष्टीत सावध असतात

इतुके करी भलत्यापरी। परद्रव्य पर नारी।
सांडूनी अभिलाष अंतरी। वर्ते व्यवहारी सुखरुप ॥ तु. म.

परद्रव्य परनारीचा अभिलाष। एथोनिया ऱ्हास सर्व भाग्या ॥ तु. म.

प्रश्न निर्माण होतो समाजात राहताना स्त्रियांचा संवंध येतो. त्याकरीता तुकोवाराय सांगतात. आपल्यापेक्षा लहान स्त्रियांना मुली, बरोबरीच्या स्त्रियांना बहिणी व वयस्कर स्त्रियांना माता समजाव्या.

पराविया नारी माउली समान। परधनी बाटू नेदी मन।
जिवित्व ते तृणासमान। स्वामीकाजी जाण शूर म्हणो तया ॥ तु. म.

परोपकार नेणे परनिंदा।परस्त्रीया 'सदा' बहिणी माया ॥ तु. म.

जेमिनी एक शास्त्रकार आहेत. उत्तर मिमांसा हे शास्त्र त्यानी लिहीले आहे. व्यास जेमिनीचे गुरु, त्यांचे पण एक शास्त्र आहे त्याचे नाव पूर्व मिमांसा व्यासांनी एक श्लोक लिहला.

मात्रा स्वत्रा दुहित्रा वा न विविक्तासनो भवेत।
बलवान इंद्रिय ग्रामो विद्वान्समपि कर्षति ॥ व्यास

अर्थ - विद्वान माणसाने सुद्धा आई, मुलगी व बहिण यांच्या समवेत एकांतात राहू नये. इंद्रिये एवढी बलवान आहेत. ती त्यांनापण धोका देतील. हा श्लोक जेमिनीना पटला नाही. त्यांनी सागितले झान्यास काय होईल? हा श्लोक पुसून टाका. व्यास म्हणाले नंतर पुसू. पावसाळ्याच्या दिवसात व्यासांनी सुंदर स्त्रीचे रुप धरले व जेमिनीच्या आश्रमासमोर एका झाडाखाली उभे राहिले. अंगावरचे वस्त्र पूर्ण भिजले होते. जेमिनी आश्रमाबाहेर आले. पहातात तो एक तरुण मुलगी समोर उभी आहे. तिला बोलविली. ती लाजू लागली, मी भिल्लाची, आपण ब्राह्मण आपला आश्रम पवित्र! कशी येऊ? जेमिनी म्हणाले माझी परवानगी आहे. ती आत आली. दोघे शेकोटीस बसले. जेमिनी पाघळले व म्हणाले मी आपल्याशी लग्न करु इच्छितो. ती बोलली हे कसे शक्य आहे! मी कुठे, तुम्ही कुठे? मी आपल्याशी लग्न करून सुखी होईल, माझं भाग्य उजळेल. पण एक अट आहे. आमच्या कुळीत अशी पद्धत आहे लग्नाअगोदर वराने वधुस पाठीवर घेऊन अग्निच्या सात

प्रदक्षिणा घालाव्या लागतात. जेमिनी बोलले सात का सातशे घालतो. "कामातुराणां भयं न लज्जा।" लगेच पाठीवर घेतली आश्रमाच्या सात प्रदक्षिणा संपल्या व पाठीवर पाहिले तर दाढी दिसली. व्यास प्रगट झाले. जेमिनी लाजून चक्काचूर झाले. व्यासाच्या चरणावर मस्तक टेवले. व्यासानी विचारले तो श्लोक पुसून टाकू का राहू दे? जेमिनी म्हणाले जोपर्यंत चंद्र सूर्य आहेत तोपर्यंत तो श्लोक तसाच राहू दे.

या दोन गोष्टीवावत जे निष्कलंक आहेत. त्यांच्या चरणाची इच्छा गंगा करते.

परद्रव्य परधन। सर्वथा नातळे ज्याचे मन। गंगादि तिर्थे जाण। चरण स्पर्शन वांछिती ॥ नाथ.

तुकाराम महाराज म्हणतात आम्हास हे विषच वाटते.

परद्रव्य परनारी। झाली विषाचिया परी ॥

परद्रव्याच्या वावतीत पण साधकांनी निष्कलंक असावे. यालाच शास्त्रीय भाषेत 'यम' म्हणतात. आता थोडा नियमाचा विचार करु. यम म्हणजे काय करु नये व नियम म्हणजे काय करावे? साधकाच्या दशेवद्दल 'उज्वलनिलमणी' या ग्रंथात दहा अवस्था दिल्या आहेत. तो श्लोक

चिंताऽत्र जागरोद्वेगो, तानवं मलिनांगता। प्रलापो व्याधीरुन्मादः, मोहो मृत्युदशा दश ॥

१) चिंता, २) जाग्रण, ३) उद्वेग, ४) कृशता, ५) मलिनांगता,
६) प्रलाप, ७) रोग, ८) उन्माद, ९) मोह, १०) मृत्यू.

१) साधकास देव प्राप्तीची सतत चिंता हवी.

तुका म्हणे चिंता वाटे। कोण भेटे सांगेसा ॥
ऐसी चिंता करी सदा सर्वकाळ। रात्रंदिवस हेचि तळमळ।
तुका म्हणे नाही आपुले बळ। जेणे फळ पावेन निश्चयेसी ॥

२) चिंतेमुळे झोप लागत नाही. 'चिंतातुराणां सुखं न निद्रा।'

स्वाद शीण देहभान निद्रा खंडण। पाहिले ताटस्थ उन्मलित लोचन।
अवघे वोसाऊन उरले ते चरण। तुका म्हणे दर्शनापे आले जीवन वो ॥ तु. म.

ही साधकाची दुसरी अवस्था आहे.

३) उद्वेग म्हणजे कशात लक्ष न लागणे. उदासिन असणे.

जावे पंढरीसी उद्वेग मानसी। कई एकादशी आषाढी हे ॥ तु. म.

४) जेवणावर लक्ष नसणे, भोगावर लक्ष नसणे झोप न मिळाल्यामुळे चौथी अवस्था, 'कृशता' म्हणजे शरीर कृश (बारीक) होणे. हाडे दिसावयास लागणे

झुरोनि पांजरा होऊ पाहे आता। येई पंढरीनाथा भेटावया ॥ तु. म.

रामाच्या विरहाने लंकेत सीतेची अंगठी हातात जात होती. असे हनुमानाने रामास सांगितले.

५) मलिनांगता म्हणजे केसाच्या, कपड्याच्या, शरीराच्या स्वच्छतेकडे लक्ष नसणे.

६) प्रलाप म्हणजे देवाच्या नावाने सतत ओरडत राहणे.

७) या सर्व अवस्थेचा परीणाम एकाधी व्याधी (रोग) जडणे.

८) देवाकरीता वेड्यासारखे वर्तन करणे. वेडे होणे. आदरापेक्षा आवड महत्वाची मात्र आवडीपेक्षा वेड श्रेष्ठ.

वेडा झालो वेडा झालो। हरिच्या आलो जागरणा ॥ तु. म.

९) मोह म्हणजे लगन लागणे. एकसारखी टक लागणे. थोडक्यात दिवाना होणे. यास मोह म्हणतात.

"निवाडा करीती दिवानात।" तु. म.

१०) या नऊ अवस्थेचा परिणाम प्रसंगी देवाकरीता 'मृत्यू' पत्करणे.

या सर्व अवस्था एकापेक्षा एक श्रेष्ट आहेत. पण ही सर्व तिव्र साधकाची लक्षणे आहेत. मंद साधकाची नव्हेत. रोग वरा होण्याकरीता औषध पाहिजे पण त्यावरोवर पथ्येही हवीत. पथ्याचे दोन प्रकार वर्ज व सेव्य. वर्ज म्हणजे करु नयेत. सेव्य म्हणजे करावी. परद्रव्य परनारी वर्ज व सतत संत सहवास व सतत नामस्मरण ही सेव्य पथ्ये होत. या दोन गोष्टीत साधकाने गोडी घेतली पाहिजे.

ज्ञानदेवा गोडी संगती सज्जनी। हरि दिसे जनी वनी आत्मतत्वी ॥ ६

ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्ण आवडी सर्वकाळ ॥ १८ (हरिपाठ)

संत संग धरा तुम्ही हरिभजन करा। पाटी लागलासे काळ दात खातो करकरा ॥ ज्ञान.

संत समागम हरिकथा तुलशी दुर्लभ होय। सूत दारा अरु लक्ष्मी, पापी घर भी होय ॥ तुलशी

तात्पर्य - या कोटीत साधकांची वर्ज पथ्ये, अवस्था व सेव्य पथ्ये दिली आहेत. परमात्मा दयाळू आहे. तो फार अंत पहात नाही. पण भेटीची तळमळ मात्र हवी. 'भेटी लागी पंढरी नाथा। जिवा तळमळ लागली व्यथा ॥' तु. म. ज्यास तळमळ आहे तोच साधक होऊ शकतो. साधनावर आरुढ होऊन साध्याची (देवाची) प्राप्ति करून घेतो व मुक्त होतो.

★ ★ ★ ★ ★

५२ : भक्त

भक्त त्याला म्हणतात जो देवापासून विभक्त नाही. (देवळापासून नव्हे) पाच देवांचे पाच भक्त प्रकार आहेत. १) गणेश - गाणपत्य, २) शक्ति - शाक्त, ३) सूर्य - सौर, ४) शंकर - शैव, ५) विष्णू - वैष्णव.

तसे अनेक देवांचे अनेक भक्त आहेत. बहुतेक संसाराचे भक्त आहेत. या कोटीत मात्र वैष्णव भक्तांचे प्रकार पहायचे आहेत. जोपर्यंत सर्वांची नाती तोडून भगवंतासी नाते जोडत नाही तोपर्यंत भगवत् भक्त होऊ शकत नाही.

जब तक नाता जगत में तब तक भक्त न होय।
नाता तोडे हरि भजे भक्त कहावे सोय॥ कबीरजी

देवाचा भक्त तो देवासीच गोड। आणिकासी चाड नाही त्याची ॥ तु. म.

नाती या शब्दाचा अर्थ ना + ती = जी आपली नाहीत ती नाती. शरीर आहे तोपर्यंत नातेवाईकांचा संबंध आहे. शरीर संपले, नाती संपली. पण देवाचा संबंध जीवाशी आहे. म्हणून यास जीवलग म्हणतात.

पांडुरंगे येई वो पांडुरंगे। जीवाचे 'जीवलगे' येई वो पांडुरंगे॥ तु. म.

अनादिकालापासून याचा व आपला संबंध आहे. संबंध ओळखणे याचेच नाव ज्ञान होय.

एक शेठानी तिर्थयात्रेस निघाली तिची ॲम्बेसिडर कार होती. ज्या कार मध्ये चालक धरुन ६ माणसे बसत होती. शेठाणीने चौघींना अगोदरच सांगून ठेवले होते. शिवाय चौघी जवळच्या नातलग व श्रीमंत होत्या १) मोठी मुलगी, २) बहीण, ३) जाऊ बाई, ४) मैत्रिण. या सगळ्याजणी व्ही. आय. पी. बॅगा घेऊनच आल्या. सर्वजणी गाडीत बसल्या. गाडी सुरु होण्याच्या तयारीत असताना विहीण यात्रेच्या तयारीनेच आली. शेठाणीची लहान मुलगी हिच्या मुलास दिली होती. तिला खात्री होती मला यात्रेस नाही म्हणण्याचे धाडस होणार नाही. कारण नुकतेच लग्न झाले होते. शेठाणीस प्रश्न पडला आता कॅन्सल कोणाला करायचे? शेवटी ती म्हणाली ड्रायव्हर आपण खाली उतरा विहीणीस बसू दे. सिद्धांत - हा ड्रायव्हर उतरला तर गाडी पुढे जाईल का? पण सर्वांना उतरुन फक्त ड्रायव्हरच ठेवला तर गाडी वेगाने जाईल. तात्पर्य 'परमात्मा' ड्रायव्हर बाजूस काढून बाकीच्या नातेवाईकांना ठेवले तर जीवनाची गाडी कधीच पुढे जाणे शक्य नाही. तात्पर्य सर्वांचा मनातून त्याग करा व देवाशी नाते जोडा म्हणजेच भक्त व्हा. गीतेमध्ये भक्तांचे चार प्रकार आले आहेत.

१) आर्त - संकटात देवाची आठवण करणारा, उदा. द्रौपदी, गजेंद्र वगैरे
२) अर्थार्थि - धनाकरीता देवाची उपासना करणारा, विभिषण, सुदामा वगैरे

३) जिज्ञासू - देव जाणण्याकरीता देवाचा भक्त असणारा, उदा. जनक - वगैरे.
४) ज्ञानी - देव जाणून देवाची ज्ञानोत्तर भक्ति करणारा, हनुमंत वगैरे.

चतुर्विधा भजन्ते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन।
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ॥ गी. ७/१६

तो पहिला आर्तु म्हणिजे। दुसरा जिज्ञासु बोलिजे।
तिजा अर्थार्थी जाणिजे। ज्ञानिया चौथा॥ ज्ञाने.

देव म्हणतात यापैकी मी ज्यांना आवडतो ते तीन भक्त आहेत. पण मला आवडणारा फक्त ज्ञानी भक्त होय. यास मर्कटन्याय व मार्जार न्याय म्हणतात. माकडीणीच्या पिलास तिला पकडावी लागते मात्र मांजरीण स्वतःच्या दातांनी पिलास इकडे तिकडे नेते. मला मात्र सर्वांना सांभाळावे लागते. असे देव म्हणतात.

म्हणोनि आपुलाल्या हिताचेनि लोभे। मज आवडे तोही भक्त झोंबे।
परी मीची करी वालभें। ऐसा ज्ञानिया एकू। ज्ञाने.

माऊली म्हणतात ज्ञानी भक्त म्हणजे माझे चैतन्यच आहे.

एऱ्हवी ज्ञानिया जो म्हणिजे। तो चैतन्यचि केवळ माझे।
हे न म्हणावे परी काय किजे। न बोलणे बोलो। ज्ञाने.

एकनाथ भागवतात भक्तांचे तीन प्रकार सांगितले आहे. १) उत्तम २) मध्यम ३) प्राकृत

सर्वभूतेषु यः पश्येद्भगवद्भावमात्मनः।
भूतानि भगवत्यात्मन्येष भागवतोत्तमः॥ भा. २/४५

अर्थ - सर्व भूतामध्ये परमात्म्यास पहाणे यास उत्तम भक्त म्हणतात.

ईश्वरे तदधीनेषु बालिशेषु द्विषत्सुच।
प्रेम मैत्री कृपोपेक्षा यः करोति स मध्यमः॥ भा. २/४६

अर्थ - हा भक्त ईश्वरास उत्तम त्याच्या भक्तांना मध्यम व इतरांना अधम समजतो.

अर्चायामेव हरये पूजां यः श्रद्धये हते।
न तद्भक्तेषु चान्येषु सभक्त प्राकृतः स्मृतः॥ भाग. २/४६

अर्थ - हा भक्त फक्त पाषाण प्रतिमेस देव समजतो. देवभक्तांना नमन करत नाही. मग इतरांचा काय पाड?

भक्त देवास किती आवडतात? खरं पाहता भक्ताशिवाय देवास कोणीच विशेष आवडत नाही.

भक्ताहुनि देवा आवडते काही। त्रिभुवनी नाही आण दुजे॥ तु. म.

नावडे वैकुंठ क्षीराचा सागर। घरोनी अंतर राहे दासा॥ तु. म.

देवास स्वतःचे उत्तम घर, वैकुंठ आवडत नाही अथवा सासुरवाडी आवडत नाही. किंबहुना देव सांगतात. मला माझा पुत्र ब्रह्मदेव, शंकर, माझा भाऊ बळीराम, माझी पत्नी लक्ष्मीही मला एवढी आवडत नाही जेवढे मला भक्त आवडतात. किंबहुना माझा आत्माही मला यांच्या एवढा आवडत नाही.

न तथा मे प्रियतम आत्मयोनीः न शंकरः।
न संकर्षणो न श्री नैव आत्माच यथा भवान॥ भागवत

देवा भक्त जिवाहुनि आवडती। सकळही प्रीती त्यांचे ठायी॥ तु. म.

देवाने आपली पत्नी पायाजवळ ठेवली. पुत्र (ब्रह्मदेव) नाभिजवळ ठेवले. भक्त ब्राह्मण छातीजवळ ठेवले. मात्र भक्तांच्या चपला डोक्यावर वाहिल्या.

सत्यभामा दान करी। उजुर नाही अंगिकारी।
सेवकाच्या शिरी। धरुनि चाले पादुका॥ तु. म.

देव दुर्वासाला सांगतात

अहं भक्त पराधीनः ह्य स्वतंत्र इव द्विज।
साधुभिर्ग्रस्त हृदयो भक्तैर्भक्तजनप्रियः॥ भा.

अर्थ - मी भक्तांच्या आधीन असतो. मी स्वतंत्र नाही. साधुंनी तर माझे हृदयच ग्रासले आहे. यापुढे सांगतात माझे भक्त मला आवडतात पण भक्तांचे भक्त मला फार आवडतात.

ये मे भक्तजनाः पार्थ न मे भक्ताश्च ते जनाः।
मद्भक्तानां च ये भक्तास्ते मे भक्ततमाः मताः॥
तेही प्राणापरौते। आवडती हे निरुते।
जे भक्त चरित्राते। प्रसंशिती॥ ज्ञाने.

अशा भक्तांची लक्षणे कोणती गीतेच्या १२ व्या अध्यायात ही सर्व लक्षणे आठ श्लोकात दिली आहेत. यास भक्ताष्टक म्हणतात. हे साधकाचे कंठस्थ हवे.

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च।
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी॥ १२/१३

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः।
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मद्भक्तः स मे प्रियः॥ १२/१४

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः।
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः॥ १२/१५

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः।
सर्वारम्भपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः॥ १२/१६

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न कांक्षति।
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान् यः सः मे प्रियः॥ १२/१७

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः।
शीतोष्ण सुखदुःखेषु समः संगविवर्जितः॥ १२/१८

तुल्यनिन्दास्तुतिर्मौनी संतुष्टो येन केनचित्।
अनिकेतः स्थिर मतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः॥ १२/१९

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते।
श्रद्धधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः॥ १२/२०

विस्तारभयास्तव अर्थ व माऊलीच्या ओव्या देत नाही. त्या मूळात पहाव्या. देव सांगतात तपश्चर्या करणाऱ्यापेक्षा मला ज्ञानी आवडतो. ज्ञान्यापेक्षा योगी आवडतो व योग्यापेक्षा भक्त आवडतो. अर्थात तपी, ज्ञानी व योगी यापेक्षा भक्त श्रेष्ठ आहे.

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः।
कर्मिभ्यश्चधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन॥ ६/४६ गीता

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनान्तरात्मना।
श्रद्धावान्भजतेयो मां स मे युक्ततमो मतः॥ ६/४७ गीता

वर संक्षिप्त अर्थ दिला आहे. योग्यापेक्षा भक्त हे श्रेष्ठ कसे? दृष्टांत - एकदा गोरक्षनाथ व कबीर एकत्र भेटले. गोरक्षनाथ योगी व कबीर भक्त. गोरक्षनाथ म्हणाले आम्ही योगी आपल्यापेक्षा श्रेष्ठ आहोत. भक्त वादात पडत नाहीत. कबीर बोलले आपण श्रेष्ठच आहात. गोरक्षनाथांना परीक्षा हवी होती. गोरक्ष म्हणाले आपण परीक्षाच घेऊ. हट्ट धरला. कबीर म्हणाले काही हरकत नाही. दोघे समुद्राकाठी आले. गोरक्षनाथ म्हणाले मी समुद्रात गुप्त होतो आपण शोधून काढावे. गोरक्षनाथ समुद्रात मासा झाले. मात्र कबीरांनी त्यांना ओळखले, पकडून बाहेर काढले. नंतर कबीर समुद्रात गुप्त झाले. गोरक्षनाथांनी सर्व समुद्र पालथा घातला पण कबीर मिळाले नाहीत. शेवटी गोरक्षनाथांनी शरणांगती पत्करली व प्रगट होण्यास सांगितले. कबीर प्रगट झाले. गोरक्षनाथ म्हणाले मी हरलो. हे समजले, योग्यापेक्षा भक्त श्रेष्ठ आहे. आपण कोण झाला होता, कुठे होता? कबीरांनी सांगितले मी समुद्रात पाणीच झालो होतो. पाण्यात पाणी कसे ओळखणार? असा आहे भक्ताचा श्रेष्ठपणा! म्हणूनच परमात्मा यांच्या घरी सर्व कामे करतो. 'असे भक्तांचिया घरी। काम न सांगता करी।' तुकोबारायांच्या या प्रमाणापेक्षा दुसरे प्रमाण महत्वाचे वाटते. भक्त घरी नसेल तर कदाचित घरी गोंधळ असण्याची शक्यता आहे. म्हणून

त्यांच्या समागमात देव (हरि) असतो. 'भक्त समागमे सर्व भावे हरि। न सांगता करी सर्व काम॥' तु. म. त्यांचा कामारी होतो. 'तुका म्हणे त्यांचा देव सर्वभार। चालवी कामार होऊनिया॥'

भक्त देव, जन - भक्त फरक

१) देवामध्ये विषमता आहे - भक्तामध्ये समता आहे.
२) देव मारतो - भक्त मार खातात.
३) भक्त स्वाभिमानी असतात - अभिमानी नसतात.
४) भक्त संपन्न कदाचित नसतील - समाधानी असतात.
५) भक्त चिंतन करतात - चिंता करीत नाहीत.
६) भक्त लीन असतात - दीन नसतात.

★ ★ ★ ★ ★

५३ : वैष्णव

वैष्णव त्यांना म्हणतात जे विष्णूचेच आहेत.

वैष्णव म्हणो जया। अवघी देवावरी माया॥ तु. म.

विष्णोरयं यतो ह्यासीत्तस्माद्वैष्णव उच्यते॥ विष्णू पुराण

नामदेवराय सांगतात यज्ञ करशील तर याज्ञिक होशील. यात्रा करणारे कापडी होतील. पण केशवाचे नाम घेशील तरच वैष्णव होशील.

नामा म्हणे नाम केशवाचे घेशी। तरीच वैष्णव होशी अरे जना॥

तात्पर्य वैष्णव तेच जे विष्णूचे रामाचे कृष्णाचे हरिचे नाम घेतात यामध्ये चार प्रकार पडतात.

१) अधमाधम वैष्णव - जे कधी कधी देवाची, आठवण होईल तसे नामस्मरण करतात. ते ४ नंबरचे वैष्णव. मात्र जे कधीच नाम घेत नाहीत त्यापेक्षा फारच श्रेष्ठ.

अकबरने बिरबलला विचारले आपला मुलगा किती शिकला आहे. बिरबल म्हणाला थोडं फार शिकला आहे. अकबर म्हणाला थोडे की फार एक सांग. बिरबल बोलला जे काहीच शिकलेले नाहीत त्यापेक्षा फारच व जे फार शिकलेले आहेत त्यापेक्षा थोडं.
Something is better than nothing.

२) अधम वैष्णव - जे सतत नामस्मरण करतात. त्यांना नाथ महाराज अग्रगण्य वैष्णव म्हणतात. हे तीन नंबरचे वैष्णव

निमिषार्ध त्रुटी लव क्षण। जे न सोडिती हरिचरण।
ते वैष्णवामाजी अग्रगण्य। राया ते जाण उत्तम भक्त॥

३) मध्यम वैष्णव - जे स्वतः सतत नामस्मरण करतातच पण सानिध्यांत येणाऱ्या जीवाना

नामस्मरण करण्यास प्रवृत्त करतात त्यांना भाग्यवान वैष्णव म्हणतात हे दोन नंबरचे वैष्णव.

ते सभाग्या नरेषेशु कृतार्था नृप निश्चितम।
स्मरयन्ति ये स्मारयन्ति हरेर्नाम कलौयुगे॥ भागवत

नाशिकमध्ये एक महात्मा होऊन गेले. ज्यानी चार पाच लोकाना पैसे देऊन सांगितले मला राम राम म्हणून चिडवा. मी तुमच्या पाठी लागेल तुम्ही पळायचे. लोकांनी तसेच केले. बाकीच्या लोकांना विशेषता लहान मुलांना वाटले हा साधू राम राम म्हटल्यास चिडतो. नाशिकमधील सर्व मुले त्यांच्या पाठीमागे लागू लागले अर्थात राम राम चिडवत. महात्म्याला फार मोठा आनंद होत असे. या निमित्ताने माझ्या रामाचे नाव मी मुलांना घेण्यास भाग पाडतो आहे.

४) उत्तम वैष्णव - जो सतत नामस्मरण करतो पण ज्याच्या जवळचे जीव नाही. तर निर्जिव वस्तू नामस्मरण करतात. त्यांना उत्तम वैष्णव म्हणावे. हनुमान म्हणाले मी सीता शोधास जातो. पण मी सीता ओळखत नाही. ८० हजार रावण स्त्रियांमध्ये सीता कशी ओळखणार? रामांनी सांगितले माझी सीता जिथे वास्तव्य करीत असेल तेथील राक्षस राम म्हणत असतील. तेथील पशू-पक्षी, झाडे राम म्हणत असतील किंबहुना सीतेकडून जो वारा येत असेल तो सुद्धा राम ध्वनी घेऊन येत असणार.

राम जानकी जीवन। योगीयांचे निजध्यान।
राम राजीव लोचन। तुका चरण वंदितो॥ तु. म.

ज्ञानेश्वर महाराजांच्या समाधीस कान लावले तर रामकृष्णहरि ऐकावयास मिळेल पण ऐकणारा दगड नको. माऊलीच्या सोहळ्यात वीस दिवस सर्व वातावरण माऊलीमयच होते. म्हणून ज्ञानेश्वर महाराज वैष्णव नाहीत, महावैष्णव आहेत.

ज्ञानदेव वैष्णव मोठा। विठ्ठल नामे मुक्त पेटा।
स्नान दान घडे श्रेष्ठा। वैकुंठ वाटा संत गेले॥

शास्त्रामध्ये सहा वैष्णव सांगितले आहेत, ज्यांच्या स्मरणाने पाप नाश होते.

बलिर्बिभीषणो भीष्मः प्रल्हादो नारदो ध्रुवः।
षडेते वैष्णवास्तेषां स्मरणं पापनाशनम्॥ सुभा.

१) बलि, २) बिभिषण, ३) भिष्म, ४) प्रल्हाद, ५) नारद, ६) ध्रुव

वैष्णवांची शास्त्रांनी, संतांनी दोन लक्षणे सांगितली आहेत, बाह्य व अंतर - जो सतत विष्णुचे चिंतन करतो हे अंतर लक्षण, पण वैष्णव ओळखायचे कसे याकरिता बाह्य दोन महत्त्वाची लक्षणे संतांनी सांगितली आहेत. ज्याने बारा ठिकाणी (शरीरावर) गोपीचंदन लावले आहे व ज्याने १०८ मण्यांची तुळशीमाळा परिधान केली आहे. "**तुळशीमाळा शोभती कंठी। गोपीचंदनाची उटी।**"

सहस्त्र विघ्ने लक्ष कोटी। बारा वाटा पळताती॥ ज्ञान.

गोपीचंदन उटी तुळशीच्या माळा। हार मिरविती गळा रे।
टाळ मृदूंग घाई पुष्प वरूषाव। अनुपम्य सुख सोहळा रे॥ तु. म.

तुळशीमाळ गळा गोपीचंदन टीळा। हृदयी कळवळा वैष्णवांचा॥ एकनाथ

कोणत्या बारा ठिकाणी गंध (गोपीचंदन) लावायचे व कोणते नाम घ्यायचे हे पद्मपुराणात लिहिले आहे. ती नांवे व तो शरीराचा भाग -

ललाटे केशवं विद्यात् कंटे श्रीपुरुषोत्तमं। नाभौ नारायणं देवं वैकुंटं हृदयेस्तथा॥१॥
दामोदरे वामपार्श्वे दक्षिणेच त्रिविक्रमं। मुर्धीचैव हृषीकेशं पद्मनाभं पृष्टतः॥२॥
कर्णयो यमुना गंगे बाहो कृष्णं हरिः तथा। यथा स्थानेषु तुष्यन्ति देवता द्वादशा स्मृताः॥३॥
द्वादशेतानि नामानी कर्तव्यो तिलके पटेत। सर्वपाप विशुद्धात्मा विष्णूलोकं स गच्छती॥४॥

१) कपाळ - केशव, २) कंठ - पुरुषोत्तम, ३) नाभी - नारायण, ४) हृदय - वैकुंठ, ५) पोटाची डावी बाजू - दामोदरे, ६) पोटाची उजवी बाजू - त्रिविक्रम, ७) डोक्यावर शेंडीच्या ठिकाणी - हृषीकेश, ८) पाठ - पद्मनाभ, ९) डावा कान - यमुना, १०) उजवा कान - गंगा, ११) डावा दंड - कृष्ण, १२) उजवा दंड - हरि. ह्या बारा ठिकाणी वैष्णवानी गंध लावावे. या बारा विष्णुच्या नामामुळे तो सर्व पापातून मुक्त होऊन विष्णूलोकी जातो. विष्णुचे भक्त वैकुंठास, रामाचे साकेत-धामी (वैकुंठ), कृष्णाचे गोलोकी (वैकुंठ) जातात.

एक मारवाडी प्रवचन ऐकून महात्म्यास म्हणाला की मला एक नियम सांगा. महात्मा म्हणाला, 'खोटे बोलणार नाही' असा नियम करा. मारवाडी म्हणाला, 'हा नियम मला जमणार नाही. कारण मी व्यापारी आहे. रोज खोटे बोलल्याशिवाय व्यापार होत नाही. ५ रुपयांचा माल २५ रुपयांना विकताना गिऱ्हाईकास खूष करण्यासाठी सांगावे लागते, तुम्हाला म्हणून मूळ किंमतीत देतो आहे.' मग महात्मा म्हणाला, 'कोणाची निंदा करू नये, हा नियम पाळा'. मारवाडी म्हणाला, 'हे पण जमणार नाही. कारण दुसऱ्याच्या उखाळ्या-पाखाळ्या काढल्याशिवाय झोपच येत नाही.' मग महात्मा म्हणाला, 'तुम्हीच नियम ठरवा'. मारवाडी म्हणाला, 'माझ्या घरासमोर एक कुंभार वैष्णव रहातो. त्याचा गंध पाहिल्याशिवाय चहा पिणार नाही' महात्मा म्हणाला 'हा नियम तरी व्यवस्थित पाळा'. दररोज कुंभार वैष्णवाचा गंध पाहिल्यानंतर मारवाडी चहा पीत असे. एक दिवस कुंभारदादा पहाटेच स्नान करून गाडी घेऊन माती आणण्यासाठी गावाजवळच्या डोंगरात गेला. मारवाडी उठला पण वैष्णव घरी नाही. त्याच्या पत्नीस विचारले व तसाच पळत गावाबाहेर डोंगरात पळाला. कुंभारदादास माती खोदताना सोन्याच्या मोहरांचा हंडा लागला. त्याच्यावरची माती बाजूस करीत असताना मारवाडी तेथे पोहोचला. कुंभारदादाने कपाळ वर केल्यानंतर मारवाड्यानी गंध पाहिले. "पाहिले" म्हणून मारवाडी परत फिरला. मात्र कुंभार वैष्णवास वाटले याने हंडा पाहिला तो मारवाड्याच्या मागून पळत सुटला व म्हणाला कोणास सांगू

नका. आपण अर्ध्या-अर्ध्या मोहरा वाटून घेऊ. मारवाड्यास पश्चाताप झाला. म्हणाला, 'गंध पाहिल्यास एवढा फायदा, मग गंध लावल्यास किती फायदा होईल?' तात्पर्य 'आम्हा अलंकार मुद्राचे शृंगार। तुळशीचे हार वाहू कंठी।।' तु. म. यासाठी कपाळावरच (सर्व तोंडावर नव्हे) उभा गंध लावावा.

उर्ध्वपुंड्र भाळ कंठी शोभे माळ ।कापिजे कळिकाळ तया भेणे ॥ तु. म.

गंध व तुळशीमाळ पाहून काळ सुद्धा थरथर कापतो. शिवाय गळयात तुळशीमाळ १०८ मण्यांची हवी. तुळशीचे महत्व एका श्लोकात सांगितले आहे.

या दृष्टवा निखिलाघ संघ शमनी स्पृष्टा वपुः पावनी।
रोगाणामभिवन्दीता निरसिनी सिक्तान्तकत्रासिनी॥
प्रत्यासत्ती विधायिनी भगवतः कृष्णस्य संरोपिता।
न्यस्तातच्चरणे विमुक्ति फलदां तस्यै तुलस्यै नमः॥ पद्मपुराण

अर्थ - तुळशीचे दर्शन घेतल्यास पापाचे कळप नाशतात. स्पर्शाने शरीर पावन होते. वंदन केल्यास रोग नाहीसे होतात. पाणी घातल्यास यम घाबरतो. तुळशी रोप लावल्यास कृष्णाजवळ नेते व देव चरणांवर अर्पण केल्यास मुक्ती देते. अशा तुळशीस नमस्कार असो. हे तुळशीचे महत्व आहे. प्रत्येक हिंदूच्या दारी तुळशी वृंदावन हवेच. नाही तर ते घर स्मशान आहे असे तुकाराम महाराज म्हणतात.

जयाचिये द्वारी तुळशी वृंदावन।नाही ते स्मशान घर जाणा॥

तुळशीची आठ नावे

वृन्दा वृंदावनी विश्व पूजीता विश्वपावनी।
पुष्पसारा नंदिनीच तुलशी कृष्णजीवनी॥ पद्मपुराण

१) वृंदा, २) वृंदावनी, ३) विश्वपूजीता, ४) विश्वपावनी, ५) पुष्पसारा, ६) नंदिनी, ७) तुलशी, ८) कृष्णजीवनी.

१०८ मणीच कां?

कारणे - १) देह छत्तीस तत्वाचा, त्याचे तीन गुण (सत्व, रज, तम) ३६ × ३ = १०८ (देहावर तुळशीपत्र म्हणून) मणी

२) नक्षत्रे २७ व त्याचे ४ चरण अर्थात २७ × ४ = १०८ मणी

३) बारा राशी व नऊ ग्रह म्हणून १२ × ९ - १०८ मणी

४) उपनिषदे १०८ म्हणून १०८ मणी (सात्विक उपनिषदे १०८)

५) आमच्या माऊलीने (अष्ठोत्तरशे) १०८ वेळा समाधी घेतली म्हणून १०८ मणी. कारण

ज्ञानेश्वर महाराज वारकरी संप्रदायाचे पाया समजले जातात.

६) जगात १०८ तिर्थे आहेत म्हणून १०८ मणी.

७) हरिपाठ (ज्ञानेश्वर महाराजांचा) हरि हे नाम १०८ वेळा उच्चारले जाते.

वैष्णवाचे नियम 'नेम' या कोटीत सांगितले आहेत.

★ ★ ★ ★ ★

५४ : संत

संत ही पदवी जगात मोठी आहे. संसारी जनापेक्षा साधक श्रेष्ठ, साधकांपेक्षा सिद्ध श्रेष्ठ व सिद्धापेक्षा संत श्रेष्ठ, संतापेक्षा कोणीच श्रेष्ठ नाही. परमात्मासुद्धा यांच्या तुलनेने कमी पडतो. भक्तापेक्षा वैष्णव श्रेष्ठ व वैष्णवापेक्षा संत श्रेष्ठ. भक्त, वैष्णव, संत यांचा क्रम असा लावता येईल, श्रेष्ठ, श्रेष्ठतर, श्रेष्ठतम

संत कोणास म्हणतात.

१) सन् + त =

सन्मार्गवर्तिनः सन्तः तद्रुपेन विद्या विनय वृद्धये
स एव वर्तत इति संतः॥ शंकराचार्य

अर्थ - सन्मार्गाने वर्तन करणारे, देवस्वरुप असणारे, विद्या व विनय यामध्ये परिपक्व दशा गाठलेले, जगद्कल्याणाकरिता अवतीर्ण झालेले त्यांना संत म्हतात.

२)

शांता महान्तो निवसन्ति संतो, वसन्तवल्लोक हितं चरतः।
तीर्णा स्वयं भीमभवार्णव जनान, अहेतुनान्यानपि तारयन्त॥ शंकराचार्य

अर्थ - शांतता व महानता ज्यांच्यात वास करते. लोक हिताकरीता विचरण करतात. जिकडे जातील तिकडे वसंत ऋतुसारखे वातावरण निर्मितात. त्यांचा स्वतःचा भवसागर संपलेला आहे व बाकी सर्वांना कोणताही हेतू न ठेवता भवसागरातून पार करतात. त्यांना संत म्हणावे.

३)

अस्ति ब्रह्मेति चेद्वेद सतमेन ततो विदुः॥ तैतरिय उपनिषद

अर्थ - ज्याला ब्रह्माचा पूर्ण साक्षात्कार झाला. त्यास संत म्हणतात

संतांचे महत्व कळण्याकरीता एक कोटी होते.

१) बुडविणारे - दुष्ट लोक अथवा राक्षस वृत्तीचे जन.

२) बुडलेले - मूर्ख (दुष्टापेक्षा चांगले), व्यसनात लोळणारे

३) बुडणारे - विषयी. आता विलासात, सुखात दिसतात. पण यमाच्या तावडीत सापडले तर?

विषयाचे सुख येथे वाटे गोड। पुढे अवघड यमदंड।

मारीती झोडीती तोडिती निष्ठुर। यमाचे किंकर बहुसाल॥ तु. म.

४) तरणारे - साधक 'काय मी उद्धार पावेन। काय कृपा करील नारायण। ऐसे तुम्ही सांगा संतजन। करा समाधान चित्त माझे॥' तु. म. उद्धाराकरीता रात्रंदिवस चिंता करणारे. असे मुमुक्षु.

५) तरलेले - मुनी - **'मुनी मुक्त झाले भेणे गर्भवासा। आम्हा विष्णूदासा सुलभ तो॥'** तु. म.

चौऱ्याऐंशी लक्ष योनी प्रवर्तले मुनीजन तत्क्षणी॥ ज्ञान. (मदालसा)

६) तारणारे - संत -

अवतार तुम्हा धराया कारण। उद्धराया जन महादोषी॥ तु. म.

बह्ममूर्ती संत जगी अवतरले। उद्धरावया आले दीन जना॥ नाम.

देव एकांतात रुक्मिणी मातेस सांगतात. अर्थात रुक्मिणी माता विचारते हे महाराष्ट्रात एकाच आईच्या पोटी चौघे दिव्य पुत्र मूळचे कोण आहेत व कशाकरीता आले?

देवो म्हणती ब्रह्मा होय। सोपान देव नेणसी काय।

निवृत्ती शिवज्योर्तिमय। ज्ञानदेव ब्रह्म निघोट।

ऐसे ब्रह्मा विष्णू हर। मुक्ताई ते मूळ माया साचार।

तारावया चराचर। कलिमाजी अवतरले॥ नाम.

अर्थ सोपा आहे. मूळचे चार देव एकाच ठिकाणी कलियुगातील लोकांच्या उद्धाराकरीता अवतीर्ण झाले. तात्पर्य उद्धाराकरीता येतात ते संत. संत व जन यामध्ये फार मोठा फरक आहे.

समुद्र नदी नव्हे पै गा। पाषाण म्हणो नये लिंगा।

संत नव्हती जगा। माणसा त्या सारखे॥ तु. म.

नदी समुद्र नव्हे, शिवलिंग पाषाण समजू नये. तद्वत संत माणूस समजू नये. तुकाराम महाराज दुसऱ्या एका अभंगात सांगतात. दुधापासून लोणी व ताक निघते पण दोघांची वेगळी किंमत असते. आकाशात चंद्र व तारे यांना समान समजू नये. पृथ्वीत हिरा सापडला तर त्याची किंमत गारगोटीशी करु नये. तद्वत संत जनासारखे समजू नयेत. ''तुका म्हणे तैसे संत आणि जन। दोहीसी समान भजू नये।' माऊली सांगते.

तो पाषाण माजी परिस। जैसा रसामाजी सिद्ध रस।

तैसा मनुष्याकृति अंश। माझाची जाण॥

ते चालते ज्ञानांचे बिंब। तयाचे अवयव ते सुखाचे कोंभ।

येर माणूस पण भांब। लौकीक भाग॥ ज्ञाने.

संत म्हणजे दगडातील परीस, रसातील अमृत तसे माणसातील देव. ते चालते ज्ञानबिंब

त्यांची इंद्रिये सुखाचे कोंभ. फक्त लौकीक दृष्टीने ते माणूस दिसतात असतात मात्र देवच. तुकाराम महाराजांच्या गाथ्यात २२६ अभंग संतपर आहेत त्याच्यात मला सापडलेले ८ प्रकारचे संतपर अभंग.

१) संतांचे कार्य सांगणारे -

तैसे संत जगी। क्रिया करुनि दाविती अंगी॥ तु. म.

काय वाणू आता न पुरे हे वाणी। मस्तक चरणी ठेवितसे। तु. म. वगैरे

२) संतांचा महिमा सांगणारे -

त्यांचा महिमा काय वर्णू मी पामर। न कळे साचार ब्रह्मादिका॥ तु. म.

३) संतांची लक्षणे सांगणारे -

तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पाहता अवगुण मिळेचिना॥ तु. म.

४) संतांना विनवणी करणारे -

कृपाळू सज्जन तुम्ही संतजन। एवढे कृपादान तुमचे मज॥ तु. म.

५) कृतज्ञता व्यक्त करणारे -

तुम्ही संत मायबाप कृपावंत। काय मी पतीत किर्ती वाणू। तु. म.

६) संत स्वभाव सांगणारे

लेकुराचे हित। जाणे माउलीचे चित्त॥ तु. म.

७) संतांमुळे काय फल प्राप्ति सांगणारे -

संत दर्शनी हा लाभ। पद्मनाभ जोडला॥ तु. म.

८) संतांचा अधिकार सांगणारे

चरणीचे रज वंदी शूळपाणी। नाचती कीर्तनी त्यांचे माथा॥ तु. म.

असे संत कोण? निळोबांचा एक अभंग.

म्हैसीपुत्रा मुखे बोलविणे श्रुति। चालविणे भिंती बैसोनिया॥

नोहे हा सामान्य महिमा संतांचा। नैवेद्य हातिचा मूर्ती जेवी॥

उदकामाजी वह्या ठेऊनि कोरड्या। दाखवणे रोकड्या विश्वजना॥

निळा म्हणे तिही संगेचि तरणे। दीन उद्धरणे नवल कोण॥

तात्पर्य असे संत ज्ञानोबाराय, नामदेवराय, तुकोबाराय, एकनाथ महाराज, निळोबाराय इत्यादी.

★ ★ ★ ★ ★

५५ : संत महिमा

बऱ्याच प्रमाणात संतांचा महिमा वारंवार वर्णन केला आहे.

१) संताचा महिमा वर्णावा तो किती। अलक्ष लक्ष मूर्ति ज्ञानोबा माझा ।। नाथ.
२) तेथ माझा काय कोण तो विचार। वर्णावया पार 'महिमा' त्यांचा ।। तु. म.
३) ऐसा संतांचा महिमा। झाली बोलायाची सीमा ।। तु. म.

असा यांचा महिमा काय आहे? त्याचा विचार.

१) संत हे प्रतिज्ञेमध्ये भिष्माचार्यापेक्षा महान आहेत. प्रतिज्ञा शब्द आला की भिष्म पुढे उभे राहतात. वडिलांकरीता ब्रह्मचारी राहिले. जगात वडिल मुलांची लग्ने करतात मात्र हे एकमेव पुत्र ज्यांनी वडिलांचा विवाह ठरविला. दहा दिवस महाभारतीय युद्धात दुर्योधनांनी डिवचल्यामुळे प्रतिज्ञा केली "एक पांडव राहतील अथवा मी." पण पांडवांचा रक्षण कर्ता श्रीकृष्ण होते. देवास प्रतिज्ञा मोडायला लावली आणि आपण प्रतिज्ञेकरीता मरण पत्करले. "तेजस्विनः सुखमसूनपि सन त्यजन्ति। सत्य व्रत व्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम ।।" म. भारत. अर्थ - तेजस्वी माणसे देह त्याग करतील पण सत्यव्रत हेच ज्याचे व्यसन तो पुन्हा प्रतिज्ञा करत नाही. तथापि भिष्माचार्यांनी स्वताःकरीता, वडिलांकरीता व गादीसी एकनिष्ठ राहण्याची प्रतिज्ञा केली जगाकरीता नाही.

रावणाने चार प्रतिज्ञा केल्या होत्या. १) देव बंदिखान्यात ठेवणे. २) लंका सोन्याची करणे, ३) समुद्राचे पाणी गोड करणे. ४) येथून स्वर्गास शिडी लावणे. त्यातील दोन प्रतिज्ञा पूर्ण झाल्या दोन अपूर्ण राहिल्या.

मात्र आमच्या माऊलींनी जगाच्या सुखाकरीता प्रतिज्ञा केली.

अवघाची संसार सुखाचा करीन। आनंदे भरीन तिन्ही लोक ।। ज्ञान.

तरी अवधान एकले दिजे। मग सर्व सुखाशी पात्र होईजे।
हे प्रतिज्ञोत्तर माझे। उघड आईका ।। ज्ञाने.

शिवाय प्रतिज्ञा पूर्ण केली.

आजी संसार सुफळ झाला गे माये। देखियेले पाय विठोबाचे ।। ज्ञान.

म्हणून संत प्रतिज्ञेमध्ये भिष्मापेक्षा श्रेष्ठ ठरतात.

२) संत प्रयत्नामध्ये भगिरथापेक्षा महान. जे सगर, अंशुमान, दिलीप याना जमले नाही ते प्रयत्नाची पराकाष्ठा करुन, गंगा भूतलावर आणली. म्हणून प्रयत्न शब्द आला की भगिरथ पुढे येतात. पण आमच्या संतांनी ज्ञानगंगा घराघरात पोहचविली. (ती गंगा फक्त उत्तर भारतात आहे.)

जे ज्ञानगंगे नहाले। पूर्णता जेऊनि धाले। जे शांतीसी आले। पल्लव नवे ।। ज्ञाने.

(आमच्या गोदरेज सोप कंपनीने मात्र सावणाच्या रुपाने गंगेचे पवित्र पाणी घराघरात पोहचवले आहे, गंगा सावणाच्या द्वारे)

३) संत हे कर्णापेक्षा उदार - कर्णाबद्दल उदार शब्द वापरला जातो. ज्याने दुर्योधनाच्या पत्नीचे गळ्यातील दागिने रस्त्यात याचकास दिले. पावसाळयात चंदनाचा पलंग शेकोटीकरीता याचकास (कृष्ण-अर्जुन) दिला. नामदेवराय म्हणतात "कर्णा ऐसा वीर झुंजार उदार।" तथापि यांचे दान नाशिवंत पदार्थाचे आहे. संत दान देतात ते अविनाशी. म्हणून 'संत उदार उदार। भरले अनंत भांडार ।।' तु. म. 'या या संतापरीस उदार। त्रिभुवनी नाही थोर। मायबाप सहोदर। इष्ट मित्र सोयरे ।।' ज्ञान. म्हणून कर्णापेक्षा संत उदार आहेत.

४) संत हे कुबेरापेक्षा धनवंत - असं म्हणतात. कुबेराकडे १८ भाग संपत्ती आहे. त्यातील एका भागातील अर्धी संपत्ती रावणाकडे होती. (कोटी घरे तेथे काशा आणि तांब्याची। शुद्ध कांचनाची सप्त कोटी ।। तु. म.) बाकीच्या अर्ध्या संपत्तीत सर्व श्रीमंत येतात. पण कुबेराची संपत्ती नाशिवंत आहे. संत अविनाशी धन देतात.

५) संत हे सूर्यापेक्षा तेजस्वी आहेत. सूर्य तेजस्वी आहे. पण तो अस्त पावतो. "तेजे सुर्य तैसे सोज्वळ। परी तो अस्तवे हे किडाळ ।। ज्ञाने. सूर्य तापदायक आहे. पण हे तापहिन आहेत 'मार्तंड जे तापहिन ।। ज्ञाने. किंबहुना माऊली'म्हणते चंद्र सूर्यास जे तेज आहे ते वैष्णवांचे आहे 'मत्स्य कुर्मादिक ज्यांचे महिमेसी आले। धन्य वैष्णव तेज रवि शशीसी पहाले ।।' म्हणून संत सूर्यापेक्षा तेजस्वी आहेत.

६) संत हे चंद्रापेक्षा शीतल आहेत. चंद्र कधी कधी पूर्ण शिवाय त्याच्यावर डाग आहे. मात्र संत हे सदा पूर्ण "चंद्र संपूर्ण एकाधे वेळ।" ज्ञाने. शिवाय डाग रहित जीवन "चंद्रमे जे अलांछन" ज्ञाने. चंद्र शरीरास शितळता देतो. पण संत जीवास शांतता देतात. म्हणून संत चंद्रापेक्षा शितल आहेत.

७) संत हे भक्ति मध्ये हनुमंतापेक्षा श्रेष्ठ वाटतात. 'भक्त' शब्द आला की हनुमान समोर येतात. पण अशी आख्यायिका आहे. माळशिरसला तुकाराम महाराज सकाळ पर्यंत कीर्तन करत असताना हनुमंतराय थोडे आडवे झाले ते अद्याप तिथे तसेच आडवे आहेत. शिवाय वानर योनी असल्यामुळे हनुमंतानी उपदेश केलेला ऐकिवात नाही. म्हणून संत हनुमंतापेक्षा श्रेष्ठ वाटतात. तसे पाहिले तर गुरुपेक्षा शिष्य मोठा वाटतो. (त्रेतायुगात तुकाराम महाराज अंगद होते व त्यांचे गुरु हनुमान होते.)

८) बळिवंतामध्ये संत देवापेक्षा महान आहेत. देव बळीवंत आहे. पण संतापुढे याचे बळ फिके पडते. 'तुका म्हणे आम्ही देवाहुनि बळी। झालों हे निराळीं ठेवुनि आशा ।। तु. म. १३८ बळीयाचे

अंकीत। आम्ही झालो बळिवंत ।।' तु. म.

९) संत हे पवित्रतेमध्ये गंगेपेक्षा महान आहेत. 'स्नान केलिया गंगा। पवित्र करी सकळ जगा। ते गंगाही निजपापभंगा। तुमच्या चरणसंगा वांछित ।।' नाथ. गंगेत स्नान केल्यानंतर गंगा पवित्र करते. पण ती अपवित्र होते. तिचे पाप जाण्याकरीता तिला संतचरणांचा आश्रय घ्यावा लागतो. 'तिर्थे त्यांची इच्छा करिती सर्वकाळ। व्हावया निर्मळ आपणासी ।।' तु. म. ज्ञानेश्वर महाराज, नामदेवराय तिर्थ यात्रेस गेले असताना गंगेजवळ गेले. माऊलीना नेण्याकरिता काशीविश्वनाथ आले. माऊलीचा हात विश्वनाथांनी धरला. दोघे गंगेत आले. गंगामातेने माऊलींच्या चरणास मिठी मारली.

ज्ञानोबाचा हात। प्रेमे धरी विश्वनाथ ।। १ ।।
ऐसे बोलत चालत। दोघे आले गंगे आत ।। २ ।।
ज्ञानाबाईच्या पायी। मिठी घाली गंगा माई ।। ३ ।।
नामा म्हणे सोडा बाई। ज्ञानदेव सर्वाठायी ।। ४ ।।

गंगा विष्णूच्या चरणापासून निघाली. (चरणी गंगा जन्मली। ज्ञान.) ब्रह्मदेवांनी कमंडलूमध्ये धारण केली. शंकराने डोक्यावर घेतली. जिचे नाव घेतले असताना आपली पापे जातात. "वाचे म्हणता गंगा गंगा। सकळ पापे जाती भंगा ।। अशी महान पवित्र गंगा माता माऊलीच्या चरणास मिठी मारते. मग माऊली किती महान? तात्पर्य - संत सर्व बाबतीत सर्वापेक्षा महानच! प्राकृत वस्तूत महान आहेतच पण दिव्य वस्तूत पण मोठे.

'कल्पद्रुमः कल्पितमेव सूते। सा कामधुक कामितमेव दोग्धि।
चिंतामणीश्चिंन्तितमेव दत्ते। संतां तु संगः सकलं प्रसुते ।। सुभा.

अर्थ - कल्पवृक्ष कल्पनेप्रमाणे देतो. कामधेनू कामना पूर्ण करते. चिंतामणी चिंता निवारण करतो. पण हे सर्व संत एकदम देतात. यापेक्षा संत कल्पना, कामना व चिंता नाहीशी करतात. शिवाय कल्पवृक्ष 'झाड' आहे. कामधेनु 'पशू' आहे व चिंतामणी 'दगड' आहे. यांची तुलना देव माणसाशी होईलच कशी? असा आहे संत महिमा.

नऊ कोटयाच कां? नऊ हा अंक सर्वात मोठा (महान) आहे. माऊलीचा आवडता कां? तर ज्ञानेश्वरीच्या ९००० ओव्या लिहिल्या व पसायदानसुद्धा नऊ ओव्यात लिहिले.

एक फरक

१) जीव - 'संत'- देव, २) पुरुष - महापुरुष - परमपुरुष, ३) जीवात्मा - महात्मा - परमात्मा, ४) मायाधीन - मायातीत - मायाधीश

★ ★ ★ ★ ★

५६ : मोठे कोण ?

या कोटीत देव मोठा की संत मोठे याचा विचार केला आहे. याचे चार मुद्दे आहेत.

१) काही बाबतीत देव मोठा आहे.

अ) उत्पत्ती, पालन, संहार हे खाते देवाकडेच आहे.

ब) देवास प्रत्येक जीवाच्या पापपुण्याचा विचार करावा लागतो.

क) देव सगळ्यांच्या कर्माची नोंद ठेवतो.

देवासी लागे सकळांसी पोसावे। आम्हा नलगे खावे काय चिंता ।।
देवा विचारावे लागे पापपुण्य। आम्हासी हे जन अवघे भले ।।
देवासी उत्पत्ति लागला संहार। आम्हा नाही फार थोडे काही ।।
तुका म्हणे आम्ही भले देवाहून। विचारिता गुण सर्व भावे ।।

खरे पाहता संत पाप-पुण्य कर्म नोंद या भानगडीत पडत नाहीत. मात्र त्यांना अशक्य नाही. याचा विचार केल्यास "हरिसे कोई नही बडा। दीवाने क्युँ गफलतमें पडा ।।" कबीरजी

२) काही गोष्टीत संत देवापेक्षा मोठे आहेत. देवास आशा आहे. संतांना आशा नाही.

तुका म्हणे आम्ही देवाहुनि बळी । झालो हे निराळी ठेऊनि आशा ।।

एक हिंदी कोटी सांगितली जाते. सबसे बडा क्या है?

सबसे बड़ी पृथ्वी है। पृथ्वी काहेकी बड़ी, वो तो शेषके माथेपर खडी।
तो शेष बड़ा, शेष काहे का बड़ा, वो तो शंकरजीके गलेमे पड़ा।
तो शंकर बड़ा, शंकर काहेका बड़ा, उसका कैलास पर्वत रावणने उखाडा।
तो रावण बड़ा, रावण काहेका बड़ा, वो तो रामके एक बाणसे उड़ा।
तो राम बड़ा, राम काहेका बड़ा, वो तो हनुमानके हृदय में खड़ा।
तो बड़ा कौन? हनुमानही (भक्तही) बड़ा।

भगवानसे भक्तन बडे कह गये संत सुजाण।
पुल बांधे रघुवीर चले, कुदी गये हनुमान।। कबीरजी

लंकेत जाण्यासाठी रामास शंभर कोस पूल वांधावा लागला. शिवाय पाच दिवस लागले पहिला दिवस १४ कोस, दुसरा दिवस २० कोस, तिसरा दिवस २१ कोस, चौथा दिवस २२ कोस, पाचवा दिवस २३ कोस. मात्र हनुमंत रामाच्या अगोदर लंकेत जाऊन आले. दोन उड्डाणात. शिवाय रामांनी अकरा हजार वर्षे राज्य करुन अवतार संपविला. मात्र हनुमंत त्यांच्यानंतर सहा दिवसांनी आले पण अद्याप गेले नाहीत. कारण ते चिरंजीव आहेत.

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभीषणः।

कृपः परशुरामश्च सप्तेते चिरजीवीनः ॥

सात चिरंजीव १) अश्वत्थामा, २) बळी, ३) व्यास, ४) हनुमान, ५) बिभीषण, ६) कृपाचार्य, ७) परशुराम. एका श्लोकात संतांची महानता

पृथ्वी तावदियं महत्तु महति तद्वेष्टनं वारीधीः।
पीतोऽसौ कलशोद्भवेन मुनीना सव्योम्नि खद्योतवत।
तद्विष्णोः परमं पदम कलयतः पूर्णं पदं नाभवत।
सोऽपि त्वद्हृदी नर्तते खलु भवस्त्वतः परः को महान॥ सुभा.

अर्थ - पृथ्वी महान आहे. त्यापेक्षा तिला वेष्टन करणारा समुद्र महान आहे. असा समुद्र अगस्ति मुनींनी प्राशन केला. असे मुनी आकाशात एका काजव्यासारखे आहेत. असे आकाश देवाने वामन अवतारात एका पावलात व्यापले असा देव ज्याच्या हृदयात आहे. ''सतत कृष्णमूर्ती सावळी।खेळे हृदय कमळी।।'' ज्ञान. ''हृदय बंदीखाना केला।आत विठ्ठल कोंडिला।।'' जना. 'तुका म्हणे आम्हा प्रेमा उणे ते काई।पंढरीचा राणा साठविला हृदयी।।' वगैरे वरीच वचने आहेत, त्या तुझ्यापेक्षा (भक्तापेक्षा) कोण महान होऊ शकतो. तात्पर्य संतच मोठे.

३) देव व संत एकसारखे बरोबर, एकच शक्ति. देवाकडे जी कर्तुम, अकर्तुम, अन्यथाकर्तुम शक्ति आहे. तशीच संताकडे सुद्धा आहे. राम व ज्ञानोबाराय यांची तुलना बरोबर होते.

मा) पदस्पर्शाने शिळा उद्धार - रामाची कर्तुम शक्ति
ध) वानरांकडून लंका जिंकणे - रामाची अकर्तुम शक्ति
व) नावाने सागरावर शिळा तारणे - रामाची अन्यथाकर्तुम शक्ति
गो) गीतेवर ज्ञानेश्वरी अलंकार - माऊलीची कर्तुम शक्ती.
पा) रेड्याच्या मुखातून वेद उच्चार - माऊलीची अकर्तुम शक्ति
ळ) जड भिंत सहज चालविणे - माऊलीची अन्यथाकर्तुम शक्ति

४) संत व देव दोघे एकच आहेत. खूप प्रमाणे देता येतील.
रा) देव ते संत देव ते संत।निमित्त त्या प्रतिमा।। तु. म.
म) तुका म्हणे येथे नाही भिन्न भाव।भक्त तोचि देव, देव भक्त।। तु. म.
कृ) देव भक्तपण।तुका म्हणे नाही भिन्न।। तु. म.
ष्ण) देव भक्त तूचि झालासी दोन्ही।वाढावया सुख भक्ति हे जनी।
जडजीवा उद्धार व्हावया लागुनी।शरण तुका वंदी पाऊले दोन्ही।।
ह) लोपले ज्ञान जगी हित नेणती कोणी।अवतार पांडुरंग नाव ठेविले ज्ञानी।।
रि) म्हणे रामेश्वर भट्ट द्विजा।तुका विष्णू नाही दूजा।।
या दोघांमध्ये जो भेद मानतो त्याचा पृथ्वीला भार होतो. असे महाराज म्हणतात.

दोघे वेगळाले लेखिल जो कोणी।तयाचा मेदिनी बहु भार॥ तु. म.

तात्पर्य हे दोघेही मोठे आहेत.

★ ★ ★ ★ ★

५७ : गुरु

गुरु या शब्दाचा अर्थ -

गु शब्द स्तन्धकारः स्यात रु शब्धस्तनिरोधकः।
अंधकार निरोधित्वात गुरुरित्याभिधीयते॥

गु म्हणजे अंधकार रु म्हणे त्याचा निरोधक. अर्थात अज्ञान अंधकार नाहीसा करणारा तो गुरु. दत्तात्रयांनी २४ गुरु केले.

पृथिवीवायुराकाशमापोऽग्नि चंद्रमा रविः।
कपोतो अजगरः सिन्धुः पतंऽगो मधुकृत गजः॥
मधुहा हरिणो मीनः पिंगला कुररोऽर्भकः।
कुमारी शरकृत सर्प, उर्णनाभि सुपेशकृत ॥ ११/७/३३/३४ भागवत

१) पृथ्वी, २) वायु, ३) आकाश, ४) पाणी, ५) अग्नि, ६) चंद्रमा, ७) रवी (सूर्य), ८) कपोत, ९) अजगर, १०) समुद्र, ११) पतंग, १२) मधमाशी, १३) हत्ती, १४) मध गोळा करणारा, १५) हरिण, १६) मासा, १७) पिंगला (वेश्या), १८) कुरर (पक्षी), १९) बालक, २०) कुमारी, २१) बाण बनविणारा, २२) साप, २३) कोळी (किटक), २४) भृंगी.

या चोवीस गुरुपासून अवधूतांनी चांगले गुण घेतले. वाईटातूनसुद्धा चांगले गुण आत्मसात केले. नाथ म्हणतात.

जो जो जयाचा घेतला गुण।तो तो म्या गुरु केला जाण।
गुरुशी आले अपारपण।जग संपूर्ण गुरु दिसे॥

वाङ्मयात गुरुंचे चार प्रकार आहेत.

१) गुरु, २) सत्‌गुरु, ३) श्रीगुरु, ४) जगद्‌गुरु,

१) गुरु - ज्यापासून जीव चांगले शिकतो तो गुरु.

२) सतगुरु - जीवास सत् म्हणजे परमात्मा याचा मार्ग दाखवितो. किंबहुना सत् वस्तूची प्राप्ति करुन देतो. त्यास सद्‌गुरु म्हणतात.

मंत्र तंत्र उपदेशीते।घरोघरी गुरु आइते।
जो शिष्यासि मेळवी सद्‌वस्तुते।सद्‌गुरु त्यासी श्रीकृष्ण मानी॥ भागवत नाथ.

जो शब्दपरनिष्णात। शिष्य प्रबोधनी समर्थ।
तोचि सद्गुरु येथ। जाण निश्चित उद्धवा॥ भागवत नाथ.

अर्थ - मंत्र, तंत्र उपदेश करणारे भरपूर गुरु मिळतील पण शिष्यास सद्वस्तूची प्राप्ति करून देणारा तो सद्गुरु. त्याची लक्षणे दोन. शब्द पर निष्णात (शब्द परिचय अर्थ निश्चय) व शिष्यास बोध करण्यास समर्थ तो सद्गुरु.

३) श्रीगुरु - सद्गुरु पेक्षा मोठा. नाथ महाराज माऊलींना श्रीगुरु म्हणतात.

एका जनार्दनी पूर्वपुण्य फळले। श्रीगुरु भेटले ज्ञानेश्वर॥
श्रीगुरुसारीखा असता पाठीराखा। इतरांचा लेखा कोण करी॥ ज्ञाने.

४) जगद्गुरु - जगाचा गुरु. (माना अगर न माना) हे तीन आहेत.
१) कृष्ण, २) शंकराचार्य (आद्य), ३) तुकोबाराय

जगद्गुरु तुका अवतार नामयाचा। सांप्रदाय सकळांचा येथोनिया॥ निळो.

जगद्गुरुची व्याख्या - जगात कोणताही प्रश्न निर्माण झाल्यास तो सोडविण्याची ज्याची शक्ति तो जगद्गुरु. अथवा या जगात जन्माला आला म्हणजे जे तुमचे गुरु ते जगद्गुरु.

गुरु शब्दाचा अर्थ मोठा. लघु म्हणजे लहान. जीवास मोठे व्हावेसे वाटते. पण संग लहानांचा करतात म्हणून लहान राहतात. जसा संग तशी प्राप्ति. एकदा शेळीस जंगलात सिंह भेटला. शेळी घाबरली. सिंहाने अभय दिले व सांगितले कोण भेटल्यास सांग मी सिंहाची मावशी म्हणून. प्रथम हत्ती भेटला हत्तीने दरडावले तू कोण? शेळी म्हणाली मी सिंहाची मावशी. हत्तीने लगेच तिला सोंडेने उचलून पाठीवर घेतले.

नीच आश्रयो न कर्तव्यो कर्तव्यो महद् आश्रयः। अजा सिंह प्रसादेन आरुढो गज मस्तके॥ सुभा.

तात्पर्य गुरुचा संग करा.

ज्ञानेश्वर महाराजांना विचारले, आपण मोठे वैष्णव, योग्यांची माउली, साधकांचा मायबाप, श्रीगुरु, तत्वज्ञ, शास्त्रज्ञ, संत पण यासगळ्या पदव्या कशामुळे? महाराज विनयाने म्हणतात.

ज्ञानदेव म्हणे 'गुरुंचा' मी दास। नेणे साधनांस आन काही॥

जीवास गुरु नसेल तर जीवन गुरांसारखे (जनावरासारखे) होईल. म्हणून गुरु करा व जीवन सुखी करा. राम व कृष्ण यांनीही गुरु केले.

राम केला ब्रह्मज्ञानी। वसिष्ठ मुनी तारक॥
कृष्ण गुरु सांदिपनी। परब्रह्म दाखविले॥ तु. म.

(माऊलींनी आचार्य या एकाच पदावर ९७ ओव्या खर्च केल्या आहेत किती गुरुवद्दल आदर!)

गुरुची लक्षणे कोणती?

१) **ब्रह्मानंदं परमसुखदं केवलं ज्ञानमुर्ति, द्वंद्वातितं गगनसदृश्यं तत्वमस्यादिलक्षम।**
एकं नित्यं विमलमचलं सर्वाधिसाक्षिभूतं, भावातीतं त्रिगुणरहितं सद्गुरुं तं नमामि॥

२) **सद्गुरु शुचिरात्मज्ञः स्वात्मस्थः पूर्णनिर्भयः।**
नित्यतृप्तः सदामुक्तः सच्चिदानंद विग्रहः॥

जो शुद्ध, पवित्र आहे. ज्यास आत्मज्ञान आहे. स्वआत्मासी रत आहे. पूर्ण निर्भय आहे. नित्य तृप्त आहे. सदामुक्त आहे जो सच्चिदानंद रुप आहे तो सद्गुरु.

३) **तस्मात गुरुं प्रपद्यते जिज्ञासु श्रेय उत्तमम।**
शाब्दे परे च निष्णातं ब्रह्मण्युपशमाश्रयम्॥ भागवत ११/३/२१॥

शिष्य असा हवा गुरुला सर्वस्व अर्पण करणारा. गुरु असा हवा शिष्याचे काही न घेणारा.

'शिष्य तो ऐसा चाहिये गुरु को सब कुछ देय।
गुरु तो ऐसा चाहिये शिष्यका कछु न लेय।' कबीरजी

शिवाजी महाराजांनी संपूर्ण राज्य रामदास स्वामींच्या झोळीत टाकले. मात्र रामदास स्वामींनी ते स्विकारले नाही. फक्त उपदेश केला हे रामाचे राज्य म्हणून चालवा. ते शिवाजी महाराजांजवळ राहिले सुध्दा नाहीत. डोंगरात वास्तव्य केले. सध्या बहुतेक गुरु शिष्याचे वित्त हरण करणारे आहेत. क्वचित चित्त हरण करणारे दिसतात.

बहवो गुरुवो लोके शिष्यवित्तापहारकाः।
क्वचित तत्र दृश्यन्ते शिष्य चित्तापहारकाः॥ सुभा.

माऊली डौर या अभंगात लिहितात

गुरु लोभी धन मान। शिष्य लोभी अतीदीन।
दोघासी लटपट लागली पूर्ण। कोण कोणासी आवरेना॥

घोडी व शालजोडी हा प्रसिद्ध दृष्टांत आहे.

गुरु मोठे आहेतच पण त्यांच्यावर श्रद्धा, विश्वास हवा शास्त्रामध्ये श्रद्धेस पार्वती व विश्वासास शंकर म्हटले आहे. या दोघांशिवाय परमार्थ क्षेत्रात फळ मिळत नाही.

भवानी शंऽकरौ वंदे श्रद्धा विश्वास रुपिणौ।
याभ्यां विना न पश्यन्ति सिद्धाः स्वान्तःस्थमीश्वरं॥

एकलव्याने द्रोणाचार्यांच्या मातीच्या पुतळ्यावर विश्वास ठेवला व महान धनुर्धर झाला.

श्रीगुरुचेनी नावे माती। डोंगरी जयापाशी होती।
तेणे कोळीये त्रिजगती। एकवद केली॥ ज्ञाने.

मातीयेचा द्रोण केला। तो कौळिका भावो फळला।
म्हणौनी विश्वासेंवीण नाडला। जगु टाकला विकल्पे॥ भागवत. नाथ.

माऊलीच्या सहा ओव्या श्रद्धा दर्शविणाऱ्या आहेतच पण गुरुचे मोठेपण सांगणाऱ्या आहेत. हे सहा शास्त्राचे सारच आहे.

मज हृदयी सद्गुरु। जेणे तारिलो हा संसार पुरु।
म्हणउनि विशेषे अत्यादरु। विवेकावरी॥
जैसे डोळ्या अंजन भेटे। ते वेळी दृष्टीसी फाटा फुटे।
मग वास पाहीजे तेथ प्रगटे। महानिधी॥
कां चिंतामणी आलिया हाती। सदा विजयवृत्ती मनोरथी।
तैसा मी पूर्णकाम निवृत्ती। ज्ञानदेवो म्हणे॥
म्हणोनि जानतेनी गुरु भजिजे। तेणे कृतकार्य होईजे।
जैसे मूळ सिंचने सहजे। शाखा पल्लव संतोषती॥
कां तिर्थे जिये त्रिभुवनी। ती घडती समुद्रावगाहनी।
ना तरी अमृतरस स्वादनी। रस सकळ॥
तैसा पुढत पुढती तोचि। मिया अभिवंदिला श्रीगुरुचि।
जो अभिलषित मनोरुचि ।पुरविता तो॥ ज्ञाने. अ. १/२२-२७

नामचिंतामणी ग्रंथात गुरुचे अर्थात गुरुकृपेचे बारा प्रकार दिले आहेत

१) धातुर्वादी - शिष्यास अनेक साधनाद्वारे आत्मबोध करणारा.

२) चंदन - चंदनाप्रमाणे सहवासातील शिष्यास मुक्त करणारा.

३) परिस - जसा परिस स्पर्शाने लोखंडाचे सोने करतो. तसा स्पर्शाने शिष्याचा उद्धार करणारा.

४) अनुग्रह - तीन पद्धती आहेत. १) मस्तकावर हात, २) आलिंगन, ३) कृपादृष्टीने आपल्यासारखे करणारा.

५) विचार - आत्मानात्म (सारासार) विचार सांगून मुक्त करणारा.

६) कच्छप - कासवीच्या सहवासात पिलाकडे पाहिल्यास त्याची तृप्ति होते तसे शिष्याकडे करुणेने पाहिल्यास त्याचा उद्धार करणारा. "कासविचे बाळ वाढे कृपा दृष्टी। दुधा नाही भेटी अंगसंग॥" तु. म.

७) चंद्र - चंद्राच्या छायेत चंद्रकांत मणी पाझरतो. तसा गुरूच्या सान्निध्यात शिष्यास प्रेमाचा पाझर फुटतो व उद्धरतो.

८) दर्पण - दर्पणात आपले प्रतिबिंब दिसते. तद्वत गुरूच्या दर्शनामुळे स्वस्वरुपाची ओळख होते.

९) छायानिधी - हा पक्षी आहे. याची सावली ज्याच्यावर पडते तो राजा होतो. तद्वत गुरुची सावली पडल्यानंतर शिष्य मुक्त होतो.

१०) नादनिधी - हा असा मणी आहे, कोणत्याही धातूचा आवाज यावर आला तर धातू सोने होतो. तशी शिष्याची आर्त हाक गुरूच्या कानांवर पडल्याबरोबर त्याचा उद्धार होतो.

११) क्रौंच - हा पक्षी हजारो मैल दूर राहून पिलाची आठवण केल्यावर तिकडे पिलाचे पोट भरते तसे दूर राहून शिष्याची आठवण केल्यास शिष्याचा उद्धार होतो.

१२) सूर्यकांत - हा मणी सूर्य प्रकाशात ठिणग्या सोडतो. तसे गुरूची इच्छा असो वा नसो, गुरु सान्निध्यात शिष्याचा उद्धार होतो.

असे हे गुरूकृपेचे बारा प्रकार आहेत.

एक शंका अशी, नाम तारक असताना गुरूंची गरज काय? नाथ महाराज निरसन करतात -

नांव तारी हे साचार। माजी बैसले थोरथोर।
परी तारकेवीण परपार। समर्थ नर न पावती॥

नाथ महाराज सांगतात, डोळे आपले आहेत पण सूर्याच्या सहाय्याशिवाय दिसत नाही. पावसामुळे भूमी मार्दव झाली. आपल्याकडे बीज आहे पण ज्ञात्यांने पेरणी केल्याशिवाय पिक मिळत नाही. रत्न सापडले पण त्याचा पारखी मिळाल्याशिवाय किंमत कळत नाही. तसे परमात्मा आपलाच आहे. पण श्रीगुरूवर श्रद्धा असल्याशिवाय आपल्यास निजसुख प्राप्त होत नाही.

तैसे निजस्वरुप आईते। श्रद्धा सद्गुरूचेनि हाते।
खरे करूनिया ज्ञाते। निजसुखाते पावले॥ नाथ.
ज्ञानदेव म्हणे तरलो तरलो। आता उद्धरिलो गुरूकृपे॥
सद्गुरूवाचोनि संसारी तारक। नसेचि निष्टंक आण कोणी॥ ज्ञान.

तुलसीदास सांगतात -

नरतनु भव वारिधी कहूँ बेरो। सन्मुख मरुत अनुग्रह मेरो।
करणधार 'सद्गुरू' दृढ नांवा। दुर्लभ साज सुलभ करी पावा॥

भागवतामधील श्लोकांचे हे भाषांतरच आहे. या भवसागरातून तरण्याकरिता नरशरीर उत्तम आहे. हीच नाव आहे, त्यात देवकृपेचा अनुकूल वारा आहे व सद्गुरू हे कर्णधार (नावाडी) आहेत. असे असतांना जो भवसिंधू तरत नाही तो आत्मघातकीच होय.

नृदेहमाद्यं सुलभं सुदुर्लभं प्लवं, सुकल्प गुरूकर्णधारम्।
मयानुकूलेन नभस्वतेरितं पुमान्भवाब्धिं न तरेत्स आत्महा॥ भागवत

★ ★ ★ ★ ★

५८ : पवित्र

जगात सर्व पवित्र पदार्थांमध्ये देवाचे 'नाम' पवित्र आहे. देव पवित्र आहेच, पण त्यापेक्षा 'नामच' पवित्र आहे. (नाम नामीमध्ये अभेद आहे.)

पवित्राणां पवित्रं यो मंगलानांच मंगलम्।
दैवतं देवतानांच भूतानां योऽव्ययः पिता ॥ विष्णूसहस्त्रनाम

ज्ञानोबाराय म्हणतात -

नाम बरवया बरवंट। नाम पवित्र आणि चोखट।
नाम स्मरे निळकंठ। निज सुखे निवाला॥
नाम 'पवित्र' आणि परिकर। रखुमादेवीवरांचे॥ ज्ञान.

नाम हे कधीच अपवित्र होत नाही. मात्र नामाचा प्रभाव एवढा आहे, ते अपवित्रास पवित्र करते.

नर अथवा नारी हो कां दुराचारी। मुखी गाता हरि पवित्र तो॥ नाथ.

हरिपाठ किर्ती मुखी जरी गाय। पवित्रची होय देह त्याचा॥ ज्ञान.

नामामुळे पापी अजामेळ, वाल्याकोळी, गणिका हे सर्व पवित्र झाले. नामाच्या पवित्रपणामुळे सर्व संत पवित्र झाले. त्यांची किर्ती वेद, शास्त्र, पुराण गातात. जगात तेच पवित्र आहेत. "पवित्र सोवळी। तीच एक भूमंडळी॥" तुका. कारण ते 'पवित्र नाम' सतत घेत असतात.

पवित्र तो देह वाणी पुण्यवंत। जो वदे अच्युत सर्वकाळ॥ तुका.

त्यांच्या पवित्रपणामुळे त्यांचे कुळ, आईवडील, जात, गांव यांना पवित्रपणा आला.

पवित्र ते कुळ धन्य त्याची माय। हरिमुखे गाय नित्यनेमे॥ नाथ.

पवित्र ते कुळ पावन तो देश। जेथे हरिचे दास जन्म घेती॥ तु. म.

किंबहुना भक्तांच्या पवित्रपणामुळे पृथ्वी पवित्र होते.

कुलं पवित्रं जननी कृतार्था। वसुंधरा पुण्यवतीच तेन।
अपार संवित्सुखसागरेऽस्मिन। लिनं परब्रह्मणि यस्य चेतः॥ रामा.

या संतांनी तिर्थानासुद्धा पवित्र केले.

तिर्थी पावन जिही धर्म केला धडौती। कैवल्य कल्पद्रुम ते त्रिजगती॥ ज्ञान.

तिर्थे तया ठाया। येती पुनित व्हावया। पर्वकाळ पाया। तळी वसे वैष्णवा॥ तु. म.

तीर्थे त्यांची इच्छा करिती नित्यकाळ। व्हावया निर्मळ आपणासी॥ तु. म.

स्नान केलीया गंगा। पवित्र करी सकळजगा।
ते गंगाही निजपापभंगा। तुमच्या चरणसंगा वांछित॥ नाथ.

दृष्टांत - जेव्हा पुंडलीक हे बायकोस खांद्यावर घेऊन व आईवडिलांना दोरीने ओढत तिर्थयात्रा करीत असताना 'कुकुटमुंड' मुनीच्या आश्रमात थांबले तेव्हा रात्री काळ्याकुट्ट तीन स्त्रिया आल्या व आश्रमात सेवा करुन पांढऱ्या शुभ्र, पवित्र होऊन निघाल्या. पुंडलिकाने विचारले आपण कोण? कशाकरीता आला व आता निघाला का? तेव्हा त्या तीन स्त्रिया म्हणाल्या आम्ही गंगा, यमुना, सरस्वती आहोत तुमच्यासारखे बायकोचा लाड करणारे व आईवडिलांचे हाल करणारे पापी यात्रेकरु येतात व आम्हांस अपवित्र करतात. आमचा अपवित्रपणा जाण्याकरीता अशा मुनींच्या आश्रमात येऊन थोडी सेवा करावी लागते. साधूची सेवा केल्यामुळे आम्ही पवित्र होतो. आम्ही पवित्र होउन चाललो. पुंडलिकरायांना पश्चात्ताप झाला व आईवडिलांची सेवा करु लागले. त्या सेवेवर संतुष्ट होऊन विठ्ठल पुंडलिक मुनीना भेटण्यास आले. देव भागवतात म्हणतात मला साधूमुळे पवित्रता आली. एवढी पवित्रता की, माझ्या चरणापासून निघालेली गंगा शंकर डोक्यावर धारण करतात. नाथाच्या शब्दात त्यांनी देवास समुद्र व साधूस मेघ म्हटले आहे. देवास केळीचे झाड व महात्म्यांना केळीचे फळ म्हटले आहे.

समुद्रोदक मेघी चढे। त्यासी मधुरता अधिक वाढे॥
जग निववी वाडेंकोडें। फेडी साकडे दुकाळाचे॥
तेचि उदक समुद्री असता। उपयोगा न ये गा सर्वथा॥
तेवी माझेनि भजने मद्भक्ता। झाली पवित्रता मजहुनी॥
केळी चाखता चवी नातुडे। तिचीच केळे ते अतिगोडे॥
तेवी मजहूनि माझ्या भक्तांकडे। पवित्रता वाढे अनिवार॥
माझ्या ठायी जे पवित्रपण। ते भक्ताचेनि मज जाण॥
या लागी भक्तांमागे मी आपण। धावे चरणरेणु वंदावया॥
भक्तचरण रेणु वंदिता। मज केवढी आली पवित्रता॥
माझे पायवणी वाहे माथा। जाण तत्वता सदाशिवू॥ भागवत ११/१६

म्हणून माउली म्हणते

ते तिर्थ ते क्षेत्र। जगी तेचि पवित्र॥ भक्तिकथेसी मैत्र। जया पुरुषा॥ ज्ञाने.

यांच्या पवित्रपणामुळे चार प्रकार निर्माण होतात.

अ) १) काही जिवंत असतांना पवित्र मात्र मेल्यानंतर अपवित्र. उदा. गाय
२) काही जिवंत असताना अपवित्र व मेल्यानंतरही अपवित्र. उदा. कावळा
३) काही जिवंत असताना अपवित्र पण मेल्यानंतर पवित्र. उदा. वाघाचे कातडे
४) काही जिवंत असताना पवित्र व देह ठेवल्यानंतरही पवित्र - अर्थात कायमचे पवित्र 'संत'.

पवित्र व गोड यामुळे चार प्रकार

ब) १) काही वस्तू गोड आहेत पण पवित्र नसतात. उदा. वचनाग

बापा विषाची मधुरता। झणी आवडी उपजे चित्ता।
परी परिणाम विचारिता। प्राणु हरि॥ ज्ञाने.

२) काही वस्तू पवित्र असतात पण गोड नसतात. उदा. गोमुत्र अथवा गंगेचे पाणी

३) काही वस्तू गोडही नसतात व पवित्रही नसतात उदा. मदिरा

४) काही वस्तू गोडही असतात व पवित्रही असतात. उदा. नाम व संत.

गोड तुझे रुप गोड तुझे नाम। देई मज प्रेम सर्वकाळ॥ तु. म.

नामाचा पवित्रपणा वर वर्णन केला आहेच.

गोड एक आहे अविट गोविंद। आणिक ते छंद नाशिवंत॥ तु. म.

संत पवित्र आहेतच पण गोडही आहेत.

हे पियुषापरते गोड वाटत। पंढरीरायाचे भक्त भेटत॥ ज्ञान.

देव म्हणे माझे पुरतसे कोड। संगती या गोड वैष्णवांची॥ तु. म.

तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड। जया पुरे कोड तयापरी॥ तु. म.

नाम, संत पवित्र आहेतच पण गीतेमध्ये ज्ञानही पवित्र सांगितले आहे. जे ज्ञान परमात्म्याची प्राप्ति करुन देते. ज्यास अध्यात्म ज्ञान म्हणतात.

न हि ज्ञानेन सदृश्यं पवित्रमिह विद्यते॥ गीता ४/३८

माऊलीच्या शब्दात

म्हणूनि बहुती परी पहाता। पुढत पुढत निर्धारिता॥
हे ज्ञानाची पवित्रता। ज्ञानीची आथि॥ ज्ञाने.

ज्ञान पवित्र आहे. यास दुसरी उपमा नाही. पण हे ज्ञान नामापेक्षा मात्र अवघड आहे.

★ ★ ★ ★ ★

५९ : माऊली

माऊली म्हणजे आई, जननी, माय अशी अनेक नावे आहेत. मनुष्य जीवनात माऊलीला फार महत्व आहे. वेदामध्ये चार देवांमध्ये आईचा प्रथम क्रमांक आहे. मातृदेवो भव, पितृदेवो भव, आचार्य देवो भव, अतिथी देवो भव। एका सुभाषितकाराने आई किती श्रेष्ठ आहे याचे

प्रतिपादन केले आहे.

उपाध्यायान दशाचार्य आचार्याणां शतं पिता।
सहस्त्रंतु पितृन्माता गौरवेणातिरिच्यते॥

उपनयन संस्कार करणाऱ्यापेक्षा आचार्य दहापट उच्च आहे. आचार्यापेक्षा पिता शंभर पट श्रेष्ठ आहे. मात्र वडिलांपेक्षा आई हजारपट श्रेष्ठ आहे. आई मुलाच्या किती जवळ आहे? मराठी माणसे आईस अग आई व वडिलांस अहो बाबा म्हणतात मराठीच्या मुळाक्षरात पहिल्याच ओळीत तिसरे मुळाक्षर 'ग' आहे. मात्र 'ह' शेवटच्या ओळीतील तिसरे मुळाक्षर आहे एवढे अंतर आहे आई बाबांमध्ये! थोडे शृंगारीक बोलणे होईल. पण वस्तूस्थिती आहे. बापाची मजा, आईस सजा. सर्व सहन करायचे आईने पण नाव मात्र बापाचे! एका सुभाषितकाराने सांगितले आहे.

न अन्नोदक सम दानं न तिथीः द्वादशासमा।
न गायत्र्या परो मंत्रो न मातुः पर दैवतम॥

अन्न - उदकासारखे दान नाही. द्वादशीसारखी तिथी नाही. गायत्रीसारखा मंत्र नाही. आई समान दैवत नाही. शरीराचे पोषण करणारी जवळ जवळ आईच!

नास्ती माता समं शरीर पोषणं, नास्ती भार्यासमं शरीर तोषणं।
नास्ती विद्या समं शरीर भूषणं, नास्ती चिंता समं शरीर शोषणं॥

आईसारखी पोषण करणारी कोणी नाही. पत्नी शरीराचे तोषण करणारी आहे. विद्येसारखे शरीराचे भूषण नाही. चिंतेसारखे शरीराचे शोषण कोणी करत नाही.

शास्त्रात आईचे पाच प्रकार सांगितले आहेत.

राजपत्नी गुरुपत्नी मित्रपत्नी तथैव च।
पत्नी माता स्वमाता च पंचेते मातरः स्मृता॥ म. स्मृ.

राजाची बायको, गुरुपत्नी, मित्राची पत्नी, बायकोची आई व स्वतःची आई या शास्त्राने पाच माता म्हटल्या आहेत. वारकऱ्यास मात्र स्वपत्नी सोडून बाकी सर्व मातेसमान आहेत.

पराविया नारी माउली समान। तु. म. किंवा
पराविया नारी रखुमाई समान। तु. म.

परोपकार नेणे परनिंदा। पर स्त्रिया सदा बहिणीमाया॥ तु. म.

कधी कधी नाही सदा आई बहिणीसारख्या.

मारुतीरायांना मात्र **''मारुती माझा ब्रह्मचारी। मातेसमान अवघ्या नारी॥'' तु. म.**

ब्रह्मचाऱ्यास मात्र हनुमानासारख्या सर्व नारी मातेसमान! प्राकृत सर्व माता प्रत्येक जन्मी बदलणाऱ्या आहेत.

तुका म्हणे काई। किती म्हणू बाप आई ॥

म्हणून ज्ञानेश्वर महाराजांनी म्हणजे माऊलींनी ज्ञानेश्वरीत तीन माऊली सांगितल्या आहेत त्या जीवाचे कायमचे कल्याण करणाऱ्या आहेत. (आत्मा, श्रोता, गीता यांनापण ज्ञा.म.माऊली म्हणतात)

तू संसार श्रातांचि साऊली। अनाथ जीवांची माऊली।
आमुते किर प्रसवली। तुझीच कृपा ॥ ज्ञाने. (श्रीकृष्ण)

म्हणोनि साधका तू माऊली। पिके सारस्वत तुझीया पाऊली।
या कारणे मी साऊली। न संडि तुझी ॥ ज्ञाने. (गुरु/संत)

अहितापासूनि काढीती। हित देऊनी वाढविती।
नाही गा श्रुति परौती। माऊली जगा ॥ (श्रुति)

या तीन ओवीत देव संत व श्रुती यांना माऊली म्हटले आहे. देवाला बऱ्याच ठिकाणी माऊली शब्द आला आहे. अर्थात संत वाङमयात ! 'दीनांची माऊली। आजी म्या देखियली॥' नाम. 'कृपाळू माऊली भुक्ति मुक्ति भांडार। करी माझा अंगिकार तुका म्हणे विठ्ठले॥' वरील प्रमाणे आहेत. या तीनही माऊली कशा ? व सर्वश्रेष्ठ माऊली कोण ? थोडा विचार दृष्टांताने पाहू.

एखादा मुलगा आजारी पडला तर वडिल त्याला डॉक्टरकडे नेतात. डॉक्टर तपासून औषधे लिहून देतात. वडिल औषधे आणतात मात्र आई बाटली फोडून अर्धा चमचा औषध व अर्धी गोळी देते. मुलगा वरा होतो. मुलगा वरा होण्याकरीता तिघांचा सहभाग आहे. मात्र डॉक्टरपेक्षा व वडिलांपेक्षा आईचा सहभाग जास्त आहे. डॉक्टर म्हणजे श्रुतीमाता. वडिल म्हणजे विठ्ठल माऊली आणि संत व गुरु म्हणजे जवळची माऊली! ज्ञानेश्वर महाराजांनी गीतारुप वाटली फोडली, नऊ हजार औषधरुपी चमचे म्हणजे ओव्या केल्या

संस्कृताच्या गाठी उघडोनी ज्ञानदृष्टी। केलिसी मराठी गीतादेवी ॥ नाम.

ज्ञानेश्वर महाराजांना सर्व संतांनी 'माऊली'ची उपमा दिली आहे कारण कारुणिक स्वभाव!

ऐसा मातेचा स्वभाव। सूत्र दोरी एक जीव॥ तु. म.

आई तिला म्हणतात जिला एकतरी अपत्य व्हावे लागते. जी कळ सोसते तिला कळवळा येतो. नाहीतर ती बाईच राहील. आमच्या ज्ञानेश्वर माऊलींना चार मुले आहेत. संत सांगतात.

१) वेदशास्त्र देती ग्वाही। म्हणती ज्ञानाबाई आई ॥ नाथ.
२) ज्ञानराज माझी योग्यांची माऊली। जेणे निगमवल्ली प्रगट केली ॥ नाम.
३) साधकांचा मायबाप। दरुषणे हरे ताप ॥
सर्वाभूती सुखरुप। ज्ञानोबा माझा ॥ नाथ.
४) ज्ञानाबाई माझी अनाथाची माय। एका जनार्दनी पाय वंदितसे ॥ नाथ.

अर्थात - वेदशास्त्रांची आई, योग्यांची आई (सर्व प्रकारचे योगी ज्ञानयोगी, कर्मयोगी, हटयोगी, भक्तियोगी) साधकांची माय व अनाथांची आई. ज्ञानेश्वर माऊलींनी सर्व मुलांकरीता अर्थात चौघांकरीता चार न संपणारे खाऊ म्हणजे ग्रंथ निर्माण केले. वेदशास्त्रसंपन्नांकरीता - अमृतानुभव, (आत्मसंवाद), योग्यांकरीता-चांगदेव पासष्टी, (मित्रसंवाद), साधकांकरीता-ज्ञानदेवी म्हणजे ज्ञानेश्वरी (श्रोत्रसंवाद) अनाथांकरीता-हरीपाठ (लोकसंवाद).

सर्व ग्रंथात भक्ती, ज्ञान, वैराग्य ओतप्रोत भरलेले आहे. माऊली शब्दात गूढ अर्थ सामावलेला आहे.

म + अ + ऊ + ली - म अ ऊ म्हणजे अ ऊ म अर्थात ॐ. ॐ ला जी जाणते. (ॐ हे एकाक्षर ब्रह्म आहे) किंवा जी ॐ स्वरुप आहे ती माऊली. म्हणून नाथ महाराज म्हणतात.

ॐ नमो ज्ञानेश्वरा। करुणा करा दयाळा ॥

आई या शब्दात तात्विक अर्थ असा आहे. 'आ' म्हणजे आत्मा आणि 'ई' म्हणजे ईश्वर. आत्म्याला ईश्वराचा जी साक्षात्कार करून देते ती खरी आई. व्यवहारात आईलाच माहित असते. मुलाचा बाप कोण ?

मन जाणे पापा। तुका म्हणे 'माय' बापा।

तसेच संतांनीच देवाची ओळख करून द्यावी. म्हणजे जीव फसणार नाहीत. दृष्टांत - कण्व मुनींच्या आश्रमात शकुंतला दुष्यंत यांचा गांधर्व विवाह होतो. पण दुर्वास ऋषींच्या शापामुळे दुष्यंत शकुंतलेस विसरतो. शकुंतलेला मुलगा होतो. त्याचे नाव भरत. वारा वर्षांनी माशाच्या पोटातील, शकुंतलेने दिलेली, मात्र जाताना पाण्यात पडलेली अंगठी दुष्यंताला मिळते. शकुंतलेला भेटण्याकरीता कण्वाच्या आश्रमात येतो. भरत सिंहाच्या छाव्याचे दात मोजत असतो. राजा जवळ जाऊन त्याला सांगतो, मी तुझा वाप आहे. तो ओळखत नाही. नंतर आई ओळख करून देते. मगच तो वडिलांना नमस्कार करतो. तात्पर्य संत हीच खरी श्रेष्ठ 'माऊली' जी देवाची ओळख करून देते. माता मैनावतीने एका गोपीचंद राजाचे खरे हित केले. माता मदालसेने ४ पुत्रांचे हित केले. १) विक्रांवर्म, २) सुवाहू, ३) शत्रूमर्दन, ४) अलर्क. पण ज्ञानेश्वर माऊलीने जगाचे हित केले.

केला जगासी उपकार। तारीयेले नारीनर ॥ नाथ.

जगन्माता तीन आहेत. विद्येची माता सरस्वती, संपत्तीची माता लक्ष्मी, तपश्चर्येची माता पार्वती. क्रम पाहिला तर पार्वतीमुळे म्हणजे तपामुळे सर्व प्रकारची (लक्ष्मी) संपत्ती प्राप्त होते. मात्र सरस्वती, लक्ष्मीची सून आहे.

व्यापकदृष्टीने पाहिल्यास आणखी तीन माता समोर येतात.

१) भारतमाता, २) गंगामाता, ३) गोमाता

जन्मभूमीचा प्रत्येकास अभिमान हवा. भारतामध्ये जन्म मिळणे नाथ महाराज सांगतात परमभाग्य.

भरतखंडी नरदेह प्राप्ति। हे तो परमभाग्याची संपत्ती।
तेथही विवेकू परमार्थी। त्याचा वशवर्ती मी परमात्मा॥

कारण भारत कर्मभूमी आहे. बाकीच्या भोगभूमी आहेत.

अत्रापि भारतं श्रेष्टं जंबुद्विपे महामुनेः।
यतोहि कर्मभूरेषा ततोऽन्य भोगभूमयः॥ विष्णुपुराण

स्वामी विवेकानंदांनी जगास सांगितले, मोक्ष हवा असेल तर भारतात जन्म घ्यावा लागेल. भारत या शब्दाचा अर्थ भा म्हणजे ज्ञान आणि रत म्हणजे आसक्ती म्हणूनच जे ज्ञानाला आसक्त आहेत ते भारतीय.

या देशात तीन ऋतू आहेत. सर्व प्रकारची फळे फुले होतात. भौगोलिकदृष्ट्या याच्या तीन बाजूस समुद्र व एका बाजूस हिमालय पर्वत आहे. हा देश संस्कृतिप्रधान आहे. या देशात विकृतिला स्थान नाही. आकृतिस महत्व नाही. प्रकृतिला एवढे स्थान नाही जेवढे संस्कृतीस आहे. ही संतांची भूमी आहे. या देशात राम-कृष्णादी दहा अवतार झाले म्हणून प्रत्येक भारतीयास या मातेचा अभिमान हवा. रामाने लंका जिंकली. लक्ष्मण म्हणाले सोन्याची लंका पाहून येऊ. राम म्हणाले

जननी जन्मभूमीश्च स्वर्गादपि गरीयसी।
अपि स्वर्णमयी लंका न मे रोचन्ते लक्ष्मण॥ रामा.

जननी आणि जन्मभूमी मला स्वर्गापेक्षा श्रेष्ठ वाटते. तथापि सोन्याच्या लंकेत मला स्वारस्य नाही. हा सर्वांनी घेण्यासारखा रामबोध आहे. भारताचा नकाशा पाहिल्यानंतर मला स्वामी विवेकानंद उभे आहेत असे वाटते. कारण ते फेटेवाले होते. जगास सांगत असावेत. माणसांच्या कल्याणाचा विचार भारतात जास्त केला आहे. सुख पळून मिळत नाही वळून मिळते. हा संदेशच जणू जगास देतात, उभा राहून!

दुसरी माता गंगा - सर्व नद्यांमध्ये श्रेष्ठ, जी विष्णूच्या पायापासून निघाली. ब्रह्मदेवाने कमंडलूमध्ये घेतली व शंकराने डोक्यावर धारण केली. सकाळच्या प्रहरी सर्वांनी आंघोळ करताना गंगेचे स्मरण करावे.

गंगेच यमुनेचैव, गोदावरी सरस्वती।
नर्मदे सिंधु कावेरी, जलेऽस्मिन सन्निधी कुरु॥
नमामि गंगे तव पादपंकजं सुरासुरैर्वंदितदिव्य रुपं।
भुक्ति च मुक्तिच ददासि नित्यं, भावानुसारेण सदा नरानाम॥

एकदा अकबर मंत्र्यांना विचारतो, पाणी चांगले कोणते? सर्व उत्तर देतात गंगेचे. कारण स्वच्छ, शितळ व पवित्र आहे. अकबर बिरबलाला विचारतात पाणी श्रेष्ठ कोणते? बिरबल सांगतो, यमुनेचे! सर्व रागावतात. याचे नेहमी जगाच्या उलटे. अकबर विचारतो कसे काय?

बिरबल सांगतो, चर्चा पाण्याची चालू आहे आणि गंगेचे पाणी नाहीच ते तर अमृत आहे. 'गंगा तेरा पानी अमृत' अमृतास पाणी म्हणणे म्हणजे अज्ञान सिद्ध होते. धन्य ती भारतमाता जिच्या अंगावरुन गंगामाता वहाते, जिच्या नावातच पुण्याई आहे. "वाचे म्हणती गंगा गंगा। सकळ पातके जाती भंगा॥" नाम. (गंगा नव्हे जळ। तु. म.)

तिसरी माता आहे 'गोमाता' गाईच्या शरीरात तेहतीस कोटी देव वास्तव्य करतात असे आमची संस्कृति सांगते. सात गोष्टींमुळे पृथ्वीला स्थैर्य आहे. १) गाय, २) विप्र, ३) वेद, ४) सती, ५) सत्यवादी, ६) आसक्तीरहीत, ७) दानशील. श्लोक.

गोभिर्विप्रैश्च वेदैश्च सतीभीः सत्यवादीभिः।
अलुब्धैदानशीलश्च सप्तभिधार्यते मही॥ म. स्मृ.

गाईच्या गोमूत्रामध्ये गंगा वास करते. गोधुलीमुळे पुष्टी मिळते. शेणात लक्ष्मी वास करते. गाईस नमस्कार केल्यास धर्माचे पालन होते. म्हणून गोमातेस सतत नमस्कार करावा आमचे भगवान श्रीकृष्ण गो-पाल झाले. संध्याकाळी घरी येताना गाईच्या खुरांची माती तोंडावर बसली म्हणून नाव पडले पांडूरंग. (पांडूर + रंग) संध्याकाळी गोरज मुहूर्तावर लग्ने होऊ लागली. एवढे गाईचे महत्व म्हणून भारतामध्ये संपूर्ण गोवंश हत्या बंदी झाली पाहिजे.

हे सर्व मातांचे वर्णन झाले. शंकराचार्यांचे एक प्रमाण सांगतो 'कुपुत्रो जायते क्वचिदपि, कुमाता न भवति॥ कुपुत्र खूप जन्मतात पण अद्याप कुमाता झाली नाही. कैकयीस कुमाता म्हणतात पण ती भरताच्या दृष्टीने. आमच्या दृष्टीने ती सुमाताच ठरेल.

सर्व मातांना प्रणाम करून ही 'माऊली' कोटी संपवूया.

★ ★ ★ ★ ★

६० : लेकरु

लेकरु म्हणजे तान्हे बाळ, अर्भक. जे फक्त आईशी अनन्य असते. अनन्यतेची उदाहरणे देताना चातक, चकोर, मासा, पतिव्रता, कृपण याबरोबर लेकरांचे उदाहरण येते. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात बालकासमोर, विश्वसुंदरी जरी उभी केली तरी बालक आपल्या आईकडेच जाणार मग ती कशीही असली तरी!

आपुली माय। कुब्ज जरी आहे। जीजे ते नोहे। स्नेह कुन्हे की॥ ज्ञाने.
येरी जीया पराविया। रंभेहुनि बरविया। तिया काय कराविया। बालके तेणे॥ ज्ञाने.

स्वर्गात अप्सरा आहेत त्यापेक्षा सुंदर उर्वशी, पण सर्वात सुंदर रंभा जी तपस्वी नारायणाने इंद्रास भेट दिली ती रंभा जरी बालकासमोर उभी केली तरी बालक आपल्या कुब्ज असणाऱ्या

आईकडेच जाणार. तुकाराम म्हणतात.

जैसी तैसी माय बरी। मानिल्या त्या माना येरी॥

लेकरु वेगळे व मुलगा वेगळा. यावरुन कोटी निर्माण होते.

१) आईशी अनन्य ते - लेकरु
२) गाईशी अनन्य ते वासरु - बैल वेगळा
३) पक्षिणीस अनन्य ते पाखरु - पक्षी वेगळा
४) शेळीशी अनन्य ते कोकरु - बोकडाची अवस्था वेगळी
५) मेंढीशी अनन्य ते मेंढरु - मेंढा वेगळा
६) वाघिणीशी अनन्य ते वाघरु - वाघ वेगळा
७) गाढवीणिशी अनन्य ते सिंगरु - गाढव वेगळा.

ज्ञानेश्वर महाराज माऊली आहेत. विठ्ठल, माऊली आहे. पण आपण लेकरु म्हणजे त्यांच्याशी अनन्य होणे महत्वाचे आहे. जे अनन्य आहे त्यांचे कल्याणच झाले. लेकरु झाल्यास माऊलीस काळजी आहेच.

लेकुराचे हित। जाणे माऊलीचे चित्त॥ तु. म.
तुका म्हणे माता। वाहे तान्हुल्याची चिंता॥ तु. म.
मातेचिया चित्ती। अवघी बालकाची व्याप्ती॥ तु. म.

★ ★ ★ ★ ★

६१ : भाग्य

भाग्य याचंच नाव दैव किंवा नशीब अथवा संचित, भाग्याचे मुख तीन प्रकार. १) संसारीक, इहलोकीचे भाग्य, २) पारलौकीक भाग्य, ३) परमभाग्य अर्थात परमार्थिक भाग्य. संसारीक भाग्य याचा थोडा विचार. मानव देह मिळणे हे अतिभाग्याचे लक्षण आहे.

बडे भाग मानुष तनु पावा। सुरदुर्लभ सब ग्रंथन्हि गावा॥ तुलशीदास

मानव तनु देव दुर्लभ आहे. या देहाचि इच्छा इंद्र, ब्रह्मदेव करतात.

इहलोकीचा हा देह। देव इच्छिताती पाहे॥ तु. म.

स्वर्गीचे अमर इच्छिताती देवा। मृत्युलोकी व्हावा जन्म आम्हा॥ तु. म.

या देहात सर्व इंद्रिये यथासांग असणे हे सुद्धा 'भाग्याचे' लक्षण आहे.

'सदैव' तुम्हा आहे। हात पाय चालण्या॥
मुखी वाणी किर्ती कानी। डोळे मूर्ती देखावया॥

अंधबहिर ठकले किती। मुकी होती पांगुळ॥ तु. म.

आंधळे बहिरे, मुके, पांगळे, रोगी नसणे. हे भाग्याचे लक्षण समजावे. यामध्ये भारतासारख्या संतांच्या भूमीत जन्म मिळणे हे परम भाग्याचे लक्षण आहे. असे नाथ महाराज म्हणतात.

भरतखंडी नरदेह प्राप्ति। हे तो 'परमभाग्याची' संपत्ती।
तेथही विवेकु परमार्थी। त्याच्या वशवर्ती मी परमात्मा॥

एक सुभाषितकार भाग्यवंत जावई याचं वर्णन करतात.

भार्या जेष्टा शिशुश्यालः श्वश्रु स्वातंत्र्यवर्तिनी।
श्वशुरस्तु प्रवासीच जामातु भाग्य कारणम्॥

ज्याची बायको माहेरी मोठी (पहिले अपत्य) मेहुणे लहान, सासू स्वतंत्र व उदार आणि सासरा नेहमी प्रवासात तो जावई भाग्यवान.

महाराष्ट्रामध्ये जन्म मिळणे सुद्धा भाग्याचे लक्षण आहे. कारण ही भूमी ज्ञानोबा, तुकोबा आदी संतांनी महान, पवित्र केली आहे. अनेक राज्यांचे राष्ट्र असते. पण हे राज्यच 'महा'राष्ट्र आहे. संसारात कोणतीच गोष्ट भाग्याशिवाय प्राप्त होत नाही. शेतीत व्यापारात नोकरीत कशातही भाग्य लाभेल तर तो श्रीमंत होतो. 'भाग्याचेनि भडसे। उद्यमाचेनी मिसे। समृद्धीजात अपैसे। घर रिघे॥' ज्ञाने. 'व्यवसाय निमित्त। फळ देतसे संचित॥' तु. म. 'भाग्य जै सानुकुल। तै केलिया उद्यम सदा सफळ॥' ज्ञाने.

तुकाराम महाराज एक दृष्टांत देतात.

एक माणूस संडासला बाहेर शेतात गेला होता. शौचास बसला असताना एका काडीने जमिन उकरु लागला. अर्थात धातू दिसला. आणखी उकरले. हांडा दिसला, झाकण उघडले तर सोन्याच्या मोहरा. तो दैववादी होता. परत मातीने हंडा झाकला व शेजाऱ्याना कल्पना दिली. अमुक ठिकाणी सोन्याच्या मोहराचा हंडा आहे. शेजारी रात्री लोखंडी पहार, कुदळ घेवून गेले. हंडा बाहेर काढला. पाहतात तो आत सर्प, विंचू आणि कोळसे. तुकाराम महाराज म्हणतात. सर्प विंचू दिसे। धन अभाग्या कोळसे॥ त्यांनी तसाच हंडा झाकला व रात्री ज्यानी वातमी सांगितली होती त्याच्या घरावरची कौले काढून हंडा खाली ओतला. काय भाग्य त्याच्या घरी हंडयातील सर्व मोहरा पडल्या. त्याला हंडा आणण्याचे पण कष्ट पडले नाहीत. कारण भाग्य!

संसारात चांगली बायको मिळणे, धन मिळणे, चांगला मुलगा मिळणे हे पण भाग्य आहे. पण तुकाराम महाराज यास भाग्य म्हणत नाहीत. ''भाग्य तरी नोहे धन पुत्रदारा। निकटवास बरा संतापायी।'' धनवान भिकारी होऊ शकतो. पुत्रवाला पुत्रहिन अथवा कुपुत्राचा बाप होतो. पत्नी कधी कधी पतनास नेणारी मिळते. म्हणून हे खरे भाग्य नाही.

२) पारलौकिक भाग्य - नाथ महाराज म्हणतात.

इंद्रपदादी ब्रह्मसदन। या नाव भाग्यपूर्ण।
तेहि सत्संगासमान। कोट्यांशे जाण तुकेना॥ भागवत.

इंद्रापासून ब्रह्मदेवापर्यंत एकापेक्षा एक वरचढ भाग्य आहे. पण या सर्वांना हे भाग्य काही दिवसाकरीता असल्यामुळे, नंतर जन्ममरणाचे दुःख भोगावे लागणार, त्यामुळे हे खरे भाग्य नाही. आता खऱ्या भाग्याचा विचार करु.

३) परम भाग्य - मानव देह मिळून परमार्थाला लागणे हे भाग्याचे लक्षण आहे. 'भाग्यवंत म्हणा जया । शरण गेले पंढरी राया ॥' तु.म. देवाची शरणागती पत्करली. सतत नामस्मरण करीत राहिला. 'नाम गोविंदाचे । घ्यारे हेचि भाग्य साचे ॥' तु.म. अर्थात म्हातारपणात नाही लहानपणापासून. 'तरणा' भाग्यवंत । नटे हरि कीर्तनात ॥ तु.म.

अशा प्रकारे परमार्थात रंगला! पूर्ण रंगला असताना परत तीन भाग्ये प्राप्त झाली. कोणती तीन भाग्ये?

१) ज्ञानाचे भाग्य, २) वैराग्याचे भाग्य, ३) भक्तिचे भाग्य

ज्ञानाचा डोळा डोळसा। तो डोळस असे विरेशा।
हे स्तुती नव्हे बहुवसा। 'भाग्याचा' तो॥ ज्ञाने. - ज्ञानभाग्य
ते हे विषय वैराग्य। आत्मलाभाचे भाग्य।
येणे ब्रह्मानंदा योग्य। होती जीव॥ ज्ञाने. - वैराग्याचे भाग्य
भक्तिभाग्य सीमा साधीन पुरुषार्थ। ब्रह्मीचा जो अर्थ निजटेवा॥ तु.म.
तुका आला लोटांगणी। भक्ति भाग्या जाली धनी॥

अर्थात या तीन भाग्यांमुळे संतांची भेट होऊ शकेल. अथवा संत भेटल्यामुळे ही तीन भाग्ये मिळतील. कारण संत हे ज्ञान, वैराग्य, भक्ति यांनी परिपूर्ण असतात. त्यांच्या संगतीमुळे साधकांना या तीन भाग्यांचा लाभ होतो.

वैराग्याचे भाग्य। संतसंग हाचि लाग॥
संतकृपेचे हे दिप। करी साधका निष्पाप॥
तोचि देव भक्त। भेदाभेद नाही ज्यात॥
तुका प्रेमे नाचे गाये। गाणियात विरोनि जाये॥ तु. म.

संतसंगे हरिची भक्ति। संतसंगे ज्ञानविरक्ति॥
संतसंगे भुक्ति-मुक्ति। साधका वरीती अनायासे॥ निळो.

अर्थात संतांची भेट होऊन त्यांनी कृपा करणे, हेच सर्वश्रेष्ठ परम भाग्य. कारण संतांमुळेच देवाची कायमची भेट होते. 'भाग्याचा उदय। ते हे जोडी संतपाय॥' तु. म. संतांमुळे देवाची प्राप्ति.

उजळले भाग्य आता। अवघी चिंता वारली।
संत दर्शने हा लाभ। पद्मनाभ जोडला॥ तु.म.
निळा म्हणे साधुसंग। हे तो 'महाभाग्याचे भाग्य।'
सेविती ते स्वरुप चांग। पावती आत्मया श्रीहरिचे॥

भागवतकार सांगतात, देवाच्या मुखांद्वारे

ते सभाग्या मनुष्येषु कृतार्थ नृप निश्चितम।
स्मरन्ति ये स्मारयन्ति, हेरेर्नाम कलौयुगे॥

अर्थ : ते भाग्यवान नर, अर्थात कलियुगातील, जे स्वतः नामस्मरण करतात आणि दुसऱ्यांना स्मरण करण्यास भाग पाडतात, ते नक्की कृतार्थ होतात.

तात्पर्य - मानव, त्यानंतर साधक, परमार्थ व संतांची भेट होऊन देवाची कायमची प्राप्ति होणे हे भाग्याचे प्रकार (कोटी) आहेत.

★ ★ ★ ★ ★

६२ : चंदन

या कोटीमध्ये चंदनाच्या झाडाचे गुण-अवगुण पाहू. संत वाङ्मयात चंदनाचे पुष्कळ ठिकाणी वर्णन आहे. इतर सर्व झाडांपेक्षा चंदनात जास्त चांगले गुण आहेत. म्हणून संतांचे वर्णन करताना सर्व संतांनी, शास्त्रांनी साधूंना चंदनाची उपमा दिली आहे.

'तुका म्हणे गुण चंदनाचे अंगी। तैसे तुम्ही जगी संतजन॥ चंदनाचे हात पायही चंदन। परीसा नाही हीन कोणी अंग॥ तु. म. ज्ञानेश्वरीत माऊलींनी दहाव्या अध्यायात ७५ विभूति सांगतांना झाडांमध्ये पिंपळ विभूति असल्याचे सांगितले आहे. पण ते चंदनास विसरत नाहीत.

कल्पद्रूम हन पारिजात। गुणे चंदनुही वाड विख्यातु।
तरी तया वृक्षजाता आतु। अश्वत्थु तो मी॥ ज्ञाने.

तथापि या कोटीत चंदन आणि संत यांच्यात काय साम्य आहे ते पाहू. तसे चंदनाचे व संतांचे सात साम्य सत्‌गुण पहावयास मिळतात.

१) चंदनाचे झाड ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणचा संपूर्ण परिसर सुगंधमय असतो. तद्वत ज्या ठिकाणी संत वास्तव्य करतात त्या ठिकाणी सर्वत्र मंगलमय वातावरण असते. मुनींच्या आश्रमात गाय-व्याघ्र एके ठिकाणी रहात होते. सर्प-मुंगूस वैर विसरत होते. तुकाराम महाराज म्हणतात, 'जेथे असती उभे ठेले। सदा प्रेमसुखे धाले। आणिकहि उद्धरिले। महादोषी चांडाळ॥'

त्रिजटा - राक्षसीण, पण सीतामाईच्या सान्निध्यात रामरूप झाली. तिचे उद्गार नाथ महाराज रामायणात सांगतात - 'कर्म पहाता राक्षसी। मनुष्याचा आहार आम्हासी। भेटी होता जानकीसी। निजकर्मासी विसरले ॥' हा त्यांच्या सहवासाचा परिणाम आहे.

२) चंदनाचा अत्यंत महत्त्वाचा गुण म्हणजे चंदनाचे झाड ज्या ठिकाणी असेल त्या ठिकाणी असणारी आजूबाजूची सर्व झाडे चंदनासारखी सुगंधी होतात. त्याप्रमाणे साधूंच्या सान्निध्यात येणारे साधक जीव संत बनतात. नाथ महाराज म्हणतात - 'सर्वांगी सुवास परी तो उगला न राहे। सभोवती तरूवर चंदन करीतची जाये ॥ किंवा 'चंदनाच्या वासे। तरू चंदन झाले स्पर्शे ॥ तु. म.

यात तीन प्रकारे फरक जाणवतो.

अ) चंदन सामान्य झाडांनासुद्धा सहवासाने चंदन बनवितो. नाथ महाराज म्हणतात -

'केवळ पाहे पा जडमूढे। चंदना सभोवती झाडे।
ती सुगंधी होऊनि लाकडे। मोल गाढे पावली ॥'
'तीच काष्टे तत्वता। चढली देव ब्राह्मणांचे माथा।
त्यांचा पांग पडे श्रीमंता। राजे तत्वता वंदिती ॥ भागवत (ए)'

तसे महात्म्यांच्या सहवासात येणारे सर्व सामान्यजन संत झाले. उदाहरणच द्यायचे झाले तर रामदास स्वामींच्या सहवासातील 'कल्याण', फक्त खाण्याकरिता आलेला, नाथांच्याकडील गावबा. नाथांनी इहलोकीची यात्रा संपवायचे ठरविले. पण रामायण ग्रंथ थोडा अपुरा होता. वंशपरंपरेने हरिपंडितांनी विचारले, "बाबा आपण जाणार, पण हा ग्रंथ कोण पुरा करणार?" नाथ बोलले "माझा गावबा तो पूर्ण करील".

एकदा शंकराचार्य प्रवचनास बसले. पण वेळ होऊन गेली तरी प्रारंभ होत नाही म्हणून समोरचे विद्यार्थी बोलले कि जे शास्त्री, पंडित, वाचस्पती होते, 'गुरुजी सुरू करा. फार वेळ होतोय'. आचार्य बोलले 'त्रोटक येऊ द्या'. विद्यार्थी बोलले, 'त्रोटकला प्रवचनातील कळतेच काय? तो तुमची इतर सेवा करण्याच्या कामाचा आहे'. आचार्यांना वाटले यांना 'ग' ची बाधा झाली आहे. 'ग' फार वाईट, पण ज्ञानाचा गर्व अतिशय वाईट. 'तुका म्हणे नरकी घाली अभिमान। जरी होय ज्ञान गर्व ताठा ॥' आचार्य आसनावरून उठले व त्रोटकास सांगितले प्रवचन सुरू करा. फक्त हात मस्तकावर ठेवला व कृपादृष्टीने पाहिले. त्रोटक आचार्यांपेक्षा उत्कृष्ट बोलू लागला.

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात -

'तुझिया स्नेहाचि वागेश्वरी। जरी मुकयाते अंगीकारी।
तो वाचस्पतीशी करी। प्रबंधु होडा ॥'

'हे असो दिठी जयावरी झळके। कि पद्मकरू माथा पारूखे।
तो जीवचि परी तुके। महेशेसी ॥

त्रोटक शंकराचार्यांच्या कृपेने महात्मा बनला, जो सामान्य होता.

माऊली म्हणते 'चंदने वेधली झाडे। झाली चंदनाचेनि पाडे। वसिष्ठे मांडिले भांडे। कि भानुशी शाटी।' वशिष्ठ-विश्वामित्राच्या वादात वशिष्ठांनी आपली लंगोटी सूर्याच्या ठिकाणी, कमंडलु सागराच्या ठिकाणी आणि दंड मेरू पर्वताच्या ठिकाणी ठेवला. तात्पर्य, सामान्य वस्तूंना एवढे महत्त्व प्राप्त झाले, कारण संतांचा सहवास मिळाला.

ब) चंदनाच्या सान्निध्यात येणारी बोरीसारखी झाडे चंदन होतात. बोरीचे वर्णन ज्ञानेश्वर महाराज करतात - 'गोवी गेलीया जवळी। झगटलीया अंग फाळी। फळे तरी आत पोकळी। बोरांडी जैसी ॥' बोरीच्या झाडाजवळ माणूस गेला तर तो गोवला जातो. सलगी केली तर शरिरास जखमा होतात. फळे एवढी चांगली नसतात पण चंदनाच्या सहवासात बोरी, चंदन होते. तुकाराम महाराज म्हणतात - 'संतांनी सरता केलो तैशापरी। चंदनाने बोरी व्यापियेल्या ॥' याप्रमाणे संतांच्या सहवासात येणारी खोडकर माणसे संत, संत बनवितात. उदा. विसोबा खेचरांनी चारही भावंडाचा छळ केला. मांडे खाण्याकरिता भांडे व तेल मिळू दिले नाही. पण योगाग्नीने पाठ तापवून जेव्हा मुक्ताईने मांडे भाजले व त्यांची पंगत बसली हे चोरून खेचराने पाहिले. हा चमत्कार पाहून, महिमा जाणून खेचर प्रसादाकरिता आत गेला. माऊलीने म्हटले, "सर परता हो खेचरा" थोडा हाताचा स्पर्श झाला. काय आश्चर्य! खेचर ब्रह्मरूप झाला. यापेक्षा माऊलींनी विसोबा खेचरांना नामदेवरायांचे गुरू करून ठेवले.

क) चंदनाच्या सहवासात कडुनिंबाचे झाडसुद्धा चंदन होते. माऊली सांगते -

'चंदनाचेनि अंगानिळे। शिवतले निंब होती जे जवळे।
तेहि देवांच्या निढळे। बैसणे केले ॥' ज्ञाने.

चंदनाच्या सहवासामुळे कडुनिंबाचे झाड चंदन झाले व देवांच्या कपाळावर जाऊन बसले. तथापि संतांच्या सान्निध्यात येणारी महापापी माणसे साधू बनली. उदा. नारदांच्या सहवासातील वाल्या कोळी वाल्मिक झाला. भगवान बुद्धांच्या सहवासात अंगुलीमाल राक्षस सत्‌शिष्य झाला.

३) चंदन हा तापनिवारक आहे. ताप आल्यास अंगास, कपाळास चंदन लावतात. 'तापलिया चंदन निवविती कुडी ॥' तु. म. 'तापलिया तेला बावन चंदन। बुंद एक क्षण शितल करी ॥' तु. म. 'तुका म्हणे कढे करावे शितळ। ऐसे जाती बळ चंदनाचे ॥' बावन्न चंदनाचा एक थेंब उकळत्या तेलाच्या कढईत टाकला तर ती कढई एका क्षणात शांत होते. हे चंदनाचे सामर्थ्य आहे. तद्वत साधुमुळे त्रिविध ताप क्षणात नाहीसे होतात.

'त्रिविध तापाची झाली बोळवण। देखिल्या चरण वैष्णवांचे ॥' नाथ.

'पाप ताप दैन्य जाय उठा उटी। झालिया भेटी हरिदासांची॥' तु. म.

'झाली पापा तापा तुटी। दैन्य गेले उठाउटी॥' तु. म.

१) आधिभौतिक ताप - जो समाजापासून, मानवामुळे होतो. २) आध्यात्मिक ताप - जो शारिरीक व्याधींमुळे होतो व ३) आधिदैविक ताप - जो दैवामुळे होतो. उदा. दुष्काळ, चोरी, आग. असे हे तीन ताप म्हणजेच दुःखे, संतसमागमात नाहिशी होतात.

४) चंदन हा दुर्लभ आहे. जशी इतर झाडांची लाकडे मिळतात तशी चंदनाची लाकडे मिळत नाहीत. किंबहुना क्वचित जंगलातच चंदनाचे झाड असते.

'शैले शैले न माणिक्यं, मौक्तिकं न गजे गजे।
साधवो नहि सर्वत्र, चंदनं न वने वने॥' सुभा.

अर्थ : प्रत्येक जंगलात चंदन नाही, प्रत्येक हत्तीच्या मस्तकात मोती नाही, प्रत्येक खाणीत माणिक मिळत नाही, तसे साधू सर्वत्र नसतात. अर्थात दुर्लभ आहेत.

महत्संगस्तु दुर्लभो, अगम्यो, अमोघश्च॥ ना. भ. सू. ३९

महात्म्यांचा संग दुर्लभ आहे. झालाच तर कळणे कठिण आहे. देवेंद्रास दुर्वास भेटले, पण कळले नाहीत. कळलेच तर फुकट जाणार नाही. कल्याणच होणार. एक हिंदी काव्य आहे.

'तात मिले पुनी मात मिले सुतभ्रात मिले युवति सुखदाई।
राज मिले गजराज मिले सब साज मिले मन वांछित पाई।
लोक मिले सुरलोक मिले विधीलोक मिले वैकुंटहि जाई।
सुंदर मिले और सबसुख संत समागम दुर्लभ भाई॥

अर्थ सोपा आहे. तात्पर्य चंदन दुर्मिळ - साधू दुर्मिळ.

५) चंदन आपले गुण देतो पण दुसऱ्याचे दुर्गुण घेत नाही. तसे संत आपले सद्गुण देतात पण दुसऱ्याचे दुर्गुण घेत नाहीत.

'जो नर उत्तम प्रकृति क्या करत कुसंग।
चंदन बीस व्यापत नही लपटे रहत भुजंग।' तुलसी.
'विकृति नैव गच्छन्ति, संगदोषेण साधवः।
आवेष्टितं महासर्पेश्चन्दनं न विषायते॥ सुभा.

अर्थ - संगदोषामुळे साधू विकृत होत नाही.जसे साप चंदनाच्या झाडास लिपटले तरी चंदनात विष उतरत नाही. मात्र सापास थंडावा मिळतो.

६) चंदन निरपेक्ष मोठा आहे तसे साधू निरपेक्ष मोठे असतात.

'चंदन तो चंदनपणे। सहज गुणे संपन्न॥ तु. म.

'नलगे चंदना पुसावा परिमळ। वनस्पती मेळ हाकारोनि॥ तु. म.

तुकाराम महाराज म्हणतात वनस्पतींची निवडणूक होऊन चंदन मोठा ठरवित नाहीत. तो स्वयंभू मोठा आहे. तसे महात्मे स्वयंभू मोठे आहेत.

निरपेक्ष मोठे, निरूपाधिक मोठे, निर्निमित्त मोठे, अनंत मोठे, थोडक्यात संत कोणाच्या अपेक्षेने मोठे नाहीत. उपाधीमुळे मोठे नाहीत, निमित्ताने मोठे नाहीत, तात्पुरते मोठे नाहीत, कायमचे मोठे.

७) चंदन जसा झिजतो व आपला सुगंध सर्वांना देतो तसे साधू जगाकरिता झिजतात व त्यांचे कल्याण करतात.

'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूति। देह कष्टविती परोपकारे॥' तु. म.

हे चंदनाचे सात गुण व संतांचे सात सद्गुण. चंदनाचे चार दुर्गूणही आहेत, जे संतांकडे नाहीत.

१) चंदनाचे एवढे गुण असून चंदनाची झाडे मात्र लावत नाहीत. कारण जिथे चंदनाची झाडे तिथे नक्की सर्पवस्ती असते.

'चंदनाचे गावी सर्पाची वसती। भोगिती ते होती द्वीपांतरी॥' तु. म.

'चंदनाचे बुड। सर्पी जैसे दुवाड। का निधानाचे तोंड। विवसीया जेवी॥ ज्ञाने.

मात्र मानवाच्या ठिकाणी दुष्टपणा असेलच तर संत त्याचा दुष्टपणा काढतात व महामानव बनवितात. तुलसीदास म्हणतात, 'संत असंतनी कै असी करनी। जिमि कुठार चंदन आचरनी॥ काटई परसू मलय सुनु भाई। निज गुण देई सुगंध बसाई॥' संत व दुष्ट यांच्यात तुलना केल्यास संत चंदनासारखे, दुष्ट कुऱ्हाडीसारखे. कुऱ्हाड चंदनाला तोडण्यास गेली तरी चंदन तिला सुगंधच देतो.

२) चंदन वेळूस, चंदन बनवित नाही कारण त्यावर गाठी असतात.

'तुका म्हणे वेळू चंदना संगती। काय ती असती जवळिके॥

मात्र संतांनी वेळूस पताकाकरिता उपयोगास आणला व त्याचे एवढे महत्त्व वाढवले की चंदनाने वेळूची पूजा होते. 'उंच पताकाचे भार। आले वैष्णव डिंगर॥

३) चंदनास फूल-फळ नाही.

'क्षत्रिय आणि शूर भला। स्वरूपी गुण व्यापिला।
चंदन फुली फुलला। हे दुर्लभजी दातारा॥' नाम.

मात्र संतांमुळे भुक्ती, मुक्ती व भक्ति मिळते. फूल, फळच काय परिपक्व फळ मिळते.

४) चंदन अग्नित टाकल्यास अग्निरूप होतो. (जरी शितल असला तरी) माऊली म्हणते,

'चंदन होय शितळू। परी अग्निसी पावे मेळू।
तै हाती धरीता जाळू। न शके काई ॥'

तथापि संतांना अग्नित टाकण्याचा प्रयत्न केला. पण अग्नी त्यांच्यामुळे शितळ झाला. प्रल्हाद, सीता यांची उदाहरणे आहेत. तुकाराम महाराजांच्यावरसुद्धा शिवबा कासारच्या पत्नीने हा प्रयोग केला. महाराज म्हणतात -

'जळे माझी काया लागला वोणवा। धाव रे केशवा मायबापा॥

देवाचा धावा करताच शरीर शितल झाले.

हे चंदनाचे चार अवगुण संतांच्या जवळ नाहीत. संत-सज्जन त्याला म्हणतात ज्याच्याकडे एकही अवगुण शोधून सापडणार नाही.

'तुका म्हणे तैसा सज्जनापासून। पहाता अवगुण मिळेचिना॥

असे हे चंदनाचे सात गुण व चार अवगुण. संतांकडे सात गुण आहेत, पण चार अवगुण नाहीत.

★ ★ ★ ★ ★

६३ : धन्य

या संसारात धन्य कोण? धनिक भरपूर आहेत. पण धन्य विरळे. संतांनी आ । वाङ्मयात धन्यतेचे प्रकार सांगितले आहेत. तुळशीदास आठ धन्य सांगतात.

धन्य देश सो सहँ सुरसरी। धन्य नारी पतिव्रत अनुसरी।
धन्य सो नृपु नीती जो करई। धन्य सो द्विज निजधर्म न टरई।
सो धन धन्य प्रथम गति जाकी। धन्य पुण्य मती सोई पाकी।
धन्य घरी सोइ जब सत संगा। धन्य जन्म द्विज भगति अभंगा॥

१) ज्या देशात गंगा नदी वाहते तो देश धन्य.

धन्यहि भारतवर्षे धन्य यस्य परंपरा।
भारतीय जन धन्यः धन्य यस्य संस्कृतिः ॥ सुभा.

भारत देश धन्य, भारतातील परंपरा धन्य, लोक धन्य व त्यांची संस्कृति धन्य!

२) धन्य पतिव्रता स्त्री.

३) धन्य तो राजा जो नितीने राज्य करतो.

४) धन्य तो ब्राह्मण, कोणत्याही परिस्थितीत आपला धर्म सोडत नाही.

५) ते धन धन्य जे धर्माच्या उपयोगी पडते.

६) धन्य त्याची पुण्यमय बुद्धी जी देवाच्या ठिकाणी स्थिर आहे.

७) त्याचे जीवन धन्य ज्याने सत्संग धरला.

८) त्याचा जन्म धन्य ज्याने द्विजभक्ति अखंड केली.

तुकाराम महाराजांनी शरीराच्या अवयवांची धन्यता सांगितली आहे.

धन्य दिवस आजी डोळिया लाधला। आनंद देखिला धर्णींवरी॥१॥
धन्य झाले मुख निवाली रसना। नाम नारायणा घोष करी॥२॥
धन्य हे मस्तक सर्वांगा शोभले। संतांची पाउले लागताचि॥३॥
धन्य आजि पंथे चालती पाउले। टाळिया शोभले कर दोन्ही॥४॥
धन्य तुका म्हणे आम्हासी फावले। पावलो पाउले विठोबाची॥५॥

१) देवाचे - संतांचे दर्शन हीच डोळ्याची धन्यता.

२) ते मुखकमल धन्य जे सतत नामस्मरण करते.

३) ते मस्तक धन्य जे संतांच्या पायांवर ठेवले.

४) ते पाय धन्य जे पायी तीर्थयात्रा करतात. ते हात धन्य जे भजनात टाळी वाजवितात. दान करतात अथवा देवपूजा करतात.

हस्तं पवित्रं यदि दान पुण्यं, पादं पवित्रं यदि तिर्थयात्रा।
मुखं पवित्रं यदि नामघोषं, हृदयं पवित्रं यदि ब्रह्मनिष्ठा॥ सुभा.

'हस्तस्य भूषणं दानं, सत्यम् कंटस्य भूषणं।
श्रोत्रस्य भूषणं शास्त्रं भूषणे किं प्रयोजनम्'॥

अर्थ अतिशय सोपा आहे.

तुकाराम महाराज शेवटी सांगतात आमचे जीवन धन्य झाले, कारण विठोबाचे चरण आम्हास प्राप्त झाले.

माऊली म्हणते, 'धन्य कुळ धन्य जन्म। जया पंढरीचा नेम। चित्ती अखंड विठ्ठल प्रेम। ते धन्य भक्त भूमंडळी ॥''

धन्य कोण? कल्याण मासिकात एक दृष्टान्त आला आहे. एकदा नारद गंगाकाठी येतात. त्यांना एक कासव दिसते. नारद म्हणतात, कासवा, तू धन्य, कारण तू गंगेत राहतोस. कासव म्हणते, ती गंगा धन्य, जिच्या उदरात असंख्य कासवे राहतात. नारदांना पटते. गंगामातेची स्तुती करतात. गंगा प्रगट होते. नारद सांगतात, आपण धन्य गंगामाता! गंगा सांगते माझ्यासारख्या

असंख्य नद्या ज्याच्यात सामावतात तो सागर धन्य. नारद सागरकिनारी जाऊन म्हणतात, सागर महाराज आपण धन्य. सागर प्रगट होतो, म्हणतो, पृथ्वीमुळे मला धन्यता! फक्त पाण्यास कोण विचारतो, पृथ्वी मातेस नारद धन्यता देतात. ती प्रगटते व म्हणते ब्रह्मदेव धन्य, कारण त्याने जीवसृष्टी निर्माण केली. नाहीतर माझी काय किंमत! नारद बाबाकडे (ब्रह्मदेवाकडे) जातात म्हणतात, बाबा आपण धन्य! ब्रह्मदेव सांगतात, जीवसृष्टी निर्माण करण्याचे ज्ञान मला माझ्या बाबापासून, विष्णूपासून मिळाले, तो धन्य! ''धन्य धन्य पांडुरंग। सकळ दोषा होय भंग॥'' नाम. त्यावेळी विष्णूचा अवतार द्वारकेत असतो. नारद द्वारकेत येतात आणि सभेत पुकारतात, श्रीकृष्ण आपण धन्य! श्रीकृष्ण सर्व जाणतात आणि म्हणतात खरे धन्य 'भक्त', कारण त्यांच्याकरिता मला अवतार घ्यावा लागतो. ''आम्हासाठी अवतार। मत्स्यकुर्मादि सूकर॥'' तु. म. याचा अर्थ जगामध्ये धन्य भक्तच. 'धन्य धन्य हरिचे दास। जया सुलभ गर्भवास। ब्रह्मादिक करिती आस। तिर्थे वास भेटीची॥' तु. म. धन्य जगी तोचि एक हरिरंगी नाचे॥' एक. असे धन्य कोण? 'धन्य तो निवृत्ति, धन्य तो सोपान। धन्य हा निधान ज्ञानदेव॥ नाम.

★ ★ ★ ★ ★

६४ : मायबाप

शास्त्रात, संतांनी मायबापाचे जवळजवळ नऊ प्रकार सांगितले आहेत. प्रत्येकास पांच माता असतात व पांच बाप असतात. पांच माता - राजपत्नी, गुरुपत्नी, मित्रपत्नी तथैवच। पत्नीमाता स्वमाताच पंचेता मातरः स्मृता॥ म. स्मृ.

१) राजपत्नी, २) गुरुपत्नी, ३) मित्रपत्नी, ४) सासू, ५) स्वतःची आई.

पाच पिता - जानिता च विनेता च यस्तु विद्यां प्रयच्छति।
अन्नदाताः भयत्राता पंचैते पितरः स्मृताः॥ म. स्मृ.

१) जन्म देणारा, २) उपनयन करणारा, ३) विद्या देणारा, ४) पालन-पोषण करणारा, ५) भय निवारण करणारा.

उपजलिया बालकासी तत्वता। पंचविध जाण पिता।
जनिता आणि उपनेता। तिजा प्रतिपाळीता अन्नदाने॥
जो भयापासूनि सोडविता। जो बंधविमोचन करविता।
जो देहाचे मरण चुकविता। तोहि पिता शास्त्रार्थे॥ भागवत

यांचा थोडासा विचार केल्यास यातील चार माता-पिता वेगळे-वेगळे आहेत. स्वतःचे माता-पिता महत्त्वाचे. कारण शास्त्र, संत सांगतात हे प्रत्यक्ष देव आहेत. यांची सर्व प्रकारे सेवा करावी.

मातरं पितरं चैव साक्षात प्रत्यक्ष देवताम्।
मत्वा गृही निषेवेत सदासर्व प्रयत्नतः॥ म. स्मृ.

माऊली सांगते, 'सकळ तिर्थांचिये धुरे। जिये कां मातापितरे। तया सेवेशी किर शरिरे। लोण किजे॥' ज्ञाने. आईवडील हे तिर्थरुप आहेत, आपणास कल्पना आहे. पुंडलिकरायाने माता-पित्यांची सेवा केली. पांडुरंग संतुष्ट होऊन त्यांना भेटण्याकरिता आले. 'पितृसेवा पुण्ये लाधले निधान। ब्रह्म सनातन तया घरी॥' तु. म. गणेशबाप्पांनी शंकर-पार्वतीस प्रदक्षिणा घालून अग्रपूजेचा मान मिळविला. श्रावणबाळाची कथा सर्व भारतीयांना माहितच आहे.

माऊली म्हणते, ज्यास विश्वमान्यता आहे, पण आईवडिलांसी धड बोलत नाही त्यासारखा मूर्ख कोणी नाही. 'घरी मातापितरा। धड बोली नाही संसारा। येर विश्वभरी आदरा। मुर्खू जैसा॥' ज्ञाने. आपल्या मिळकतीचा काही भाग आईवडिलांकरिता खर्च करावा. एकदा एक राजा जंगलात शिकारीस गेला. शिकार मिळाली नाही. रात्र झाली. एका शेतकऱ्याच्या घरी रहावे लागले. राजाने विचारले, आपली मिळकत किती? खर्च कसा करता? शेतकरी हुशार होता. सांगितले, माझ्या शेतात २० पोती धान्य होते. त्याचे चार भाग करतो. एक भाग मी खर्च करतो, एक भाग खड्ड्यात टाकतो, एका भागाने कर्ज फेडतो व एक भाग कर्जाने देतो. राजा म्हणाला, मला समजले नाही. शेतकरी म्हणाला, सोपे आहे. एक भाग मला, एक भाग खड्ड्यात म्हणजे बायको-करिता. कारण ना पाप ना पुण्य. एक भाग कर्ज फेडतो म्हणजे आई-वडिलांकरिता खर्च करतो. एक भाग कर्ज देतो, म्हणजे मुलांकरिता खर्च करतो. राजास संतोष वाटला, असे हुशार व सेवाधारी शेतकरी आपल्या राज्यात आहेत. तात्पर्य, आई-वडिलांची सेवा करावी. तथापि आपल्या आईवडिलांना आपले खरे हित समजत नाही.

हित नाही टाऊके जननी जनका। दाविला लौकिकाचार तिही॥ तु. म.

काही आई-वडील तर सर्पीण व बोक्यासारखे असतात. स्वतःच्या संतानास खाणारे. 'मायबाप जरी सर्पिन का बोका। त्यांच्या संग सुखा वाळ न पविजे॥' तु.म.

दुसरी एक महत्त्वाची गोष्ट प्रत्येक जन्मी आई-वडील बदलतात. 'तुका म्हणे काई। किती म्हणो बाप आई॥ म्हणून जी माऊली माता-पित्यास मान द्या म्हणते ती ज्ञानेश्वर माऊली म्हणते, 'कवणाचे मायबाप कवणाचे गणगोत। मृगजळवत जाईल रया॥' या सर्वांचे एकच कारण आपले कायमचे हित करणारे ते आपले खरे मायबाप. असे माय-बाप माऊली सांगते,

बाप-वेद, माऊली-श्रुति,

ब्रह्माचा अबोला फिटावा। अद्वैत तत्वे तो भेटावा।
ऐसा मंत्र देखिला कणवा। वेदु बापे॥ ज्ञाने.
जो जगी समान सकृप। हिताहित दाविता दिप।
तो अमान्य केला 'बाप'। वेदु जेणे॥ ज्ञाने.

अहितापासुनि काढीती। हित देउनी वाढविती।
नाही गा श्रुति परौति। माऊली जगा॥ ज्ञाने.

हे हिताहित पहाणारे जीवाचे आई-वडील आहेत. पण हे कळण्यास कठीण आहेत. शिवाय यांच्यामध्ये पंक्तिप्रपंच दिसतो. तीन वर्णाच्याच उपयोगाचे असे माऊली सांगते.

वेद संपन्न होय ठायी। परी कृपण ऐसा आण नाही।
जे कानी लागला तिही। वर्णाच्याची॥ ज्ञाने.

हे सहावे मायबाप. वेद-श्रुतिचा अर्थ गुरू समजाऊन सांगतात म्हणून गुरूंनासुद्धा मायबाप म्हणतात. मात्र हे वास्तविक गुरू हवेत.

गुरू क्षेत्र गुरू देवता। गुरू 'माता' गुरू 'पिता'।
जो गुरू सेवेपरौता। मार्गु नेणे॥ ज्ञाने.

गुरू श्रुति द्वारा सांगतात तो मायबाप विठ्ठल (कृष्ण) यांचा नंबर आठवा. वेदात, शास्त्रात संतांनी देवास मायबाप म्हटले आहे.

''त्वमेव माता पिता त्वमेव'', माता रामो मत्पिता रामचंद्रः॥ रामरक्षा

विठ्ठल माय बाप चुलता। विठ्ठल भगिनी आणि भ्राता॥ तु. म.

येतीयासी पुसे जातीया धाडी निरोप। पंढरपुरी आहे माझा 'माय बाप'॥ नाम.

बाप आणि आई। माझी विठ्ठल रखुमाई॥ नाथ.

अशी शेकडो प्रमाणे आहेत. पण हा मायबाप दुसऱ्या मायबापाशिवाय भेटत नाही. श्रुती गुरु सांगतात पण संत मायबाप देव भेटवतात. म्हणून खरे मायबाप संतच!

तुम्ही संत 'माय बाप' कृपावंत। काय मी पतीत किर्ती वाणू॥ तु. म.

आजीचे हे मज तुम्ही कृपादान। दिले संतजन 'मायबापे'॥ तु. म.

खूप प्रमाणे आहेत. असे संत माय-बाप कोण? उत्तर - ज्ञानेश्वर माऊली.

साधकांचा 'मायबाप'। दरुषणे हरे ताप। सर्वाभूती सुखरुप। ज्ञानोबा माझा॥ नाथ.

माय कां? स्वभाव कारुणिक, सांभाळणारे, जागविणारे, शिकविणारे, म्हणून माय.
बाप कां? आपली परमार्थरुपी संपत्ती साधकांच्या नावे करणारे म्हणून बाप.

कृपाकटाक्षे न्याहाळिले। आपुल्या पदी बैसविले। ज्ञान.

असे हे माय-बापाचे प्रकार पण सर्व श्रेष्ठ मायबाप जे कायमचे कल्याण करणारे ते संतच!

★ ★ ★ ★ ★

६५ : उपकार

देवाने सृष्टीच्या प्रारंभापासून सात पदार्थाची उपकाराकरीता निर्मिती केली आहे. रविश्चंद्रो घनाः वृक्षा नदी गावश्च सज्जनाः। एते परोपकाराय युगे देवेन निर्मिताः॥ अर्थ-सूर्य, चंद्र, मेघ, वृक्ष, नदी, गाय, सज्जन हे सात पदार्थ.

१) सूर्य - सूर्यापासून आपणास प्रकाश, ड जीवनसत्व मिळते, विनामूल्य हे विशेष.

२) चंद्र - प्रकाश व शितलता मिळते. आपण खातो ते धान्य चंद्रामृतात तयार होते.

३) मेघ - पाऊस, पाणी देतो. स्वच्छता आणतो. हवेत गारवा निर्माण करतो. पाणी म्हणजे जीवांचे 'जीवनच' आहे. यामुळेच हरितक्रांती शक्य आहे.

४) वृक्ष - एका वृक्षाचे नाथ महाराज 'सात' उपयोग सांगतात, पत्र पुष्प छाया फळ। त्वचा काष्ट समूळ। वृक्ष सर्वांगे सफळ। सर्वांशी केवळ 'उपकारी'॥ नाथ. हे सात पदार्थ आहेत. शिवाय वृक्ष दिवसा प्राणवायू सोडतात व रात्री कार्बन डायऑक्साईड सोडतात. त्यामुळे प्राणीजीवन समतोल राहते. दुसरी महत्वाची गोष्ट. वृक्ष जितके घाणेरडी खते खातील तेवढी चांगली व भरपूर फळे देतात. मात्र मानव चांगले खातो व घाण बाहेर फेकतो. शिवाय जो वृक्ष लावतो त्याच्यावर उपकार व तोडतो त्याच्यावरही उपकार. माऊली म्हणते ''जो खांडावया घावो घाली। कां लावणी जयाने केली। दोघा एकचि साऊली। वृक्षु दे जैसा॥'' ज्ञाने.

पंजाबचे राजा रणजीतसिंह एकदा शिकारीस गेले होते. दुपारच्या प्रहरी विश्रांतीसाठी आंब्याच्या एका झाडाखाली बसले. थकल्यामुळे झोप लागली. सेवकपण डुलक्या घेऊ लागले. झोपडीत राहणारी एक म्हातारी आंब्याच्या कैऱ्या मिळण्याकरीता झाडास दगड मारु लागली. म्हातारीस बरोबर दिसत नव्हते. एक दगड चुकून राजास लागला. राजाचे कपाळ फुटले. राजा ओरडला. सेवक धावले. म्हातारीस समोर उभी केली. म्हातारी थरथर कापत होती. राजाने पाहिले व सांगितले हिला उद्या दरबारी हजर करा. राजास मलमपट्टी केली. दुसऱ्या दिवशी दरबार भरला. राजाने विचारले माझे या म्हातारीने कपाळ फोडले. हिला काय शिक्षा द्यावी. सर्वांनी एकमुखाने सांगितले सहा महिने कैद व ५०० रुपये दंड. मंत्री, सभाजन, न्यायाधीश सर्वांचे एकच मत. राजा कडाडला, म्हणाला मला दरबारात एकही शहाणा माणूस दिसत नाही. अरे ज्या आंब्याच्या झाडास दगड मारल्यास तो फळे देतो. मग मला दगड मारल्यास मी शिक्षा द्यावी? या आजीस ५०० रुपये बक्षीस द्या व एक साडी द्या. सर्व दरबार स्तंभित झाला. राजा बोलला झाडापेक्षा मला कमी समजता की काय?

५) नदी - नद्या, ओढे हे सुद्धा उपकाराकरीता आहेत. आंघोळ, कपडे धुणे, पिण्याचे पाणी, पिके, धरण बांधल्यास विद्युतशक्ति हे सर्व नदीचे उपकार आहेत.

६) गाय - गाईच्या मुत्रापासून औषध, शेणामुळे घरात स्वछता, खत, दूध वगैरे अनेक फायदे होतात. म्हणून यास गोधन म्हणतात.

७) सज्जन - संतांची निर्मिती पण उपकाराकरीता आहे. तुकाराम महाराज यानी, सूर्य, चंद्र, मेघ, नदी, गाय, वृक्ष यांचे एवढे उपकार मानले नाहीत. पण संतांचे उपकार मानले. ''काय सांगू आता संतांचे उपकार। मज निरंतर जागविती।। बाकीचे सर्व पदार्थ शारिरीक उपकार करतात. पण आत्मकल्याण संतच करतात. जागृतीचे काम यांचेच. म्हणून यांचे जगावर, जीवावर यापेक्षा देवावरही उपकार आहेत. 'जगाच्या कल्याणा संतांच्या विभूती। देह कष्टविती परोपकारे।।' तु. म. उपकारापेक्षा परोपकार शव्द महत्वाचा आहे. पर + उप + कार, पर म्हणजे परमात्मा, उप जवळ, कार-करणे. देवास जवळ करण्याचे उपकार संताचे. असे उपकार आई वडिल, भाऊ वहिण, बायकोमुले कोणीच करु शकत नाही. 'केले उपकार सांगू काय। बाप न करी ऐशी माय। धर्मे त्यांच्या देखिले हे पाय। दिधले अक्षय। अभयदान गा।। तुकयाबंधू. हे इथे अवतीर्ण होतात. फक्त उपकाराकरीता ''येथे उपकारासाठी। आले घर ज्या वैकुंठी।।'' तु. म. यांच्या उपकाराचे तीन प्रकार - कायीक, वाचिक, मानसिक 'तैसा काया वाचा मने प्राणे। साधु वाढला उपकार कारणे। आपुले परावे म्हणो नेणे। उपकारु करणे सर्वांशी।।' नाथ. 'बळ बुद्धी ज्याची उपकारासाठी। अमृत ते पोटी साठविले।।' तु. म. 'परोपकार बचन मन काया। संत सहज सुभाव खगराया।।' तुलशीदास. ही प्रमाणे कायिक, वाचिक, मानसिक उपकार सांगतात.

पिबन्ति नद्याः स्वयमेव नाम्भः स्वयं न खादंति फलानि वृक्षाः।
धाराधरो वर्षति नात्महेतो, परोपकाराय संतां विभूतयाः।। सुभा.

अर्थ - नद्या स्वतःचे पाणी स्वतः पित नाहीत. झाडे आपली फळे आपण खात नाहीत. पाऊस स्वतः करीता पडत नाही तसे संत उपकाराकरीताच अवतीर्ण होतात.

संतांचे मोठेपण समजण्याकरीता एक कोटी निर्माण होते.

१) उपकाऱ्यावर अपकार - काही जीव उपकाऱ्यावर अपकार करतात. माऊली म्हणत 'जेथेचिया कृपा लाहिजे वरु। तेथेचि मनी व्यभिचारु। तरी काय मी भस्मासुरु। अर्जुन म्हणे।।' ज्ञाने. शंकराने भस्मासुरास वर दिला तू ज्याच्यावर हात ठेवशील तो भस्म होईल. पण हा कृतघ्न पार्वतीच्या अभिलाषाने शंकरावर हात ठेवण्यास निघाला. मोहीनीने त्यालाच भस्म केला. असे काही जीव आहेत. सापासारखे दूध दिले तरी विष मिळते.

२) अपकाऱ्यावर अपकार - जशास तसे सहस्त्रार्जुन उन्मत्त झाला. जमदाग्निची कामधेनु घेऊन गेला. परशुरामानी त्याचा वध केला. (मोठी कथा आहे. विस्तारभयास्तव थोडक्यात)

३) उपकाऱ्यावर उपकार - ज्यानी आपल्यावर उपकार केले. त्यांची जाणीव ठेवून कृतज्ञ राहाणे. शुकाचार्यानी राजसूय यज्ञातील एक शीत खाल्ले. या उपकारातून उत्तीर्ण होण्याकरिता

अर्जुनाचा नातू परिक्षीतीस भागवत सांगून सात दिवसात मुक्त केले. 'परिक्षीती मृत्यू साता दिवसांचा। उच्चारिता वाचा मुक्त झाला।। ज्ञान.

४) अपकाऱ्यावर सुद्धा उपकार - संतांची भूमिका, संताचे कार्य सर्वश्रेष्ठ आहे. 'उपकारिपु यः साधुः साधुत्वे तस्य को गुणः। अपकारिषु यः साधुः स साधुः सद्भिरुच्यते।।' वा. रामायण याचा अर्थ न देता नाथ महाराजांची ओवी देत आहे. 'अपकाऱ्यावरी जो कोपला। तो कोपे तत्काळ नागवला। अपकाऱ्या जेणे उपकार केला। तोचि दादुला परमार्थि।।' नाथ. रामायण.

१) ज्ञानेश्वर महाराजांदी भावंडाना विसोबा खेचरानी त्रास दिला. मात्र माऊलीनी विसोबास ब्रह्मरुप केले. २) भक्ति विजय ग्रंथामध्ये व्यास अवतार जयदेवची कथा आहे. चोरांनी त्यांचे हातपाय तोडून विहीरीत टाकले. मात्र जयदेवांनी त्यांचा उद्धार केला. अपकाऱ्यावर उपकार. ३) कैकयीने रामास १४ वर्षे वनांत पाठविले. लोक कैकयीस दोष देऊ लागले. वनवासानंतर रामाने प्रथम कैकईचे दर्शन घेतले. कैकयी म्हणाली रामा माझ्यामुळे तुला फार त्रास झाला. राम सांगतात नाही आई, तुझ्यामुळे किती फायदे झाले हे तुला माहित नाही. श्लोक

तातस्नेहो भरत महिमा पौरुषं वायुसूतो।
सख्यं चापिप्लवगम नृपते कापे सौमित्रो भक्तेः।
सीता सत्वं निजभूज बलं वैरिना वैरी भावः।
एतत सर्व तव चरणयोः मातुरेष प्रसादः।। सुभा.

अर्थ - तुझ्यामुळे वडिलांचे माझ्यावर किती प्रेम ते प्रगट झाले. भरत महिमा वाढला. हनुमंताचे पौरुष दिसले. सुग्रीवाची मैत्री प्रगट झाली. लक्ष्मण किती निसिःम भक्त आहे. हे जगास दिसले. सीतेचे सत्व कळले. माझ्या बाहूत काय बळ आहे. ते समजले. वैऱ्यावरोबर वैरत्व कसे असावे. याचे ज्ञान झाले आणि हे आई हे सगळे तुझ्यामुळे! अपकाऱ्यावर उपकार! ४) रामकृष्ण परमहंस, जो विंचू नांगी मारत होता त्यास पाण्यातून बाहेर काढत होते. नाथांच्या अंगावर पान खाऊन थुंकणाऱ्या यवनास नाथांनी मुक्त केले. किती तरी उदाहरणे आहेत.

संताचे देवावर सुद्धा उपकार आहेत.

एकैकस्योपकाराय प्राणान्दास्यामि ते कपे। शेषस्ये होपकाराय भवान ऋणिनो वयं।। रामा.

हनुमंता, एकएक उपकाराकरीता एक एक प्राण द्यावा पण प्राण पाचच आहेत. बाकीच्या उपकाराकरीता मी तुझा कायमचा ऋणी आहे असे राम म्हणतात.

सुनु कपि तोही समान उपकारी। नही कोऊ सुरनरपुनी तनुधारी।
प्रति उपकार करो का तोरा। सनमुख होई न सकत मन मोरा।। तुलशीदास

राम म्हणतात हनुमंता तुझ्यासारखा देव मानव पवित्र तनुधारी कोणी उपकारी नाही तुझ्या उपकारातून उत्तीर्ण होण्याकरीता माझ्याकडे काही नाही. म्हणून मी खाली मान घालतो. 'परोपकाराय फलन्तिवृक्षाः। परोपकाराय वहन्ति नद्याः। परोपकाराय दुहन्ति गोः। परोपकाराय इदं

शरीरं ।।' देवानी मानव शरीर उपकाराकरीता दिले आहे. म्हणून उपकार करावा. फार अपेक्षीत नाही पण थोडा तरी ।। तुका म्हणे फार । थोडा तरी परोपकार ।। तु. म.

★ ★ ★ ★ ★

६६ : तुकाराम तूपासम

तुकाराम महाराजांची थोरवी सांगावी तेवढी थोडीच आहे. महाराज जगद्गुरु आहेत. शिवाय संतही आहेत. यांच्या अवताराचा अभ्यास केल्यास एक कोटी समोर येते. "तुकाराम-तूपासम' तुकाराम महाराज तूपासारखे आहेत. कसे? महाराजाचा पहिला अवतार अंबऋषी, ज्याच्याकरिता देवाने दहा अवतार घेतले. "भक्तांच्या कैवारे कष्टलीस विठ्ठले । अंबऋषी कारणे अवतार दहा घेतले ।।" तु. म. भागवतामध्ये यांचे मोठे चरित्र आहे. राजा असून सुद्धा देवांची सर्वांगाने सेवा करीत असत.

अंबऋषी हे दुधासारखे, दूध हे पवित्र आणि गोड असते. माऊली म्हणतात 'पाहे पां दूध पवित्र आणि गोड' ।। तद्वत अंबऋषी दुधासारखे पवित्र आणि गोड. दुधापासून तूप काढायचे असल्यास प्रथम दूध तापवावे लागेल. दूध चांगले तापले हा महाराजांचा दुसरा अवतार 'प्रल्हाद'. हिरण्यकश्यपुने प्रल्हादास मारण्याकरीता अकरा प्रयोग केले पण 'देव तारी, त्यास कोण मारी" या न्यायाने प्रल्हाद वाचले. दूध तापले, थोडे थंड झाले. नंतर त्याच्यात विरजण टाकले. हा महाराजांचा तिसरा अवतार 'अंगद'. विरजण कोणते असा प्रश्न पडतो. रामाची सेवा व हनुमंतरायांचे मार्गदर्शन हे विरजण पडले. दही तयार झाले. आता दह्याचे घुसळण हा महाराजांचा चौथा अवतार 'उद्धव'. घुसळण कोणते अशी शंका येईल? भागवताची प्रश्नोत्तरे हे घुसळण झाले. अशा घुसळणातून जे सार निघाले ते लोणी महाराजांचा पाचवा अवतार 'नामदेवराय'. शेवटी लोणी कडकडीत तापविले, त्यापासून जे प्राप्त झाले ते तूप, शेवटचा अवतार. 'जगद्गुरु तुका अवतार नामयाचा । सांप्रदाय सकळांचा येथोनिया ।।' निळोबा. तूपानंतर कोणतीच क्रिया पुढे उरत नाही. तूप हे दुधाचे सार शिवाय टिकाऊ व सुगंधी. म्हणून कोटी होते 'तुकाराम-तूपासम'.

अंबऋषी - भक्त, प्रल्हाद - भक्त, अंगद - भक्त, उद्धव - भक्त, नामदेव - वैष्णव, विसोबांची भेट झाल्यानंतर संत. तुकाराम महाराज 'संत'च.

महाराजांच्या जवळ परमार्थिक सहा गुण आहेत.

१) वेदनिष्ठा - वाचा बोलू वेदनिती । करु संती केले ते ।। तु. म.
२) धर्मनिष्ठा - धर्माचे पालन । करु पाखांड खंडण ।। तु. म.
३) जीवांच्या उद्धाराची तळमळ - येतो हिताचा कळवळा । पडती हाती म्हणऊनि काळा ।। तु. म.

बुडते हे जन न देखवे डोळा । येतो कळवळा म्हणोनिया ।। तु. म.

४) भक्ति
५) ज्ञान -
६) वैराग्य

} भक्ति ज्ञान वैराग्य आगळा । ऐसा नाही डोळा देखियेला ।। रामेश्वर भट्ट

हरिभक्तिचा महिमा विशेष वाढविला । विरक्ति ज्ञानाचा ठेवा उघडोनि दाखविला ।। निळोबा.

परिपूर्ण जीवन म्हणजे तुकोबाराय. शिवाय माऊलींचे आवडते. माऊली रामेश्वर भट्टांच्या मुखातून म्हणते "तुका आम्हा प्रिय सर्वाहूनि थोर । जो का अवतार नामयाचा ।।" महाराष्ट्रातील पाच संतांची महती सांगतांना असे वाटते हे पाच संत पंचभूतात विलीन झाले आहेत.

१) नामदेवराय - पायरीजवळ समाधी, पृथ्वीमय झाले.
२) एकनाथ महाराज - पाण्यात विलीन झाले. जलरुप समाधी.
३) ज्ञानेश्वर महाराज - संजीवन समाधी म्हणजे अग्निमय आहेत.
४) रामदास स्वामी - वायुरुप झाले. कारण वायुसूत हनुमंताचे अंश अवतार
५) तुकाराम महाराज - आकाशरुप झाले.

अणूरेणू थोकडा । तुका आकाशा एवढा ।। तु. म. ज्यांचे जगात अद्भूत चरीत्र, सदेह वैकुंठगमन केले.

मानवदेह घेऊनि निजधामा गेले ।। निळोबा. ज्यानी शिवाजी महाराजांनी दिलेला नजराणा परत पाठविला.

ज्यांनी तेरा दिवस अन्नपाणी वर्ज्य करून अनुष्ठान केले.

ज्यांनी पाचवा वेद "गाथा' निर्माण केला.

तुका सहज बोले वाणी । तेथे वेदांत वाहे पाणी ।। अशी ग्रंथ निर्मिती! ज्यांनी वेचाळीस वर्षात संतकार्य करून वैकुंठगमन केले. अशा तुकाराम महाराजांच्या चरणी साष्टांग दंडवत करु. ज्यांची तुलना रामाबरोबर करता येईल.

राम प्रभू व तुकाराम महाराजांची भेट झाली. तुकाराम महाराज म्हणाले आपण राम कां? आपणास राम कां म्हणतात? रामांनी सांगितले माझ्या नावाने सागरात दगड तरले म्हणून मी राम पण आपण "तू का राम" तुकाराम म्हणाले मी या संसार सागरातून जीवांना तारण्याकरीता अभंग लिहीले म्हणून मी 'तुकाराम' प्रभू एक लक्षात ठेवा आपण बांधलेला सेतू नाही. मात्र माझे अभंग आहेत. 'तुकाराम 'तुका' रामसे दो नाम एक अंग। उसका सेतु भंग गया इसका सेतु अभंग ।।' अनघड फकिर.

ड) महाराजांची वंश परंपरा

१) विश्वंभरबाबा, २) हरि - मुकुंद, ३) हरिपुत्र - विठोजी, ४) पदाजी, ५) शंकर,

६) कान्होबा, ७) बोल्होबा, ८) सावजी, कान्होबा, तुकाराम महाराज.

ब) ज्ञानवंश परंपरा -

१) महाविष्णू, २) ब्रह्मदेव, ३) नारद, ४) व्यास, ५) राघव, ६) केशव, ७) वावाजी, ८) तुकाराम महाराज (पूर्ण नांव - तुकोबाराय बोल्होबा मोरे)

तुकोबारायाचे चौदा टाळकरी

१) कान्होबाराय बोल्होबा मोरे (महाराजांचे भाऊ), २) कोंडोपंत लोहकरे, ३) कोंड पाटील, ४) नावजी माळी, ५) सोनबा ठाकर, ६) शिवबा कासार, ७) संताजी जगनाडे, ८) गंगाजी मवाळ, ९) महादजी पंत, १०) मालजी गाढे, ११) मल्हारपंत, १२) गवर शेठ वाणी, १३) रामेश्वरभट्ट, १४) आबाजीपंत.

★ ★ ★ ★ ★

६७ : ज्ञानदेव

''ज्ञानदेव माऊली'' याची विस्तारपूर्वक व्याख्या अशी आहे

१) ज्ञा - ज्ञानोत्तम, २) न - नरोत्तम, ३) दे - देवोत्तम, ४) व - वरोत्तम, ५) मा - मानवता, ६) ऊ - उदारता, ७) ली - लीनता.

माझ्या जीवनात माऊलीच्या तीन सप्त शताब्दी होत आहेत. १९७४ साली जन्मसप्तशताब्दी १९९० साली ज्ञानेश्वरी व या वर्षी म्हणजे १९९६ साली संजीवन समाधी सप्तशताब्दी सोहळा साजरा होत आहे. याची तारीख आहे ८ डिसेंबर (रविवार) १९९६. अवघ्या बावीस वर्षाचे असताना माऊलीनी समाधी घेतली. जगाच्या पाठीवर ही अद्भूत घटना होय. तुकोबारायांचे वैकुंठगमन ४२ व्या वर्षी झाले. शंकराचार्यांनी वयाच्या ३२ व्या वर्षी, नाथांनी ६२ व्या वर्षी जलसमाधी घेतली. ज्ञानोवा रायांनी १६ वर्षात सर्व कार्य केले. आमच्या बाबतीत 'सोळावं वरीस धोक्याच' पण माऊलीनी १६ व्या वर्षी गीतेवर टिका 'ज्ञानेश्वरी' लिहीली. शंकराचार्यानी १६ व्या वर्षी गीतेवर भाष्य केले. शिवाजी महाराजांनी १६ व्या वर्षी तोरणा किल्ला घेतला. माधवराव पेशव्यांनी १६ व्या वर्षी पेशवाईची जबाबदारी स्विकारली. माऊलीनी १६ ते २२ म्हणजे ६ वर्षे भक्ति केली आहे. अशी एक अख्यायिका आहे. पंढरपूरला विठोबा पुंडलिका करीता आले. पुंडलिकांने देवास सांगितले तुझ्या दर्शनास जे येतील त्यांचा उद्धार कर. मग ते कसेही असोत. ''मूढ पापी जैसे तैसे। उतरी कासे लावोनी।। तु. म. पण देवाकडे कोणीच येईना. मग देव उद्धार कसा करणार? विठ्ठलाने तक्रार केली,'अरे पुंडलीका माझ्याकडे कोणी येत नाही.' पुंडलिकाने सांगितले देवा आपण संताचा अवतार घ्या व सर्वांना आपल्या भेटीस आणा. म्हणून विठ्ठलांनी ज्ञानोबारायांचा अवतार घेतला. आळंदीहून सर्व वारकऱ्यांना घेऊन पंढरपूरला आले. ती प्रथा आजतागायत चालू आहे. विठोवा समाधी वेळेस ज्ञानोबारायांना म्हणतात.

ज्ञानदेव नाम तुझे। ते ज्ञान पै हृदयीचे माझे।
जन तरावया काजे। तुवा अवतार घेतला।। नाम.

आरती तर प्रसिद्धच आहे.

लोपले ज्ञान जगी। हित नेणती कोणी।।
अवतार पांडुरंग। नाव ठेविले ज्ञानी।। आरती ज्ञानराजा

जगाच्या पाठीवर असा माऊलीचा सोहळा फक्त महाराष्ट्रातच आहे. कुंभमेळयास १० लाख भाविक जमतात पण तेथे स्नानाचे महत्व. पण सोहळ्यात १७-१८ दिवस लाख, दिड लाख भाविक, वारकरी पायी चालत असतात. हे खरे 'महाराष्ट्राचे वैभव' आहे. हा सुख सोहळा वैकुंठापर्यंत कुठेच नाही. विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळा। हा सुख सोहळा स्वर्गी नाही।। तु. म. म्हणून ज्ञानोबाराय यांना वारकरी मंदिराचा पाया म्हटले आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया। उभारिले देवालया।।' अशा या ज्ञानोबारायांची थोडी ओळख.

१) म अ उ ची माऊली - म म्हणजे मध्यम, अ म्हणजे अधम, उ म्हणजे उत्तम या सर्वांची आई. म्हणजे ज्ञानोबाराय.

न पाहे याती कुळाचा विचार। भक्त करुणाकर ज्ञानाबाई।। नाथ.

माऊली या कोटीत याचा विस्तृत विचार आला आहे.

२) योगी ज्ञानदेव - ज्ञानयोग, कर्मयोग, हटयोग, भक्तियोग या सर्वांची जननी म्हणजे ज्ञानोबाराय.

३) ज्ञानी ज्ञानोबाराय - ज्ञानीयांचा शिरोमणी।। नाथ. किंबहुना सर्वज्ञ.

४) भक्त ज्ञानोबाराय - भक्ति केली ख्यात ज्ञानदेवे।। नाम. यांची भक्ति ख्यात आहे. माऊलींना वाटले असावे. या अवतारात भक्ती कमी झाली म्हणून भक्ति करिता खास एकनाथांचा अवतार घेतला व भक्तिप्रधान भागवत लिहीले. 'ज्ञानियाचा एका व नामयाचा तुका'' हे सर्व परिचीतच आहे.

५) संत मान्य ज्ञानोबाराय - काहीना गावांत मान असतो. काहींना तालुक्यात, काहींना जिल्ह्यात, काहींना राज्यात, काहींना देशात, काहींना जगात मान्यता मिळते. जगात मान्यता शास्त्रज्ञांना आहे. शास्त्रज्ञ देवास मानतात. विश्वाचे गूढ अद्याप कोणास समजले नाही. पण देव विश्वनिर्माता आहे. देव संतांना मानतो. मात्र सर्व संत ज्ञानोबारायांना मानतात. सर्व संतानी ज्ञानोबारायांची स्तुती करून आपली वाचा पवित्र केली.

६) वैराग्यवान ज्ञानोबाराय. त्यांच्याच शब्दात त्यांचे वर्णन 'जन्मतेनि प्रसंगे। स्त्री देह शिवणे अंगे। तेथोनिया अवघे। सोवळे किजे।।' ज्ञाने. आमच्या बिघडण्याच्या वयात ज्ञानदेवांनी समाधी घेतली.

७) श्रीमंत ज्ञानोबाराय - ज्यांच्या दारात सोन्याचा पिंपळ आहे. 'पिंपळ प्रत्यक्ष सोनियाचा॥' निळो. बप्पा (आप्पासाहेब वासकर) सांगत होते. जे आळंदीची वारी करतील ते वारकरी श्रीमंत होतील ज्ञानोबाराय आपल्या भक्तांना भुक्ति, मुक्ति व भक्ति अर्पण करतात. जशी ज्याची इच्छा!

८) दिव्यरुप ज्ञानोबाराय - नाथांना माऊलीनी दर्शन दिले ते नाथ महाराज वर्णन करतात "दिव्य तेजपुंज मदनाचा पुतळा। परब्रह्म केवळ बोलतसे॥

९) बळीवंत ज्ञानोबाराय - कर्तुम, अकर्तुम, अन्यथाकर्तृम शक्ति ज्यांच्या कडे असते त्यांना समर्थ म्हणजेच बळीवंत म्हणतात.

जयाचिये द्वारी सोन्याचा पिंपळ। अंगी ऐसे बळ रेडा बोले॥ तु. म.

१०) प्रभावी ज्ञानोबाराय - ज्यांचे वाङमय सातशे वर्षे तसेच टवटवीत आहे. सर्व वारकरी कोणी न बोलविता सोहळ्यात सामील होतात फक्त माऊली प्रेमाखातर. त्यांची आज्ञा शिरसावंद्य मानतात.

जयाचि आज्ञा आपण। शिरी वाहे अंतःकरण।
मनुष्याकारे जाण। ज्ञानचि तो॥ ज्ञाने.

११) वारकरी ज्ञानदेव - माऊली योगी, ज्ञानी, भक्त आहेतच पण विशेष म्हणजे वारकरी आहेत

माझ्या मनीची आवडी। पंढरपुरा नेईन गुढी॥ ज्ञान.

१२) शास्त्रज्ञ ज्ञानोबाराय - 'शोध' या कोटीत ज्ञानोबारायांचे दहा वैज्ञानिक 'शोध' दिले आहेत. म्हणून माऊली 'शास्त्रज्ञ सुद्धा' आहेत.

१३) श्रीगुरु ज्ञानोबाराय - गुरुचे बरेच प्रकार आहेत पण श्री म्हणजे श्रेष्ठ गुरु ज्ञानोबाराय आहेत.

एका जनार्दनी पुर्वपुण्य फळले। श्रीगुरु भेटले ज्ञानदेव॥ नाथ.

गुरु सेवेलागी जाण। शरण एका जनार्दन।
त्रैलोक्याचे जीवन। ज्ञानोबा माझा॥ नाथ.

वास्तविक नाथांचे गुरु जनार्दन स्वामी पण नाथांना जनार्दन स्वामींनी सांगितले आपल्या सर्वांचे गुरु ज्ञानोबाराय आहेत. त्यांची सेवा करा. सर्व वारकऱ्यांचे आद्य 'गुरु' माऊलीच आहेत.

१४) वाङमयकार ज्ञानोबाराय - माऊलीनी अमृत अनुभव, चांगदेव पासष्टी, ज्ञानदेवी, हरिपाठ व अभंग हे विपुल व अक्षर वाङमय लिहिले. या रुपाने ते प्रत्येकाच्या घरी येऊ शकतात.

१५) संत ज्ञानोबाराय - ज्ञानोबाराय भक्त आहेत, मोठे वैष्णव आहेत. 'ज्ञानदेव वैष्णव मोठा। विठ्ठलनामे मुक्त पेठा।' शिवाय संत आहेत. संत हे सर्वश्रेष्ठ आहेत. जे जगाच्या उद्धाराकरीता अवतीर्ण होतात त्यांना संत म्हणतात. अवतार तुम्हा धराया कारण। उद्धराया जन महादोषी॥ तु. म. जन तारावया काजे। तुवा अवतार घेतला॥ नाम. तारावया चराचर। कलिमाजी अवतरले॥ नाम.

१६) अधिकारी ज्ञानोबाराय - माऊलीनी आठ जनांना उपदेश केला आहे. गाते श्रोते आणि पहाते। चतुर विनोदी दुश्चिते। सोहं भावी पूर्ण ज्ञाने। या सकळाते विनवणी। करा विठ्ठलस्मरण॥धृ॥ १) गाते-वेद, शास्त्रे, पुराणे, २) श्रोते-परिक्षीती, ३) पहाते-शेष, ४) चतुर-ब्रह्मदेव, ५) विनोदी-नारद, ६) दुश्चिते-व्यास, ७) सोहंभावी-शुकाचार्य, ८) पूर्णज्ञाते-जनक, हे सर्व मोठे आहेत. पण यांना सुद्धा विठ्ठलाचे परमप्रेम मिळण्याकरीता माऊली विठ्ठल स्मरण करण्यास सांगतात. याचेच भाषांतर तुकोबाराय करतात.

लागोनिया पाया विनवितो तुम्हाला। करे टाळी बोला मुखी नाम॥
विठ्ठल विठ्ठल म्हणा वेळोवेळा॥ तु. म.

तात्पर्य ज्ञानोबाराय सर्व बाबतीत सर्वात श्रेष्ठ आहेत. पण यांचे अंतःकरण मात्र आईचे आहे. अशा या माऊलीला कोटी कोटी प्रणाम. '**नमामि सद्गुरु शांतं सच्चिदानंद विग्रहं। पूर्णब्रह्म परानंदं इशं आलंदीवल्लभम्॥, सद्गुरुं सच्चिदानंदम् केवलं करुणाकरम। ज्ञानयोगेश्वरं वंदे ज्ञानदेवं पुनः पुनः॥ अलंकापुरी रम्य सिंहासनस्थं पदाम्भोज तेजः स्फुरद्दिव्यप्रदेशम्। विधीन्द्रादिदेवैः सदा स्तूयमानं समाधिस्तमूर्ती भजेज्ञानदेवम्॥**' (पूर्ण नांव - ज्ञानदेव विठ्ठलपंत कुलकर्णी)

★ ★ ★ ★ ★

६८ : हनुमंत

हनुमंताचे स्मरण केल्यास जीवाला आठ फायदे होतात.

बुद्धिर्बलं यशोधैर्यं निर्भयत्वमरोगता।
अजाऽयं वाक्पटुत्वंच हनुमत्स्मरणाद भवेत॥

१) बुद्धी, २) बळ, ३) यश, ४) धैर्य, ५) निर्भयता, ६) आरोग्य, ७) जन्ममरणांतीत, ८) वाक्चातुर्य हे आठ फायदे.

रामायणाचा विचार केल्यास हनुमंताचे सर्वांवर उपकार आहेत.

१) सीतेचा शोध - रामावर उपकार, २) राम सीतेची भेट - सीतेवर उपकार, ३) द्रोणागिरी आणणे - लक्ष्मणावर उपकार, ४) राम आगमनाची वार्ता - भरतावर उपकार, ५) सुग्रीवाची संकटकाळी साथ - सुग्रीवावर उपकार.

रामायणातून हनुमंत गाळले तर गाळच शिल्लक राहील. रामाने त्रेतायुगात अकरा हजार वर्षे राज्य केले. पण अवतार संपविला. मात्र हनुमंत सहा दिवसांनी आले. पण अद्याप आहेत. सात चिरंजीवामध्ये यांचा नंबर आहे.

अश्वत्थामा बलिर्व्यासो हनुमांश्च बिभिषणः। कृपः परशुरामश्च सप्तेते चिरजीवीनः॥

रामापेक्षा हे थोडे मोठे वाटतात.

भगवानसे भक्तन बडे कह गये संत सुजाण।
पुल बांधे रघुवीर चले कुदी गये हनुमान॥ कबीरजी

देवापेक्षा भक्त मोठे आहेत कारण लंकेत जाण्याकरीता रामास पुल बांधावा लागला पण हनुमान पुल न बांधता रामा अगोदर जाऊन आले. अशा हनुमंतास तुकाराम महाराज शरण आले.

शरण शरण हनुमंता। तुम्हा आलो रामदूता॥ तु. म.

शरण शरण ही द्विरुक्ति आहे. याचे सात अर्थ होतात. अर्थात 'सप्तकोटी'

१) स्थूल शरण २) सूक्ष्म शरण

काही लोकांना आपण फक्त तोंडाने शरण जातो जसे दुर्जनं प्रथमं वंदे सज्जनं तदनंतरम्। मूख प्रक्षालनात पूर्व गुद प्रक्षालनं यथा॥ मात्र काहीना हृदयातून शरणांगती पत्करतो. मात्र हनुमंताना आतून बाहेरुन शरण म्हणून दोन वेळा शरण.

२) त्रेतायुगात शरण - कलियुगात शरण

तुकाराम महाराज म्हणतात त्रेतायुगात आपण होता. मी सुद्धा अंगद म्हणून होतो. त्यावेळा मी आपणास शरण होतो. आणि आता कलियुगात आपण चिरंजीव म्हणून आहात आणि मी तुकाराम म्हणून आलो. आता सुद्धा आपणास शरण आहे. म्हणून शरणांगतीची द्विरुक्ति.

३) मारुतिराया आपण तो सागर उल्लंघन करून सीतेचा शोध लावला शिवाय संसार सागर (जो दुस्तर आहे) तो सुद्धा पार केला म्हणून मी आपणास दोन वेळा शरण आहे.

४) हनुमंता आपणास स्त्री काम अथवा धनकाम विलोभीत करु शकत नाही. 'काम नाही काम नाही। झालो पाही रिकामा॥' तु. म. ज्यावेळी सीतेच्या शोधास मारुती गेले. रावणाच्या ऐंशी हजार स्त्रिया वेगवेगळ्या महालात रहात होत्या. सूक्ष्मरुप घेऊन हनुमंताने कामचेष्टा पाहिल्या. सीता शोध करून आल्यानंतर राम मस्करीत म्हटले हनुमंता ते शृंगार पाहिल्यानंतर आपणास लग्न करावे वाटले नाही कां? हनुमंत म्हणतात. 'कामं दृष्ट्वा मया सर्वा विश्वस्ता रावणस्त्रियाः॥ न तु मे मनसा किंचित वैकृत्यम उपपद्यते॥' रामा. मी सर्व पाहिले पण काम जागृत झाला नाही. कारण मी रामाचे काम करण्यास गेलो होतो. जेव्हा बक्षिस समारंभ केला, सीतेने नवरत्नांचा हार दिला. पण दोन रत्ने दातांनी फोडली. सीता रागावली. तेव्हा हनुमंत म्हणाले. ज्यात राम नाही ती वस्तू आम्ही भक्त जवळ ठेवत नाही. म्हणून दोन वेळा शरण!

५) सुभटा त्यास म्हणतात जो दहा हजार सैन्याशी एकटा लढतो. रावणाच्या सैन्यास जिंकले म्हणून शूर (मनास + इंद्रियास जिंकले म्हणून शूर) संसार सागर जिंकला म्हणून शूर. जिंकीजे संसार। येणे नांवे तरी शूर॥ तु. म. दोनही ठिकाणी 'शूर' म्हणून शरण शरण हनुमंता। असे महाराज म्हणतात.

६) हनुमान या शब्दाचे दोन अर्थ होतात. हन - मारणे, मान - अभिमान (अभिमान्यास मारणारा), अ) आपला अभिमान रामास अर्पण करणारा. (अभिमान मारणारा)

जेव्हा लंका जाळून हनुमंत आले. राम म्हणाले हनुमंता आपण फार मोठे कार्य केले की लंका जाळली. हनुमंत विनयाने म्हणतात. ती लंका सीतेच्या क्रोधाने अगोदरच जळली होती. मी फक्त निमित्त मात्र आहे.

निश्वासे नैव सिताया राजन कोपानलेनच।
पूर्वदग्धत्विया लंका निमित्तो अपि भवेत कपी॥ रामा.

ब) अभिमानी जो रावण त्याचा गर्व हरण करणारा म्हणून दोन वेळा शरण

७) हनुमंता तू भक्त म्हणून शरण आणि मूळचा देव (महादेव) म्हणून शरण अर्थात देव + भक्त याना शरण. हनुमान शंकराचे अवतार आहेत.

तुका म्हणे 'रुद्रा'। अंजनिचिया कुमरा॥
अंजनीच्या तपासाठी। महारुद्र आले पोटी॥ नाम.

अशा सात कोट्या निर्माण होतात म्हणून महाराज म्हणतात 'शरण शरण' हनुमंता॥

मनोजवं मरुत तुल्यवेगं जितेंद्रियं बुद्धीमतां वरिष्टं।
वातात्मजं वानर युथ मुख्यं श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये। रामरक्षा

★ ★ ★ ★ ★

६९ : विप्र

वर्णामध्ये ब्राह्मण उच्च आहेत. एका ब्राह्मणाची लाथ विष्णूनी छातीवर घेतली. अद्याप ते विष्णूचे भूषण आहे. हे भूपण दिसावे म्हणून विष्णू शर्ट वापरत नाहीत. फक्त पितांबर धारण करतात. एका ब्राह्मणाने समुद्र प्राशन केला. (अगस्ती)

काय सामर्थ्य! माऊली म्हणते हे पृथ्वीतळीचे देव आहेत.

जे पृथ्वी तळीचे देव। जे तपोवतार सावयव। सकळ तीर्थासि दैव। उदयले जे॥ ज्ञाने.

यांची शक्ति सांगताना माऊली सांगते

जयाचा कोप सुभटा। काळाग्निरुद्राचा वसौटा।
जयांचे प्रसादी फुकटा। जोडती सिद्धी॥ ज्ञाने.

यांनी जर शाप दिला तर यांच्या वाणीस काळ, अग्नि, शंकर यानी सहकार्य करावे लागते. यांच्या आशिर्वादाने फुकट सिद्धी जोडतात.

मंगलमूल विप्र परितोषु। दहई कोटी कूल भूसर रोषु॥ तुलसी.

ब्राह्मणांचा परितोष हे मंगलमूल आहे. मात्र रोषामुळे कोटी कुळे नाश होण्याची शक्यता आहे. असे हे तेजःपुंज विप्र या कलियुगात तेजहिन दिसतात. याचे कारण अपेयपान व अभक्ष भोजन असावे असे वाटते. शास्त्रात ब्राह्मणांचे आठ प्रकार दिले आहेत.

१) मात्र - फक्त ब्राह्मणकुळात जन्म घेतलेला. आचाररहित.
२) ब्राह्मण - सदाचारी, सत्यभाषी, वेद पारंगत असणारा
३) श्रोत्रिय - विधीयुक्त षड्कर्म करणारा.
१) यजन, २) याजन, ३) दान देणे, ४) दान घेणे, ५) अध्ययन, ६) अध्यापन ही षड्कर्मे.
४) अनुचान - वेदतत्व जाणणारा. शुद्धात्मा
५) भ्रूण - मोठमोठे यज्ञ करणारा, करविणारा, इंद्रियावर ताबा असणारा (जितेंद्रिंय)
६) ऋषी - सत्यप्रतिज्ञ, शाप व अनुग्रह करण्यास समर्थ असणारा.
७) ऋषीकल्प - आश्रम व्यवस्था पहाणारा, चार वेदाचे ज्ञान असणारा, कुलपती असणारा (साठ हजार विद्यार्थ्यांची व्यवस्था करणारा त्यास कुलपती म्हणतात.)
८) मुनी - सर्व कर्मात निवृत्त, सोने माती समान मानणारा. मन निरंतर देवाच्या चरणी लीन असणारा मुनी.

नारदमुनी, व्यासमुनी, निवृत्तीनाथ मात्र मुनीराय

आता असोत हे भेदाभेद आम्ही असो एका बोधे रे।
बाप रखुमादेवीवरु विठ्ठल निवृत्ती मुनीराय प्रसादे रे॥ ज्ञान.

सांगण्याचे तात्पर्य वेद, शास्त्र, संतानी ब्राह्मणाच्या सेवेत मोठे पुण्य सांगितले आहे. वैष्णव मुनी विप्राचा सन्मान। करावा आपण घेऊ नये॥ तु. म. देव सुद्धा यांची सेवा करतात. त्यांचे महत्व समजण्याकरीता हा प्रपंच.
(जन्मना जायते शूद्रः संस्कारात द्विज उच्यते। वेदपाठी भवेद्विप्रो ब्रह्मजानाति ब्राह्मणः)

★ ★ ★ ★ ★

७० : लक्ष्मी

लक्ष्मी म्हणजे फक्त धन नव्हे. लक्ष्मी म्हणजे सुख, समाधान, संपन्नता. लक्ष्मी ही विष्णूची पत्नी किंवहुना पायाची दासीं. तुकाराम महाराज म्हणतात. 'पाय लक्ष्मीच्या हाती। तिसी यावे काकुळती॥' लक्ष्मी म्हणजे लक्ष + मी - देवाच्या चरणांवर जीचे कायम लक्ष ती लक्ष्मी या कोटीत लक्ष्मीची विविध रुपे पहायची आहेत.

१) तनलक्ष्मी - माणसाचे आरोग्य नेहमी चांगले हवे. आपण प्रार्थना करतो शुभं करोति कल्याणं आरोग्यं धनसंपदा। शत्रुबुद्धी विनाशाय दिपज्योती नमस्तुते॥ संसारातील सहा सुखे सुभाषितकारानी सांगितली आहेत.

अर्थागमो नित्यं आरोगिताच, प्रियाच भार्या प्रियवादिनीच।
वश्यश्च पुत्रेऽर्थकरीच विद्या, षड्जीवलोकस्य सुखानितात॥

१) घरी सतत पैसा येणे, २) सतत आरोग्य, ३) नवऱ्यास बायको प्रिय, ४) बायकोस नवरा प्रिय, ५) आज्ञाधारी पुत्र, ६) अर्थ प्राप्तिची विद्या. तात्पर्य सुडौल बांधा, कधी डॉक्टरकडे जाणे नाही यास तन लक्ष्मी म्हणतात.

२) वनलक्ष्मी - घराभोवती, शेतात झाडे, लता, वेली असणे यास वनलक्ष्मी म्हणतात. आपल्या सरकारला उशिरा सुचले आहे झाडे लावा व जगवा. पण माऊलीनी सातशे वर्षापूर्वीच हे सांगून ठेवले आहे. 'नगरेचि रचावी। जळाशये निर्मावी। 'महावने' लावावी। नानाविध॥' ज्ञाने. तुकाराम महाराज म्हणतात 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे।' झाडे वेली पाहिल्यास मनास प्रसन्नता प्राप्त होते. वसंत ऋतूत वनलक्ष्मीची शोभा विशेष असते. असे माऊली म्हणते - 'ययामाजी मी ऐसा। वनी का वसंतु जैसा। 'वनलक्ष्मी' विलासा हेतु भूत॥ ही वनलक्ष्मी.

३) धनलक्ष्मी - स्थावर जंगम संपत्ती ही धनलक्ष्मी, यामध्ये गोधन, गजधन, वाजीधन, कनक धन, रतनधन वगैरे हे संसाराचे साधन आहे. धनवंतास समाजात मान असतो. 'धनवंता जगी। सर्व मान्यता असे जगी॥' तु. म. आई वडील, भाऊ, बहीण, बायको, मुले सर्व धनवंतास मानतात. सर्व गुण यांच्यामुळे मिळतात. असे एक सुभाषितकार सांगतात. यस्यास्ति वित्त सनरकुलिनःस पंडितः सश्रुतवान गुणज्ञ। स एव वक्ता सच दर्शनिय, सर्व गुणः कांचनम् आश्रयन्ते॥ अर्थ. ज्याच्याजवळ धन आहे. त्यास कुलिन, पंडित, श्रुतवान, वक्ता समजतात, सर्वांना तो दर्शनिय वाटतो कारण धन. ही धनलक्ष्मी.

४) माधुर्य लक्ष्मी - काहींना देव सुंदर रुप देतो. सर्व त्याच्याकडे किंवा तिच्याकडे आकर्षित होतात. ही माधुर्यलक्ष्मी. श्रीकृष्णाचे रुप पाहिल्यानंतर लक्ष्मी वेडी झाली. मदन पोटाला आले. असे नाय महाराज सांगतात. श्रीकृष्ण सौंदर्यापुढे। लक्ष्मी भुलोनी झाले वेडे। मदन पोटा आले बापुडे। तेथे कोणीकडे इंद्रचंद्र॥ यास रुपलक्ष्मी म्हणतात.

५) मोक्षलक्ष्मी - मोक्षसुख सात्विक ज्ञानाने प्राप्त होते. जीव मुक्त होतो. यास माऊली मोक्षलक्ष्मी म्हणतात. 'पुढती तेचि सात्विक ज्ञान। जे 'मोक्षलक्ष्मीचे' भुवन। असो एक चिन्ह। राजसाचे॥ ज्ञाने.

६) महालक्ष्मी - अष्टमहासिद्धीसह लक्ष्मी येते. यास महालक्ष्मी म्हणतात. निर्धनाघरी वाणीवसे। महालक्ष्मी येऊनि वैसे। तयाते निर्धन ऐसे। म्हणो ये काई॥ ज्ञाने. क्षीर सागरातून चौदा ले निघाली. मंगलाष्टकच आहे.

लक्ष्मी कौस्तुभ परिजातक सुरा धन्वंतरी चंद्रमा।
गावः कामदुधासुरेश्वर गजो रंभादि देवांगणा।

अश्वः सप्तमुखी विषं हरि धनु शंखो अमृतं च अंबुधे।
रत्नानिह चतुर्दशं प्रतिदिनं कुर्यात सदा मंगलम। लक्ष्मी पहिले रत्न (सुभाषितात)

जेव्हा क्षीरसागरातून लक्ष्मी निघाली. सर्व देवांनी रांग लावली. लक्ष्मीस प्रत्येक देवात दोष दिसू लागला. चंद्र-डागवाला, सूर्य-तापट, मेघ-लहरी, ब्रह्मदेव-म्हातारा, इंद्र-अल्पायु, शंकर-तापसी. लक्ष्मी हार घालत नाही पाहून काहींनी हारात डोके घालण्याचा प्रयत्न केला. पण लक्ष्मी समर्थ असल्यामुळे हार काढून पुढे गेली. नारायण एक बाजूस होते. लक्ष्मी नारायणास हार घालू लागली. नारायण बोलले मी तुला पसंत आहे. पण तू मला पसंत नाहीस. काय वैराग्य पहा. माऊली म्हणते 'हे असो महासिद्धीसी। लक्ष्मी आलीया पाशी। परी महाविष्णू जैसी। न गणीच ते।।' ज्ञाने. लक्ष्मी विचार करते. सर्वांचा अपमान करून आले परत मागे कशी जाऊ. लक्ष्मी म्हणाली पत्नी नको. दासी म्हणून स्विकारा. देव म्हणाले काही हरकत नाही. पाय धर. 'मग सर्वस्वे करुनि सेवा। अभिमान सांडूनि पांडवा। पाय धुवावयाच्या दैवा। पात्र झाली।। ज्ञाने. लक्ष्मी ऐसी जयाची दासी।। तु. म.

७) विचारलक्ष्मी - जीवनात विचारामुळे समाधान प्राप्त होते. विचारावाचून। न पवे समाधान।। तु. म. विचारावर उच्चार अवलंबून आहे विचारावर आचार सुद्धा आधारीत आहे. विचार विघडल्यास उच्चार व आचार विघडतो. म्हणून ''सारासार विचार करा उठाउठी। नाम धरा कंठी विठोबाचे।।'' तु. म. कारण यात समाधान आहे. माऊलीने विचार लक्ष्मी शब्द ज्ञानेश्वरीत वापरला आहे. जे ज्ञानामृताची जान्हवी। जे आनंदचंद्रिची सत्रावी। विचार 'क्षीरार्णवीची नवी। लक्ष्मी जे हे।।' ज्ञाने.

८) विजयलक्ष्मी - कोणत्याही क्षेत्रात यश विजय प्राप्त झाल्यास सुख मिळते. परिक्षा, कुस्ती, क्रिकेट, निवडणूक यामध्ये यश विजय मिळाल्यास माणसे आनंदाने बेहोश होतात. मिरवणूका काढतात. फटाके वाजवतात. कारण विजयलक्ष्मी. माऊली म्हणतात. ''जेणे सांकडलिया धर्माचेनि कैवारे। आपणपया धनुष्य करूनि दुसरे। विजयलक्ष्मीचे एक मोहरे। केले त्रेती।।'' ज्ञाने. रामांनी रावणावर त्रेतायुगात विजय मिळविला व सर्वांना आनंद झाला.

९) राजलक्ष्मी - ज्या राजाकडे चतुरंग सैन्य असते व त्याला पोसण्याची सामुग्री असते त्यास राजलक्ष्मी म्हणतात. 'चतुरंग बलोपेतो धनधान्य सुखस्थितीः। अश्वारुढं अहं वंदे राजलक्ष्मी हिरण्यमयी।।' अर्थ - चतुरंग म्हणजे हत्ती, घोडे, रथ, पायदळ यास चतुरंग सैन्य म्हणतात. त्यास सांभाळण्यास धनधान्य अशी सुख स्थिती. अशा अश्वारुढ असणाऱ्या सुवर्णमयी लक्ष्मीस वंदन असो.

१०) साम्राज्यलक्ष्मी - साम्राज्य म्हणजे सत्ता असणे. सरपंच, आमदार, खासदार, मंत्री, पूर्वीचे राजे यांचा ज्या प्रदेशावर अधिकार म्हणजे सत्ता असायची. त्यामुळे ते खूप असत. सत्ता वाढविण्याचा प्रयत्न करत. यास साम्राज्यलक्ष्मी म्हणतात.

११) ऐश्वर्यलक्ष्मी - देवाचे ऐश्वर्य म्हणजे 'विश्वरुपदर्शन' होणे यास ऐश्वर्यलक्ष्मी म्हणतात. याचे अधिकारी अर्जुन, यशोदा व गोपिका. अथवा वैकुंठातील सर्व भक्त. ऐश्वर्य पाहून सुखी असतात.

१२) नारायण लक्ष्मी - लक्ष्मीसह नारायणाचे आगमन यास नारायण लक्ष्मी म्हणतात. 'सकुळीने आपुली। आत्मजा सद्कुळीच दिधली। हे असो लक्ष्मी स्थिरावली। मुकुंदी जैसी।।' ज्ञाने. लक्ष्मी कुठेच जास्त स्थिर राहत नाही. पण नारायणाच्या चरणी कायम स्थिर आहे. 'कमला स्थिर ना रहिम कहे ये जानत नही कोय। पुराण पुरुष की बधु कस न चंचला होय।।' रहिम. कारण त्यांचा अद्याप घटस्फोट झाला नाही. जिथे नारायण तिथे लक्ष्मी. तैसे सकळ पुरुपार्थ। जेणे स्वामी कां सनाथ। तो श्रीकृष्ण रावो जेथ। तेथ लक्ष्मी।। ज्ञाने.

१३) गृहलक्ष्मी - स्वपत्नी हे लक्ष्मीचे रुप आहे. शास्त्र सांगते. पत्नी कशी असावी. 'यस्य भार्या शुचिर्दक्ष, भर्तार अनुगामिनी। नित्यं मधुर वृक्तिच सा रमा न रमा रमाः।।' ज्याची अर्धांगी पवित्र, दक्ष, नवऱ्याचं ऐकणारी व मधुर बोलणारी ती खरी लक्ष्मी अर्थात गृहलक्ष्मी (ग्रहलक्ष्मी नाही.)

१४) कडकलक्ष्मी - लक्ष्मी बऱ्याच ठिकाणी रागावलेली दिसते. रुद्ररुप म्हणजे कडकलक्ष्मी! नारायण विचारतात तू ब्राह्मणांच्या घरी का रहात नाहीस? लक्ष्मी सांगते. कशी राहू?

'पितोऽगस्तेन तातश्चरणतलहतो वल्लभो अन्येत रोषाद्।
आबाल्याद्विप्रवर्येः स्ववदनविवरे धारिता वैरिणी मे।
गेहं मे छेदयन्ति प्रतिदिवसं उमाकान्त पूजानिमित्तं।
तस्मात्खिन्ना सदाहं द्विजकुल सदनं नाथ नित्यं त्यजामि।। सुभा.

अर्थ - माझा पिता सागर, त्याचा एक घोट अगस्ती ब्राह्मणाने केला. माझ्या नवऱ्यास भृगु ब्राह्मणाने अपराध नसताना छातीवर लाथ मारली. माझी वैरीण विद्या (सरस्वती) चे हे उपासक आहेत. अगदी लहानपणापासूनच माझं घर कमळ हे रोज मोडतात. व शंकरास अर्पण करतात. त्यामुळे मी खिन्न आहे. म्हणून ब्राह्मणांच्या घरी जात नाही. यात ब्राह्मणांचे तेज सुद्धा आहे. श्रीकृष्ण अवतारात माझा नवरा मथुरेत दाखल झाला असताना ब्राह्मणांनी दारे लावून घेतली. व्यापाऱ्यानी सत्कार केला. तेव्हाच मी ठरविले. बनियांच्या घरी राहायचे ब्राह्मणांच्या घरी जायचे नाही. वृंदावनात यज्ञ चालू असताना माझ्या नवऱ्यास थोडे सुद्धा अन्न दिले नाही. शिवाय एक ब्राह्मण माझा प्राणवल्लभ जन्मास आल्याबरोबर लोभाने मारण्यास प्रवृत्त झाला (माभळ). मग मी यांच्या घरी कशी राहू? यास कडकलक्ष्मी म्हणतात.

१५) भाग्यलक्ष्मी - अर्थात सौभाग्यलक्ष्मी. जगामध्ये भाग्यवान कोण असा प्रश्न निर्माण झाला तर उत्तर हेच ''तिच भाग्यवंते। सरती पुरती धन वित्ते।। तु. म. एक ट्रक मिळणे, टेम्पो मिळणे बंगला मिळणे हे भाग्य खरे नाही. कदाचित हे भाग्य भागण्याची शक्यता आहे. पण संत भेटणे खरे भाग्य! भाग्याचा उदय। ते हे जोडी संत पाय।। तु. म. ज्यांच्या घरी नारायण लक्ष्मी

दासदासी होतात. यापेक्षा भाग्यवान कोण? 'वैष्णवाघरी लक्ष्मी कामारी। एका जनार्दनी देव दास्यत्व करी।।' नाथ. 'चक्र गदा घेऊनि हरि। उभा असे त्यांचे द्वारी। लक्ष्मी कामारी। ऋद्धी सिद्धी सहित।।' तु. म. म्हणून 'लक्ष्मी ते ऐशा नावे। भाग्ये ज्यावे तरी त्यांनी ।।' तु. म.

असे हे लक्ष्मीचे पंधरा प्रकार आहेत.

★ ★ ★ ★ ★

७१ : अनुभव

मानवी जीवनात अनुभवास फार महत्व आहे. मग तो कोणत्याही क्षेत्रातील असो. अनुभवाने माणूस शहाणा होतो. यावरुन एक कोटी तयार होते. व्यक्तिस तेव्हा महत्व येते, जेव्हा त्याच्याकडे एखादी शक्ति येते. मग ती कोणतीही असो. कलेची असो अथवा सत्तेची असो. मात्र शक्ति युक्तिने वापरली तरच प्रगति होते. मराठीत म्हण आहे. शक्तिपेक्षा युक्ति श्रेष्ठ. युक्ति आहे पण संपत्ती नसेल तर समाजात मान्यता नाही. गुजराथी मध्ये एक म्हण आहे. 'जेणे पासे नानु छे वो शहाणु छे, नानु नथी तो मुरख छे.' संपत्तीही आहे पण निती नाही. संपत्ती वाया जाण्याची शक्यता आहे. निती आहे पण भक्ति नाही. परमार्थिक जीवनामध्ये त्यास विशेष किंमत नाही. 'भक्तिविन पशु कशासी वाढला। सटवीने नेला कैचा नाही।।' नाथ. भक्ति शिवाय जीवन व्यर्थ आहे. बर, भक्ति करतो आहे पण विरक्ति नाही. काय उपयोग? 'भक्ति ज्याची थोडी पूर्ण विषयाची गोडी।।' तु. म. किंवा 'दंभे करु भक्ति सोंग दाऊ जना। अंतरी भावना वेगळाल्या।।' तु. म. 'भजन ते ओंगळवाणे। नरका जाणे चुकेना।।' तु. म. जर विरक्ति नसेल तर भजन करुन नरकास जाईल असे तुकाराम महाराज म्हणतात. भक्तिवरोबर विरक्ति असेल तर 'अनुभूती' आलीच. याचाच अर्थ असा 'अनुभूतीला' परमार्थात फार महत्व आहे. 'अनुभवे आले अंगा। ते या जगा देतसे।।' तु. म. 'तुका म्हणे चाखोनि सांगे। मज अनुभव आहे अंगे।।

जीवाने अनुष्ठान करावे. अनुष्ठानामध्ये अनुसंधान असावे. अनुसंधानात अनुराग असावा, अनुराग असल्यास अनुभव येणारच. नामदेवराय म्हणतात. अनुहात वाजती टाळ। अनुक्षीर गीत नित्य रसाळ। 'अनुभवे' तन्मय सकळ। नामा म्हणे केशव कृपाळ गा।।

तात्पर्य - १) व्यक्ति, २) शक्ति, ३) युक्ति, ४) संपत्ति, ५) निती, ६) भक्ति, ७) विरक्ति, ८) अनुभूती यास अष्टपैलू जीवन म्हणतात.

अथवा - १) अनुष्ठान, २) अनुसंधान, ३) अनुराग, ४) अनुभव चौरस पूर्ण झाला.

★ ★ ★ ★ ★

७२ : नेम

माणसांच्या जीवनांत नियमांना फार महत्व आहे. जो नेमाशिवाय अन्न खातो तो पशुतल्य आहे. 'काही नित्यनेमाविन। अन्न खाय तोचि श्वान। वाया मनुष्यपण। भार वाहे तो वृषभ।।' तु. म.

१) वारकऱ्याचे वार्षिक नियम - पंढरीची वर्षातून दोन वेळा वारी. 'आषाढी कार्तिकी विसरु नका मज। सांगतसे गुज पांडुरंग।।' नाम. 'आषाढी कार्तिकी भक्तजन येती। चंद्रभागे मध्ये स्नान जे करिती।।' नाम. 'आषाढी कार्तिकी तुझ्या गोंधळाची दाटी वो।।' एकनाथ. आषाढी निकट। आला कार्तिकीचा हाट।।' तु. म. 'सुखे करावा संसार। परी दोन्ही न संडावे वार।।' तु. म. 'आषाढी कार्तिकी पंढरीचा सोहळा। पाहताती डोळा विश्वजन।।' निळो. ही सर्व प्रमाणं सांगतात दोन वेळा पंढरीची वारी व एक वेळ आळंदीची वारी. 'यात्रे अलंकापुरी येती। ते आवडती विठ्ठला।' निळो.

नामा म्हणे धन्य जन्म। जया पंढरीचा 'नेम'।
तया अंती पुरुषोत्तम। जीवे भावे न विसंबे।।
धन्य कुळ धन्य जन्म। जया पंढरीचा 'नेम'।
चित्ती अखंड विट्ठल प्रेम। ते धन्य भक्त भूमंडळी।। ज्ञान.

यामध्ये पायी वारीस महत्व आहे.

पायी तिर्थयात्रा घडो। देह संताघरी पडो।। तु. म.

पायीवारीमुळे कायिक, वाचिक, मानसिक 'तप' होते. हा एक 'योग' आहे.

शीत वेढावे। उष्ण पांघुरावे। वृष्टीचिया असावे। घरा आंतु ।। ज्ञाने.

देवाकडे जाताना संतांचे नामस्मरण व संताकडे जाताना देवाचे नामस्मरण करायचे असते.

दृष्टांत - पांडवाचा राजसुय यज्ञ चालला होता. रोज घंटा वाजत असे. एक दिवस वाजली नाही. श्रीकृष्णानी सांगितले शहराच्या बाजूस एक साधू झाडाखाली बसला आहे. तो जेवेल तरच यज्ञ यथासांग होईल. अर्जुन रथ जुंपून साधूकडे गेला. विनंती केली. साधूने सांगितले शंभर यज्ञाचे फळ जो मला देतो. त्याच्याकडेच मी जेवतो. अर्जुन परत आला. चर्चा झाली. द्रौपदीने सांगितले मला संधी दिल्यास मी साधूंना आणते. (तीस टक्के) अर्जुन रथ देऊ लागला. द्रौपदीने दोन दासी बरोबर घेतल्या व पायी निघाली. साधूने अट सांगितली. द्रौपदी म्हणाली आमच्या घरी नेहमी श्रीकृष्ण येतात. एक दिवस त्यांनी सांगितले देवाचे नाव घेत संताकडे गेले असता पावलागणिक एक यज्ञ होतो. 'राम म्हणे वाट चाली। यज्ञ पाऊला पाऊली।।' तु. म. मी सतत श्रीकृष्णाचे नाव घेतले. आपल्याकडे येण्याकरीता ५०० पावले लागली. माझ्याकडे ५०० यज्ञाचे फळ आहे. शंभर घ्या व चारशे माझ्याकडे राहू दे. साधू काही न बोलता द्रौपदीच्या मागे आला. जेवला व यज्ञ यथासांग झाला. हे पायी वारीचे महत्व आहे.

रामाने रावणाला जिंकला. लंका विभिषणास दिली. विभिषण रथ घेऊन सीतेकडे आला सीतेस बसण्याची विनंती केली. पण सीतेने रथाचा त्याग करून राम दर्शनाकरीता पायी निघाली.

परकापायी राम सापडे। तरी साधक कां शिणती बापुडे।
ऐसे सर्वथा न घडे। जे राम सापडे परके पायी॥
ऐसे बोलोनिया सती। मस्तकांजली विनयवृत्ती॥
उठोनिया अतिप्रीती। सहजस्थिती चालीली॥ रामायण नाथ.

२) वारकऱ्यांचे इतर महत्वाचे नेम - एकादशी व सोमवार उपवास करावा. जो एकादशीचा उपवास करतो. त्याची तुलना विष्णूशी होते.

ऐका व्रताचे महिमान। नेमे आचरती जन।
गाती ऐकती हरिकिर्तन। ते समान विष्णूसी॥ तु. म.

जो एकादशीचा नेम करत नाही ते तिनही लोकांत प्रेत समजावे.

जया नाही नेम एकादशी व्रत। जाणावे ते प्रेत सर्वलोकी॥ तु. म.

जो एकादशी करतो. त्याच्या घरी देव नांदतो. (साजरी करतो त्याच्या घरी नाही.)

जो एकादशीचा व्रतधारी। मी नित्यनांदे त्याचे घरी।
सर्व पर्वकाळाच्या शिरी। एकादशी पै माझी॥ नाथ.

अन्न भुक्तेन यत्पापं जातं पंचदर्शेर्दिनै।
एकादश्युपवासेन तत्सर्वं विलयं भवेत्॥ गर्गसंहिता

अर्थ - पंधरा दिवसांत अन्नभक्षणाने होणाऱ्या अज्ञातपातकाची निवृत्ती एकादशी व्रत करण्याने होते.

जर महिन्यातून हे ६-७ उपवास केले तर पोटास विश्रांती मिळेल व तव्येत चांगली राहील. लोक डॉक्टरांचे पैसे देऊन ऐकतात. पण संतांचे फुकट ऐकत नाहीत. 'पाव को रखो गरम|पेटको रखो नरम। दिमाखको रखो ठंडा। फिर आवे डॉक्टर तो उसको मारो डंडा॥' म्हणून उपवास करावे. शंकर हे आपले सर्वांचे गुरु आहेत. म्हणून आठवड्यातून सोमवारचा उपवास. एकादशी व्रत सोमवार न करिती। कोण त्याची गती होईन नेणो॥ तु. म. व्रत करा 'एकादशी सोमवार। कथा पूजन हरिजागर। पुण्य ते असे गाता नाचता फार। पुन्हा वोलीला संसार। नाही नाही सत्यत्वे॥' तु. म. उपवास या शब्दाचा अर्थ उप + वास. उप - जवळ, वास- राहणे, देवाच्या जवळ राहणे. हा उपवास. रुक्मांगद राजाने एकादशी व्रत करुन संपूर्ण नगरीच वैकुंठास नेली.

व्रत एकादशी रुक्मांगद करी। वैकुंठा नगरी नेली त्याने॥ तु. म.
रुक्मांगदाकारणे एकादशीचा छंद। तेणे परमानंद प्रगटला॥ नाथ.

३) वारकऱ्याचा रोजचा नियम - नामस्मरण. मात्र सतत हवे.

हाचि माझा नेम धर्म। मुखी विटोबाचे नाम॥ तु. म.
नित्यनेम नामी ते प्राणि दुर्लभ। लक्ष्मी वल्लभ तयाजवळी॥ ज्ञान.

नामास कोणताच प्रतिबंध नाही. म्हणून हा रोजचा नियम. नेमाचे महत्व असे आहे.

तुका म्हणे 'नेम' प्राणा सवसाटी। तरीच या गोष्टी विटोबाची॥ तु. म.

तात्पर्य नेमाला फार महत्व आहे. थोडक्यात वार्षिक नियम वारी, पंधरा दिवसात एकादशी सोमवार उपवास व रोज नामस्मरण.

नामा म्हणे केशव राजा। केला 'नेम' चालवी माझा॥ नाम.

पंढरीची वारी आहे माझे घरी। आणिक न करी तिर्थ व्रत॥
व्रत एकादशी करीन उपवासी। गाईन अहर्निशी मुखी नाम॥
नाम विटोबाचे घेईन मी वाचे। बिज कल्पांतीचे तुका म्हणे॥

★ ★ ★ ★ ★

७३ : पंथ

पंथ म्हणजे मार्ग. ज्या मार्गाने परमात्मा प्राप्ति होते. भारतात अनेक पंथ आहेत. सर्वांचे ध्येय एकच देवाची प्राप्ति. तथापि कोणताही पंथ पाच तत्वांनी बनलेला असतो. तो पूर्ण पंथ होऊ शकतो. वारकरी साप्रंदाय हा पूर्ण पंथ आहे. याचे कारण यामध्ये पाच पूर्ण तत्वे आहेत.

पाच तत्वे-१) पंथाचा देव, २) पंथाचे संत, ३) पंथाचे ग्रंथ, ४) पंथाची तीर्थक्षेत्रे, ५) पंथाची साधना.

१) वारकरी पंथाचा देव आहे विठ्ठल. जो देवांचा देव आहे. 'जो हा देवाधिदेव बरवा। पांडुरंग सदाशिवाचा निजठेवा। बापरखुमादेवीवरु पंचविसावा। चोवीसा मूर्ती वेगळा रया॥' ज्ञान. ज्या देवाचे ध्यान शंकर, ब्रह्मदेव करतात. जो तिन्ही देवांचे अधिष्ठान आहे. 'वि'कारो विधाताय 'ठ्ठ' कारो निलकंठ ! 'ल' कारो लक्ष्मीकांतः विठ्ठलनामाभिधीयते॥' सुभा

अ) वि - विधाता - ब्रह्मदेव
ब) ठ्ठ - निलकंठ - शंकर
क) ल - लक्ष्मीकांत - विष्णू

जो हा देवांचाही देव। काय कळिकाळाचा भेव॥ तु. म.

बळीया माझा पंढरीराव। जो या देवांचाही देव॥ तु. म.

२) वारकरी पंथाचे संत आहेत. १) ज्ञानोबाराय, २) नामदेवराय, ३) एकनाथ महाराज, ४) तुकोबाराय, ५) निळोबाराय (यांना संत पंचायतन म्हणतात.) हे सर्व संत पंढरीचे वारकरी आहेत. ज्ञानदेव या पंथाचे पाया व तुकाराम महाराज कळस आहेत. या भागवत मंदिराचे खांब

आहेत एकनाथ महाराज. या इमारतीचा विस्तार केला नामदेवराय यांनी.

३) वारकरी पंथाचे ग्रंथ आहेत - गीता भागवत. गाथा वगैरे. 'गीता भागवत करीती श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे॥' तु. म. तीन ग्रंथांना प्रस्थानत्रयी म्हणतात. गीता (ज्ञानेश्वरी) ज्ञानप्रधान ग्रंथ, भागवत - भक्ति प्रधान ग्रंथ, तुकाराम महाराज गाथा - वैराग्य प्रधान ग्रंथ, इतर सर्व सत्शास्त्रे जी परमार्थ पोषक आहेत.

४) वारकरी पंथाची तिर्थक्षेत्रे - पंढरी, आळंदी, देहू, पैठण, नेवासे वगैरे. तिर्थक्षेत्र त्याला म्हणतात ज्याठिकाणी देव, संत, तिर्थ आहे. 'सर्वोत्तम तिर्थ, क्षेत्र आणि देव। शास्त्रांनी हा भाव निवडिला॥' तु. म. वरील पंढरीचे वर्णन आहे. आळंदी यापेक्षा श्रेष्ठ म्हणतात. हे पंढरीहुनी सोपे। जनाची हरावया पापे। कळिकाळ कोपलिया कोपे। न चले त्याचे अलंकापुरीसी॥ नाम. ही आहेत पंथाची तिर्थक्षेत्रे.

५) वारकरी सांप्रदायाची अथवा पंथाची साधना आहे. 'नाम'स 'कीर्तन' 'नामसंकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची॥' तु. म. जे साधन सोपे, श्रेष्ठ आहे. 'नामसंकीर्तन वैष्णवांची जोडी। पापे अनंत कोडी गेली त्याची॥' ज्ञान. हा पंथ संताचा आहे.

संताचे संगती मनोमार्ग गती। आकळावा श्रीपती येणे 'पंथे'॥ ज्ञान.

हा सिद्ध पंथ आहे.

तुका म्हणे जो संसारा रुसला। तेणेचि टाकिला 'सिद्धपंथ'॥
जाईन 'सिद्धपंथे' अवघ्या चुकतील खेपा॥ तु. म.

हा पंथ अनादि, वेद वोधीत, श्रेष्ठांनी अंगीकारलेला व फलद्रुप आहे.

★ ★ ★ ★ ★

७४ : ग्रंथ

ग्रंथ या शब्दाचा अर्थ ग्रंथी म्हणजे गाठी. संशयाच्या गाठी ज्यामुळे सुटतात व जीवांस ज्ञान होते त्यास ग्रंथ म्हणतात. याचे तीन प्रकार आहेत.

१) कृत ग्रंथ, २) स्मृत ग्रंथ, ३) विनिर्गत ग्रंथ,

१) कृतग्रंथ त्यांना म्हणतात माणूस स्वतःच्या बुद्धीने, कल्पनेने, प्रतिभा शक्तिने जे वाङमय लिहितो त्यास कृतग्रंथ म्हणतांत. कादंबरी, नाटक, कथा वगैरे यात मोडतात.

२) स्मृतग्रंथ त्यांना म्हणतात देवाचा साक्षात्कार झाल्यानंतर प्रभूने अथवा संतांनी आशिर्वाद दिल्यानंतर मुखातून जी प्रासादिक वाणी निर्माण होते त्यास स्मृत ग्रंथ म्हणतात. यामध्ये शास्त्रे, पुराणे, ज्ञानेश्वरी, गाथा वगैरे संतवाङमय याचा समावेश होतो. 'गीता भागवत करिती

श्रवण। अखंड चिंतन विठोबाचे॥' तु. म. हे साहित्य परमार्थास अतिशय पोषक आहे. साधकांनी कृत ग्रंथ न वाचता स्मृत ग्रंथ वाचावेत. ''वाचावी ज्ञानेश्वरी। डोळा पहावी पंढरी॥'' जनाबाई. या वाङमयाचे महत्व असे आहे.

''उदयति यदि भानुः पश्चिमे दिग्विभागे। विकसती यदि पद्मं पर्वतानां शिखाग्रे।
विचलति यदि मेरुः शीततां याति वन्ही। न चलती खलु वाक्यं सज्जनानां कदाचिता॥'' सुभा.

अर्थ - कदाचित सूर्य पश्चिमेस उगवेल. कमळ पाण्यात उगवते पण ते खडकावर उगवेल. मेरु पर्वत स्थिर आहे. पण तो हालेल. कदाचित अग्नि शीतल होईल. पण संताच्या (सज्जनांच्या) वाक्यात कधीच बदल होणार नाही. संताचे सहज बोलणे म्हणजे दगडावरील कोरलेली रेघ पण दुर्जनाने शपथ घेऊन सांगितले तरी ती पाण्यावरील रेघ समजावी.

''सद्भिस्तु लिलया प्रोक्तं शिलेलिखीतंऽक्षरं।
असतभिः शपथेनापि जले लिखीतं अक्षरम्॥'' सुभा.

हे कळण्यास सोपे व हितकारक आहे.

३) विनिर्गत ग्रंथ फक्त वेदास म्हणतात. हे कोणी निर्माण केले नाहीत. वेद देवाच्या श्वासातून निघाले. 'जयाच्या निश्वासी। जन्म झाले वेदराशी॥'' ज्ञाने. 'जो हा वेदार्थ सागरु। जया निद्रिताचा घोरु। तो स्वये सर्वेश्वरु। प्रत्यक्ष अनुवादला॥' ज्ञाने. वेद ब्रह्मदेवांसही कळत नाहीत तर सामान्यांची काय कथा!

ब्रह्मा डोळसा तो वेदार्थ नाकळे। तेथे हे आंधळे व्यर्थ होती॥ नाथ.

तात्पर्य साधकांनी याच्या भानगडीत पडू नये. याविषयी आदर ठेवावा. या कोटीत आपले मूळ वाङमय (ग्रंथ) यांचा कर्त्यासह समावेश आहे. आपले चार वेद आहेत. प्रथम वेद एकच होता. पण व्यासांनी लोकांच्या हिताकरिता याचे चार भाग केले.

१) अथर्ववेद, २) ऋग्वेद, ३) यजुर्वेद, ४) सामवेद. चार वेदांची चार ब्रह्मवाक्ये आहेत. १) अहं ब्रह्मास्मि, २) अयमात्मा ब्रह्म, ३) प्रज्ञानं ब्रह्म, ४) तत्वमसी.

सहा शास्त्रे व त्यांचे कर्ते

१) पूर्वमिमांसा - जेमिनी, २) उत्तर मिमांसा - व्यास, ३) न्याय - गौतम, ४) सांख्य - कपिल, ५) योग - पतंजली, ६) वैषेयिक - कनाद. एका श्लोकात-

गौतमस्य कणादस्य कपिलस्य पतंजले। व्यासश्च जैमिनीश्चापि दर्शनानि षडेव हि॥

आपली मुख्य अठरा पुराणे आहेत. जी सर्व व्यासांनी लिहीली आहेत. एका श्लोकात अठरा पुराणे

मद्वयं भद्वयं चैव ब्रत्रयं व चतुष्टयं। नालि पग्नि पुराणानि कुस्कं गारुडमेवच॥

श्लोकाप्रमाणे यांची नावे

१) मत्स्य, २) मार्कंडेय, ३) भागवत, ४) भविष्य, ५) ब्रह्म, ६) ब्रह्मांड, ७) ब्रह्मवैवर्तक, ८) वराह, ९) वामन, १०) वैष्णव, ११) शैव, १२) नारद, १३) लिंग, १४) पद्म, १५) अग्नि १६) कुर्म, १७) स्कंद, १८) गरुड. हे सर्व आपले वैष्णवांचे प्रमाणभूत ग्रंथ आहेत.

चहू वेद जाण षट्शास्त्रीकारण। अठराही पुराणे हरिसी गाती॥ ज्ञान.

वेद शास्त्र प्रमाण श्रुतिचे वचन। एक नारायण सार जप॥ ज्ञान.

वेद अनंत बोलिला। अर्थ इतुकाचि साधिला॥
विटोबासी शरण जावे। निज निष्ठा नाम गावे॥
सकळ शास्त्रांचा विचार। अंती इतुलाचि निर्धार॥
अठरा पुराणी सिद्धांत। तुका म्हणे हाचि हेत॥ तु.म.

सकळ शास्त्रांचे हे सार। हे वेदांचे गव्हार॥
पहाता विचार। हाचि करिती पुराणे॥ तु. म.

आपल्या या 'अठ्ठावीस' ग्रंथामध्ये अठ्ठावीस युगे विटेवर उभा असणाऱ्या विठ्ठलाच्या शरणांगतीचा व नामाचा विचार केला आहे. त्यांची माहिती आपणास ज्ञात हवी म्हणून ही 'ग्रंथ कोटी'. संत वाङमयास महत्व का? त्याची सहा कारणे.

१) देवाचे कार्य करतात -

तुका म्हणे मज धाडिले निरोपा। मारग हा सोपा सुखरुप॥
सांगितले काम करावे कवित्व॥ तु. म.

२) लौकिकाचा अभाव -

ऐसा हा लौकिक कदा राखवेना॥ तु. म.
लौकिका पुरती नव्हे माझी सेवा॥ तु. म.

३) निःस्पृहता -

नव्हे वैद्य आम्ही अर्थाचे भुकेले॥ तु. म.
अनपेक्षः (गीता) निरपेक्ष (भागवत)

४) पवित्रता -

पवित्र सोवळी। तिच एक भूमंडळी।
पवित्र ते कुळ पावन तो देश। जेथे हरिचे दास जन्म घेती॥ तु. म.

५) अनुभव -

'अनुभवे आले अंगा। ते या जगा देतसे।' (प्रतितीतून वाङमय स्फुरण)

तुका म्हणे चाखोनि सांगे। मज अनुभव आहे अंगे॥

६) वास्तवता -

जसे आहे तसे **'राजस सकुमार मदनाचा पुतळा॥'** तु. म.

★ ★ ★ ★ ★

७५ : शिव

वारकरी सांप्रदायामध्ये विठ्ठल व शिव यामध्ये भेद मानत नाहीत. किंबहुना शंकर हे नाथ सांप्रदायाचे आद्य 'गुरु' आहेत.

आदिनाथ गुरु सकळ सिद्धांचा। मच्छिंद्र तयाचा मुख्य शिष्य॥ ज्ञान.

शंकर हे वैष्णवसुद्धा आहेत. ते सतत रामनाम जपतात.

हस्ते अक्षमाला हृदी कृष्ण तत्वं जिव्हाग्र भागे वर राम मंत्रं
यन्मस्तके केशव पाद तिर्थ शिवं महाभागवतम् नमामि॥ सुभा.

आदिनाथ शंकर नारद मुनेश्वर। शुका ऐसा थोर आणिक नाही॥ तु. म.

गळा रुंडमाळा खापर हस्तकी। रामनाम मुखी सर्वकाळ॥ नाम.

शंकर हे देव नव्हे तर महादेव आहेत.

हरिहर ऐक्य

विष्णू शंकराचे ध्यान करतात. शंकर विष्णूचे ध्यान करतात.

शिवस्य हृदयं विष्णूः विष्णूस्य हृदयं शिवः।
यथा विष्णूमय शिवः तथा शिवमय विष्णूः॥ सुभा.

एक एकाचे हृदयी। गोडी साखरेच्या ठायी॥ तु. म.

किंबहुना शंकर विष प्याले म्हणून विष्णू निळे झाले. विष्णू अमृत प्याले म्हणून शंकर श्वेत झाले. विष्णूचे वाहन व पत्नी शंकराचे अवतार आहेत. शंकराचे वाहन व पत्नी विष्णूचे अवतार आहेत. एका अभंगाद्वारे नामदेवराय वेदाचा पुरावा देऊन सांगताहेत.

भजन करा रे हरिहरा। नारायण शिव शंकरा।
माझे बोलणे अवधारा। भेद न करा दोघांचा॥
तुम्हा सांगेन सत्य वृत्तांत। पाहे पां तेथीचा दृष्टांत।
नारायणे सेवीले अमृत। श्वेत झाला महादेव।
शंभुने गिळीले हळहळा। म्हणोनि विष्णू झाला निळा।

देखत देखत आंधळा। झणी होशी गव्हारा॥
शक्ति रुपी शारंगपाणि। नारायण झाला भवानी।
शारंगधर नंदी होऊनी। सन्मुखासनी राहीला॥
लक्ष्मीरुपे आपण हरु। देवे वरीला शारंगधरु।
गरुडरुपे महेश्वरु। वाहन झाला विष्णूचे॥
एक तो एक वेगळा नाही। हा दृष्टांत 'आगमी' पाहे।
नामा म्हणे एक केशव ध्यायी। हरिहर अवतार॥

राम शिवलिंगाची पूजा केल्याशिवाय अन्न ग्रहण करीत नव्हते. 'शंकर तर 'सेवक स्वामी सखा सिय पिके'॥' तुलशी. शंकर रामाचे सेवक, सखा व स्वामीपण आहेत. सांप्रदायाचा विचार केल्यास नाथ परंपरा शिवविष्णूमय आहे.

१) आदिनाथ - शंकर - मच्छिंद्रनाथ - विष्णू
२) गोरक्षनाथ - शंकर - गहिनीनाथ - विष्णू
३) निवृत्तीनाथ - शंकर - ज्ञानोबाराय - विष्णू

शिव या शब्दाचे चार तात्विक अर्थ आहेत.

१) शिव - कल्याण - शिव नामाचा जप करणाऱ्यांचे कल्याणच होणार. कल्याण म्हणजे परमानंद सुखाची प्राप्ति आत्यंतिक दुःखाची निवृत्ती.

२) शिव - स्पर्श करणे. जीवाचा शिवाशी स्पर्श झाला पाहिजे. तरच जीव आत्मा होतो. म्हणजे दोषमुक्त होतो. जोपर्यंत जीवाचे शिवाशी मिलन नाही तोपर्यंत सर्व अस्पृश्यच आहेत

३) शिव - शिवणे जोडणे. जीवानी जीवांशी अथवा नाशिवंत वस्तूशी नाते जोडण्यापेक्षा शिवाशी नाते जोडावे.

जोडिन ते आता देवाचे चरण। अविनाशी धन परमार्थ ॥ तु. म.

४) शिव - मर्यादा. गावची शीव. ब्रह्मदेवापर्यंत जीवाची धाव आहे. तेथून पुढे जीव शिवच होतो.

म्हणौनि ब्रह्मेशाना परौते। वाढणे नाही जीवाते।
तेथूनि मग वरौते। ब्रह्मचि की॥ ज्ञाने.

रा) शिवाची मूर्ती - सगुण स्वरुप समजली जाते
म) शिवलिंग - निर्गुण स्वरुप समजतात.

लिंग देखिले देखिले। तिही त्रिभुवनी विस्तारीले॥ ज्ञान.

सर्व साधुसंतानी शिव भोळा म्हटले आहे.

'कैलाशीचा देव भोळा चक्रवर्ती। पार्वतीचा पती योगीराज॥' नाम.

शिव भोळा चक्रवर्ती। त्याचे पाय माझ्या चित्ती॥ नाथ.

तुका म्हणे भोळा। स्वामी माझा हा कोवळा॥ तु. म.

रुद्र हे नाम तुम्हा उग्र संहाराशी। शंकर शिव भोळा उदार सर्वस्वी।
उदक बेलपत्र टाळी वाहिल्या देशी। आपुलेचि पद दासा ठाव देई कैलासी॥ तु. म.

याच्या भोळेपणाच्या काही कथा

१) कुबेराने सोन्याची लंका आपले स्वामी शंकर यांच्याकरीता बनविली. वास्तूशांतीस ब्राह्मण म्हणून रावणास बोलाविले. शंकर वास्तूशांतीच्या पूजेवर प्रसन्न झाले व रावणास वर मागण्यास सांगितले. रावणाने शंकराकडे सोन्याची लंकाच मागितली. भोळ्या शंकराने लंका त्यास दिली.

२) शंकरपार्वती एकदा जंगलात फिरत असताना, एका जुनाट शिवमंदिरात शिवलिंगावरची घाट चोरण्याकरीता एक चोर आला. पिंडीस पाय लागू नये व घाट हाती यावी याकरिता बराच प्रयत्न केला. पण नाईलाजाने त्याने घाट हाती लागण्याकरिता पिंडीवर पाय ठेवला व घाट काढून चालला असता शंकर प्रगट झाले व त्यास नंदीवर बसवून कैलासाला निघाले. पार्वती म्हणाली तुम्ही एवढे कसे भोळे? हा चोर घाट चोरण्यांकरीता आला. तुमच्या पिंडीवर पाय दिला. त्यास कैलास कसे? शंकर म्हणाले पार्वती माझा संग केलास पण माझा स्वभाव तुला समजणार नाही. मला काही लोक एका हाताने नमस्कार करतात काही दोन हातानी, काही फक्त डोके ठेवतात मात्र काही साष्टांग नमस्कार करतात. साष्टांग म्हणजे काय? आठ अंगे जमिनीस लागणे.

पादौ हस्तो जानुनी द्वे उरच्याथ ललाटकम्।
अष्टाङ्गेन स्पृशेद भूमिं साष्टांङ्ग प्रणतिश्च सा॥ सुभा.

अर्थ - दोन पाय, दोन हात, दोन गुडघे, उर व डोके ही आठ अंगे. माऊली नमस्कार करण्याची पद्धत सांगतात.

लिंग का प्रतिमा दिठी। देखत खेंवों अंगेष्ठी।
लोटिजे कां काठी। पडली जैसी॥ ज्ञाने.

शिवलिंग अथवा देव प्रतिमा दिसल्याबरोबर काठी जशी पडते तसे शरीर पडावे यास 'अंगेष्ठी' म्हणतात. पण हा भक्त एवढा श्रेष्ठ याने मला आपले सर्व शरीरच अर्पण केले. म्हणून यास कैलासास घेऊन चालला आहे.

चोरे पिंडी दिला पाय। त्या पूजने धाय देव॥ तु. म.

भागवत धर्माचे एकादशी, सोमवार सोडून पाच पर्वकाळ आहेत. त्यात उत्तम शिवरात्र आहे.

पर्व विशेष भागवत धर्मी। नृसिंहजयंति रामनवमी।

वामन जयंति कृष्णाष्टमी। उत्तमोत्तम शिवरात्र॥ भागवत (नाथ.)

हे उपवास भागवत धर्मी (वारकरी) करतात.

शंकर पंढरपूरास वारीस निघाले सर्व कुटुंब बरोबर होते. शंकराने विठ्ठलास भेटण्याकरीता गणपती, पार्वती व नंदी यांना लांब ठेवले व एकटेच दर्शनास गेले. पांडुरंग प्रसन्न झाले व शंकराना उचलून डोक्यावर घेतले. विठ्ठलाच्या डोक्यावर शिवलिंग आहे.

परब्रह्म लिंगं भजे पांडुरंगम॥ शंकराचार्य

पंढरपूरामध्ये गणपती, पार्वती व नंदी हे बाहेरच आहेत. किंबहुना पुंडलिक हा शंकराचा अवतार आहे. पुंडलिक मंदिरात शिवलिंग आहे. तुकोबाराय म्हणतात.

आवडे पंढरी भीमा पांडुरंग। चंद्रभागा 'लिंग' पुंडलिक॥
सांगण्याचे तात्पर्य 'हरिहरा' भेद। नाही नका करु वाद॥ तु. म.

★ ★ ★ ★ ★

७६ : श्रीकृष्ण

विष्णूचे अनंत अवतार आहेत. 'अवताराच्या राशी तो हा उभा विटेवरी' असे नामदेवराय म्हणतात. तथापि भागवतात २४ अवतार सांगितले आहेत, 'दो जलचर दो भूचर दो विप्र दो राजा!' बौद्ध कलंकी अवतार लिया भक्तजनोंके काजा॥ हे मुख्य दहा अवतार १) मत्स्य, २) कच्छ, ३) वराह, ४) नारसिंह, ५) वामन, ६) परशुराम, ७) राम, ८) कृष्ण, ९) बौद्ध, १०) कलंकी.

बाकीचे १४ अवतार १) सुयज्ञ, २) कपिल, ३) दत्त, ४) धन्वंतरी, ५) सनक, ६) सनातन, ७) सनंदन, ८) सनत्कुमार, ९) नर, १०) नारायण, ११) वेनपुत्र, १२) ऋषभ, १३) हयग्रीव, १४) हंस (भागवत स्कंद २)

या अवतारात सहा प्रकार पडतात.

अंशाशोंऽशस्तथावेशः कलापूर्ण प्रकथ्यते।
व्यासाद्यैश्च स्मृतः षष्ठः परिपूर्णतमः स्वयंम॥ गर्गसंहिता॥

१) अंश, २) अंशांश, ३) आवेश, ४) कला, ५) पूर्ण, ६) पूर्णतम. मात्र श्रीकृष्णाचा अवतार परिपूर्णतम आहे.

परिपूर्णतमः साक्षात श्रीकृष्णोनान्य एवहि।
एक कार्यार्थमागत्य कोटी कार्य चकार ह॥ गर्गसंहिता
दुर्जनांचा येणे करुनि संहार। पूर्ण अवतार रामकृष्ण॥ तु. म.

रामकृष्ण पूर्ण अवतार आहेत. मात्र राम अवतारात सामर्थ्य आहे. पण स्वातंत्र्य नाही. राम वनवासात निघाले. बरोबर सीता लक्ष्मण निघाले. लक्ष्मण उर्मिलेचा निरोप घ्यायला गेले. उर्मिला म्हणाली मी पण तुमच्या बरोबर येते. तुम्ही दादांची सेवा करा. मी ताईची (सीता) सेवा करीन. तिघांपेक्षा चौघे चांगले. लक्ष्मणास उर्मिलेचा विचार पटला. लक्ष्मण रामास विचारण्यास आले. आपण चौघे वनात जाऊ. राम म्हणाले काही हरकत नाही. पण वाल्मिकीने रामायणात तिघांनाच वनवास लिहीला आहे. लक्ष्मण गप्प बसले.

बोलिले वाल्मिक तैसेचि करीन। वर्तोनी दाविन नामा म्हणे॥

मात्र श्रीकृष्णांचे तसे नाही. सामर्थ्यासह स्वातंत्र्य आहे. रामाने अकरा हजार वर्षे राज्य केले पण श्रीकृष्णाने फक्त १२५ वर्षे.

यदुवंशेऽवतीर्णस्य भवतः पुरुषोत्तम।
शरच्छतं व्यतीताय पच्चविंशाधिकं प्रभो॥ भागवत

मृत्युलोकी मनुष्यमर्यादा। शतवर्षे जी गोविंदा। ते अतीक्रमोनि अवदा।
अधिक मुकुंदा पंचवीस जाहली॥ भागवत (एक.)

या सव्वाशे वर्षात श्रीकृष्ण ११ वर्षे गोकुळ, १४ वर्षे मथुरा व १०० वर्षे द्वारकेमध्ये राहिले. थोडक्यात खेडेगावात जन्मले, शहरात आले व देशाबाहेर गेले (द्वारका समुद्रात) श्रीकृष्ण आठवा अवतार म्हणून यांच्या जीवनात ८ अंकास फार महत्व आहे. यांची आठ नावे आहेत.

१) लाला कृष्ण - यशोदेचा, २) बाळकृष्ण - नंदावरोवर, ३) युगुलकृष्ण - गौळणीवरोवर, ४) गोपाळकृष्ण - गोपाळाबरोवर, ५) राधाकृष्ण - राधेवरोवर, ६) श्रीकृष्ण - मथुरेत, ७) भगवानकृष्ण - द्वारकेत, ८) योगेश्वरकृष्ण - अर्जुनांच्या रथावर.

हे अष्टमीस जन्मास आले. जन्मताच ८ वर्षाची मूर्ती बनले होते. यांचे ८ गुण आहेत

१) अपहृद पापम् - यांना पापपुण्य नाही.
२) विजरो - यांना म्हातारपण नाही. सोळा वर्षापर्यंत देह वाढतो. पुढे वय वाढते देह तसाच राहतो. कारण दिव्य देह, म्हणून यांना दाढी मिश्या नाहीत.
३) विशोको - यांना शोक नाही. गोकुळातून सहज मथुरेत गेले. किंबहुना स्वतःचे कूळ संपवून अवतार संपविला. तरी चेहऱ्यावर हास्यच.
४) विमृत्यू - यांना मृत्यू नाही कारण जन्ममरणांतीत म्हणून
५) विधिघत्सो - यांना भूक लागत नाही.
६) अभिप्यास - यांना तहान लागत नाही.
७) पूर्ण काम - यांचा नेहमी काम पूर्ण असतो. पूर्ण तृप्त. कारण हे पूर्ण आहेत
८) सत्यसंकल्प - यांचा कोणताही संकल्प सत्य होतो. सत्य असतो. एका सुभाषितकाराने

एकाच श्लोकांत ८ मुद्दे सांगितले आहेत.

आदौ देवकी गर्भ जननं गोपीगृहे वर्धनम।
माया पुतना जीवताप हरणं गोवर्धन धारणम।
कंस छेदनं कौरवादि हननम् कुंति सुता पालनम।
एतद्वि भागवत पुराण कथितम श्रीकृष्ण लीलामृतम॥

१) देवकीच्या गर्भात जन्मले, २) यशोदेच्या घरात वाढले, ३) पुतनेचा उद्धार केला, ४) जीवांचा ताप हरला, ५) गोवर्धन डोंगर उचलला, ६) कंसास मारला, ७) कौरवांना हाणले, ८) पांडवांचे रक्षण केले. थोडक्यात ही भागवतात श्रीकृष्ण लिला आहे. माऊलींनीपण चार ओवीत चरित्रांचे ८ मुद्दे सांगितले आहेत.

जो देवकी वसुदेवास्तव जाहला। कुमारी साटी गोकुळी गेला।
तो मी प्राणासकट पियाला। पूतनेते॥
नुघडता बाळपणाची फुली। जेणे मिया अदानवी सृष्टी केली।
करी गिरि धरूनि उमाणिली। महेंद्रमहिमा॥
कालिंदीचे हृदयशल्य फेडिले। जेणे मीया जळत गोकुळ राखिले।
वासरुवांसाठी लाविले। विरंचीस पिसे॥
प्रथम दशेचिया पहाटे। माजी कंसा ऐसी अचाटे।
महाधेंडी अवचटे। लीलाचि नाशिली॥ ज्ञाने.

१) देवकी वसुदेवासाठी आला, २) कुमारीसाठी गोकुळी गेला, ३) प्राणासकट पुतनेस पियाला, ४) गोवर्धन उचलून इंद्र गर्व हरण केला, ५) कालिया मर्दन केले, ६) वारा गाव अग्नि प्राशन केला. गोकुळ राखले, ७) वासरे होऊन ब्रह्मदेवास वेड लावले, ८) बालपणीच कंसासह अनेक महाराक्षसांचा वध केला.

८ अंकास महत्व असल्यामुळे वारकरी सांप्रदायात आठव्या दिवशी काल्यांच्या कीर्तनात यास आठवावा लागतो. त्याशिवाय सप्ताह पूर्ण होत नाही. मात्र यांचे चरित्र गोकुळात उत्तम मथुरेत मध्यम व द्वारकेत अधम असे महात्मे सांगतात. म्हणून तुकोबाराय म्हणतात 'चरित्र ते उच्चारावे। देवे केले गोकुळी॥' श्रीकृष्णांनी गोकुळात 'समाजकारण', मथुरेत राजकारण व द्वारकेत धर्मकारण केले.

कृष्ण या शब्दाचे तीन अर्थ होतात.

१) कृष्ण - काळा. कळण्यास कठीण

टायिचाची काळा अनादि बहु काळा। म्हणऊनि वेदा चाळा लावियेला॥ ज्ञान.

२) कृष्ण - काळ. सर्वांचा काळ 'तरी अर्जुना मी काळु गां पुढे॥' ज्ञाने.

३) कृष्ण - हा शब्द 'कर्ष' धातूपासून आला आहे. सर्वांना आकर्षित करणारा. 'सुंदर साजिरे

ध्यान मान। तेणे आकर्षिले माझे पंचप्राण॥' निळो. 'तुका म्हणे छंदे। येणे वेधिलीं गोविंदे॥ तु. म. कृष्णानी नवरसात चरित्र केले. 'एकचि पुरुष जैसा। अनुसरत नवारसा। नवविध ऐसा। आवडो लागे॥' ज्ञाने.

१) शृंगार - गोपीबरोबर रासक्रिडा,
२) वीर - काग, बग, अघ, शकटासूर वध
३) करुणा - सुदामा सत्कार,
४) अद्‌भुत - 'विश्वरुप, गोवर्धन धारण, अग्निप्राशन,
५) हास्य - वानरास लोणी, दाढी वेणी गाठ, मुंगूस सोडणे वगैरे
६) भयानक - कालिया मर्दन
७) बिभत्स - पुतना शोषन
८) रौद्र - चाणूर, मुष्टिक वध, कंस वध.
९) शांत - गीतोपदेश, भागवत उपदेश.

ज्ञानप्रधान गीता - भक्तिप्रधान भागवत. दिनकरस्वामी नावाच्या दासपंथी भक्ताने ९ अवताराचे नवरसात वर्णन केले आहे. १) मत्स्य - भयानक, २) कुर्म - शांत, ३) वराह - अद्‌भुत, ४) नृसिंह - बिभत्स, ५) वामन - हास्य, ६) परशुराम - रौद्र, ७) रामचंद्र - वीर, ८) कृष्ण - शृंगार, ९) बौद्ध - करुणा. जो श्रीकृष्ण तोच विठ्ठल अशी सर्व संताची प्रमाणे आहेत.

पांडुरंग बाळमुर्ती। गाई गोपाळ सांगाती। येऊनिया प्रिती। उभे समची राहिले॥ तु. म.

विठ्ठल मात्र कारुण्यरुप आहे.

बहु आहे करुणावंत। अनंत हे नाम ज्या॥ तु. म.

कोणाकरिता काय धारण केले? तात्विक विचार.

१) मख्खनधारी - गोकुळवासीयांच्या दर्शनाकरिता - चित्तचोर
२) मोर मुगुटधारी - नाचण्याकरीता व राजा म्हणून बुद्धीस महत्व
३) मुरली - मोहरी पावाधारी, गौळणीना आकर्षण करण्यासाठी आनंद देण्याकरीता
४) गोवर्धनधारी - संकट रक्षक म्हणून, इंद्र गर्वहरण, गोपाळ अहंकार हरण्याकरीता
५) घोंगडी - काठी धारी - गायींचे पालन करण्याकरिता, गोपालक, इंद्रिय पालक
६) गदा चक्रधारी - दुष्टाकरिता भिती वाटावी म्हणून (पापाची)
७) शंख पद्मधारी - शंख बोधाकरिता, पद्म पूजेकरिता (भक्तांच्या)
८) गीताधारी - जगातील मानवाकरीता - तत्वज्ञान देण्याकरिता.

★★★★★

७७ : पाप

पापामुळे माणसांस दुःख भोगावे लागते. १) पापामुळे दुःख, पुण्यामुळे सुख, २) ज्ञानामुळे मोक्ष, अज्ञानामुळे बंधन, माणूस जन्मास येतो तो मुळात पापामुळेच. 'जन्मा येणे घडे पातकाचे मूळ। संचिताचे फळ आपुलिया।।' तु. म. जन्म मरण म्हणजे दुःख सागरच. जन्म मरणांतील मानवी जीवनातील जी वेळ तिला संसार अथवा जीवन म्हणतात. यात जवळ जवळ दुःखच आहे. असे वेद, शास्त्र, संत सांगतात. संसार दुःख मूळ चहुकडे इंगळ ।। ज्ञान. दुःख वांदवडी आहे हा संसार ।। तु. म. तात्पर्य - पापामुळे दुःख भोगावे लागते. दुःख कोणालाही नको असते. अर्थात दुःखाचे मूळ जे पाप त्याचे प्रकार पहायचे आहेत. जे आपल्या हातून होऊ नयेत. व्यासानी अठरा पुराणांचे सार एका श्लोकांत सांगितले आहे.

अष्टादश पुराणेषु व्यासस्य वचन द्वयं । परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।।

पुण्य परोपकार पाप ते परपिडा । आणिक नाही जोडा दुजा यासी ।। तु. म.

दुसऱ्यास काया, वाचा, मने पिडा, त्रास देणे म्हणजे पाप. यामध्ये तीन प्रकार १) सामान्य पाप, २) मध्यम पाप, ३) उच्च पाप, याचा थोडा विचार.

१) सामान्य पाप - निळोबारायांचा एक अभंग चिंतनीय आहे.

पाप तया नाव परदारा गमन। पाप ते परधन अपहार।।
पाप तेचि निंदा परपिडा परद्वेष। पाप ते उपहास पुढीलांचे।।
पाप तेचि जीवी विषयांची आसक्ति। पाप अभक्ति कुळाचारी।।
निळा म्हणे पाप मुख्य तेचि साचे। नावडे देवाचे नाम मुखी।।

अर्थ सोपा आहे. निंदा पाप 'क्रूरग्रहांची जैसी। मांदी मिळे एकेचि राशी। येती निंदकापाशी। अशेष पापे।।' ज्ञाने. निंदा म्हणजे वस्तुस्थिती नाही, नसलेले आरोप. मात्र संताची निंदा मोठे पाप ''तयाशी घडली सकळहि पापे। संताचिया कोपे निंदा द्वेषे।।'' तु. म. अखंड संत निंदी। ऐसी दुर्जनाची बुद्धी।। काय म्हणावे तयासी। तो केवळ पापराशी।। तु. म. नाम न आवडणे, पापाचे लक्षण आहे 'नामाशी विन्मुख तो नर पापीया।।' ज्ञाने. 'पाप तया नाव न विचारी नीत।।' तु. म.

२) मध्यम पाप अथवा आततायी - (अतिरेकी) याचे मनुनी सहा प्रकार सांगितले आहेत.

अग्निदौ गरदश्चैव शस्त्रपाणिर्धनापहा। क्षेत्रदार हरश्चैव षडेते आततायिनः ।।

१) आग लावणे, २) विष घालणे, ३) शस्त्र बाळगणे, ४) खून करणे, ५) क्षेत्र लुटणे, ६) परस्त्री पळविणे. ही सहाही पापे कौरवांकडून घडली म्हणून गीता त्यांना आततायी म्हणते. मनुचे मत आहे आततायी गुरु असेल, बालक अथवा वृद्ध असेल, ब्राह्मण वा बहुश्रुत असेल तरी देवाचा विचार न करता त्यास मारला तरी पाप लागणार नाही.

गुरुं वा बालवृद्धौ वा ब्राह्मणं वा बहुश्रुतम। आततायिनमायातं हन्या देवाविचारयन।।

म्हणून कौरवास साह्य करणारे द्रोणाचार्य याना देव मारण्यास सांगतात असे वाटते. नाथांची एक ओवी आहे.

अग्निदाने गरदाने। धनदारा अपहारणे।
घाला घालुनि मारणे। शस्त्रपाणी होणे वधार्थ।। नाथ. भागवत (सहा आततायी)

३) उच्चपाप, महापाप. याचे पाच प्रकार आहेत.

ब्रह्महत्या सुरापानं स्तेयं गुर्वंगनागमः। महंति पातकान्याहुः संसर्गश्चापि तैः सह।। म. स्मृ.

महापातकीयाचे लक्षण। ब्रह्महत्या मद्यपान।
सुवर्णस्तेयी गुरुदारगमन। सत्संसर्गी पाचवा।। नाथ. रामा

१) ब्राह्मण, गाय, निरापराध प्राणी यांना मारणे, २) दारु पिणे, ३) सुवर्ण चोरी, ४) गुरुदारागमन, ५) या चौघांना सहकार्य करणे तो पाचवा महापातकी. हे वैयक्तिक पापाचे तीन प्रकार. आता सामाजिक पापे यांचे प्रकार पाहू.

१) तत्वविरहीत राजकारण - लोभामुळे पक्ष वदलणे, स्वार्थाकरिता राजकारण
२) श्रमविरहित पैसा - 'चाकरीवाचून। खाणे अनुचित वेतन।।' तु. म. फुकट खाणे.
३) नितीविरहीत व्यापार - वजनात, भावात, मालात फसविणे.
४) मानवताविरहित विज्ञान - शेजारी कोण मेले तरी टि. व्ही च्या आकर्षणामुळे प्रेत यात्रेसही न जाणे.
५) चारित्र्यविरहीत शिक्षण - शिकला पण संस्कार नाहीत. त्यामुळे सदाचार नाही.
६) त्यागविरहीत पूजा - मान देणे, पूजा करणे, पण महात्म्यांनी सांगितले त्याचा त्याग न करणे.
७) सत्सत् विवेक विरहीत विलास - नविन जोडपे, (निर्लज्ज) समाजाचे भान नसणे.

या सामाजिक पापामुळे समाज, देश धोक्यात येतो. ही सात पापे गेली तरच समाज सुखी होईल. अन्यथा नाही. शास्त्रात पापाचे दहा प्रकार सांगितले आहेत. हे गेले तरच 'दशहरा' साजरा करता येईल.

अ) कायिक तीन -

अदातानामुपादानं हिंसाचैवविधानतः। परदारोपसेवाच कायिकं त्रिविध स्मृतम।।

१) दिल्याशिवाय घेणे, २) अविधी हिंसा, ३) परदारासेवन ही तीन कायिक पापे.

ब) वाचिक चार -

पारुष्यमनृतंचैव पैशुन्यंचापि सर्वतः। असंबद्ध प्रलापश्च वाङमय स्याश्चतुर्विधम।

१) खोटे बोलणे, २) अर्थ रहित बोलणे, ३) असंबद्ध बोलणे, (विचित्र), ४) वडवड ही

वाचिक पापे (चार)

क) मानसिक पापे

परद्रव्येष्वभिधानं मनसानिष्ठचिंतनम। वितथाभिनिवेशश्च मनसं त्रिविधं स्मृतम॥

१) दुसऱ्याच्या धनाचे चिंतन, २) दुसऱ्याचे अनिष्टचिंतन, ३) खोटा आग्रह ही मानसिक तीन पापे,

ड)

एतानि दश पापानि हरत्वमस्य जानहवि। दशपापहरा यस्मात्तस्माद्दशहरा स्मृताः॥

जोपर्यंत ही दहा पापे जात नाहीत तोपर्यंत जीवनात दशहरा (दसरा) म्हणजे आनंद मिळणे शक्य नाही. आपल्या हातून ही पापे होऊ नयेत याकरीता पाप जाणून घेणे महत्वाचे आहे. जरी पापे झाली असली तरी घाबरण्याचे कारण नाही. एक नाम सूर्य जीवनात उगवला, क्षणांत अनंत जन्माचा पापरुपी अंधकार नाहीसा होईल, 'पंच पातकाच्या कोडी। नामे जळता न लगे घडी॥' तु. म. नाम संकीर्तन साधन पै सोपे। जळतील पापे जन्मांतरीची॥ तु. म. मात्र एक गोष्ट लक्षात ठेवणे. आता पाप न करता नामस्मरण करणे, ज्याप्रमाणे 'वाल्या' सर्व सोडून नामस्मरण करु लागला. व वाल्मिकी झाला. एक अती महत्वाची गोष्ट माणूस देहाकरीता, कुटूंबाकरीता पाप करतो. कुटुंब, देह इथेच राहतो. मात्र पाप बरोबर येते. मग पाप करावेच का?

★ ★ ★ ★ ★

७८ : पुण्य

पापाचे फळ जसे दुःख, तसे पुण्याईचे फळ सुख. म्हणून जीवाने सतत पुण्य करावे. माणसास पुण्याईचे फळ हवे. पुण्य करण्यास नको. पापाचे फळ नको पण करतात पापच. ''पुण्यस्य फलं इच्छन्ति पुण्यं न करोति मानवः। पापस्य फलं नेच्छन्ति पापं करोति यत्नतः॥'' काही लोक विचारतात पापी माणसे सुखात कशी? ज्या अर्थी ते सुख भोगतात त्या अर्थी नक्की मागचे पुण्य आहे. ते संपल्यानंतर मात्र कायमचे दुःख. कबीर म्हणतात ''कबीरा तेरा पुण्यका जब तक भरा है भंडार। तब तक अवगुण माफ है करौ गुनाह हजार॥ पुण्य म्हणजे भूलथाप नाही. पुण्य म्हणजे सुकृत्य. आपणास पुण्याचे प्रकार पाहायचे आहेत.

१) सामान्य इहलौकीक पुण्य, २) पारलौकीक भोगाचे पुण्य, ३) परमार्थ प्राप्तिचे 'परम' पुण्य.

१) सामान्य पुण्य - परोपकार वगैरे सतकृत्ये. 'परोपकाराय पुण्याय'' अर्थात कोणतेही चांगले काम पुण्याईमध्ये मोडते. गरीबास मदत. आई वडिलांची सेवा, समाजसेवा वगैरे. एक सुभाषित आहे. माणसास (जीवास) तेरा गोष्टी पुण्याईने प्राप्त होतात.

मानुष्यं वर वंशजन्म विभवो दीर्घायुरारोग्यता।

सन्मित्रं सुसुता सती प्रियतमा भक्तिश्च नारायणे।
विद्वत्वं सुजनत्वंमिद्रिंयजयो सत्पात्रदाने रतिः।
ते विना पुण्येन त्रयोदश गुणः संसारिणो दुर्लभः।

१) मनुष्यजन्म, २) चांगल्या कुळात जन्म, ३) वैभव, ४) मोठे आयुष्य, ५) आरोग्य, ६) सुमित्र, ७) सुपुत्र, ८) सुप्रिया, ९) नारायण भक्ति, १०) विद्वत्ता, ११) चांगले नातेवाईक, १२) इंद्रिये ताब्यात, १३) सत्पात्र दान. या तेरा गोष्टी संसारी जीवास पुण्याईने मिळतात.

२) पारलौकिक पुण्य - ज्यामुळे पारलौकिक भोग मिळतात असे पुण्य. इंद्र होण्याकरिता १०० यथासांग यज्ञ करावे लागतात. ब्रह्मदेव होण्याकरीता ब्राह्मणांचे १०० जन्म घेऊन षड्कर्म करावे लागते. ज्ञानेश्वर महाराज सांगतात ''जे ज्ञान तयाचे हाती। तोचि समर्थ मुक्ति। जैसी 'शतमख' संपति। स्वर्गीचिया॥'' 'कां शतएक जन्मा। जो जन्मोनि ब्रह्मकर्मा। करी तोचि ब्रह्मा। आण नोहे॥' ज्ञाने. गायी, ब्राह्मण, सतीकरीता प्राण अर्पण केल्यास ब्रह्मलोक प्राप्त होतो. असे भागवत सांगते. हे मध्यम पुण्य आहे. कारण याने जन्ममरण चुकत नाही. गीतेत चार पुण्याचे प्रकार दिले आहेत.

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम्।
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम॥ गीता ८ ॥ २८

माऊली भाषांतर करते. जरी 'वेदाध्ययनाचे जाले। अथवा यज्ञाचे शेतचि पिकले। कां तपोदानाचे जोडले। सर्वस्व हन जे॥ तया आघवयाचि पुण्याचा मळा। भारु आतौनि जया ये फळा। जे परब्रह्म निर्मळा। साठी न सरे॥ ज्ञाने.

१) वेदाध्ययन - हे खरे पुण्य नाही. कारण ब्रह्मदेवांनी चार वेद पाठ केले. चतुर्मुख झाला. विष्णूस सांगितले पाठांतर घ्या. देवाने सांगितले मला वेळ नाही. पण एक चूक झाल्यास पुढील झाडाचे एक पान गळेल. संध्याकाळी सांगा. पाने गोळा करुन, किती चुका! पाठांतरास सुरुवात केल्यावरोबर वृक्षच पडला. कारण काय? पाठांतराचा अभिमान आणि नाथ महाराज म्हणतात. 'वेदार्थाचा गोवा करुया अभिलाष। वेदे नाही ऐसे सांगितले॥ तात्पर्य वेदाभ्यास पुण्य आहे पण अशुद्ध.

२) यज्ञ करणे - पुण्य आहे पण शुद्ध नाही. धर्मराजाने राजसूय यज्ञ केला. पण सोनेरी मुंगुसाचे अर्धे अंग सोन्याचे झाले नाही. मुंगुस बोलले यज्ञ यथासांग झाला नाही. श्रीकृष्णानी मुंगुसास अनुमोदन दिले कारण चार दिशांना चार भाऊ पाठवून दुसऱ्याचे द्रव्य जमा करुन केलेला यज्ञ यथासांग कसा होईल? वाघाचिये भूके वधवावी गाय। याचे नाव काय 'पुण्य' असे॥ तात्पर्य यज्ञ खरे पुण्य नाही.

३) तप करणे - पुण्य आहे पण खरे नाही. का? नाथ महाराज सांगतात 'धडक मारीली विश्वामित्रा। रंभेमागे झाला कुत्रा॥' हेच तपाचे फळ कां?

४) दान करणे - पुण्य आहे पण शुद्ध नाही. भागवतात कथा आहे.

दान देता नृग बहुवस। कुपि झाला कृकलाश ॥ भागवत.

नृग राजा रोज गाई दान करत होता. दान केलेली गाय पुन्हा कळपात आली. तिच दुसऱ्या दिवशी दान केली. गाई दान घेणारा ब्राह्मण आला, तीच गाय मागू लागला राजाने दिली नाही. परीणाम ब्राह्मणाने शाप दिला तू वेडूक होशील. (सरडा होशील)

तात्पर्य - ही चारही पुण्ये शुद्ध नाहीत. मग शुद्ध पुण्य कोणते?

जयामध्ये नारायण। शुद्ध पुण्य ते एक ॥ तु. म. ज्ञानेश्वरीमध्ये पुण्यास तीन शब्द वापरले आहेत. उत्तम पुण्य, शुद्ध पुण्य, असाधारण पुण्य.

प्रभु आघवेनि येणे जन्मे। जिये पुण्ये केली मिया 'उत्तमे' ॥
तयाची न टकतीची अंगे कामे। सद्गुरु तुवा ॥ ज्ञाने.

स्वर्गा पुण्यात्मके पापे येईजे। पापात्मके पापे नरका जाईजे ॥
मग माते जेणे पाविजे। ते 'शुद्ध' पुण्य ॥ ज्ञाने.

पुण्ये पोषिली 'असाधारणे'। तिये तुझे गुण वानणे।
देऊनि मज उत्तिर्णे। झाली आजी ॥ ज्ञाने.

निष्कामता निजदृष्टी। अनंतपुण्य कोट्यान कोटी ॥ नाथ.

अशी चार पुण्ये आहेत. १) शुद्ध २) उत्तम ३) असाधारण ४) निष्काम यामुळे देवाची अथवा संताची प्राप्ति होते.

पुण्य फळले बहुता दिवसा। भाग्य उदयाचा ठसा ॥ तु. म.

कोण पुण्या फळ आले। आजी देखिली पाऊले ॥ तु. म.

काय पुण्य राशी। गेल्या भेदोनि आकाशी ॥ तु. म.

कोण पुण्य कोणा गाटी। ज्याची ऐसियासी भेटी ॥ तु. म.

कोण पुण्य त्यांचा होईन सेवक। जिही द्वंद्वादिक दुराविले ॥ तु. म.

असे कोणते पुण्य असावे? उत्तर सांगता येईल,'पुण्य ऐसे काय रामनामापुढे। काय ते बापुडे यज्ञ याग ॥' तु. म. 'तिळेतिळे पुण्य साचा पडे। तरी हे बहुता जन्मी जोडे। 'नाम' तुझे वाचेसी आतुडे। समागम घडे संताचा ॥' तु. म. नामस्मरणच उत्तम, शुद्ध, असाधारण पुण्य असे ज्ञानेश्वर महाराज हरिपाठाच्या धृव पदात सांगतात

हरिमुखे म्हणा हरिमुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥

एक हरिनामामुळे किती पुण्य मिळते. एक दृष्टांत पाहू व कोटी संपवू.

एका गावात दोन भाऊ होते. एक आस्तिक, दुसरा नास्तिक. मोठा भाऊ जो हरिभक्त होता तो सतत भजन पूजन, वारी, अन्नदान वगैरे करत असे. पण लहान भावास हे बिलकूल आवडत नसे. त्यास वाटायचे ही सर्व उधळपट्टी आहे. घरी भजन असल्यास हा आरामशीर एका खोलीत टि. व्ही. पहायचा किंवा टेपची गाणी ऐकत बसायचा. मोठ्या भावास दुःख वाटायचे आपला भाऊ अधोगतीस चालला. पण करणार काय! एकदा घरी भजन व भोजन होते. भजन व भोजन झाले. एक महात्मा आला होता. त्यांनी विचारले आपला चेहरा खिन्न का? मोठा भाऊ म्हणाला माझा भाऊ भजनात भाग घेत नाही. भजन म्हणजे त्यास ओझे वाटते. वीट येतो. महात्यानी विचारले. तो आहे कुठे? बाजूच्या खोलीत बसला आहे. आपण सर्व गेल्यानंतर गुपचूप येऊन जेवण करणार. हे महाराज सर्व मंडळी गेल्यानंतर त्याच्या खोलीजवळ गेले. त्याने दार उघडले. तो बोलला आता फुकटचे जेवला ना? मग चालू लागा. महात्मा बोलले आम्ही जातो पण तू एकदा हरि म्हण! तो म्हणाला मी म्हणणार नाही. महात्मा आत गेले. त्यास धरला, खाली पाडला व छातीवर बसले. म्हणाले एकदा हरि म्हटल्याशिवाय तुला सोडणार नाही. आता उपाय नाही हे जाणून तो हरि म्हणाला. आता सोडा. महात्मा म्हणाले हे हरिनाम कोणत्याही किमतीस विकू नको. लहान भाऊ वारला. यमाच्या हातात चित्रगुप्ताने त्याची जीवन कॅसेट दिली. सर्व लाल रंग फक्त एके ठिकाणी हिरवा रंग. सर्व पाप, फक्त एकदाच पुण्य. त्याने विचारले त्याची किमत काय? यमराज बोलले मला माहीत नाही. तो म्हणाला मला किंमत कळली पाहिजे. यमराज यास घेऊन इंद्राकडे गेले. इंद्रास एकदा घेतलेल्या नामाची किंमत माहित नव्हती. इंद्र ब्रह्मदेवाकडे, ब्रह्मदेव शंकराकडे गेले. शंकर म्हणाले मी सतत हरि म्हणतो. पण एकदा हरि म्हटल्याची किंमत मला पण माहित नाही. शेवटी हे सर्व देव यास पालखीत घालून विष्णूकडे गेले. विष्णूनी सांगितले. मला सुद्धा माझ्या नामाची किंमत माहित नाही. ज्याअर्थी यास माझे दर्शन झाले, माझ्यापर्यंत आला त्याअर्थी मोठे पुण्य केले आहे. तात्पर्य एकदा हरि म्हटल्याने एवढे पुण्य होते तर सतत नामस्मरण करतो त्याचे किती पुण्य होईल? म्हणून माऊली म्हणते, ''हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा। पुण्याची गणना कोण करी ॥'' रामायणात एक श्लोक आहे, नाम पुण्याची थोरवी सांगणार.

गोकोटीदानं ग्रहनेषु काशिप्रयाग गंगायुत कल्पवासः।
यज्ञायुतं मेरु सुवर्ण दानं गोविंदनामस्मरणेन तुल्यम् ॥ रामायण.

नाथ महाराजांनी विस्तारपूर्वक वर्णन केले आहे. त्याचा साधारण अर्थ. ग्रहणाच्या पर्वकाळी रौप्य खुरी, सोन्याच्या शिंगाच्या कोट्यावधी गाई दान दिल्या, काशिप्रयाग गंगेच्या काठी अनेक कल्प वास केला, अनेक यज्ञ केले, मेरु पर्वताएवढे सोने दान दिले, या सगळ्यांची बेरीज केली तरी एका गोविंदनामाच्या उच्चाराएवढी होत नाही. तात्पर्य नामस्मरणासारखे परम पुण्य नाही.

★ ★ ★ ★ ★

७९ : पापपुण्य

या कोटीत पापपुण्यांचा विचार आहे. पाप आणि पुण्य वेगळी कोटी आहे.

गो) १) पशुपक्षी यांना पापपुण्य नाही. पशू, पक्षी व इतर पापाचा भोग आहे.

पशु काय 'पापपुण्य' जाणती। उत्तम मध्यम भोग भोगिती।
काही एक उपजता मरती। बहिरी अंध होती। पांगुळ मुकी॥ तु. म.

पशु 'पापपुण्य' काय हे जाणती। मनुष्य या रिती टाऊकिया॥ तु. म.

२) स्वर्गातील इंद्रादी देवाना सुद्धा पापपुण्य नाही. ही भोगभूमी आहे. पुण्याचा भोग भोगतात.

३) योगी याना सुद्धा पाप-पुण्य नाही.

यथारविः सर्व रसान्प्रभुक्ते हुताश्चऽपि सर्व भक्षः।
तथैव योगी विषन्प्रभुक्ते न लिप्यते 'पापपुण्यश्च' शुद्धः॥ सुभा.

अर्थ - ज्याप्रमाणे सूर्य सर्व रस भोगतो. अग्नि सर्व भक्षण करते. पण त्यांना पापपुण्य नाही. तद्वत योगी विषय भोगतो. पण पापपुण्यांनी लिप्त होत नाही. योग्यास जर पापपुण्य नाही तर योगेश्वर श्रीकृष्ण त्यास पापपुण्य कसे असेल?

४) पाप - पुण्य फक्त माणसासच आहे. माऊली म्हणते.

वाहतेनि भौतिके। 'पापपुण्य' येथ पिके।
म्हणौनि आम्ही कवतुके। क्षेत्र म्हणो॥ ज्ञाने.

यात आणखी एक कोटी निर्माण होते.

पा) १) पुण्य करत नाहीत - पापच करतात - दुष्ट राक्षसी माणसं.

पापी जो निसुगु। पुण्याविषयी निलागु। जयाच्या मनी वेगु। विकल्पाचा॥ ज्ञाने.

२) पुण्यही करतात पापही करतात - संसारी जन. सत्यनारायणही करतात दारुही पितात. माऊली म्हणते 'पापपुण्याचे खिचटे। करुनि खाता बुद्धी चेष्टे। कडू मधुर न वाटे। ऐशी जे दशा॥' ज्ञाने. पापपुण्याची खिचडी करतात.

३) पुण्यच करतात, पाप कदापि करत नाहीत. साधक, मुमुक्ष

आता मज दृष्टी देई पांडुरंगा मायबापा। शरण मी आलो तुज निवारोनिया 'पापा'॥ तु. म.

४) संताना पापही नाही अथवा पुण्यही नाही. (वैष्णव भक्त योगी हे सर्व)

तुका म्हणे आम्ही झालो अग्निरुप। लागो नेदी 'पापपुण्य' अंगा॥ तु. म.

झुंझार ते एक विष्णूदास जगी। 'पापपुण्य' अंगी नातळे त्या॥ तु. म.

पट्टे ढाळु आम्ही विष्णूदास जगी। लागो नेदी अंगी 'पापपुण्य'॥ तु. म.

म्हणोनि तयाची बुद्धी। नेणे 'पाप-पुण्याची' गंधी।
गंगा मिनलिया नदी। विटाळु जैसा॥ ज्ञाने.

ल) १) पापात पाप-नरक २) पापात पुण्य-मनुष्य ३) पुण्यात पाप-स्वर्ग ४) पुण्यात पुण्य-परमात्मा

स्वर्गा पुण्यात्मके पापे येईजे। पापात्मके पापे नरका जाईजे। मग माते जेणे पाविजे। ते शुद्ध पुण्य॥ ज्ञाने.

★ ★ ★ ★ ★

८० : विश्वास

परमार्थामध्ये विश्वासास फार महत्व आहे. भाव, श्रद्धा व विश्वास हे जवळ जवळ एका अर्थी शब्द आहेत. तथापि भावापेक्षा श्रद्धा महत्वाची व श्रद्धेपेक्षा विश्वास अतिमहत्वाचा.

जीवनात देहाला जेवढी श्वासाची गरज आहे. तेवढी देवाकरीता विश्वासाची गरज आहे. श्वास बंद, जीवन संपले. विश्वास संपला देव मिळणे शक्य नाही.

भांडवल गाठी तरी 'विश्वास'। जालो ते जालो निश्चये दास।
न पाहे मागील ते वास। पुढती सोस सेवेचाची॥ तु. म.

भाविक 'विश्वासी'। पार उतरले त्यासी।
तुका म्हणे नासी। कुतर्क्यांचे कपाळी॥ तु. म.

भाविक 'विश्वासी'। तुका म्हणे नमन त्यासी॥ तु. म.

विश्वासी तो करी स्वामीवरी सत्ता। सकळ भोगीता होय त्याचे॥ तु. म.

''मोको कहाँ ढुंढे मै तो तेरे पासमे॥ धृ.॥
ना तिरथ मे ना मुरतमे ना बनमें ना एकांतमें॥
ना मंदिरमें ना मसजिदमें ना काशी कैलास में॥ १॥
ना मै जपमे ना मै तपमें ना वरत उपवास में।
ना मै क्रिया करममे रहता ना योग सन्यास में॥ २॥
ना प्राणमें ना पिंड मे ना ब्रह्मांड मे ना आकाश मे।
ना मै भृकुटी भंवर में रहता ना स्वासोच्छवास में॥ ३॥

खोजी होय तुरन्त मिल जाऊ एक पलककी तलाश मे।
कहत कबिर सुनो भाई साधो मै हूँ विश्वास में॥४॥

अर्थ - अतिशय सोपा आहे. 'तरले तरती गा आणिकही विश्वासी॥' तु. म. प्रश्न निर्माण होतो विश्वास कोणावर ठेऊ नये व कोणावर ठेवावा. एका सुभाषितकाराने सांगितले आहे. सहा गोष्टीवर विश्वास ठेऊ नये.

१)

नदिनांच नखिनांच शृंगीणां शस्त्रपाणिनाम।
विश्वासो नैव कर्तव्यः स्त्रीषु राजकुलेषुच॥ सुभा.

१) नदी, २) नखाचे प्राणी, ३) शिंगाचे प्राणी, ४) शस्त्र बाळगणारा, ५) स्त्री, ६) राजकुल. दुसरे एक सुभाषितकार सांगतात शत्रूवर विश्वास ठेऊ नका तसेच मित्रांवर पण अती विश्वास ठेऊ नका. कारण मित्र उलटला तर आपली गुपिते फुटतात.

२)

न विश्वसेदमित्रेच मित्रेचति न विश्वसेत।
कदाचित कुपितं मित्रं सर्व गुह्यं प्रकाशयेत॥ सुभा.

परदेशांत दोन मित्र होते. सिझर व ब्रुटस. जीवापाड प्रेम करणारे. सिझर राजा व ब्रुटस प्रधान. पण यांची मैत्री काहीना बघवेना. बंडखोर बंड करण्यास तयार झाले व त्यामध्ये ब्रुटसला सामील करुन घेतले. त्याला बंडखोरांनी राजा करण्याचे आश्वासन दिले. रात्रौ बारा वाजता सिझरवर हल्ला केला. सिझर लढण्यास तयार झाला. पण समोर ब्रुटस दिसला. सिझर म्हणाला,'ब्रुटस यु टू' तू सुद्धा यांच्यात सामील? मग जगण्यात अर्थ नाही. सिझरने शस्त्र खाली टाकले. ब्रुटसने व बंडखोरांनी सिझरला मारले व राज्य सत्ता मिळविली. म्हणून मित्रांवर जास्त विश्वास ठेवू नये.

३) दुर्जनांच्या गोड बोलण्यावर विश्वास ठेवू नये. कारण त्यांच्या जिव्हेवर अमृत व हृदयात विष असते.

दुर्जनः प्रियवादीती नैतद्विश्वासकारणम्।मधु तिष्टति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलम॥ सुभा.

४) वायको मुलांवर विश्वास ठेवावा कां? महाराज म्हणतात. हे सर्व चोर आहेत

स्त्रिया पुत्र कलत्र हे तव नाशिवंत।शेवटीचा अंत न पवे कोणी॥१॥
यमाचिये हाती बांधोनिया देती।भूषणेहि घेती काढूनिया॥२॥
ऐसिया चोरांचा कैसा हा 'विश्वास'।धरीली तुझी कास तुका म्हणे॥३॥

५) धनावर विश्वास ठेवावा का? नको. कारण लक्ष्मी चंचल आहे. माऊली म्हणते धन म्हणजे तरुखालची सावली जशी क्षणाक्षणास बदलते.

या धनाचा न धरी विश्वास जैसी तरुवर छाया॥ ज्ञान.

६) मग देहावर विश्वास ठेवावा का? नाही. देह सुद्धा क्षणभंगुर आहे.

या देहाचा 'भरवसा' पुत्रा न धरावा ऐसा॥ज्ञान. मदालसा

शंकराचार्य सांगतात

निश्वासे नहि विश्वासः कदा रुद्धो भविष्यति।कीर्तनीयमतो वाल्यात हरैर्नाम केवलम्॥

अर्थ - श्वासाचा विश्वास धरु नका. केव्हा बंद होईल हे सांगता येत नाही. म्हणून लहानपणापासूनच हरिकीर्तन करा. जर देहाचाच विश्वास नाही तर देहसंबंधीवर विश्वास कसा ठेवावा. मग विश्वास कोणावर ठेवावा? अर्थात अविनाशी परमात्म्यावर विश्वास ठेवावा. त्यापेक्षा त्याच्या नामावर 'विश्वास' ठेवावा. 'ऐसे सुख वचनी आहे।विश्वासे अनुभवे पाहे॥' तु. म. 'आम्हासी विश्वास त्याचिया 'नामाचां'।म्हणोनिया वाचा घोष करु॥ तु. म. आणि दुसरा संतावर विश्वास ठेवावा. "आहे भरवंसा तुमचाची मज।संत जाणतसा अंतरीचे गुज॥" निळो. 'संताचिये पायी हा माझा 'विश्वास'।सर्वभावे दास झालो त्यांचा॥' तु. म. याचे कारण संतही अविनाशी तत्वास मिळाले आहेत. अद्याप संतांनी कोणाचा 'विश्वासघात' केलेला नाही. म्हणून त्यांच्यावरच विश्वास ठेवावा. एक दृष्टांत -

एका राज्यामध्ये दुष्काळ पडला. पिण्यासही पाणी मिळेना. राजास मोठे दुःख झाले. लोक तडफडू लागले. एके दिवशी राजा व प्रधानजी एका तळ्यापाशी आले. राजा श्रम झाल्यामुळे तळ्याकाठी एका झाडाखाली झोपला. तळ्यात पाण्याचा थेंब नव्हता. प्रधानजी बसला होता. जवळच्या एका झाडावर दोन पक्षी (नर मादी) बोलत होते. प्रधानजींना पक्षाची भाषा अवगत होती. नर बोलला अग, या राजाच्या मानेचे रक्त जर या तळ्यात शिंपले तर लगेच तळ्यास पाणी लागेल. मादी बोलली, राजा मरुन पाण्याचा काय उपयोग? नर बोलला कापलेल्या मानेस जर समोरच्या झाडाचा पाला घेऊन त्याचा रस लावला तर जखम तावडतोब नाहीशी होईल. प्रधानजीने सर्व बोलणे ऐकले. स्वतःचे बोट कापले. रक्त आले. समोरच्या झाडाच्या पाल्याचा रस लावला. जखम ताबडतोब बरी झाली. प्रधानजी राजाच्या छातीवर बसला. तलवार काढली. राजाने डोळे उघडले व परत झाकले. प्रधानजीने मानेचे रक्त काढले. तळयात शिंपले. समोरच्या झाडाच्या पाल्याचा रस जखमेस लावला मान तावडतोव बरी झाली. तळ्यास तावडतोव पाणी लागले. तळे भरले. सर्व लोक सुखी झाले. राजा प्रधान पण खुश झाले. तथापि प्रधानाची तब्येत कृश होऊ लागली त्यास वाटले राजाच्या छातीवर बसून तलवार काढली तरी राजाने परत पाहून डोळे झाकले. राजा अद्याप कसा विचारत नाही! शेवटी प्रधानजीनेच विचारले. राजा बोलला मला 'विश्वास' आहे. प्रधानजी जे काय करील ते माझ्या आणि राज्याच्या हिताचेच असणार. म्हणून मी त्यावेळी डोळे मिटले व अद्याप आपणास विचारले नाही. 'विश्वास' असा असावा. देवाच्या नामावर व संतावर! संतावर ज्याचा विश्वास नाही त्याचे दोष वाढले म्हणून समजा. संतापाशी

ज्याचा नुरेचि विश्वास। त्याचे जाले दोष बळिवंत.।। तु. म.

(अमेरिकेत एकदा एका भागात पाऊस पडला नाही. चर्चमध्ये फादरला भेटण्यास लोक गेले. फादरने सांगितले संध्याकाळी सहा वाजता सर्वजण या. देवास प्रार्थना करु. पाऊस पडेल. संध्याकाळी सर्व लोक आले. प्रार्थना झाली. पण पाऊस पडला नाही. लोक म्हणाले पाऊस कां पडला नाही? फादर बोलले पाऊस पडेल असा कोणासच 'विश्वास' नाही. कारण आपण कोणीच छत्री आणली नाही.)

★ ★ ★ ★ ★

८१ : अवस्था

यांना दशाही म्हणतात.

ना) प्रत्येकास तीन अवस्था आहेत. वालपण, तरुणपण, म्हातारपण. वालपणात पायात वळ असते. तरुणपणात कमरेत व म्हातारपणात तोंडात वळ असते. बहुतेकांचे वालपण खेळात तरुणपण विषयात व म्हातारपण चिंतेत जाते.

''बालपण गेले नेणता। तारुण्य दशे विषय व्यथा।
वृद्धपणी प्रवर्तली चिंता। मरे मागूता जन्म धरी।। तु. म.
बालस्तावत्क्रीडा सक्तः तरुणस्तावत्तरुणीरक्तः।
वृद्धास्तावच्चिंन्तामग्नः परे ब्रह्मणि कोऽपि न लग्नः।। शंकराचार्य

शंकराचार्य सांगतात बालपण खेळात, तरुणपण स्त्री आसक्तीमध्ये व म्हातारपण चिंतेत गेले तर परब्रह्म, परमात्म्यासी लग्न केव्हा करणार? म्हणून शास्त्रकार सांगतात.

प्रथमे नार्जितं विद्या द्वितीया नार्जितं धनं।
तृतीया नार्जितं पुण्यं चतुर्थे किम् करिस्यती।। सुभा.

जीवाने पहिल्या अवस्थेमध्ये विद्या मिळवावी. दुसऱ्या अवस्थेत धन मिळवावे. तिसऱ्या अवस्थेमध्ये पुण्य मिळवावे. मगच शेवट चांगला होईल. नाहीतर दुःख मिळेल.

रा) प्रत्येकास सहा विकार आहेत. त्यास षड्विकार म्हणतात हे देव व भक्त यांना नाहीत १) अस्ति - गर्भ धारण करतो. २) जायते - जन्मतो, ३) वर्धते - वाढतो, ४) विपरिनमते - तरुण होतो, ५) अपक्षियते - म्हातारा होतो. ६) नश्यती - मरतो

य) वयावरुन सात अवस्था

स्त्री	पुरुष		वय
१) वालिका	शिशु	-	दोन वर्षापर्यंत

२) कुमारी	कुमार	-	पाच वर्षापर्यंत
३) कन्या	पौगण्ड	-	दहा वर्षापर्यंत
४) किशोरी	किशोर	-	पंधरा वर्षापर्यंत
५) युवती	युवा	-	तीस वर्षापर्यंत
६) प्रौढा	प्रौढ	-	पन्नास वर्षापर्यंत
७) वृद्धा	वृद्ध	-	पन्नासपासून मरेपर्यंत

राधेस किशोरी म्हणतात. हनुमंतास कुमार म्हणतात. सनकादिक संत हे कायम पाच वर्षासारखे दिसतात. त्यानाही कुमार म्हणतात. 'तुका म्हणे रुद्रा। अंजनिचिया कुमरा।।'

ग) झोपणे - जागणे यावरुन चार अवस्था आहेत.

१) जागृती - बाहेर जागे, आत झोपलेले. 'जागे बाहेर आत निजले।' तु. म.

२) स्वप्न - बाहेर झोपलेले दिसतात. आत जागे. मनाचा व्यापार चालू असतो. ज्ञानेश्वर महाराज म्हणतात, 'मग पाचभौतिक संचले। जेव्हा शरीर असे निदेले। तेथ मनचि रहाटे एकले। स्वप्नी जेवी।। ज्ञाने. ।।

३) सुषुप्ति - या अवस्थेमध्ये मनाचे व्यापार वंद असतात. जीव सुखरुप होतो ही दशा अशी आहे. बाहेरही झोपलेला आतही झोपलेला.

४) तुर्या - ही संताची अवस्था आहे. बाहेरही जागे, आतसुद्धा जागे.

मेले जीत असो निजोनिया जागे। जो जो जे जे मागे ते ते देऊ।। तु. म.

या चार प्रकारात वीस अवस्था आहेत. या अवस्था सांगण्याचे कारण शरीराच्या अवस्थेमध्ये जसा बदल होतो तसा अंतःकरणात बदल झाला पाहिजे. दशरथ राजाच्या कानाजवळचा एक केस पांढरा झाल्यावरोवर रामास राज्यावर बसविण्याचा विचार केला. आता लोक पांढरे केस काळे करुन चिरतरुण दिसण्याचा प्रयत्न करतात. पण हे किती दिवस? परमार्थ लहानपणापासून करायला हवा. तसे नाही जमले तरी शेवटचे आयुष्य तरी परमार्थात जायला हवे. अवस्थेप्रमाणे विचार बदलावेत म्हणून ही कोटी.

★ ★ ★ ★ ★

८२ : विचार

मानव प्राणी विचार प्रधान आहे. यामध्ये तीन प्रकार पडतात. १) काही गोष्टीचा विचार करु नये. २) काही गोष्टीचा थोडा विचार करावा. ३) काही गोष्टीचा सतत विचार करावा.

१) काही माणसे नको तो विचार करतात. एक सेवानिवृत्त म्हातारा माडीवर वसून खालून जाणाऱ्या गोल शिंगाच्या म्हैसीकडे रोज पहात असे व विचार करत असे. या म्हैसीच्या शिंगावर

मी उडी मारल्यास काय होईल? सहा महिने विचार झाला. वृद्धाने विचार केला आपण आता आचारच करु. एक दिवस माडीवरुन बरोबर म्हैसीच्या शिंगावर उडी मारली. म्हैसीने म्हाताऱ्यास मोठ्या गटारात ढकलला. म्हाताऱ्याचा एक पाय मोडला. डोके फुटले. अंगास इजा झाली. पण वाचला. लोकांनी विचारले आजोबा हे तुम्ही विचार करुन करावयास हवे होते. म्हातारा बोलला सहा महिने हाच विचार करत होतो. अशा विचाराचा काय फायदा?

विचार करिता वाया जाय वेळ। लटिके ते मूळ फजितीचे॥ तु. म.

२) संसारात काही गोष्टीचा विचार करणे आवश्यक आहे. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, आरोग्य, संस्कार याचा विचार करणे योग्य आहे. थोडे वेगळया भाषेत १) संगती, २) संपत्ती, ३) संतती, ४) प्रकृति.

१) आपली प्रगति कोणाच्या संगतीने होईल याचा विचार करावा. कारण 'संग तसा रंग''. २) आपली संपत्ती किती आहे, खर्च कसा करावा. संपत्ती मिळविण्यास किती वेळ द्यावा. हा पण विचार हवा, ३) संतती• आपणास किती मुले हवीत. त्यांचे शिक्षण, आरोग्य कसं व्यवस्थित राहील. त्यांच्यावर संस्कार कसे होतील. याचा सुद्धा विचार हवा. ४) प्रकृति म्हणजे शरीर कसे निरोगी राहील, आपण काय खावयास हवे. किती व्यायाम हवा. कोणते व्यसन शरीरास मारक आहे. कारण संसार व परमार्थ दोन्ही गोष्टी शरीरावर अवलंबून आहेत. ''शरिरमाध्यं खलु धर्मसाधनम्'' म्हणून याचा विचार आवश्यक आहे. पण कमी वेळात!

३) काही गोष्टीचा विचार सतत करावा - क्षणोक्षणी हाचि करावा विचार। तरावया पार भवसिंधु॥ तु. म. यामध्ये एक कोटी १) एका वेळेचा विचार करतो. पशु २) एका जन्माचा जो विचार करतो तो चार्वाक. ''यावत जीवेत सुखं जीवेत ऋणं कृत्वा घृतं पिवेत। भस्मीभूतस्य देहस्य पुनरागमनं कुतः॥'' जोपर्यंत देह आहे तोपर्यंत ऋण काढून सण करा, मजा करा. देह गेल्यानंतर उपभोग मिळणार नाही. ३) अनेक जन्माचा जो विचार करतो तो साधक. ४) कायमचा विचार करतो तो सिद्ध म्हणावा. कोणता विचार करावा? शास्त्र सांगते - ''कोहं कथमिदं जातं को वै कर्तास्य विद्यते। उपादानं किमस्तीह विचारः सोयमीदृशः। मी कोण आहे. माझा जन्म कसा झाला. मला पुढे कुठे जायचे आहे. या जगाचे निमित्त, उपादान कारण कोण आहे. असा तात्विक विचार त्यास 'विचार' म्हणतात. 'आहे मी कोण हा करावा 'विचार'। म्हणे ज्ञानेश्वर निवृत्तीचा॥ विचारावाचून। न पवे समाधान॥' तु. म. या विचाराकरिता अनेक ग्रंथाची निर्मिती झाली आहे. उदा. विचार सागर, विवेक चुडामणी वगैरे, गीता, ज्ञानेश्वरी विचार प्रधान ग्रंथ आहेत. 'आधीच विवेकाची गोठी। वरी प्रतिपादी श्रीकृष्ण जगजेठी। भक्तराज किरीटी। परिसत असे॥ ज्ञाने. विचारी माणसास समाजात मान आहे. बोलून विचारात पडण्यापेक्षा विचार करुन बोलणे फायद्याचे ठरते. एक दृष्टांत - विचार बिघडला की उच्चार बिघडतो. उच्चार विघडला की आचार विघडतो. रामायणामध्ये, मारीच मामा सोनेरी हरिण होऊन येतो. सीतेला हरणांच्या कातडीचा ब्लाऊजकरिता मोह होतो. सीता रामाकडे हट्ट धरते. बालहट्ट, स्त्री हट्ट, राजहट्ट, योगीहट्ट यानुसार

राम हरणाच्या मागे धावतात. लक्ष्मणास सूचना देतात. पर्णकुटी सोडू नकोस. पुढे रामायण घडायचे असते. न निर्मितः केन न दृष्टो पूर्वे न श्रुयते हेममय कुरंगः। तथापि तृष्णा रघुनंदनस्य, विनाशकाले विपरित बुद्धीः॥ रामा. सोनेरी हरण ब्रह्मदेवानी निर्माण केले नाही. कुठल्या ग्रंथात याचे वर्णन नव्हते. कोणी पाहिले नसताना सीतेस, रामास मोह झाला कारण विनाशकाल जवळ आला होता म्हणून डोके विघडले. ''रामाने विचार केला सीतेस सोन्याचा मोह झाला आहे. हिला सोन्याच्या लंकेतच पाठवू.'' राम हरणामागून गेले. हरणास मारले. मात्र हरिण (मारिच मामा) ओरडले 'लक्ष्मणा धाव' सीता व्याकुळ झाली. माझा नवरा संकटात आहे. भावोजी धावा. लक्ष्मण बोलले मला दादाची आंज्ञा आहे पर्णकुटी सोडू नकोस. शिवाय ज्याच्या नावाने संकटे जातात. त्याच्यावर संकट येईलच कसे? तयाच्या चिंतने निरसेल संकट। तराल दुर्घट भवसिंधू॥ तु. म. सीतेचा कुविचार झाला व बोलली मला समजले ''आपण कां जात नाही.'' उच्चार विघडला. लक्ष्मण विचार करताहेत ज्या वहिनींच्या साडेतेरा वर्षे तोंडाकडे पाहिले नाही. फक्त पायाचे दर्शन घेतले. तिच्याकडून ही अपेक्षा? ''नाहं जानामि केयुरे नाहं जानामि कुंडले। नुपूरे त्वभिजानामि नित्यं पादाभिवंदनात॥ रामा. खाली मान घालून लक्ष्मण निघाले, जाताना बोलले वहिनी मी निघालो पण मी ही लक्ष्मणरेषा मारतो आहे. तिच्या बाहेर पडू नका. लक्ष्मण गेल्यानंतर लपलेला हा कुत्रा (रावण) संन्यास वेशामध्ये भिक्षा मागू लागला. भिक्षा देण्याकरीता सीतेने लक्ष्मण रेषा ओलांडली. अर्थात आचार बिघडला. म्हणून विचारास महत्व आहे. आम्हास विचार शक्ति नाही. सार काय असार काय? तुकाराम महाराज सांगतात आम्ही विचार केला. तुम्हास सांगतो. सारासार 'विचार' करा उठाउठी। नाम धरा कंठी विठोबाचे॥ सतत नामस्मरण करा यामुळे हा भवसागर पार होईल. 'संत एकांति बैसले। सर्वहि सिद्धांत शोधीले। ज्ञानदृष्टी अवलोकिले। सारांश काढीले निवडोनी॥ ते एक श्रीहरीचे नाम॥' निळो. तात्पर्य जास्त विचार करु नका. सदाचारी रहा व सतत नामाचा उच्चार करा.

विचार

स्नातं तेन समस्ततिर्थ सलिले सर्वापि दत्ताऽवनिः।
यज्ञानांच सहस्त्रमिष्टमाखिला देवाश्च संपूजिता।
संसाराच्य समुद्धृताः स्वपितरस्त्रैलोक्य पूज्येऽप्यसो।
यस्य ब्रह्म विचारेन क्षणमपि स्थैर्य मनः प्राप्नुयात॥ सुभा.

अर्थ - त्याने सर्व तीर्थात स्नान केले. सर्व पृथ्वी दान दिली. योग्य हजारो यज्ञ केले. सर्व देवांची पूजा केली. संसार सागरातून सर्व पितरांचा उद्धार केला व त्रैलोक्यास पूज्य झाला (कोण?) ज्याने ब्रह्म विचारामध्ये एक क्षण मन स्थिर केले तो.

एवढे ब्रह्म विचारास महत्व आहे.

★ ★ ★ ★ ★

८३ : श्लेष

भाषेची शोभा अलंकारामुळे वाढते. मराठी संतवाङ्मयात वऱ्याच ठिकाणी श्लेष अलंकार आला आहे. श्लेष म्हणजे एका शब्दाचे अनेक अर्थ या कोटीमध्ये संत शब्दावरोवर काही मराठी काव्य देत आहे ज्यात श्लेष अलंकार आहे. एक शब्द दोन अर्थ

१) चालीले न 'वाटे'। गाऊनिया जाता 'वाटे' ॥ तु. म.
२) वाटे - समजून येत नाही २) वाटे - वाट, मार्ग
वारी वो वारी। देई गा मल्हारी ॥ नाथ.
१) वारी - येरझार, जाणे येणे, २) वारी - निवारी - निवारण कर.
३) निज ध्यानी नीज पां रे लक्ष लागू दे डोळा ॥ ज्ञान.
१) निज - स्वस्वरुप, २) नीज - झोप घे.
४) मुगुटमणी संताचा। हर हर तुकया म्हणो नये वाणी।
जड नेले वैकुंठा। विठ्ठल विठ्ठल म्हणोनिया वाणी ॥
वाणी - जातीय वाचक शब्द, वाणी - वाचा बोल.

एक शब्द दोन, तीन, चार अर्थ

संतवाङ्मयात बऱ्याच ठिकाणी द्विरुक्ति, तिरुक्ति, चौरुक्ति आली आहे. उदा. विठ्ठल विठ्ठल मंत्र सोपा ॥ तु. म. गोविंद गोविंद। मना लागलीया छंद - या ठिकाणी एक विठ्ठल किंवा गोविंद नामाकरिता दुसरा गोविंद किंवा विठ्ठल शब्द रुपाकरिता !

हरि हरि तुम्ही म्हणा रे सकळ। तु. म. अथवा

हरि मुखे म्हणा हरि मुखे म्हणा ॥ ज्ञान.

आता तिरुक्तिची काही उदाहरणे

सत्य साच खरे। नाम विठोबाचे बरे ॥ तु. म.

सत्य तू सत्य तू सत्य तू विठ्ठला। कां गा हा दाविला जगदाकार ॥ तु. म.

तीन अर्थ - देव सर्व काळात, सर्व देशात, सर्व-वस्तुत सत्य म्हणून तिरुक्ति किंवा जागृती स्वप्न, सुषुप्ती मध्ये सत्य, बरेच अर्थ निर्माण होतात. देव सोयरा देव सोयरा। देव सोयरा दीनाचा ॥ तु. म. सोयरा - सोय करतो तो. योगाची सोय, क्षेमाची सोय, जन्ममरण चिंतेची सोय

त्याचा भार वाहे माथां। करी "योग क्षेम चिंता" ॥ तु. म.

पुढती पुढती पुढती। इया ग्रंथ पुण्य संपत्ति ॥ ज्ञाने.

१) श्रवण, मनन, निदिध्यास

२) वालपणात, तरुणपणात, म्हातारपणात.
३) मने काया वाचा असे अनेक अर्थ निष्पन्न होतात. पुढती शब्दाचे

सार सार सार विठोवा नाम तुझे सार ॥ ज्ञान. याची फोड 'सार' कोटीत केली आहे. ही चौरुक्ति आहे.

कनकाणि कान्ता द्वय 'कातराया'। केल्या विधीने नर 'कातराया'।
जो सापडेना नर ''कातराया''। तो योग्य जाणा नर ''कातराया'' ॥

अर्थ - कनक व कांता या दोन कात्र्या ब्रह्मदेवाने नरास कातरण्यास केल्या. जो या दोन कातऱ्यामध्ये सापडत नाही. तोच नरकातून तरुन जाण्यास योग्य.

तीर्थासी गेला कधी 'पावलानं'। हरि तयासी कधी 'पावलानं'।
गाठी तयाच्या कधी 'पावलानं'। कान्ता तयासी हानी पावलानं।

अर्थ - पावलानं या शब्दाचे चार अर्थ तीर्थास कधी 'पायी' गेला नाही. हरि त्यास कधी 'प्रसन्न' झाला नाही. अशाच्या खिशात कधी 'पावली' मिळणार नाही. पावली नसल्यामुळे त्यास वायको 'चपलाने' मारते.

चंद्रासी संतोष एकादशीत। अग्निशी संतोष एकादशीत।
शंभुसी संतोष एकादशीत। विष्णूशी संतोष एकादशीत ॥

अर्थ - एकादशीत शब्दाचे चार अर्थ. चंद्रास पूर्वीच्या स्त्रिया लुगड्याची एक दशी अर्पण करायच्या. चंद्र खूप ! अग्नित एकाद शीत टाकल्यास अग्नि संतुष्ट होतो. अकरा रुद्र असल्यामुळे एकादशी म्हणजे अकरा अंकात शंभू संतोप पावतो. एकादशी हे विष्णूचे आवडते व्रत असल्यामुळे, हे व्रत जो करतो त्याच्यावर विष्णू प्रसन्न होतात.

कीर्तनास नर तुम्ही हो जागा। कीर्तनास नर तुम्ही हो जागा।
कीर्तनास नर तुम्ही हो जागा। कीर्तनास नर तुम्ही हो जागा ॥

अर्थ - एकच वाक्य चार अर्थ. अ) कीर्तनाकरिता तत्पर रहा, ब) घरी वसू नका, कीर्तनास जा, क) कीर्तनात झोपू नका, जागे रहा. ड) कीर्तनास जा आणि देवाचे नाम गा, म्हणजे नामस्मरण करा.

असे अनेक शब्द किंवा वाक्ये मिळतील. वाङ्मयाची कल्पना येण्याकरिता श्लेष अलंकाराचे काही प्रकार (कोटी) दिले आहेत.

★ ★ ★ ★ ★

८४ : आनंद

जीव हा जन्मभर आनंदाच्या शोधात असतो. कारण तो आनंदकंदाचा अंश आहे.

महायोगपीठे तटे भिमरथ्या, वरं पुंडरीकाय दातुं मुनीन्द्रैः।
समागत्य तिष्ठंतमानंदकंदं, परब्रह्मलिंगं भजे पांडुरंगम्॥ शंकराचार्य

शास्त्रात आनंदाची कोटी सांगितली आहे. एकापेक्षा एक उच्च अशी.

१) मानुषानंद - कोणतेही दुःख नसणारा, निरोगी, तरुण, शिकलेला सार्वभौम राजास जो आनंद होतो त्यास मानुपानंद म्हणतात.
२) मानुषानंदापेक्षा १०० पट आनंद मनुष्यगंधर्वास होतो.
३) मनुष्यगंधर्वापेक्षा १०० पट आनंद देवगंधर्वास होतो.
४) देवगंधर्वापेक्षा १०० पट आनंद पितरास होतो.
५) पितरापेक्षा १०० पट आनंद अजानदेवास होतो.
६) अजानदेवापेक्षा १०० पट आनंद कर्मदेवास होतो.
७) कर्मदेवापेक्षा १०० पट आनंद मुख्यदेवास होतो. (अष्टवसू, अकरा रुद्र, वारा आदित्य)
८) मुख्यदेवापेक्षा १०० पट आनंद इंद्रास होतो.
९) इंद्रापेक्षा १०० पट आनंद बृहस्पतीस होतो.
१०) बृहस्पतीपेक्षा १०० पट आनंद प्रजापतीस होतो.
११) प्रजापतीपेक्षा १०० पट आनंद ब्रह्मदेवास होतो.

ब्रह्मदेवापर्यंत मायेचे आवरण आहे. म्हणजे हा संसारी आनंद झाला. ब्रह्मदेवापेक्षा हजार पट आनंद योग्यास होतो आणि योग्यापेक्षा अनंतपट आनंद भक्तास होतो. यालाच प्रेमानंद म्हणतात. आनंदाचे तीन प्रकार १) आनंद, २) ब्रह्मानंद, ३) प्रेमानंद

दृष्टांत - आनंद झाड, ब्रह्मानंद झाडास फळ येणे, प्रेमानंद फळ परिपक्व (कल्पना येण्याकरिता) संत हे प्रेमानंदात निमग्न असतात.

आनंदाच्या डोही आनंद तरंग। आनंदचि अंग आनंदाचे॥ तु. म.

आनंदाच्या कोटी। आम्ही साठविल्या पोटी॥
प्रेम चालिला प्रवाहो। नाम ओघ लवलाहो॥ तु. म.

नित्यानंदापुढे आनंद तो कोण। विषयसुख बाई बापुडे ते क्षीण।
जेथे न सरेचि वैकुंठ सदन। शेषशाई त्रिकुट भुवन वो॥ निळो.

श्रीकृष्णाचा सतत संग म्हणजेच प्रेमानंद. सच्चिदानंद पदवी म्हणजे काय? अर्थात ही देवाची पदवी आहे. 'सच्चिदानंद घन। पंढरीये परिपूर्ण। कर ठेऊनि जघन। वाट पाहे भक्तांची।'

ज्ञान. ही पदवी संतानी प्राप्त करुन घेतली. म्हणून संत गुरुच आहेत. मात्र गुरु संत असतीलच असे सांगता येत नाही.

ज्ञानोबाराय यांना ही पदवी आहे.

नमामी सद्गुरु शांतं। सच्चिदानंद विग्रहं।
पूर्ण ब्रह्म परानंदं। इशं आलंदीवल्लभं॥

तुकोबाराय यांचे वर्णन निळोबाराय करतात. 'नमो सद्गुरु तुकया ज्ञानदिपा। नमो सद्गुरु सच्चिदानंद रुपा। नमो सद्गुरु भक्त कल्याणमूर्ती। नमो सद्गुरु भास्करा पूर्ण किर्ती॥' ज्ञानोबाराय, तुकोबाराय हे सच्चिदानंद रुप आहेत. प्रत्येक जीवास ही पदवी प्राप्त करुन घेण्याचा अधिकार आहे.

मनुष्य देहिचेनि ज्ञाने। सच्चिदानंद पदवी घेणे।
एवढा अधिकार नारायणे। कृपावलोकने दिधला॥ नाथ.

आयुष्याचिया साधने। सच्चिदानंद पदवी घेणे॥ तु. म.

सत्‌चिदानंद यात तीन मुद्दे आहेत. १) सत्, २) चिद्, ३) आनंद

परमात्मा अथवा संत हे सत + चिद् + आनंद रुप आहेत

वि) सत् म्हणजे परमात्मा आहे, त्याचे अस्तित्व आहे. अर्थात देव सर्व काळात सर्व देशात व सर्व वस्तूत आहे. जगातील सर्व पदार्थ एकाच काळात, एकाच देशात, एकाच वस्तुपुरते मर्यादित असतात. पण देव व संत या मर्यादा उल्लंघन करतात. देश काळ वस्तू भेद मावळला। आत्मा निर्वाळला विश्वाकार॥ तु. म.

ड) चिद् म्हणजे देव सर्वांना जाणतो. सर्वाचे ज्ञान त्यास आहे. आपण फक्त आपल्या हृदयात काय आहे हे जाणतो पण देव सर्वांच्या हृदयातील जाणतो. दुसऱ्याचे हृदयातील आपणास कळले असते तर ५ मिनिटात जगाचा नाश झाला असता. पण कळत नाही ही देवाची जीवावर कृपा आहे. संतसुद्धा सगळ्यांचे अंतःकरण ओळखतात. चिंचवडचे मोरया गोसावी पूजेस वसले होते. तुकोबाराय त्यांना भेटण्यास आले होते. पण मोरया गोसावी पूजेत असताना शेतातील वांग्याच्या पाण्याचा विचार करीत होते. पूजा आटोपली व मोरया देव बाहेर आले व महाराजांना विचारले आपण केव्हा आला? तुकोबाराय बोलले आपण वांग्याना पाणी देत होता तेव्हा. मोरया देव चकीत झाले. कारण संत अंतःकरण जाणतात.

ल) आनंद - परमात्मा आनंदरुप आहे. 'समागत्य तिष्ठन्तं आनंदकंदं। परब्रह्म लिंग भजे पांडुरंग॥' शंकराचार्य - किंबहुना जगामधील जीवांना जो थोडा आनंद प्राप्त होतो तो देवाचा आहे, कारण तो आनंदसिंधू आहे व जीव विंदू आहेत. या तिघांशिवाय पूर्णता नाही. मुलगा हवा,

तो शिकलेला पाहिजे व त्याने आनंद दिला पाहिजे तरच पूर्ण सुख आहे. एक कमी असून जमणार नाही, अपूर्णता राहिल.

हे लक्षात येण्याकरिता एक दृष्टान्त. एका श्रीमंताची मुलगी सुंदर, सुदृढ व पदवीधर होती. अर्थात सुंदर, शिकलेली व श्रीमंत. तिला वर पहाण्याकरिता वडील एके ठिकाणी गेले. मुलगा श्रीमंत होता व पदवीधर होता. पण चौकशीअंती समजले की यास दोन हृदयविकाराचे झटके येऊन गेले आहेत. वडील दुसऱ्या ठिकाणी गेले. मुलगा श्रीमंत व सुदृढ होता. पण डि. एच. ए. होता. (डाव्या हाताचा अंगठा) शिकलेली मुलगी यास कशी देणार? तिसऱ्या ठिकाणी गेले, मुलगा शिकलेला सुंदर व सुदृढ होता, पण सेवा-नियोजनमध्ये नांव नोंदवूनसुद्धा १० वर्षे नोकरी नव्हती. अर्थात दरिद्री. मात्र चौथ्या ठिकाणी मुलगा द्विपदवीधर, श्रीमंत, सुंदर व सुदृढ होता. लग्न जमले. तात्पर्य -

१) सुंदर, सुदृढ - अस्तित्वाची खात्री - सत्

२) शिकलेला - जाणकार, ज्ञानी - चिद्

३) श्रीमंत - उपभोगाच्या वस्तू - आनंद

ही सच्चिदानंद पदवी आहे.

★ ★ ★ ★ ★

८५ : खरे-खोटे

याचे चार प्रकार पडतात. यामुळे खऱ्या खोट्याचा निवाडा होतो.

१) खोट्यातील खोटे - सर्व शास्त्रांनी संसार खोटा सांगितला आहे.

संसार हा 'खोटा' शास्त्रे निवडीला। पाहिजे साक्षीला सद्गुरु॥ नाम.

एका जनार्दनी हा संसार 'खोटा'। हरिस्मरण करा मग कधी नये तोटा॥ नाथ.

ज्यात कांही सार आहे असा संभ्रम होणे यास संसार म्हणतात. 'सीण झाला मज 'संसार संभ्रमे'। शितळ या नामे झाली काया॥' तु. म.

माऊली संसाराची व्याख्या करते - 'उपजणे आणि निमणे। हे जे कां साचची मानणे। तो जीव लोकु म्हणे। संसार हन॥' ज्ञाने. - जन्म-मरण खरे मानणे हा संसार. संसार खोटा म्हणजे बदलणारा आहे.

मृगजळ दिसे साचपणा ऐसे। खोटीयाचे पिसे उर फोडी। तु. म.

फुटोनि पडे तंव। मृग वाढवी हांव। परी न म्हणे ते वाव। रोहिणीची॥ ज्ञाने.

संसाराचे स्वरुप म्हणजे मृगजळासारखे भासमान आहे. या खोट्या संसारात नाटक,

चित्रपट, तमाशा वगैरे आणखी खोटे. एखाद्या नटास विचारले आपण या चित्रपटात नटीवर काय 'प्रेम' केले आहे. तो सांगेल प्रत्येक चित्रपटात असेच प्रत्येक नटीवरोवर प्रेमाचे नाटक करावे लागते. पण ते सर्व खोटे असते, पैशाकरिता हे सर्व 'प्रेम' करावे लागते.

दृष्टान्त - एकदा निद्रेत जनक राजास स्वप्न पडले. तो स्वप्नात भिकारी झाला व भिक मागू लागला. स्वप्नात रडू लागला. अचानक जाग आली. राज्यातील सर्व विद्वानांना बोलाविले व विचारले, 'हे खरे कां ते खरे'? कोणास उत्तर देता आले नाही. सर्वांना तुरुंगात टाकले. त्यावेळी कहोड नांवाचे ब्राह्मण होते. तेही तुरुंगात गेले. त्यांचा मुलगा अष्टवक्र. आईच्या पोटात असताना बाबांची चूक काढली म्हणून कहोडांनी शाप दिला, तू आठ ठिकाणी वाकडा होशील, तो अष्टवक्र! आठ वर्षात सर्व अभ्यास पूर्ण झाला. वडिलांना सोडविण्याकरिता जनकपुरीत आला. जनकाच्या दरबारात गेल्यावरोवर सर्व हसू लागले. सर्वांना शांत होऊ दिले व अष्टवक्र हसू लागला. जनक संतापले, विचारले, कां हसतोस? अष्टवक्राने विचारले, आपण कां हसलात? जनक म्हणाले, तुझे विद्रूप रूप पाहून सर्व हसले. अष्टवक्र म्हणाला, मला वाटले होते, जनकाची सभा म्हणजे विद्वानांची सभा असावी. पण इथे प्रत्यय आला की ही 'चांभाराची' सभा वाटते. राजा भडकला. विचारले, असे कां म्हणतोस? अष्टवक्र म्हणाला, लोकांनी माझ्या चामड्याची, हाडांची परीक्षा केली, म्हणून चांभार. माझ्या ज्ञानाचा परिक्षक कोणी दिसत नाही. जनक चपापले. येण्याचे कारण विचारले. अष्टवक्र म्हणाला, आपल्या प्रश्नांचे उत्तर देऊन वडिलांना सोडविण्याकरिता आलो आहे. सभेत प्रश्न विचारला, हे खरे कां ते खरे? लगेच उत्तर मिळाले, हेही खोटे व तेही खोटे. राजांनी साष्टांग दंडवत घातला, अष्टवक्राला गुरु केले. माऊलीच्या भाषेत, 'तैसी दशेचि वाट न पहाता। वयसेचिया गांवा न येता। बाळपणीच सर्वज्ञता। वरी तयाते॥ ज्ञाने.

लोकांनी विचारले हे उत्तर बरोबर कसे? राजाने सांगितले मी स्वप्नात भिकारी झालो होतो. प्रश्न होता, मी राजा हे खरे की स्वप्नातील भिकारी खरा? यांनी सांगितले दोन्हीही खोटे. 'जे जे देखणे सकळ। ते हे स्वप्निचे मृगजळ। म्हणोनि चिंती चरण कमळ। रखुमादेवीवराचे॥ ज्ञान.

स्वप्न खोटे मग स्वप्नातील मृगजळ खरे कसे असेल? (सत्ता तीन आहेत. १) स्वप्नातील - प्रतिभासिक सत्ता, २) व्यवहारातील - व्यावहारिक सत्ता, ३) देवाची - पारमार्थिक सत्ता.)

२) खोट्यातील खरे - या खोट्या संसारात खरा आहे प्रत्येकाचा जीव'. जीव खरा कां? याचे कारण जीव मरत नाही. अविनाशी आहे. कारण हा देवाचा अंश आहे.

१) ईश्वर अंश जीव अविनाशी। चेतन अमल सहज सुखराशी॥ तुलशी

२) ममैवांशो जीव लोके॥ गीता

३) जीव अवघे देव। परी हा नागवे संदेह॥ तु. म.

४) एक हरि आत्मा जीव शिव सम। वाया तू दुर्गमी न घाली मन॥ ज्ञान.

५) जीव निज नित्य निर्मळ। अज अव्यय अचळ। अच्छेद अभेद्य अमळ। अचंचल निजांगे॥ भा. नाथ.

अशी शेकडो प्रमाणं मिळतील. जीव देवाचा अंश पण मायेमुळे जीव दशा भोगतो आहे. जन्ममरण दुःख भोगण्याचे कारण माया! संत मात्र माया तरले व देव झाले. संताचे लक्ष अविनाशी जीवावर आहे.

'या उपाधीमाजी गुप्त। जे चैतन्य असे सर्वगत। ते तत्वज्ञ संत। स्विकारिती॥' ज्ञाने.

माऊलीनी बरेच दृष्टांत दिले आहे. दुधात तूप, हिणकसात सोने, धान्यात कण, राजहंस फक्त दूध घेतो, तद्वत देहापेक्षा जीवास महत्व आहे. कारण जीव मरत नाही. जीव दिसत नाही. केव्हा येतो, केव्हा जातो, हे कळत नाही. जीवामुळे देहास महत्व नाहीपेक्षा ओली माती. जीव गेल्यावर ज्या देहाबरोबर आयुष्यभर संसार केला ती बायकोपण घाबरते.

यावज्जीवो निवसति देहे कुशलं तावत्पृच्छति गेहे।
गतवती वायौ देहापाये, भार्या बिभत्ति तस्मिन्काये॥ शंकराचार्य

(दृष्टांत मेढरांच्या कळपातील सिंहाचा छावा)

म्हणून या संसार पसाऱ्यात खोट्यातील खरा जीव ''अमर आहां अमर आहां। खरे की पहा खोटे हे॥'' तु. म.

३) खऱ्यातील खोटे - माया
ब्रह्म माया दोन्हीही अनादी आहेत.

ऐसी इये निरुपाधिके। जगाची जिये जनके।
तिये वंदिली मिया मूळिके। देवो देवी॥ ज्ञान. अमृतानुभव

सीय राममय सब जग जानी। करऊ प्रणाम जोरी जुग पाणी॥ तुलशी.

सर्व जग म्हणजे सीता रामच आहे. ब्रह्म मायामय, शिव शक्तिरुप 'तैसी जाण जवटे। दोन्ही इथे एकवटे। प्रकृति पुरुष प्रगटे। अनादिसिद्ध॥' ज्ञाने. फरक एवढाच ब्रह्म अनादी अनंत माया अनादी सान्त. जसे दागिने मिथ्या, सोने सत्य. तरंग मिथ्या, पाणी सत्य. मात्र पाणी तरंग अभिन्नत्व व सोने दागिने भिन्न नाही. हा अनुभव संताचा आहे. ऐसा ज्याचा अनुभव। विश्व देव 'सत्यत्वे'॥ तु. म. नामरुप संबंध। जाती क्रियाभेद। हा आकाराशीच प्रवाद। वस्तूशी नाही॥ ज्ञाने. वस्तू ब्रह्म. नाम, रुप, जाती, क्रिया वगैरे माया. ज्यामध्ये बदल होतो. म्हणून खऱ्यातील खोटे माया.

४) खऱ्यातील खरे - नाम

ब्रह्म खरे आहे. ब्रह्माचे तीन प्रकार आहेत. १) ब्रह्म, २) महद्ब्रह्म, ३) परब्रह्म. ब्रह्म सत्य आहे. 'ब्रह्म सत्यं जगन्मीथ्या॥' शंकराचार्य. पण ब्रह्म आकाराला आले म्हणजे योग मायेचा आश्रय घ्यावा लागतो. देव सगुण आहे. निर्गुण आहे. आकारी आहे. निराकारी आहे. वगैरे महाराज म्हणतात.

सगुण निर्गुण तुज म्हणे वेद। तुका म्हणे भेद नाही नामी॥

म्हणून खऱ्यातील खरे नामच

सत्य साच खरे। नाम विटोबाचे बरे॥ तु. म.

तात्पर्य - १) खोट्यातील खोटे - संसार - चित्रपट, २) खोट्यातील खरे - संसार - जीव, ३) खऱ्यातील खोटे - ब्रह्म - माया, ४) खऱ्यातील खरे - देव - नाम

नामास माऊली परब्रह्म म्हणतात.

नामजप यज्ञ तो परम। बाधू न शके स्नानादिकर्म।
नामे पावन धर्माधर्म। नाम 'परब्रह्म' वेदार्थे॥ ज्ञाने.

★ ★ ★ ★ ★

८६ : अर्थ

अर्थ म्हणजे पैसा, संपत्ती. सर्व माणसे याकरिता रात्रंदिवस धडपडत आहेत. कारण हे संसाराचे मुख्य साधन आहे. समाजात प्रतिष्ठा या अर्थामुळे प्राप्त होते. ''धनवंता लागी। सर्व मान्यता असे जगी॥ तु. म. याचे चार प्रकार पडतात.

१) अर्थ, २) अनर्थ, ३) स्वार्थ, ४) परमार्थ

१) अर्थ - पैसा हा प्रत्येकाच्या प्रारब्धावर व प्रयत्नांवर अवलंबून आहे. तुकोबाराय म्हणतात ''प्रारब्धेचि जोडे धन। प्रारब्धेचि वाढे मान॥'' पैसा मिळतो नशिबाने पण खर्च कसा करायचा हे तुमच्या हातात आहे. कारण अर्थाचा अनर्थ होऊ शकतो. तसे अर्थाचे १५ अनर्थ भागवतात सांगितले आहे.

२) अनर्थ -

स्तेयं हिंसाऽनृतं दंभः काम क्रोध स्मयोमदः।
भेदो वैरमविश्वासः संस्पर्धा व्यसनानि च॥

१) चोरीची भिती, २) हिंसा होण्याची शक्यता, ३) खोटे बोलणे (पैसेवाल्यास खरे बोलून जमणार नाही.) ४) दांभिकपणा, ५) काम, ६) क्रोध, ७) अभिमान, ८) मद, ९) भेद, १०) वैर, ११) अविश्वास १२) स्पर्धा, १३) जुगार, १४) दारु, १५) वेश्यागमन हे अर्थाचे १५ अनर्थ आहेत. शिवाय

अर्थानामर्जने दुःखं संचितानांच रक्षणे।
नाशे दुःखं व्यये दुःखं धिगर्थान क्लेशसंश्रयान॥ सुभा.

अर्थ - पैसा मिळविण्याकरिता दुःख, साठविण्याकरिता, रक्षणाकरीता ताप, खर्च झाले तरी दुःख, नाश झाले तरी दुःख अशा क्लेशकारी अर्थाचा धिक्कार असो. पैसा मिळवितानां पाप होण्याची शक्यता आहे. मात्र पैसा इथेच राहील. पाप आपल्याबरोबर मरणानंतर सुद्धा येईल. हे सर्व अनर्थ आहेत.

३) स्वार्थ - योग्य मार्गाने पैसा मिळवावा.

कथा विक्रय न करावा। दान परिग्रहो न घ्यावा।
स्वकष्टार्जित मेळवावा। तोचि ग्रास आपुला॥ नाथ.

संसारीक गरजा असतील त्याकरीता खर्च करावा. उदा. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण, संस्कार, आरोग्य या करिता पैसा खर्च व्हावा. व्यसनाकरिता नको. यापेक्षा आपल्या उत्पन्नाचा काही भाग देव, धर्म, देश, साधू याकरिता ठेवावा. (किमान १०%) यासच परमार्थ म्हणता येईल.

४) परमार्थ - तुकोबाराय सांगतात. जोडोनिया धन उत्तम व्यवहारे। उदास विचारे वेच करी॥ कशाकरिता खर्च करावा?

जोडोनि धन न घाली माती। ब्रह्मवृंद पूजन यती।
सत्य आचरण दया भूती। करी सांगाती चुको नको॥ तु. म.

प्रारब्धाने पैसा मिळाल्यास घरी पंच यज्ञ करावे. अन्नदान करावे, मंदिरास देणगी द्यावी. भक्तास सहाय्य करावे. नाथ महाराज सांगतात दुर्बल भगवतभक्तास जो धनवंत सहाय्य करतो. त्याचा उद्धार भक्ता अगोदर देवास करावा लागतो.

'दुर्बळ जो कां भगवद्भक्त। त्यासी संरक्षी जो धनवंत।
येणे तुष्टला भगवंत। त्याते उद्धरीत भक्ताआधी॥ भाग.

अर्थात अर्थामुळे परमार्थ प्राप्त होतो. धनापेक्षा निधन लक्षात असावे. कारण 'धन मिळविले कोटी। सवे नये रे लंगोटी॥' तु. म.

तुका म्हणे धन। भाग्य अशाश्वत जाण॥ पण माणसे धनासाठी अमोलिक प्राण देतात. दुसऱ्याचा पैसा हडप करु नये. कारण त्याची परतफेड करावीच लागते. ऋण वैर हत्या। हे तो न सुटे नेदिता॥ तु. म. तुकाराम महाराज आपल्या शिष्यमंडळीवरोबर चालले असताना वाटेत एक कुत्रा मरुन पडला होता व त्यास किडे खात होते. महाराजांना शिष्यानी विचारले हा काय प्रकार आहे. तुकोबाराय बोलले. ह्या कुत्र्याने माणूस असताना बऱ्याच जणांचे पैसे खाल्ले. आता तेच लोक किडे होऊन त्या कुत्र्यास खात आहेत. कर्म कोणास सुटत नाही. एका माणसाने एकाचे एका जन्मी एक लाख रुपये वुडविले दुसऱ्या जन्मी ज्याचे पैसे वुडविले होते तो पैसे वुडविणाऱ्याचा मुलगा झाला. जन्मल्यापासून तो मुलगा आजारी पडला ९० हजार रुपये खर्च झाले. मुलगा वारला व तेराव्यास १० हजार रुपये खर्च आला. फिटाफिट झाली. कारण ऋण

कोणास चुकत नाही.'

समाजात पैसे मिळविणे व खर्च करणे याचे चार प्रकार दिसून येतात.

१) उत्तम - नशिवाने पैसा मिळाला तर परमार्थाकरिता खर्च करतात. नाथ महाराज यांना त्यावेळी वार्षिक उत्पन्न १० हजार मिळायचे पण सर्व परमार्थात, उत्सवाकरिता खर्च करीत होते. एकदा सर्व पैसे खर्च झाले व नाथांनी कर्ज काढले ते कर्ज देवानी फेडले.

एकोबाचे ऋण फेडी हृषीकेशी। अंबऋषीचे सोशी गर्भवास॥

असे तुकोबाराय सांगतात. काही संसारात कष्ट करुन मिळवितात व देवाकरिता खर्च करतात. तुकोबाराय गौळणींचे उदाहरण देतात. (वाळक्रिडेमध्ये) 'सायास करुनि मेळविले धन। तेहि कृष्णार्पण केले त्यांनी॥'

२) मध्यम - या प्रकारात परमार्थात मिळवितात व परमार्थात खर्च करतात. डोंगरे महाराज यांनी पंढरपूरला दर्शन मंडपाकरिता लोकांना आव्हान केले व ११ लाख रुपये देणगी दिली. अर्थात दर्शन मंडपाच्या बांधकामाकरिता. काही मंदिराकरिता, सप्ताहाकरिता, स्वमेहनतीने पैसे जमा करतात व त्याकरिताच खर्च करतात.

३) अधम - संसारात कष्ट करुन कमवितात व संसाराकरिताच खर्च करतात. यांच्या जीवनांत देव, धर्म, साधू, मंदिर याचे नाव नसते. मात्र घरात सर्व आधुनिक साहित्य घेत असतात. संसार चकाचक करतात. हे लोक विलासी जीवन जगतात.

४) अधमाधम - परमार्थात जमा करतात व संसारात खर्च करतात. एका गावात एका माणसाने (जो सत्संगी होता) मंदिराकरिता पैसे जमा केले व इमारत बांधून स्वतःच्या नावावर केली. धर्माच्या नावावर पैसे मिळवून स्वतःकरिता जमिनी घेणे, इमारत बांधणे हा अधमाधम प्रकार आहे. तात्पर्य - अर्थ ही एक शक्ति आहे. यामुळे अनर्थ होऊ शकतो. स्वार्थ साधता येतो. अथवा परमार्थिक लाभ होऊ शकतो. ही शक्ति कशी वापरावी हे मात्र प्रत्येकाच्या हातात आहे. नाथ महाराज सांगतात जो मूर्ति प्रतिष्ठापण करतो. त्यास सार्वभौम राज्य मिळते. जो देवालय बांधतो तो तीन लोकांचा स्वामी होतो. जो पूजा करतो तो ब्रह्मसदन पावतो. या तीनही गोष्टी जो करतो तो देवासारखे ऐश्वर्य प्राप्त करुन घेतो. त्यांच्या शब्दात.

जो मूर्ति प्रतिष्ठा करुनि ठाये। तो सार्वभौम राज्य लाहे।
जो देवालय करी स्वये। तो स्वामी होये तिही लोकी॥
जो करी पूजा विधान। तो पावे ब्रह्मसदन।
हे तिन्ही जो करी आपण। तो मजसमान ऐश्वर्य पावे॥ भागवत.

★ ★ ★ ★ ★

८७ : सूत्र

१) भारतीय नारी लग्नातच मंगळसूत्र धारण करते. सर्व अलंकारात हा अलंकार महत्वाचा. यास सौभाग्य अलंकार म्हणतात. भारतीय संस्कृति सांगते स्त्रियांनी लहानपणी वडिलांच्या आश्रयास, तरुणपणी नवऱ्याच्या आश्रयास व म्हातारपणी मुलांच्या आश्रयाने रहावे. स्त्रीने एकटे राहू नये. ''पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने। रक्षंति स्थविरे पुत्रा न स्त्री स्वातंत्र्यं अर्हति॥ मनु. तात्पर्य लग्न झाल्यानंतर नवऱ्याच्या सूत्राने चालल्यास स्त्रीचे कल्याण होते. माऊली सांगते.

पतिचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेचि ते॥ ज्ञाने.

२) पूर्वी कळसूत्र बाहुल्यांचा खेळ चालत होता. आता क्वचित दिसतो. या खेळात बाहुल्या नाचताना दिसतात पण सूत्रधार दिसत नाही.

३) चित्रपट पहाताना समोर पडदा दिसतो. चित्रे दिसतात. पण ऑपरेटर दिसत नाही, जो सूत्रधार असतो. तसा जगाचा सूत्रधार परमात्मा आहे. जगाचे चलन वलन दिसते. पण सूत्रधार दिसत नाही. देवच गीतेत म्हणतात मी सूत्रधार आहे.

मत्तः परतरं नान्यत्किंचिंदस्ति धनंजय।
मयि सर्वामिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव॥ गीता ७/७

माऊली भाषांतर करते

सुवर्णाचे मणी केले। ते सोनियाच्या सुती वोविले। तैसे म्या जग धरिले। सबाह्याभ्यंतरी॥ देव सूत्रधार आहे पण कोणत्या माध्यमाने फिरवितो? तर कर्माच्या माध्यमाने सर्व जीवांना फिरवत असतो. ''जया जे कर्मसूत्र। मांडूनि ठेविले स्वतंत्र। तो तेचि गती पात्र। होचि लागे॥ ज्ञाने. तुकोबाराय सांगतात.

प्रारब्धाची गती न कळे विचित्र। हाती आहे सूत्र विठोबाच्या॥ अथवा
एके देही भिन्न दावियेल्या कळा। नाचवी पुतळा सूत्रधारी॥ तु. म.

ऐसा लाघवी हा मायासूत्रधारी। एकला एकटाचि झाला नानाकारी॥ निळो.

एक शंका निर्माण होते. जीव कर्ता की देव कर्ता? याचे उत्तर, दोघेही कर्ते आहेत. कर्म करण्यास जीव स्वतंत्र आहे. पण कर्म देवाच्या सत्तेने होते. उदा. शेतात काय पेरायचे आपल्या हातात. पण पाऊस देवाच्या हातात. दोन गोष्टीशिवाय पिक येत नाही. घरात विजेची उपकरणे आणणे आपल्या हातात. पण 'वीज' मंडळाच्या हातात (पॉवर हाऊस) फक्त उपकरणे उपयोगाची नाहीत. फक्त वीज उपयोगाची नाही. दोनीही हवित. तद्वत कर्मास जीव व देव दोघेही जवाबदार आहेत. मात्र परमात्मा सत्ताधारी आहे त्यामुळे दोषी नाही. जीवासच कर्माप्रमाणेफळ म्हणजे पापपुण्य भोगावे लागते. खालील पाच गोष्टी जशी कर्माचि योजना असेल तशा घडतात.

विवाहोऽर्थश्य मरणमन्न जननमेवच।
कंटे बध्या दृढं सूत्रं यत्रस्थं तत्र नियते॥ सुभा.

१) लग्न, २) पैसा, ३) मरण, ४) अन्न, ५) जन्म हे ज्याचे जिथे असेल तिथे ओढून घेऊन जाते. यांचा एक एक दृष्टांत पाहू.

१) विवाह - रावणाने नारदास विचारले माझा मृत्यू कोणाच्या हातून आहे? नारदानी सांगितले आता ज्याचे लग्न होणार आहे. त्या दशरथाच्या रामाकडून. रावणाने लग्नच उधळून लावले. पण कौशल्या दशरथ एका बेटावर एकत्र आले व त्यांचे लग्न नारदानी लावले. रावणाने त्याला मुलगी झाल्यानंतर ब्रह्मदेवास विचारले हिचा विवाह कोणाबरोबर होईल? ब्रह्मदेवांनी कुंडली पाहिली. समोर झाडूवाला लहान मुलगा होता. सांगितले, या मुलाशी होईल. रावण संतापला व नोकरांना सांगून त्यास पायाचा अंगठा कापून समुद्रात फेकून दिला. तो जिवंत एका बेटावर आला. तिथला राजा वारला होता व हत्ती राजाच्या शोधात माळ घेऊन लोकाबरोबर फिरत होता. हत्तीने या मुलाच्या गळ्यात माळ घातली. लोकांनी त्यास त्या बेटाचा राजा केले. मुलगा वयात आला. इकडे रावणकन्या उपवर झाली. दोघांचे लग्न झाले. रावणाने जावयास बोलाविले. रावण म्हणाला ब्रह्मदेवपण खोटे बोलतो. माझ्या मुलीचे लग्न झाडूवाल्याशी होणार सांगितले होते. पण आपण राजकुमार आहात. जावई बोलला मामा माफ करा मीच तो झाडूवाला. पायाचा कापलेला अंगठा पहिल्यानंतर खात्री पटली. या ब्रह्मदेवाच्या गाठी.

२) पैसा - ज्याच्या नशिबात जिथे जेवढा पैसा असेल तेवढा मिळेल. माझ्या जीवनात घडलेला प्रसंग मला मुलाखतीस मॅनेजरने एक प्रश्न विचारला त्या प्रश्नाच्या उत्तरावर माझी नोकरी अवलंबून होती. प्रश्न होता बारा इंचाची लोखंडी पट्टी विकली तर बारा रुपये मिळतात. पण एक इंचाचे तुकडे केले तर प्रत्येक इंचास दोन रुपये मिळतात. पण तुकडे करण्याचा खर्च प्रत्येक इंचामागे एक रुपया आहे. तर पट्टी कशी विकावी? मी तावडतोब उत्तर दिले (देवाने बुद्धी दिली) तुकडे करुन पट्टी विकली तर एक रुपया फायदा मिळेल. मी पास झालो व आजपर्यंत गोदरेज सोपमध्ये नोकरी करीत आहे. नंतर माझे मलाच आश्चर्य वाटले. पण माझी भाकरी (अर्थ) गोदरेज मध्येच होती म्हणून उत्तर सुचले.

३) ज्याचे मरण जिथे असेल, जेव्हा असेल तिथेच होणार. एकदा गरुडाची आई आजारी पडली. सर्व देव येऊन भेटत होते. मोठ्याची माता. गरुड संध्याकाळी आईस विचारत आज कोण कोण देव येऊन गेले. एकदा यमराज आले व जाताना हसले. संध्याकाळी आईने सांगितले आज यमराज आले होते व जाताना हसले. गरुड घाबरले आईस उचलली व जंगलातील एका झाडाच्या खोडात ठेवली. यमराज दुसऱ्या दिवशी आले. गरुडाने स्वागत केले गरुडाने विचारले आपण काल आला होता. मी आभारी आहे. पण आपण जाताना का हसला? यमराज म्हणाले तुमच्या आईचा मृत्यू या झाडाच्या खोडात आहे. ती अद्याप इथे कशी काय म्हणून हसू आले.

त्याच वेळी गरुडाची आई झाडाच्या खोडात वारली होती.

४) अन्न - एक म्हण आहे "दाने दाने पर लिखा है खानेवालेका नाम।।" प्रत्येक अन्नकणांवर खाणाऱ्याचे नाव असते. वारीत आळंदीस जाताना एक वारकरी चोरुन लाडू खात होता. तसे बरेच वारकरी चोरुन खाद्य पदार्थ खातात. त्यांच्या बायकोची तशी त्यांना ऑर्डर असते. पण त्या वारकऱ्यांस मालकांनी बोलाविले त्या वेळी लाडू तोंडात होता. तो घाबरला व त्यास ठसका लागला व गिळलेला लाडू तोंडातून उडाला. समोर एक कुत्रा बसला होता. त्याने तो कॅच केला व पळाला. याचा अर्थ तो लाडू त्याच्या नशिबात नव्हता. तो कुत्र्याच्या नावावर होता.

५) जन्म - ज्याचा जन्म जेव्हा जिच्या पोटी असेल तसाच होणार. रोहिदास महाराज अगोदरच्या जन्मी उत्तम ब्राह्मण होते. पण मरताना चपलावर लक्ष गेले व वासना राहिली 'एवढी उत्तम चप्पल मी वापरली नाही.' मृत्यू आला. 'जन्म घेणे लागे वासनेच्या संगे।।' नाथ. अथवा 'वासनेचा संग होय अंतकाळी। तरी तपोबळी जन्म धरी।।' तु. म. ते पुढच्या जन्मी चर्मकार झाले. अस म्हणतात त्यांना गत जन्माची स्मृती होती ते आईचे दूध पित नव्हते पण संतांनी समजूत काढली व दूध पिऊ लागले. अर्थात नंतर संत झाले. वासना शिल्लकच राहिली नाही.

अशी ही कर्माची सूत्रे आहेत. समाजात, राजकारणात सूत्रधारास फार महत्व असते. सर्कशीमध्ये कोणता प्राणी रिंगणात आणायचा हे रिंग मास्तर ठरवितो. तसे परमात्मा प्रत्येकास या जगाच्या रिंगणात आणून खेळवितो त्याच्या कर्माप्रमाणे! मात्र महात्मे प्रेमाने परमात्म्यास खेळवितात. गोपिका थोडे लोणी देऊन देवास नाचायला सांगायच्या. देव सर्वांना नाचवितो पण भक्त देवास नाचवितात. तुकोबाराय सांगतात 'प्रेमसूत्र दोरी। नेतो तिकडे जातो हरि।।' जनाबाई म्हणतात आम्ही या चोरास प्रेमदोरीने बांधले व हृदयमंदिरात कायमचा कोंडून ठेवला. धरिला पंढरीचा चोर। गळा बांधुनिया दोर।। हृदय बंदिखाना केला। आत विठ्ठल कोंडिला।। कारण प्रेमसूत्र!

★ ★ ★ ★ ★

८८ : कलि

युगे चार आहेत. १) कृत अथवा सत्य, २) त्रेता, ३) द्वापार, ४) कलि. सत्ययुगात धर्म १००% होता. त्रेतायुगात ७५% , द्वापारयुगात ५०% व कलियुगात २५% धर्म राहिला आहे.

ऐका कलिचे महिमान। असत्याशी रिझले जन।
पापा देती अनुमोदन। करिती हेळण संतांचे।। तुकया बंधू

१) सत्ययुगात ब्राह्मणांना घरी जाऊन दान देत होते.
२) त्रेतायुगात ब्राह्मणांना स्वतःच्या घरी बोलावून दान देऊ लागले.

३) द्वापारयुगात ब्राह्मणांनी मागितल्यानंतर दान देऊ लागले.
४) कलियुगात ब्राह्मणांकडून काम घेऊन दान देऊ लागले.

एका प्रवचनांत मी ऐकले सत्ययुगात सर्वच ब्राह्मण, त्रेतात सर्व क्षत्रिय, द्वापारात सर्व वैश्य व कलित जवळ जवळ सर्व शुद्र आहेत. किंबहुना देवाचे अवतारपण असेच आहेत. म्हणून जातीचा मिथ्या अभिमान वाहू नये. पांडवानी, श्रीकृष्णानी अवतार संपविला व कलियुग सुरु झाले. श्रीकृष्ण एकदा पांडवाघरी आले होते. तसे ते नेहमीच यायचे

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खुणा। द्वारकेचा राणा पांडवा घरी।। ज्ञान.

चार भाऊ बाहेर गेले होते. धर्मराज घरी होते. संध्याकाळी सर्व एकत्र जमले. चौघांनी चार वेगळीवेगळी विचित्र दृश्ये पाहिली होती. ते श्रीकृष्णाना विचारु लागले. भीम म्हणाला देवा आतापर्यंत मी एक सोंडेचा हत्ती पाहिला होता पण आज दोन सोंडेचा हत्ती दिसला. देवा याचा अर्थ काय? श्रीकृष्ण म्हणाले पुढे कलियुग येत आहे. त्याची ही चिन्हे आहेत. कलियुगात बोलूनसुद्धा मी असे बोललोच नाही असे म्हणतील. सही करून ही माझी सहीच नाही असे म्हणतील. अर्जुन म्हणाला देवा एक गाय नुकतीच व्याली. वासरु स्वपायावर उभे राहिले व लगेच गायीस लाथ मारु लागले. याचा अर्थ काय? देव म्हणाले कलियुगात मुले स्वतःच्या पायावर उभी राहिली (कमवू लागली) की आईवडिलांना लाथाडून बायकोस घेऊन वेगळी राहतील. नकुल म्हणाला देवा मी तीन विहीरी पाहिल्या दोन पूर्ण भरलेल्या होत्या. एकीत पाणी कमी होते. मात्र ज्या विहीरीत कमी पाणी तिकडेच लोक पाणी भरण्याकरिता जात होते याचा अर्थ काय? देव म्हणाले याचा अर्थ कलियुगात धर्माच्या कामास श्रीमंत लोक येणार नाहीत. जेवढे गरीब लोक येतील. श्रीमंत पैसा साठविण्याच्या मागे लागतील. गरीब लोक हरिनाम सप्ताह, प्रवचन, कीर्तन करतील (श्रीमंत वस्तीत धार्मिक कार्यक्रम क्वचितच होतात.) सहदेव म्हणाला मला असे दृश्य दिसले. एका डोंगरावरुन मोठा दगड खाली येत होता. तो जर तसाच खाली आला असता तर डोंगर पायथ्याची झोपडपट्टी चक्काचूर झाली असती. पण छोटेसे झाड आडवे आले व पुढचा अनर्थ टळला. याचा अर्थ काय? देव म्हणाले कलियुगात बॉंबस्फोट होतील, जातीय दंगली माजतील. भूकंपाचे धक्के बसतील. पण एखादा अखंड हरिनाम सप्ताह अथवा प्रवचन पंधरवडा लोकांना समाधान देईल. गावात एखादा सदाचारी सज्जन गावास तारु शकेल अथवा एखादी सती तिच्या पुण्याईमुळे गावात शांतता राहिल. हल्ली सज्जनास बावळट समजतात. पण तो तसा नसतो. एका राजकन्येने असा पण लावला होता माझ्या मताप्रमाणे जो वीस पर्यंत मोजून दाखविल त्यालाच वरमाला घालीन. अर्थात त्याच्याशी लग्न करीन. मात्र समाधान केले नाही तर तुरुंगात पाठविले जाईल. बरेच हुशार राजकुमार आले. काही मराठीत, काही इंग्रजीत काही गुजराथीमध्ये काही संस्कृतमध्ये वीस पर्यंत मोजून तुरुंगात गेले. एक लग्न न झालेला वारकरी आला व म्हणाला मला वीसपर्यंत मोजण्याची परवानगी आहे का? सर्वांनी सांगितले परवानगी आहे पण राजकन्या खूश झाली नाही तर तुरुंगात जावे लागेल. वारकरी म्हणाला काही हरकत

नाही. राजकन्येने वारकऱ्यास विचारले एक म्हणजे? जगात एक देव आहे. एको देवाः, दोन? ब्रह्म व माया. तीन? तीन गुण. चार? चार वेद. पाच? पंच महाभूते. सहा? सहा शास्त्रे. सात? सप्तस्वर, सप्तवार, सप्तऋषी, सप्तपाताळ, सप्त लोक, सप्त रंग, सप्त समुद्र. आठ? अष्टवसू. नऊ? नवविधा भक्ति. दहा? दहा दिशा. अकरा? एकादश रुद्र. बारा? राशी. तेरा? धनतेरस मुहूर्त. चौदा? विद्या. पंधरा? तिथी. सोळा? शृंगार. सतरा? तत्वे. अठरा? पुराणे. एकोणिस? वारकरी थोडा अडखळला पण लगेच म्हणाला एकोणीस तू व वीस मी. उत्तरे बरोबर असतील तर माझ्याबरोबर चल. राजकन्येने वारकऱ्यास वरमाला घातली. तात्पर्य वारकऱ्यास बावळट समजू नये. रावणाने हनुमंतास 'वानर' समजले पण त्याने सर्व लंका जाळली.

कलियुग अतिशय वाईट आहे. काय काय घडते ते सकाळी पेपरात (वर्तमानपत्र) समजते. प्रश्न पडतो हे काय चालले आहे? माझे प्रामाणिक मत आहे. अगोदर संध्या, स्नान, हरिपाठ, पूजा करा व नंतर पेपर वाचा म्हणजे दिवस समाधानात जाईल. पण काहीना अंथरुणातून उठल्यावरोबर पेपर लागतो. याच्यात काही मोठी माणसे व काही लहान मुले, फक्त उपयोग वेगळा. कलियुग वाईट आहे पण यात एक अतिशय चांगला गुण आहे. तुकोवाराय सांगतात कलि पापाचिच मूर्ती। नाम खड्ग घेऊ हाती ॥

या कलियुगात नामस्मरणामुळे मुक्त होता येते व हा अधिकार सर्वांना आहे. 'सकळांसी येथे आहे अधिकार। कलियुगी उद्धार हरिच्या नामे ॥' तु. म. 'कलियुगामाजी करावे कीर्तन। तेणे नारायण देईल भेटी।' तु. म. 'कलियुगी सुगम साधन। न लगे योग याग त्याग दान। करिता निर्लज्ज हरिकीर्तन। चारी मुक्ति चरण वंदिती ॥' नाथ. कलियुगात वाकीच्या साधनामुळे देवाची प्राप्ति होणार नाही. फक्त नामस्मरणामुळेच देव मिळेल. सत्ययुगात जे साधन करण्यास दहा वर्षे लागत होते. तेच साधन करण्यास त्रेतात एक वर्ष लागते. द्वापारात एक महिना व कलियुगात फक्त एक रात्र व एक दिवस म्हणजे २४ तास. परमार्थाकरिता हे युग सुलभ आहे.

यतकृते दशभिवर्षे त्रेतायां हायनेनच।
द्वापारे यच्च मासेन एहोरात्रेन कलौ तदा॥ भागवत.

शिवाय हरिनाम हेच साधन देव मिळवून देते. बाकी अन्य गती नाही. हे तिरुक्तिने पुराण सांगते.

हर्रेनाम हर्रेनाम हर्रेनाम केवलं।
कलौ नास्तेव नास्तेव नास्तेव गतिरन्यथा॥ पुराण

तात्पर्य - कलियुगात वाकीच्या साधनांच्या छंदात न पडता फक्त नामस्मरणच करा. असे वेद, शास्त्र. संत यांचे सांगणे आहे.

★ ★ ★ ★ ★

८९ : एक

१) गणितामध्ये 'एक' अंकास फार महत्व आहे. शून्यास किंमत आहे. पण मागे एक अंक असेल तर! एक अंक असल्यामुळे शून्याची किंमत दहापट वाढते.

'राम नामको अंक है सब साधन है सून।
अंक गये कछु हाथ नही, अंक रहे दसगुण॥ कबीरजी

यापुढे जाऊन तुकाराम महाराज म्हणतात

एके दाविले दहा। फाटा पहा पुसोनि॥

एक या अंकाचे फक्त मुंडके ठेवून दांडके उडविले तर सर्व शून्य, शून्य होणार. तद्वत जीवनातून परमात्मा पुसला तर सर्व जीवन शून्य!

शरीरं सुरुपं तथा वा कलत्रं, यशश्चारुचित्रं धनं मेरुतुल्यम्।
हरेरंध्रीपद्मे मनश्चेन्न लग्नं ततः किं ततः किं ततः किं ततः किं॥ शंकराचार्य

अर्थात शरीर उत्तम आहे. नातेवाईक खूप मोठे आहेत. कुठेही गेला तरी यश आहे. धन, मेरु एवढे आहे. तथापि हरिचरणांवर मन नसेल तर सर्व व्यर्थ आहे.

२) 'एक' परमात्मा ज्याच्या वाजूस आहे त्याचा केस पण वाकडा होत नाही.

'जितने तारे गगनमे उतना शत्रू होय।
कृपा करे 'एक' रघुराज बाल न बाका होय॥' कबीरजी

महाभारतीय युद्धात कौरवांचे दीडपट सैन्य, पण पांडवांच्या वाजूस परमात्मा, फक्त पांडव वाचले. बाकी जवळ जवळ सर्व गेले. ३९३६६०० पैकी दहा शिल्लक राहिले. पाच पांडव, श्रीकृष्ण, सात्यकी, कौरवाचे तीन, अश्वत्थामा, कृतवर्मा, कृपाचार्य (दोघे चिरंजीव) प्रल्हादास मारण्याकरीता अनेक प्रयोग झाले पण सहिसलामत सुटला! कारण परमात्मा संरक्षक !

३) 'एकच' जगाचा सूत्रधार - जीवाच्या कर्माप्रमाणे परमात्मा सर्वांना फिरवितो.

'ऐसा लाघवी हा माया सूत्रधारी।
एकला 'एकटाची' झाला नानाकारी॥' निळो.

शिवाय सर्व जग या एकाचा (परमात्म्याचा) विस्तार आहे.

बिजचि झाले तरु। अथवा भांगारचि अलंकारु।
तैसा मज 'एकाचा' विस्तारु। ते हे जग॥ ज्ञाने.

एक राम दशरथ का बेटा। एक राम घट घट मे बैठा।
एक राम का सभी पसारा। एक राम है सबसे न्यारा॥ तुलसी.

४) सर्वांच्या हृदयात एकच परमात्मा आहे.

सर्वाघटी राम देहादेही एक। सूर्यप्रकाशक सहस्त्ररश्मी ॥ ज्ञाने.

एकाच नृत भांडं अनेक रुपं गोक्षीर एकं बहुवर्णधेनुः।
सुवर्ण एकं बहु भूषणानि शरिरभेदः परमार्थ एकः ॥ सुभा.

मातीची भांडी अनेक माती एक, गाईचे रंग, आकार वेगळा, मात्र दूध एक. अलंकार अनेक सोने एक. तशी शरीरे अनेक पण सर्वांच्या हृदयातील परमात्मा मात्र एक.

'गगनभरी धारा। परी पाणी एकचि विरा। तैसा या भूताकारा। सर्वांनी तो ॥ ज्ञाने.

'एको देवः सर्वभूतेषु गुढः सर्वव्यापी सर्वभूतांतरात्मा।
कर्माध्यक्षः सर्वभूतादिवासः साक्षी चेतो केवलो निर्गुणस्य ॥ उपनिषद

५) भारतात अनेक धर्म, जाती, प्रांत, चालीरिती, भाषा, असल्यातरी आपले एकच तत्व आहे. 'एकोऽहम बहुस्याम' आपण सर्व एक 'भारतीय' आहोत.

६) पत्त्यांमध्ये बावन्न पानात एक्क्यास (अर्थात हुकूमी) महत्व! दुरी, तिरी, राजा, राणी पेक्षा!

७) व्यवहारात एक तारखेस फार महत्व कारण पगाराचा दिवस! काहींच्या जीवनात १० तारखेस महत्व कारण १० तारीख पगाराचा दिवस, शेवटी 'एका' वर शून्य म्हणून.

८) व्यवहार आणि परमार्थामध्ये 'एक' निष्ठेला फार महत्व आहे.

'एकविध आम्ही न धरु पालट। न संडू हे वाट सापडली ॥' तु. म.

९) 'एका'चीच उपासना करावी म्हणजे फळ नक्की मिळणार.

'सिंचन करिता मूळ। वृक्ष ओलावे सकळ ॥' तु. म.

सर्व शरीर तुष्ट पुष्ट होण्याकरिता एका मुखात अन्न टाकावे.

'मुखिया सो मुख चाहिये खान पानको 'एक'।
पाले पोसे सकल अंग, तुलशी सहित विवेक ॥

एका माणसाची १०० एकर जमीन होती. त्याने ठरविले. सध्या पाऊस नीट पडत नाही. आपण विहीर काढावी. एका पानाड्यास विचारले. त्याने सांगितले, या ठिकाणी २० फूट खोदा पाणी लागेल. खोदली, पाणी लागले नाही, दुसऱ्याने दुसऱ्या ठिकाणी २० फूट खोदावयास सांगितले, पण पाणी नाही. सात जणांनी सात ठिकाणी २० फूट खोदावयास सांगितले, पण पाणी नाही. लाखो रुपये मातीत गेले. एक वारकरी भेटला, आता माझे ऐका, कोणत्याही विहीरीस आणखीन चाळीस फूट खोदा! 'एकच' विहीर ६० फूट खोदली. हत्तीच्या सोंडेएवढे पाणी लागले.

तात्पर्य कोणत्याही एका देवाची उपासना करा.

'एक धरिला चित्ती। आम्ही रखुमाईचा पती।
तेणे झाले अवघे काम। निरसला भवभ्रम ॥ तु.म.

१०) परमार्थामध्ये एकांताची फार गरज आहे. किंबहुना हे ज्ञानाचे लक्षण आहे.

'बहु एकांतावरी प्रिती। जया जनपदाची खंती।
मनुष्याकारी मूर्ति। ज्ञानची तो।' ज्ञाने.

दत्तात्रयांनी चोवीस गुरु केले. त्यापैकी 'कुमारीच्या हातातील कंकण' गुरु केला आहे.

वासे बहुनाम कलहो भवेतवार्ता द्वयोरपि।
एक एव चरेत तस्मात कुमारी इव कंकणम ॥ भागवत

खूप लोक असल्यास भांडणे होतात. दोघे गप्पा मारतात. पण एक माणूस शांत राहतो. लालबहाद्दूर शास्त्री म्हणाले होते भारतीय एक माणूस शहाणा, दोन मूर्ख, तीन महामूर्ख आणि चार चांडाळ चौकडी! भारतात बऱ्याच चौकड्या गाजल्या आहेत, महाभारतापासून! मात्र पाश्चिमात्य देशात या उलट आहे. एक मूर्ख, दोन शहाणे, तीन चांगले काम करतात. चारजण मोठे काम करतात.

११) ज्ञानोबा, तुकाराम महाराज सांगतात. कलियुगात बाकीच्या साधनात पडू नका फक्त एका विठ्ठलाचे नाम घ्या.

एकतत्व नाम दृढ धरी मना। हरिसी करुणा येईल तुझी। ज्ञान.

एक गाऊ आम्ही विटोबाचे नाम।
आणिकांचे काम नाही आता ॥ तु. म

एका श्लोकाचा उच्चार करुन ही कोटी पूर्ण करुया.

एकं शास्त्रं देवकी पुत्रं गीतं एको देवो देवकी पुत्र इव ॥
एको मंत्रः तस्य नामानियानी कर्माप्यकं तस्य देवस्य सेवा ॥

एकच शास्त्र गीता जे श्रीकृष्णाचे गीत, एकच देव श्रीकृष्ण, एकच मंत्र त्याचे नाव, एकच कर्म. त्या देवाची काया, मने, वाचा सेवा.

★ ★ ★ ★ ★

९० : सिद्धी

अ) सात्विक अष्टमहासिद्धी (भागवत)

१) अणिमा - स्थुलाचे सूक्ष्म शरिर बनविता येते.
२) महिमा - सुक्ष्माचे स्थूल शरीर बनविता येते.
३) लघिमा - शरीराचे वजन हलके करता येते.
(तिर्थयात्रेत माऊलींनी नामदेवरायासमोर ही सिद्धी वापरुन विहीरीतील पाणी पिऊन आले.)
४) प्राप्ति - कोणत्याही प्राण्याच्या इंद्रियांच्या क्रियाशक्तीशी संबंध जोडणे.
५) प्राकाश्य - स्वर्गातील, अदृश्य स्थानातील पदार्थ पहाता येतात.
६) ईशता - इतरांच्या ठिकाणी गुणांची व शक्तिची प्रेरणा करता येते.
७) वशिता - विषय भोगून असंग रहाता येते.
८) यत्काम - इच्छिल्या कामसुखाची प्राप्ति करुन घेता येते.

या सर्व सिद्धी भक्तांकडे असतात.

अष्टमहासिद्धी ओळंगती द्वारी। नवजती दुरी दवडिता॥ तु. म.
अष्टमहासिद्धीचा कोण आला पाड। वागो नेदी आड कोणी तया॥ तु. म.

ब) राजस दहा सिद्धी

१) अनुर्मिकत्व - उर्मी सहा (क्षुधा, तृषा प्राणाच्या, हर्ष, शोक मनाच्या, जन्ममृत्यू शरीराच्या) नसणे.
२) दूरश्रवण - दूरचे ऐकणे (स्वर्गातील सुद्धा)
३) दूरदर्शन - त्रिलोकातील (दूरचे) पहाता येते.
४) मनोजव - कल्पिल्या ठायी मनाच्या वेगाने शरीर घेऊन जाणे.
५) कामरुप - कामनेप्रमाणे (इच्छेप्रमाणे) रुप धारण करणे.
६) परकाया प्रवेशन - आपले शरीर बाजूस ठेऊन दुसऱ्याच्या शरीरात प्रवेश करणे. (मंडनमिश्राच्या वादाच्या वेळी शंकराचार्यांनी या सिद्धीचा उपयोग केला)
७) स्वच्छंदमृत्यू - स्वइच्छेने मृत्यु (काळास ताब्यात) (भिष्माचार्य)
८) सुरक्रिडाप्राप्ति - स्वर्गातील देवाचे खेळणे पहाणे अथवा त्यांच्याशी खेळणे.
९) संकल्पसिद्धी - संकल्पाप्रमाणे प्राप्तव्य.
१०) अप्रतिहत आज्ञा - आज्ञा अथवा गमन कोणाकडून न रोखणे.

क) पाच तामस सिद्धी

१) त्रिकालज्ञता - भूतभविष्यवर्तमान काळाचे ज्ञान असणे.
२) अद्वद्वंता - सुख, दुःख, मान-अपमान, मृदू कठिण याना वश नाही.

३) प्रतिष्टंभ - अग्नि, वायु, उदक, विष, अर्क, यांचे प्रतिष्टंभन
४) परचित्तअभिज्ञता - दुसऱ्याचे स्वप्न अथवा चित्तातील सांगणे.
५) अपराजित्व - कोणाकडून न जिंकणे, सर्वांना जिंकणे.

या सर्व तेवीस सिद्धी आहेत. यापेक्षा श्रेष्ठ सिद्धी त्यास परमसिद्धी म्हणजे मोक्ष म्हणतात. (विस्तारपूर्वक भागवतात पहाणे.)

या सर्व सिद्धी नामाने प्राप्त होतात.

आरंभी आवडी आदरे आले नाम। तेणे 'सकळ सिद्धी' जगी जाले पूर्ण काम॥ ज्ञान.

प्रत्येक सिद्धीकरिता भागवतात वेगळा उपाय सांगितला आहे. फार मेहनत आहे. मात्र नामास मेहनत नाही. नामामुळे परमात्मा प्राप्त होतो. ज्याच्या चरणाजवळ या सर्व सिद्धी आहेत 'काय उणे तयापाशी। ऋद्धीसिद्धी ज्याच्या दासी॥' तु. म. दुसरी एक सिद्धी आहे जी फक्त हस्तपत्रके (हँडबील) वाटून होते. तिचे नाव आहे 'प्रसिद्धी'.

संकल्पसिद्धीकरीता शास्त्रात नऊ गोष्टीची गरज आहे.

१) ईश्वर, २) ईश्वरज्ञान, ३) ईश्वरप्रयत्न, ४) ईश्वरइच्छा, ५) योग्य काळ, ६) योग्य देश, ७) अदृष्ट, ८) प्रागभाव (ती वस्तु असणे), ९) प्रतिबंधभाव (त्या वस्तुच्या प्राप्तिस अडथळा नसणे.)

संकल्पासी अधिष्ठान। नारायण गोमटे॥ तु. म.
मनाचे संकल्प पावविन सिद्धी। जरी राहे बुद्धी याचे पायी॥ तु. म.
सत्यसंकल्पाचा दाता नारायण। सर्व करी पूर्ण मनोरथ॥ तु. म.
जै कृष्णचि होईजे आपण। तै कृष्ण होय आपुले अंतःकरण।
मग संकल्पाचे आंगण। ओळगती सिद्धी॥ ज्ञाने.

साधकास सिद्धींचे ज्ञान असावे म्हणून हा 'प्रपंच'.

★ ★ ★ ★ ★

९१ : काय

ज्याप्रमाणे बटाटा अनेक प्रकारे वापरला जातो. भाजी, भात, भजी, वेफर्स, चिवडा वडा वगैरे पदार्थात उपयोगात आणतात. तद्वत काय हा शब्द संत वाङमयात जवळ जवळ दहा प्रकारे आला आहे. याप्रमाणे

१) अनिर्वचनिय वाचक -

किंबहुना निवृत्ती। ठेविले असे जिये स्थिती।

ते 'काय' देऊ हाती। वाचेचिया॥ ज्ञाने. अमृ.

२) उपकार वाचक -

'काय' सांगू आता संताचे उपकार। मज निरंतर जागविती॥ तु. म.

३) उद्गारवाचक -

'काय' वाणू आता न पुरे ही वाणी। मस्तक चरणी ठेवितसे॥ तु. म.

४) उपहासवाचक -

'काय' नपुंसका पद्मिणीचे सोहळे। वांझेसी डोहळे कैसे होती। नाथ.

५) करुणावाचक -

'काय' काय करितो या मना। परी नायके नारायणा।
करु नये त्याची करी विवंचना। पतना नेऊ आदरीले॥ तुकयाबंधू

६) तळमळवाचक (स्वतःविषयी) -

'काय' मी उद्धार पावेन । काय कृपा करिल नारायण ।
ऐसे तुम्ही सांगा संतजन । करा समाधान चित्त माझे ॥ तु. म.

७) तळमळवाचक (जगाविषयी) -

'काय' करु बहु वाटे तळमळ। आंधळे सकळ बहिर्मुख॥ तु. म.

८) महिमावाचक -

'काय' सांगू देवा ज्ञानोबाची ख्याती। वेद म्हैशामुखी बोलविले॥ नाम.

९) संतापवाचक -

'काय' माय गेली होती भूतापाशी। हरि नये मुखाशी अरे मूढा॥ नाथ.

१०) सिद्धांतवाचक -

'काय' नोहे केले। एका चिंतिता विठ्ठले॥ तु. म.

अशी ही आहे 'काय' शब्दाची कोटी.

★ ★ ★ ★ ★

९२ : शोध

विज्ञानाने माणसांच्या जीवनामध्ये क्रांती घडविली आहे. जगातील सर्व शास्त्रज्ञांचे जेवढे उपकार मानावेत तेवढे थोडेच आहेत

१) थॉमस एडिसन - बल्ब, ग्रामोफोन	२) न्यूटन - गुरुत्वाकर्षण
३) मायकल फॅरेडे - वीज	४) राईट बंधू - विमान
५) जॉन लोगी बेअर्ड - टि. व्ही.	६) सिंगर - शिलाई मशिन
७) ब्लेझी पास्कल - गणकयंत्र (कॅलक्युलेटर)	८) फोर्ड - मोटर
९) जेम्स वॅट - वाफेचे इंजिन	१०) ऑटोहन व स्ट्रॅसमन - अणुउर्जा

या सर्व शोधामुळे मानवी जीवन खरोखरच सुखकर झाले आहे. त्याबद्दल आपण त्यांचे आभारी असले पाहिजे. परंतु हे सर्व शोध माणसाच्या शरीरास सुख देणारे आहेत. कारण अमृताचा शोध घेत घेत रसायनशास्त्र व जीवशास्त्र जन्माला आले आणि परिसाचा शोध घेत घेत भौतिकशास्त्र जन्माला आले. अमृत आणि परिस हीच मूळात मानवाला सुख देणारी साधने असल्याने त्यांपासून तयार झालेले विज्ञानही त्याच स्वरुपाचे असणार - 'बाप तसा बेटा' परंतु शरीर नाशिवंत आहे. हे जाणूनच संतांनी शक्यतो या भानगडीत न पडता अविनाशी आत्म्याला सर्वोच्च परमात्म्याशी जोडण्याचा प्रयत्न केला. हे सर्व करुन देखिल 'अवघाची संसार सुखाचा करण्यासाठी' काही शोधही लावले. माऊलींनी ज्ञानेश्वरीमध्ये अशा दहा शोधांचे वर्णन केले आहे. त्याचा थोडा विचार करु.

१) विमान - ज्या गोष्टीद्वारे पंख नसूनदेखिल मानव उडू शकतो तिचा शोध ज्ञानेश्वरांनी लावला आहे. माऊली म्हणते -

'अभ्यासाचेनि बळे। एका गती अंतराळे।
व्याघ्र सर्प प्रांजळे। केले एकी॥ ज्ञाने.

ही कल्पना माऊलींची आहे. तिच्या साकार करण्यामुळे ते श्रेय राईट बंधूकडे गेले. असे म्हणतात, त्या पूर्वीच भारतातील केळकर बंधूनी विमानाचे उड्डाण केले. पण त्याचे काय झाले हे नंतर कळलेच नाही.

२) विद्युत - विजेचा शोध मायकेल फॅरेडे या शास्त्रज्ञाच्या नावावर आहे. पण हा माऊलीचा शोध आहे हे पुढील ओवीवरुन कळते.

तया उदकाचेनि आवेशे। लखलखीत तेज दिसे।
तया तेजामाजी असे। सलील काई॥ ज्ञाने.

३) सूर्याभोवती पृथ्वी फिरते या शोधाचे श्रेय गॅलिलिओस देतात. पण १२ व्या शतकात

माऊलींनी हे सांगून टाकले आहे.

उदोअस्तुचेनि प्रमाणे। न चलता सुर्याचे चालणे।
तैसा नैष्कर्म्य तत्व जाणे। कर्मिच असता॥ ज्ञाने.

४) चांदी

मात्रेचेनि मापे। जैसे दिव्यौषध घापे।
का कथिलाचे किजे रुपे। रसभावनी॥ ज्ञाने.

कथिलापासून रासायनिक क्रियेने रुपे म्हणजे चांदी बनविता येते जसे रोग्यास दिव्य औषध प्रमाणात द्यावे. म्हणजे रोग बरा होईल.

५) चित्रपट - पुढील ओवीत माऊलींनी हुवेहुब चित्रपट उभा केला आहे.

स्वमायेचे आडवस्त्र। लावोनि एकला खेळवी सूत्र।
बाहेरी नटी छायाचित्र। चौऱ्यांशी लक्ष॥ ज्ञाने.

६) कॅमेरा -

'जेथ हे संसार चित्र उमटे। तो मनरुप पट फाटे।
जैसे सरोवर आटे। मग प्रतिमा नाही॥ ज्ञाने.

७) घड्याळ -

उपजे ते नाशे। नाशिले पुनरपि दिसे।
हे घटिकायंत्र जैसे। परिभ्रमे गा॥ ज्ञाने.

८) सुवर्ण -

'पितळेचि गंधकाळीक। फिटलिया होय निशेःख।
ते सोने काय आणिक। जोडू जाईजे ?॥ ज्ञाने.

या शोधाचा विकास झालेला दिसत नाही. पण माऊलीचे मत असे वाटते. पितळेतून हिणकस पदार्थ काढला तर पितळेतून सोने मिळेल.

९) गुरुत्वाकर्षण -

फळलिया तरुचि शाखा। सहजे भूमिसी उतरे देखा।
तैसे जीवमात्रा अशेखा। खालावती ते॥ ज्ञाने.

हा शोध न्यूटनच्या नावावर आहे पण माऊलींनी अगोदरच सांगितले आहे.

१०) पंखा -

अफाटा समिरणा। अपैतेपणे शहाणा। करी जैसा विंजना। निर्मुनिया॥ ज्ञाने.

असे अनेक शोध ज्ञानेश्वरीमध्ये सापडतील. ज्ञानेश्वरीमध्ये ज्ञान आहे, विज्ञान आहे व अज्ञानाचे पण दिग्दर्शन दिसते. म्हणून माऊली फक्त संत, योगी, वैष्णव, गुरु नाहीत तर शास्त्रज्ञसुद्धा आहेत. पूर्वी आम्हांस १९७० ला एस्. एस्. सी. ला टिळकांचा धडा होता. त्यांनी इतर शास्त्रज्ञांना ज्ञानेश्वर महाराजांची उपमा दिली आहे. धड्याचे नाव होते. 'देशोदेशीचे ज्ञानेश्वर' एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट, अशी माऊलींनी शोधाकरिता ज्या ओव्या वापरल्या आहेत. त्या दृष्टांताकरिता आहेत. मात्र दृष्टांत कमी प्रतिचा, सिद्धांत महत्वाचा असतो.

★ ★ ★ ★ ★

९३ : काळवेळ

अ) काळाचे मुख्य तीन प्रकार १) भूतकाळ, २) वर्तमान काळ, ३) भविष्यकाळ.

म्हातारी माणसे भूतकाळाचा विचार करतात. सत्ताधारी माणसे वर्तमानकाळाचा विचार करतात. गंगा वाहते हात धुऊन घ्या. गरीब माणसे भविष्यकाळाचा विचार करतात. प्रारब्धाने येणारे दोन काळ १) सुकाळ, २) दुष्काळ.

यापेक्षा दुसरे महत्वाचे दोन काळ १) माध्यान्ह काळ, २) अंतकाळ. जगातील सर्व लोक बहुतेक माध्यान्हकाळाचा विचार करतात. माध्यान्ह काळ म्हणजे पोटाचा प्रश्न. जगण्याकरिता निदान दिवसातून एक वेळ तरी अन्न हवे ''जरी झाला संन्यासी। माध्यान्हकाळी तोंड वासी॥ पण देवाचा नियम असा आहे. जगातील सर्व जीवांचे भोजन झाल्याशिवाय परमात्मा अन्न ग्रहण करीत नाही. त्यास सर्वांची चिंता आहे.

मातेचिया उदरी उपजलासी जेव्हा। चिंता तुझी तेव्हा केली त्याने॥ तु. म.

जभी दंत नही थे। तभी दुध दिया। अभी दंत दिये।तो अन्न न दे॥ कबीरजी

हे जाणून महात्म्ये अंतःकाळाचा जास्त विचार करतात. कारण अंतःकाळावर पुढील जन्म अवलंबून आहे. 'अन्ति मती सो गती॥' मरणी जया जे आठवे। तो तेचि गतीते पावे॥ ज्ञाने. म्हणून सर्वांनी अंतःकाळ चांगला कसा होईल याचा विचार करावा. कारण ज्याकरिता आपण आयुष्य वेचतो ते काहीच बरोबर येत नाही.

आयु गवाई दुनियामे, दुनिया न चले साथ।
पाव कुऱ्हाडी मार लिया मुरखने अपने हात॥ कबीरजी

कळो येईल अंतःकाळी॥ प्राण प्रयाणाचे वेळी॥ राहाती निराळी। रांडा पोरे सकळ॥ तु. म.

अंतःकाळ चांगला कशाने होतो? अंतःकाळी ज्याच्या नाम आले मुखा॥ तुका म्हणे सुखा पार नाही॥ त्याचा शेवट गोड झाला. म्हणजे जन्ममरणांचाच शेवट झाला. याकरिता वेळेस महत्व

द्यावयास हवे. मानवी आयुष्याला फार महत्व आहे.

मनुष्यदेहाचि अर्धघडी। न मिळे वेचिता लक्ष कोडी। येणे आयुष्य परमार्थ जोडी।
विषयाच्या कोडी थुंकोनी सांडी॥ नाथ.

नरदेहाचे आयुष्य क्षण। न मिळे देता कोटी सुवर्ण॥ नाथ.

तीन लोक चौदह भुवन एक श्वास का मोल।
तुलशी हरिके भजन बिना वृथा न बोले बोल॥ तुलशी.

या आयुष्याने परमार्थ प्राप्ति करुन घेता येते.

आयुष्याचिया साधने। सच्चिदानंद पदवी घेणे॥ तु. म.

अतिशय महत्वाची गोष्ट, ब्रह्मदेवाचा वशिला लावला तरी गेलेले आयुष्य परत मिळत नाही.

'धातयाहि पाया पडता। नुठी गतायु पंडुसुता॥' ज्ञाने.

मानवी आयुष्य म्हणजे 'पर्वकाळ' आहे. म्हणून सर्वकाळ परमार्थात घालवावा. ज्ञानदेवा गोडी हरिनामाची जोडी। रामकृष्ण आवडी 'सर्वकाळ'॥ ज्ञानदेवा रम्य रमले समाधान। हरिचे चिंतन 'सर्वकाळ'॥ रामकृष्ण हरि विठ्ठल केशवा। मंत्र हा जपावा 'सर्वकाळ' ॥ तु. म.

तुकाराम महाराज म्हणतात मला संतांची भेट झाली कारण सर्वकाळ त्यांचेच चिंतन केले.

'सर्वकाळ होतो आठवित मनी। फिटलिसे धणी येणे काळे॥'

जीवनात काही पर्वकाळ आहेत. 'जो एकादशीचा व्रतधारी। मी नित्य नांदे त्याचे घरी। सर्व पर्वकाळाचे शिरी। एकादशी पै माझी॥ नाथ. संत जेव्हा घरी येतील तो सुद्धा पर्वकाळ. ''माझे भक्त जै येती घरा। वैष्णवा तो दिवाळी दसरा। सर्व पर्वकाळ येती द्वारा। तिर्थे घरा पै येती॥ नाथ. कपिला षष्ठी पर्वकाळ आहे. असे बरेच पर्वकाळ काळ आहेत.

रोजचे तीन काळ १) सकाळ, २) माध्यान्हकाळ, ३) सायंकाळ. हे काळाचे प्रकार.

वेळेचे तीन प्रकार

१) अनर्थक वेळ (काळ), ३) निरर्थक वेळ, ३) सार्थक वेळ

१) अनर्थक वेळ म्हणजे जी वेळ अथवा काळ व्यसनात जातो. महाराज म्हणातात ज्याला देह व्यर्थ जावा वाटत असेल त्याने द्युतकर्म अथवा सारीपाठ खेळावा.

अरे हे देह व्यर्थ जावे। ऐसे तुज वाटतसे जीवे।
द्युतकर्म मनोभावे। सारीपाठ खेळावा॥ तु. म.

अनर्थक वेळेमुळे पाप निर्माण होते.

२) निरर्थक वेळ - गप्पा, आळस, अतिनिद्रा, प्रमाद यामध्ये जो वेळ जातो तो निरर्थक वेळ. यापासून ना पाप ना पुण्य.

३) सार्थक वेळ - जी वेळ परमार्थामध्ये जाते

काळ सारावा चिंतने। एकांतवासी गंगा स्नाने।
देवाच्या पूजने। प्रदक्षणा तुळशीच्या॥ तु. म.

चिंतनात, गंगा स्नानात, पूजनात, भजनात, वारीत, तुळशीच्या सेवेत जो वेळ जातो तो सार्थक वेळ. हरिकथेमध्ये जो वेळ जातो त्या वेळाची गणना काळ करत नाही. काळाची गणना ते नाही घटिका। पंढरीनायका आठविता॥ सदाकाळ गणना करी आयुष्याची। कथेच्या वेळेचि आज्ञा नाही॥ तु. म.

करीता माझी कथा श्रवण। काळासी रिगमु नाही जाण।
इतरांचा पाडू कोण। कर्म बंधन तेथे कैचे॥
जो हरिकथेने गेला क्षण। तो काळासी नव्हे प्राशन।
काळ सार्थकता त्या नाव जाण। जै श्रद्धा श्रवण हरिकथा॥ नाथ. भागवत.

काळ सार्थक केला त्यांनी। धरीला मनी विठ्ठला॥ निळोबा

सार्थक काळामुळे पुण्यच प्राप्त होते.

असे हे काळाचे खूप प्रकार आहेत. थोडक्यात

१) भूतकाळ, २) वर्तमान काळ, ३) भविष्यकाळ, ४) सुकाळ, ५) दुष्काळ, ६) पर्वकाळ, ७) सर्वकाळ, ८) माध्यान्हकाळ (जेवण), ९) अंतःकाळ, १०) सकाळ, ११) माध्यान्हकाळ (दुपार), १२) सायंकाळ, १३) अनर्थककाळ, १४) निरर्थककाळ, १५) सार्थककाळ.

मनुष्य देहाचा काळ सार्थक केला तर 'कळिकाळ' जीवाकडे वाकड्या दृष्टीने पहाणार नाही. शेवटी काळ ज्याच्याहातात आहे तो कृष्ण त्यास प्राप्त होईल. एक सुभाषित

काव्यशास्त्र विनोदेन कालो गच्छति धीमताम्।
व्यसनेनच मुर्खानां निद्रया कलहेन वा॥

सज्जनाची वेळ काव्य, शास्त्र, विनोद यामध्ये जाते. मुर्खांची वेळ व्यसन, झोप व भांडण यात खर्च होते. याकरिता काळाचे (वेळेचं) महत्व लक्षात घ्यावे.

'जिंदगी है जबतक फुरसत न मिले कामसे।
बस जरासा 'समय' निकालकर रामभजन कर प्यारसे॥'

ब) तिथी

भारतीय संस्कृतीमध्ये तारखेपेक्षा तिथीस महत्व आहे. आमचा दिवस सूर्योदयापासून सुरु होतो. पण पाश्चिमात्य लोकांचा रात्रौ १२ वाजता दिवस वदलतो. आपणास तिथीचे ज्ञान हवे. तुका म्हणे ठावी नाही तीथ मती । यमाची निश्चिती कुळवाडी ।। कोणत्या तिथीस काय करावे याचे ज्ञान हवे. एकादशीस स्व स्त्री समागम पण निषिद्ध आहे. तुकोबाराय म्हणतात तो क्षयरोगी होईल.

शेज बाज विलास भोग। करिता कामिनीचा संग।
तया जोडे क्षयरोग। जन्मव्याधी बळिवंत॥

एकादशी दिनी करील जो भोग। तया मातासंग घडतसे॥ नाम.

आमच्या सनातन संस्कृतीने प्रत्येक तिथीस महत्व दिले आहे.

१) प्रतिपदा - गुढी पाडवा, दिवाळी पाडवा
२) द्वितीया - भाऊबीज, तुकाराम बीज
३) तृतिया - अक्षय तृतिया, साडेतीनपैकी अर्धा मुहूर्त
४) चतुर्थी - गणेश चतुर्थी
५) पंचमी - नाग पंचमी, ऋषी पंचमी
६) षष्टी - नाथ षष्टी
७) सप्तमी - रथ सप्तमी
८) अष्टमी - गोकुळ अष्टमी (कृष्णाष्टमी)
९) नवमी - रामनवमी
१०) दशमी - दसरा, माघ शुद्ध दशमी
११) एकादशी - आषाढी, कार्तिकी (मोठ्या) प्रत्येक महिन्यात दोन
१२) द्वादशी - वसुबारस
१३) त्रयोदशी - धनत्रयोदशी, माउली, नामदेवराय, निवृत्तीनाथ यांनी अनुक्रमे कार्तिक, आषाढ, ज्येष्ठ त्रयोदशीस समाधी घेतली. शिवरात्र
१४) चतुर्दशी - गणेश चतुर्दशी अथवा नरक चतुर्दशी
१५) पौर्णिमा - नारळी, कोजागिरी, व्यास गुरु पौर्णिमा वगैरे
१६) अमावास्या - दिवाळी.

देवाच्या जन्मास महत्व म्हणून जन्मतिथी, महात्म्यांच्या मरणास महत्व म्हणून त्यांची पुण्यतिथी साजरी केली जाते. किंबहुना ती तिथी पुण्यरुप होते.

★ ★ ★ ★ ★

९४ : शबरी सुदामा

एका अभंगात तुकाराम महाराजांनी भक्तिचा महिमा सांगताना दोन भक्तांचे दृष्टांत वापरले आहेत. पण ही दृष्टांत खुवी विचार करायला लावते.

१) त्रेतायुगातील शबरी	१) द्वापारयुगातील सुदामा
२) रामायणातील दृष्टांत	२) महाभारतातील दृष्टांत
३) शबरी भिल्ल (नीच) कुळातील	३) सुदामा ब्राह्मण (उच्च) कुळातील
४) स्त्री आहे.	४) पुरुष आहे.
५) ही लग्न न झालेली आहे.	५) लग्न झालेला, मुले असणारा आहे.
६) संन्यास आश्रमात राहणारी	६) गृहस्थाश्रमात राहणारा
७) घर, नातेवाईक सोडलेली	७) घर, नातेवाईक न सोडलेला
८) संताने (मातंग ऋषी) सांगितले म्हणून देवाची प्रतिक्षा करणारी	८) कांतेने (वायकोने) सांगितले म्हणून देवाच्या भेटीस जाणारा.
९) देवाची भेट पर्णकुटीत	९) देवाची भेट राज महालात
१०) देव (राम) संन्यासी वेशात	१०) देव (कृष्ण) राजा वेशात
११) देव पत्नी विरहीत (सीता रावण घेऊन गेल्यानंतरचा प्रसंग)	११) देव एक नाही अनेक पत्नींसहित
१२) शबरीस भेटण्यास देव आले.	१२) सुदामा देवास भेटण्यास आला.
१३) शबरीने देवास नैसर्गिक बोरे (उष्टी) दिली.	१३) सुदाम्याने देवास कृत्रिम पोहे आणले होते.
१४) रामाने शबरीस मुक्ति दिली.	१४) कृष्णाने सुदाम देवास भुक्ति (सोन्याचा गाव) दिला.
१५) राम भेटल्यानंतर इहलोक सोडला.	१५) कृष्ण भेटल्यानंतर इहलोकीचे वैभव भोगले.

अभंग

ऐका महिमा आवडिची। बोरे खाय भिल्लटीची॥ १॥
थोर प्रेमाचा भुकेला। हाचि दुष्काळ तयाला॥ २॥
पोहे सुदाम देवाची। फके मारी कोरडेची॥ ३॥
न म्हणे उचिष्ट अथवा थोडे। तुका म्हणे भक्ति पुढे॥ ४॥

★ ★ ★ ★ ★

९५ : निंदा-स्तुती

१) माणसांने स्वतःची निंदा करावी. स्तुती करु नये.

आत्मउत्कर्ष तथा निंदा परेषां परिवर्जयेत ॥ (उप.)

आत्मउत्कर्ष टाळावा तशी परनिंदासुद्धा करु नये. अर्थात निंदा म्हणजे नसलेले आरोप करणे. असलेले दोष बोलणे यास वस्तुस्थिती म्हणतात. निंदा करणे पापाचे लक्षण आहे.

क्रूरग्रहांची जैसी। मांदी मिळे एकेचि राशी। येती निंदकापाशी। अशेष पापे ॥ज्ञाने.

दृष्टांत - एका पुराणिकास एका भोळ्या बाईने गाडग्यातून ताक दिले. पुराणिक गरीब होता. खूष झाला. ताक घरी घेऊन निघाला. मात्र गाडग्यावर झाकण नव्हते. आकाशमार्गे एक घार सापास धरुन चालली होती. सापाने भितीने आपले विष खाली सोडले जे बरोबर पुराणिक बुवांच्या गाडग्यात पडले. बुवांना कल्पना नव्हती. पुराणिकांने व मुलांनी हौसेने भाकरी बरोबर ताक खाल्ले व सर्वजण गतप्राण झाले. यमदूत आले. यांच्या मृत्यूस जबाबदार कोण? भोळी बाई, घार, साप, ब्राह्मण यापैकी कोणीच दोषी दिसेना. एका चौकात चार जण तंबाखू खात बसले होते. त्यातील एक बोलले 'बाईने ताक दिले व पुराणिक बुवांचे कुटुंब गेले'. यमदूत गुप्तरुपाने फिरत होते. वस्तुस्थिती माहित नसताना याने त्या बाईस दोष दिला. यालाच जबाबदार धरा. कारण याने निंदेचे पाप केले. तात्पर्य दुसऱ्यांची निंदा करु नये. स्वतःची निंदा करावी.

पतीत पतीत पतीत। मी तो त्रिवाचा पतीत॥ तु. म.

मी अवगुणी अन्यायी। किती म्हणोनि सांगू काई॥
आता मज पायी। ठाव देई विठ्ठले॥ तु. म.

यावरुन दुसरी कोटी निर्माण होते.

२) माणसाने दुसऱ्याची निंदा करु नये. तसेच दुसऱ्या जीवांची स्तुतीही करु नये. दुसऱ्याची निंदा ऐकूही नये.

निंदेचे श्रवण नको माझे कानी। बधिर करुनि ठेवी देवा॥ तु. म.

स्तुतीही नको

स्तवूनिया नरा। केला आयुष्याचा मातेरा॥ तु. म.

नरस्तुती अथवा कथेचा विकरा। हे नको दातारा घडू देऊ॥ तु.म.

३) देवाची स्तुती करावी किंवा निंदा करावी दोन्हीही फलदायक आहेत.

निंदा अथवा स्तुती करावी देवाची। अधम तो वेची व्यर्थ वाचा॥ तु. म.

स्तुती

श्री अनंता मधुसूदना। पद्मनाथा नारायणा।

जगव्यापका जनार्दना। आनंदघना अविनाशा॥ तु.म.

शांताकारं भुजगशयनं वगैरे

निंदा -

हरि तू निष्ठूर निर्गुण। नाही माया बहु कठीण। तु. का.
अरे विठ्या विठ्या। मूळ मायेच्या कारट्या॥ १॥
तुझी रांड रंडकी झाली। जन्म सावित्री चुडा ल्याली॥ २॥
तुझे गेले मढे। तुला पाहुनि काळ रडे॥ ३॥
उभी राहुनि अंगणी। शिव्या देत दासी जनी॥ ४॥

जनाबाई शिव्या देत होती. देव हसत होते.

तुलशी अपने रामको रिझ भजे चाहे खिज।
खंत न करे जामिही पडे उलटा सुलटा बीज॥

तुलसीदास म्हणतात मी रामास कधी रिझवितो. कधी खिजवतो म्हणजे निंदा करतो. पण याचे फळ मिळते. शेतकरी जमिनीत बीज उलटे किंवा सुलटे टाकतो पण रोप येतेच.

गजेंद्र हत्तीने देवास बोलाविले. सर्वांना कथा माहित आहे. नक्रांनी देवाची निंदा केली. पण देव खूष झाले व त्याचाही उद्धार केला.

नक्र बोले देवाशी हासू आले। निंदा नोहे स्तवन माझे केले।
दीनानाथे तात्काळ उद्धरिले। विष्णूदास नामा कवतुके बोले॥ नाम.

श्रीकृष्णांनी शिशुपालाच्या शंभर शिव्या खाऊन त्यास मोक्ष दिला तात्पर्य देवाची निंदा किंवा स्तुती करा. मात्र.

४) संताची फक्त स्तुती करा निंदा कधीच करु नका.

स्तुती

जयाचे नाव तीर्थरावो। दर्शने।
प्रशस्तीसी ठावो। जयाचेनि संगे ब्रह्मभावो। भ्रांतासही॥ ज्ञाने.
विपाये आठवला चित्ता। तरी दे आपुली योग्यता।
हे असो तयांते प्रशंसिता। लाभु आथी॥ ज्ञाने.

पुण्यवंत व्हावे। घेता सज्जनांची नावे
नेघे माझी वाचा तुटी। महालाभ फुकासाठी॥ तु. म.

निंदा नको

अखंड संत निंदी। ऐसी दुर्जनाची बुद्धी।
काय म्हणावे तयाशी। तो केवळ पापराशी॥ तु.म.

तयाशी घडली सकळही पापे। संताचिया कोपे निंदा द्वेषे॥ तु. म.

देवाची निंदा करणारे उर्ध्वगतीस गेले. पण संताची निंदा करणारे नरकास गेले (दुर्योधन वगैरे) देव संताची स्तुती करतात. संताची निंदा त्यास सहन होत नाही. 'हरिजनाची कोणा न घडावी निंदा। साहात गोविंदा नाही त्याचे॥' तु. म. साधुंच्या स्तुतीने आपल्या वाचेस विश्रांती मिळते. 'ऐसे बोलीले देवे। तेथ जी जी म्हणितले पांडवे। ऐक जेथ वाचा विसवे। ते साधुकथा॥' ज्ञाने. तात्पर्य - १) स्वतःची निंदा करावी. स्तुती करु नये, २) जनांची निंदा अथवा स्तुती करु नये, ३) देवाची निंदा अथवा स्तुती करावी, ४) संतांची निंदा करु नये स्तुतीच करावी.

सुभाषित -

अद्यापि दुर्निवारं स्तुतिकन्या वहति कौमारम।
सतभ्यो न रोचते साऽसन्तोऽप्यस्यै न रोचन्ते॥

अर्थ - स्तुती नावाची कन्या अद्याप कुमारीका आहे. कारण सज्जनांना ही आवडत नाही. आणि दुर्जन हिला आवडत नाहीत.

★ ★ ★ ★ ★

९६ : पत्नी

१) पत्नीचे प्रकार सात आहेत.

स्त्रियांच्या अनेक भूमिका आहेत त्यापैकी मुख्य तीन कन्या, पत्नी, आई. मराठीत जी नाती आहेत. त्यांच्या नावात अर्थ भरला आहे.

पत्नी - या शब्दाचा अर्थ चांगली वागली तर ठिक नाहीतर पतीस पतनास नेणारी ती पत्नी.

दादा - दा म्हणजे ओझे ओढणारा. डवल दा. लहान भाऊ, बहिणीचे ओझे वाहणारा खरा तर दास पण दादा, दा म्हणे देणे. लहानांना देणारा तो दादा. आणखी एक उलटा अर्थ, लहान भावांना दादच लागू न देणारा तोही दादाच.

जाऊ - आता एकत्र राहू पण कालांतराने वेगळे जाऊ.

नणंद - जी नांदायला गेल्याशिवाय भाऊ भावजय यांना न आनंद ती नणंद !

नातू - नातू आजोबांना सांगतो यापुढे शेतीचा, संपत्तीचा मालक मी, ना - तू, तुम्ही देऊळ धरायचे पहा !

तात्पर्य - पत्नी पतनास नेते किंवा पावन करते असा.

१) व्यभिचारी पत्नी - वर वर नवऱ्यावर प्रेम दाखविणे व यारावर खरे प्रेम करणे.

ज्ञानेश्वर महाराज यांच्या दोन ओव्या चिंतनीय आहेत

का कांताच्या मानसी। रिगोणी स्वैरिणी जैसी।
रहाटे आणिकांसी। जावया लागी॥
वल्लभाचिया उजरिया। आपणया प्रति कुस्त्रिया।
जोडोनि तोषिती जैसिया। अहेवपणे॥
पतिव्रता ऐसी जगामाजी ख्यात। भोगी पाच सात अंधारी ते॥ तु. म.

उदा : भर्तृहरी राजाच्या दोन वायका पिंगला व शामदेवी. पिंगला लहान तरुण सुंदर म्हणून आवडती. शामदेवी नावडती. एकदा राज्यात साधू येतो व राजास एक दिव्य फळ देतो. फळांत अशी शक्ति असते जो प्राशन करील त्याचं आरोग्य सुधारणार व आयुष्य वाढणार. राजा जीवलग राणीस ते फळ देतो. राणीचे प्रेम प्रधानजीवर असते. ते फळ राणी प्रधानजीना देते. प्रधानाचे प्रेम एका गणिकेवर असते. प्रधान ते फळ गणिकेस देतो. गणिकेचे प्रेम राजावर असते. शेवटी ते फळ राजाकडे येते. राजा चौकशी आयोग नेमतो. पत्नीचा राज्याचा त्याग करतो व गोरक्षनाथांचा शिष्य बनतो. भर्तृहरीचा एक प्रसिद्ध श्लोक आहे.

यां चिंतयामी सततं मयी सा विरक्ता।
स अप्यन्यम् इच्छती जनो स जनो अन्यऽसक्तः।
अस्मत कृतेपी परितुष्यती काचितऽन्या।
धीक ताम च ताम च मदनाम् च इमाम् च माम च॥

अर्थ : मी जिचे चिंतन करतो तिचा जीव दुसऱ्यावर आहे. दुसऱ्याचा तिसरीवर आहे. तिसरीचा माझ्यावर आहे. तेव्हां माझा - तिचा - त्याचा, कामाचा धिक्कार असो.

२) कर्कशा - नवऱ्यास त्रास देणारी, पतीची फजिती करणारी. तुकाराम महाराज आपल्या पत्नीस कर्कशा म्हणतात व देवाचे आभार मानतात. 'बरे झाले देवा बाईल कर्कशा। बरी ही दुर्दशा जनामध्ये॥' कारण घरी यावंसं वाटतच नाही. त्यामुळे तुझे चिंतन जास्त होते. त्यांचा एक अभंग-

कर्कशी संगती। दुःख उदंड फजिती॥१॥
इहलोक ना परलोक। मजूर दिसे जैसा रंक॥२॥
तुका म्हणे पायी बेडी। पडली कपाळी कुऱ्हाडी॥४॥

तिसरे चरण गाथ्यात पहावे. लिहिण्यास लाज वाटते. उदाहरणच द्यायचे झाले तर, ब्रह्मदेवाची एक कर्कशा मुलगी, तिचे उद्धालक मुनींशी लग्न होते. अशी पुराणांत कथा आहे. ती नवऱ्याच्या उलट वागणारी. लग्नापासून ऋषींचे शरीर सुधारण्याऐवजी कृश झाले. मित्राने विचारले काय भानगड आहे? पत्नी उलट वागते. मित्राने सल्ला दिला, तुला जे हवे त्याच्या उलट बोलायचे. वडिलांचे श्राद्ध करायचे होते. ऋषी म्हणाले, साधे करायचे. कर्कशा म्हणाली, 'भव्य' करायचे. मंत्र लागू पडला. दहा ब्राह्मणांस बोलवायचे. शंभर बोलवायचे. तयारी झाली. ऋषी म्हणाले नदीस

नैवेद्य मी अर्पण करतो. पत्नी म्हणाली, मी जाणार. जा, पण नदीत जाऊ नकोस. नदीत जाणार. बुडू नको. बुडणार. शेवटी बुडली व मेली. बिना औषधाची खरुज गेली! असे म्हणतात, उद्दालक ऋषी प्रेत पहाण्याकरिता नदीच्या वरच्या बाजूस गेले. लोकांनी विचारले काय शोधता? बायकोचे प्रेत. मग खाली जा, नाही, कदाचित ती उलटी वहात असावी, कारण वागणंच उलट होतं!

३) अर्धपत्नी - अर्धांगीच्या ऐवजी अर्थांगी म्हणणे योग्य. नवऱ्याच्या पैशावर लक्ष. ती अर्थ-पत्नी. नवऱ्यावर विश्वास नसल्यामुळे किंवा व्यसनी असल्यामुळे बँकेत जोडखाते उघडते.

४) कामपत्नी - सतत कामाची इच्छा करणारी. हे नाही, ते नाही म्हणून नवऱ्यास सतावणारी. कामपत्नी.

देहगृहाचि ''कामिनी''। ती तंव राहिली भुवनी।
मी जळतसे स्मशानी। अग्निसवे एकला॥ नाम.

५) धर्मपत्नी - नवऱ्याचे जे धर्म त्याप्रमाणे वागणारी. पूर्वी कर्नाटकांत वाचस्पती नांवाचे ब्राह्मण होऊन गेले. त्यांचे लग्न झाले आणि त्यांनी एक ग्रंथ लिहिण्यास घेतला. अर्थात पत्नीने फार सेवा केली. जेवण-पाणी-बत्ती वगैरे. यात छत्तीस वर्षे गेली. ग्रंथ पूर्ण झाला. सिंहावलोकन करताना दिवा विझला. पत्नीने तत्परतेने लावला. ब्राह्मणांनी विचारले, आपण कोण? आपणास आठवते कां? छत्तीस वर्षांपूर्वी आपले लग्न झाले होते, ती आपली धर्मपत्नी! माझ्याकरिता तू आयुष्य जाळलंस? आपलं नांव काय? छत्तीस वर्षे नांव माहित नाही. हल्ली लग्नाच्या अगोदर नांव घेण्यास सुरुवात. या देहास 'भामिनी' म्हणतात. वाचस्पतीने ग्रंथास नांव दिले, 'भामिनी'. हा व्याकरणाचा ग्रंथ जगात प्रसिद्ध झाला. ही 'धर्मपत्नी'

६) मोक्षपत्नी - नवऱ्यास मोक्ष देणारी. तुळशीदासांची पत्नी रत्नावली. बायकोवर फार प्रेम. एकदा न सांगता माहेरी गेली. तुळशीदास पावसाची, पूराची तमा न करता रात्रीचे निघाले. ओंडका समजून प्रेतावर बसले. दोरी समजून सापास पकडले व रत्नावलीस भेटले. रत्नावली आश्चर्यचकित झाली. तिने सांगितले या हाडामासावर जसे प्रेम करता तसे श्रीरामावर केले तर भवसागर पार होईल. तुळशीदास गेले. राम भजन करू लागले. रामाचे दर्शन झाले. तुळशीदासांना विचारले, आपल्या जीवनांत परिवर्तन कसे झाले? तुळशीदास म्हणतात, 'कटे एक रघुनाथ संग बांधी जटा शिरकेश। हम तो चाखा प्रेमरस पत्निके उपदेश॥' अशी मोक्षपत्नी सर्व पुरुषांना मिळाल्यास सर्वांना मोक्ष मिळेल. पण असं सौभाग्य सगळ्यांना शक्य आहे कां?

७) सेवापत्नी - पतीसेवेपुढे मोक्षसुख नको. जशी पार्वती किंवा सीता. नाथ महाराज म्हणतात -

'केवळ स्त्री नव्हे सीता। ते निजभक्त जाण तत्वता।
सांडोनि राजभोगा समस्ता। सेवेच्या ''निजस्वार्था'' वना आली॥

म्हणून म्हणतात - ग्रंथात गीता, प्रेमात माता आणि पतिव्रतेमध्ये सीता. असे हे सात पत्नी प्रकार पडतात.

★ ★ ★ ★ ★

१७ : पतिव्रता

पतिव्रतेस भारतीय संस्कृतिमध्ये अतिशय महत्व आहे. शिवाय संताना, देवास या स्त्रियाविषयी अतिशय आदर आहे.

पती हेच जीचे व्रत ती पतिव्रता!

ज्ञानेश्वर महाराज म्हणतात.

पतीचिया मता। अनुसरोनि पतिव्रता। अनायासे आत्महिता। भेटेचि ते॥ ज्ञाने.
पतिव्रतेचे हृदय जैसे। पतिवाचोनि न स्पर्शे। मी सर्वस्व या तैसे। सुभटासी॥ ज्ञाने.
तरी एक प्रियोत्तम। वाचोनी वाढो नेदी काम। जैसा कां मनोधर्म। पतिव्रतेचा॥ ज्ञाने.
पै आघवाचि भोगेसी। पतिव्रता क्रिडे पतीसी।
कि तयाची नामे जैसी। तपे तिया केली॥ ज्ञाने.
एकही व्रत एक धर्म नेमा। काया वचन मन पती पद प्रेमा॥ तुलशी.

तुळशीदासांनी पतिव्रतेचे चार प्रकार सांगितले. अर्थात हे शरीरसंबंधावर आधारीत आहेत. तुळशीदासांनी याकरीता वेदपुराण संत यांची मते सांगितली आहेत.

''जग पतिव्रता चारी विधी अहही। वेद पुराण संत सब कहहि॥
उत्तम के अस बस मनमाहीं। सपनेहुँ आन पुरुष जग नाही॥
मध्यम परपती देखई कैसे। भ्राता पिता पुत्र निज जैसे॥
धर्म विचारी समुझी कुल रहई। सो निकिष्ठ त्रिय श्रुती अस कहई॥
बिनु अवसर भय ते रह जोई। जानेऊ अधम नारी जग जोई॥
बिनुश्रम नारी परम गती लहई। पतिव्रता धर्म छाडी छल गहई॥

थोडक्यात अर्थ - उत्तम पतिव्रता ती जिच्या स्वप्नातही परपुरुष येत नाही. मध्यम ती परपुरुष स्वतःच्या वडिल, भाऊ, मुलगा समजते. अधम ती धर्माचा, कुळाचा विचार करुन राहते. अधमाधम ती व्यभिचार करण्यास संधी मिळाली नाही किंवा भितीने चांगले वागते. तुलशीदास म्हणतात स्त्रिला विनाश्रम चांगली गती प्राप्त होते. पतिव्रता असेल तर, नाहीपेक्षा फार छळ सोसावा लागतो. तुकाराम महाराज म्हणतात.

पतिव्रते जैसा भ्रतार प्रमाण। आम्हा नारायण तैशापरी॥

पतिव्रता नेणे आणिकांची स्तुती। सर्वभावे पति ध्यानी मनी ॥ तु. म.

यामध्ये तीन प्रकार पडतात १) पतिव्रता, २) सती, ३) प्राणेश्वरी. पतिव्रतेचे वर्णन वर आले आहे. आता सती म्हणजे काय पाहू. पती मेल्यानंतर त्याच्या बरोबर आनंदाने सती जाते.

तुकाराम महाराजाचा एक अभंग आहे.

आगी देखोनिया सती। अंगी रोमांच उठती ॥ १ ॥
हा तो नव्हे उपदेश। सुख अंतरी उल्हास ॥ २ ॥
वित्तगोताकडे। न पाहे न रडे ॥ ३ ॥
आठवूनि एका। उडी घाली म्हणे तुका ॥ ४ ॥

पूर्वी सतीची चाल होती. ती सध्या बंद आहे. पण मधेमधे अशा घटना घडतात. म्हणून कोणत्याही कठिण कामास सतीचं वाण म्हणतात. पण सतीपेक्षा श्रेष्ठ आहे प्राणेश्वरी अर्थात नवऱ्याच्या मरणाची वार्ता कानावर पडल्याबरोबर जिचे प्राण पाखरु कुडीतून निघून जाते ती प्राणेश्वरी.

सती व प्राणेश्वरी ज्ञानेश्वर महाराज एकाच ओवीत लिहीतात.

वोखटे मरणा ऐसे। तेही आले अग्नि प्रवेशे।
परी प्राणेश्वरोद्देशे। न गणिच सती ॥ ज्ञाने.

भक्तिविजय ग्रंथात जयदेव (व्यासांचे अवतार) व पद्मावती यांची कथा आहे. पण महाराष्ट्रात एक अद्‌भुत घटना घडली. धुंडा महाराज देगलूरकर यांच्या देहांताची बातमी त्यांच्या पत्नी कृष्णाबाई यांना समजताच प्राण सोडले. दोघांची एकच अंत्ययात्रा व एकच सरण. म्हणून म्हणावे वाटते धन्य ते मरण!

आपण तीन प्रकार पाहिले. पण पतिव्रता ओळखायची कशी? तर शास्त्रात पतिव्रतेची सहा लक्षणे सांगितली आहेत.

कार्येषु मंत्री करणेषु दासी, भोज्येषु माता शयनेषु रंभा।
धर्मानुकुला क्षमया धरित्री षाड्गुण एतद्धी पतिव्रतानाम ॥

अर्थ - कार्यात मंत्र्याप्रमाणे, सेवेत दासीसारखी, जेवणांत आईसारखी. शयनांत रंभेप्रमाणे, धर्मामध्ये अनुकुल असणारी व नवऱ्याचे अपराध पृथ्वीप्रमाणे सहन करणारी. अशी पतिव्रतेची सहा लक्षणे आहेत.

पतिव्रतेचा अधिकार पाहू व ही कोटी संपवू. तुकाराम महाराजांचे एक क्षेपक प्रमाण आहे.

तुका म्हणे पतिव्रता। तिची देवावर सत्ता ॥

मार्कंडेयं पुराणात मांडवीची (शैव्या) कथा आली आहे. दुर्दैवाने तिला कुष्टरोगी पती

मिळतो. पण ती काया वाचा मने करुन तशा पतीची सेवा करते. पतीचे नाव कौशिक ब्राह्मण. रामायणात सीतेस अनुसया उपदेश करते.

नगरस्थो वा वनस्थो वा शुभो वा अशुभः। यासां स्त्रीनाम प्रियो भर्ता तासां लोक महोदयः।
दुःशील कामवृतो वा धनेर्वा परिवर्जितः। स्त्रीनाम आर्यस्वभावानाम् परमम् दैवतं पतीः ॥

अर्थ - पती नगर अथवा वनवासी असो, शुभकार्य करो वा अशुभ करो, स्त्रीस तो प्रिय हवा. दुराचारी, कामी, धनहिन, सर्वांनी टाकलेला असला तरी आर्य स्वभावाच्या स्त्रीला पती परम दैवतच होय. एकदा मांडवी आपल्या पतीस फिरावयास नेते. त्याचे मन एका गणिकेवर जाते. पतीच्या मनोरथाकरिता ती गणिकेची सेवा करते. ती वेश्या प्रसन्न होते. पतीस रात्रीस आणावयास सांगते. मांडवीचा आनंद गगनात मावत नाही. पतीस पाटीत घालून ती रात्री गणिकेकडे निघते. वाटेत मांडव्य ऋषीस सुळावर चढविलेले असते. हिच्या पाटीचा धक्का त्याला लागतो व त्यांना असह्य वेदना होतात. मांडव्य शाप देतात. पती सुर्योदयावरोबर मरेल. मांडवी कंबर कसते. सूर्य उगवतोच कसा पहाते. दहा दिवस सूर्य उगवत नाही. ब्रह्मांडात हलकल्लोळ माजतो. सर्व देव मांडवीजवळ येतात. अनुसया मांडवीस प्रार्थना करते, एका तुझ्या पतीमुळे जगाचा कारभार खोळंबला आहे. मांडवी म्हणते ''आप मोहे पिछे डूब गयी दुनिया'' माझा पती जिवंत नसेल तर मला जगाचा काय उपयोग? शेवटी अनुसया तडजोड करते. ऋषींचा शाप खरा होण्याकरीता सुर्योदयावरोवर पती जाईल. पण मी पाच मिनिटात माझ्या पातिव्रत्य सामर्थ्याने पतीस जिवंत करते. शिवाय जवान व निरोगी करते. मांडवी तयार होते. तिचा पती कौशिक सर्वोत्तम होऊन मिळतो. धन्य पतिव्रतेचे सामर्थ्य. पाच पतिव्रतेचे वर्णन करणारा एक श्लोक आहे.

अहिल्या द्रौपदी सीता तारा मंदोदरी तथा।
पंचकन्या स्मरण नित्यं महापातक नाशनम् ॥

अर्थ - अहिल्या (गौतम पत्नी) द्रौपदी, सीता, तारा (वाली पत्नी), मंदोदरी (रावणपत्नी) या पाच कन्यांची नावे घेतल्यास आपली महापातके नाश पावतात. सूक्ष्म पाहिले तर या पतिव्रता आहेतच पण 'कन्या' म्हणून वर्णन आहे. या पाचजणींचा राम किंवा कृष्ण यांच्याशी संबंध आला म्हणजे त्या भक्त झाल्या. त्यामुळे त्यांच्या नामामुळे आपली पातके जातात.

मैना पार्वतीस सांगते.

करेऊ सदा शंकर पदपूजा। नारी धरम पती देव न दुजा ॥ तुलशी

पार्वती, सदा शंकराची पदपूजा कर, कारण नारीचा हाच धर्म, हाच तिचा देव. धन्य ती स्त्री जी पतिव्रता आहे. धन्य तो भारत देश, ज्या देशांत अनेक पतिव्रता झाल्या व आहेत.

★ ★ ★ ★ ★

९८ : प्रतिबंध

परमार्थाला आड येणारे प्रतिबंध म्हणजे अडथळे दूर व्हावे लागतात. देव आपल्या अंतःकरणातच आहे. जसे सूर्य दिसण्याकरीता ढग बाजूला जावे लागतात किंवा शेवाळ बाजूला सारल्यास पाणी मिळते. माऊली म्हणते. वारा आभाळचि फेडी। वाचूनि सूर्याते न घडी। हात बाभूळ धाडी। तोय न करी ॥ ज्ञाने.

या प्रतिबंधाचे मुख्य तीन प्रकार सामान्य, मध्यम, विशेष.

अ) सामान्य - यामध्ये आठ सामान्य प्रतिबंध आहेत.

१) आळस - परमार्थी माणूस आळशी असता कामा नये. सदा तत्पर हवा.
नितीशास्त्र सांगते

'आलस्यहि मनुष्यानां शरिरस्थो महान रिपुः ॥'

आळस माणसाचा शत्रू आहे.

न करी आळस रामनामी ॥ तु. म.

२) विलासिता - विलासी जीवनात आयुष्य खर्च करु नये. शरीरास आवश्यक तेवढेच उपभोगात आणावे. भोगाचे आठ प्रकार शक्यतो वर्ज करावे.

सुगंधं वनिता वस्त्रं गीतं तांबुल भोजनं।
शय्याच कुसुमं चैव भोगाष्टक मुदाहृतः ॥ सुभा.

सुगंध, स्त्री, वस्त्र, गाणे, पान, भोजन; गाद्यागिरद्या, फुले यामध्ये आसक्ती नको.

३) प्रसिद्धी - आपला नाव लौकीक व्हावा याच्या मागे लागल्यास देव दुरावेल.

४) मोठेपणा - साधकाच्या जीवनात मानाचा अभाव हवा. अमानित्व हवे. मानाच्या मागे लागल्यास अपमान होण्याची शक्यता असते. ''मान इच्छी तो अपमान पावे ॥ तु. म.

५) दांभिकपणा - बाहेरी दिखावा नसावा. दंभाची व्याख्या माऊली सांगते

जेणे सत्याचा भोकसा काढीला। मग असत्य तृणकुटा भरीला।
तो दंभ रुढविला। जगी इही ॥ ज्ञाने.

आपले पाप लपविणे.-पुण्य दाखविणे यास दांभिकता म्हणतात, अशांची शेवटी फजिती होते. जसे वांझेने गर्भारपणाचे सोंग करणे.

६) परदोष चिंतन - साधकाने दुसऱ्याचे दोष पाहू नये. आपले दोष पहावे व दूर करावे दुसऱ्याकडे एक बोट दाखविताना आपल्याकडे तीन बोटे असतात. आपण तिप्पट दोषी ठरतो.

७) संसारीक कामाची अधिकता - काही माणसे म्हणतात. आम्हास डोके खाजविण्यास वेळ नाही. अर्थात खोट्या संसारास वेळ, खऱ्या परमार्थास वेळ नाही. शेवटी बरोबर काय येणार? एक सुभाषित आहे.

शतं विहाय भोक्तव्यं सहस्त्रं स्नानं आचरेत।
लक्षं विहाय दातव्यं कोटीं त्यक्त्वां हरिम् भजेत ॥

माणसाने शंभर कामे टाकून भोजन करावे. हजार कामे टाकून स्नान करावे. लाख कामे टाकून दान करावे. कोटी कामे टाकून 'भजन' करावे. तुकाराम महाराज म्हणतात. पोटापुरते काम। परी अगत्य तो राम ॥

८) गुरुभाव - साधक अवस्थेमध्ये गुरु होण्याचा प्रयत्न, शिष्य शाखा निर्माण करणे. मठाच्या भानगडीत पडणे. शेवटी बंधनात सापडणे यास गुरुभाव म्हणतात. माऊली म्हणते. 'शिष्य शास्त्राचेनि विलासे। मठादि मुद्रेचेनि मिसे। घातली आहाती फासे। निसंगा जेणे ॥' हे सामान्य आठ अडथळे आहेत.

ब) मध्यम अडथळे - भूत, वर्तमान, भविष्य प्रतिबंध

१) भूत - भूतकाळातील आठवणीत आयुष्याचा वेच करणे. तुकाराम महाराज अभंगात दृष्टांत देतात. एक मेंढपाळ कथेस येतो. पुराणिक दाढीवाला असतो. पुराण सांगताना मेंढपाळ रडतो. लोकांना आश्चर्य वाटते हा आजच येऊन याचे अष्टसात्विक भाव जागृत दिसतात. कथा संपल्यानंतर लोक विचारतात. आपल्या डोळयात अश्रू कसे? मेंढपाळ सांगतो. माझा एक बोकड मेला. त्याची दाढी पुराणिकासारखी होती. त्यास दोन शिंग होती (ब्रह्म, माया) चार पाय होते (चार वेद) वगैरे वगैरे. ''देखोनि पुराणिकाची दाढी। रडे स्फुंदे नाक ओढी ॥ यास भूत प्रतिबंध म्हणतात.

२) वर्तमान - सध्याच्या आठवणीत वेळ जाणे. नाथ महाराजांच्याकडे एक सेवानिवृत्त माणूस गीता शिकण्यास आला. नाथ म्हणाले आपले वय झाले. आपण राम राम म्हणावे तो ऐकेना. शेवटी नाथांनी सांगितले उद्या आपण एक गोष्ट ध्यानात धरुन या तो दुसऱ्या दिवशी मनात गाढव धरुन आला. नाथांनी सांगितले. मनात धरलेली वस्तू विसरुन हे एक प्याला दूध प्या. जेव्हा पेला ओठाजवळ यायचा तेव्हा गाढव पुढे यायचे. शेवटी दूध पिता आले नाही. नाथ म्हणाले. आताच मनात धरलेले गाढव विसरता येत नाही. आपण जन्मभर संसार केला तो कसा विसराल? यास वर्तमान प्रतिबंध म्हणतात.

३) भविष्य - भविष्य काळातील चिंतेत आयुष्य घालविणे. दृष्टांत भरत राजाचा, ज्याने देवाकरीता अनुकूल राज्य त्यागले. मात्र शेवटी हरणाच्या पाडसावर लक्ष गेले. मी मेल्यानंतर याचे काय होईल. फळ मिळाले, पुढचा जन्म हरणाचा. जड भरत राजा हरणी गर्भा गेला। घाला तो घातला वासनेने ॥ तु. म. यास भविष्य प्रतिबंध म्हणतात.

क) विशेष प्रतिबंध - काम क्रोधादि विकार जर दूर झाले. तर देव मिळालाच समजा. 'काम क्रोध आड पडले पर्वत। राहिला अतंन पलिकडे॥' तु. म. 'तया स्वांतःकरण जीता। सकळ 'कामोपशांतां। परमात्मा परौता। दुरी नाही॥' ज्ञाने. काम क्रोधादी षड्रिपु जर हृदयातून कामचे गेले तर राम आतच आहे. तो प्राप्तच आहे. मूर्तीच्या प्रदर्शनात एका मूर्तीकाराचा पहिला नंबर आला त्याचा सत्कार करुन त्याची मुलाखत घेतली. एवढी सुंदर मूर्ति तुम्ही कशी बनविली? त्याने सांगितले एक मोठा दगड घेतला त्यात मूर्ती होतीच मी माझ्या कलाकौशल्याने मूर्तीच्या आड येणारा सर्व अनावश्यक भाग दूर केला मूर्ती तयार झाली. तात्पर्य हे कामक्रोधादि विकार अनावश्यक आहेत. ते गेले तर "तैसा हृदयामध्ये मी रामू। असता सर्व सुखाचा आरामू॥" ज्ञाने. आपला राम जो सर्व सुखाचा आराम आहे तो मिळतोच. एका वाक्यात काम गेला तर राम आला. असे हे प्रतिबंधाचे प्रकार.

★ ★ ★ ★ ★

९९ : इतर

योग

योग हा शब्द युज धातुपासून तयार झाला आहे. युज म्हणजे जोडणे. अर्थात काय जोडायचे? तर मानवाने देवाची जोड करावे.

जोडिन ते आता देवाचे चरण। अविनाशी धन परमार्थ॥ तु. म.

आपण सर्व देवापासून विभक्त झालो आहोत म्हणून संकुचित आहोत व अनादिकालापासून दुःख भोगीत आहोत. ज्ञानोबाराय दृष्टांत देतात.

लवण समुद्री न पडे। तव वेगळे अल्प आवडे। मग होय सिंधुची एवढे। मिळे तेव्हा॥ ज्ञाने.

जोपर्यंत मीठ वेगळे आहे. तोपर्यंत ते अल्प, बरणीत, पाट्यावरवंट्याखाली येते. पण समुद्रात पडताच समुद्राएवढे होते. तद्वत जीव देवाचा अंश आहे. तो देवास मिळाला (जोडला गेला) की देवा एवढाच होतो. मात्र जोडणे अवघड व तोडणे अतिशय सोपे आहे. अंगुलीमाल नावाचा राक्षस सर्वांना त्रास देत होता. त्याने लोकांना मारुन त्यांच्या बोटांची माळ गळ्यात घातली होती. भगवान बुद्ध त्या गावी गेले. लोकांनी राक्षसाचा प्रताप सांगितला. बुद्ध अंगुलीमालास भेटण्यास निघाले. काहींनी जाऊ नका सांगितले. पण बुद्धांचे मनोगत कोण ओळखणार! बुद्ध राक्षसाजवळ गेले. अंगुलीमालास आश्चर्य वाटले. तो बोलला आपले दिवस भरलेले दिसतात. बुद्ध मनात म्हणाले तुझे दिवस मी बदलणार आहे. भगवानानी त्यास एक झाडाचे पान तोडण्यास सांगितले. राक्षस म्हणाला झाडच तोडून देतो. भगवान म्हणाले नको फक्त पान हवे. पटकन पान तोडले. भगवान बोलले आता तोडलेले पान जोडा. मी तुमच्या हातून

मरण्यास तयार होईन. अंगुलीमाल वरमला. म्हणाला तोडणे सोपे आहे जोडणे अवघड आहे. भगवान म्हणाले मी जोडले तर, राक्षस म्हणाला मी आपला कायमचा गुलाम होईन. भगवान बुद्धांनी ते पान जसे होते तसे जोडले व अंगुलीमाल भगवान बुद्धाचा कायमचा शिष्य बनला. तात्पर्य तोडणे सोपे पण जोडणे अवघड आहे. माणसांना पण जोडणे अवघड पण तोडणे एकदम सोपे! तद्वत परमात्मा आपल्यापासून दूर आहे. तो जोडणे याचेच नाव योग. गीतेचे१८ अध्याय म्हणजे १८ योगच सांगितले आहेत. या १८ अध्यायात तीन योग आहेत. कर्मयोग, ज्ञानयोग व भक्तियोग. सहाव्या अध्यायात अष्टांग योग पण सांगितला आहे. १) यम, २) नियम, ३) आसन, ४) प्राणायाम, ५) प्रत्याहार, ६) ध्यान, ७) धारणा, ८) समाधी. या सर्वांचा उद्देश एकच आहे. देवाचा व जीवाचा जो वियोग झाला आहे तो संयोग घडवून आणणे.

२) पती प्रकार

१) पती, २) उद्योगपती, ३) लाखोपती, ४) करोडोपती, ५) सभापती, ६) राष्ट्रपती, ७) सेनापती, ८) छत्रपती, ९) महिपती, १०) मठपती, ११) वाचस्पती, १२) बृहस्पती, १३) कुलपती, १४) श्रीपती, १५) गणपती, १६) प्रजापती, १७) वनस्पती, १८) पशुपती, (पार्वतीपती)

३) गीता श्लोक

गीता श्लोक - एकूण ७००.

भगवान उवाच - ५७४, अर्जुन, ८४, संजय ४१, धृतराष्ट्र १, एकूण सातशे.

४) अर्जुनाची ज्ञानेश्वरीतील नावे

१) अर्जुन, २) पार्थ, ३) पांडव, ४) पंडुसुत, ५) किरिटी, ६) कुंतीसुत, ७) कपिध्वजा, ८) सुभट (वीरा-विरेशा-विरश्रेष्ठा), ९) सुभद्रापती, १०) सव्यसाची, ११) धनंजया, १२) धनुर्धरा, १३) महाबाहो, १४) फाल्गुणु, १५) भक्तराज, १६) कुटिलालमस्तका (कुरळ्या केसांचा) १७) प्रियोत्तम, १८) उन्मेषसुलोचन, १९) भारत, २०) चतुरनाथा, २१) सुमती, २२) श्रोतेमुखटिळका, २३) अनघा, २४) विजय, २५) नर, २६) गुडाकेश, २७) धर्मानुज

५) अक्षौयणी

अक्षौयणी २,१८,७०० × १८ अक्षौयणी - ३९,३६,६०० (महाभारतातील सैन्य), चतुरंग सैन्य म्हणजे १) हत्ती, २) रथ, ३) घोडे, ४) पायदळ

६) कमळ

कमळाचे सात प्रकार १) चरण कमळ, २) नाभीकमळ, ३) हृदयकमळ, ४) करकमळ, ५) मुखकमळ, ६) नेत्रकमळ, ७) शिरकमळ

७) लक्षणा

१) जहदलक्षणा - शब्दाचा त्याग - अर्थाचा बोध.
गंगेवर गौळीवाडा आहे. गंगेच्या काठावर शब्दाचा त्याग, तीराचा स्विकार,

२) अजहदलक्षणा - शब्दावरुन वस्तूचा बोध. तांवडा पळतो आहे.
तांवडा घोडा, गाय, मोटार वगैरे.

३) अहदाजहदलक्षणा - व्यक्ति न बदलणे, कांती, देश, वय, अवस्था बदलणे व्यक्ति तिच, तोच हा श्रीमंत पण आता गरीब झाला. पूर्वी हा गुरे राखत होता आता तोच नगरशेठ झाला. सर्व गोष्टीत फरक पडणे.

८) काय करावे ?

१) जिंकावे काय ? अंतःकरण, मन, 'तया स्वातःकरण जीता ।।' ज्ञाने.
२) टाकावे काय ? काम क्रोध, लोभ, 'तस्मात एतत् त्रयं त्यज्येत ।।' गीता
३) जाणावे काय ? स्वस्वरुप.
४) भजावे काय ? गुरु, संत, देव, 'म्हणोनि जानतेनि गुरु भजीजे ।।' ज्ञाने.
५) धरावे काय ? नाम 'कंठी धरीला कृष्णमणी ।' तु. म.
६) सोडावे काय ? निंदा, संसाराची आसक्ती, सोडिला संसार । माया तयावरी फार ।। तु. म.

९) मणी

मण्यांचे प्रकार सामान्य ८४ प्रकार आहेत. वाङमयात १२ आढळतात.
१) चंद्रकांत, २) सूर्यकांत, ३) वासरमणी, ४) पारसमणी, ५) स्यमंतकमणी, ६) स्पटिकमणी, ७) कौस्तुभमणी, ८) नागमणी, ९) चिंतामणी, १०) वैरागरमणी, ११) नादनिधी मणी, १२) देवमणी.

१०) प्रलय

१) नित्यप्रलय - रोजचा, झोपेतून जागे होणे.
२) प्रलय - ब्रह्मदेवाचा एक दिवस. ८ हजार युगे,
३) महाप्रलय - ब्रह्मदेवाचे १०० वर्षाचे (दिव्य) आयुष्य संपल्यानंतर अथवा दोन परार्ध वर्ष संपल्यानंतर
४) आत्यंतिक प्रलय - जन्ममरण संपणे, मोक्ष मिळणे, मुक्त होणे.

११) योग वियोग

१) जीवनात काही गोष्टीचा योगच येऊ नये. भांडण, दुष्टसंग
२) योग यावा पण लगेच वियोग व्हावा - जावई, पाहुणा वगैरे

३) योग यावा पण वियोग होऊ नये - संतसंग,परमात्मा

एका जनार्दनी मज घडो त्यांचा संग । न व्हावा 'वियोग' जन्मोजन्मी ।। नाथ.
पडिले दूरदेशी मज आठवे मानसी । नको नको हा 'वियोग' कष्ट होताती जीवाशी ।। ज्ञान.

१२) संग

१) माणसाचा जन्मच स्त्रीपुरुप संगातून निर्माण झाला आहे.
२) माणूस हा संगप्रिय आहे. समाजात राहतो.
३) माणसाचे पतन अथवा उद्धार संगामुळे होतो.

पतन उद्धार संगाचा महिमा । त्यजावे अधमा संत सेवी ।। तु. म.

संगामुळे माणसांची किंमत वाढते अथवा घटते. दुधात पाणी मिसळले तर दुधाची किंमत कमी होते. पाण्याची वाढते. धान्यात खडे टाकले तर धान्याची किंमत कमी होते, खड्यांची वाढते. एकाच आईच्या उदरी जन्मलेले पोपट चोराकडे राहणारा शिव्या देतो, मात्र सायुकडे राहणारा सुस्वागतम म्हणतो. हा सर्व संग महिमा आहे.

सत्संगत्वे निसंगत्व, निसंगत्वे निर्मोहत्वं ।
निर्मोहत्वे निश्चलचित्तं निश्चलचित्ते जिवनमुक्तीः । शंकराचार्य

अर्थ - सतसंगाने निसंगत्व प्राप्त होते. निसंगत्वाने मोह नाहीसा होतो. मोह गेला की चित्त स्थिर होते. चित्ताच्या स्थिरतेने जीवनमुक्ति मिळते.

बैसता संताचे संगती । कळो आले कमळापती ।
आपुले कोणीच नव्हती । निश्चय चित्ती दृढ झाला ।। तु. म.

बिनुसतसंग न हरिकथा तेहि बिनु मोह न भाग ।
मोह गये बिनु राम पद होई न दृढ अनुराग ।। तुलशी.

महाभारतातील एक श्लोक आहे. संताच्या संगाने संत होशील, तपस्वीच्या संगतीने तपस्वी व चोरांच्या संगतीने चोर होणार. ज्याप्रमाणे प्रथम कपडा पांढराच असतो. जसा रंग द्यावा तसा दिसतो. तात्पर्य जसा संग तसा रंग

यदि संत सेवती यद्यसंतं तपस्विनं यदि वा स्तेनमेव ।
वासो यथा रंगवशं प्रयाति तथा स तेषां वशमभ्युपैति ।। म. भा.

म्हणून ज्ञानोबाराय म्हणतात.

संताच्या संगती मनोमार्ग गती । आकळावा श्रीपती येणे पंथे ।।

तथापि दुर्जनांचा संग पूर्ण वर्ज करावा.

दुःसङ्गः सर्वथैव त्याज्यः ।। ना. भ. सू. ४३

नको दुर्जनाचा संग। क्षणोक्षणा चित्त भंग॥ तु. म.

दुर्जन कोणास म्हणतात ज्याची बुद्धी, विचार, आचार (क्रिया) बोलणे वाईट त्यास दुर्जन म्हणतात.

दुर्विचारा दुर्विचेष्टाः दुस्प्रज्ञाः प्रियसाहसाः।
असंतस्त्विति विख्याताः संतश्चाचार लक्षणा॥ सुभा.

स्त्री व स्त्रैण यांचा संग फार घातक आहे. यदा कदाचित स्त्रीसंग इतका बाधक नाही पण स्त्रैणांचा (स्त्री लंपट) संग अधोगतीस कारण आहे. तुलशीदास तर म्हणतात देवा नरक चालेल पण दुष्टांचा संग नको.

बरु भल वास नरक कर ताता। दुष्ट संग जनी देई विधाता॥ रामा.

दुःसंगाचे दोन प्रकार बाह्य व अंतर. बाह्यसंगापेक्षा अंतर संग म्हणजे काम, क्रोध लोभ हे अति घातक आहेत.

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते।
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते॥ गी. २/६२

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः।
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति॥ गी. २/६३

अर्थ - विषयाचे ध्यान केल्याने त्याविषयी प्रिती उत्पन्न होते. प्रितीमुळे काम, कामापासून क्रोध, क्रोधापासून संमोहो, संमोहापासून स्मृतिभ्रंश, स्मृतिभ्रंशापासून बुद्धिनाश, बुद्धिनाशापासून त्या पुरुषाचा नाश होतो. हा सर्व आतील संगाचा परिणाम आहे. म्हणून तुकोबाराय म्हणतात.

सर्व संगी वीट आला। तू एकला आवडसी॥

तात्पर्य सत्संग उर्ध्वगतीस व दुःसंग अधोगतीस कारण आहे.

१३) दान

दान - दानाचे परमार्थात विशेष महत्व आहे.

एकदा ब्रह्मदेवाकडे राक्षस, मानव व देव तिघे गेले व विचारले आमचे परम कल्याण कशाने होईल? ब्रह्मदेवाने सांगितले

देव दनुज मानव सभी लहै परम कल्याण।
पालै जो 'द' अर्थको दमन दया अरु दान॥ तुलशी.

देवांनी इंद्रिय दमन, राक्षसांनी दया व मानवाने दान करावे तर त्याचे कल्याण होईल. या जन्मात दिलेली वस्तू शेकडो पटीने जन्मोजन्मी मिळत राहते. हे दानाचे महत्व आहे. नामदेवराय म्हणतात

भूमि दाने होसी भूमि पाळू। कनकदाने कांती निर्मळू।
चंदन दाने सदा शीतळू। जन्मोजन्मी प्राणिया॥१॥
अन्नदाने दृढायुषी। उदकदाने सदासुखी।
मंदिरदाने भुवन पालखी। सुपरिमळ उपचारा॥२॥
वस्त्रदाने सुंदरपण। तांबूलदाने मनुष्यपण।
गोपिचंदने ब्राह्मणपण। अतिलावण्य सुंदरता॥३॥
जे वृक्ष लाविती सर्वकाळ। तयावरी छत्रांचे झल्लाळ।
जे ईश्वरी अर्पिती फळ। नानाविध निर्मळ॥४॥
ऐशा दानाचिया पंक्ति। वेगळाल्या सांगू किती।
एक ध्यारे लक्ष्मीपती। विष्णूदास म्हणे नामा॥५॥

सर्वांना माहित आहे. जन्मोजन्मी श्रीकृष्ण पती मिळावा म्हणून नारदाच्या सांगण्यावरुन सत्यभामा ब्राह्मणांना देवास दान देण्यास निघाली होती. "देव घ्या कोणी देव घ्या कोणी। आइता आला घर पुसोनि॥ तु. म. या जन्मात काही दान दिले नाही तर पुढच्या जन्मी माणूस भिकारी होतो.

बोधयन्ति न याचन्ते भिक्षाद्वारे गृहे गृहे।
दियतां दियतां नित्यं अदातुः फलं इदृश्यम॥ सुभा.

अर्थ - भिकारी भिक मागण्यास येत नाही. तो बोध करतो नेहमी देत रहा. मी कोणास काही दिले नाही म्हणून ही स्थिती झाली आहे.

पूर्वी श्वेत नावाचा विदर्भात एक राजा होऊन गेला. त्याने हजारो वर्षे तप केले व ब्रह्मलोकांस गेला. त्यास दिव्य देह प्राप्त झाला पण खाण्यास काहीच मिळत नव्हते. त्याने ब्रह्मदेवास विचारले. हे असे का? ब्रह्मदेवाने सांगितले आपण तप केले पण दान केले नाही. म्हणून इथे जेवण मिळत नाही. तो राजा जंगलातील (पृथ्वीवरील) स्वतःचे प्रेत खाण्यास येत होता. त्यानंतर अगस्तिच्या दर्शनाने त्याचे हे येणे बंद झाले. तात्पर्य - या लोकांत दान महत्वाचे आहे. दान केल्याने धन वाढत असते.

उपार्जितानां वित्तानां त्याग एवही रक्षणम्।
तडागोदर संस्थानां परीवाह इवाम्भसाम॥ सुभा.

अर्थ - मिळविलेल्या धनाचा त्याग (दान) हेच त्याचे रक्षण आहे. जसे साठलेले पाणी खराब होते. पण वाहते पाणी निर्मळ राहते.

दान देणारा नेहमी उंच राहतो व गौरव प्राप्त करून घेतो.

गौरव प्राप्यते दानान्न तु वितस्य संचयान।
स्थितीरुच्चैः पयोदानां पयोधीनामधः स्थितीः॥ सुभा.

अर्थ - दान देणारा गौरवास पात्र होतो. साठविणारा नाही. जसे पाण्याचे दान न करणारा समुद्र खाली राहिला पण दान करणारा मेघ वर असतो. दानाचे अनेक प्रकार आहेत. पण या दानात पृथ्वी, भूमिदान श्रेष्ठ वाटते.

सुवर्ण रजतं वस्त्रं मणिरत्नंच वासव।
सर्वमेवं भवेद्दत्तं वसुधां यः प्रयच्छति ॥ सुभा.

अर्थ - सुवर्ण, चांदी, वस्त्र, मणि, रत्न वगैरे दानापेक्षा भूमिदान श्रेष्ठ आहे. कारण हे सर्वपदार्थ भूमिपासून तयार होतात. गोदान, कन्यादान, मतदान ही दानेपण श्रेष्ठ आहेत. या सर्वात अन्नदान श्रेष्ठ समजले जाते.

दानामाजी जाण। अतिश्रेष्ठ अन्नदान।
दीनास देऊन सन्मान। द्यावे सदन्न अतिश्रद्धा॥ नाथ.

अन्नदान श्रेष्ठ आहे. पण कोणास द्यावे? गरीव लोकांना शिवाय सन्मानाने, सश्रद्धेने सात्विक अन्न द्यावे. अन्नदानापेक्षा विद्यादान श्रेष्ठ आहे. कारण अन्नाने क्षणिक तृप्ति होते. पण विद्येने अनेक जन्म तृप्ति मिळते.

अन्नदानं महत्दानं विद्या दानं तथाः परम।
अन्नेन क्षणिका तृप्ति यावत जिवेत तु विद्यया॥ सुभा.

विद्यादानापेक्षा सर्वश्रेष्ठ दान आहे कृपादान अथवा अभयदान.

न गो प्रदानं न महि प्रदानं। न च अन्नदानं हि यथा प्रधानम।
यथा वदन्ति बुधः प्रधान। सर्व प्रदानेष्य अभयं प्रधानम॥ सुभा.

अर्थ - गाय, भूमि, अन्न ही प्रधान दाने नाहीत. या सर्व दानात अभय दान श्रेष्ठ आहे असे विद्वान सांगतात. हे दान संतच करु शकतात. अभय उत्तरी संती केले दान। झाले समाधान चित्त तेणे॥ तु. म. कृपादान केले संती। कल्पांतीही सरेना॥ तु. म.

दानाचे चार प्रकार

१) ध्रुव - धर्मशाळा, विहीर, दवाखाना, अनाथालय यांना दान, देणग्या कायमच्या वस्तू आहेत.

२) त्रिक - पुत्रेषणा, लोकेषणा, वित्तेषणा याकरिता दान देणे. शाळेत डोनेशन, नोकरी लागण्याकरीता दान वगैरे.

३) काम्य - इच्छापूर्तीसाठी दान देणे. एखाद्या भटजीकडून देवाकडून, भविष्यकाराकडून काम झाल्यानंतर त्यास दान देणे. हे काम्य दान.

४) नैमित्तीक दान - दुष्काळ, भूकंप, महापूर, विद्यार्थी याकरिता दान दिले जाते त्यास नैमित्तीक दान म्हणतात.

दानाचे तीन दोष आहेत

१) दान देऊन पस्तावणे, २) कुपात्रास दान देणे, ३) श्रद्धेशिवाय दान देणे.

गीतेतील दानाचे तीन प्रकार सात्विक, राजस, तामस

१)

दातव्यमिती यद्दानं दीयतेऽनुपकारिणे।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम॥ गी. १७॥२०

अर्थ - दान करणे हे कर्तव्य आहे या बुद्धीने, परतीची अपेक्षा न करता, काळ ठिकाण व पात्र पाहून दान केले जाते त्यास सात्विक दान म्हणतात.

२)

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।
दीयतेच परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम्॥ गी. १७॥२१

अर्थ - जे उपकाराचा मोवदला, म्हणून अथवा फलाची अपेक्षा धरुन अतिशय कष्टाने दिले जाते त्यास राजस दान म्हणतात.

३)

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते।
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम॥ गी. १७॥२२

अर्थ - अयोग्य ठिकाणी, अयोग्य काळी, अपात्र मनुष्यास जे सत्काररहित व अवहेलनापूर्वक दिले जाते त्यास तामस दान म्हणतात. या श्लोकावरील ज्ञानेश्वरीतील ओव्या पहाणे महत्वाचे आहे.

१४) श्रवण

श्रवण - श्रोत्याचे तीन प्रकार आहे. उत्तम, मध्यम, अधम.

गीता श्रीकृष्णानी जेव्हा सांगितली तेव्हा तिघांनी एकदम ऐकली. पण तिघांना सारखी नाही कळली. १) हनुमान, २) अर्जुन, ३) धृतराष्ट्र

१) धृतराष्ट्राने गीता ऐकली पण मोह गेला नाही.

२) अर्जुनाने गीता ऐकली व मोह गेला असे अर्जुन म्हणाला तरी स्वतःचा पुत्र अभिमन्यु गेल्यानंतर थोडा शोक झाला. याचा अर्थ मोह पूर्ण गेला नाही. कारण मोहाचा पुत्र लोभ व लोभाचा पुत्र शोक आहे.

३) हनुमंतास मात्र गीता पूर्ण कळली व ते तृप्त झाले.

एकदा बाजारात तीन बाहुल्या एका मूर्तिकाराने आणल्या. त्याने सांगितले यातील उत्तम, मध्यम, अधम बाहुली ओळखेल त्यास १० हजार रुपये बक्षिस! बाहुल्या एकसारख्या होत्या त्यामुळे कोणास ओळखता येईनात. त्या बाजारात बिरबल अकबर आले होते. बिरबलने १० हजार रुपये तयार ठेवण्यास सांगितले. पाणी मागविले. एका मूर्तिच्या कानात टाकले ते दुसऱ्या कानातून बाहेर आले. दुसऱ्या मूर्तिच्या कानात टाकले ते तोंडातून बाहेर आले. तिसऱ्या मूर्तिच्या कानात पाणी टाकले ते पोटात गेले. तसे श्रोत्यांचे तीन प्रकार आहेत.

१) या कानाने ऐकायचे त्या कानाने सोडायचे - अधम श्रोता
२) कानाने ऐकायचे व तोंडाने बडबडायचे - मध्यम श्रोता
३) कानाने ऐकायचे व पोटात ठेवायचे - उत्तम श्रोता

श्रोत्यांचे वेगळे चार प्रकार आहेत.

१) चातक - फक्त अध्यात्मिक ऐकणारा एकनिष्ठ
२) हंस - दोन्ही ऐकून चांगले ग्रहण करणारा.
३) शुक - फक्त गोड (विनोद) ऐकणारा.
४) मीन - ऐकून शांत राहणारा, काही न बोलणारा

१५) मोह

मोह - गीतेत मोहाचे तीन प्रकार आहेत.

१) धृतराष्ट्राचा मोह - तामस, पुत्रस्नेहे मोहितु ॥ ज्ञाने.
२) द्रोणाचार्याचा मोह - राजस. स्वतःच्या पुत्राचा (अश्वत्थामा)
३) अर्जुनाचा मोह - सात्विक. नातेवाईकांचा

पण हे सर्व मोह बाधकच आहेत. कारण सोन्याचा, चांदीचा अथवा लोखंडाचा फास हे सर्व बंधनासच कारण आहेत. जसे अकबरला सर्व जावयाना फासी द्यायची होती. बिरबलने तीन प्रकारचे फास तयार केले. इतर लोकाकरिता लोखंडाचे, अधिकाऱ्यांकरिता चांदीचे व बादशहाकरिता सोन्याचा, कारण बादशहापण कोणाचा तरी जावई होता. हे सर्व मोह गेल्याशिवाय मुक्ति नाही. याचा एकच उपाय ज्ञान. याकरिताच गीतेची निर्मिती झाली.

१६) मंदिर

मंदिर या शब्दाचा अर्थ आहे. मं-मंगल, दि- दिव्य, र-रम्य. ज्या ठिकाणी मांगल्य, दिव्यता व रम्यता असते. त्यास मंदिर म्हणावे. देशाच्या दृष्टीने व्यापक विचार केल्यास राम जन्मभूमि, श्रीकृष्ण जन्मभूमि, काशिविश्वनाथ मंदिर ही हिंदूची अस्मिता आहे. देशातील बारा ज्योतिर्लींग मंदिरे, महाराष्ट्राच्या दृष्टीने ज्ञानेश्वर महाराज समाधी. देहू, पैठण येथील मंदिरे, पंढरपूरातील विठ्ठलमंदिर ही महाराष्ट्राची भूषणे आहेत. सार्वजनिक देव मंदिरे-संत मंदिरे यांचा आपणास

स्वाभिमान हवा. प्रत्येक गावात मंदिर पाहिजेच. ती गावची शोभा आहे. यापुढे विचार केला तर घर एक मंदिर हवे. सध्या घर एक थिएटर वाटते आहे. घर मंदिर तर नाहीच पण घर सुद्धा वाटत नाही. अर्थात सर्व टि. व्ही. केवल चा परिणाम आहे. गृहस्थाश्रम सर्व आश्रमांचा आधार आहे. म्हणून श्रेष्ठ आहे. शास्त्रकार सांगतात कोणता गृहस्थाश्रम धन्य आहे?

सानंदं सदनं सुताश्च सुधियः कांता मृदुभाषिणी।
सन्मित्र सुधनं स्वयोषितीरतीः आज्ञापरा सेवका।
अतिथ्यं शिवपूजनं प्रतिदिनं मिष्टान्न पानं गृहं।
साधोः संगमु उपासते हि सततं धन्यो गृहस्थाश्रमः ॥ सुभा.

अर्थ - ज्यांच्या घरी वातावरण आनंदी आहे. (भांडणे नाहीत) मुलगा शहाणा आहे. बायको मृदु बोलणारी आहे. (खेकसणारी नाही) ज्यांचे मित्र सज्जन आहेत. ज्याच्या घरी कष्टाचा पैसा येतो. (दोन नंबरचा नाही) ज्याचे स्वतःच्या बायकोवरच प्रेम आहे. ज्यांचे सेवक आज्ञाधारी आहेत. घरी अतिथी सत्कार होतो. शिवाचे (देवाचे) पूजन रोज होते. मिठान्न खातात व ज्याच्या घरी साधूंची वर्दळ असते. तो गृहस्थाश्रम धन्य होय. असे कोणते घर असावे? तर पांडवांचे. म्हणून तर श्रीकृष्ण नेहमी द्वारका सोडून त्यांच्या घरी येत असत.

ज्ञानदेव म्हणे व्यासाचिया खूणा। द्वारकेचा राणा पांडवाघरी ॥

ज्या घरी सतत देवाचे नामस्मरण होते. ते मंदिरच आहे.

धन्यधन्य ते वैष्णव मंदिर। जेथे नामघोष होय निरंतर॥ भानुदास.

यापुढे जाऊन विचार केला तर प्रत्येक माणसाने आपले हृदयच मंदिर करावे. संतानी हृदयात परमात्मा साठविला व हृदयांचे मंदिर बनविले. 'साठविला हरि। जिही हृदय मंदिरी।' तु. म. अथवा देव अर्जुनास सांगतात 'म्हणोनि अर्जुना अवधारी। तू बुद्धी आपुली सोपारी करी।' 'सहजे आपुलिया मनोमंदिरी। न विसंबे माते ॥' ज्ञाने. कारण हे मंदिर सतत आपल्या बरोबर असते.

१७) ब्रह्म

ब्रह्म - गीता सांगते 'अक्षरं ब्रह्म परमं' ८/३ अर्थात ज्याचा नाश होत नाही. जे नेहमी असते. जे परम आहे. त्यास ब्रह्म म्हणतात. ब्रह्म सूक्ष्म आहे. ब्रह्मापासून आकाश, आकाशापासून वायू, वायूपासून तेज, तेजापासून पाणी, पाण्यापासून पृथ्वी निर्माण झाली. जे व्यापक आहे. त्यास ब्रह्म म्हणतात. ब्रह्माचे तीन प्रकार आहेत. १) ब्रह्म, २) महद् ब्रह्म, ३) परब्रह्म. महद्ब्रह्म म्हणजे माया व मायेच्या पलिकडे, मायातीत जे आहे ते परब्रह्म ''सर्व सुखाचे आगर। बापरखुमा देवीवर ॥'' ज्ञान. रखुमादेवीचा (मायेचा) जो बाप तोच वर (पती) आहे. हे व्यवहारात पटत नाही. पण अध्यात्मात ते सिद्ध होते. नाथ महाराज सांगतात 'तिने बापचि दादला केला। कोण वाईट म्हणे या बोला। अवघे तिच्याच बोलाने चाला। तरी कैवल्य सुख तुम्हाला ॥' कान्होबा तेरे तेरे ते

यासच 'ग्यानवाची मेख' म्हणतात. थोडक्यात मायेचा आधार घेऊन जे आकारास येते ते ब्रह्म व मायेच्या पलिकडे, ते परब्रह्म आहे व माया म्हणजे महदब्रह्म ही पण देवाची शक्ति आहे. या तीनमध्ये तसा भेद नाही. दिसत नाही ते 'ब्रह्म' या व्याखेवरुन नादब्रह्म, शब्दब्रह्म हे शब्द आले आहेत. नामास ज्ञानोबाराय 'परब्रह्म' म्हणतात 'नाम परब्रह्म वेदार्थे ।।' ज्ञाने. श्रीकृष्णास पण नामदेवराय परब्रह्म म्हणतात. परब्रह्म निष्काम तो हा गौळिया घरी ।। देव अथवा ब्रह्म जसे अविनाशी आहे दिसत नाही. तसा 'जीव' आहे. म्हणून प्रत्येकाचा जीव हा ब्रह्मच आहे. असे शंकराचार्य सांगतात. 'ब्रह्मसत्यं जगन्मिथ्या, जिवो ब्रह्मेव नापराः ।।

१८) रंग

रंग - व्यवहारात रंगाचे अनेक प्रकार आहेत. पण परमार्थात चार प्रकारचे रंग दिसतात. १) तामस, २) राजस, ३) सात्विक, ४) शुद्ध सात्विक. जग तीन गुणाचे आहे. म्हणून माणसे तीन रंगात रंगली आहेत.

१)

तत्र सत्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम ।
सुखसंङगेन बध्नाति ज्ञासंडगेन चानघ ।। गीता ।। १४ ।। ६

अर्थ - हे जीव ज्ञानाच्या मस्तीत जगत असतात. ज्ञानेश्वर महाराज सांगतात.

येणेही न सरे । लांकण लागे दुसरे । जे विद्वतेचे भरे । भूत अंगी ।। ज्ञाने.
आपणचि ज्ञान स्वरुप आहे । ते गेले हे दुःख न वाहे । कि विषयज्ञाने होये । गगनाएवढा ।। ज्ञाने.

यामध्ये सर्व विद्वान मंडळी मोडते, डॉक्टर, वकिल वगैरे बुद्धीवादी लोक. या रंगात रंगलेले असतात. (परमार्थाचा रंग सोडून)

२)

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंऽगसमुद्भवम ।
तन्निबध्नाति कौन्तेय कर्मसंङ्गेन देहिनम् ।। गीता १४ ।। ७

हे तृष्णेने वांधलेले असतात. रात्रंदिवस कर्म करत असतात. तोच त्यांचा रंग ! तैसी तृष्णा वाढिनलिया । मेरुहि हाता आलिया । तरी म्हणे एकादिया । दारुणा वळघो ।। ज्ञाने.

३)

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम ।
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ।। गीता १४/८

हे प्रमाद, निद्रा, आळस, झोप यामध्ये रंगलेले असतात.

आणि निद्रेविषयी चांग । जीवी आथी लाग । झोपी जाता स्वर्ग । वावो म्हणे ।। ज्ञाने.

ब्रह्मायु होईजे । मग निजेलियाचि असिजे । हे वाचुनि दुजे । व्यसन नाही । ज्ञाने.

या तीन रंगाचा विचार केला तर १) विभिषण सात्विक रंग, २) रावण - राजस रंग व ३) कुंभकर्ण - तामस रंग (एकाच घरात तीन रंग) आता चौथा जो रंग आहे तो शुद्ध सात्विक रंग आहे. यास परमात्याचा रंग म्हणतात. 'ऐसे करी गा पांडुरंगा । शुद्ध रंगवावे रंगा ।।' तु. म. मागणी करतात व सर्वांनी या रंगात रंगा असे सांगतात. 'रंगी रंगे रे श्रीरंगे । काय भुललासी पतंगे ।।' तु. म. विषयाच्या रंगात रंगू नका. श्रीरंगात रंगून जा. संत मात्र या रंगात रंगलेले असतात.

माझा रंग तुझे गुणी । म्हणे नामयाची जनी ।
रंगले हे चित्त माझे तया पायी । म्हणोनिया घेई हाचि लाहो ।। तु. म
तुका म्हणे मना श्रीरंगाचा रंग । राहिला अभंग एकविध ।।

बाकी तीन रंग जन्ममरणास कारण आहेत. मात्र हा श्रीरंग जन्ममरण संपवितो.

हिंदू - शब्दाची इंग्रजी व्याख्या अतिशय उपयुक्त व योग्य आहे. म्हणून देत आहे.

H	Harmony	आनंद	H	Humanity	मानवता
I	Intensive	अतिदक्ष	I	Intrigity	अखंड, एकात्मता
N	Noble	आदर्श	N	Novelty	नाविन्य
D	Divine	स्वर्गिय, ईश्वरी	D	Durability	टिकाऊ
U	Universal	विश्वात्मक	U	Understanding	समज

ही दहा मूल्ये हिंदूंची आहेत. आमच्याजवळ अक्षय सुखाची साधने आहेत. अमर उन्नती करु शकतो व चिरायु वैभव भोगू शकतो. पण पाश्चिमात्यांचे क्षणिक सुख, क्षणिक उन्नती व क्षणिक वैभव या मागे आपण भुलतो आहोत.

हिंदूंची व्यापक दृष्टी एवढी आहे 'हे विश्वची माझे घर ।।' ज्ञाने. विश्वबंधूभावाची शिकवण जगास देण्याचा आमच्या संस्कृतिचा अधिकार आहे. आमची प्रार्थनाच सर्वांकरिता म्हणजे जगाकरिता आहे.

१) असतो मा सत्‌गमय, २) तमसो मा ज्योर्तिर्गमय, ३) मृत्योर्मा अमृतं गमय - ओऽम शांतीः शांतीः शांतीः ।। सर्वेऽत्र सुखिनः सन्तु सर्वेसन्तु निरामयाः । सर्वे भद्राणि पश्यन्तु मा कश्चित दुःखमाप्नुयात ।।

★ ★ ★ ★ ★

१०० : मागणी

समाजात मागणारा माणूस हलका समजला जातो.

तुका म्हणे करी ब्रह्मांड ठेंगणे । हात पसरी जिणे धीक त्याचे ।।

किंवा

भिक्षा पात्र अवलंबने। जळो जिणे लाजिरवाणे।
ऐसियाशी नारायणे। उपेक्षिजे सर्वथा॥ तु. म.
रहिमन वो नर मर चुके ज्यो कही मागने जाय।
उनसे पहले वो मरे जिन मुख निकसत नाय॥ रहिमन

रहिमन म्हणतात ती माणसे जवळजवळ मेलेली जी दुसऱ्याजवळ मागतात पण असून जे देत नाहीत ते त्याच्या अगोदर मेलेले असतात.

तृणादपि लघुस्तुलस्तुलादपि याचकः।
वायुना किं न नीतोऽसौ? मामयं प्रार्थयेदिती॥ सुभा.

अर्थ - गवतापेक्षा कापूस हलका, कापसापेक्षा याचक हलका. प्रश्न निर्माण होतो वाऱ्याने गवत, कापूस उडून जातो. मग याचकास वारा उडवून का नेत नाही? तर वाऱ्यास भिती वाटते हा माझ्याकडे काही मागणी करेल. जो कोणाकडे काही मागत नाही तो देवास आवडतो. 'काही न मागे कोणासी। तोचि आवडे देवासी॥' तु. म. तुकोबाराय तर म्हणतात आमच्या वडिलांची परंपरा आहे. कोणाकडे काही मागायचे नाही.

काही मागणे हे आम्हा अनुचित। वडिलांची रीत जाणतसो॥ तु. म.

तुकाराम महाराजांचे वडिल वारीस जात. पण देवाच्या (विठ्ठलाच्या) मुखाकडे पहात नसत. फक्त चरणावर डोके ठेवत होते. असं म्हणतात वोल्होवा जेव्हा विठ्ठलाच्या दर्शनास येत होते तेव्हा देव मान खाली घालायचे. कारण सेवेच ऋण म्हणून! एकदा तुकोबाराय यांची मातोश्री कनकाई म्हणाली मी पण आपल्याबरोबर वारीस येणार. वोल्होवा म्हणाले या पण देवाकडे काही मागायचे नाही. दोघे देवळात आले. वोल्होवा दर्शन घेऊन पुढे गेले. मातोश्रींनी विठ्ठलाच्या चरणावर मस्तक ठेवले. देव म्हणाले आईसाहेब आपला चेहरा पडलेला आहे. कनकाई म्हणाल्या अद्याप कूस पवित्र झाली नाही. देव म्हणाले जा मुलगा होईल. संभाषणात वेळ गेला. वोल्होवा व्हरांड्यात गरुड खांबाजवळ थांबले होते. गरुड खांबास आलिंगन, कान धरुन उडी, लोटांगण या सर्व विधी झाल्या होत्या. कनकाई हसत मुखाने आल्या. वोल्होवांनी विचारले एवढा वेळ कां लागला? आपण कांही मागितले कां? कनकाई म्हणाल्या मी आपली आज्ञा कशी मोडेन. पण देव स्वतः वोलून विचारु लागले. काय दुःख आहे? मी मुकी नाही. माझं शल्य सांगितले. देवाने आशिर्वाद दिला जा पुत्र होईल. वोल्होवा म्हणाले परत जा व देवास सांग असा पुत्र दे की तुझी वारी व भजन करेल. कनकाई गेल्या व म्हणाल्या देवा 'ऐसा पुत्र देई गुंडा। (गुंड नव्हे) ज्याचा तिही लोकी झेंडा॥ देव तथास्तु म्हणाले. यामुळे तुकोबाराय यांच्या पोटास आले. जननी जने सो भक्तजने या दाता या शूर। नहीं तो जननी वांझ भली क्या खोवेगा नूर॥ आईने या तिघांना जन्म द्यावा भक्त, दाता अथवा शूर, नाही पेक्षा वांझ बरी. वडिल या शब्दाचा अर्थ संत पण

होतो.

येथ वडिल जे जे करिती। तया नाम धर्म टेविती।
तेचि येर अनुष्ठिती। सामान्य सकळ॥ ज्ञाने.

तुकोबाराय वंश परंपरा (मल वंश) व संत परंपरा (ज्ञान वंश) या अनुषंगाने वोलतात वडिलांची रीत जाणतसो. प्रल्हादास देव म्हणाले काही माग. प्रल्हादाने मागण्यास नकार दिला. देवाने आग्रह केल्यानंतर प्रल्हाद म्हणाला देवा द्यायचेच आहे तर माझी कामनाच नष्ट व्हावी असं दे. कारण कोणताही वर देण्यास तू समर्थ आहेस.

यदीराशीस मे कामान्वंरांस्त्वं वरदर्षभ्॥
कामानां ह्यसंरोहं भवतस्तु वृणे वरम॥ भागवत.

तात्पर्य संत, भक्त देवाकडे काही मागत नाहीत. 'कांही' शब्द फार महत्वाचा वाटतो. कांही शब्दामुळे आरोप येत नाही. काही पुढारी चांगले आहेत. काही कामगार चांगले आहेत वगैरे. तसे कांही मागणे अनुचित व कांही मागणे उचित आहे. पत्नीने पतीकडे साडी मागणे उचित म्हणजे योग्य आहे. पण परत पतीकडे साडी धुऊन द्या हे मागणे अनुचित वाटते. यामध्ये चार प्रकार पडतात.

१) सेवा नाही - मागत सुद्धा नाहीत.

२) जेवढी सेवा - तेवढेच मागणे, जेवढे दिवस काम तेवढ्या दिवसाचा पगार.

३) सेवा थोडी मात्र मागणे फार. उदा. सत्यनारायणाच्या पूजेस जवळ जवळ टाकाऊ पदार्थ वापरतात. दुकानात पूजेचे साहित्य वेगळे असते. मात्र भटजी मंत्र म्हणतात,''अस्माकं सकुटुंबानाम, सपरिवारानाम क्षेम, स्थैर्य, आयुः आरोग्यं प्राप्तर्थ्यम् मने इप्सित सकल कामना सिद्धर्थ्यं॥ 'सोडा पाणी' अर्थात थोड्या सेवेने सकळ कल्याण व्हावे ही मागणी (रेल्वेच्या मालगाडीसारखी)

४) मात्र संत खूप सेवा करतात. किंबहुना जन्मभर देवाची सेवाच करतात मात्र मागत नाहीत.

तुका म्हणे जिवभाव देवापायी। टेवोनिया कांही न मागती॥

तुकोबाराय कांही मागत नाही असे म्हणतात पण त्यांच्याच गाथ्यात मागणीपर १२५ अभंग आहेत. याचा अर्थ कसा लावायचा? त्याचे उत्तर असे, संत मागतात पण देवाचे नाही तर देवच मागतात. देवाचे म्हणजे संसार, देवच म्हणजे जेणे करून देवाची भक्ति, ज्ञान, वैराग्य, प्रेम प्राप्त होईल असे मागणे.

श्रीकृष्णाकडे भारतीय युद्धाच्या वेळी प्रथम दुर्योधन गेला. देव झोपले होते. दुर्योधन देवाच्या डोक्याजवळ बसला. थोड्या वेळाने दुर्योधन गेल्याचे कळल्यानंतर अर्जुनपण देवाकडे गेला व देवाच्या पायाजवळ वसला (भक्ताची जागाच देवाचे पाय) देव उठले व म्हणाले अर्जुना तू

केव्हा आलास? मागून दुर्योधन म्हणाला पहिला नंबर माझा आहे. देव म्हणाले मला अर्जुन पहिला दिसला (हा नटवर्य आहे.) देवाने झोपेचे सोंग घेतले होते. या दुष्टाचे उठल्यावरोवर तोंड दिसू नये म्हणून! देव म्हणाले काय काम आहे? दुर्योधन म्हणाला कौरव पांडवांच्या युद्धात आपली मदत हवी. अर्जुन म्हणाला माझी पण हीच मागणी आहे. देव म्हणाले माझी सर्व सेना एका बाजूस व मी एकटा एका बाजूस, शिवाय शस्त्र हातात धरणार नाही. प्रसंग पडलाच तर चार हिताच्या गोष्टी सांगेन. देव बोलले दोन वाटण्या केल्या आहेत. अर्जुन लहान भाऊ आहे तेव्हा तो पहिले मागू दे. कारण व्यवहार असा आहे. मोठ्या भावाने वाटण्या करायच्या व लहान भावाने उचलायची. दुर्योधन म्हणाला भावास मी मानत असतो तर युद्धाची काय गरज? माझा हक्क पहिला म्हणून, आपले सर्व चतुरंग सैन्य माझ्याकडे पाठवावे. याचा अर्थ देवाचे मागितले. अर्जुनास देव म्हणाले तू खूष आहेस का? अर्जुन म्हणाला देवा आम्हास फक्त आपल्या छत्राचीच गरज आहे. बाकी खोगीर भरती काय कामाची? देवाने फक्त चारच हिताच्या गोष्टी सांगितल्या. चौघांना कसे मारायचे. भिष्म, द्रोण, कर्ण व जयद्रथ. गीतेत या चौघांच्या नावाचा श्लोक आहे.

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान।
मया हस्तांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युध्यस्व जेतासि रणे सपत्नान्॥ गी. ११/३४

१) द्रोणास अश्वत्थामा हत्ती मारून, धर्मराजास खोटे बोलायला लावून (नरो वा कुंजरो वा) हतबल झाल्यानंतर धृष्टद्युम्नास मारण्यास सांगितले.
२) भिष्मास शिखंडी पुढे उभा करुन मारण्यात आले.
३) जयद्रथास प्रथम सूर्य झाकून परत सूर्य दाखवून हा सूर्य व हा जयद्रथ म्हणून अर्जुनाकडून वध केला.
४) कर्णास दाताने बाण मारत असता ब्राह्मणांचा वेश घेऊन सोन्याचे दात पाडून मागितले. "कर्ण भिडता समरंगणी। बाणी व्यपियेला रणी। मागसी पाडोनि। तेथे दात तयाचे॥" तु. म. बाण वंद झाले व अर्जुनास श्रीकृष्णाने मारण्यास सांगितले.

अशा प्रकारे चारच गोष्टीचा श्रीकृष्णाने सल्ला दिला व कौरवांचे दीडपट सैन्य असून पांडवांचा विजय झाला. कारण अर्जुनाने देवच मागितला. तात्पर्य सामान्य लोक देवाचे मागतात.

वाढावे संतान। गृही व्हावे धनधान्य॥ तु. म.

ल्यावे खावे बरे असावे सदैव। हेचि करी हाव संसारी॥ तु. म.

मात्र संत जेणे करून देव जोडला जाईल असेच मागतात. शिवाय देवाजवळच मागतात बाकी कोणाकडे नाही.

मागणे ते मागू देवा। करु भक्ति त्याची सेवा।
काय उणे तयापासी। ऋद्धी सिद्धी ज्याच्या दासी॥ तु. म.

तुजवाचूनि मागणे काय कोणा। मही मंडळ व्यापक विश्वजाणा।
जीव भावना पुरवू कोण जाणे। तुजवाचूनि होत कां राव राणे॥ तु. म.

रामायणात राम प्रभू रावणास जिंकून आल्यानंतर अयोध्येत बक्षिस समारंभ ठेवला. ज्यानी ज्यानी युद्धात पराक्रम गाजविला त्या सर्वांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे बक्षिसे दिली. प्रभू घरच्या लोकांना बक्षिस देऊ लागले. सीतेस म्हणाले मी आता राजा आहे. जे हवे ते मागा. सीता म्हणाली मी काहीच मागणार नाही फक्त एका चोळीकरिता त्या रावणाच्या बंदीखान्यात रहावे लागले. तेव्हापासून ठरविले पातळ अथवा चोळी फाटली तरी मागायचे नाही. ती लाज नवऱ्यास! 'तुका म्हणे नग्न भाज। तरी ते लाज स्वामीसी॥' तु. म. लक्ष्मणास विचारले तुला काय हवे आहे. लक्ष्मण म्हणाला जन्मभर आपला वियोग नसावा. रामायणात रामाचा व सर्व नातेवाईकांचा वियोग झाला आहे. पण लक्ष्मणाचा वियोग नाही. लक्ष्मणाने अवतार संपविला. तेव्हाच रामाने प्रयाण करायचे ठरविले. भरतास विचारले तुला काय पाहिजे भरत म्हणाला धर्म, अर्थ, काम, मोक्ष यापैकी काही नको फक्त जन्मोजन्मी आपली चरण सेवा द्यावी. "अरथ न धरम न काम रुचि गति न चहु निखान। जनम जनम रति राम पद यही वरदान न आन॥" तुलशी. शत्रुघ्नला विचारले तुझी काय इच्छा आहे. शत्रुघ्न म्हणाला प्रभू भरताने तुमची सेवा करावी व मी भरताची म्हणजे संताची सेवा करावी हे वरदान मला द्या. उर्मिलेला विचारले तुला काय हवे. उर्मिला म्हणाली प्रभू विरहाचे दुःख सहन करण्याची शक्ति द्या. कारण चौदा वर्षे लग्न झाल्यावरोवर पतीचा विरह सहन करावा लागला. भरताची पत्नी मांडवीस विचारले तुझी काय मागणी आहे. मांडवी म्हणाली रघुकुलात सून म्हणून आले याचा मला अभिमान आहे. मला काही मागायचे नाही. शेवटी शत्रुघ्न पत्नी श्रुतकिर्तीस प्रभूने विचारले बाळ तुला काय हवे? श्रुतकिर्ती म्हणाली आपण आता राजा झालात. आपण तिघांनी वनवासात वापरलेली वल्कले मला द्या. मी ती 'शोकेस' मध्ये ठेवीन व रोज त्याचे दर्शन घेईन. मला जाणीव राहिल जीवनांत भोगापेक्षा त्यागास फार महत्व आहे. सांगण्याचे तात्पर्य सर्वांनी सेवाच मागितली, जेणे देव जोडेल, अथवा प्रेम वृद्धिंगत होईल.

मागणाऱ्यांचे तीन प्रकार आहेत.

१) एका शेतकऱ्यास राजा प्रसन्न झाला पण त्याने तंबाखूस चुना मागितला. राजाची प्रसन्नता चुन्याकरिता घालविली.
२) एकाने शंकराची उपासना करुन वर प्राप्त करुन घेतला हात लावीन ते सोने झाले पाहिजे. शंकर 'तथास्तु' म्हणाले हा घरी गेला घरास हात लावला. घर सोन्याचे झाले. अधाशीपणाने घरातील सर्व वस्तूना हात लावला, सोन्याच्या झाल्या. मुलगी भेटण्यास आली पण हात लावल्याबरोबर सोन्याची झाली. दुःख झाले. जेवण्यास बसला अन्न सोन्याचे झाले. शेवटी तडफडत मेला. यास अतिशहाणा मागणारा म्हणावा.

३) कमी मागणीत भरपूर प्राप्ति. जसे सती सावित्रीने यमाकडे एकाच वाक्यात मागितले. 'माझ्या सासऱ्यांनी त्यांचा नातू राज्याच्या गादीवर बसलेला पहावा.' पहा किती चातुर्य! एकाच मागणीत किती फायदे १) सासऱ्याचा आंधळेपणा गेला. २) नवरा परत जिवंत म्हणजे सौभाग्य प्राप्ति, ३) मुलगा, ४) श्रीमंती. या सर्व गोष्टी मिळाल्या.

एक राजा रात्री वेष बदलून प्रजेत काय चालले आहे याचे परिक्षण करीत असे. सेनापतीने राजास न कळता संरक्षण मंडळ ठेवले होते. एक दिवस, पाऊस पडत असताना राजाने कपडे बदलले पण बोटातील अंगठी काढून ठेवण्यास राजा विसरला. रात्रौ १२ वाजता एका रस्त्याने राजा चालला होता राजाचे संरक्षणदल चहा पित मागे राहिले. राजास दोन चोरांनी पाहिले त्यांना अंगठी दिसली त्यातील हिरा चमकत होता. चोरांनी विचार केला माणूस फाटका दिसतो आहे. पण अंगठी १ लाख रुपयाची दिसते. ही हस्तगत केली की वर्षभर चोरी करण्याची गरज नाही. एकाने राजास खाली पाडला व एक अंगठी काढून घेऊ लागला. राजा ओरडला कोणी वाचवा. बाजूच्या धर्मशाळेत सहा विद्यार्थी परिक्षेकरिता आले होते. त्यांना आवाज गेला. ते तसेच बनियन व लुंगीवर बाहेर आले. पहातात तो दोन माणसे एका माणसाची पिटाई करत आहेत. हे सहाजण होते तिघातिघांनी एकेकाला धरले व झोडपले. दोघे चोर पळाले. राजा वाचला व अंगठी पण वाचली. राजाने सहा विद्यार्थ्यांचे आभार मानले व सकाळी चहापाण्यास बोलाविले. विद्यार्थ्यांनी नकार दिला. म्हणाले हे आमचे कर्तव्यच होते. शिवाय ते दोघे आम्ही सहाजण, अवघड काहीच नव्हते. राजाने आग्रह केल्यावर विद्यार्थी म्हणाले कुठे यायचे. राजाने ओळख दिली नाही. राजवाड्याजवळ येण्यास सांगितले. मुलांनी विचार केला कदाचित राजाचा नोकर असावा व सरवंट क्वार्टर्स मध्ये रहात असेल. सकाळी कपडे करुन सहाजण राजवाड्याजवळ गेले. पाहतात तर प्रत्यक्ष राजा स्वागतास उभा होता. त्यांना विस्मय वाटला. राजाने तातडीची सभा घेतली व जाहीर केले यांनी माझा प्राण वाचविला आहे यांना मी त्यांच्या इच्छेप्रमाणे बक्षिस देणार आहे. मागण्यास सांगितले. पहिला म्हणाला नोकरीचा भरोसा नाही. शिक्षणास काही अर्थच उरला नाही. माझा कुठे वशिला नाही. आपण मला व्यापाराकरिता ५ लाख रुपये द्यावे. मंजूर झाले. दुसऱ्याने सांगितले आपण मला गावी ५ लाखाचा बंगला बांधून द्यावा. राजा बोलले मंजूर ! तिसरा बोलला मी व्यापारी आहे. कितीही प्रामाणिकपणाने धंदा केला तरी लोक दोन नंबरचा पैसा म्हणतात. मला आपले 'मानपत्र' हवे. राजाने मागणी मान्य केली. चौथा म्हणाला माझे लग्न जमत नाही. पूर्वी मी मुली नापसंत करत होतो पण आता वय वाढल्यामुळे मुलीच मला नापसंत करतात. तरी मला वधू मिळवून द्यावी. राजाने प्रधानजीला सांगितले आपली एकूलती एक मुलगी यास द्या व घरजावई करुन घ्या. प्रधानजीनी मान्यता दिली व तो खूष झाला. पाचवा म्हणाला माझ्या गावचा रस्ता, गावात पाण्याची, विजेची, शाळेची सोय सरकारने करावी राजा म्हणाला याची मागणी ताबडतोब मंजूर करा. कारण हा स्वतःकरिता मागत नाही. गावाकरिता मागतो आहे. सहावा

म्हणाला माझी इच्छा आहे आपण राजाराणी दरवर्षी दिवाळीस माझ्या घरी चार दिवस येऊन रहावे. सर्वांनी त्यास मुर्खात काढले. दिवाळी ६-७ महिने लांब होती. प्रधानजींना सांगितले आम्हांला ज्याच्या घरी दिवाळीस जायचे त्याचे गाव व घर पाहून या. प्रधानजी गेले पाहतात तो खडड्याचा रस्ता व तो मुलगा साध्या झोपडीत रहात होता. प्रधानजी म्हणाले इथे राजा येणार का? तो म्हणाला माझी मागणी आहे. प्रधानजींनी राजाला सविस्तर माहिती सांगितली. राजा म्हणाला. प्रथम त्यास बंगला बांधून द्या. शिवाय ५ लाख दरवर्षी दुरुस्ती खर्च द्या. ज्या गावी जायचे त्या गावचा रस्ता दुरुस्त करा. गावात पाण्याची, विजेची सोय करा. एक बाग बनवा. त्याचे लग्न झाले का? प्रधानजी बोलले नाही. प्रथम आपण त्यास जावई करुन घेऊ म्हणजे आमच्या आवडीचे पदार्थ आम्हास दिवाळीस मिळतील. शिवाय राजास कुठेही उतरता येत नाही त्यास प्रथम सेनापती म्हणून मानपत्र द्या. सांगण्याचे तात्पर्य पाच जणांची मागणी या एकट्यास मिळाली. हाच शहाणा ठरला. यास चतुर मागणारा म्हणतात.

संत हे असे चतुर मागणारे आहेत. देवाच्या चरणाचीच इच्छा करतात देवाच्या चरणाजवळ काय मिळणार नाही?

तुका म्हणे कांही न मागो आणिक। तुझे पायी सुख सर्व आहे॥

४) मागणाऱ्याची पात्रता हवी - काही माणसे मागतात पण परत देताना परवा देतो परवा देतो असे एक सारखे बोलतात अर्थात परत देण्याची पर्वाच करत नाहीत.

५) देणाऱ्याची पात्रता हवी. देव उदार आहे व सर्व संपन्न आहे. संसारी व परमार्थिक सर्व वस्तू परमात्मा देऊ शकतो.

६) ज्यांच्याकडे मागायचे त्यांच्यावर ऋण हवेत. संतांचे देवावर अनंत जन्माचे ऋण असते. "तुका म्हणे देवा। ऋणी करुनि ठेवू सेवा॥" त्यामुळे मागण्याचा अधिकार आहे.

जीवाने देवाकडे देवच मागावा. अर्थात त्याची सेवाच मागावी.

हेचि दान देगा देवा। तुझा विसर न व्हावा॥ १॥
गुण गाईन आवडी। हिच माझी सर्व जोडी॥ २॥
न लगे मुक्ति आणि संपदा। संत संग देई सदा॥ ३॥
तुका म्हणे गर्भवासी। सुखे घालावे आम्हासी॥ ४॥

★ ★ ★ ★ ★



॥श्री सन्त तुकाराम महाराज॥

।। पसायदान ।।

आता विश्वात्मकें देवें । येणे वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । पसायदान हें ।।१।।

जे खळांची व्यंकटी सांडो । तया सत्कर्मी रती वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जिवाचे ।।२।।

दुरितांचे तिमिर जावो । विश्वस्वधर्मसूर्यें पाहो ।
जो जे वांछील तो ते लाहो । प्राणीजात ।।३।।

वर्षत सकळमंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी ।
अनवरत भूमंडळी । भेटतू भूतां ।।४।।

चलां कल्पतरूंचे आरव । चेतना चिंतामणींचें गांव ।
बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।५।।

चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन ।
ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु ।।६।।

किंबहुना सर्वसुखीं । पूर्ण होऊनि तिहीं लोकीं ।
भजिजो आदिपुरूखीं । अखंडित ।।७।।

आणि ग्रंथोपजीवियें । विशेषीं लोकीं इये ।
दृष्टादृष्ट विजयें । हो आवे जी ।।८।।

येथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल दान पसावो ।
येणे वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ।।९।


श्री.ह.भ.प.वैभव म.जगताप
पांडेपोखरीकर ता.परतूर जि.जालना.मो.8408049323